म.ग्रं.सं., संग्रह शाखा, ठाणे.
विषय : निबंध
दा.क्र. : ३२४५





# दलित पुरुषांच्या आत्मचरित्रातील स्त्री-प्रतिमा

## शोभा भागवत







प्रकल्प प्रमुख:
डॉ. फ्रान्सिस मारिया यासस

स्त्री वाणी प्रकाशन

REFBK-0025524










मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

17 APR 1988
20 APR 1988
8 MAY 1988
31 JUL 1988
7 AUG 1988
9 SEP 1992

10 SEP 1992

(क्र. मा. पहा)
५०००–११–८६

अप्रभ निबंध
३२८५
२५५२८
७।३।८८

वाचनालय ठाणे
ग्रं. क्र. ३२८५
निबंध २५५२८
७।३।८८

REFBK-0025524

दलित पुरुषांच्या आत्मचरित्रातील

# स्त्री प्रतिमा

शोभा भागवत

स्त्रीवाणी प्रकाशन

**स्त्रीवाणी प्रकाशन**
संपादिका : फ्रान्सिस यासस
द्वारा– ईशवाणी केंद्र
नगर रोड, पुणें ४११०१४

**सर्व हक्क प्रकाशकाधीन**

**मुद्रक**
**उषा वाघ**
८६१।१, सदाशिव पेठ
पुणें ४११०३०

मुद्रणस्थळ : हंस प्रिंटिंग प्रेस
४७४।१ सदाशिव पेठ
पुणें ४११०३०

**प्रथमावृत्ती : सप्टेंबर १९८७**

**मुखपृष्ठ : अनिल उपळे कर**

**वितरण व्यवस्था**
सुगावा प्रकाशन
८६१।१, सदाशिव पेठ
पुणे ४११०३०

मूल्य : पंचाहत्तर रुपये

दलित पुरुषांच्या आत्मचरित्रातील

# स्त्री प्रतिमा

# अनुक्रम

प्रस्तावना १

**विभाग पहिला–चर्चासत्र वृत्तान्त**

१) प्रास्ताविक ५
२) स्त्री- पुरुष नातं १२
३) स्त्रीचं जग २४
४) स्त्रीची भाषा ४८
५) स्त्रीचं बदलतं स्थान ६२
६) समारोप ७५

**विभाग दुसरा–शोधनिबंध**

१) दलित स्त्रीची प्रतिमा ७९
२) दलित स्त्रीची वास्तव प्रतिमा ९२
३) दलित आत्मचरित्रातील स्त्री ९९
४) बलुतं– स्त्रीजग, स्त्रीपुरुष नातं, स्त्रीचं बदलतं स्थान १४७
५) दलित पुरुषांच्या आत्मचरित्रातील स्त्री-विश्व १५३
६) दलित स्त्रीचा व तिच्याबद्दलचा भाषाव्यवहार १६१
७) दलित स्त्रीचं बदलतं स्थान १७५

**विभाग तिसरा–निवडक परिच्छेद**

१) बलुतं १८३
२) उपरा २२१
३) आठवणींचे पक्षी २५१
४) मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे. २५९
५) तराळ अंतराळ. ३०५

# FOREWORD

This volume, aptly edited by Shobha Bhagwat, brings out the varying images of Dalit women as portrayed in the autobiographies of Dalit men creative writers. This includes other writers' critical reflections on the same images in the papers they especially prepared for and which were discussed by participants in a seminar of which this volume is a product-

Simultaneonsly, for the same seminar, women researchers of Streevani's research project on images of women in Maharashtra (as well as other scholars and participants), also prepared, presented and discussed, from a feminist perspective, the images of Dalit women as depicted in the Dalit men creative writers' autobiographies. The result has been a most fruitful creative tension and dialogue between Dalit men creative writers, women researchers, scholars and women activists, the kind of a meeting that should be held more regularly.

Dalit men and women creative writers have a unique role to play in Indian society not only in depicting, and thus making visible, what has been and is the image of Dalit women, but also in taking that great creative and contemplative leap into the future for humankind in envisioning what these images of women might and should become.

Frances Maria Yasas

# प्रस्तावना

स्त्री–वाणी ही स्त्रियांचा अभ्यास करण्यासाठी १९८१ मध्ये स्थापन झालेली संस्था आहे. ' ईश–वाणी केंद्र, पुणे ' या संस्थेचा हा विभाग. १९७५ साली आंतरराष्ट्रीय स्त्री–वर्ष जाहीर झालं आणि स्त्रियांच्या स्वतंत्र अस्तित्वाची समाजाला, आणि स्त्रियांना स्वतःलाही, अधिक स्पष्टतेनं जाणीव झाली. पुरुषांपेक्षा स्त्रियांचे अनुभव वेगळे असतात, ते व्यक्त करण्याची त्यांची भाषा वेगळी असते, त्यांची जगण्याची मूल्यं वेगळी असतात अशी आता जाणीव होते आहे. स्त्रियांच्या जीवनाचा अभ्यास करून हा वेगळेपणा टिपण्याचा स्त्री–वाणीचा प्रयत्न आहे. स्त्रियांच्या वेगळेपणाला आजपर्यंत पुरुषांच्या नजरेतूनच– पुरुषप्रधान संस्कृतीच्या मापानंच तोललं जात होतं. या अन्यायाची स्त्रियांना पूर्वी जाण नव्हती असं नाही. प्रत्येक स्त्री जीवनात कधी ना कधी अन्यायाविरुद्ध प्रश्न विचारते, छोटे–मोठे ठाम निर्णय घेते. आपल्या आयुष्याला, बारीकसे का होईना, स्वतःच्या इच्छेने वळण देण्याचा प्रयत्न करते याची कुठेही नोंद नसते. आजवर एकूणच मानवी संस्कृतीच्या विकासासाठी स्त्रियांनी किती काम केलं याची नोंद फारशी कुठे आहे?

स्त्री–वाणीच्या संचालिका डॉ. फ्रान्सिस यासस या बाईंनी या प्रश्नामधून स्त्री– प्रतिमेचा अभ्यास करायचं ठरवलं. यासस बाईंनी जवळ जवळ १५ वर्षांच्या

वर यूनोमध्ये नोकरी केली. या निमित्ताने त्यांनी जगातले २०–२२ देश, तिथली संस्कृती, तिथल्या स्त्रिया जवळून बघितलेल्या आहेत. त्यांचं भारतावर, गांधी-विचारावर, भारतीय संस्कृतीवर अत्यंत प्रेम आहे. यूनोतून निवृत्त झाल्यावर त्यांनी ठरवलं की भारतात राहून भारतीय स्त्रीचं जीवन समजवून घेऊन तिचे प्रश्न सोड-विण्याच्या प्रयत्नांना हातभार लावायचा. त्यांनी स्त्रीवाणीच्या वतीने स्त्री-प्रतिमेच्या अभ्यासाची योजना ठरवली. या अभ्यासात त्यांना उपसंचालिका श्रीमती सुमित्रा भावे यांची समर्थ साथ लाभली.

स्त्री–प्रतिमेच्या या अभ्यासात स्त्री–वाणीने मुंबईसारख्या शहरातल्या सुशि-क्षित स्त्रियांचा अभ्यास केला, ब्रह्मचारी ख्रिश्चन स्त्रियांचा अभ्यास केला, ग्रामीण भागातल्या स्त्रियांचा अभ्यास केला आणि दलित स्त्रियांचाही अभ्यास केला. दलित स्त्रियांच्या अभ्यासाचा एक भाग म्हणून स्त्री–वाणीनं दलित पुरुषांच्या आत्म-चरित्रातील स्त्रीप्रतिमांचा अभ्यास केला.

या अभ्यासासाठी पाच आत्मचरित्रं निवडली होती.

| | |
|---|---|
| १) तराळ अंतराळ | श्री. शंकरराव खरात |
| २) बलुतं | श्री. दया पवार |
| ३) उपरा | श्री. लक्ष्मण माने |
| ४) आठवणींचे पक्षी | प्रा. प्र. ई. सोनकांबळे |
| ५) मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे | श्री. माधव कोंडविलकर |

ह्या आत्मचरित्रांवर स्त्री–वाणीच्या उपसंचालिका श्रीमती सुमित्रा भावे, स्त्री–वाणीत संशोधन करणाऱ्या श्रीमती शोभा भागवत आणि सुप्रसिद्ध लेखिका श्रीमती सरिता पदकी यांनी काम केलं.

ही पाचही आत्मचरित्रं वाचून त्यांतले स्त्रियांबद्दलचे प्रसंग, संदर्भ, उल्लेख वेगळे काढणं आणि त्यांची वर्गवारी करणं हे काम सरिता पदकी यांनी केलं. ह्या आत्मचरित्रांचा अभ्यास करताना प्रत्येक आत्मचरित्रात किती स्त्रियांचा उल्लेख येतो याचा नुसता आकडा काढला तरी लक्षात येतं की पुरुषांच्या मानाने स्त्रियांची संख्या खूपच कमी आहे.

| | स्त्रिया | पुरुष |
|---|---|---|
| तराळ अंतराळ | ७१ | २०७ |
| बलुतं | १०९ | २१७ |
| उपरा | ५१ | १५५ |
| आठवणींचे पक्षी | ३९ | ११३ |
| मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे | ९४ | १८५ |

याशिवाय स्त्रियांच्या दिसण्याविषयीचे उल्लेख, स्त्रीचं बालपण, लग्न, वैवा-हिक जीवन, स्त्रीची कामं, तिचं प्रत्यक्ष बोलणं, मनातलं बोलणं, तिच्या जीवनातले आनंदाचे प्रसंग, दुःखाचे प्रसंग, तिचं इतरांशी नातं, इतरांचा तिच्याविषयीचा दृष्टि-

कोण अशा अनेक कोनांतून तपशीलवार अभ्यास केला त्याबद्दलचे उल्लेख पुढे दिलेल्या चर्चेच्या वृत्तान्तात आहेत.

आत्मचरित्रांच्या अधिक अभ्यासासाठी लेखकांच्या उपस्थितीत

स्त्री–पुरुष नातं
स्त्रीचं जग
स्त्रीची भाषा
स्त्रीचं बदलतं स्थान

ह्या चार विषयांवर चर्चा व्हावी यासाठी चर्चासत्र आयोजित केलं होतं.

ह्या चर्चासत्रात पुढील गोष्टींची चर्चा व्हावी हा स्पष्ट उद्देश समोर होता–

१) स्त्रीवाणीच्या स्त्रीप्रतिमेच्या अभ्यासात दलित स्त्रियांच्या प्रतिमेविषयी आलेली जाण.
२) चर्चासत्रात सहभागी झालेल्या जाणकारांचा दलित स्त्रियांविषयीचा दृष्टिकोण आणि त्यांचे अनुभव.
३) दलित स्त्रीचं बालपण, तारुण्य, प्रौढत्व, वृद्धत्व या प्रवासात तिची प्रतिमा घडवणाऱ्या व्यक्ती, प्रसंग, परिस्थिती, अनुभव, समाज यांचं विश्लेषण.
४) दलित पुरुषांचा त्यांच्या जीवनात आलेल्या दलित स्त्रियांविषयीचा दृष्टिकोण.
५) दलित स्त्रीची माणूस म्हणून अधिक ओळख करून घेण्यात लेखक, सामाजिक कार्यकर्ते, दलित चळवळीतले कार्यकर्ते आणि अभ्यासक यांची भूमिका काय असावी?

ह्या चर्चासत्रात झालेल्या चर्चेचा सविस्तर वृत्तान्त हा ह्या पुस्तकाचा पहिला भाग आहे.

दुसऱ्या भागात चर्चासत्रासाठी विविध अभ्यासकांनी लिहिलेले शोधनिबंध दिले आहेत.

तिसऱ्या भागात ह्या पाच आत्मचरित्रातले स्त्रियांच्या संदर्भातले महत्त्वाचे परिच्छेद संकलित केले आहेत.

दलित स्त्रियांच्या अभ्यासात, त्याचप्रमाणे स्त्रियांविषयीच्या कार्यक्रमांच्या आयोजनात, मग ते शिक्षणाविषयी असोत, कुटुंबकल्याणासाठी असोत किंवा स्त्रियांच्या कामाविषयी, हक्कांसाठीच्या चळवळीविषयी असोत. ह्या अभ्यासाचा निश्चितपणे उपयोग होईल असा आमचा विश्वास आहे.

दलित पुरुषांच्या आत्मचरित्रातील स्त्री प्रतिमांच्या या अभ्यासात मार्गदर्शन आणि मदत करणाऱ्या या सर्वांचे आम्ही मन:पूर्वक ऋणी आहोत.

| | |
|---|---|
| श्री. पी. डी. कुलकर्णी | श्रीमती सरिता पदकी |
| श्री. शंकरराव खरात | श्रीमती सरोज टोळे |

**– शोभा भागवत**

**ह्या चर्चासत्रात खालील व्यक्तींनी भाग घेतला–**

| | |
|---|---|
| श्री. शंकरराव खरात | श्रीमती विद्या बाळ |
| डॉ. गंगाधर पानतावणे | श्रीमती विजया चौहान |
| श्री. दया पवार | डॉ. नीलम गोऱ्हे |
| श्री. माधव कोंडविलकर | श्रीमती आशा मुंडले |
| प्रा. प्र. ई. सोनकांबळे | श्रीमती सरिता पदकी |
| श्री. लक्ष्मण माने | श्रीमती बेबी कांबळे |
| श्री. जनार्दन वाघमारे | श्रीमती उषा कोंडविलकर |
| श्री. गो. म. कुलकर्णी | श्रीमती स्टेला फारिया |
| श्री. पी. डी. कुलकर्णी | श्रीमती मर्सी मॅथ्यू |
| डॉ. अशोक केळकर | श्रीमती ॲनी मायकेल |
| डॉ. विद्याधर पुंडलिक | श्रीमती अंजली मायदेव |
| डॉ. अनिल अवचट | श्रीमती सरोज टोळे |
| डॉ. बाबा आढाव | श्रीमती वसुधा सरदार |
| डॉ. भालचंद्र फडके | श्रीमती शिल्पा मुंब्रीस्कर |
| श्री ॲन्डर्स यॉन्सन | डॉ. फ्रान्सिस यासस |
| फादर झायटलर | श्रीमती सुमित्रा भावे |
| फादर पीटर | श्रीमती शोभा भागवत |
| फादर ऑगस्टिन | श्रीमती राणी मुळे |

या सर्वांना धन्यवाद !

विभाग पहिला

# चर्चासत्र वृत्तान्त

१) प्रास्ताविक

२) स्त्री- पुरुष नातं

३) स्त्रीचं जग

४) स्त्रीची भाषा

५) स्त्रीचं बदलतं स्थान

६) समारोप

चर्चासत्रात झालेली चर्चा जशीच्या तशी देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

संपादक.

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ........
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## १ प्रास्ताविक

### दलित पुरुषांच्या आत्मचरित्रातील स्त्री–प्रतिमा
### चर्चासत्र वृत्तान्त

चर्चासत्राच्या सुरवातीला सर्व उपस्थितांचं स्वागत स्त्रीवाणीच्या संचालिका डॉ. फ्रान्सिस यासस यांनी केलं आणि उपसंचालिका श्रीमती सुमित्रा भावे यांनी स्त्री-वाणीच्या अभ्यासाविषयी विवेचन केलं–

### सुमित्रा भावे

स्त्रीच्या मनामध्ये शिरून तिला नेमकं काय म्हणायचं आहे ते आजमावावं म्हणून ह्या अभ्यासाचा अट्टाहास. मोजक्या स्त्रियांशी जास्त जवळीक साधली, त्यांच्या जीवनाविषयी आत्मीयता दाखवली तर ते योग्य ठरेल असं आम्हाला वाटलं. एरवीचे जे अभ्यास असतात किंवा जी संशोधनं असतात त्यांच्यापेक्षा फार वेगळी पद्धत स्त्रीवाणीने अंगीकारली आहे.

दलित स्त्रीचा अभ्यास स्त्रीवाणीत झाला. मुंबईसारख्या मोठ्या औदयोगिक शहरातल्या सुशिक्षित स्त्रियांबद्दलचा अभ्याससुद्धा स्त्री–वाणीने केला. त्याचप्रमाणे ब्रह्मचारी ख्रिश्चन स्त्रियांचा अभ्यास इथे चालू आहे. हे जे स्त्रियांविषयीचे अभ्यास केले त्याला आम्ही नाव दिलं 'सहभागी संवाद पद्धती.' म्हणजे आम्ही या स्त्रियांना भेटायचो, त्यांच्याशी परिचय करून घ्यायचो, त्यांच्याशी बोलायचो. मग आम्ही ठरवलं की, त्यांची नुसती मुलाखत नाही घ्यायची, नुसते प्रश्न नाही विचारायचे, तर संवाद साधायचा. म्हणजे नेमकं असं की, केवळ आम्ही त्यांना प्रश्न विचारायचो नाही तर त्यासुद्धा आम्हांला प्रश्न विचारू शकायच्या. बऱ्याच वेळा–प्रश्न विचा-रायचे, त्याची उत्तरं लिहून घ्यायची व संशोधन करणाऱ्यांनी तीच उत्तरं समोर ठेवून त्यांचा अभ्यास करायचा असंच घडतं. ही पद्धत थोडी बाजूला ठेवून आम्ही ही संवादाची पद्धत अनुसरली. अगदी खुलेपणानं आम्ही त्यांना प्रश्न विचारले, त्यांनी आम्हांला प्रश्न विचारले आणि एकमेकींची आयुष्यं आम्ही जाणून घेतली. त्यामुळे आम्ही अगदी थोडया म्हणजे फक्त दहा दलित स्त्रियांच्या जीवनाचा अभ्यास करू शकलो. मात्र तो आम्ही अत्यंत बारकाईनं केला. अत्यंत जवळून केला.

त्यांच्या संपूर्ण जीवनाची कथा आम्ही त्यांच्या तोंडून ऐकली. त्यांतील अनेक प्रसंगांच्या संदर्भात आम्ही त्यांच्याशी चर्चा केल्या. आता कथांच्या स्वरूपात आम्ही जे पुस्तक काढणार आहोत त्यामध्ये तो संवाद येणार नाही, परंतु संपूर्ण आत्मकथन मात्र येणार आहे. या आत्मकथांमधून आम्हाला अनेक गोष्टी जाणवल्या. स्त्रीला स्वतःविषयी काय वाटतं, तिच्या कुटुंबजीवनाविषयी काय वाटतं, ती जिथे कामाला जाते तिथले तिचे अनुभव कसे आहेत, धार्मिक गोष्टींबद्दल तिला काय वाटतं, तिच्या कल्पना काय आहेत आणि तिच्या भोवतालचा व्यापक समाज कसा आहे हे सगळं बघायचं होतं. दुसरं असं आम्ही ठरवलं होतं की नुसतं 'तुम्हाला आमक्याविषयी काय वाटतं?' असे प्रश्न विचारायचे नाहीत. तर प्रत्यक्ष जीवनातले अनुभव, प्रसंग सांगायला लावायचे. नंतर त्यातला अर्थ शोधून काढायचा. त्यामुळे या ठिकाणी बायकांची केवळ मतं विचारली नाहीत. स्त्रीची प्रतिमा जर पहायची असेल तर कोणत्या प्रसंगी ती कशी वागली हे पाहणं आवश्यक आहे. असं आम्हाला वाटतं हा अभ्यास करताना आम्हाला असं जाणवलं की जी प्रतिमा समाजानं आपल्यावर लादलेली असते तीच प्रतिमा आपलीच आहे असं आपल्याला वाटायला लागतं. आणि प्रत्यक्ष प्रसंगात वागल्यावर आपल्या लक्षात येतं की, अरे! समाजाने लादलेल्या प्रतिमेपेक्षा आपण काहीतरी वेगळेच वागलेलो आहोत. काहीतरी वेगळंच वळण घेतलेलं आहे. अभ्यास करतानाचा आणि प्रत्यक्ष प्रसंगामधील वागणुकीतला हा जो वेगळेपणा आहे तो आम्हाला जास्त महत्त्वाचा वाटतो आणि ती जी उमटलेली प्रतिमा आहे ती प्रतिमा स्त्रीच्या आंतरमनातील प्रतिमा आहे असं गृहीत धरून आम्ही आमचा अभ्यास केला.

मुंबईमधील सुशिक्षित स्त्रियांबद्दल सुद्धा आम्ही अभ्यास केला. त्याबद्दल मला आपल्याला सांगावंसं वाटतं. या स्त्रिया सुशिक्षित, नोकरी करणाऱ्या आहेत. पुरेशी आवक असणाऱ्या आहेत. परंतु अत्यंत नैराश्य पदरी पडलेल्या अशा आहेत. ज्यांचं नवऱ्याशी पटलं नाही, ज्यांना नवऱ्यानं मारहाण केली, अन्य प्रकारे छळवणूक केली आणि अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत त्यांना आपलं घर सोडावं लागलं अशा तऱ्हेचे अनुभव घेतलेल्या स्त्रियांनी स्वतःच मदतकेंद्र स्थापन केलं. या केन्द्राचं वैशिष्टच असं की, या केन्द्रात बाहेरचे तज्ज्ञ येऊन या स्त्रियांना मदत करत नसत, तर ज्या स्त्रीने आयुष्यात दुःख भोगलेलं आहे, जी अडचणीतून गेली आहे, त्या स्त्रीनं दुसऱ्या स्त्रीला मदत करायची हे त्या केन्द्राचं वैशिष्टच होतं. तिथे सुद्धा या समान सहभागी पद्धतीनं अभ्यास करणं हे अधिक महत्त्वाचं वाटलं, कारण दोन्हीही स्त्रिया कोणत्यातरी दुर्दैवी अनुभवातून गलेल्या आणि कार्यकर्त्या स्त्रीनं देखील जीवनात असे अनुभव घेतलेले होते आणि मग तिनं अशा अनुभवातून जाणाऱ्या स्त्रियांसाठी काम सुरू केलं होतं.

ब्रह्मचारी ख्रिश्चन स्त्रिया असा मी जो उल्लेख केला त्या स्त्रिया म्हणजे 'नन्स्' नव्हेत. परंतु या स्त्रियांनी, 'आम्ही आमचं जीवन ईश्वराच्या कामासाठी

वाहून घेऊ. परंतु ते जीवन धार्मिक संस्थांच्या माध्यमातून घेणार नाही, इतर सर्व-सामान्य स्त्रियांप्रमाणे समाजात राहून, समाजाची काहीतरी जबाबदारी मानून; इतर वेळात आम्ही ईश्वराच्या सेवेचं काम करू' अशी धार्मिक शपथ घेतलेली आहे. या ज्या काही ब्रह्मचारी स्त्रिया असतात त्यांच्याकडे पाहून आपल्या असं लक्षातसुद्धा येणार नाही की या स्त्रिया व्रतस्थ म्हणून जीवन जगत असतील. या स्त्रायांचीसुद्धा एक कोंडी असते. धड त्यांना चर्च आपल्यामधले मानत नाही; आणि समाजातले जे सर्वसामान्य लोक आहेत तेही आपल्यातले समजत नाहीत. त्यामुळे व्रतस्थ जीवन तर जगायचं आणि शिवाय कसलीतरी कोंडी अनुभवायची. याही स्त्रियांचा अभ्यास आम्ही असाच अत्यंत सखोल अशा पद्धतीने केलेला आहे.

स्त्रीवाणीचा असा अभ्यास करत असताना आमची एक पद्धत होती. एखादया स्त्रीची मुलाखत झाली, चर्चा झाली की प्रत्येक आठवडयात सर्व स्त्रियांनी एकत्र यायचं आणि जे काही बोलणं झालं त्यावर एकत्र बसून चर्चा करायची. याला कारण आहे. नुसता कोरडा अभ्यासासाठी अभ्यास आम्हाला करायचा नव्हता. सतत असा अनुभव येत होता की आपण या स्त्रियांकडून शिकत आहोत. त्यामुळे आम्ही आमच्या मूल्यांवर टीका करायला शिकलो, की खरोखरच आपण नेमकं काय जगतो आहोत? या बायका अशा प्रकारे जगताहेत आणि आपण कशा प्रकारे जगतो आहोत? या दोन्हींमधील नेमकं नातं काय आहे? अशा तऱ्हेचे प्रश्न सतत आम्ही स्वतःला विचारायला शिकलो. यावर आम्ही खूप चर्चा करत असू.

त्यामुळं आणखी एक जाणवलं की या प्रतिमांचा सखोल अभ्यास करण्यासाठी पुरुषांचासुद्धा सहभाग हवा. ती प्रतिमा बघण्यामधेसुद्धा पुरुषांच्या मनात काय प्रतिमा आहे? त्या प्रतिमेचं बाईच्या मनात असलेल्या प्रतिमेशी काय नातं आहे? ती पुरुषांच्या मनातल्या प्रतिमेपेक्षा वेगळी आहे काय? ती कितपत दूर आहे? एकमेकींपासून त्या किती दूर आहेत? या सगळ्याचासुद्धा शोध घेणं आवश्यक आहे. आणि हे सगळं जाणवायला लागल्यापासून, याससबाईंनी सांगितल्या प्रमाणे, ही जी दलित पुरुषांनी लिहिलेली आत्मचरित्रे आहेत ती लिहिताना त्यांच्या मनामध्ये स्त्रीची काय प्रतिमा उमटलेली आहे हे पाहायचं ठरवलं आणि त्याचा अभ्यास सुरू केला. यामध्ये अत्यंत महत्त्वाची अशी मदत सरिता पदकी यांनी केली. म्हटलं तर ते काम एखादया लायब्ररियनच्या पद्धतीनं करायचं आहे. परंतु ते काम फारच मोलाचं आहे. या पाच आत्मचरित्रांमध्ये जिथे जिथे म्हणून स्त्रीचा संदर्भ आला तो सगळा संदर्भ त्यांनी आपल्या हातांनी लिहून काढला आणि म्हणूनच ते फारच तपशीलाचं असं काम झालं. आपल्याला जी सायक्लोस्टाईल्ड बाडं दिसताहेत ती बाडं या संदर्भाची तयार झालेली आहेत. जिथे कुठे बाईचा उल्लेख आहे, मग ती आई असो, काकू असो, मावशी असो किंवा एखादी शेजारीण असो, तो सर्व तपशील सरिताबाईंनी हातांनी लिहून काढला ते तपशील. वेगळे काढले. त्यांचं वर्गीकरण केलं याच्यामधली आई कशी आहे? बहीण कशी आहे? पत्नी कशी

आहे? मग सगळ्याचं वर्गीकरण केलं. मग ही बाई कशी दिसते आहे. हे पुरुषांच्य नजरेमधून किंवा आपल्या अनुभवामधून पाहण्याचा प्रयत्न या सगळ्या अभ्यासा-मध्ये केलेला आहे. या सगळ्यामागचा हेतू आणि कल्पना अशी की अनेक ठिकाणी स्त्रीमुक्ती वर्ष आणि स्त्रीमुक्ती दशक झाल्यापासून बऱ्याचशा ठिकाणी स्त्रियांच्या विषयी अभ्यासक्रम सुरू झालेले आहेत. एस. एन. डी. टी. सारख्या ठिकाणी स्त्रियां-विषयी अभ्यासक्रम सुरू झालेले आहेत. टाटा इन्स्टिटयूट सारख्या संस्थांमधून खास स्त्रियांचे अभ्यास सुरू झालेले आहेत. दिल्लीसारख्या ठिकाणी याच्यावर खास संस्था निघताहेत. या संस्थांशी बोलल्यानंतर आमच्या एक लक्षात आलं की नेमकं स्त्रीचं जगणं काय आहे? याबद्दलचा डेटा अगर माहिती फार कमी उपलब्ध आहे. आपल्याकडे स्त्रीविषयी ज्याला आपण सेकंडहँड म्हणू अशी खूप माहिती उपलब्ध आहे. परंतु 'प्रत्यक्ष स्त्रीच्या नजरेतून स्वतःचं जीवन' अशा तऱ्हेची माहिती आपल्याकडे अभ्यासासाठी सुद्धा नाही. त्यामुळे आम्हाला असं वाटलं की आम्ही केलेल्या अभ्यासाचा उपयोग अशाप्रकारच्या अभ्यासांसाठी होऊ शकेल. दुसरं असं लक्षात आलं की स्त्री-मुक्तीची जी चळवळ आहे त्यामध्ये स्त्रिया मोठ्या प्रमाणावर सहभागी का होत नाहीत? भारतामध्ये स्त्रियांची मोठी चळवळ का बांधली जात नाही? याचं उत्तर, जर स्त्रियांच्या मनात स्वतःची काय प्रतिमा आहे याचा अभ्यास केला तर मिळू शकेल. स्त्रियांच्या मनातील प्रतिमेवर स्त्रीमुक्तीचं काम अवलंबून आहे, असं आम्हाला वाटलं म्हणून या अभ्यासाचा खटाटोप केला. या आमच्या अभ्यासाबद्दल शोभा भागवत यांनी निबंध लिहिला आहे, त्याच्या वाचनाच्या वेळी अधिक चर्चा होईलच.

## सरिता पदकी

ज्या पुस्तकांचा मी अभ्यास केला त्यापैकी तीन पुस्तकांचे तरी लेखक आज इथे उपस्थित आहेत याचा मला फार आनंद होतो. त्यांच्याशी बोलून आपल्याला अनेक गोष्टींचा मागोवा घेता येईल.

दलित वाङ्मय मी अत्यंत अगत्यानं आणि आवडीनं वाचत होते. मला साधनेमधलं 'दलित शब्द' नावाचं सदर आठवतंय. त्यात अतिशय समर्थ असं दलित काव्य असायचं. ते मला फार आवडायचं. दलित कवितांनी माझ्या मनामध्ये चांगलं घर केलं. अगदी त्याच सुमारास 'उपरा' आणि 'बलुतं' ही अत्यंत जळजळीत अशी आत्मचरित्रं माझ्या वाचनात आली. नंतर 'आठवणींचे पक्षी.' त्यानंतर 'मुक्काम-पोस्ट...' हे पुस्तक वाचताना तर अक्षरशः पाण्यात चामडं कुजल्याचा वास माझ्या नाकात भरत होता. इतकं या आत्मचरित्रांनी मला भारावून टाकलं. सोनकांबळेंचं अगतिक बालपणही डोळ्यांपुढं उभं राहतं. मध्यमवर्गीय वाङ्मयामधलं तरलतेचं वलय आता नष्ट व्हायला लागलं आहे. परंतु दलित साहित्यानं मला वास्तवाच्या अगदी जवळ नेऊन ठेवलं आहे. त्यानं मला फार भारावून टाकलं आहे. इथपर्यंत

दलित स्त्रीचा कुठेही संबंध आलेला नव्हता. परंतु पेपरमधल्या एका बातमीनं ठिणगी पडली. पुढे अस्मितादर्श मासिकाचा दलित स्त्री विशेषांक माझ्या वाचनात आला. साधनेत त्याविषयी चर्चा होणार असं वाटल्याने मला त्याविषयी ओढ निर्माण झाली. त्या तिथे गेल्यावर काय, नेहमीचंच दृश्य दिसलं. एक दलित स्त्री आपल्या मुलाबाळांना घेऊन आली होती. बाकी सर्व पुरुष कार्यकर्ते होते. आम्ही प्रश्न उभा केला, 'बाबांनो, दलित स्त्रीबद्दल बोलायलासुद्धा दलित स्त्रिया येऊ शकत नाहीत का?' कामं आहेत, पोरगं आजारी आहे या सबबी! ही काय कारण आहेत का? मी त्यांना म्हटलं हा अंक तुम्ही त्यांना वाचायला दिला पाहिजे. त्यांना वाचायला वेळ होत नसेल तर तुम्ही भाकरी केल्या पाहिजेत. हें ऐकल्यावर मात्र तिकड उपहासाचा कल्लोळ उठला. असे काही प्रसंग घडले अन् मला फार जाणवलं की दलित स्त्रीचा अभ्यास करायला हवा. दलित स्त्रीचा अभ्यास म्हणजे असं नव्हे की मी त्यांना प्रत्यक्ष भेटू शकेन, त्यांच्याशी बोलू शकेन. प्रत्यक्ष तसं करायला हवं. ते आदर्श. परंतु दुसरं पर्यायी असं मी काय करू शकेन याचा विचार करत असताना ह्या स्त्री-वाणीच्या अभ्यासात दलित आत्मचरित्रातील स्त्रीचा अभ्यास करायचं ठरलं. यामध्ये दलित स्त्रीचं आत्मचरित्र मिळालं असतं तर ते चांगलं झालं असतं. परंतु तोपर्यंत तरी दलित स्त्रीचं आत्मचरित्र उपलब्ध नव्हतं. मुक्ता सर्वगोड, त्यांचं लिखाण नुसत्या आठवणीच आहेंत. तावडे यांचं लिखाणही आत्मचरित्र नव्हे. बेबी कांबळे यांचं लिखाण मात्र आत्मचरित्र आहे. पहिलं दलित स्त्री–आत्मचरित्र असं त्याला म्हणावं लागेल. परंतु ते सुद्धा पुस्तकरूपानं अजून उपलब्ध नाही. तेव्हा दलित पुरुषांच्या आत्मचरित्रांतच स्त्रीची प्रतिमा काय आहे हे बघायचं ठरलं. मी फ्रान्सिस यासस यांना भेटले. आम्ही खूप चर्चा केली. त्यातून काही ठरवलं प्रथम या पाचही आत्म-चरित्रांतून स्त्रिया वेगळ्या करूया. सुरुवातीला वाटलं, पुरुषांच्या आत्मचरित्रांतून स्त्रीला कितीसं स्थान असणार? परंतु बारकाईने पाहिल्यावर असं लक्षात आलं की या आत्मचरित्रात स्त्रिया अगदी ठाण मांडून बसल्या आहेत. विविधतेने आलेल्या आहेंत आणि खूप खरेपणाने आलेल्या आहेत. मराठीत खूप आत्मचरित्रं आली. त्यांवर असत्य भाषणाचा आरोप झाला आहे. परंतु दलित आत्मचरित्रांवर हा आरोप कोणीही केलेला नाही. असं बऱ्याच प्रमाणात स्त्रीचं सत्यदर्शन या आत्मचरित्रांत आहे. म्हणून हा अभ्यास करताना मला कल्पनाही नव्हती अशी दलित स्त्री या आत्म-चरित्रांमधून भेटली. 'तराळ–अंतराळ' मधली आई इतक्या समर्थपणे उभी राहिली आहे की 'शामच्या आई' नंतर ही आई असं मला वाटलं. किती समर्थपणे तिनं आपल्या मुलांना वाढवलं व वेळप्रसंगी आपल्या मुलांच्या मागे उभी राहिली! त्याच प्रमाणे दया पवारांची आई. जन्मभर गॅस चेंबरपुढे बसली आणि भाकरींचा ढीग भाजला. कोंडविलकरांची आई सगळ्या संकटांत त्यांच्या बाजूने उभी राहिली. सोनकांबळ्यांची आई या आत्मचरित्रात नकारात्मक उभी आहे. अशा प्रकारे अनेक प्रकारांनी स्त्रीचं दर्शन घडतं.

असाच एक पंचायतीचा प्रसंग आहे. एका माणसाला दोनशे रुपये हवे होते म्हणून त्याने अगदी सहजपणे आपली बायको गहाण ठेवली. पांढरपेशा मनाला अशा प्रसंगी ज्या यातना होतील त्या त्या माणसालाही झाल्या नाहीत अगर त्या बाईलाही झाल्या नाहीत. आणि अशी ती बाई पाच वर्षपर्यंत त्या माणसाकडे केवळ दोनशे रुपयांच्या बदल्यात राहिली. तो सर्वच प्रसंग अगदी थक्क करून सोडणारा आहे. अनेक अंगांनी दलित स्त्रिया मला भेटल्या.

दलितेतर स्त्रियासुद्धा अशा आहेत की त्यांचीही वेगळी दर्शनं घडतात. उदा. सीता. तिचा नवरा तिला सोडतो. ती हिस्टेरिक होते. नवरा मात्र दुसरं लग्न करतो. पण या वेड्या सीताचं काय करायचं याचा तो विचारही करत नाही. मात्र उपाय सुचवतो की तिला सांडशीनं डागण्या दयायच्या. म्हणजे तिला कोणतंही संरक्षण न देता पारंपरिक उपाय, अघोरी उपाय, ते वापरायचे. या स्त्रियांबद्दल मला काय वाटलं याबद्दल मी पेपर लिहिला आहे.

## पी. डी. कुलकर्णी

आजच्या या कार्यक्रमपत्रिकेत मी विषयाची मांडणी करावी असं आहे माझे विचार व मुद्दे मी मांडणार आहे. ते या पाच आत्मचरित्रांतील स्त्रियांवर. आधारित आहेत असं नव्हे. तेवढं स्वातंत्र्य मी घेतलेलं आहे. मी पांढरपेशा वर्गातला असल्याने व पुरुष असल्याने माझ्या विचारात काही पूर्वग्रह असण्याचा संभव आहे, पण मी तो जाणीवपूर्वक दूर ठेवीत आहे.

सुरुवातीला सांगण्यात आलं की हा जो स्त्रीवाणीचा अभ्यास आहे हा स्त्रीच्या प्रतिमेचा अभ्यास आहे. आणि मला असं म्हणायचं आहे की प्रतिमा हा शब्द जरी मानसशास्त्रीय असला तरी प्रचारमाध्यमे, संपर्कशास्त्र आणि जाहिरातबाजी यांमधून याला जास्त महत्त्व आलेलं आहे.

## प्रा. सोनकांबळे

दलित साहित्य आणि दलित चरित्रं उपलब्ध होऊन खूप काळ झालेला आहे. बाबासाहेबांचा आशीर्वाद या सर्वास कारणीभूत आहे. त्यांची चळवळ सर्वव्यापी असल्याकारणाने दलित आत्मचरित्र हा त्याच्यातील एक भाग आहे. दलित साहित्यास निरनिराळी नावं दिलेली आहेत- कादंबरी, कविता इ. परंतु दलित माणसाचं सारं जीवनच काव्यमय आहे. दलित माणूस जरासा वेगळा असतो. पण वेगळा असतो तेव्हा तो स्त्रियांच्याच जाणिवेतून जात असतो. समाजात सगळ्यात शेवटच्या वर्गातला दलित असतो. आणि दलित स्त्री त्याही पलिकडे असते. त्यांचं शोषण इतर वर्गातले लोक करीत असतात. आणि स्वतः दलितही आपल्या स्त्रीचं शोषण करीत असतात. स्त्रियांचं जीवन जगणं मला फार आवडतं. आमचं– दलितांचं– जीवन

दुसऱ्याला दिसत नसल्यामुळे अधोरेखित करावं लागतं. जीवनातली वावटळ स्त्री-पासून सुरू होते. स्त्रीपाशीच शांत होते. स्त्रीपुरुषांचं जीवन हे एकमेकांवर अवलंबून असतं.

आक्काचं जीवन नसतं तर कदाचित माझं जीवन नसतं. काही नसताना तिनं जे माझ्यासाठी केलं त्यासाठी मी तिला काहीतरी करून मदत करत होतो. आईच्या पश्चात वात्सल्य निर्माण करणारी तीच एक होती. आमच्या तिकडे आईला 'वाई' म्हणतात. 'बा'चं व 'आई'चं दोन्ही कामं करणारी ती बाई

स्त्रीपुरुषांत समानता असेल तर काव्यमय जीवन निर्माण होईल.

या सत्राचे अध्यक्ष श्री. शंकरराव खरात यांनी सत्राचा समारोप करताना सांगितले की, 'स्त्रीवाणी'ला दलित आत्मचरित्रातील स्त्रीप्रतिमा दिसू शकली ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे.

या दलित आत्मचरित्रांतल्या व्यक्तिरेखा कृत्रिम नव्हेत. त्यामुळे स्त्रीची प्रतिमा ही खरीखरी आहे. या आत्मकथनांत दलित स्त्रीचा आत्मा, तिच्या जिवाची तळमळ, तिची व्यथा, वेदना, आशा, आकांक्षा सारं त्यांत आहे.

परंतु ही पाच आत्मचरित्रं म्हणजे त्यात सर्वार्थाने दलित स्त्रियांचं चित्रण आल असं नव्हे. ती प्रातिनिधिक दलितस्त्री समजू नये व तसे निष्कर्षही काढू नयेत.

गेल्या ४० वर्षांपासून दलित स्त्री माणुसकीच्या हक्कांसाठी चालू असलेल्या संघर्षामध्ये आघाडीवर आहे. अशी ही दलित स्त्री 'स्त्रीमुक्ती आंदोलना'ला कितपत जोडली जाईल हा खरा प्रश्न आहे.

## २ स्त्री-पुरुष नातं

### अनिल अवचट

आज सकाळपासून आपण या दलित आत्मनिवेदनांवर चर्चा करत होतो. बऱ्याचश्या आत्मनिवेदनांवर ती खरी आहेत का खोटी या बद्दल नेहमी शंका घेतली जाते. आणि मोठमोठ्या आत्मचरित्रकारांच्या चारित्रामधल्या घटना नंतर खोट्या आहेत असं सिद्ध झालेलं आहे. आत्मचरित्र लिहिताना माणूस नेहमी आत्म-समर्थन करतो. त्यामुळे तो विश्वसनीय पुरावा म्हणून कितपत मानता येईल अशी शंका कोणालाही येणं स्वाभाविक आहे.

आचार्य अत्र्यांचं पुस्तक आहे 'कऱ्हेचे पाणी' आणि 'मी कसा झालो.' त्याच्या प्रकाशनाच्या वेळी एकदा न. र. फाटक असं म्हणाले होते, 'आमच्या बाबुरावांची स्मरणशक्ती इतकी तीव्र आहे की त्यांना घडलेल्या आणि न घडलेल्या गोष्टी सुद्धा आठवतात.'

सांगण्याचा मुद्दा असा की खरातांचं सोडलं तर ही आत्मनिवेदनं आहेत ती सर्व तरुणांनी लिहिलेली आहेत. आणि आत्मचरित्रं ज्या वेळी त्यांनी लिहिली त्या वेळी ती अप्रसिद्ध माणसं होती. त्यामुळे आपली काही इमेज प्रोजेक्ट करण्याचं त्यांना काही कारणही नव्हतं. ती अधिक ऑनेस्ट आहेत असं मला वाटतं. त्यांनी अगदी खरी खरी नावं घेऊन लिहिलेली आहेत. खोटं लिहिलं तर लगेच अंगाशी येईल अशी त्यांना सुद्धा खात्री असेल, म्हणून त्यांनी सर्व खरं लिहिलं असणार.

या लेखनानंतर ज्या रिॲक्शन्स् त्यांच्याकडे आल्या त्यावरून सुद्धा याचा खरेपणा आपल्याला कळेल. बलुतंच्या दुसऱ्या आवृत्तीमध्ये लिहिलेलं आहे की ती प्रसिद्ध झाल्यानंतर काय काय घडलं ते. लक्ष्मण मानेंनी सुद्धा असं बरंच सांगितलं आहे. कोंडविलकरांच्या ज्या नातेवाइकांनी त्यांच्याविरुद्ध बोलायला सुरुवात केली त्यांच्याशी त्यांनी संबंध तोडले. दया पवारांवर तर त्यांच्या बौद्ध समाजातील लोकांनी टीकेची झोड उठवली होती.

या लोकांना ज्यावेळी राहवेनासं झालं व आपलं जीवन लोकांपुढे मांडाव असं वाटलं त्या वेळी त्यांनी लिहलं आहे. आणि त्यासाठी त्यांनी किंमतही मोज-

लेली आहे. इतर आत्मचरित्रं आणि ही आत्मनिवेदनं यांच्यामध्ये हा फार मोठा फरक आहे. इतर दलित साहित्याला जो अभिनिवेश आहे तो या आत्मचरित्रांना नाही आहे. दलित कविता जर पाहिल्या तर सवर्ण समाजावर प्रहार करण्याची त्यांची भूमिका आहे. पण या आत्मनिवेदनांकडे पाहिलं तर असं दिसतं की हे लोक स्वतःचे दोष मांडताहेत, अत्यंत परखडपणे स्वतःकडे पाहताहेत, स्वतःच्या आयुष्यातले अत्यंत लाजिरवाणे प्रसंग वाचकांसमोर ठेवताहेत. त्यांनी एखाद्या प्रिय मित्रालासुद्धा सांगितलं नसेल ते येथे सांगितलं आहे. हे त्यांचं जे सेल्फ एक्स्प्रेशन आहे, त्याच्याकडे विश्वसनीय पुरावा म्हणून बघता येण्याजोगे आहे.

मी खरातांची माफी मागतो की मी त्यांचं तराळ- अंतराळ वाचलेलं नाही. म्हणून खरं तर इथे बोलायला मी अपात्र आहे. या आत्मचरित्रांच्या निमित्ताने समाजाचे निरनिराळे थर इथे आलेले आहेत. आठवणींचे पक्षी आणि बलुतं मधील समाज हे महार समाज जरी असले तरी ते अतिशय भिन्न समाजातले महार समाज आहेत. बलुतं मधला महारवाडा हा संगमनेरजवळचा, अत्यंत पॉवरफुल अश्या गावगाड्यातला महारवाडा आहे व आठवणींचे पक्षी मधला महारवाडा हा तेलंगणाच्या बॉर्डरवरचा महारवाडा आहे आणि अतिशय मागास भागातला महारवाडा आहे. आणि म्हणून त्याचा सुद्धा फरक आपल्याला पहाता येतो. आता कोंडविलकरांच्या पुस्तकात जो आलेला आहे तो कोकणातला चांभार समाज आहे आणि या उपरामधे जो आहे तो भटका समाज आहे. यातून दलितांच्या निरनिराळ्या थरांमधलं दर्शन आपल्याला घडतं. याच्यात लेखकाला सुद्धा महत्त्व येतं. तो काय चित्रण करतो याला सुद्धा महत्त्व आहे.

आता सोनकांबळेंच्या पुस्तकातील चित्रणावरून हा अत्यंत दबून वागणारा, निराधार, दारिद्र्यात वाढलेला असा माणूस आपल्या डोळ्यासमोर येतो. तो या कुठल्याही व्यवस्थेवर रागावताना दिसत नाही. कसंही करून जगायचं आणि शिकायचं येवढीच त्याची इच्छा आहे. त्यात शाळा, बदली आणि जागा याच्याभोवती त्यांचा संपूर्ण विषय घोटाळतो आहे.

पण बलुतं आणि उपरा यांमध्ये अधिक सामाजिक थर आलेले आहेत. संगमनेर-अकोला येथील महारवाडा हा रगेल महारवाडा आहे. पाण्यासाठी त्यांनी जे आंदोलन केलं ते गावाला सुद्धा मान्य करावं लागलं. स्थित्यंतर करून बकाल वस्तीमध्ये राहणारी महार कुटुंबं—तीसुद्धा त्यात तितक्याच प्रखरपणे उल्लेखली गेलेली आहेत. आता उपरामधील भटक्यांच्या कक्षा सुद्धा खूप विस्तारानं आलेल्या आहेत. त्यात जत्रांचा उल्लेख आहे. डोंबाऱ्यांचा उल्लेख आहे. या जमातींमधील निरनिराळे पदर उलगडून दाखवले आहेत. म्हणून आत्ताच्या दृष्टीने मला ही पुस्तकं महत्त्वाची वाटतात.

या पुस्तकांत स्त्रियांबद्दल जे काही आलेलं आहे ते अप्रत्यक्षरीत्या आलेलं आहे. स्त्रियांच्या समस्या मांडण्यासाठी काही त्यांनी पुस्तकं लिहिलेली नाहीत.

पुस्तकं ही स्वतःचं जीवन व्यक्त करण्याकरता आलेली आहेत. स्त्रियांबद्दल एखादा माणूस लिहीत असतो तेव्हा नकळत एखादी भूमिका घेऊन तो लिहीत असतो- की स्त्रियांचे किती हाल आहेत, स्त्रिया किती दडपल्या गेलेल्या आहेत, इ. अशा रीतीने भूमिका घेऊन तुम्ही लिहायला बसलात की नकळत तो तपशील मोल्ड केला जातो आणि स्त्रियांची परिस्थिती किती वाईट आहे हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु इथे अप्रत्यक्षपणे स्त्रियांचा उल्लेख आल्यामुळे अधिक अपीलिंग आहे असं मला वाटतं.

इथे सर्रास दिसणाऱ्या गोष्टी म्हणजे नवरा दारू पिऊन घरी येतो, तो धिंगाणा घालतो, तो बायकोला काळीनिळी होईपर्यंत मारतो. अशी उदाहरणं अनेक आहेत चारित्र्याविषयी शंका घेण्याची दारू पिणं आणि चारित्र्याविषयी शंका घेणं हे एकमेकांशी निगडीतच आहे. आता सकाळी जी उदाहरणं सांगितली होती त्यांचा मी इथे उल्लेख करतो- की नवऱ्याने बायकोला मारलं आणि नंतर तो तिला हळद लावत बसला. हा जो अनुभव आहे हा अत्यंत बोलका आहे असं मला वाटतं.

एका दृष्टीनं पाहिलं तर स्त्रियांचं जीवन अत्यंत बंदिस्त आहे. त्यांना कसली मुभा नाही. एखाद्या विक्रीच्या वस्तूइतकी त्यांना किंमत आहे. यातील काही वाक्यं जर आपण पाहिलीत तर हे जीवन किती गुलामगिरीचं आहे हे आपल्या लक्षात येईल. पण आपण जर त्या जीवनातलं मर्म प्रत्यक्ष पहायचं ठरवलं तर वेगळं दृश्य सुद्धा आपल्याला दिसतं- म्हणजे तांत्रिक दृष्ट्या स्त्रियांचं स्थान दुय्यम आहे, परंतु प्रत्यक्षात ते तसे नाही. अनेक तऱ्हेने त्याची भरपाई प्रत्यक्ष जीवनात होत असते. स्त्रियांच्या जीवनात त्या प्रकारची कोंडी झालेली नाही. वाईट प्रसंग जरी गुदरले तरी तिथेच त्यांचा उतारापण ठेवलेला आहे. आणि म्हणून त्यांचं जीवन सुसह्य झालेलं आहे असं मला वाटतं.

स्त्रीचं जीवन बंदिस्त अजिबात नाही असं मला वाटतं. पांढरपेशा समाजामध्ये जे व्यक्तिमत्व स्त्रियांचं आहे त्यापेक्षा चांगलं व्यक्तिमत्व या स्त्रियांमध्ये आहे असं मला वाटतं. स्त्रिया या पुरुषांच्या बरोबरीनं कामाला बाहेर पडतात, शेतीच्या कामाला जातात हे यामागचं कारण असलं पाहिजे. लक्ष्मण मानेच्या बाबतीत तर संपूर्ण सोपं तोडायला त्या नवऱ्याबरोबर ती बाई आहेच. चोरून जेव्हा ते सोपं तोडत होते तेव्हा त्या नवऱ्याबरोबरीनं त्या बायकोला सुद्धा मारहाण झालेली आहे. म्हणजे प्रत्येक बाबतीत ती या नवऱ्याबरोबर आहे. म्हणजे संसाराचा गाडा चालवण्याच्या बाबतीत तिचं अत्यंत समर्थ व्यक्तिमत्व आपणाला पहायला मिळतं.

आता दया पवारांची जी आई आहे ती नवऱ्याच्या पश्चात समर्थपणे मुलाचं शिक्षण पुरं करते. कोंडविलकरांच्या पुस्तकात आईचं व्यक्तिमत्व अत्यंत रसरशीत आणि उठावदार दिसतं आणि ते डोळस आहे असं मला वाटतं. हा जो फरक आहे तो वरिष्ठ वर्गातल्या स्त्रिया, मध्यम वर्गातल्या स्त्रिया आणि कनिष्ठ वर्गातील स्त्रिया यांमुळे पडतो.

यात इतर स्त्रियांची जर परिस्थिती बघितली तर बर्गेच्या संदर्भात जे आलेलं आहे, त्या स्त्रीला घराबाहेर पडायची परवानगी नाही. तिच्या कुलशीला-बद्दलच्या कल्पना आहेत त्या अतिशय बंदिस्त अशा आहेत आणि अशा परिस्थितीत जर लग्न मोडलं तर वेडं होण्याशिवाय तिला गत्यंतर नाही- वेडं होणं किंवा आत्म-हत्या करणं किंवा नष्ट होणं. परंतु हा जर प्रसंग लक्ष्मण मानेंच्या पुस्तकातील स्त्रीवर गुदरला असता तर काय झालं असतं ? मला असं काही वाटत नाही की ती काही वेडी- बिडी झाली असती. ती काडीमोड घेऊन वेगळी झाली असती

या पुस्तकातच आपण बघतो की एकेका स्त्रीची चार- चार सुद्धा लग्नं झाली आहेत. प्रत्येक बाबतीत जर आपण स्त्रीचं स्थान बघायला गेलो तर त्या त्या प्रत्येक समाजातल्या पुरुषाच्या तुलनेने आपण पहायला पाहिजे असं मला वाटतं—

आता बालविवाह होतात. अगदी तान्ह्या मुलींची लग्नं होतात, त्याप्रमाणे तान्ह्या मुलांची सुद्धा लग्नं होतात. एखाद्या मुलीचं ज्या मुलाबरोबर लग्न झालेलं असतं त्याला सुद्धा काही चॉइस मिळालेला नसतो. त्यामुळे स्त्रियांची स्थिती पुरुषां-पेक्षा काही वेगळी आहे असं मला वाटत नाही.

यात गजरा नावाच्या एका वेश्याव्यवसाय करणाऱ्या बाईचा जो अनुभव आहे, तो जितका वाईट आहे तितकाच तिच्या पोटी जन्म घेतलेल्या मुलांचा अनु-भव वा परिस्थिती सुद्धा वाईटच आहे. त्यांना कोणी मुलगी देत नाही. तेव्हा त्यांची स्थिती सुद्धा दयनीयच आहे. ते जे आपल्या आईला मारहाण करतात तो एक प्रकारचा आपल्या परिस्थितीवर प्रहार करत असतात. त्या घरातील सर्वांनाच एका पद्धतीचं हलाखीचं सामाजिक व आर्थिक जीवन जगावं लागतं, आणि त्यातनं या आपत्ती त्यांच्या वाट्याला येतात.

संसारात माणसांना एकमेकांना धरून रहावं लागतं आणि ज्या काही ॲड-जस्टमेंटस् असतात. उदा. संध्याकाळी नवऱ्याने बायकोला सांगितलं की, 'तू जा घरातून निघून.' आणि ती चुलीत पाणी ओतून निघून गेली. मग हा लटपटला, आरडाओरडा करायला लागला. मग ही बाई परत आली. आता संध्याकाळी उशीरा परत यायचं नाही हा संकेत आहे का नाही ? आहे. परंतु प्रत्यक्षात उशीरा येणाऱ्या स्त्रीला जात वाळीत टाकते असं नाही. परंतु जे संकेत आहेत त्यांची तीव्रता कमी करून माणसं एकमेकांना धरून राहतात.

आता दया पवारांच्या पुस्तकातला मुंबईच्या वस्तीतला जो भाग आहे तो अत्यंत बोलका आहे. प्रत्यक्ष त्या वस्तीत राहणारी आणि धंदा करणारी बाई आहे. प्रत्यक्ष त्यांचे वडील आणि काका यांच्या ठेवलेल्या बाया आहेत. स्त्री-पुरुष संबंधा-संबंधी जी बंधन अगर जे संकेत ब्राह्मण समाजात अगर मराठा देशमुख समाजात आहेत ती बंधनं या समाजामध्ये नाहीत. (इथलं जीवन अधिक प्रॅक्टिकल आहे. जीवनाशी टक्कर देताना हे जे काही भ्रामक संकेत आहेत ते टिकत नाहीत.)

आता यांच्यावर अन्याय होतो तो नेमका कुठं ? तर परजातीच्या समाजा-

कडूनच यांच्यावर अन्याय होतो. आता लक्ष्मण मानेंच्या पुस्तकात ती जी डोंबारी बाई आहे तिच्यावर अन्य समाजातले लोक बलात्कार करतात. इतर लोकांना या भटक्या जमातीतील लोक अगर महार समाजातील लोक हे प्रॉपर्टीसारखे वाटतात. यांच्यावर काही जरी अन्यायकारक केलं तरी यांची काही रिॲक्शन येणार नाही. म्हणून यांच्यावर एक प्रकारचा डोळा असतो. त्यामुळे होणारा त्रास हा खरा त्रास आहे. परंतु हा त्रास संपूर्ण जातीला होणारा त्रास आहे, आणि बळी त्या त्या वेळी स्त्री आहे. परंतु तसाच प्रकार पुरुषांच्या बाबतीतही आढळून येईल. हे जीवन आहे हे मुख्यत्वे करून जातीतून आणि दारिद्र्यातून येणारं जीवन आहे.

यातून आपल्याला काय निष्कर्ष काढता येतील? आता स्त्रियांच्या चळवळींना हवा तसा पाठिंबा का मिळत नाही? तर जातीयतेमध्ये माणसं अतिशय अडकलेली आहेत आणि त्यात सुद्धा कॉम्पेन्सेशन्स पेरलेली आहेत. आता महाराला काय अमक्याचा मान, वेशीवर पाटलाचा घोडा अडवण्याचा मान किंवा जत्रेच्या वेळी रथाची खुंटी ठोकायला तो गावचा सुतारच पाहिजे. तेव्हा प्रत्येक जातीला अशी सायकॉलॉजिकल कॉम्पेन्सेशन्स् आहेत. त्या माणसाला असं वाटतं की वर्षातून एक दिवस असा येतो की, माझ्यावाचून गावाचं अडतं! भंग्यांना सुद्धा काही मान आहे. खरं तर ते अतिशय वाईट अवस्थेत जगतात. पण ते म्हणतात की जर आम्ही काम केलं नाही तर गावचा उकीरडा होऊन जाईल. तसंच वाघ्या मुरळीचं आहे. लग्नानंतर जर देवीचा गोंधळ झाला नाही तर ते लग्न खरं धरलंच जाणार नाही. ही जी सगळी समाजव्यवस्था तयार झाली आहे त्याचा जाच त्यांना होत नाही.' म्हणून यांच्यामधील चळवळींना म्हणावा तसा पाठिंबा मिळत नाही.

आज स्त्री- मुक्तीच्या ज्या काही चळवळी आहेत. त्यांनी या परिस्थितीकडे डोळसपणे पाहिलं पाहिजे असं मला वाटतं. एखादा कोर्स घेऊन आपण या समाजापर्यंत जातो. परंतु तिथे गेल्यावर असं दिसतं की या स्त्रियांना काही प्रश्नच नाहीत. त्यांना प्रश्नच नाहीत का ? तर प्रश्न आहेत, परंतु तुमची जी भाषा आहे ती त्यांच्यापर्यंत पोहचूच शकत नाही. म्हणून ही परिभाषा बदलायची असेल आणि त्यांच्या जीवनातले प्रश्न जर आपल्याला शोधून काढायचे असतील तर त्यांचा 'पोत' लक्षात घेऊन, त्यांची सुख-दुःखं जर आपण जाणून घेऊ शकलो तर आपल्या समाजातील स्त्रियांची परिस्थिती सुधारण्यासाठी फार मोठी मदत होईल.

डॉ. अवचटांच्या या निरीक्षणानंतर 'स्त्री- पुरुष नातं' याविषयी चर्चा झाली—

## सरिता पदकी

आपल्या वयाच्या साठ वर्षांनंतर खरातांनी 'तराळ— अंतराळ' हे आत्मचरित्र लिहिले आहे, त्यामुळे त्यांचं लिखाण संथ आहे.

त्यांच्या आई- वडिलांमध्ये सभ्यतेचं, सौजन्याचं नातं आहे. उरलेल्या चार

आत्मचरित्रांतील नायकांच्या (पर्यायानं लेखकांच्या) आई- वडिलांच्या नात्यामध्ये रंडीबाजी, दारू पिऊन मारहाण या विषयीचे संदर्भ आहेत. परंतु खरातांच्या आई-वडिलांमध्ये एक विशिष्ट प्रकारची डिग्निटी आहे. तसेच आई- मुलाचे (शंकर-रावांचे आणि त्यांच्या आईचे) नातेही अशाच स्वरूपाचे आहे. (उदा:- शंकरराव खरात कुलगुरू झाल्यानंतर त्यांच्या आईने त्यांना लिहिलेले पत्र.)

तेच नेमके शंकरराव खरात आणि त्यांच्या पत्नीबाबत. त्यांच्या पत्नीने लग्न ठरवताना आपले वैद्यकीय शिक्षण पूर्ण करण्याचे कायदेशीर लेखी आश्वासन मागितले.

त्यामुळे एकूणच शंकरराव खरातांच्या आत्मचरित्रातील स्त्रिया इतर दलित स्त्रियांपेक्षा वेगळ्या आहेत.

### अनिल अवचट

सवर्ण स्त्रियांशी संपर्क साधताना या दलित लेखकांच्या मनात भीती आहे. आपण हीन जातीत जन्मलो. त्या मुलीशी घसट वाढली, नातं निर्माण झालं तर घोटाळा होईल. मात्र काही जणांना मदत करणारे लोकही भेटतात. 'उपरा' कार लक्ष्मण मान्यांच्या आंतरजातीय विवाहाला मदत हे त्याचे उत्तम उदाहरण. त्यामुळे सध्याच्या समाजव्यवस्थेचे भयानक रूप एकीकडे दिसते, तर दुसरीकडे अनेक मदत करणारे लोकही भेटतात हा अनुभव आशादायक म्हणावा लागेल.

### गो. म. कुलकर्णी

'मध्यमवर्गीय स्त्री-पुरुष नात्यापेक्षा दलित समाजातील स्त्रीपुरुषांमध्ये अधिक मोकळेपणा असतो, असा आक्षेप. हा उत्तानपणा की मोकळेपणा? मुख्य म्हणजे, त्या नात्यांमध्ये 'डिग्निटी' दिसत नाही. हे त्यांच्या परिस्थितीमुळे की एकूण अभावात्मकतेमुळे असे घडते, हीही शंका आहे. विशेषतः 'बलुतं' वर असा आक्षेप घेतला जातो. याबद्दल तुम्हाला काय वाटतं ?

### अवचट

हे संबंध उत्तान अजिबात वाटत नाहीत. उलट आपल्या समाजात सरळपणा नाही, मोकळेपणाही नाही. दलित लोकांत मध्यमवर्गीयांचे संकेत नाहीत. त्यामुळे यात मोकळेपणा आहे.

### बबी कांबळे

पण यात स्त्रीवर अन्याय होतो, तिच्या वाट्याला दुय्यमत्व येतं. मग हे असंच चालू ठेवायचं का?

**अवचट**

असं चालू ठेवावं असं मी म्हणणार नाही. कारण त्यात स्त्रीचं असलेलं दुय्यम स्थान नष्ट झालं पाहिजे. पण या दलित समाजातील मोकळेपणा निश्चितच कौतुकास्पद आहे.

**गो. म. कुलकर्णी**

'बलुतं' मध्ये दया पवारांच्या वडिलांचं वागणं त्यांची आई का सहन करते? हे कशाचं निदर्शन ? ही तिची अगतिकता म्हणावी की, तिची सहनशीलता, सहजीवनाचा धागा असे म्हणावे ?

**अवचट**

हे वेगळ्या प्रकारचं सहजीवन म्हणावं असं मला वाटतं.

**गो. म. कुलकर्णी**

'बलुतं' या आत्मकथनात दया पवारांची आई नवरा जिवंत असताना त्याला शिव्या देते, पण मेल्यावर देत नाही.

**अवचट**

हे सर्व समाजात आहे, आणि ते तसं न उलगडणारं कोडंच आहे. मुख्य म्हणजे, केवळ संकेतापेक्षा काहीतरी अधिक आहे. तसेच मध्यमवर्गीय लोक संकेत कधी उघड करत नाहीत. रूढीमुळे आपली व्यथा उघडपणें मांडत नाहीत. परंतु दलित समाजात असे नाही.

**पो. डी. कुलकर्णी**

सामाजिक संदर्भात गूढ नातं असतं का ?

**आशा मुंडले**

हें दोघं स्त्री-पुरुष (दया पवारांच्या आईवडिलांच्या संदर्भात) गूढ नात्याच्या जवळ पोचतात. त्यामुळे त्यातील गूढपणा विचारात न घेता त्याचा विचार करता येणारच नाही.

**अवचट**

मानेंची बायको उच्चवर्णीय असली तरी ती त्यांच्यामागे येते. ते का ? ह्यामागे संकेतापलिकडची जवळीक आहें हें लक्षात घ्यावं. आणि या नात्यातील पुढचा भाग गूढ आहे म्हणून तो सोडून देणंच योग्य.

**पो. डी. कुलकर्णी**

आपल्या वागणुकीने दलित पुरुषाने जर आपल्या पत्नीवरील अत्याचार—अन्याय इत्यादींबाबत भरपाई केली तरी त्यानं असा जुलूम करावा का हा मूलभूत प्रश्न उरतोच. तसेच या दलित स्त्रीला आपल्या व्यक्तित्वाला या साऱ्यामुळे आकार देता येतो का ? तिला स्वतःच्या आशा—आकांक्षा व्यक्त करता येतात का? त्याला पर्याय आहे का? तो नसेल तर, केवळ मलमपट्टी झाली तर ते योग्य आहे का?

**अवचट**

संकेतांचं गाजलेलं हे तण आहे, असं म्हणून त्यातून तिनं दूर व्हावं असं आपण म्हणू शकत नाही. त्यांनी त्यातून बाहेर पडावं म्हणजे मध्यमवर्गीयांचे अनुकरण करावे असे आपण अपेक्षू नये.

**आशा मुंडले**

या दलित स्त्रियांचं मध्यमवर्गीयांत रूपांतर करावं असं कोणीच म्हणणार नाही.

**अवचट**

आपल्या विकासाच्या कल्पना म्हणजे दलितांनी मध्यमवर्गीय बनावे या विचाराशी जोडल्या जातात. परंतु मध्यमवर्गाच्या विकासाच्या कल्पना पोशाखी आहेत.

**अंजली मायदेव**

डॉ. अवचट म्हणतात तसं निदान स्त्रीमुक्ती चळवळीतील मध्यमवर्गीय स्त्रिया निश्चितच म्हणणार नाहीत. कारण मध्यमवर्गीय स्त्रिया अजून स्त्रीमुक्तीच्या जवळपाससुद्धा पोचलेल्या नाहीत.

**प्र. ई. सोनकांबळे**

मला एक मुद्दा मांडावासा वाटतो. एरवी समाजात हुंड्याचा जो प्रश्न येतो, तो प्रश्न या पाचही आत्मचरित्रांत आलेला नाही. त्यामुळे नवरा-बायकोची नाती

अधिक जवळ आली असतील. बायकांची व व्याह्यांची या संदर्भातील पिळवणूक यांचा विचार त्यात झालेला दिसतो. त्यामुळे संसारात अडथळे निर्माण होताना दिसत नाहीत.

## लक्ष्मण माने

मध्यमवर्गीयांशी तुलना टाळावी, कारण मध्यमवर्गीय स्त्रिया आणि या स्त्रिया या मुळातच वेगळ्या आहेत. त्यामुळे त्यांची तुलना होऊच शकत नाही. दलित समाजाची लग्न ठरविण्याची पद्धतच वेगळी. उलट, या समाजात परिस्थिती उलटी आहे. या समाजात मुलगी हुंडा घेते.

या समाजातील स्त्रीचं 'बाई' म्हणून दुःख मोठं, पण केवळ 'बाई' आहे म्हणून दुःख नाही. कारण या समाजातील स्त्रीपुरुष दोघंही समदुःखी. पण त्यात अर्थात डावं– उजवं आहेच. हिंदू धर्मानंच बाईला कमी लेखलं आहे, पायाचं पायताण ठरवलं आहे. तशीच वागणूक तिला सर्व समाजात मिळते. याला हा गावकुसाबाहेरचा समाजही अपवाद नाही. या समाजातील स्त्री आपल्या नवऱ्याला थोबाडीत मारू शकते– पायातल्या वहाणेनं मारू शकते. तसेच ती शिक्षाही करू शकते. पण बाई म्हणून तिच्यावर अन्याय होतोच. नवऱ्याची बायको म्हणून तिच्यावर दडपण आहेच. पण जातीचा म्हणून जो त्रास आहे तोही तिला आहेच. गावातला पाटील माळ्याच्या बायकोला पटकन हात लावणार नाही. त्यापूर्वी दहा वेळा विचार करतो. पण महाराच्या बाईला हात लावणं हा आपला हक्कच आहे, असे तो मानतो. त्यामुळे या समाजातील स्त्री असुरक्षित आहे. पण बाई आल्या प्रसंगाला तोंड देईल. ती स्वतःहून आगळीक करणार नाही, पण कोणी केली तर त्याला शिक्षा देईल व ती ते मोठ्या अभिमानाने सगळ्यांना सांगेल.

मध्यमवर्गाचे आणि या समाजाचे नॉर्म्सच वेगळे आहेत. त्यांची मूल्यं, जगण्याच्या पद्धती वेगळ्या. या समाजात (गावकुसाबाहेरच्या अगर दलित समाजात) बाईला 'चॉईस' आहे. तिला नवरा नको असेल, तर ती नाकारू शकते. ज्या समाजात पुनर्विवाहाला मान्यता त्यातील बाई सुखी, असं मी तरी म्हणेन.

वडिलांनी आईला मारणे, दारू पिणे या गोष्टी या समाजात सर्रास आहेत. एवढंच नव्हे, तर व्यसनं करायची ती सर्वांनी मिळून करायची. देवालाच दारू पाजतात. सगळे पितात, मग घरच्या मुलांनीही दारू प्यायला हवी असा संकेत. त्यामुळे या स्त्रियाही या गोष्टी मान्य करतात, स्वीकारतात.

पारध्यांच्यात पुरुष बायकांचं शोषण करतात. तितकंच स्त्रियाही पुरुषांचं शोषण करतात. या समाजात बायका गहाण ठेवल्या जातात, त्यांना विकण्यात येतं. अर्थात त्यांच्या समस्याच वेगळ्या आहेत.

कोल्हाटी स्त्रियांचा प्रश्न आणखीनच वेगळा आहे. कोल्हाटी स्त्री जोवर नाचत असते तोवर तिचे लग्न होत नाही. पण तिला अनौरस संतती होण्यासंब-

धीची परवानगी आहे. पण मग अनौरस संतती असलेल्या पुरुषांनी पुढे काय करायचं? हे पुरुष दुसऱ्या जातीतील पोरगी विकत घेतात किंवा पळवून नेतात.

पारधी समाजातील पुरुष फार लौकर मरतात. त्या समाजातील स्त्रियांचा अभ्यास करताना अनेक वेगवेगळे अनुभव आले. पारधी समाजात एक पुरुष चार, पाच, सहा अशा कितीही बायका करतो. तो मेल्यावर त्यांनी काय करायचे? म्हणून मग घरच्या दुसऱ्या पुरुषांबरोबर त्या राहू लागतात, त्यांच्याशी शारीरिक संबंध ठेवतात. पंचांनी दुसऱ्या पुरुषांशी (घराबाहेरचा) लग्न करण्यास परवानगी दिली तरी या स्त्रिया घरातल्या पुरुषांनाच जवळ करतात. आपल्या सख्ख्या मुलाशी संबंध ठेवणारी एक स्त्री मला भेटली. मला वाटलं, ती याबाबत स्पष्ट नकार देईल. पण तिने हा संबंध असल्याचे उघडपणे तर सांगितलेच, पण पुढे म्हणाली, 'हा मला सोडणार तरी नाही. विकणार तरी नाही.' या स्त्रियांचं होणारं शोषणच हे संबंध प्रस्थापित करतं. काही असो, दलित जीवन खरं आहे. त्यात नाटकीपणा नाही. खरं तर, मध्यमवर्गीय लोकच या दलितांना जगणं असह्य करतात. म्हारणीला कधी महाराची नाही भीती वाटत; कारण जातपंचायतीचे कायदे कडक असतात, त्यामुळे तो वाटेल ते अत्याचार करूच शकत नाही. त्यामुळे या दलित स्त्रियांना भीती आहे ती इतर समाजाचीच.

दलित समाजाने स्त्रीपुरुषसंबंधांचा इतका गंभीर विचारच केलेला नाही. म्हणून ते संबंध समाजाने 'स्वीकारले' आहेत. एवढेच नव्हे, तर मध्यमवर्गीय बाईवर जर बलात्कार झाला, तर तिला जगणं असह्य, अशक्य होऊन जातं, पण या दलित समाजांमध्ये असं होत नाही. ती स्त्री पुन्हा समाजात सामावून जाते.

## सुमित्रा भावे

आम्ही आमच्या अभ्यासात झोपडपट्टीतील दलित (महार) स्त्रियांचं जीवन जवळून पाहिलं, अभ्यासलं. त्यावेळी दिसलं की स्त्रीपुरुष नात्यात बाई नवऱ्याचा धसका घेते. कारण नवरा हा तिच्यावर बलात्कार करत असतो. परंतु हा नवरा म्हातारपणी वेगळा वागतो. आई (त्याची बायको) मुत्सद्दीपणे वागते. मुलं मोठी झाल्यानंतर त्यांना आपलंसं करून घेऊन, स्वतःकडे त्यांचा अधिक कल, आस्था निर्माण व्हावा, असा प्रयत्न करते. तिचा नवरा म्हातारपणी अगदी केविलवाणा होतो. कधी कधी दारू पिऊन, पिऊन आधीच निम्मा खलास झाला असल्याने तो लौकर मरतो.

अशा वेळी या नात्याचं खरं स्वरूप काय? त्या स्त्री- पुरुषांतील शारीरिक संबंधापलीकडे आंतरिक माया, जिव्हाळा, प्रेम त्यांच्यात नसतंच का? आपण विचारात घेतलेल्या पाच दलित आत्मकथांतील स्त्री- पुरुष नात्यांत या भावना दिसतात, पण दलित समाजात हे सार्वत्रिक आहे का, यावर चर्चा व्हावी.

## लक्ष्मण माने

माया व प्रेमाशिवाय माणसं जगूच शकत नाहीत. अर्थातच दलित समाजातील

नवरा आपल्या बायकोला मारतो, पण तो फार तर तिशी–पस्तिशीपर्यंत मारेल. पण त्यापलीकडे हे नातं आहे– मैत्री आहे, हे कळल्यावर तो मारहाण करणार नाही. मुख्य म्हणजे असा थोडाफार विचार शहरातील या जमातींत आढळेल. परंतु ग्रामीण भागात असलेल्या या जमातींत, समाजांत स्त्री–पुरुषांनी परस्परांशी जिव्हाळ्यानं, प्रेमानं वागण्याची, तशीच तिथं एकमेकांजवळ राहाण्याची सक्ती नाही. म्हणून म्हातारपणी नवरा थकल्यामुळे मऊ होतो. थोडक्यात, तिथे 'पॉवर ऑफ रिलेशनशिप' बदलते. सत्ता त्याच्या बायकोच्या किंवा मुलांच्या हातात येते. त्यामुळे नवरा पडतं धोरण घेतो.

### शिल्पा मुंब्रिसकर

आमच्या समाजातील नवरा म्हातारा झाल्यावर सर्वांचं ऐकायला लागतो.

### मर्सी मॅथ्यू

मी आमच्या गोंड आदिवासी भागातील अनुभव सांगते. आमच्याकडील स्त्री स्वतंत्र आहे. तेथील पुरुष रोजी आठ तास काम करतात, तर बायका १६ ते १७ तास काम करतात. निर्णय घेण्याचे महत्त्वाचे कामही तीच करते. घरचे, विवाहा-संबंधीचे निर्णय घेण्याबाबत ती स्त्री पूर्णपणे स्वतंत्र आहे. एवढेच नव्हे, तेथे त्यांचे जे शोषण होते, त्या विरुद्ध आम्ही जेव्हा आवाज उठवायचं ठरवलं, तेव्हा त्याबद्दल खरं बोलायला स्त्रियाच पुढे आल्या. मोर्चातही स्त्रियाच पुढे होत्या. पुरुष मात्र डरपोकपणे मागे राहिले, यात सहभागी झाले नाहीत. एवढेच नव्हे, तर काही पुरु-षांनी आपल्या घरातील स्त्रियांना याबाबत माघार घ्यायला लावली.

तेथील स्त्रिया आपले पहिले लग्न मोडून दुसरीकडे जाऊ शकतात. फक्त विधवा स्त्रिया आपल्या संपत्तीच्या बाबतीत मात्र असहाय्य होतात. कारण त्या संदर्भात त्यांच्या मतांना, किंबहुना त्यांनाच, वाव नसतो.

### गो. म. कुलकर्णी

या पाच आत्मचरित्रांचा अभ्यास केल्यावर एक गोष्ट जाणवते– पुनर्विवाह हा मध्यमवर्गीयांत प्रतिष्ठेचा विषय होता, पण या समाजात तसं नाही. प्राचीन मूल्यव्यवस्था व त्यानुसार भावना या गोष्टी या दलित स्त्रियांच्या मनात अधिक चिकटून बसल्या आहेत. उदा- 'बलुतं' मध्ये दगडूची आई व आजी पुनर्विवाहाच्या विरुद्ध आहेत.

तसेच दलितांच्या समस्या सोडविण्यासाठी मिश्रविवाह हा योग्य तोडगा आहे, पण असे विवाह फारसे होताना दिसत नाहीत.

## सुमित्रा भावे

मला वाटतं, इथे 'स्त्रीवाणी' ची भूमिका थोडक्यात स्पष्ट करायला हवी. स्त्री व पुरुष यांच्यातील शारीरिक भेद बाजूला सारून स्त्रीला सर्व अधिकार प्राप्त व्हावेत, हा जसा स्त्रीविषयक चळवळींचा प्रयत्न आहे, नेमकी तशीच भूमिका 'स्त्री-वाणी' ची आहे. त्यासाठी तिने आयोजित केलेल्या 'सहभागी संवाद पद्धती' मध्ये दलित स्त्रिया खूप बोलल्या. पण तरी काही शंका (तिच्यासंबंधीच्या व त्या समाजा-संबंधीच्या) कायम राहिल्या. ती मागासलेली का आहे, तिच्या कुटुंबियांबाबत तिच्या नेमक्या कोणत्या भावना आहेत, यासंबंधी अधिक तपशील मिळावा, हा प्रयत्न आहे. तसेच या संस्थेतून अभ्यास करत असलेल्या आमची भूमिका निव्वळ पुस्तकी व्हायला नको, हाही विचार आहे. तसेच या सर्व अभ्यासात या समाजाचे जीवन पहा-ताना त्यातील अस्सल देशीपणा नेमका काय आहे, तसेच या प्रश्नाला हात घालताना दुसरा एखादा प्रश्न निर्माण होणारच, या सर्वांचे भान ठेवून हा अभ्यास चालू आहे.

## ३ स्त्रीचं जग

चर्चासत्राच्या दुसऱ्या दिवसाची सुरुवात 'दलित आत्मचरित्रातील स्त्रीचे जग' या विषयाच्या मांडणीने झाली. या विषयाची मांडणी प्रा. गो. म. कुलकर्णी यांनी केली. अध्यक्षस्थानी श्रीमती सरिता पदकी होत्या.

### गो. म. कुलकर्णी

'बलुतं' मधील स्त्री–प्रतिमा पुरुषी दृष्टिकोनातून आली आहे. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीला गौणत्व मिळालेलं आहे. तोच दृष्टिकोन दया पवारांचा आहे. 'दगडू'ला दयाबुद्धी आहे, पण त्याचा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन पारंपरिक आहे. त्यामुळे 'बलुतं'मध्ये स्त्रीविषयी विधायक किंवा तिच्या विमोचनाबद्दल विचार झालेला दिसत नाही.

एक तर 'बलुतं'मधील दलित स्त्रीचं जग दारिद्र्यानं वेढलेलं आहे. मध्यमवर्गीय स्त्रीपेक्षा ही स्त्री अधिक धीट, मोकळी, कर्तबगार आहे. परंतु मध्यमवर्गीय संस्कारांचं अनुकरण करण्याची तिच्यात प्रवृत्ती दिसते. उदा- 'बलुतं' मध्ये दगडूची आई आणि माई वैधव्याचं जीवन वाट्याला आल्यानंतर पुनर्विवाह करत नाहीत. हिंदू मूल्य जपण्याचा त्यांचा प्रयत्न इथे दिसतो.

अस्पृश्यतानिवारणासाठी मिश्रविवाह होण्याची गरज आहे, याचं भान 'बलुतं' मध्ये दिसत नाही. तसेच मिश्रविवाहामुळे निर्माण होणारे ताण, त्याचे उमटणारे पडसाद यासंबंधीचे विपर्यस्त चित्रण 'कन्यादान' या नाटकात येते हे मान्य, पण या आत्मचरित्रांत मिश्रविवाहाचं रास्त चित्रण, त्यासंबंधीचा योग्य विचार व्हायला हवा होता, असं वाटतं.

### दया पवार

दगडू ज्या काळात वावरत होता, त्या काळातलं भावविश्व मी रेखाटलं आहे. त्याच्या भावविश्वाशी तो प्रामाणिक आहे. 'दया' आणि 'दगडू' यांच्यात फरक आहे, हे ध्यानात घेतले पाहजे. गावकुसाबाहेर वाढलेल्या ह्या मुलाने जातीच्या उतरंडीचा

त्रास, जाच अनुभवला आहे. त्याचे चित्रण मी केले आहे. परंतु या साऱ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून वादाचा विषय फक्त सई आणि सलमा हाच झाला, त्यात मध्यमवर्गीय मनोवृत्तीचं प्रतिबिंब दिसतं. कारण केवळ सलमा, सई यांच्यावर चर्चा केली की, लेखकाला कोंडीत पकडणं सोपं होईल, असा त्यांनी विचार केला असावा, त्यांचा तसा हेतू असावा. म्हणून आतापर्यंत जरी दगडूची आई, काकू, आजी यांच्यावर चर्चा झाली नाही, तरी यापुढे तरी ती व्हावी.

आपल्या समाजात पुरुषप्रधान संस्कृती असल्याने विशेषत: स्त्रियांना खूप कष्ट करावे लागले आहेत. त्यांचे कष्ट त्यांचेवर झालेले अन्याय पाहता मन गांगरून जाते, पण त्यातही त्यातील एखादया व्यक्तीचे वैशिष्टय़ तसेच कायम राहिलेले पाहिले की, आश्चर्य वाटते. उदाहरणार्थ, दगडूच्या आजीच्या वाटयाला अनेक प्रकारचे भोग येऊनसुद्धा आजीचा निर्मळपणा, विशाल मन तसेच कायम राहिले.

मला असं वाटतं की, केवळ दगडूला दोष देऊन चालायचं नाही. परंतु अनेक ठिकाणी त्याला दोषी ठरविण्यात आले आहे. असे करण्यापेक्षा तो ज्या समाजात जगतो त्या समाजरचनेकडे, तसेच त्यातील नॉर्म्सकडे लक्ष देणे आवश्यक आहे. तसेच आजचे शिक्षण माणसांमाणसांत विभाजन करते आणि एक वेगळया प्रकारचे नॉर्म्स तयार करते. त्यामुळेच ते सुशिक्षित दलितास आपल्या नातेवाईकांपासून दूर करते. मध्यमवर्गीयांचे जे नॉर्म्स आहेत ते त्याला शिक्षणामुळे स्वीकारावे लागतात, आणि यातूनच त्याला जुने नॉर्म्स आणि नवे नॉर्म्स यातील संघर्षामुळे निर्माण होणाऱ्या ताणांना तोंड द्यावे लागत आहे. खरे तर, सुशिक्षित दलित वर्गविहीन व जातिविहीन होऊ इच्छितो. मध्यमवर्गीय नाही. पण शिक्षणामुळे, शिक्षणातील नॉर्म्समुळे तो मध्यमवर्गाकडे सरकतो, मध्यमवर्गाचा भाग होतो, हे दगडू स्वत:सुद्धा कबूल करतो आहे.

'बलुतं'मधील लैंगिक चित्रणाबाबत खूपच गदारोळ झाला. परंतु, आपल्या समाजात अंडरग्राउंड पद्धतीने लैंगिक संबंध चालू आहेत. दलित–सवर्ण स्त्रीपुरुष संबंधाबाबत तर असे म्हणता येईल की, दलित स्त्री आणि सवर्ण पुरुष यांचे नाते दिवसा मजूर-मालकाचे असते, तर रात्री स्त्रीपुरुषांचे असते. तसेच सवर्ण बाई आणि दलित पुरुष यांच्यातही याच स्वरूपाचे नाते असते. दिवसा ती त्याला पाणीसुद्धा वरून घालेल, पण रात्री त्यांचे संबंध मात्र वेगळे असतात!

तसेच खेडयातील, विशेषत: दलित स्त्रियांना मोकळा वेळ घालविण्यासाठी कोणतीही सोय नाही. त्याउलट मध्यमवर्गीय स्त्रिया आपला वेळ भरतकाम, विणकाम, गायन इत्यादी गोष्टींत रस घेऊन चांगल्या पद्धतीने घालवू शकतात. यामुळेच दलित स्त्रिया आपल्या जीवनातील पोकळी भरून काढण्यासाठी सेक्स हे साधन म्हणून वापरतात. त्यांच्या मनात सेक्स नसतो, पण त्यांच्या शिव्यांत, प्रतिमांत सेक्सचा उल्लेख असल्याचे इतरांना जाणवते. आणि मध्यमवर्गीयांना मात्र ही गोष्ट खटकते.

आपल्या विवाहसंस्थेतही एक विशिष्ट व्यवस्था आहे. धर्म, जाती इत्यादींनी निर्माण केलेल्या भिंतींमुळे प्रेम एकाशी, लग्न दुसऱ्याशीं असे मनाविरुद्ध घडते. वेग-

वेगळी सामाजिक मूल्यं माणसाला मागे खेचत असतात. लक्ष्मण माने (उपरा) सारखा अपवाद एखादाच. दगडूला सुंदर, गोऱ्या, सवर्ण मुलींबद्दल आकर्षण वाटतं आणि वस्तीतल्या स्त्रियांची घृणा वाटते, ही वस्तुस्थिती आहे, पण त्यामागेही कार्यकारण-भाव आहे. जे अप्रूप आहे, दुर्मिळ आहे त्याबद्दल आकर्षण वाटतं हा मानवी स्वभाव आहे. त्यातून निर्माण होणाऱ्या मानसिक ताणतणावांचा शोध घ्यायला हवा.

'बलुतं'सारखी धीट आत्मचरित्रं आणखी किती निर्माण होतील हा प्रश्न आहे. त्यासाठी लेखकांमध्ये धैर्य असावं लागतं. परंतु ही गोष्ट लक्षात घेतली जात नाही आणि विशिष्ट घटनेमागचा कार्यकारणभाव समजावून न घेता लेखकावर टीका केली जाते. उदा- बलुतंमध्ये काही काळानंतर दगडू आपल्या देहविक्रय करणाऱ्या जमनामावशीला ओळख देण्याचे टाळतो, याबद्दल टीका होते, पण जमनामावशीला देहविक्रय का करावा लागला, याबद्दल मूलभूत विचार होत नाही- केला जात नाही.

## गो. म. कुलकर्णी

'आत्मचरित्र' हा रचनाप्रकार एकच माणूस अनेक पद्धतींनी वापरू शकतो. दया पवारांना 'बलुतं'मध्ये ज्या जीवनावर प्रकाश टाकायचा आहे, तो तसा पडलेला नाही. त्यांना जे अभिप्रेत आहे, ते मांडणीच्या अपुरेपणामळे वाचकांपर्यंत पोहोचत नाही. त्यामुळे अभावग्रस्त जीवनात लैंगिकता हाच एक विरंगुळा असतो, हा मुद्दा त्या लिखाणात स्थिरपणे न येता विरलपणे येतो. त्यामुळे या पुस्तकाचा या संदर्भात संकलित परिणाम होत नाही.

## दया पवार

'बलुतं' हे माझं आयुष्य आहे. मला वाटतं, जे घडलं ते लिहायला धाडस हवं. अनेक मध्यमवर्गीय साहित्यिकांच्या वाट्याला दुभंगलेपण येऊनही ते सत्यनिष्ठ आत्म. चरित्र लिहिण्याबाबत कितपत धारिष्टच दाखवतील, याबद्दल शंकाच आहे. 'लेखक जन्माला यावा लागतो' असं म्हणतात.

आणि असंही एक म्हटलं जातं की पुरुष शेवटी पुरुषच आहेत. ते स्त्रियांचं मन व्यक्त करू शकणार नाहीत. जवळजवळ सगळ्याच दलित लेखकांनी, लक्ष्मण मान्यांपासून ज्यांनी ज्यांनी आत्मचरित्रं लिहिली आहेत त्या सर्वांनी, स्त्रियांच्या संदर्भात खूप मोठा न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचं कारण असं की त्या स्त्रियांच्या वेगळ्या वेगळ्या दृष्टिकोनातूनच त्यांचं आजचं आयुष्य घडलं आहे.

आणि ती बेचैनी अनेक लेखकांना आहे ती अशी आहे की, ज्यासाठी त्यांनी कष्ट केले आणि ज्या पिढीने काम केले त्यांची- विशेषत: आयांची, आजींची, बहिणींची. आतां 'बलुतं' मधला एक छोटा प्रसंग आहे, की बोर्डिंगमध्ये एकाची लहान बहीण आहे. सगळी मुलं तिला नाचवतात. खरं तर मध्यमवर्गीय माणसाला याचं काहीच

वाटणार नाही. परंतु त्याला त्याचं वाईट वाटतं कारण त्याच्या अनेक आया—बहिणी नाचवल्या गेल्या आहेत, तमाशाच्या फडामध्ये. त्याच्या मनामध्ये ज्या नीतिमूल्यांच्या मूलभूत कल्पना आहेत त्या आहेतच. त्यामुळे त्याला अत्यंत मनःस्ताप झालेला आहे. खरं तसं पाहिलं तर हा प्रसंग काहीच नाही. तसं आपल्या घरामध्ये लहान—लहान मुली नाचत असतात, गाणी म्हणत असतात, लावण्या म्हणत असतात. पण हे त्याला इतकं भीषण वाटतं की त्याला वाटतं आपल्या बहिणींच्या बाबतीत असं होता कामा नये.

आणखी एक प्रसंग आहे. दगडूचे वडील गेलेले आहेत. वडील जाऊन तीन—चार महिने झालेले आहेत आणि आईला आधीच दिवस गेलेले आहेत मग कोणी-तरी त्याला विचारतं 'तुझा बाप गेलेला आहे, मग तुझी आई गरोदर कशी?' तेव्हा त्याच्या मनामध्ये बाबुराव बागुलांच्या 'आई' कथेमध्ये जो संदर्भ आहे तो येतो. तो जयवंत दळवींना 'चक्र' मध्ये समजतच नाही. उदा- 'चक्र' मधला बेन्वा झोपडपट्टीत राहणारा आहे. तरुण मुलगा आहे. आणि आई त्याची, तिने टॅक्सी ड्रायव्हर ठेवलेला आहे. गोरापान. तिथे जातीचा उल्लेख नाही. परंतु जानवं घातलेला असा उल्लेख आहे, त्याअर्थी तो ब्राह्मण असावा. आणि तो रात्री-अपरात्री येत असतो त्या आईला भेटायला. आणि तो बेन्वा खाट टाकून बघतो. परंतु तो बेन्वा सबंध कादंबरीभर मुका आहे. त्याची काहीही रिॲक्शन् नाही. तो बंड करणार नाही आई विरुद्ध, परंतु त्याच्या मनामध्ये प्रचंड कल्लोळ तर असायलाच हवा की, 'काय हे या कुटुंबव्यवस्थे-मध्ये आलं आहे आपल्या वाट्याला?' ती अगतिकता, मनाचा कोंडमारा हे दळवींना समजूच शकत नाही. कारण त्यांनी झोपडपट्टी पाहिलेली नाही. परंतु इथे आपल्या लक्षात येईल की, बाबुराव बागुलांची 'आई' नावाची गोष्ट आहे. विधवा आई आहे आणि लहान मुलगा आहे, शाळेत जाणारा. परंतु तिलाही काही शरीरधर्म आहेत, काही गरजा आहेत, म्हणून ती एका परपुरुषाशी संबंध जोडते. मग ती चांगली लुगडी नेसायाला लागते, पट्ट्या खायला लागते, घरात चांगल्या वस्तू यायला लागतात, मुलाला चांगले कपडे येऊ लागतात. शाळेत मुलाला इतर मुलं विचारू लागतात, 'नवे कपडे कुठून आले?' आणि 'तो कोण तुझा?' त्यामुळे आई व मुलामध्ये एक प्रचंड भावनिक दरी निर्माण होते. या सर्व गोष्टी बाबुरावांना समजू शकतात, कारण ते झोपडपट्टीत राहिलेले आहेत. तेथील सांस्कृतिक जीवन, वातावरण त्यांनी पाहिलेलं आहे, त्याचा अनुभव घेतलेला आहे.

सईच्या संदर्भात विचार करायचा झाला तर आता इथं सांगायला हरकत नाही. पु. ल. देशपांड्यांनी माझ्या पुस्तकावर अतिशय चांगलं लिहिलं आणि मिसेस पु. लं. नी त्या काळात आठ-दहा पानांचं एक पत्र मला लिहिलं. त्यातला मुद्दा असाच आहे की, जे दलित पुरुष अन्यायाविरुद्ध ओरडत असतात, तेच आपल्या बायकांवर अन्याय करतात. आता या अन्यायाची कारणं जर आपण तपासायला गेलो तर ती कारणं आपल्याला त्या पुस्तकातच सापडतील. उदा. लग्न कधी घडलेलं आहे? हा

साधा मॅट्रिक झालेला आहे आणि त्याला असलेलं मुलीचं आकर्षण, मध्यमवर्गीय मुलीचं आकर्षण, परंतु समाजात काही करण्याची ताकद तर नाही आहे. सई अत्यंत देखणी आहे, गोऱ्या रंगाची, घाऱ्या डोळ्यांची. परंतु अगदी दोन टोकं आहेत दोघांच्या जीवनात. हा अगदीं पुस्तकी जगातला, कधीही कष्टाची कामं न केलेला. म्हणजे त्याच्यामध्ये काही फॅक्टर्स असू शकतात. ते म्हणजे ही खेड्यातली आहे. आडदांड आहे. शेतातली कामं केलेली आहे. आणि त्याच्या मनामध्ये समाजात चाल-लेल्या घडामोडींचा प्रभाव आहे, उदा. आजूबाजूला 'नवरा कसा पाहिजे?' 'नवरी कशी पाहिजे?' याची होणारी चर्चा. लायक नवरा कुणाला समजायचं? तर मातीचा ढिगारा करून ठेवायचा व त्यात मुलाला मुतायला सांगायचं. जर त्या ढिगाला भोक पडलं तर तो लायक मुलगा आहे असं समजायचं. या पार्श्वभूमीवर ती जी लग्नं झाली होती. ती कुणाला अनुरूप अशी नव्हतीच. त्या वेळच्या रूढीप्रमाणे सातव्या-आठव्या वर्षी लग्न होणं, त्या लग्नात झालेले मान–अपमान, त्यांचा झालेला परि-णाम, पुढे शारीरिक पातळीवर घडत जाणारी भिन्नता, यांमुळे पडत गेलेली तफावत या सर्वांचा विचारही इथे महत्त्वाचा आहे.

सईच्या बाबतीत असं झालं की, दहा–बाय बाराच्या घरात राहून होणारा कोंडमारा, बाहेरच्या जगात मिसळण्याची कुवत नाही, मानसिक वाढ झालेली नाही, शिवाय आजूबाजूच्या वातावरणाचा परिणाम; याविरुद्ध त्याला समाजात मिसळ-ण्याची ओढ, सभासंमेलनाला जाण्याची आवड, कविता करण्याची आवड, यांमुळे त्यांच्यात पडत गेलेली जमीन–अस्मानाची तफावत. आमचे टीकाकार मित्र रोकडे नेहमी टीका करतात की, संशयामुळे तुम्ही अन्याय केला. परंतु वातावरणाचा प्रभाव, त्यामुळे तिच्यात घडत गेलेले बदल आणि पडलेली दरी याचा या ठिकाणी विचार करणे आवश्यक आहे. कोणी म्हणतं, तुम्ही सईला टाकण्याचं स्पष्ट कारण दिलं नाही. अरे, पण ती आता कुणाची तरी बायको आहे, तिची मुलगी दुसरीकडे नांदते आहे, आणि तो माणूस ही कुठं राहात होती याचा खोलवर शोध करून गेला आहे. मी म्हणतो की, याच्यातून मला काय मिळणार आहे? ही एक प्रकारची विकृतीच म्हणावी लागेल! आणि तिला व्यभिचारी दाखवून माझी सुटका आहे का? म्हणून विभक्त जरी झालो तरी त्यातून काही सुटका होत नाही. म्हणून म्हणतो की, हे तुटता तुटत नाही.

## आशा मुंडले

दया, माझी स्वतःची तुम्हा कोणाशीच ओळख नव्हती. पुस्तकंच वाचली होती मी. तेव्हासुद्धा मला हे जाणवलं होतं की, टीका करणारे हे सुद्धा पुरुषच आहेत. आणि आतासुद्धा आमच्यासारख्या दुसऱ्या प्रकारच्या स्त्रियांना हेच जाणवल्याशिवाय राहिलं नाही. म्हणजे असं की, जातपंचायत बसून 'या बाईचं सेक्स लाईफ असं असावं

किंवा नाही, या बाईने हा नवरा करावा किंवा नाही' याबद्दल निर्णय देते. तशा पद्धतीची थोडीशी एक वेगळी पंचायत भरल्यासारखं. ही पाच माणसं, हे यांचं जीवन आणि यांनी हे का केलं आणि ते का केलं याची चर्चा चालू आहे. मला असं वाटत नाही की, संस्थेचा परिसंवादाचा विषय हा आहे. पण मला स्वतःला अशा तऱ्हेने पाहण्याची कल्पना तेव्हाही आवडली नव्हती, आणि आता सांगायची संधी मिळाली आहे तेव्हा मला बरं वाटतं की, तुम्हाला त्या वयामध्ये तुमच्या आयुष्याबद्दल जे वाटलं ते तुम्ही लिहिलं. आम्ही तुमच्या दृष्टीतून स्त्रियांचं जग किंवा स्त्रिया कशा आहेत, ते पाहतो.

ही पाच लेखक माणसं, तीच त्या समाजामध्ये सर्वात प्रगल्भ समाजशास्त्रीय जाणीवांची होती. आणि त्यांनी सर्व मुद्दे आपल्या आत्मचरित्रात सोडवायला हवे होते, असं तर आपण म्हणत नाही? त्यांना योगायोगाने दुसरी माणसं भेटली, त्यांनी लिहायला प्रवृत्त केलं. कुणाला 'कॉन्फिडन्स' नव्हता. त्यांना सारखं सांगून लिहायला लावलं. या अपवातांचा यामध्ये पुष्कळ भाग आहे. आता इथे ज्या आम्ही मुलाखती घेतो त्या स्त्रियांच्यातही असं दिसलेलं आहे की, खूप आरडाओरडा करून स्त्री–मुक्तीविषयी बोलणाऱ्या एखाद्या स्त्रीपेक्षा एखादी अबोल स्त्री जर आपण बोलकी केली, तर ती अधिक मार्मिक आणि परखड असं बोलून जाते. परंतु तिला यापूर्वी ते समाजापुढे मांडायची संधी मिळालेली नसते. या लोकांना संधी मिळाली त्याअर्थी यांनी जे स्त्रीचं जग पाहायला पाहिजे ते काही विशेष, त्यावेळच्या समाजाच्या परिस्थितीपेक्षा अती प्रगल्भतेने पहायला पाहिजे, असं मुळात समजणं बरोबर नाही आणि हा मुद्दा तुम्ही फारच चांगला सांगितलात की, सध्या जे आमचे उच्चभ्रू लेखक आहेत ते काय दृष्टीने स्त्रियांकडे पाहतात किंवा जगतात हे काही आम्हाला माहिती नाही, असं नाही, परंतु त्यांना तेवढे धैर्य नाही. हा तुमचा मुद्दा फारच आवडला मला.

आज मला पवारांना असं विचारायचं आहे की, त्यावेळी त्यांनी ओघानं प्रामाणिकपणे आपलं लाईफ लिहिलं, पण आता त्यांना स्त्रियांबद्दल काय वाटतं ते त्यांनी सांगावं.

## सुमित्रा भावे

दया पवारांनी जे सांगितलं ते आम्हाला मुळात मान्य आहे की, हे सगळे जे नॉर्म्स आहेत, ते सगळे प्रश्न आहेत. ते मानणारे आम्ही सगळे आहोत. दुसरं म्हणजे मी भूमिका म्हणून सुद्धा असं सांगेन की, ही सर्व आत्मचरित्रं म्हणून वाचल्यानंतर, तिथे सरसकट दलित पुरुषांनी दलित स्त्रीवर अन्याय केलेला आहे, असं विधान आम्हाला करायचं नाही, ही पहिली गोष्ट. दुसरं म्हणजे हे वाचत असताना मला व्यक्तिशः असं वाटलेलं आहे, जिथे जिथे स्त्रियांच्या संदर्भात लिहिलेलं आहे, तिथे एकेका वाक्यामध्ये. ती एकेक वाक्यं काढून दाखविता येईल की तुम्ही स्त्रीला न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. तेव्हा त्या स्त्रीला काय बरं म्हणायचंय, कोणती गोष्ट

फार सुख देणारी वाटते, ही त्या बाईची सुखं, त्या बाईची दु:खं, त्या बाईचे आशय, मनामध्ये येणाऱ्या भावना, यांच्यावर नेमकं बोट ठेवून आपल्याला या तिच्या भावना आणि पुरुषाच्या मनामध्ये येणाऱ्या भावना यांमध्ये फार अंतर आहे का? त्या भावनांचं आणि आम्हां मध्यमवर्गीय स्त्रियांचं काय नातं आहे, याचा तपशिलात शोध घ्यायचा आहे. तेव्हा पुरुषांना, या दलित लेखकांना कोंडीत घेऊन मारणं वगैरे मुळीच नाही. किंबहुना, काय म्हणून असं करायचं? म्हणजे ॲप्रीसिएशन असं करायचं की यामध्ये दिसणारी दलित स्त्री ही अतिशय ताकदवान दिसते. अतिशय ताकदीची वाटते. त्यामुळे आम्हाला कुतूहल वाटलेलं आहे त्या आईविषयी. असं सगळ्यांच्याच आयांबद्दल म्हटलं पाहिजे. सोनकांबळ्यांच्या आत्मचरित्रात आई नाही, पण बहिणीबद्दल तसंच म्हणावं लागेल. आमचे अगदी साधे म्हणजे अगदी काँक्रीट प्रश्न आपण घेऊया. म्हणजे ते अगदी सिस्टिम वगैरे पातळीवरून बोलायला लागलो की, अनेकदा सपाटसुद्धा जाण्याची शक्यता असते. माहेरचा आधार आता या बाईला किती आहे? काल 'स्त्री–पुरुष नातं' या विषयावर बोलत असताना स्त्री-पुरुष संबंध इकडे सगळी वळली चर्चा आणि मग स्त्री–पुरुष संबंध म्हणजे लैंगिक संबंध, इकडे येऊन ठेपले सगळे. तर तसं करायचं काही कारण आहे असं आम्हाला वाटत नाही. आता बाईचे सुखदु:ख बघताना सुख देणारा बाईचा सर्वांत मोठा आधार कोणता? आई तिला सुख देते का? भाऊ तिला सुख देतो का? कोण देतं सुख? ही नाती काय आहेत? त्यांचं स्वरूप काय आहे? हे आपण सर्व समजावून घेऊया. स्त्री–वाणीला या सगळ्या परिसंवादामधून असे तपशील आणि या तऱ्हेच्या जाणिवा समजावून घ्यायच्या आहेत.

**आशा मुंडले**

आम्ही सुद्धा असा विचार करत नव्हतो की, आई हे आमच्याशी वागते आहे हे वात्सल्याने आहे किंवा नाही. परंतु मोठं झाल्यावर आईवडिलांची पॉवर रिलेशन्स मनात येतात ना! त्यावेळी तुम्ही नसेल तसा विचार केला, पण आता तर केला असेल. आता तर चळवळीत जास्तीजास्त समरस झाल्यामुळे म्हणा, चळवळीविषयी जास्त विचार केल्यामुळे म्हणा, दलित स्त्रिया तुम्हाला वेगळ्या स्वरूपात भेटत असतील. तेव्हा तरी काही बोलणं झालं असेल ?

**शोभा भागवत**

स्वत:ची आई, बहिणी किंवा नातेवाईक स्त्रिया किंवा अगदी जवळच्या जमातीतील स्त्रिया यांचे जे उल्लेख येतात त्याच्यात काही तरी त्यांची बाजू आल्यासारखे वाटते. परंतु गावात एखादी घटना घडते, एखादया मुलीवर बलात्कार होतो, तिला त्याच्यातून दिवस राहतात, त्याच्यातून ती विष घेते, याचे उल्लेख येतात.

ते प्रसंग लिहितानाची जी तटस्थता आहे, जो अलिप्तपणा आहे, तो बोचतो असं वाटतं. तुमच्या 'बलुतं'मध्ये सुद्धा असा उल्लेख आहे की, मग ती कुंती सापडली म्हणे आणि मग तिला शिक्षाही झाली. एवढ्या अलिप्तपणे हे उल्लेख कसे येतात? इथे बायकांची बाजू मांडली जात नाही असं वाटतं. तर याच्या संबंधी नंतरच्या काळामध्ये काही सुधारणा होतात का? कारण प्रत्यक्षात दलित स्त्रियांच्यांत काम करताना, खेडेगावातून बालवाड्या चालवताहेत त्यांच्याशी बोलत असताना असं लक्षात येतं की, त्यांच्याविषयीचे संशय, पुरुषांची त्यांच्याविषयीची वागण्याची पद्धती हे खूप मध्ये येतं. त्यांना मोकळेपणानं काम करता येत नाही. त्या असं म्हणतात की नवरा घरी आला आणि घरी बिडीचं थोटूक जरी पडलेलं दिसलं तरी तो चिडतो. म्हणजे कदाचित् वडील पण येऊन गेलेले असतात, पण ते बिडीवरून काही कळत नाही की वडील येऊन गेले की दुसरं कोणी येऊन गेलं. तर यावरून पुरुषांची स्त्रियांकडे पहाण्याची वृत्ती यावर काही आपण प्रकाश टाकू शकलो. या स्त्रियांच्या जगामध्ये, तर प्रकर्षानं ते हवं आहे.

## अंजली मायदेव

इथे शोभाने जो मुद्दा मांडला आहे की, ती तटस्थता आम्हाला बोचते, ते स्वतःला मला फीलिंग आलं नाही. मला असं वाटतं की, तितकी जर तटस्थता तुमची त्या प्रसंगाकडे बघण्याची असेल तर त्या आत्मनिवेदनामध्ये ते प्रसंग येणारच नाहीत. ज्याअर्थी त्या आत्मनिवेदनामध्ये ते प्रसंग आले त्याअर्थी त्या लेखकाला त्यामध्ये काही वाटत असणारच. किंवा तो त्याच्याकडे तटस्थ भूमिकेतून बघत नसल्यामुळेच ते आत्मनिवेदनामध्ये इतक्या प्रामुख्याने आले. मात्र असं वाटतं की, ती तटस्थता तिथं नाही आहे.

## दया पवार

'बलुतं' मधलं जे कारुण्य आहे, जे टॉर्चर आहे ते त्या दृष्टिकोनामुळे समजलं नाही तर आधी समजणं शक्यच नव्हतं. तेव्हा हा जो महत्त्वाचा अँगल आहे, म्हणजे याच्यामध्ये कसं आहे की, दगडूच्या आईचा संदर्भ त्याच्यामध्ये घेतलेला आहे. एका निबंधामध्ये तो मी वाचला— तर काही प्रश्न त्या निबंध लिहिणाऱ्याला समजले नाहीत. विशेषतः दगडूची आई, तिथे तेच तिचं सर्वस्व आहे. मुलगा! मुलगा जेव्हा कर्तबगार होतो आणि जेव्हा त्याची बायको येते, ही घराघरातील प्रकरणं आहेत- तेव्हा आईला जे असुरक्षित वाटतं की ही बायको हा मुलगा आपल्यापासून कॅप्चर करते किंवा काय, हा मानवी प्रश्न आहे. याच्यामध्ये तिला असं वाटतं का की लहानपणापासून तिनं त्या मुलासाठी त्याग केलेला आहे. आणि मग ती बैल वगैरेपण म्हणते. पण याची कारणं त्या संपूर्ण व्यवस्थेतच आहेत. तिला तशी असुरक्षितता वाटते

कारण तिचा हा जो मुलगा आहे हा बायकोच्या कह्यात तर जाणार नाहीना, अशी भीती वाटते. तिथे जी टसल्स् आहेत ती घराघरातील टसल्स् आहेत. आणि ही त्या पद्धतीनं आपण पहायला पाहिजेत. आणि या सगळ्या संदर्भामध्ये मी मघाशी म्हणालो की, या सगळ्या संबंधी, कुठल्याही स्त्रीसंबंधी जे लिहिलं गेलेलं आहे, त्याचा एक वेगळा अँगल झाल्यामुळेच लिहू शकलो आम्ही. विचारांची जर बांधिलकी नसती त्याच्या पाठीमागे तर लिहिताच आलं नसतं. फक्त याच्यात एक आहे की, 'आम्ही हे केलं, ते केलं' म्हणणं एखादे वेळी बटबटीत अगर स्लोगनही झालं असतं. उदा- ज्या वेळी 'बलुतं' मी संपवलं त्यावेळी एक मोठी घटना मी माझ्या आयुष्यात केली होती. मी सोळा वर्षांनंतर बकुळाला खेड्यातून जाऊन आणली. तिचं लग्न केलेलं आहे. खरं तर मी तिथे एंड करू शकलो असतो, मी किती मोठा हिरो आहे हे दाखवू शकलो असतो, पण मला ते दाखवायचं नव्हतं, कारण तो एक मोठा कॅनव्हास आहे. पुढे मागे तो घेण्याची शक्यता आहे. आता त्यामध्ये स्त्रियांस्त्रियांमध्ये जो भावनिक गुंता आहे- आता सांगायला हरकत नाही- आता आपण त्या गावी गेलेलो आहे आणि सई कुठेतरी असेल. आजूबाजूला तिचा लहान मुलगा आहे- तिच्या नवऱ्यापासून झालेला, आणि तो अगदी सईसारखा दिसतो. म्हणून आपण त्याला अगदी वेगळ्या पद्धतीने खाऊ देतो, हे करतो, ते करतो. पण जेव्हा सुशिक्षित बायकोला हे सांगतो, तेव्हा ती समजून घेऊ शकत नाही. खरं तीं स्त्रीच आहे, सुशिक्षित आहे. पण ती समजूच शकत नाही. आता मध्यमवर्गीयांत युरोपात नवरा सोडलेला असतो, बायका सोडलेल्या असतात; तरी ते भेटतात, बोलतात, मिळून जेवतात. या ज्या जाणिवा आहेत त्या कुठेतरी त्या रूट्समध्ये आहेत ना? इथे ही सुशिक्षित बायको समजूच शकत नाही की, त्या मुलाला खाऊ का दिला. हे सुशिक्षित बायकोसुद्धा समजू शकत नाही, तर याची कारणं तुम्ही कशात शोधणार? ती 'दलित स्त्री' म्हणून तुम्ही लिहिणार का? की आणखी काही मूलभूत प्रश्न येऊन भिडतात? जोपर्यंत तुम्ही जात नाही ना मानवीसंबंधाशी, तोपर्यंत ते तुम्हाला समजत नाहीत.

## बेबी कांबळे

मी लिहून आणलं आहे ते वाचून दाखवते. देवानं नराला वर दिला की, नार त्याची अंकित राहील, त्याचा शब्द ओलांडणार नाही. आणि नार नराची गुलामगिरी पत्करूनच धरतीवर पाठवली. सुंदर शब्द, गोंडस भाषा, नरनारीचं समान कार्य, 'दोन चाकांशिवाय गाडी चालणार नाही' ही बरोबरीची भाषा, यांत कितपत तथ्य आहे? ही आहे निव्वळ फसवणूक! सत्य आहे तो नर. नार ही नराच्या हातातलं खेळणं. त्यानं तिच्याशी कसंही खेळावं हीच तर भगिनीकर्माची कहाणी आहे. मागील अशिक्षित युग तर जाऊ द्या, पण आजच्या युगात डॉ. आंबेडकरांनी नार ही नराच्या बरोबरीची आहे, हे सिद्ध केलं आहे, पण हे लेखीच राहिले. प्रत्यक्ष कृतीत नाही. भारताची पंतप्रधान नारच होती. देश चालविण्याची तिची बुद्धी होती.

नरापेक्षाही तिच्याजवळ हिंमत होती. आज या पुढारलेल्या जगात नारी शास्त्रज्ञ आहेत, नारी डॉक्टर्स आहेत, नारी बॅरिस्टर्स आहेत. नरापेक्षा नार पुढे आहे. सर्व जगाचे व्यवहार करण्याची तिच्यात शक्ती आहे. पण कुठला नर तिचं वर्चस्व मानतो? तिला बरोबरीनं वागवतो? कामानिमित्त नार घराबाहेर पडली आणि तिला घरी जायला मध्यान्ह झाली, एखाद्या अडचणीच्या ठिकाणी ती सापडली, तर रोखठोक ती घरी जाईल का? आणि जरी ती आली, तरी तिच्या नवऱ्याचा, भावाचा, बापाचा तिच्यावर विश्वास बसेल का?

आता ऐका माझे प्रत्यक्ष अनुभव:- ग्रामीण महिलेचं दुःख हिमालयाहून मोठं आहे. ग्रामीण महिला दुःखाचं पीठ करत आहेत. शहरी महिला फुलपाखराप्रमाणे विद्यापीठात बागडत असतात. ग्रामीण महिला दुःखाच्या पिठात हालाचं मीठ घालत असतात. ग्रामीण मुलगी आईबापांचं घर सोडून सासरघरी जाते ती सून म्हणून नव्हे, तर गुलाम म्हणून ती सासरी पाऊल टाकते. त्या मुलीचा नवरा तसा जास्त वयाचा नसतो. चार- दोन वर्षानंच मोठा असतो, पण तो प्रौढपणाचा आव आणतो, आणि नवरेपणाचा जुलूम करण्यास सिद्ध होतो. सासरी आलं की पहिला प्रश्न पद-राचा. तिने डोईवरचा पदर पोटच्या मुलाप्रमाणे जपावा लागतो. घरातील दीर-मामंजी यांना लाजून- लपून रहावे लागते. घरातील कामे ब्र न काढता करावी लागतात. सर्व लहानथोर माणसांची मर्जी सांभाळावी लागते. हे करत असता नवरे महाराजांच्या छळाला सिद्ध व्हावे लागते. खेडेगावामध्ये घराला घरे लागून अस-तात, शहराप्रमाणे घराचे दरवाजे बंद नसतात. महिलांना भांडी घासणं, धुणी धुणं, जनावरांची सोड-आण करणं हे एका अंगणात करावं लागतं हे मी पाहते, अनुभवते. कोवळ्या मुली सकाळच्या वेळी भांडी घासतात. चुलत भाऊ, पुतणे, दीर अशी माणसेही बाहेर ये- जा करत असतात. नवरा आपल्या बायकोवर करडी नजर ठेवून असतो. भांडी घासून झाल्यावर शेवटी तवा घासत असते. तवा घासल्यावर तवा धुताना तव्यातलं पाणी झरा उपसतात तसं उपसण्याची ग्रामीण महिलेची पद्धत असते. असे करताना पाणी जर इकडे तिकडे गेले तर ती घरात जाताच भांड्यासकट नवरोजी तिच्यावर चाबूक ओढण्यास सज्ज असतात. तिला खाली पाडून मनसोक्त मारतात. ‘का गं, तुला लई अमक्या- तमक्याचं गोड वाटतं आहे. पाणी बरोबर त्याच्या रोखानं शिताडलंस. सांग, कुणाकडं जायचं ठरलं? कोणच्या येळंला जायचा विचार होता? सांगितलं तर बरं, नाहीतर रांडं तुझा जीवच घेईन.’ असा आरडा- ओरडा, मारहाण करावी, बांगड्यांचा चक्काचूर करावा. असा ओरडा आमच्यासारख्या वयस्कर बायकांच्या कानी आला म्हणजे मग आमच्यासारख्यांनी त्या रागीट नवरोबाला घरातून बाहेर काढावं, त्या कोवळ्या मुलीचं सांत्वन करावं, डोळे पुसावे, साडी नीटनेटकी करून तिला डोक्यावरून पदर द्यावा. म्हणावं, ‘अगं, तो नवरा आहे. त्याला कोण बोलणार? उठ, चूल पेटव. भाकर–तुकडा करून लाग कामाला.’ ग्रामीण महिलेच्या कामाला अंत नाही. ग्रामीण पुरुष मजुरी,

शेतमजुरी एवढेच करत असतो. पण महिला त्यांच्या बरोबरीनं मजुरी करून शिवाय घरातील कष्ट उपसत असते. नवऱ्याचा हक्क म्हणून तिचा आठवड्याचा पगारही तोच घेतो. ना तिच्या डोकीला तेल, अंगाला वस्त्र, पोटाला अन्न. त्यातच गरोदरपण. मुलाबाळांचे तिलाच करावे लागते. अंगावरल्या दुधावर मुलांचे पोषण करावे लागते. रात्रंदिवस ती कष्टाने पिचत असते, दुःखाने रडत असते, गांजलेली असते आणि दारिद्र्याने बरबटलेली असते, पण भारतीय संस्कृतीने मात्र पुरेपूर नटलेली असते. एवढा नवरा छळत असतो, पण उठल्याबरोबर नवऱ्याच्या नावाने कपाळभर कुंकू लावते. गळयात काळ्या पोतीचे दोन पदरसुद्धा तिला मिळत नाहीत. आयुष्यात ' कुंकवाचा टिळा, काळी पोत गळा ' हाच तिचा धनाचा साठा असतो. पतीवर प्रेम करून आपलं आयुष्य तिने त्याच्यावरून ओवाळून टाकलेलं असतं. खरं तर तिला नवऱ्याने काय सुख दिलेले असते ? परंतु ती नवऱ्याचे अनंत उपकार मानत असते. स्त्रीत्व जपणाऱ्या एका व्रतासाठी तिने आयुष्याची राखरांगोळी करून पुरुषाच्या चरणी वाहिलेली आहे. ग्रामीण महिलेला आयुष्यात कुठलेही सुख मिळालेले नाही. वनवासानेच तिची ओटी भरलेली आहे. ग्रामीण महिला वयाने म्हातारी झाली तरी पतीगृही तिचा हक्क नसतो. आणखी एक उदाहरण सांगते– शंकर आणि शारदा अशी दोघेच वयस्क नवराबायको आहेत. बायको उंच, काळी आहे. दोघांचं छोटं झोपडं आहे. नवरा आज बारा वर्षे झाली अंथरुणावर पांगळा होऊन पडला आहे. तिने सकाळी उठून नवऱ्याचं सर्व करायचं, त्याला गरम भाकरी द्यायची अन् दिवसभर अन्नासाठी कष्ट करायचे. तरी दुपारी तिला अन्न मिळत नाही. जर कुणाला दया आली तर तिला तुकडा द्यावा, त्यावर तांब्याभर पाणी पिऊन तिने वेळ भागवावी. पाच वाजता जी मिळेल ती मजुरी घेऊन, चहा-साखर आणणार, नवऱ्याला चहा करून देणार. आवराआवर करून उद्याच्या मजुरीची चौकशी करावयास गेली व जरा उशीर झाला की, नवरा काठी घेऊन मारण्यास सज्ज. गोड बोलून जवळ बोलावेल नि काठीचे दोन रट्टे घालेल. ' रातची कुठं गे रांडं मला सोडून गेलीस ? ' ती म्हणाली ' अगे बया, काम नको का बघाया, गावात मोलमजुरी करून आणती, तुम्हाला घालती आन् मलाच मारता व्हय ? ' तो म्हणतो, ' रांडं, नीघ माझ्या घरातून. तू काय तुझ्या बापाच्या गावातून आणून घालतीस काय ? माझ्याच गावचं खातेस. ' पावसाळ्यात त्याची उपासमार होते. काम नसतं. बायको उपासाला कंटाळून म्हणाली, ' आता आपण म्हातारे झालो. मलाबी काम मिळंना. आहे ते टाकूया विकून. कुठं आपल्याला पोरंबाळं हायेत ? ' त्यान म्हणावं ' अगं, उठ उठ माझ्या पुढनं. याचा मालक मी हाये. तुजं ग काय त्यात हाये? चालती हो माझ्या घरातून.' सर्व अवयव गलितगात्र होऊन मरणप्राय अवस्थेत अंथरुणावर पडलेल्या पुरुषाची एवढी सत्ता. मिळेल ते आणून, चिमणीसारखा चारा घालून शेवटी ती सत्ता नसलेला गुलामच. तिला कुठली सत्ता नाही. नवऱ्याच्या झोपड्यावर तिचा हक्क नाही. स्त्री मरेपर्यंत चरख्यात घालून

तिचा रस न् रस काढून घेऊन शेवटी स्वतःच्या वारसाहक्कात मुळीच तिला भागीदार होऊ देणार नाही.

ग्रामीण महिलेचं अस्तित्वच अशा प्रकारे मुळात शून्यात आहे. सुशिक्षित स्त्रियांनी आता ग्रामीण महिलांच्याकडे मोर्चा वळविला पाहिजे. लिखाणातून त्यांचे दुःख समाजापुढे मांडले पाहिजे. नुसते न पाहता त्याचा अनुभव घेतला पाहिजे. महिन्यातून एकदा तरी खेडोपाडी जाऊन त्यांची पिळवणूक थांबवली पाहिजे. त्यांच्या आर्थिक अडचणी सोडविल्या पाहिजेत. सुशिक्षित महिलेला लाभलेल्या वृत्तीचा उपयोग होईल. सुशिक्षित स्त्रीचा नाडलेल्या स्त्रीला दिलासा मिळेल व आपल्या स्त्री जातीसाठी काहीतरी केल्याचं तिला समाधान मिळेल. दुःखी महिलेचे अश्रू पुसले तर ते कधीही वावगे होणार नाही. या महिला म्हणजे रसरसत्या अग्नीतून निघालेलं शंभर नंबरी सोनं आहे. या महिला रसरसत्या उन्हात किती कष्टाची कामं करतात! परंतु ती कामं करताना विरंगुळा म्हणून त्या नकला करतात. त्यांच्यापाशी अनेक कला आहेत, पण त्या कष्टामध्ये विरून जातात. कारण त्यांच्या कलेला वाव नाही, कोणता वशिला नाही. त्यांच्या अंतःकरणात शिरून त्यांच्या कलागुणांना वाव द्यावा. कारण सुशिक्षित महिला हा दलित, ग्रामीण स्त्रीचा दिलासा आहे. ती आपल्याला आर्त हाक मारत आहे. ती हाक आपल्यापर्यंत पोहोचावी एवढीच सदिच्छा !

## शिल्पा मुंब्रिसकर

तुम्ही विचारता की, दलित स्त्रियांच्या अपेक्षा काय असतात? खरं म्हणजे, राग आला तरी चालेल पण, दलित स्त्रीला काही अपेक्षा नसतातच. ज्या काही अपेक्षा असतात त्या तुम्हीच करायच्या असतात. पहिल्यापासून आईवडिलांनी असंच बिंबवलेलं असतं की, आज जे करते आहे तेवढीच आमची अपेक्षा असावी. आम्हाला उद्याची अपेक्षा नसते, कारण जेव्हा शिकायची अपेक्षा असते तेव्हा शिक्षण घेऊ देत नाहीत. मुलगी घरात राहिली तर तिचं कसं होईल, केव्हा कोण डोळा ठेवेल, कधी नेईल तिला पळवून हीच त्यांना चिंता असते. म्हणून एकदा लग्न करून 'दिली तिथं मेली' हेच त्यांना माहीत असतं- वयस्क नवरा असला तरी तिचं लग्न करून द्यायचं. त्यामुळे आम्ही अपेक्षा ठेवतच नसतो. आजचा दिवस कसा जाईल, आज कसं राहता येईल, आजचं जेवण कसं भेटेल आणि आज घरात कसं वागवतील, याचीच अपेक्षा असते. तेव्हा उद्या काय होईल याचा आम्ही विचार करत नाही. तसंच आता बेबीताईंनी सांगितलं की खेड्यात म्हणजे आम्हाला त्रास असतो. पण दलित स्त्रिया शहरात जरी झोपडपट्टीतून असल्या तरी त्यांना पाहिजे तसं शिक्षण घेता येत नाही. आम्हाला सरकारने ज्या सोयी, जी मदत दिलेली आहे, ती आम्हाला मिळत नाही. जास्त पुरुषवर्गालाच मिळते. त्यांना असं वाटत नाही की महिलांनी शिकावं, पुढे जावं. त्यांना आपण स्वतः कसं

शिकू, पुढे जाऊ याचंच सगळं असतं. पाहिजे तेवढी दलित स्त्री पुढे आलेली नाही आणि दलित शिकलेले लोक कोणीही असोत, स्त्रियांना पुढे आणण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला नाही. असं मी त्यांना म्हणते, कारण तुम्ही शिकलेले आहात, तुम्ही आम्हाला पुढं आणलं पाहिजे. तुम्ही सगळं लेखनातून लिहिता, करता. म्हणजे लिहिणं हे सोपं असतं, पण कृतीत आणणं हे महाग असतं. आपल्या घरामध्ये जरी एखादी मुलगी असली तरी तिचं लग्न मी कस लावेन, नवरा कितीही मोठा शिकलेला असला तरी माझी बहीण त्याला द्यावी हाच विचार मध्यमवर्ग करतो. पण दलित वर्ग अजून करत नाही. आम्हाला जावईबापू काही हुंडा मागणार नाही अन् आम्ही काही जळणार नाही. पण जळण्यापेक्षाही आमचं जे जगणं असतं ते भयंकर असतं. ते जळून मरून गेलेलं आम्हाला पत्करेल, पण जे जिणं असतं ते आम्हाला अजिबात पत्करणार नाही, असं मी सांगते आणि शेवटी असं म्हणते, तुम्ही जे लिहिता– करता ते थोडं तरी कृतीत आणण्याचा प्रयत्न करा. एवढंच मला दलित लेखकांना म्हणायचे आहे.

**माधव कोंडविलकर**

तुमच्या म्हणण्याशी आणि दुःखाशी मी सहमत आहे. तुम्ही जे म्हणता–दलित लेखक स्त्रियांसाठी काही करत नाहीत, तर माझा अनुभव सांगतो– एक स्वतःचा. माझी पत्नी उषा इथे आहे. ती अल्पशिक्षित असताना मी तिचा स्वीकार केला. मी तसं कधीही म्हणत नाही, ती तसं म्हणते. आणि याचा उल्लेख मी पुढच्या चरित्रात्मक कादंबरीत करतो आहे. सध्या लिहितो आहे. हे मी सांगतो की उषाला ज्या वेळी मी स्वीकारलं त्यावेळी तिला करणारं कोणी नव्हतं. वडील वारले होते, भाऊ लहान होते, आई मिळवती नव्हती. म्हणजे साधनच नव्हतं त्या गावामध्ये तेव्हा. आजोबा होते– आईचे वडील. ते धान्य वगैरे आणून द्यायचे. हे मलाही काही माहीत नव्हतं. तर मला उषा आवडली. तिचं वागणं, तिच्या घरची माणसं मला आवडली आणि आमचे संबंध जुळले. पण तिचं शिक्षण कमी असल्यामुळे, मध्येच वडील गेल्यामुळे तिचं सगळं सपलं होतं. पण तिचा स्वीकार केल्यानंतर मला असं वाटायला लागलं की तिला शिकवलं पाहिजे. अजुनी तसं वाटतं. ती पण तसं म्हणते. दरम्यानच्या काळात म्हणजे काय गेल्या दहा- बारा वर्षांमध्ये ती आता समाजवाद म्हणजे काय, मार्क्सवाद म्हणजे काय, मराठीत कोणते लेखक आहेत, हे जाणू शकते आहे. दहा वर्षांमध्ये आमचं एक साहित्य संमेलनच असतं घरामध्ये. मुलीपण बोलतात. म्हणजे तितक ती करू शकली. आत्मप्रौढी म्हणून सांगत नाही मी.- पण त्यावेळची उषा आणि आजची उषा यांत खूप फरक आहे. असं मीच म्हणतो असं नाही. त्यावेळी आम्हाला पाहणारे सुद्धा आज असंच म्हणतात. तिच्या आईला त्याचा अभिमान आहे. इतरांना नाही फारसं– म्हणजे तेच त्या पातळीपर्यंत आलेले नाहीत.

**शिल्पा मुंब्रिसकर**

मी काही फार शिकलेली नाही, परंतु मी अनुभव खूप घेतलेले आहेत. मी

जेव्हा बाहेर वावरते तेव्हा मला असं वाटतं की, मीच तेवढी बाहेर आहे. जेव्हा मी एखाद्या बाईला विचारते की, तुझी मुलगी आमच्या पथनाटयात पाठवशील का, तर 'हो हो, छान करतेस तू' अशी तोंडावर स्तुती करतात, पण प्रत्यक्षात आम्हाला सहकार्य मिळत नाही व आमचं कार्य पुढे न्यायला मदत होत नाही. माझ्या घरात सुद्धा माझा नवरा कार्य करतो, परंतु त्याला असं वाटत नाही की, मी काही कार्य करावं. मीच आपली धडपड करत असते, सभा–संमेलनाला जाते. जर कधी म्हटलं ना की, 'हे काम करा, मी जरा जाऊन येते' तर लगेच म्हणेल, 'मला काय करा-यच आहे? जायचं आहे ना तुला? जा, फेडून घे तुझी हौस.' कधी पुस्तक वाच म्हणणार नाही. कुणी सांगितलं तर मीच वाचते. पण सुशिक्षित असले तरी चर्चा करणार नाहीत. नवरा असो, भाऊ असो अगर दीर असो! म्हणतील 'तिला काय कळतं? ती बाहेर जाते म्हणून तिला असं वाटतं की, मला खूप काही येतं.'

**बाबा आढाव**

चर्चा आता खरी सुरू झाली आहे. दलित स्त्री वेगळी बाजूला काढून आपल्याला नीटपणे आणि नेमका विचार करता येईल का, अशी मला थोडी शंका आहे. दलित स्त्री ही अनेक ठिकाणी समाजाबरोबर भिडलेली आहे. आता बेबीताईंनी जे वाचलं त्यात त्यांनी 'दलित स्त्री'च्या ऐवजी ग्रामीण असा शब्द वापरला. ग्रामीण याचा अर्थ कष्टकरी स्त्री आहे, मोलानं काम करणारी स्त्री आहे, अंगमेहनत करणारी स्त्री आहे. आणि तिथं असलेल्या पाटलाकडली, देशमुखाकडली स्त्री आहे. यातही असे काही फरक पडतात. आता विरोध असा दिसतो की, ज्या स्त्रिया आंबेडकरी चळवळीमुळे शिकतात, त्या स्त्रियांच्या वाटयाला जे जिणं येतं आहे, आणि जे पुरुष शिकताहेत आणि त्यांना जे नव्यानं जीवनात वागावं लागतं आहे, त्यामुळे मला असं दिसतं की, काही प्रकारचे विसंवाद या ठिकाणी पहायला मिळतात. ज्याचं लग्न लहानपणी झालं आहे, तो आता प्राध्यापक झाला आहे. मग त्याला त्या बायकोबरोबर संसार करताना अवघड होताना दिसतं आहे. तर आता हा दलितांच्या पुरताच प्रश्न आहे का? तर नाही. आणि मग त्यातून काही प्रश्न निर्माण होताहेत. मग त्याच्याकडे आपण लक्ष केंद्रित केलं पाहिजे. आता कारखान्यात काम करायला आलेली मुलं. त्यांचं लग्न रत्नागिरीला वडिलांनी केलेलं असतं, पण इथे त्यांची काही भानगड होते. तो प्रेम करायला लागतो. त्यातून समाजव्यवस्थेमध्ये जे प्रश्न निर्माण होतात, ते प्रश्न सुद्धा आपण विचारात घेतले पाहिजेत. मला एकंदर असं दिसतं की, दलित, मग ते कोणीही असू देत, महार असू देत अगर मातंग असू देत, मराठयांचीच ते कॉपी करत असतात, असं मला वाटतं. आता ब्राह्मण जरी म्हटला, आणि खेडयातला ब्राह्मण जरी म्हटला, तरी त्याचं जीवन परत अलिप्त असतं. किती जरी खेडयात तो असला तरी तो आपल्या

मुलांना शिकवणारच. शिल्पा म्हणाली त्याच्याशी मी सहमत आहे. की जसे, मराठे पुरुष बोलतात– तू मूर्ख आहेस, तुला काही कळत नाही, तसं दलित बोलतात. आता आमच्या घरात 'अरे' ला 'कारे' चालतं का? तर नाही चालत. जी धुसफूस चालते ती वेगळया पातळीवर चालते. मध्यमवर्गीय पातळीवर चालते. आता माझी बायको पण नोकरी करते. तिची मैत्रीण आली तर ती पण म्हणते, 'तुम्ही बघा की जरा स्वैपाकाकडे. मी तिच्याशी बोलते आहे. तुमची का सारी घाई चालली आहे?' तिच्या ज्या जाणीवा आत्ता झाल्या आहेत, ती जी समान पातळी आली आहे आणि त्यामुळे जर को- ऑपरेशन हवं असेल, तर तिची अडचण ही माझी अडचण, असं जाणून वागलं पाहिजे.

कोळशावर, मालधक्क्यावर काम करणाऱ्या स्त्रिया आहेत, त्यांचा एक अनुभव सांगतो. लातूर स्टँडवर एक माणूस आपल्या बायकोला मारत होता जोरजोरात आणि सारे लोक लांबून बघत होते. आता आम्ही मध्ये पडू लागलो तर दुसऱ्यांनीच अडवलं. 'अहो, त्याची ती लग्नाची बायको आहे. मध्ये जाऊ नका.' मी म्हटलं, 'अरे, तुला कसं कळलं ती लग्नाची बायको आहे का नाही ते? आणि असली तरी रस्त्यावर काय मारायचं?' लगेच तो मला म्हणाला, 'बायकोला मारतो आहे. तुम्ही कोण मध्ये येणार?' तेव्हा मी त्याला म्हटलं, 'रस्ता ही काही मारायची जागा नाही.' तेव्हा सगळयांनी त्याला धरलं. जेव्हा त्या बाईला कळलं की, आता आपल्या नवऱ्याला हे सर्वजण मारतील, तेव्हा तीच गर्दीतून पुढे येऊन म्हणाली, 'जाऊद्या, मारूद्या, नवराच हाये माझा. मारलं तर काय बिघडत नाही.' आता काय आहे, तुम्ही काय म्हणाल की, ही तिची लाचारी आहे. आता असं दिसतं की, ब्राह्मण स्त्री, सुशिक्षित स्त्री स्वतःचं दुःख गुदमरून गुदमरून लपवून ठेवते. आमच्याकडे नवऱ्याने टाकून दिलेल्या स्त्रियांचा परिसंवाद झाला. तेव्हा या स्त्रिया उठून बोलत होत्या आणि म्हणत होत्या, 'आम्हाला नवऱ्यानं मारलं तरी मोडलेल्या मनगटानं आम्ही दहा घरची भांडी घासतो, पण आमच्या अब्रूचा पंचनामा नाही आम्ही होऊ देणार. मी माझ्या आईवडिलांचं नाव राखीन, वगैरे वगैरे.' मला असं म्हणायचं आहे- आज हे जे वारं वाहतं आहे खाली ते सर्व समूहांच्या पर्यंत जात आहे का? दलित, सुशिक्षित मराठे. आता गंमत काय होते, ही सगळी मंडळी खेडयातून उठतात आणि शहरात येतात. परंतु ग्रामीण पातळीवर जी महिला राहते, तिची दैना फार विलक्षण आहे. खरी गोष्ट तर तिला चॉईसच नसतो. लग्नाचा चॉईस नसतो, घरात चॉईस नसतो, जेवायला बसायचा सुद्धा चॉईस नसतो. याचं कारण विलक्षण दारिद्रय असतं. आणि समाजाचं जे स्तरीकरण आहे ते लक्षात घेतल पाहिजे. आता धुळयाला तीन मुलींवर त्या गुराख्याने बलात्कार केला. मला तर खरं हे समजून घ्यायचं आहे की, तिकडे काही घडावं असं वाटत असेल, तर तिकडे जे काही घडतं त्याची इकडे प्रतिक्रिया काय उमटते? लगेच ते ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद आहे, असं म्हणायला लागतात. धुळयाला छोटया-छोटया मुलींवर

बलात्कार झाला त्याची छोटीशी बातमी आली. त्याची प्रतिक्रिया इकडे कुठे उमटली का? नाही. मग लोक समजावून घेतात, घेतात, म्हणजे काय घेतात? आपण जेव्हा म्हणतो की, समजावून घ्यायचं आहे, समजावून घ्यायचं आहे, म्हणजे नेमकं काय समजावून घ्यायचं आहे?

आता दलित लेखकांच्याबद्दल म्हणायचं तर, त्याच्या पलिकडे जाऊन, त्यांनी निवेदन केलेली 'दलित स्त्री' शोधून काढून जर विचार करायला लागलात तर ती प्रातिनिधिक होईल का नाही, याबद्दल मला शंका आहे. अक्करमाशी पुस्तक घेऊया. अक्करमाशी पुस्तकात हा जो प्रसंग आलेला आहे की, तो आपल्या बहिणीला रागावतो आहे की तू त्या पाटलाच्या नादी लागू नकोस. आता त्या मुलीला सुद्धा वाट कळत नाही की जावं कुठे! आता तो पाटलाचा मुलगा तिच्याशी संबंध निर्माण करतो आणि या शरणला तिचा राग येतो. आणि तो जेव्हा रागवायला लागतो की, 'तू असं करू नकोस.' तेव्हा त्याची आई काय म्हणते बघा. शेजारणी त्याला म्हणतात, 'अरे, तू का तिला रागावतोस, मारतोस?' तेव्हा आई म्हणते, 'तो तिला शेण करण्यास नकार देतो आहे.' आता या ठिकाणी आई एक आहे व वडील वेगवेगळे आहेत. आता हा प्रसंग घेऊन जर तुम्ही दुसरीचं चित्रण करायला जाल तर फार अवघड होईल, असं मला वाटतं. सध्या जीवन इतकं दुभंगलेलं आहे की, हे जे शब्द आहेत ना आत्मसन्मान, हीन भावना, ते फोल आहेत. म्हणजे तुमची आत्मसन्मानाची कल्पना काय? आणि तुमची आत्मसन्मानाची कल्पना घेऊन तिनं उभं राहावं असं आपल्याला वाटतं. तशी ती उभी राहणं त्या परिस्थितीत शक्य आहे का? उलट दलित लेखकांनी ते दिग्दर्शित करून दाखवलं आहे की, ते त्या परिस्थितीत केवळ अशक्य आहे. 'आठवणींचे पक्षी' मध्ये काय किंवा लक्ष्मण मान्यांच्या 'उपरा' मध्ये काय, मानवी पातळीवरून सर्व गोष्टी लिहिल्या आहेत? या पुस्तकांचं वैभव कोणतं आहे? तिथे नीतिनियम हे सगळे वेगवेगळे आहेत, नातेसंबंध हे फार महत्त्वाचे आहेत. एकमेकांना भेटताना नातेसंबंधांना हा समाज फार जपतो. उदा– मी बार्शीहून येताना लहान लहान गावांतून गाडी येत होती. प्रत्येक वेळी कंडक्टर बेल देत नव्हता, पण आतील माणसं बेल द्यायला लावत होती व ती माणसं गाठोडी ठेवून एकमेकांच्या गळ्यांत पडून रडत होती. असं सारखं चाललं होतं. 'बाई माझी पुन्हा भेटंल का?' म्हणून थांबून थांबून गळा काढत होत्या. एक शेटजी म्हणाले, 'हा या बायांचा पाघळ आहे, पाघळ.' तेव्हा त्यातील एक बाई म्हणाली, 'का हो शेटजी, हा पाघळ आहे व्हय? तुम्ही नोटा देऊन तुमची मुलगी सावलीला दिली आहे. आम्ही नोटा घेऊन मुलगी तुम्हाला विकली आहे. आमचं दुःख तुम्हाला नाही कळायचं.' ही जी मांडणी आहे ती, आपल्या दुःखाची मांडणी, अत्यंत स्पष्टपणे ग्रामीण दलित स्त्री करताना दिसते. ग्रामीण देशमुखाची स्त्री आपलं दुःख स्पष्टपणे मांडू शकणार नाही. आता असंच महारोगासंबंधी आम्ही पहातो. आता महारोग झालेल्या माणसाकडे इतर लोक

जसं पाहतील तसं महार लोक पहात नाहीत. तो येतो, जेवतो, समोर बसतो, सगळं करतो. त्याला हिडीस- फिडीस करत नाही. आता ही माणसं, बाया, म्हाताऱ्या एकमेकांशी अत्यंत मायेने, अत्यंत जिव्हाळ्याने जगतात. आता हे चित्रण मला बरोबर वाटतं. हे कुठं बदलून दाखवलं आहे असं मला वाटत नाही. आज असं मला वाटतं, आज तिचे जे कष्ट आहेत त्याबद्दल तिला जे मिळतं त्याबद्दल तिला काही निर्णय करता येत नाहीत. शहरात येऊन झोपडी जरी घातली तरी कुटुंबाची सर्व जबाबदारी तिच्यावर असते. बाजारात तिनेच जायचं, लाकडं तिनेच आणायची, दळून तिनेच आणायचं, आलेल्या पाहुण्याला हिनेच वाटेला लावायचं. यानं फक्त १० ची नोट तिच्यापुढे टाकायची आणि सारं तू बघ असं सांगायचं. यांची व्यसनाधीनता काही ठिकाणी बायकांच्यात सुद्धा दिसते. आपली समाजरचनाच इतकी विचित्र आहे. यांच्यातला पुरुषवर्ग सुद्धा गुदमरलेला असा का वाटतो ? कारण मोठ्या प्रवाहात मिसळून जाण्याची जी त्याची ऊर्मी असते ती पुरीच होत नाही. त्यांना मिसळून घेतलंच जात नाही. प्रत्येक ठिकाणी ते असं शंकेनं पाहतात. त्यांना पाहून लगेच 'लई मांदळ इकडे आलं का?' असं म्हणतात. बेशरमपणे लोक असं म्हणतात. आता या जाणीवा आपण जेव्हा सांस्कृतिक पातळीवर एक यायचं म्हणतो, तेव्हा शब्दांची सरमिसळ होईल, वागण्याची सरमिसळ होईल. या सरमिसळीला आपण काही वाव देणार आहोत का ? मग आपल्याला सुद्धा दलितांशी दलित लेखकांच्या मार्फत संवाद साधून बोलावं लागेल. ही एक प्रकारची गॅप आहे. आता मध्यम वर्गीयांमध्ये एक फायदा आहे. शिक्षण पूर्ण झाल्यावर शिक्षक, शिक्षकाची बायको यांना पगार सारखा असतो; क्लार्क, क्लार्कची बायको यांना पगार सारखा असतो. परंतु अशिक्षितांत 'समान काम, समान दाम' असं होत नाही. अंगमेहनतीच्या कामात स्त्रीला कमीच मिळतं आहे. तिनं किती जरी मेहनत केली तरी तिला पुरुषाइतकं मिळण्याची सोय नाही. पुरुषाची देखील तयारी नाही. ' समान काम, समान दाम ' मध्ये स्त्रीला पुरुषाइतकं वेतन देण्यास पुरुषाचा विरोध असतो ही आज परिस्थिती आहे.

## पी. डी. कुलकर्णी

आता बाबा आढाव फार चांगलं बोलले. ते जे समजूतदारपणे मुद्दे मांडतात ते पटायला लागतात. परंतु ज्या तत्त्वावर त्यांनी मुद्दे मांडले त्या तत्त्वावर काही भ्रम होण्याची शक्यता आहे, म्हणून त्यांच्या दोनचार मुद्यांवर मी बोलणार आहे. पहिला मुद्दा असा आहे की दलित स्त्री वेगळी काढून तिच्या अडचणी निराकारण करणे आपल्याला जमेल का? माझं म्हणणं की वेगळं काढणं आवश्यक आहे. तिच्या दलित म्हणून ज्या समस्या आहेत त्या सार्वजनिक दलित म्हणून आहेतच, दलित पुरुषांच्या आहेत त्या आहेतच. आणि दलित स्त्री म्हणून ज्या अॅडिशनल आहेत त्यांचा

विचार होत नाही. म्हणून त्यांना वेगळं काढणं जरुरी आहे. म्हणून त्यांची आयडेंटिटी समजावून घेणं आवश्यक आहे. दलित स्त्री म्हणजे सामूहिक जीवनाचा एक घटक नाही आहे. आणि ते आता नजरेला येऊ लागलेलं आहे. दुसरं यांनी असं म्हटलं, दलित लेखकांच्या मार्फतच यांना समजावून घ्यायचं आहे का? नाही, तसं नाही आहे. स्त्रीवाणी जी आहे, ती प्रत्यक्ष त्या दलित स्त्रियांशी संपर्क साधून, त्यांना समजावून घेण्याचा प्रयत्न करते आहे, त्यांच्या जीवनाचा अभ्यास करते आहे. अनेक मार्गांपैकी एक म्हणजे दलित चरित्रांत त्यांचा उल्लेख आला आहे, त्याद्वारे त्यांना समजावून घेऊया. म्हणून ही सभा आणि म्हणून हे चर्चासत्र. दुसरं उदाहरण दिलं विसंवादाचं. जे दलित शिक्षणाने अगर इतर काही मार्गांनी वर येतात त्यांना, लहानपणी लग्न झाल्यामुळे, विसंवाद निर्माण होतात, हाच मुळी मुद्दा आहे. स्त्रियांच्या प्रगतीमध्ये व पुरुषांच्या प्रगतीमध्ये विसंवाद निर्माण होतो याची जाणीव आपणाला आहे. परंतु तो विसंवाद एका रात्रीत कोणी संपवत नाही. परंतु तो कमी करण्याचा प्रयत्न करता येतो. कोंडविलकरांच्या उदाहरणात तसं आलं आहे. शिल्पाबाईंच्या बोलण्यातही तसं आलं. म्हणजे विसंवाद असणं हा या कल्पनेचा गाभा आहे. तिसरी गोष्ट- या चरित्रांवरून आढळणाऱ्या स्त्रिया या प्रातिनिधिक असतील का? नाही. जेव्हा सर्व्हेपद्धतीनं सापडलेली व्यक्ती- मग ती कोणीही असो-दलित असो, कामगार असो, लक्षाधीश असो– ती या पद्धतीमुळे जास्तीतजास्त अॅबस्ट्रॅक्ट होत जाते. आणि पूर्णतः प्रातिनिधिक होते त्यावेळी ती स्टिरिओटाईप होऊन जाते. त्यामुळे फार जर रिअॅलिस्टिक होण्याचा प्रयत्न केला तर काहीच हाती लागणार नाही.

त्यानंतर आत्मसन्मानाचा प्रश्न त्यांनी काढला की, तुमच्या संकल्पनांप्रमाणे तिने आत्मसन्मान वाटून घ्यावा का? असं कोणीच म्हणालेलं नाही. तिच्या समजुतीप्रमाणे तिला आत्मसन्मान वाटावा एवढीच फक्त अपेक्षा. तिची समज काय आहे हे आम्ही सांगत नाही. तेव्हा आत्मसन्मानाबद्दल किंवा व्हॅल्यूबद्दल कोणी लादतं आहे असं मुळीच नाही. आणि शेवटी ते म्हणाले की, या ज्या गोष्टी असतात त्या त्या व्यवस्थेमध्ये अशक्य असतात. तोच पुन्हा मुद्दा आहे. तुम्ही दलित समाजाचे पुढारी, आणि आम्ही समाजकार्यकर्ते. आम्ही समाज बदलायला निघालेलो आहोत. आपण ह्या समाजव्यवस्थेत बदल करणं अशक्य आहे असं म्हणू नये. जे समाजपरिवर्तन करायला निघालेले आहेत, प्रचलित व्यवस्थेला विरोध करताहेत त्यांनी व्यवस्थेचं समर्थन देऊ नये.

### नीलम गोऱ्हे

अध्यक्ष सरितातार्इ, मित्रमैत्रिणी, मला अपरिहार्य कारणांमुळे उशीर झाला. पण एक फायदा असा झाला- माझ्यानंतर जे काही जण बोलले असते त्यांचं बोलणं आधीच मला ऐकायला मिळालं. या आत्मचरित्रांतील स्त्रियांच्याबद्दल जे काही मुद्दे चालले होते त्यांतील एक वस्तुस्थिती म्हणूया किंवा सामाजिक स्थितीमधून

आलेली अपरिहार्यता म्हणूया ती अशी की, ही पाच माणसं आहेत ती वेगवेगळ्या चळवळीतून आणि वेगवेगळ्या पार्श्वभूमीतून आलेली माणसं आहेत. म्हणून जेव्हा आपण म्हणतो, व्यवस्था नाकारणाऱ्या माणसाकडून आपली जास्त अपेक्षा असते, त्याच्यामध्ये सुद्धा आपण जर पाहिलं तर मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे मधील सामाजिक परिस्थिती आणि संघर्षाचं स्वरूप वेगळं आहे, उपरामधील संघर्षाचं स्वरूप आणि तिथली पार्श्वभूमी वेगळी आहे आणि पूर्वाश्रमीचे जे महार आणि बौद्ध चळवळीत असणारे- तिथे बाबासाहेबांचा प्रभाव आहे आणि तिथले संघर्ष वगैरे सगळं वेगळं आहे.

एकूणच आपल्या समाजामध्ये, गेल्या दीडशे वर्षांपासूनचा विचार केला तरी, धर्मामध्ये सुधारणा व्हावी म्हणून ज्या ज्या सुधारकांनी प्रयत्न केले त्या त्या ठिकाणी असं दिसेल की जातीच्या प्रश्नावर विद्रोह करणं हे लवकर स्वीकारलं गेलं. त्या तुलनेमध्ये मनुस्मृती जरी नाकारली गेली असली तरी जातीच्या प्रश्नावर ती नाकारली गेली. परंतु स्त्री– पुरुष विषमतेच्या संदर्भामध्ये ती नाकारायची म्हणजे काय करायचं? याचाच टप्पा कुठेतरी तुटल्यासारखा वाटतो. मी दुसरं उदाहरण देईन. राखीव जागांच्या प्रश्नावर१९२० साली मोठे संघर्ष चालले होते, म. गांधी, व डॉ. आंबेडकरांचे. अनुसूचित जातींचे विद्यार्थी, लोक, राजकारणी यांच्या जागांविषयी ब्रिटिश सरकारच्या रिपोर्टस्‌मध्ये उल्लेख आहे की, स्त्रियांच्याही राखीव जागांची चर्चा होऊ शकेल. आपल्याला दिसेल की गेल्या साठ वर्षांत तो धागा कुठेतरी मागेच राहिला आहे. परंतु परत १९७५ सालापासून त्या सर्व गोष्टींना उजाळा मिळालेला आहे असं दिसतं. इथं हे सर्व लेखक जमले आहेत ही फार चांगली गोष्ट आहे. आपल्या स्वतःच्या लेखनावर जेव्हा चर्चा होते तेव्हा स्वतःच्या शरीरावर शस्त्रक्रिया केल्यासारखी वाटते. पुरुषाच्या दृष्टिकोनातून उल्लेखनीय असं जे जग आहे त्याचं चित्रण करणं म्हणजे दोष दाखवणं, किंवा फार मोठी चूक दाखवणं असं मला वाटत नाही. स्त्रीने जर आत्मचरित्र लिहिलं, मग ती कोणत्याही जातीची असो, तर तिला जे उल्लेखनीय वाटेल तेच ती लिहिणार आहे. आणि हे जे काही अनुभव आहेत ते एका दृष्टीने फिल्टर होऊन आपल्यापर्यंत आलेले आहेत. या पाची आत्मचरित्रांत ज्या काही बायका बोलतात, जो काही संघर्ष करतात, आपल्याशी भांडतात त्यात त्यांचं दुःख आपल्याला दिसतं. लेखकाला दिसलेलं दुःख त्याने आतापर्यंत मांडलेलं दिसतं.

दुसरं, या स्त्रियांच्या नवऱ्याकडून आणि समाजाकडून ज्या अपेक्षा आहेत, त्या अपेक्षा आणि तिला भोगावी लागणारी वास्तविक परिस्थिती यांमधला संघर्ष यामध्ये सातत्याने आहे असं आपल्याला दिसतं, आणि या पाच आत्मचरित्रांमध्ये काही समान सूत्रं आपल्याला दिसतात. या बायकांना समानपणे काही काही भोगायला लागलेलं आहे. एकतर बलुतं मागणं, देवदेवस्कीचा जो प्रकार आहे- अंगात येणं, लग्नप्रसंगासारख्या प्रसंगाच्या रूढी, परंपरा या दलित समाजातल्या स्त्री आणि पुरु-

षांना समान समजणाऱ्या गोष्टी आहेत. बलुतं मागणं व मेलेलं ढोर वाहून नेणं हा स्त्री व पुरुषांचा समान अनुभव आहे. पण दुसरीकडे आपण असं लक्षात घेतलं पाहिजे की, स्त्री असल्यामुळे तिची समाजामध्ये अवहेलना झालेली आहे. जो प्रश्न कष्टकरी स्त्रियांच्या मध्ये आहे- मारहाण- तो सर्वांना समान अनुभवायला लागतो. म्हणून दलित स्त्रीचे जे काही प्रश्न आहेत ते या आत्मचरित्रांतून आपल्याला दिसतात. काही प्रश्न ते दलित असल्यामुळं आहेत ते बलुतं, देवदेवस्की, चळवळ, त्यांचे संघर्ष, मान- अपमान अन् त्यांच्या रूढीपरंपरा हे आहेत. दुसरं असं की मारहाण होणं, रोजगारासाठी कष्ट करणं, लैंगिक अत्याचार, तिचं व्यक्तिमत्व काय असावं, तिनं कसं रहावं, तिचं चारित्र्य काय असावं, त्याला नियम काय असावेत, ती कशी दिसावी याबद्दलच्या सौंदर्यकल्पना काय आहेत, त्या कुटुंबातील सासू- सून संबंध हे जे मुद्दे दलित स्त्रीबद्दल आहेत तसेच ते दलितेतर कष्टकरी, दरिद्री स्त्रियांच्या बद्दलही जाणवतात. कुटुंबातल्या पुरुषांची भीती वाटणं, त्यांनी मारहाण करणं यात परत बाई जर सुंदर दिसत असेल तर तिला तो सुंदर दिसण्याचा हक्क नाही. लक्ष्मण मान्यांच्या पुस्तकात उल्लेख आहे- 'भयाण सुंदर होती.' तसंच बलुतं मध्ये ती इतर पुरुषांबरोबर राहू लागली ते समाज स्वीकारू शकत नाही. कुटुंबामध्ये पुरुषाला असं वाटतं की हिची जी अपेक्षा आहे आमच्याकडून, स्वतःच्या जगण्याबद्दल, ती आम्हाला मान्य नाही. या चौकटीमध्ये राहणं तिला जर मान्य नसेल तर आम्ही दडपशाही करून तिला ते स्वीकारायला लावणार. आपण दुसरीकडे बघितलं तर असं दिसतं की, ज्याप्रमाणे बाबा आढाव म्हणतात, मराठा समाजात सुद्धा एखादी स्त्री सुंदर असली अन् नटायला लागली तर त्याच्यात असुरक्षिततेची जाणीव येते. परंतु आपल्या चौकटीमध्ये सुंदर दिसलीस तरी चालेल, नात्यागोत्यात सुंदर दिसलीस तरी चालेल, परंतु चारचौघांत तू सुंदर दिसायचं काही कारण नाही. मारहाणीच्या प्रकारात चोरी करण्याच्या प्रकारावरून करण्याची मारहाण आहे किंवा बाटवलं म्हणून मारहाण होते. या पाची चरित्रांमध्ये एक मुद्दा मला दिसतो की पाण्याच्या भोवती या स्त्रियांचं जग खूपच घोटाळत राहिलेलं आहे. आणि पाण्यासाठी लहानपणासून ते म्हातारपणापर्यंत अवहेलनाच त्यांच्या वाट्याला आली. या ठिकाणी परत स्त्री—मुक्ती चळवळीकडे मला लक्ष वेधावं वाटतं. एकंदर पाण्याची समस्या हीच बिकट असल्यामुळं सर्व स्त्रियांना यासाठी अवहेलना पत्करावी लागते. हा प्रश्न परत दलित—दलितेतर नसून सर्व स्त्रियांचाच प्रश्न आहे. आपण जो आत्मसन्मानाचा मुद्दा म्हणालो, आणि कुटुंबाकडून तिच्या असणाऱ्या अपेक्षा— आपण नाव त्याला काहीही देऊ— मानवमुक्ती म्हणू वा माणूसपणाची जाणीव म्हणू— हा परिघावरचा मुद्दा आहे असं मला वाटतं. इथं मला असं वाटतं की दया पवारांची आई म्हणते की, 'तुझ्या बापानी माझ्या अंगाला पाच बोटं सुद्धा लावली नाहीत.' इथे कुठेतरी बाप तुझा चांगला होता इतर पुरुषांच्यापेक्षा हेही असण्याची शक्यता आहे. त्याचं निराळेपण हे तिला जाणवत असतं. सर्वसाधारणपणे मार खाणं दलित

स्त्रियांना आवडतं असं मानलं तर हे उद्गार आले नसते. पाण्यात बर्फ आत खूप व वर कमी दिसतो त्याप्रमाणे आत्मसन्मानाची जाणीव फार कमी वेळा दिसते. तरी सुद्धा ती आहे. आणि घरामध्ये नवरा, मुलगा, इतर पुरुषमाणसं यांनी आपला जास्त विचार करावा असं तिला वाटतं.

दुसरा मुद्दा मी घेतला आहे तो रोजगार आणि या स्त्रियांना करावी लागणारी जातीविशिष्ट कामं. मला इथे बलुतंमध्ये विशेष वाटलं की कोणत्याही स्वरूपाची अपेक्षा करावी नवऱ्यानं बाईकडून आणि तिनं ती मान्य करावी. दारूभट्टी जेव्हा वडील लावतात त्या वेळी त्यासाठी पाणी आणते ती म्हणजे स्त्रीच असते. जो काही कर्ता पुरुष निर्णय घेईल तो तिनं स्वीकारणं. आपण आज जसा आक्षेप घेतो की याच्यामध्ये आज बदलाचं स्वरूप काही दिसतच नाही, तेव्हा हे लक्षात घेतलं पाहिजे की ही आत्मचरित्रं बऱ्याच वर्षांपूर्वीची आहेत. स्पष्ट सांगायचं तर १९७० सालानंतरच्या चळवळींचा याच्यामध्ये काही संदर्भच नाही आहे, की ज्याच्यामुळे विद्रोह सुरू झाला, विस्फोट सुरू झाला. त्या आधी लेखकांनी, कुठंतरी निर्णयाची संधी मिळायला लागल्यानंतर, भूतकाळाकडे बघण्याला सुरुवात केलेली आहे. त्यावेळी समाजामध्येच चळवळ जिवंतपणे उभी नव्हती, तर ती आयुष्यापर्यंत त्यांच्या पोहोचलीच असावी ही अपेक्षा धरणं सुद्धा बरोबर नाही. आठवणींचे पक्षी मध्ये येतं पीठ गोळा करणं किंवा विदवा गोळा करणं, किंवा तराळअंतराळ मध्ये पुरणपोळचा गोळा करणं, आणि बलुतंमधलं कागद गोळा करणं, गिरणीतलं धान्य गोळा करणं आणि काही गोष्टी आहेत, उपरामध्ये झाडू करणं या गोष्टी जातीविशिष्ट आहेत. एखाद्या स्त्रीनं आत्मचरित्र लिहिलं, परंतु ती दलित नसेल तर यातले काही अनुभव तिला येणार नाहीत. तिचे अनुभव थोडेसे निराळे असतील असं मला वाटतं. रोजगार जातीविशिष्ट आहेत. त्यामुळे ती एक मर्यादा म्हणा अगर सामर्थ्य, त्या अनुभवांचं विश्व आपल्याला पहायला मिळालं. या मध्ये एवढी संवेदनशीलता लेखकापर्यंत पोहोचते असं मला वाटत नाही.

एका मुद्याच्या बद्दल मला असं वाटतं की सामाजिक जीवन आणि लैंगिक कल्पना याबद्दल विचार करताना बायकांनी कसं जगावं आणि पुरुषांनी कसं जगावं हा प्रश्न येतो. त्यात दया पवार असं म्हणतात की, पुरुषांनी रांडबाजी करणं म्हणजे छातीवर एखादं मेडल लटकावल्यासारखं वाटतं. पण बायकोला मात्र काटेकोर नियम. परंतु आता जेव्हा हे लेखक परत लिहितील तेव्हा त्यांची दृष्टीसुद्धा बदललेली असेल— या अनुभवांकडे पाहताना. तिथे आपल्याला दिसेल की उपरामध्ये सुद्धा दिसतं की गोरी बाई असावी. म्हणजे ब्राह्मणी सौंदर्याच्या कल्पना आहेत. आणि त्याबद्दलचा नकार का बरं दिसत नाही, हे मला फार आश्चर्य वाटतं. ती गोरी होती आणि कोकणस्थ बायकांसारखी, हे तर त्यात फारच येतं. ' मुक्काम पोस्ट ' मध्ये जे चर्मकार स्त्रीचं पात्र आहे ते बोलकं आहे की, भटांना सुद्धा त्या बायकांचा मोह आवरता येत नाही. तेव्हा माणूस म्हणून आम्ही जेव्हा वाचायला लागलेल्या आहोत त्यावेळेला आमच्या

अपेक्षा वाढलेल्या आहेत की, सौंदर्याबद्दलच्या कल्पना आहेत त्या बदलल्या पाहिजे होत्या. चळवळ जरी सुरू झाली आणि ती प्रत्यक्ष आयुष्यात उशीरा पोहोचली असली तरी निग्रोंची चळवळ आणि आपल्यातली चळवळ यांच्यात साधर्म्य आहे याची जाणीव चाळीस–पन्नास वर्षांपासून सुशिक्षित तरुणाला होते आहे असं मला वाटतं. लैंगिक कल्पनांमध्ये सुद्धा नुसती 'ठेवली' तर चालेल, परंतु विवाह करण्याला नकार आणि मग बाकीच्या गोष्टी आहेत त्या खपवून घेणं. जातिविशेष मध्ये जातपंचायतीचा फार मोठा प्रभाव आहे. उलट आपल्याला दिसेल की जे लोक गाव सोडून मुंबई-पुण्यासारख्या ठिकाणी गेले, ते आपल्या चाळीतील खोली बंद करून बाईला चार शिव्या देऊन गप्प बसवतातच.

या ठिकाणी असं म्हणतात की, जर एखाद्या सुनेचा संबंध कोणाशी आलाच तर सासूच सर्वात प्रथम बोंब मारायला लागते- कुठे तू शेण खायला गेली होतीस, वगैरे. दुसऱ्या प्रसंगात मुलगा आहे तो म्हणतो की, बायको जी आहे ती मी सामायिक केलेली आहे. लैंगिक कल्पनांच्या मध्ये दुटप्पी नियम आहेत. बाईला एक नियम व पुरुषाला एक नियम. याचं अत्यंत सुस्पष्ट दर्शन या पाचही आत्मचरित्रांमध्ये होतं.

स्त्रियांच्या संदर्भात विचार करताना एक मुद्दा मला असा वाटतो, त्या आरोग्यापासून वंचित आहेत. औषध मिळू शकत नाही, बाळंतपणात डॉक्टर येऊ शकत नाही. तराळ– अंतराळ मध्ये येतं की धाकटा भाऊ दगावतो आणि दगावल्यानंतर सुद्धा औषध पोचू शकत नाही. गावठी औषधांचा सुद्धा उपयोग आहे की! बलुतं मध्ये वासना मारण्यासाठी काकू कडुलिंबाचा रस घेते. आज आम्ही स्त्रीमुक्तीमध्ये ज्या आहोत त्यांचं असं म्हणणं आहे की मध्ययुगात आणि सरंजामशाही मध्ये स्त्रियांचा जंगलाशी संबंध अधिक येत होता आणि स्त्रियांनी काही झाडपाल्याची औषधं शोधून काढली आहेत. याबद्दल त्यांना जे ज्ञान होतं ते संपूर्णपणे मारलं गेलं. आणि इथे आपल्याला दिसेल- नवनवीन आरोग्याच्या कल्पना जशा वाढायला लागल्या तशी ही दलित स्त्री आरोग्यापासून परत दूर फेकली गेली.

लग्नप्रसंगीचे जे काही प्रसंग आहेत ते मला विनोद म्हणून काही घेता नाही आले. बलुतं मध्ये विहिणीला चिमटे वगैरे काढणं– त्या बाईला कसं वाटत असेल ते अव्यक्तच राहिलं आहे. एक आहे. मुक्काम पोस्टमध्ये आलेलं आहे. बहिणीला लिंब काढायला सांगतात व बहिणीला त्याचं फार वाईट वाटतं. काळजाला भिडेल अशा प्रसंगापेक्षा आत्मशोधाचाच प्रोसेस इथे चाललेला आहे. आठवणींचे पक्षी मध्ये स्त्री कुठे भेटते ? तर पाच सहा प्रसंगांतच स्त्री येते. या परिसंवादाचा विषय 'दलित स्त्री' असा आहे. तर फक्त दलित स्त्री असं कसं म्हणायचं ? सवर्ण स्त्रियांकडून सुद्धा फार वाईट अनुभव आलेले आहेत या दलित लेखकांना. आणि काही चांगले अनुभवही. आता या अनुभवांना चांगले अनुभव असं म्हणता येईल की हीना हा वेगळा भाग आहे. जात कळल्यावर न बोलणाऱ्या, अगर हेटाळणीने बोल-

णाऱ्या स्त्रिया यात आहेत. स्त्री मुक्ती चळवळ ही जी इतर समस्यांवर बोलते तेव्हा हे जे नाकारलेपण आहे, दलित माणसाशी जे माणूस म्हणून वागलं जात नाही, आणि त्याची खंत असण्याची जी भावना, जितकी आत्मसन्मानाची भावना आपण शोधतो आहोत, तितकीच नकाराची भावना शोधणं याचीसुद्धा जाणीव स्त्री-मुक्ती-वाद्यांच्यात झाली पाहिजे असं मला वाटतं. त्याप्रमाणे या पाची आत्मचरित्रांमध्ये मनाला भिडतील असे प्रसंग आहेत. उपरा मध्ये शेवटी लेखक आंतरजातीय विवाह करतो. काही वेळेला समाजामध्ये बदल होतात ते अपरिहार्य असतात. त्यांच्या वेदना समाजाला होतात. ज्या खेड्यातून हे लेखक आलेले आहेत त्यातील सवर्ण स्त्री किती बदलली आहे याबद्दल मला तरी शंका आहे. यामध्ये बेबीताई कांबळ्यांच्या लिखाणात चळवळींचा उल्लेख खूप येतो आणि बाईच्या रोजच्या जगण्यातला जो तपशील आहे तो खूप छान येतो. तसा तो वाईट आहे. आपल्याला अक्षरशः हादरायला होतं. अनुभव जो आहे तो चांगला म्हणताच येणार नाही. परंतु किती सामर्थ्यानं तो प्रसंग लिहिलेला आहे! रोजच्या जीवनामध्ये जे घडतं ते टिपून घेण्याची क्षमता या स्त्रियांमध्ये जाणवते. चळवळीमधील स्त्रियांचे उल्लेख फारच कमी येतात. ही आत्मचरित्रं उशीरा लिहिली गेली असली तरी अगोदरचा काळ याच्यामध्ये चित्रित झालेला आहे. दया पवारांच्या पुस्तकात मात्र शांताबाई दाणींचा उल्लेख आढळतो.

## दया पवार

आतापर्यंतच्या अनेक वक्त्यांच्या बोलण्यात दलित पुरुष दलित स्त्रीला मारतो असा उल्लेख आला. तसेच तो तिला बरोबरीने वागवत नाही असेही मला सांगण्यात आले. तशी वागणूक दिली जाते हे खरे आहे. परंतु, त्यामध्ये तिच्याशी शत्रुत्व असते असे नव्हे, तर आम्ही 'पुरुष' म्हणून लहानाचे मोठे झालेले असतो, तसेच जगत असतो. त्यामुळे आमचे वागणे तसे अपरिहार्यपणे होते. मला तर त्याच्याही पुढे जाऊन असं म्हणायचं आहे की, प्रत्येकातच– प्रत्येक पुरुषात– 'शंकराचार्य' लपलेला असतो. म्हणून आमच्या वागण्यात अशी वृत्ती दिसून येते.

या पाच आत्मचरित्रांत स्त्रियांच्या संदर्भातील जे प्रसंग आहेत ते त्या त्या वेळच्या परिस्थितीनुसार आहेत हे वाचकांनी लक्षात घ्यायला हवं.

मला वाटतं, स्त्री ही पुरुषापेक्षा कुठेही कमी नाही. ते एकमेकांसाठी पूरक आहेत. परंतु पुरुष बाईला 'अग– तुग' करतो, पण बाई मात्र पुरुषाला 'अहो– जाहो' करते. खरं म्हणजे, कोणी कोणाला कमी लेखू नये.

तसंच स्त्रियांचं दुःख अतिशय व्यापक आहे. कष्ट ती करते आणि त्याचं फळ मात्र दुसरे लोक घेतात– पखाल तिनं वाहायची आणि पाणी मात्र दुसऱ्यांनी प्यायचं, हे कसं काय? त्याचबरोबर ती स्त्री दिवसा अस्पृश्य आणि रात्री मात्र स्पृश्य हे कसं

काय? असा प्रश्न मला पडतो.

आताची दलित स्त्री काही प्रमाणात शिकलेली आहे. या शिकलेल्या दलित स्त्रिया बऱ्याच ठिकाणी नोकरी करतात, त्यामुळे त्यांचाही एक मध्यमवर्ग तयार झाला आहे. त्यांचीही कोंडी झाली आहे. या स्त्रिया पुढे का शिकत नाहीत? ती पुढे का येऊ शकत नाही? ती लिहू का शकत नाही? इत्यादी प्रश्न तर आहेतच, पण आजच्या दलित चळवळीमध्ये या अशा सुशिक्षित, मध्यमवर्गीय, दलित स्त्रिया नसतात. त्या का नसतात याचा विचार व्हायला हवा. या दलित स्त्रियांमध्ये त्यांचे ब्राह्मणीकरण करू पाहणारे मध्यमवर्गीय नॉर्म्स तयार झाले आहेत. यालाही बऱ्याच अंशी दलित पुरुष जबाबदार आहेत, असे मला वाटते. कारण सुशिक्षित स्त्रीची दलित चळ-वळीला अनुकूल अशी मानसिकताच तयार झालेली नाही.

या सत्राचा समारोप करताना, सत्राच्या अध्यक्षा श्रीमती सरिता पदकी म्हणाल्या– 'दलित समाजाची सुधारणा करताना त्याचे, दलित स्त्रियांचे ब्राह्मणी-करण होऊ देऊ नका असेच ठामपणे सुचवावेसे वाटते. कारण ब्राह्मणीकरण याचाच अर्थ, 'माझ्याहून इतर सर्व कमी आहेत' ही भावना वाढीस लागणं होय. ही इतरांना गौण लेखण्याची प्रक्रिया निर्माण होऊ देऊ नका असंही मला सांगावंसं वाटतं. तसंच माणूस सुशिक्षित होतो म्हणजे त्याच्यात नेमका कोणता बदल होतो याचा दलितां-च्या संदर्भात विचार व्हावा.

दलित स्त्रीला करमणुकीची साधनं उपलब्ध नाहीत हा मुद्दा काही वेळापूर्वी चर्चेत आला होता. तो डोळ्यांपुढे ठेवून तिला या संदर्भात काय देता येईल, तिच्या कलांना उत्तेजन कसे देता येईल याचा विचार होणे आवश्यक आहे.

तसेच कालच्या व आजच्या सत्रात दलित स्त्रीच्या संदर्भात परस्परविरोधी विधानं करण्यात आली. 'दलित स्त्रीला हवा तेवढा चॉईस (निवडीचं स्वातंत्र्य) आहे' असं काल लक्ष्मण माने म्हणाले, तर आज 'दलित स्त्रीला अजिबात निवडीचे स्वातंत्र्य नाही' असे डॉ. आढाव म्हणाले. ते दोघेही दलित समाजाचे अभ्यासक. प्रत्यक्ष कार्य करणारे कार्यकर्ते आहेत. त्यांच्या या विधानांबाबत कोणाचे तरी एकाचे बरोबर, दुसऱ्याचे चूक असे म्हणणे कठीण आणि चुकीचे आहे. मात्र यावरून दलित स्त्रीचे आयुष्य किती व्यामिश्र स्वरूपाचे आहे हे स्पष्ट होते.'

## ४ स्त्रीची भाषा

दुपारचे चर्चासत्र सुरू होण्यापूर्वी श्रीमती शिल्पा मुंब्रिसकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी 'उपरा' व 'तराळ-अंतराळ' या आत्मकथनातील काही प्रसंग सादर केले.

दुपारच्या चर्चासत्राची सुरुवात श्रीमती आशा मुंडले यांच्या 'दलित स्त्रीचा व तिच्याबद्दलचा भाषाव्यवहार' या विषयावरील शोधनिबंध वाचनाने झाली. त्यापूर्वी या सत्राचे अध्यक्ष डॉ. अशोक केळकर यांनी प्रास्ताविक केले.

श्रीमती मुंडले यांनी आपल्या शोधनिबंधात प्रामुख्याने पुढील मुद्दे मांडले—

उच्चशिक्षित कुटुंबातली, घराबाहेर पडून अर्थार्जन करणारी, दारिद्र्याने ग्रस्त नसलेली व आरोग्यसेवा उपलब्ध असलेली स्त्री आणि दलित— भटकी स्त्री यांच्या भाषाव्यवहारातही जमीन— अस्मानाचे अंतर आहे.

दलित स्त्रीला तिची भाषा ऐकू जाईल अशा ठिकाणी बोलण्याची संधी फार कमी मिळते आणि जेव्हा ती बोलते तेव्हा तिचे बोलण्याचे विषय प्रामुख्याने अस-तात— पाणी, अन्न, रोगराई, त्या रोगराईला कारण असणारे देवदेवस्की, जादूटोणा, भुताटकी, इत्यादी घटक, मुलांचा मृत्यू, नवऱ्याची मारहाण, व्यसन आणि गरिबी. भटक्या जाती— जमातीतील स्त्रिया तर फारच कमी बोलतात.

'दलित स्त्री' हा शब्दप्रयोग खरं पाहिलं तर पुनरुक्तिदोषाने ग्रस्त आहे. कारण कोणतीही स्त्री म्हटली तरी आजच्या समाजव्यवस्थेत ती थोडीबहुत दलितच आहे. पण तरीसुद्धा दलित याचा मर्यादित अर्थ जो रूढ आहे तोच घेऊन त्यांच्यामधील स्त्रियांचा वेगळा विचार करणं आवश्यक आहे.

दलित स्त्रीचे ताण वरिष्ठ वर्गातील स्त्रीपेक्षा वेगळे आहेत. एकाची पत्नी, परंतु त्याचवेळी नवऱ्याच्या बॉसची भोगदासी अशी अवघड दुहेरी भूमिका तिच्या वाट्याला येते. आणि बॉस एकटाच असेही नाही, वरिष्ठ जातीतील कोणताही धटिंगण, इतर धटिंगणांच्या सहकार्याने किंवा त्यांना डावलून, दलित स्त्रीकडे यायला मोकळा. शिवाय या स्त्रियांचे संसार तर चालू रहायचेच. त्यांचे नवरे काही त्यांना घराबाहेर काढू शकत नाहीत. कारण शरीरसंबंधापुरताच तिला स्पर्श करणारा उच्चवर्णीय पुरुष दिवसा तिला अस्पृश्य नोकरच समजणार.

यातूनच दलित पुरुष आणि दलित स्त्री या दोघांच्याही मानसिकतेवर काय-

मचे गंभीर परिणाम झालेले दिसतात. इतर स्त्रियांच्या बाबतीत व्यभिचार मात्र निषिद्ध आणि अपवादात्मक; व दलित स्त्रियांवर मात्र व्यभिचाराची एक प्रकारे सक्तीच; हा असा न्याय परंपरागत समाज निर्लज्जपणे अनुसरत आला आहे. मात्र त्याची प्रगट चीड आता कुठे दिसू लागली आहे. पण तीही तुरळकच.

दलित स्त्रीच्या मानसिकतेवर या परिस्थितीचा झालेला परिणाम उद्बोधक आहे. नाईलाजातून काय जन्म घेते याचा ठळक पुरावा आपल्याला बेबी कांबळे यांच्या आत्मकहाणीत दिसतो.

दलित स्त्रीची अस्मिता नेहमीच संघर्षातून जन्म घेणारी. त्यामुळे दलित स्त्री जास्त बोलकी आहे. तिची भाषा ठसठशीत. कोणत्याही दलित वस्तीत जाऊन समाजकार्य करणाऱ्या स्त्रियांना याचा अनुभव असेल की, एकदा विश्वास उत्पन्न झाला की, धिटाईने, हुशारीने त्या आपले विचार मांडतात. परिष्कृत वक्तृत्वाचा नमुना 'पुणे झाडू कामगार संघटने'च्या पुढारी स्त्रियांमध्ये दिसतो.

घाबरून, पायाच्या अंगठ्याने जमीन टोकरणारी व पुरुषासमोर तोंडातून आवाजही न फुटणारी अशी दलित स्त्री नाही. आवाज टिपेला चढवून, खड्या सुरात शिव्यांचा आणि अलंकारिक भाषेचा उपयोग करून चारचौघांत उत्तम भांडू शकणारी, प्रसंगी मधाळ बोलणारी दलित स्त्री आहे. 'रोजचे मढे, त्याला कोण रडे?' म्हणीमागची तिखट वृत्ती तिच्या वागण्या- बोलण्यात दिसते. लैंगिक संबंधाविषयी बोलतानाही तिच्यात आत्मविश्वास, 'ग्राफिक इमेजरी' निःसंकोच आणि 'मॅटर ऑफ फॅक्ट' वृत्ती दिसते. या तुलनेत वरिष्ठ स्त्री अगदीच पुचाट, तिचे अनुभवविश्व तोकडे, अशी आहे.

आतापर्यंत ऐकता ऐकता आपल्याला वाटेल की स्त्री– पुरुष नातं हा विषय तर या परिसंवादात डॉ. अवचटांकडे दिलेला. मग मी माझ्या नियोजित विषयाकडे म्हणजे दलित स्त्रीची भाषा आणि तिच्याबद्दलची दलित आणि दलितेतरांची भाषा याच विषयाकडे एकदमच का वळत नाही? याचं कारण हेच की, समाजात सर्वात खालचं स्थान दलित पुरुषाचं आहे. आणि दलित स्त्रीचं स्थान पुरुषांहूनही कनिष्ठ आहे असे मानण्यात अडचणी आहेत, हे स्पष्ट झाल्याखेरीज त्यांच्याबद्दलची आणि त्यांच्या भाषाव्यवहारासंबंधीची माझी जी निरीक्षणं मी यापुढे मांडणार आहे त्यांचा आशय पुरेसा स्पष्ट होणार नाही, तो कदाचित संदर्भहीन राहील. एवढी पार्श्वभूमी मला वाटतं पुरे झाली.

दलित स्त्री रगडलेली असली तरी चिरडलेली नाही. ती मूक, अबोल तर नाहीच नाही, पण दुःख असं की तिचं ऐकून ते लिहायला अजूनपर्यंत तरी सुरुवात झालेली नाही. आज दिसणारी तिची आकृती, हिरा बनसोड, बेबी कांबळेंसारखे तुरळक अपवाद सोडता, पडद्यामागची धूसर आकृतीच वाङ्मयापर्यंत पोचली आहे. दलित पुरुषांच्या आत्मकथनातून जेवढी जाणवते तेवढीच तिची प्रतिमा मर्यादित आहे. किंवा दलितेतर पुरुषांच्या लिखाणातूनही ती अशीच धूसर जाणवते. थोड-

क्यात, दलित स्त्रीचे प्रत्ययकारी चित्रण अजून व्हायचे आहे आणि त्यातला मुख्य अडसर तिच्या अबोलपणाचा नसून ती बोलली तर हा समाज ते ऐकू धजणार नाही हा आहे.

दलित स्त्रीचे एकूण जीवन पाहता प्रत्येक दलित स्त्री ही स्वतंत्रपणे वासनेची शिकार होत नसून as a mass म्हणून तिला या गोष्टीला तोंड द्यावे लागते. तसेच याबाबत गुळगुळीत गांधीवादी, पोथीनिष्ठ समाजवादी आणि कट्टर हिंदुत्ववादी अजूनही अशा भ्रमात दिसतात की एकेका– स्त्रीवर 'उत्तम' (म्हणजे काय?) संस्कार करून तिला बदलता येईल. वरिष्ठ वर्गातील पुरुषांच्या लैंगिक अपेक्षा बदलायला त्यांना भाग पाडल्याखेरीज ग्रामीण दलितांचे पुनरुत्थान अशक्य आहे.

ग्रामीण दलित शेतमजूर स्त्रीच्या भावविश्वाची समृद्धी आणि ताकद तिच्या भाषेत दिसते. समृद्धी हा शब्द गुणवत्तादर्शक आहे. परंतु याचा अर्थ 'चाललंय ते उत्तम आहे' असा नसून, मानवी अनुभवांना दलित स्त्रीच्या बाबतीत घरबशा जातीतील स्त्रियांपेक्षा अधिक सखोल परिमाण आहे असा आहे.

दलित आत्मकथनांतून झालेलं चित्रण पाहता, त्यातील मुलगे आपल्या आईकडे फार सहानुभूतीने पाहताना दिसतात. आई आणि जिला सांभाळायची जबाबदारी पडते ती छोटी बहीण यांच्याबद्दलच्या भावना मधुर आहेत, संरक्षक आहेत.

ग्रामीण जीवनातील या दलित स्त्रिया मरमर कष्ट करतात, पण त्या कष्टांचं त्यांना अप्रूप नाही. अपार शारीरिक कष्ट हे सर्वच स्त्रियांनी जीवनाचा अपरिहार्य भाग म्हणून स्वीकारलेले आहेत. शरीर माणसाचं, पण ओझ्याच्या जनावरासारखं राबणारं आणि तेही अपुऱ्या अन्नावर. हा अन्नाचाही मुद्दा दलित स्त्रीच्या संदर्भात फार महत्त्वाचा आहे. शिळं, उष्टं, मागून आणलेलं, बुरसलेलं अन्न उन्हात वाळवून, साठवून ठेवायचं. ते पाण्यात उकळून सर्वांना पुरवायचं, स्वत: कमी घेऊन नवरा, मुलंबाळं, आला–गेला यांची सरबराई करायची, ही तिच्या गृहिणीपदाची मिरासदारी. या क्षेत्रात सर्वच दलित स्त्रिया कुशल. अन्नाबद्दल उठवळ किंवा बेपर्वा अशी स्त्री कुठेच दिसत नाही. विशेष म्हणजे जेव्हा या मागून आणलेल्या किंवा मेलेल्या जनावरांच्या मासाच्या अन्नातला अपमान बाबासाहेबांनी समजावून सांगितला तेव्हा मात्र निक्षून त्याचा त्याग करण्याइतकी ती बाणेदार झाली आहे.

दलित पुरुषांना एखादा संघर्षाचा मुद्दा कळला, पण स्त्रिया मागेमागे राहून विरोध करताहेत असे आजही होत नाही. दलित स्त्रियांची बौद्धिक आणि भाषिक जाणीव त्यांच्या पुरुषांच्या बरोबरीची आहे.

तसेच सुरुवातीपासून या स्त्रियांना स्वतंत्रपणे पोटासाठी राबावं लागतंच. 'बसून' खाणारी बाई अस्तित्वातच नाही. शिवाय ती 'संरक्षित' ही नाही. तिच्या मदतीला वडील, भाऊ किंवा नवरा, मुलगा हे मनुस्मृतीतले धोंडे नाहीतच. तिच्या पायातली चप्पल, तिच्या कमरेचा विळा आणि तिची तिखट जीभ ही तिची संर-

32845 25528



क्षक कवच- कुंडले. या बाबतीत तिचे साम्य अमेरिकेच्या दक्षिणेकडील संस्थानातून पूर्वी गुलाम म्हणून राबणाऱ्या निग्रो स्त्रियांशी आहे. कित्येकदा घराचा भावनिक आधारस्तंभ ती स्वतःच आहे. आणि पुरुष हा कुटुंबाचा घटक असला तरी निर्वाणीच्या वेळी ती त्याच्यावरही अवलंबून नाही. मानसिकदृष्ट्या ती एकटीच आहे. तिला सोबत आहे तिच्यासारख्या इतर स्त्रियांचीच.

त्यामुळे संघटित कृती उभी करताना दलित स्त्रियांची एकजूट घडवणे तुलनेने सोपे पडते. हा अनुभव समाजपरिवर्तक कार्यकर्त्यांनाही येतो. परंतु दुर्दैवाने त्याचा योग्य तेवढा राजकीय उपयोग अजून केला गेलेला नाही. स्त्री- मुक्तीच्या संदर्भात तिला झोपी गेलेली जागी करायची असा प्रश्न नसून, तिच्या तिखट शिव्यांनी युक्त असलेल्या भाषेचे सोवळे–ओवळे न मानता, तिच्या चारित्र्याची मध्यमवर्गीय मूल्यातून चिरफाड न करता, तिला समानतेच्या लढ्यात ओढण्याचा हा प्रश्न आहे. राजकीय दृष्ट्या बेडर दलित स्त्री ही आगामी काळातले प्रभावी हत्यार आहे. तिच्या भाषेत पुनर्जन्मावर भार टाकून वर्तमान निमूटपणाने भोगणारा दैववाद जवळजवळ नाहीच. त्याचप्रमाणे पुरुषाला 'देव' मानणारी ही स्त्री नाही. मुख्य म्हणजे, सत्ता आणि संपत्ती या जोरावर दलित स्त्रिया दबवल्या गेलेल्या असल्या तरी केवळ पुरुष म्हणून एखाद्याला भिणाऱ्या त्या नाहीत.

दलित स्त्री दलितेतर पुरुषांना कशी दिसते? त्यांच्या भाषेतून दिसलेली दलित स्त्री लावणीतून दिसते. मदनाची मंजिरी, वय माझं सोळा– जवानीचा मळा वगैरे. तिच्या काबाडकष्टांचे किंवा दारिद्र्याचे सोयरसुतक त्यांना नाही.

दलित पुरुषांना त्यांच्या भाषेतून दिसणारी स्त्री ही दुभंगलेली आहे. आई, बहीण म्हणून प्रेमळ, हवीहवीशी आणि पत्नी म्हणून असमाधानकारक. कारण ती आपली एकट्याचीच आहे ही खात्री नाही.

दलितेतर स्त्रियांना दिसणारी दलित स्त्री एकतर घरापलीकडे ठेवावी अशी. तसंच तिचे कष्ट शेतात घेतले तरी तिला शिवायचे नाही. रोज पाणवठ्यावर तिला पाणी वरून घालायचे. ती तिरस्करणीय. ती इमानाने कष्ट करणारी असली तरच ममता, नाहीतर लगेच ती माजलेली. आणि शिवाय रात्रीच्या जीवनात तर तमासगीर या स्वरूपात ती अदृश्य सवत–प्रतिस्पर्धी. तिला मध्यमवर्गीय बनवता आलं, तरच ती त्यांना जवळची वाटणार, नाही तर दूरचीच.

दलित स्त्री स्वतःला कशी दिसते हा शेवटचा भाग. परंतु त्याविषयी फारच कमी माहिती उपलब्ध आहे. मात्र या सर्वच पुस्तकांतून बहिणी–बहिणी, मैत्रिणी, मायलेकी, क्वचित सासवा-सुना ज्या एकमेकींशी वागताना, बोलताना दिसतात त्यामध्ये त्यांच्यातील भावसंबंध उत्कट आहेत, हे जाणवतं. तसंच प्रेम आणि द्वेष ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजूही दिसतात.

'उपरा'तील भटक्या जमातीतील स्त्रियांचे चित्रण, जीवन पाहिल्यास तिचं 'जिवंत मालमत्ता' हे स्थान असल्याचं स्पष्ट होतं.

या स्त्रियांच्या मनात काय आहे ते कळणे आणखीन दुरापास्त होते, कारण कचाकचा भांडण, शिव्या सोडल्या तर कला म्हणून किंवा सुसंवाद म्हणून संभाषण वापरले जाण्याचे प्रसंगही कमी आणि त्यातला स्त्रीचा सहभागही कमीच. शिवाय या सर्व जमातींच्या बोलीभाषा मराठीहून खूपच भिन्न आहेत.

याबाबत इंग्लंडमधील एका प्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञाने सप्रमाण दाखवून दिले आहे की, शाब्दिक प्रक्रियेची संधी अंतर्गत शक्तिसंबंधामुळे जिथे नाकारली जाते, तिथे मनोविकास आणि बुद्धिविकासही खुंटतो. बुद्धिमत्ता आणि भाषाज्ञान यांचा बराच जवळचा संबंध आहे. नुसता अनुभव घेत जगणे पुरेसे नसून त्या अनुभवावर भाष्य, टीका–टिप्पणी करता येणे हे समृद्ध समूहजीवनाचे लक्षण आहे. त्या दृष्टीने या स्त्रिया सांस्कृतिक दरिद्र्यातच जगत आहेत. या प्रश्नाच्या मुळावरच कुऱ्हाड घालायची तर, या जमातींची सध्याची अस्मिता जशीच्या तशी कायम राखणे अगदी अशक्य आहे.

फार दूरचा विचार करून योजना आखण्याची कुवत आदिवासी किंवा भटक्या लोकांत नसते. यावर पुष्कळ बोललं जातं, पण त्यांच्या जीवनाची सध्या जी जेम-तेम पोट भरण्याइतकी परिस्थिती आहे व त्यात स्त्रियांना जे जिवंत मालमत्तेचं स्थान आहे, ते बदलल्याशिवाय नवा विचारही अशक्य आहे. आधी भाषाविषयक समृद्ध जाणिवा की आधी राहणीमध्ये परिवर्तन हा अंडं आणि कोंबडीसारखा यक्ष-प्रश्न आहे. फ्रेअरेने 'बोलते व्हा' इथून सुरुवात केली खरी, परंतु बोलायचे शिक्षण व राहणीत आर्थिक आणि सामाजिक परिवर्तन जोडीनेच चालावे लागते. अव्वल इंग्रजीत 'ब्राह्मण समाज कसा बदलत गेला' याचा इतिहास मार्गदर्शक ठरावा. स्त्रिया बदलल्या तर राष्ट्र बदलतं, हे लेनिनचं निरीक्षण अचूक आहे. शाळा किंवा मुक्त-शाळा या प्रकारापर्यंत जोपर्यंत स्त्रिया पोचत नाहीत तोपर्यंत त्यांच्या भाषाव्यवहा-रावर फार बंधन राहणारच. आणि जिथे सुसंवाद नाही तिथे भांडणे आणि शिव्या यांचेही महत्त्व राहणारच.

शब्दांच्या मदतीने समूहजीवन नियंत्रित करणे आणि समूहातील प्रत्येकाला बोलायची संधी असणे, या फार मूल्यवान गोष्टी आहेत. त्यांचे राजकीय व सामा-जिक महत्त्व अगदी अलिकडे समजू लागले आहे. ग्रीक संस्कृती गुलामांच्या श्रमा-वर चालत होती. भारतातले अनेक समूह स्त्रियांच्या गुलामगिरीवरच टिकून आहेत. स्त्रिया बोलू लागल्या की समूहांचे स्वतंत्र अस्तित्व नक्कीच डळमळेल.

सर्वात शेवटी एक गोष्ट नोंदवावी लागेल. ती म्हणजे–आधुनिक नागरी संस्कृतीबद्दल. दलित व भटक्या स्त्रीच्या मनात विश्वास आणि आपुलकी निर्माण करण्याचे काम अंगावर घेणाऱ्यांना, हे आव्हान स्वीकारताना भाषावैज्ञानिकांची मदत घ्यावीच लागेल.

श्रीमती मुंडले यांच्यानंतर डॉ. अशोक केळकर यांनी आपले विचार मांडले.

**डॉ. अशोक केळकर**

दलित आणि भटक्या समाजाची, त्यातील स्त्रियांची परिस्थिती बदलण्यासाठी केवळ भावडा ध्येयवाद उपयोगी नाही, त्यासाठी परिस्थितीचं विश्लेषण करून योग्य ती उपाययोजना सुचवली गेली पाहिजे. या समाजाचं वर्णन, म्हणूनच, वस्तुनिष्ठ असणं आवश्यक आहे. मात्र माणसांनी माणसांचा केलेला अभ्यास, असं त्याचं स्वरूप असल्याने पूर्ण ताटस्थ्य कठीण आहे.

तसेच या अभ्यासासाठी खूप निरीक्षण करण्याचीही गरज आहे. नाहीतर त्या अभ्यासात ढोबळपणा येण्याची शक्यता असते व त्यामुळे या समाजाचे आंतरिक जीवनही व्यक्त होत नाही.

या पाच दलित आत्मकथनांच्या संदर्भात एक गोष्ट लक्षात घेण्याची गरज आहे. ती अशी की, ही पाच आत्मकथनं निवेदनात्मक स्वरूपाची असून ती साहित्याच्या अंगाकडे झुकलेली आहेत. तसेच या आत्मकथनात समाजजीवनाचे घेतलेले छेद हे प्रामुख्याने वैयक्तिक स्वरूपाचे, एका भिंगातून घेतलेले आहेत. त्यांच्यामध्ये आत्मनिष्ठता अधिक असल्याने, सौंदर्य अधिक असलं तरी, वस्तुनिष्ठता कमी आहे. त्यातील भाषाव्यवहाराचं निरीक्षण करण्याचं महत्त्व निश्चित आहे. कारण हा भाषाव्यवहार हा वैयक्तिक आणि सार्वजनिक अशा दोन्ही पातळ्यांवर होतो.

एकाच शब्दाबाबत दलित आणि दलितेतर समाजांच्या मनात कशा भिन्न प्रतिमा निर्माण होतात याबाबत आकाशवाणीवर दया पवार यांनी आपल्या एका भाषणात 'पाणी' या शब्दासंबंधी उदाहरण दिले होते, ते इथे मला नमूद करावेसे वाटते. ते म्हणाले होते की, 'पाणी' हा शब्द उच्चारला की, दलितेतरांच्या मनात स्वच्छता पावित्र्य या संकल्पनांनी युक्त पदार्थ उभा राहतो. या उलट दलितांच्या मनात या शब्दाच्या संदर्भात 'पाणी' हा पारदर्शक असा पदार्थ डोळ्यासमोर उभा राहात नसून, शेवाळ पसरलेला एक पदार्थ, तसेच भांडणाचे एक ठिकाण इत्यादी त्याच्याशी निगडीत कल्पना उभ्या राहातात.

म्हणूनच भाषाव्यवहाराचा विचार, अभ्यास करणाऱ्यांनी या गोष्टींचे भान ठेवणे आवश्यक आहे.

यानंतर या विषयाशी संबंधित पुढीलप्रमाणे चर्चा झाली.

**जनार्दन वाघमारे**

भाषेच्या आधारावर दलित स्त्री आणि दलित पुरुष यांच्यात काही फरक आहे का? मला वाटतं, हो, त्यांच्यात निश्चितच फरक आहे

दलितांनी स्त्रीचं वर्णन लावणीमध्ये शृंगारिक केलं आहे हे मान्य, पण त्यांचा सामान्य स्त्रीशी बोलताना अगर तिच्याबद्दल हा दृष्टिकोन नसतो.

मुख्य म्हणजे, दलित स्त्री– पुरुषांच्या नात्याबाबत मला खुलासा करावा वाटतो. इतर समाजातील स्त्री– पुरुषांप्रमाणे दलित पती– पत्नीलाही परस्परांबद्दल ओढ वाटून त्यांच्यातील वीण सहवासाने, हळूहळू घट्ट होते. कारण ती काही यंत्रं नव्हेत. अर्थात त्यांच्यातील ही वीण घट्ट होऊ नये म्हणून काही वेळा घरातील इतर माणसं प्रयत्न करतात हेही खरं.

श्रीमती आशा मुंडले यांच्या मांडणीतून हे स्पष्ट झालं नाही म्हणून मी सांगितलं.

तसंच बाईचं वर्णन शृंगारिक भाषेत करताना दलित पुरुष अगर लेखक जितक्या सूक्ष्मपणे, मोकळेपणाने वर्णन करू शकतो तितकं उघड वर्णन दलितेतर माणूस अगर लेखक उघडपणे करू शकत नाही.

## शंकरराव खरात

आता श्रीमती मुंडले यांनी वाचलेल्या शोधनिबंधातून मांडलेल्या मुद्यांमुळे या चर्चासत्राला आलेल्या स्त्रीपुरुषांचा दलित स्त्रीबाबत गैरसमज होण्याची शक्यता आहे. म्हणून त्या संदर्भात मला स्पष्टीकरण द्यावेसे वाटते.

एक तर मी पूर्वी म्हटल्याप्रमाणे ही पाच दलित आत्मचरित्रं ही प्रातिनिधिक नव्हेत; त्यांना प्रातिनिधिक मानल्यास गैरसमज होईल.

दुसरे म्हणजे, दलित स्त्री वेश्याव्यवसायाकडे चटकन वळते अशा आशयाचे विधान करण्यात आले. परंतु वेश्याव्यवसाय हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय होऊ शकेल. परंतु आराधने, जोगतिणी, बसवे, जटाधारी इत्यादी सौंदत्ती येथील स्त्रियांचा अभ्यास मी काही काळापूर्वी केला, तेव्हा त्यात मराठा वगैरे सर्व जाती आहेत असं मला आढळलं.

शिवाय एके ठिकाणी वेश्याव्यवसायातील स्त्रियांच्या केलेल्या पाहणीत दलित स्त्रिया फक्त एक टक्का आढळल्या. विशेष म्हणजे ब्राह्मण स्त्रियाही त्यात असल्याचे आढळून आले.

म्हणून दलित स्त्रिया व वेश्याव्यवसाय या संदर्भात सरसकट विधान करू नये असे मला वाटते.

## आशा मुंडले

श्री. खरात यांनी व प्राचार्य वाघमारे यांनी या संदर्भात अधिक माहिती दिल्याबद्दल मला कृतज्ञता व्यक्त करावीशी वाटते. या विषयाच्या संदर्भातील माझी मर्यादा मी सुरुवातीला स्पष्ट केली होती. गेल्या पिढीमध्ये एकूण सर्वच समाजात भाषाव्यवहार कमी होता अशी नोंद श्रीमती इरावती कर्वे यांनीही करून ठेवली आहे.

## शिल्पा मुंब्रिसकर

आम्हा दलित स्त्रियांना अपेक्षा अशा नसतातच. एकदा लग्न झालं की, 'कुकू

भेटतं, कपडं भेटतात'. मध्यमवर्गीय बाईला गंठण– घड्याळ भेटतं. पण नवरा– वायको मध्ये बोलणं– चालणं अजूनही फारसं होतच नाही.

## दया पवार

ग्रामीण स्त्रियांची जी भाषा असते ती अत्यंत मिताक्षरी असते, परंतु त्याचा आशय फार मोठा असतो. आता ती शहरी माणसाची टवाळी करण्यासाठी म्हणेल, 'ए इजाऱ्या, खाली बस.' सामान्य लोकांना कळतच नाही की हे काय चाललं आहे? म्हणजे भाषेचे जे पदर आहेत ते लक्षात घ्यायला हवेत.

अशा प्रकारानं एका गृहस्थांनी बलुतंमधील दीडशे– दोनशे शब्द लिहून पाठवलेले आहेत. त्यांचा अर्थ त्यांना कळला नाही आणि डिक्शनरीतही ते सापडत नाहीत. म्हणजे भाषेचा जर अभ्यास करावयाचा असेल, मराठी भाषा जर व्यापक करायची असेल तर त्याचा पुरेसा अभ्यास अजूनही सुरू नाही तो करावा लागेल. उदा. मी काही ठिकाणी मांडलेलं आहे की, आजी मला म्हणायची की 'गबागबा खा.' मध्यमवर्गामध्ये 'सावकाश जेव बाळा' असं म्हटलं जातं. हे गबागबा खा म्हणजे भरभर खा. एखादयाला जर त्या समाजाचं अर्थशास्त्र माहिती नसेल तर कळणार नाही की त्याचा अर्थ 'तुला कधी मिळत नाही. आता मिळालं आहे तर गबागबा खा' असा होतो. त्याचप्रमाणे "रजाचा गज केला". आता संस्कृतमध्ये रज म्हणजे धुळीचा कण. परंतु या समाजात रज म्हणजे जनावर फाडल्यावरचा मासाचा गोळा. तर या गोळ्यापासून गज केला. असं माझ्या म्हणींचा सुद्धा मी वेगळ्या पद्धतीनं विचार करतो की- रांडकीचं रांड पोर, तिनं रजाचा गज केला. तेव्हा या म्हणीचा अर्थ सुसंगत वाटतो. ते अगदी सहज बोलतात, त्यांच्या मनात या काही पांढरपेशा कल्पना नसतात. बोली भाषेमध्ये सांगण्याची जी प्रक्रिया आहे, त्याला आपण संवाद म्हणतो. त्यांच्यामध्ये आशय वाहण्याची वाहनशक्ती कमी आहे, त्यांच्या बुद्धीची वाढ होत नाही आहे असं एक विधान आहे. त्यामध्ये माझं तर उलट म्हणणं आहे. मध्यमवर्गीयांचे विचार पुढंच जात नाहीत. तुम्ही ग्रामीण बोलीकडे जितके खोलवर जाल तितका आशय मोठा होईल. त्या बोलीचे सारे संदर्भ त्या मातीशी इमान राखून आहेत. उलट आपली सगळी भाषा ग्रांथिक आहे. लक्ष्मण मानेचा जो मुद्दा आहे तो पुन्हा लक्षात घेतला पाहिजे. अनुभव घेण्याची जी क्षमता थांबलेली आहे त्यात भाषेची फार मोठी अडचण आहे. म्हणजे सोनकांबळे जे म्हणतात उंटाला- काय ते- मराठी भाषेत लिहिता येत नाही- हाळी आहे उंटाला बोलवण्याची- प्रक्रिया आहे. त्यापुढे भाषाच इतकी फिकी आहे काही बाबतीमध्ये की तीत विचार व्यक्तच होत नाहीत. अशा पद्धतीच्या निबंधाची मला इथे अपेक्षा होती.

## जनार्दन वाघमारे

शहरी मंडळी जेव्हा दलित साहित्याचा अभ्यास करतात त्यावेळेला खूप घोटाळे

होतात. मी ग्रामीण भागातला आहे. माझा त्यांच्याशी दैनंदिन संबंध येतो. तेव्हा फक्त दलितच अशा प्रकारची भाषा बोलतात असं नाही, तर दलितेतर खालच्या समाजातील लोक अशीच भाषा बोलतात आणि या भाषेतून त्यांच्या प्रतिमा परावर्तित होऊन जातात. खरंतर या समाजापासून तसे आपण दूर राहतो. 'कल्चरल आयसोलेशन' इतकं आहे की त्यांची खरी कल्पना आपल्याला येऊच शकत नाही. दुसरी गोष्ट लक्षात अशी घेतली पाहिजे की दलितांचं जीवन अमानुष अशा प्रकारचं आहे. आणि दलितांची जी एक निराळी भाषा तयार झाली त्याला हे कल्चरल आयसोलेशन जबाबदार आहे. वेगवेगळी भाषा आपण वेगवेगळ्या प्रकारांनी का बोलतो? त्याचं कारण असं की मोठी तफावत आहे, एक फार मोठी सांस्कृतिक पोकळी आहे. त्यामधून मग त्या त्या भाषेच्या वेगवेगळ्या छटा निर्माण होतात. पुण्यातला माणूस निराळ्या प्रकाराने मराठी बोलेल, नागपूरचा निराळ्या प्रकाराने बोलेल आणि मराठवाड्यातला निराळ्या प्रकाराने बोलेल. असं का होतं? तर यामध्ये सामाजिक दूरत्व आणि कल्चरल आयसोलेशन ही कारणे आहेत.

गेल्या पन्नास वर्षांमध्ये अनेक चळवळी होताहेत- आंबेडकरांच्यामुळे. साहित्यावर त्यांचा फार मोठा पगडा आहे. दलित साहित्य जन्मालाच मुळी आलं ते करमणुकीसाठी नाही; काहीतरी स्वत:चं मनोगत व्यक्त करण्याच्या दृष्टीनं ते जन्माला आलेलं आहे. दलित स्त्री धीट आहे. तिची भाषा वेगळी आहे. ही पाच पुस्तकं वाचल्यानंतर मला असं वाटतं की काही वाक्यं घेऊन प्रातिनिधिक जीवन समजू शकणार नाही. मग आपण विधान करतो की, अशा प्रकारचं यांचं जीवन आहे, तसं नाही आहे. उलट काय आहे की आजपर्यंत एक प्रकारची अगतिकता दलित समाजावर लादायचा प्रयत्न झालेला आहे. गावातला पाटील आपल्या मध्यमवर्गीयांच्या मराठी सिनेमातलं एकादं पात्र असतं. वस्तुस्थिती तशी नाही आहे. इथे नाटकाची उदाहरणं दिलेली आहेत. ती रंजनातून उभी केलेली काहीतरी प्रतिमा आहे, परंतु खरं तर प्रत्यक्ष जीवन हे थोडंसं वेगळं आहे.एखादा माणूस कुठल्या प्रकारे शब्द वापरतो ते कल्चरचं इंडेक्स आहे असं म्हटलं तरी चालेल. खालच्या वर्गातील स्त्री असं का बोलते? तर उच्चभ्रू समाजाशी तिचा संवाद होऊ शकत नाही. अलिकडे दलित समाजावर आंबेडकरांचा आणि इतर चळवळींचा इतका पगडा बसलेला आहे की, दलित स्त्रीबद्दल आपण जी कल्पना करतो की, ती वेश्याव्यवसायाकडे वळते, ते अतिशय खोटं आहे. याच्यामध्ये काहीही तथ्यांश नाही आहे. त्या तिथला सवर्ण समाज मात्र या स्त्रियांच्या मागे लागलेला असतो आणि एखादा राग जर कुठे काढायचा असेल तर तो शिवीतून अगोदर व्यक्त होतो. कुठल्याही संस्कृतीमध्ये शिव्या या नेहमी बाईवर असतात हे लक्षात घ्या. कारण स्त्री ही प्रत्येक संस्कृतीचा मानबिंदू आहे, असं आपण मानलं आहे, मग तो दलित असो का अन्य कुणी असो. मग त्या मानबिंदूवरच ठोका द्यायचा ! सवर्ण समाज जो आहे तो धिंड काढतो. त्यांना वाटेल तशा पद्धतीनं बेअब्रू करतो. त्यावरून हा समाज हा त्या वाईट मार्गाला लागलेला

आहे, असं समजणं अतिशय चुकीचं आहे. उलट हे कमी होत चाललेलं आहे. त्या चळवळींचा किती परिणाम झालेला आहे, हे शंकररावांच्या आत्मचरित्रावरून लक्षात येईल.

शंकरराव खरातांची आई देवधर्माला मानते. नवऱ्याला कधीतरी, चोरून, बोलते ते गरिबी, दारिद्र्य असल्यामुळे. मग बकरं कापणं, मरीआईला जाणं वगैरे चालू असतं. शंकरराव शिकून परत येतात. आंबेडकरांच्या चळवळींचा परिणाम होतो आणि ते ठरवतात की, मृतमांस आपण खायचं नाही. पूर्वी ती प्रतिष्ठेची गोष्ट होती. आईवडिलांनी जेव्हा म्हटलं की, मला देवाला गेलं पाहिजे, बकरं कापलं पाहिजे; तेव्हा शंकरराव म्हणतात, हे असं जर असेल तर मी चालता होईन. आणि काही दिवसांनी ते परत जेव्हा गावी जातात तेव्हा घर बदललेलं असतं. ते विचारतात, 'आपले देव कुठं गेले?' तेव्हा तीच आई सांगते, 'देव आम्ही गंगेला वाहून टाकलेले आहेत.' दलितांच्या मधला हा प्रातिनिधिक बदल खेड्यापाड्यातून तुम्हाला बघायला मिळतो. आंबेडकर जयंती साजरी करत असताना कुठल्याही बाबतीमध्ये तुमच्या असं लक्षात येईल की, अतिशय स्वाभिमानातून हा समाज जातो आहे.

आणि दलित साहित्यात जे काही थोडंबहुत चित्र तुम्हाला दिसतं ते प्रातिनिधिक नाही, असं मला म्हणायचं आहे. आणि या परिस्थितीमध्ये दलित स्त्री आणि दलित पुरुष असा फरक करण्याचंही काही कारण नाही. ही गोष्ट खरी आहे की, स्त्रियांना इकडे–तिकडे बाहेर जाण्यासाठी वाव नसतो. त्या फक्त शेतावर जातात. पण त्या फारसं पुरुषांशी बोलतही नाहीत. त्या फक्त इतर स्त्रियांशी बोलत असतात. मग त्यावेळी त्या शृंगारिक भाषा बोलत असतील कदाचित. स्त्री स्त्रीशी बोलताना हे होऊ शकेल. ती भाषा वेगळी दिसेल, तिथले शब्दप्रयोग वेगळे दिसतील. तेव्हा या सगळ्या गोष्टी लक्षात घेतल्याशिवाय तिचं स्वरूप कळेल, असं मला वाटत नाही.

### लक्ष्मण माने

'उपरा' वाचून मला हजारो वाचकांची पत्रं आली. वाचकाला सगळ्यात जर कुठली गोष्ट वेगळी वाटली असेल, तर या सगळ्या आत्मचरित्रातल्या भाषा. आता मी जे या सर्व समाजामध्ये काम करतो त्यावरून मी असं म्हणेन की, भाषा ही कुणी आम्हाला शिकविण्याची जरूरीच नाही, इतकी ती भाषा समृद्ध आहे. आता एखाद्या गोष्टीला अगर वस्तूला काय म्हणायचं याच्यासाठी कोणते व्यवहार अडलेले आहेत असं नाही. इथं काय झालं आहे, ब्राह्मणाचे स्वतःचे वैयक्तिक अहंकार आणि जातीचे अहंकार, त्यामुळे प्रमाण भाषा व त्यांची बोलीभाषा दोन्ही एकच आहेत. इथे दिसलंच की तुमचे कितीतरी गैरसमज आहेत दलितांच्या भाषेबद्दलचे, त्यांच्या समाजाबद्दलचे. तिथे प्रत्येक बाई म्हणजे बोलवायलाच आहे असं चित्र नाही.

दुसऱ्या बाजूला त्या इतकं समृद्ध बोलतात की, पारध्यांच्या बरोबर दोन दोन तास तुम्ही बोललात, तर तो एकाच शब्दामध्ये उत्तर देतो. तुमच्या एका तासाचं भाषण तो एका वाक्यामध्ये, एका शब्दामध्ये करतो. एवढी ताकद कशामधून येते ? बायकांचा एखादा रिमार्क जरी पाहिला ना तरी आपल्याला कळतं की, यांची उंची फार मोठी आहे. त्यांना संधी मिळत नाही. मी जेव्हा लिहितो, बोलतो त्यावेळी मला सारखं वाटत असतं, 'मी नाही बोलत, माझी आईच बोलते आहे.' माझ्या पुस्तकातील भाषा माझ्या आईची आहे, माझी नव्हे. ती जे काय जगली, ती जे काय बोलली, तेच मी आता लिहितो आहे. वडिलांचे संस्कार माझ्या भाषेवर नाहीत. परंतु मी लिहिताना जे शब्द, ज्या म्हणी वापरतो त्या माझ्या आईच्याच आहेत. तसं पाहिलं तर बारा गावचं पाणी पिणारे आम्ही लोक. बारा गावच्या बारा भाषा माहीत असणारे आम्ही लोक. नगरला गेलो, नगरच्या बोलीत, कोल्हापूरला गेलो, कोल्हापूरच्या बोलीत आम्ही बोलू शकतो. या हिंडण्यामुळे भाषेची समृद्धी आली. शब्दांची व्याप्ती फार मोठी आहे. 'ॲलर्जी' शब्दाला प्रमाण मराठीमध्ये काय शब्द आहे ? आमच्याकडे जर विचारलं ना, तर अडाणी बाईसुद्धा सांगेल की, 'याचं मला वावडं आहे.' आता तिथे हा शब्द बरोबर चपखल बसतो. ग्रामीण भागातील जी भाषा आहे ती महाराष्ट्रातील खरी मराठी आहे. आणि ग्रांथिक ही एका बेटाची भाषा आहे. खरं म्हणजे प्रमाण भाषा कोणी व कोणत्या कारणासाठी ठरवली, हे मला माहीत नाही, पण आम्ही जी भाषा बोलतो ती हिणकस आहे, वाईट आहे, तिच्यातून येणारं लोकजीवन अगर भावजीवन आहे, ते काहीतरी वेगळं आहे या समजामध्ये जोपर्यंत तुम्ही मंडळी रहाल ना, तोपर्यंत मराठीला चांगले काय, वाईटच दिवस येतील. आमची भाषा हिणकस मुळीच नाही.

## सुमित्रा भावे

ही जी पाच आत्मचरित्रं आहेत ती पुरुषांनी लिहिलेली आहेत, त्यामुळे बायकांचे एकमेकींमधले संवाद त्यामध्ये नाहीत. त्यामुळं या अभ्यासाच्या वेळेस काही स्त्रियांना आम्ही विचारलं की, तुम्ही एकमेकींमध्ये कसं बोलता? तेव्हा त्या म्हणाल्या, आम्ही एकमेकींना गंमतीशीर उखाणे घालतो. त्या बाईनी तऱ्हेतऱ्हेचे उखाणे आम्हाला सांगितले आणि ते उखाणे अतिशय चांगले होते. आम्हाला ते ऐकताना सुद्धा लाज वाटायला लागली. त्यातून काढले तर अश्लील अर्थ काढता येतील, काढले तर सरळ अर्थही काढता येतील. उखाणा घालून त्या म्हणायच्या, ओळखून दाखवा. आणि मग आम्ही एकमेकींकडे बघायचो की, आता काय उत्तर द्यायचं. आपण बायका एकमेकींमध्ये कधीच असं बोलत नाही. अशा प्रकारचे उखाणे घालून त्या बायका जी त्याची गंमत घेत होत्या त्याचीच मला गंमत वाटली. चांगल्या अर्थाने म्हणते आहे मी, वाईट अर्थाने नव्हे. तो आनंद प्रत्येकाच्या मनामधला आहे. आणि

तो आनंद मध्यमवर्गीय बाई दडपून ठेवते. त्या बायका एकमेकींना उखाणे घालत होत्या, विनोद करत होत्या, उत्तरं देत होत्या. एकमेकींमध्ये चेष्टा करत होत्या. त्या बायकांनी हे आम्हाला सांगितल्यानंतर एक नवं विश्व आमच्यासमोर उलगडल्यासारखं झालं की आपण हे कधीही बोलत नाही, अनुभवत नाही. आणि हा अनुभव म्हणून सुद्धा गंमतशीर आहे.

## डॉ. अशोक केळकर

इथे कुणाच्याही भाषेला हिणकस ठरवायचा प्रयत्न नाही. एक अशी गोष्ट आहे की, समोर बसलेला समाज हा उच्चभ्रू आहे आणि तो आपल्याला हेटाळणारच अशी कल्पना करायची, मूळ निबंधात ते नसलं तरी कोंबायचं आणि मग त्याच्यावर जोरदार हल्ला करायचा, अशा प्रकारानं चर्चासत्र चालू शकत नाही. शोधनिबंधात कुठंही असं विधान नाही की दलित भाषा हिणकस आहे. दुसरं असं आहे, त्यांचा निबंधाचा विषय भाषाव्यवहार असा आहे. भाषाव्यवस्था वेगळी आणि भाषाव्यवहार वेगळा. दया पवार जसं म्हणाले– भाषासंग्रह जो आहे– त्याचाही अभ्यास करता येईल. अभ्यास अनेक गोष्टींचा करता येईल. पण एका निबंधात एकाच गोष्टीचा अभ्यास करता येतो. एका निबंधात अनेक गोष्टींचा अभ्यास करावयास गेलं, तर तो निबंधाचा फापटपसारा होतो. त्यामुळे भाषाभांडार हा विषय न घेता भाषाव्यवहार हा विषय घेणं योग्यच आहे. शब्दभांडार जे असतं त्याच्यामध्ये ही संस्कृती गोठलेली आहे. या समाजव्यवस्थेचा जो एक साचा ठरलेला आहे तोच व्यक्त होतो. भाषाव्यवहार हा अधिक लवचिक असतो. क्षणाक्षणाला जी बदलती परिस्थिती असते ती त्याच्यातून व्यक्त होते. तेव्हा समाजाची अगर संस्कृतीची जी पाहणी करायची असते त्यासाठी भाषाव्यवहार हा जास्त उपयोगी पडतो. आता ‘वावडं’ हा शब्द जर म्हणाल, तर वावडं हा शब्द माझ्या आईच्या तोंडी होता. आणि हे जे तुम्हाला वाटतं की द्व्यर्थी बोलणं हे आपल्यात नाही आहे, ते पांढरपेशा समाजात पन्नास वर्षांपूर्वी होतं. आपल्या इथं झपाट्यानं महायुद्धानंतर जे शहरीकरण झालेलं आहे त्याच्यात पांढरपेशा बायका एकमेकींत काय बोलताहेत ते, मी लहान असल्यामुळे माझ्याकडे दुर्लक्ष व्हायचं त्यामुळे, मी ऐकलेलं आहे. आणि त्या अशाच प्रकारचं अश्लील आणि गंमतीशीर बोलत असत. आता पांढरपेशा बायका असं बोलत नाहीत. तेव्हा त्यांच्या भाषाव्यवहारातून त्यांचं जीवन बदललं असं लक्षात येतं. वावडं हा शब्द कोशामध्ये जाऊन बसला आणि तो अजूनही तुम्हाला सापडेल. वावडं हा शब्द जाऊन त्याची जागा ॲलर्जीनं घेतली. हा भाषाव्यवहार तपासताना तुमच्या लक्षात येईल, कोश तपासताना तुमच्या लक्षात येणार नाही. कारण कोशाची जी भाषा आहे ती एक प्रकारे डबाबंद केलेली भाषा आहे. आणि आपल्याला डबाबंद भाषेच्या बरोबर वाहत्या भाषेचाही अभ्यास करा-

यला पाहिजे. त्यामुळे या चर्चासत्राचं उद्दिष्ट, मला असं वाटतं की, 'याकडे कोण-कोणत्या दृष्टिकोनातून बघता येईल त्या दिशा सगळ्या खुल्या करणं' हे आहे. आपले जे काही समज आहेत ते अधिक घट्ट करण्यासाठी हे चर्चासत्र नाही. आपल्या ज्या काही गाठी आहेत त्या आपण सोडणारच नसलो तर सेमिनारचा उद्देशच विफल होणार आहे असं मला वाटतं.

## प्र ई. सोनकांबळे

भाषेच्या संदर्भामध्ये सर्वांनी आपापल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. लक्ष्मण मानेनी सांगितलं की, मी बोलत नाही, तर माझी आईच बोलते आहे. मी मात्र म्हणेन की, 'माझी आई नसल्यामुळे माझी अक्काच बोलते.' हे मी का म्हणतो? आम्ही एकमेकांच्या माध्यमातूनच बोलत असतो. पुणे विद्यापीठानं माझी भाषा समजण्यासाठी माझं पुस्तक लावलं. खरं तर पुण्यापासून मी फार दूर होतो. तेव्हा त्यांनी मला पत्रानं कळवलं की तुमचं पुस्तक आम्ही लावलेलं आहे. आणि त्या-बरोबर त्यांनी जवळजवळ चारशे शब्दांची यादी कळवली आणि कळवलं की हे शब्द आम्हा शिक्षक मंडळींना थोडेफार कळतात, परंतु मुलांना शिकवताना अड-चणी येतात. तेव्हा तुम्ही या शब्दांचे विश्लेषणात्मक अर्थ कळवल्यास बरे पडेल. खरं तर चारशे शब्दांचे विश्लेषण मी द्यायची गरज नाही, कारण माझे पुस्तक मी काही गाईड करू इच्छित नाही. जीवनाचा अर्थ लावण्यासाठी लोक जरा सोप्या मार्गानं जाऊ इच्छितात. बाबासाहेबांच्या चळवळीचा आढावा आम्ही किती कळ-कळीने घेतला आहे हे विद्यापीठाला समजत नाही आणि माणसांना समजत नाही. पुस्तकातले शब्दही ज्यांना समजत नाहीत त्यांना आमचं जीवन कसं काय कळणार?

## गो. म. कुलकर्णी

दलितांत जो भाषिक व्यवहार होतो तो ग्राम्य स्वरूपाचा वाटण्याची शक्यता आहे. पण त्यामुळे नैतिकता मोजली जाते किंवा जावी की काय हा प्रश्न आहे. त्यांचा भाषिक व्यवहार सुशिक्षितांना मान्य नाही, परंतु त्यात भावना व्यक्त कर-ण्याचं सामर्थ्य आहे हे मात्र निश्चित.

दलितांना संधी मिळूनही त्यांना अद्याप भाषिक प्रगल्भता आलेली नाही. मुख्य म्हणजे त्यांची भाषा, साहित्य महाराष्ट्रातील विद्वानांच्या पद्धतीनुसार आवि-ष्कृत होणं चुकीचं आहे.

तसंच दलित कविता मराठी नवकवितेला जवळची असली तरी, दलित गद्य मात्र नवसाहित्यापेक्षा खांडेकरी वळणाला अधिक जवळचे असल्याने ते पूर्वीच्याच काळात रेंगाळते आहे असे वाटते.

## अनिल अवचट

पुणे विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात श्री. लक्ष्मण माने यांचे ‘उपरा’ हे पुस्तक लावण्यात आले तेव्हा शहरी विद्यार्थ्यांना समजावं यासाठी त्या शब्दांचे प्रमाण-भाषेत रूपांतर करण्यात आले. उदा:– परत्येक – प्रत्येक, शनिमा–सिनेमा, फुटू–फोटो, फुडं–पुढे, रेसल–रिहर्सल, इत्यादी. परंतु मी जेव्हा त्यांची प्रुफं तपासली तेव्हा पुन्हा त्यांचं मूळ रूप तसंच ठेवण्यास मी सांगितलं. याबाबत मला वाटतं–दोन्ही बाजूंनी आपापले आग्रह धरू नयेत. दलित लेखकांनी आपल्या पुस्तकाच्या मागे त्या, त्या शब्दांच्या अर्थाच्या टीपा द्याव्यात आणि वाचणाऱ्यांची सहानुभूतीपूर्वक सोय करावी.

## आशा मुंडले

मी माझा शोधनिबंध वाचताना सुरुवातीलाच म्हटलं होतं की, माझ्या विषयाच्या मांडणीला मर्यादा आहेत. परंतु दलितांचे जीवन, भाषा तुम्हाला कळणार नाही असं म्हणणं म्हणजे बोलणंच बंद करावं लागेल. त्यापेक्षा या विषयावर एकमेकांशी नेहमी नेहमी बोलणं हेच जास्त चांगलं असं मला वाटतं.

या चर्चेनंतर दुसऱ्या दिवसाचे कार्यक्रम संपले

## ५ स्त्रीचं बदलतं स्थान

स्त्रीचं स्थान या चर्चेच्या सुरवातीला श्रीमती बेबी कांबळे यांनी कविता वाचल्या श्री. दया पवार यांनी 'पानी कुटवर आलं ग बाई' आणि 'धरण' या कविता वाचल्या.

डॉ. गंगाधर पानतावणे हे स्वत: उपस्थित नसल्याने 'दलित स्त्रीचं बदलतं स्थान' हा त्यांचा शोधनिबंध श्रीमती शोभा भागवत यांनी वाचून दाखवला.

### जनार्दन वाघमारे

ज्याला फारसं प्राप्त होऊ शकत नाही, त्या समाजाची प्रतिमा निगेटिव्ह स्वरूपाची असते. मग आपल्याला असं म्हणता येईल का की, दलित समाजाची प्रतिमाच नकारात्मक (निगेटिव्ह) स्वरूपाची आहे. हा थोडासा वादाचासुद्धा मुद्दा होऊ शकतो. पण जगातला कुठलाही समाज घ्या–निग्रोंचा समाज घ्या. या सबंध समाजाची प्रतिमाच तशी आहे, कारण सगळया गोष्टी त्यांना नाकारलेल्या असतात, मालमत्ता नाकारलेली असते. जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या ज्या सगळ्या काही गोष्टी आहेत, त्या त्यांना नाकारल्या गेल्या असतात. त्यांचं स्थान विशेष असं नसतं. निग्रोंच्या बाबतीत सतत तिथला गोरा माणूस म्हणत असतो. you should know your place की, तुला तुझी जागा लक्षात घेणं आवश्यक आहे. त्यांच्या संपूर्ण परिभाषेत असे शब्द येतात की, what is your, place? आपण आपल्या परिभाषेत असं म्हणतो की, प्रत्येकाने आपली पायरी ओळखली पाहिजे आणि याच्यातून मग कुठेतरी आपलं स्थान पक्कं होत असतं आणि म्हणून मला असं वाटतं की, कुठलाही समाज, ज्याचं शोषण झालेलं आहे, त्या समाजाची प्रतिमाच नकारात्मक स्वरूपाची असते. आता याचा आधार घेत घेत समाजाचा विचार केल्यानंतर मला असं वाटतं की, स्त्रीचं स्थान हे आधिक नकारात्मक आहे. दलित समाज हा अन्‌ह्यूमनाईज्ड आहे, पण दलित स्त्री ही आधिक अन्‌ह्यूमनाईज्ड आहे, तिकडं सुद्धा पुरुषांचं जग आणि स्त्रियांचं जग अशी दोन वेगवेगळी जगंच आपल्याला सापडतील. म्हणून मला असं वाटतं की दलित स्त्रीची प्रतिमा या समाजामध्ये नकारा-

त्मक प्रकारची आहे. ज्यावेळी सवर्ण लोक दलित स्त्रीकडे पाहतात तेव्हा ती निगेटिव्ह असते. त्यांनी सगळं नाकारलेलं आहे. म्हणून हा दलित लेखक लिहित असताना तो कशा प्रकारची प्रतिमा तयार करण्याचा प्रयत्न करतो, हे आपण लक्षात घेणं आवश्यक आहे. आणि हे जर आपल्या लक्षात आलं, तर कदाचित् आपल्याला हे कळेल की, दलित स्त्रीचं आजही स्थान नकारात्मक स्वरूपाचंच आहे. संपूर्ण दलित समाजाचा विचार केला, तर ती अधिक डीह्यूमनाईज्ड आहे अन् त्याला मग सवर्ण समाजही कारणीभूत आहे अन् दलित पुरुषसुद्धा कारणीभूत आहे. तिचा विचार करताना तिला शिक्षण मिळतं किंवा नाही, तिच्या आरोग्याचे प्रश्न, विवाहसंस्था ही फार महत्त्वाची असते. कारण त्यावर स्त्री आणि पुरुष या दोघांच्याही प्रतिमा अवलंबून असतात आणि मग दलित समाजच का, पण ग्रामीण समाजात वैवाहिक जीवन हा वेठबिगार आहे किंवा काय, असं वाटायला लागतं अन् सगळ्या गोष्टी तिला सहन कराव्या लागतात. त्यातूनच ती पुढे जात असते.

आता शंकरराव खरातांच्या पुस्तकातलंच उदाहरण घेऊ. शेवंताला नीट नांदवत नाहीत. ती पळून येते माहेराला. ती अन्यायाविरुद्ध झगडा देऊ पाहते शेवटपर्यंत, पण देऊ शकत नाही. मग जात पंचायत बसते. तिथंसुद्धा दलित पुरुष हाच डॉमिनेट करतो . दलितांचा पुरुषसमाज त्या स्त्रीवर अन्याय करण्याचा प्रयत्न करतो. आता शंकरराव खरातांची आई, वडील. यांत आई संरक्षण करण्याचा प्रयत्न करते. असं म्हणतात ना ज्याचं जळतं त्याला कळतं. इथं बायकांनी मध्ये बोलायचं नसतं. सगळे पुरुष सांगतात—आम्ही बोलत असताना बायकांनी मध्ये बोलायचं नाही. तरी ही स्त्री मागे कुठेतरी बसते आणि सांगते—नाही, हे मी खपवून घेणार नाही. यातून काय निष्पन्न होतं की, दलित समाजामध्ये दलित हा स्वतः शोषित आहे. तरी स्त्रीला कुठे तरी तो डीह्यूमनाईज्ड करण्याचा प्रयत्न करत असतो. नंतरच्या चळवळी वगैरे हा वेगळा भाग आहे. तेव्हा हे लक्षात घेणं फार आवश्यक आहे असं मला वाटतं. एकंदरीत पाहता आज जगात जे काही चाललेलं आहे आपल्याला दलित प्रश्नाला स्थान त्यात द्यावं लागेल. एकंदर एक्सप्लॉयटेड सोसायटीमध्ये दलित स्त्री काय किंवा पुरुष काय, एकच प्रश्न शेवटी उरतो– 'who am I?' स्त्रीवाणीने अगदी नेमकं ते लक्षात घेतलेलं आहे—who am I? सगळ्याच समाजात जगात एक प्रकारची नवीन जागृति येत आहे. चळवळी सगळ्या ठिकाणी उभ्या राहताहेत. जे शोषित समाज आहेत ते सुद्धा पुढे येण्याचा प्रयत्न करत आहेत. इतकंच नव्हे तर भविष्याचा शोधा घेताना आपला भूतकाळ काय याचा विचार करण्याचा प्रयत्न करताहेत. अमेरिकेत तुम्ही पहा, प्रत्येक समाज हा स्वतःचा शोध घेण्याचा प्रयत्न इतिहासामध्ये स्थान काय?' या प्रश्नातून उत्तरे जी मिळतात ती नकारात्मक स्वरूपाची असतात. प्रतिभा ही अत्यंत लवचिक बाब आहे. आणि प्रतिमा म्हटल्यावर फक्त एकावर अवलंबून रहाता येत नाही हे पण आपण लक्षात घेतलं पाहिजे. माझी स्वतःच्या विषयीची जी कल्पना असेल ती माझी स्वयंप्रतिमा

आहे. मी माझ्याकडे पाहताना कुठल्या नजरेनं पहात आहे, माझी प्रतिमा तुमच्या मनामध्ये कुठल्या प्रकारची आहे ह्या वेगळ्या बाबी आहेत. अनोळखी माणूस तुमच्याविषयी जी प्रतिमा करून घेतो ती एक वेगळी बाब आहे. म्हणून प्रतिमा ही अतिशय गुंतागुंतीची बाब आहे. कित्येकदा आपले पूर्वग्रह दूषित असतात. दलित लेखक ज्यावेळी लिहितो तेव्हा तो तिथे हीरो आहे. खरं तर त्याला त्या तिथे अँटी-हीरो म्हणावं लागेल, कारण हीरॉईक क्वालिटीज त्याच्याजवळ नाहीत.तेव्हा चरित्र-नायकाला स्वतःबद्दल बोलताना अनेक स्त्रियांच्या बाबतीत बोलावं लागतं. इतर स्त्रियांबद्दल तो सविस्तर पणे सांगेल असं नाही, पण त्याच्यातून तो प्रतिमा निश्चित करतो.

या चरित्रांमध्ये दलित स्त्रिया ज्या स्वरूपात आल्या आहेत त्याप्रमाणे दलितेतर स्त्रिया कोणत्या स्वरूपात आल्या आहेत? इथे एक वेगळा गुंता तुम्हाला सापडण्याची शक्यता आहे. शंकरराव खरात आपल्या वडलांबरोबर जातात एका मास्तराच्या घरी. कार्ड वाचून घेण्यासाठी. मास्तराला बरं वाटतं की आता रामा महार इथं आलेला आहे, तेव्हा याच्याकडून आपल्याला काही काम करून घेता येईल. तो मास्तर म्हणतो 'अरे रामा, बरेच दिवसांनंतर तू आलास. मास्तरीणबाई म्हणते की पावसाळ्याचे दिवस आलेले आहेत तर लाकडं फोडून घ्या याच्याकडून.' खरं तर पत्र दोन- तीनच ओळींचं होतं. तिथं तो पत्र वाचून दाखवू शकला असता. पण नाही. त्याला वाटतं— तसं केलं तर कदाचित रामा जाईल. म्हणून तो म्हणतो, 'मला स्नान करायचं आहे. तोपर्यंत तू लाकडं फोड'. रामा महाराला तो मजकूर समजावून घ्यायचा असतो, म्हणून तो खूप लाकडं फोडतो. सगळं काम झाल्यानंतर मास्तर ते पत्र वाचतात. दोनच ओळी असतात. रामाची बहीण वारलेली असते. इथे एक सवर्ण स्त्री आहे आणि ही प्रतिमा इथं अशाप्रकारे का आली? या प्रसंगामध्ये एक प्रकारचं खलनायकत्व येथे लपून बसलेलं आहे. एका विशिष्ट कामासाठी हा माणूस जातो त्याला तिथं असं वागवलं जातं. म्हणजे दलित स्त्रीची प्रतिमा आणि इतर स्त्रियांची प्रतिमा यांचासुद्धा अभ्यास करणं महत्त्वाचं आहे. तुमचं प्रयोजन केवळ दलित स्त्रीपुरतंच मर्यादित नाही आहे. परंतु समाजात एकमेकांची नाती कशी असतात, एकमेकांशी कसं वागतात हेही आपल्याला पहावं लागेल.

आता 'तराळ–अंतराळ' मध्ये माळी समाजातील बाई दाखवली आहे. तिचा बैल मेलेला असतो. इथेसुद्धा फार विचित्र परिस्थिती निर्माण झालेली आहे. तिला असं वाटतं की, ज्या बैलाच्या आधारावर आपला जन्म गेलेला आहे तो बैल कापला जाऊ नये. त्याला पुरलं पाहिजे. तीसुद्धा एक अतिशय चांगल्या प्रकारची भावना आहे. तिला वाटतं, याला पुरावं. परंतु तिथं जी महार मंडळी जमतात ती म्हणतात की हा आमचा हक्क आहे. इथे एक निराळाच गंड तयार होतो आणि त्या बाईची इमेज तुमच्यापुढे येते. म्हणजे अॅक्शन आणि रिअॅक्शन यांमधून त्या सर्व इमेजेस पुढे चाललेल्या आहेत.

मला एक सांगायचं आहे की, दलितेतर समाजाच्या ज्या काही प्रतिमा इथे येतात, त्या रिॲक्टिव्ह प्रकारच्या आहेत. सवर्ण समाज या समाजाला जवळ करायला तयार नाही. यांच्या आशा– आकांक्षा पूर्ण करायला तयार नाही. प्रत्येक गोष्टीवर नकार द्यायला मात्र तो तयारच आहे. मग या नकारातूनच एक प्रकारची रिॲक्शन जन्म घ्यायला लागते.

हे सर्व होत असताना निर्माण होणाऱ्या प्रॉब्लेमबद्दलसुद्धा हा लेखक जागृत आहे. तराळ अंतराळ मध्ये किमान दोन पिढ्यांतील चित्रण तुम्हाला सापडतं. आईची व बहिणीची एक प्रतिमा आहे आणि नंतर बायकोची एक प्रतिमा आहे. मला वाटतं, या तीन स्त्री– प्रतिमा आपण ठळकपणे लक्षात घ्यायला काही हरकत नाही. आईविषयी अतिशय जिव्हाळा आहे. प्रेम आहे. ती खूप कष्ट करते. ते कष्ट पाहून आपल्या हे लक्षात येईल की, ती खूप एक्स्प्लॉयटेड आहे. ती रानात खूप काम करते. बापही खूप काम करतो, लाकडं फोडतो, त्याला अनेक ठिकाणी जावं लागतं. त्याचाही काही दोष नसतो. तरी शेवटी तो पुरुष आहे. या स्त्रीला सकाळी उठून घरातलं सगळं करून शिवाय परत शेतात जावं लागतं. शेतावरचं काम दिवसभर करावं लागतं. परत आल्यावर पुन्हा घरीही काम करावं लागतं. या स्त्रीवर नियतीनं ते लादलेलं आहे की काय, असं वाटायला लागतं. तरीसुद्धा या स्त्रीनं स्वतःची एक प्रतिष्ठा जपून ठेवलेली आहे. याच प्रतिमा बलुतं आणि इतर आत्मचरित्रांतही आलेल्या आहेत. हे आपल्या समोर सगळं वाढून ठेवलेलं आहे म्हणून ते तिनं स्वीकारलेलं नाही. जातपंचायतीच्या लोकांना ती सांगते- हे चालणार नाही, मी विरोध करणार. बाई आहे म्हणून ती गप्प बसत नाही. म्हणून मला वाटतं की, रामा महारापेक्षा साऊबाईची प्रतिमा ही अधिक ठळक आहे. ती सगळा विरोध नोंदवते आणि आलेल्या परिस्थितीला तोंड देते. नंतर वाळीत टाकलं जातं घर. तेसुद्धा एक फार मोठं शस्त्र आहे. याचं एवढं प्रस्थ जातीनं केलेलं आहे की जिथं तिथं त्याचा आधार घेतला जातो. दुसरी कुठली स्त्री असती तर ती त्या परिस्थितीला शरण गेली असती. आपल्या मुलाला ती म्हणते की, तुला पुरणपोळी, गोडधोड मिळत नाही का ? मी तुला ते करून घालीन. घरातील चूल पेटवण्यासाठी विस्तव वगैरे मिळत नाही, असं तुझं म्हणणं आहे का ? आपण वाण्याच्या दुकानातून एक पेटी घेऊन येऊ. सबंध समाज बहिष्कार टाकतो. त्या बहिष्काराला ती तोंड देते. एका दृष्टीनं ती परंपरावादी आहे. परंपरेचे असलेले पाश तिने तोडलेले नाहीत. तिला असं वाटतं की, आपण जत्रेला गेलं पाहिजे, आपण देवाची पूजा केली पाहिजे. जे जे म्हणून आपल्याला शक्य आहे ते ते केलं पाहिजे. परंतु कुठेतरी या सगळ्याचा प्रोटेस्ट आहे. जेव्हा समाज तुमच्याकडे निगेटिव्ह दृष्टीने पहात असतो, त्यावेळी तुमच्यामध्ये प्रोटेस्ट येत असतो.

असं म्हणतात की, Slave woman has something to lose, but slave man has nothing to lose आता समथिंग म्हणजे काय ? स्त्रीच्या

बाबतीत समथिंग म्हणजे तिची अब्रू. हा फरक आहे स्त्री आणि पुरुष यांच्यात. बाकी तिच्याकडे काही नाही. प्रॉपर्टी नाही, शेतीवाडी नाही, हे नाही, ते नाही, फक्त अब्रू ही एकच गोष्ट तिच्याकडे आहे आणि कधी कधी तिला ती गमवावी लागते. आजसुद्धा खेडयापाडयांतून दलितांवर जे अन्याय चालतात ते आपण लक्षात घेतले पाहिजेत. आणि म्हणून हा प्रश्न अतिशय नाजूक आहे.

इथं परंपरा आहे. दलित सासू आणि दलित सून. हा जर सगळा गुंता आपण लक्षात घ्यायला लागलो, तर मग स्त्रीचं कुठलं स्थान हा प्रश्न परत लक्षात घ्यावा लागेल. शेवंता जेव्हा पळून येते तेव्हा सगळे पुरुष म्हणतात की, बाईनं असं वागलं पाहिजे, तसं वागलं पाहिजे. मग तिची आई म्हणते की, ती कुणाचा हात धरून पळून गेलेली नाही. संपूर्ण समाजामध्ये स्त्री ही विशेष संवेदनशील आहे. आता स्त्रीकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलेल का ? नाही. म्हणून ही विवाह-संस्था दलितांनी सुद्धा मानलेली आहे.

निग्रो समाज आणि दलित समाज यांची इथे मात्र तुलना होत नाही. निग्रोंची पार्श्वभूमी अशी की, निग्रोंना स्वतःची इन्स्टिटयूशन अशी कुठलीच राहिलेली नाही. म्हणजे सगळा व्यवहार हा पशुपातळीवर होत गेला. कारण गुलामी होती. अमेरिकेमध्ये आधी पुरुष सगळे आणले गेले. आर्थिक पातळीवर निर्माण झालेली ही सर्व समस्या होती. त्यांना वापरलं गेलं. मग गोऱ्या लोकांना असं वाटत गेलं की, आपण किती गुलाम विकत घ्यायचे ? मग नंतर त्यांनी बाया आणल्या. तिथून बाया जर आणल्या तर त्या काम तर करतीलच, परंतु त्यांच्यापासून संततीसुद्धा निर्माण होऊ शकेल, ही भावना होती. ज्या प्रमाणे शेतकरी गायीकडे बघतो, अगदी त्याच नजरेने गोरा मालक निग्रो स्त्रीकडे बघत होता. मार्टिन ल्यूथर किंग असंच म्हणत होता की, आमचं सगळंच संपलेलं आहे. आता सगळं रिऑर्डर कसं करायचं हा प्रश्न आहे. तसा प्रश्न सुदैवानं दलितांपुढे नाही. कुठल्याही संस्था नष्ट झालेल्या नाहीत. म्हणून ही विवाहसंस्था दलित स्त्री सातत्याने जपायचा प्रयत्न करते आहे. परिस्थिती तिला ते करू देत नाही, पण ती पुढे जाते आहे.

आता आपण आजची दलित स्त्री बघूया. शंकरराव खरात ज्यावेळी लग्न करतात तेव्हा ती स्त्री म्हणते की, मला आता शिकायचं आहे. आता परिस्थिती बदलली आहे. लग्न झाल्यावर आपलं शिक्षण बुडेल अशी भीती वाटते. तिला तर डॉक्टर व्हायचं आहे. ती स्त्री इथे एक अट घालते आणि मला हे फार महत्त्वाचं वाटलं. ती अट अशी घालते— 'माझ्या शिक्षणाची सर्व जबाबदारी घ्यावी लागेल.' म्हणजे, वेळही देणं आलं आणि पैसाही देणं आलं. 'मान्य आहे' असं खरातांनी म्हटल्यानंतर 'विश्वास नाही, स्टँप पेपरवर लिहून द्यावं लागेल' असं ती म्हणते. हेसुद्धा महत्त्वाचं आहे. हे प्रत्यक्षात घडतं आहे का प्रत्येक ठिकाणी ? मला माहिती नाही. पण इथे प्रतिमेच्या दृष्टीने मला महत्त्वाचं वाटतं. ती म्हणते की पाच रुप-यांच्या स्टँपपेपरवर मला लिहून द्या. त्यावेळेला शंकररावांची वकिलीपण सुरू

झालेली आहे. ते वकील झालेले आहेत. बायकोला डॉक्टर व्हायचं आहे. आणि ते म्हणतात, 'बरं आहे, लिहून देतो.' कुठल्याही स्त्री-मूव्हमेंटसाठी ही फार चांगली नायिका आहे. तरीपण पुरुषांवरच विश्वास नाही. परत तिला वाटतं की– नाही, पुरुष बदलतात. ती नाही म्हणते आणि सहा महिने पुढे जातात आणि त्यानंतर मग ती तयार होते. आता लक्षात घ्या– आईची एक प्रतिमा, बहिणीची एक प्रतिमा आणि पत्नीची एक प्रतिमा. या तीन तीन सिच्युअेशन्स आहेत. बायकोची जी अलीकडची प्रतिमा आहे ती मला महत्त्वाची वाटते. ही प्रतिमा आता अधिकाधिक पॉझिटिव्ह होत चाललेली आहे. स्वतःचं व्यक्तिमत्व इथे नाकारलं जाऊ दिलेलं नाही. म्हणून ही संस्था अत्यंत महत्त्वाची मानली गेलेली आहे.

लक्ष्मण मान्यांचं जर पुस्तक घेतलं तर त्याला काही वेगळी परिमाणं आहेत- या पुस्तकाला व दलित प्रतिमेला देखील. तिथेसुद्धा एक दलितेतर स्त्री लक्ष्मण मानेशी लग्न करते. हा या एकंदर जातिव्यवस्थेलाच एकूण धक्का आहे. हे दोन्ही समाज दोन व्यक्तींना बाहेर फेकून देतात– व्यक्ती म्हणून त्यांना फारशी किंमत देत नाहीत. शशी लग्न करते लक्ष्मण मानेशी. तिला माहीत आहे ती चांगल्या कुळातील मराठा स्त्री आहे. पुढे काय अडचणी येणार आहेत, तिला सगळं माहीत आहे. आणि ती प्रतिमासुद्धा अत्यंत पॉझिटिव्ह स्वरूपात तुमच्या समोर येते. एक प्रकारे जातिव्यवस्थेवर फार मोठा प्रहार केल्याचे तुम्हाला त्या ठिकाणी दिसून येते. आणि त्याच्यातून ती हे सगळं सहन करते. पुढे जातपंचायती वगैरे घेतल्यानंतर पुरुष किती डॉमिनेटिंग असू शकतो हे कळून येतं. पहिल्यांदा कुठलीतरी एक बाई गहाण ठेवलेली असते. त्या माणसापासून तिला मूल होतं. हा व्यवहार सामान्य पातळीवर चालला आहे. अशा समाजामध्ये पॉझिटिव्ह इमेजेस मिळू शकतात का? पुरुषांची पॉझिटिव्ह इमेज मिळू शकणार नाही, स्त्रीचीसुद्धा मिळू शकणार नाही. तिथे शब्द वापरले गेले आहेत स्त्रीबद्दल की, ती वस्तू आहे, शेती आहे, वगैरे. हे आपल्याकडेच आहे असं नाही. युरोपमध्येसुद्धा स्त्रीला आत्मा असू शकत नाही असा समज होता.

पुरुषाची इमेज ही देव म्हणून आहे. स्त्रीची ती तशी कशी असू शकेल? आता सामाजिक परिस्थिती कशी बदलत चाललेली आहे याचं भान तुम्हाला ठेवावं लागेल. स्त्री स्वतःला सिद्ध करण्याचा प्रयत्न करते आहे, कारण पूर्वी तिला स्थान नव्हतं. आता तिला शिक्षण मिळतं का, तिला प्रॉपर्टीचे हक्क आहेत का, यासारख्या समस्या फार मोठ्या प्रमाणात यायला लागतील. आणि याच्यातून ही सर्व प्रतिमा पुढंच चाललेली आहे. आत्मचरित्रांचा अभ्यास करत असताना ते आपल्याला लक्षात घ्यावं लागेल. शंकरराव असं म्हणतात की, 'ही जी माझी आत्मकथा आहे ती दलित समाजाची आत्मकथा आहे.' एका अर्थाने दलितांमध्ये देखील आणखीन काही वेगळे प्रश्न आहेत.

'अक्करमाशी'मधला प्रश्न हा अगदी वेगळा प्रश्न आहे. 'अक्करमाशी' मधील

स्त्रीची प्रतिमा ही जरा वेगळी आहे. लिंबाळे हा लिहीत असताना लातूरला होता आणि माझ्या मार्गदर्शनाखालीच त्यानं सर्व लिखाण केलेलं आहे. म्हणून त्याची माहिती मी देतो. तो माझ्याकडे यायचा. परंतु त्याचा जो प्रश्न आहे तो सांगण्यास तो लाजत असे. तो प्रश्न असा आहे– लिंबाळेची आई ही एका लिंगायत पुरुषाबरोबर संबंध ठेवत होती. आणि त्या पुरुषापासून झालेला हा मुलगा आहे. त्याची अशी शोकांतिका आहे की, सवर्ण समाज त्याला जवळ करत नाही आणि त्याचा समाज त्याचा स्वीकार करत नाही. इथे जी प्रतिमा आहे ती नकारात्मक असून शिवाय अधिकच नकारात्मक होत गेलेली आहे.

आणखी त्याचा एक प्रश्न आहे, त्या प्रश्नाचं निग्रोंच्या प्रश्नांशी साम्य आहे. अनेक निग्रोंना आपला बाप कोण, हे सांगता येत नाही. यालाही बाप कोण आहे हे माहीत असूनसुद्धा तो त्याला आदर देऊ शकत नाही. आता इथे परिस्थिती अशी आहे की, आईविषयी सुद्धा आदर वाटणं शक्य नाही आणि बापाविषयी आदर नाही; कारण आपल्या आईकडे एक भोग्य वस्तू म्हणून तो पाहतो.

एक प्रसंग तर असा आहे की, हा वाहवत जातो एका वेश्येच्या घरी. हा आणि याचा लिंगायत बाप एकाच वेळी तिथे जातात. इथे कोणत्या प्रकारच्या प्रतिमेची आपण अपेक्षा करावी ? आईनं सांभाळ केलेला असतो म्हणून तो सतत आईविषयी आदरयुक्त भावना ठेवतो. तरीसुद्धा मनातून तो अत्यंत अस्वस्थ असतो. हॅम्लेटसारखा थोडासा प्रॉब्लेम आहे. आंबेडकरांसारख्या माणसांमुळे मी शिक्षण घेऊ शकतो, नोकरी करू शकतो, लिहू शकतो ही भावना या समाजात आहे. यापुढे ‘ तुझा बाप कोण ’ हा प्रश्न गौण आहे. माझा बाप दलित नव्हता किंवा लग्नाच्या व्यवहारातून झालेली ही संतती नाही. कुणातरी माणसाच्या ठेवलेल्या बाईपासून झालेला हा मुलगा आहे. ही एक अतिशय न्यूनगंडयुक्त अशी प्रतिमा आहे. दलित साहित्य हे पूर्णपणे पुढं आलेलं नाही. दलित स्त्रीची इमेज जर खऱ्या अर्थानं पहायची असेल, तर स्त्रियांनीच मोठ्या प्रमाणात लिहायला पाहिजे. दलित समाज देखील दलित लेखनात आलेला नाही. या लेखकांना माहीत नसलेलं जग देखील इतक्या प्रचंड प्रमाणात अस्तित्वात आहे, की, तिथपर्यंत आपण पोहचू शकलेलो नाही.

लिहीत असताना वास्तव प्रतिमा येते आहे किंवा नाही, हे थोडंसं बघावं लागेल. ‘बलुतं’ वाचताना मला असं वाटलं की, काही ठिकाणी आपण अतिरंजित स्वरूपात लिहितो आहोत की काय ? कदाचित् ते सगळे धागेदोरे आम्हाला माहीत नसल्यामुळे आम्हाला तसं वाटत असेल. लेखक लिहीत असताना त्याच्यासमोर कोणता ना कोणता वाचकवर्ग असतो. आणि दलित लेखक लिहीत असताना सवर्ण समाज हा आपला वाचकवर्ग आहे, असं धरून लिहीत असतो. आणि याच्यामुळे त्या प्रतिमांमध्ये थोडा बदल होण्याची शक्यता आहे. या संपूर्ण लेखनाला जर वेगळं स्वरूप दिलं, तरच निराळ्या इमेजेस येण्याची पुढे शक्यता आहे.

**बेबी कांबळे**

आत्ताच श्री. वाघमारे यांनी 'दलित स्त्रियांनी लिहिलं पाहिजे' असं सांगितलं. परंतु जेव्हा एखादी दलित स्त्री लिहिते तेव्हा तिचं साहित्य कुजत पडतं. ते प्रसिद्ध होत नाही. कारण माझंही लिखाण 'स्त्री' मासिकानं प्रसिद्ध केलं नसतं तर तसंच पडून राहिलं असतं. म्हणून मला विचारावंसं वाटतं—यावर उपाय काय?

**प्र. ई. सोनकांबळे**

शंकरराव खरात यांनी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर गेले वर्षभर एक गोष्ट केली. ज्यांनी, ज्यांनी लिहिलं त्यांचं लिखाण प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. असा प्रयत्न साहित्य संमेलनाच्या सर्व अध्यक्षांनी यापुढे करत रहायला हवा.

**शंकरराव खरात**

या संदर्भात लेखकांनी साहित्य संस्कृती मंडळाची मदत घ्यायला हवी.

**पी. डी. कुलकर्णी**

माझे प्रश्न थोडे वेगळ्या स्वरूपाचे आहेत. ज्यांचे पूर्वी शोषण झाले तेच शोषित पुन्हा शोषक का होतात? अनेक प्रकारचे शोषण सोसणारे ज्यू लोक पॅले-स्टाईनी लोकांचा छळ कां करतात? प्रत्येक दलितात शोषक लपलेला असतो का? आजचे क्रांतिकारक उद्याचे शोषक का बनतात? हेच नेमके सासू—सून नात्यातही आढळते. म्हणून या इतिहासाबाबत नेमके स्पष्टीकरण मिळावे अशी माझी इच्छा आहे.

**जनार्दन वाघमारे**

परिस्थितीतून सारे बदलत जाते. दोन समाजांच्या संघर्षामधून निर्माण होणारी प्रतिमाही त्यानुसार बदलत जाते. मार्टिन ल्यूथर किंगने निग्रोंवरील अन्यायाविरुद्ध उभी केलेली चळवळ 'Black- power movement' म्हणून पुढे आली. खरं तर, मार्टिन ल्यूथर किंगला या चळवळीचे असे वळण अपेक्षित नव्हते. परंतु सांस्कृतिक घटक, जीवशास्त्रीय घटक, सत्ता, इत्यादी गोष्टी साधनं व साध्यांना बिघडवून टाकतात. तसंच, माणूस हा चांगल्या आणि वाईट दोन्ही प्रवृत्तींचं मिश्रण असल्याने कोणती प्रवृत्ती अधिक उफाळून येईल. तिला अधिक प्रोत्साहन मिळेल, हे सांगता येत नाही.

**आशा मुंडले**

आत्ता पी. डी. कुलकर्णी यांनी म्हटल्याप्रमाणे सासू—सून नात्यात सून सासू झाल्यावर आपल्या सुनेस जेव्हा छळते तेव्हा ती आपल्या मेलेल्या सासूवरच सूड उगवत असते. सूड उगवल्याचे समाधान मिळवीत असते, असं मला वाटतं.

तसंच आणखी एक मुद्दा मला सांगावासा वाटतो. दलित स्त्रीचं समाजातील स्थान बदलत असताना दलित लेखकाची त्यातील भूमिका नेमकी कोणती असावी यावरही विचार व्हावा.

**भालचंद्र फडके**

शोषित 'शोषक' होतो तेव्हा तो समाजातून फेकला जातो, असे इतिहास सांगतो. तसेच शोषिताने शोषक होणे, हे कोणत्याही कारणाने समर्थनीय म्हणता येणार नाही.

मात्र इथे एक मुद्दा महत्त्वाचा आहे. दलित लेखकांच्या लिखाणामध्ये आपल्यावर झालेल्या अन्यायाच्या, आपल्या शोषणाच्या विरुद्ध सूड उगवावा अशी भूमिका दिसून येत नाही.

**अनिल अवचट**

या विषयाच्या संदर्भात मला एका बातमीचा संदर्भ द्यावासा वाटतो. त्या-बातमीनुसार दक्षिण आफ्रिकेच्या ज्या जिल्ह्यांत निग्रोंचे सर्वाधिक शोषण होते त्या जिल्ह्यांत दरवर्षी ४०,००० बलात्कार होतात. विशेष म्हणजे, हे बलात्कार निग्रो पुरुष निग्रो स्त्रियांवर करताना आढळतात.

**सुमित्रा भावे**

दलित स्त्रियांच्यात आता जागृती होऊ लागली आहे, हा मुद्दा मला नोंदवावासा वाटतो. दलितांच्या घरांमध्ये वर्चस्व दलित पुरुषांचे असले तरी मोर्च्यांमध्ये संख्याबळ वाढावे म्हणून अनेक वेळा दलित स्त्रियांनाच बोलावले जाते. या बाबत अनेक स्त्रियांना कळतं. तसंच त्यांच्या सामर्थ्याचं (या संदर्भातील) भानही त्यांना आलं आहे. विशेष म्हणजे त्यांच्या झोपडपट्ट्यांच्या परिसरात दलित संघटना, राष्ट्रसेवा दल, सरकारी कामं करणारे व्यावसायिक कार्यकर्ते काम करत असतात. त्यांचा प्रत्येक घराशी संपर्क येतो. त्यामुळे या स्त्रियांना राजकीय जागृती येऊ लागली आहे. त्यामुळे दलित स्त्रियांची मतं तयार होऊ लागली आहेत. त्यातून त्या अधिक खंबीर बनत आहेत. 'मी कोणीतरी आहे' याची जाणीव त्यांच्या मनात निर्माण झालेली आहे. आमच्या संपर्कात आलेल्या एका दलित स्त्रीनं दिलेलं बाणेदार उत्तर हे त्याचंच उदाहरण आहे.

एका स्त्रीला नवऱ्यानं मारहाण केली—सुरुवातीला ती गप्प बसली, परंतु नंतर मात्र ती नवऱ्याला म्हणाली, 'मला मारू नका. कायद्यानं बोला.'

**अनिल अवचट**

याबाबतीत निपाणी येथील विडी कामगार स्त्रियांच्या संदर्भातील माझा अनुभवही लक्षणीय आहे. तेथील एक माणूस विडी कामगार स्त्रियांवर अत्याचार करत असे. आतापर्यंत दबलेल्या त्या स्त्रियांशी मी संपर्क साधला असता त्या जवळ-

जवळ १०,००० ते १५,००० संख्येने संघटित झाल्या. त्यांनी संतापाच्या भरात त्या माणसाला चपला मारल्या. त्यांनी त्याच्याविरुद्ध घोषणा दिल्या. यापुढेही कृती करण्याची त्यांची इच्छा, तयारी होती. इतकी की, त्यांना आवर घालणें आम्हाला कठीण झाले. दबलेली भावना एकदा बाहेर पडली की किती आवेगानं बाहेर पडते, हे आम्हाला त्या प्रसंगी पाहायला मिळालं.

**जनार्दन वाघमारे**

दलित स्त्रीचं बदलतं रूप पाहता दलित पुरुष दलित स्त्रीचं प्रतिनिधित्व करू शकत नाही हे स्पष्टपणे सांगावंसं वाटतं.

या नंतर सर्वांतर्फे श्री. माधव कोंडविलकर यांच्या पत्नी श्रीमती उषा कोंडविलकर यांनी आपले अनुभव, विचार सांगावेत असा आग्रह करण्यात आला. त्यांना बोलतं करण्यासाठी त्यांना अधूनमधून प्रश्नही विचारण्यात आले.

**शोभा भागवत**

आजच्या दलित स्त्रीत कोणकोणते बदल व्हावेत असं तुम्हाला वाटतं? तसंच तुम्ही कोणत्याही प्रकारचे उपास, नेमधर्म करत नाही असं कळलं. तर त्याबाबत घरची व आसपासची माणसं रागावतात का?

**उषा कोंडविलकर**

दलित पुरुष सुधारला तरी त्या सुधारणेमुळे बदललेली मतं, वागणूक याबाबत स्त्रीलाच अधिक सोसावं लागतं.

हळदीकुंकू, सत्यनारायणाची पूजा इत्यादी गोष्टी मी करत नाही व त्या गोष्टी इतरांनी केल्यानंतर मला बोलावल्यास मी जात नाही. म्हणून सर्व लोक, अगदी पुरोगामी लोकसुद्धा, माझ्यावर रागावतात. 'मिसळत नाही' अशी माझ्याबद्दल तक्रार करतात.

मात्र तरीही मी उपास करत नाही. तसंच ह्यांच्या आईच्या मृत्यूनंतर कोणतेही धार्मिक विधी आम्ही केले नाहीत.

तसंच हे आमच्या समाजावर, आमच्या नातेवाईकांवर लिहितात म्हणून सर्वजण यांना शिव्या देतात, यांच्यावर रागावतात. माझ्या भावांशी यामुळे व इतर कारणांमुळे भांडण झाल्याने मी माहेरीही जात नाही.

**सुमित्रा भावे**

तुमचा उपास–तापास, व्रतवैकल्यं, सत्यनारायणाची पूजा यांच्यावरचा विश्वास कसा काय उडाला?

**उषा कोंडविलकर**

ह्यांचे लिखाण मी वाचत होते. तसेच ह्यांचे आणि माझे बोलणे व्हायचे. त्यातून माझे विचार बदलले.

### अनिल अवचट

कार्यकर्त्यांमध्ये जुनी मूल्यं फेकून देण्याची तयारी आहे. पण सर्वांच्या यासंबंधीच्या प्रतिक्रिया कोणत्या आहेत व त्याविषयी स्वतःला काय वाटलं, हे लेखकांनीही सांगावं.

### जनार्दन वाघमारे

मला एक मुद्दा मांडायचा आहे. समाजात मध्यमवर्गीयीकरण होऊ नये असे आपण म्हणतो. पण ते अटळ नाही का? कारण जोपर्यंत मध्यमवर्गीयीकरण होत नाही तोपर्यंत सांस्कृतिक उन्नती होत नाही.

तसेच मी शिकतो, मला नोकरी मिळते म्हणजे माझे 'ब्राह्मणीकरण'च होते. कारण सामाजिक संरचना (social structure) बदलल्याशिवाय हे घडत नाही. यातूनच आजचा शोषित उद्याचा शोषक होतो.

### आशा मुंडले

आजपर्यंत दलित पुरुषांचेच मध्यमवर्गीयीकरण होत होते. परंतु आता दलित स्त्रियापण मध्यमवर्गीय होऊ लागल्या आहेत.

### सुमित्रा भावे

हे मध्यमवर्गीयीकरण अटळ आहे, हे मलाही मान्य आहे. पण तरीही या संदर्भात दलितांनी मध्यमवर्गीय होणे ही खंत वाटते. आणि हे सूत्र मला वाटतं सर्वांच्याच बोलण्यात आलं आहे.

### माधव कोंडविलकर

शिक्षण–नोकरीनंतर दलितांचे होणारे मध्यमवर्गीयीकरण अटळ आहे, हे मला मान्य नाही. तसेच या स्थितीकडे तो ओढला जातो, हेही मला अमान्य आहे. या व्यवस्थेत 'मी वेगळा, दलित' हे नष्ट करून 'मी माणूस म्हणून जगतो' याची जाणीव प्रत्येकानं ठेवायला हवी. मग व्यवसायानं तो कोणीही असो–शिक्षक, शेतकरी वा कोणीही.

### जनार्दन वाघमारे

समाजरचना तीच ठेवून हा प्रश्न (दलितांचे मध्यमवर्गीयीकरण) सुटणार नाही. सर्व समाज जर एकाच पातळीवर आला- त्यात समानता आली तरच हा प्रश्न सुटू शकेल.

### मेघा टेंगशे

याबाबत मला एक मुद्दा मांडावासा वाटतो. या चर्चासत्रात आपण 'दलित मध्यमवर्गीय अगर पांढरपेशे होण्यासाठी धडपडतात' असं म्हणतो. पण मला वाटतं याबाबत स्त्रियांच्या, विशेषतः उच्चशिक्षित स्त्रियांच्या मनोवृत्तीचाही विचार करावा.

ज्या स्त्रियांना डॉक्टर, इंजिनिअर होण्याची संधी मिळाली, त्यांना अशिक्षित व अनेक समस्यांना तोंड देणाऱ्या इतर स्त्रियांचे प्रश्न जाणवत तरी नाहीत किंवा त्या त्यांकडे सोयीस्कररीत्या दुर्लक्ष तरी करतात. आपल्यापुरतं पाहण्याची आत्मकेंद्रित वत्ती, तसंच आपल्याला मिळालेल्या विनासायास संधीत तृप्तता असणाऱ्या स्त्रिया पाहिल्या की, स्त्रियांचं 'पुरुषीकरण' झालं आहे हे तीव्रतेनं जाणवतं. निदान दलित पुरुषांना आपल्या बदलत्या विचारांबाबत भान तरी आहे, पण या अशा प्रकारच्या स्त्रियांना तेवढीही जाणीव नाही असे वाटते. मला वाटतं, आपल्याला स्वतःला सोयीस्कर, फायदेशीर भूमिका उचलणं ही मानवी प्रवृत्तीच असावी.

**सुमित्रा भावे**

जे, जे चांगलं त्याचं अनुकरण करणं या मानवी प्रवृत्तीतून स्त्रियांचं 'पुरुषीकरण' आणि दलितांचं 'मध्यमवर्गीयीकरण' होत असावं.

**शोभा भागवत**

पण काही काळाने स्त्रीला कळत असावं की, 'पुरुषी होणं' म्हणजे मुक्त होणं नव्हे.

**जनार्दन वाघमारे**

नेतृत्व हे नेहमी मध्यमवर्गातून येतं आणि तेच इतर कनिष्ठ वर्गासाठी भांडतं. म्हणून (दलितांनी) मध्यमवर्गीय होण्याची प्रक्रिया टाळणं कठीण होत असावं.

**सुमित्रा भावे**

पण त्यामुळे काही गोष्टींचं नुकसान होतं. आता पातिव्रत्य हे मध्यमवर्गीय मूल्य सुशिक्षित दलित स्त्रीतही येऊ लागलेलं आहे. पातिव्रत्याचं काल्पनिक मूल्य स्वीकारून, जपून ती मध्यमवर्गीय होतेय, असं आमच्या अभ्यासातून जाणवलं. या उलट अशिक्षित दलित स्त्री या संदर्भात अधिक मोकळी, स्वच्छ आहे असे वाटते.

**दया पवार**

मला वाटतं, पातिव्रत्यापेक्षा पतीला सोडणं हा मार्ग असुरक्षिततेचा आहे. म्हणून, दहा पुरुषांच्या जाचापेक्षा एका नवऱ्याचा जाच बरा, अशी कल्पना करून ती सुशिक्षित दलित स्त्री नवऱ्याकडेच रहात असावी.

**सुमित्रा भावे**

परंतु आपल्या वागण्याचे, निर्णयाचे समर्थन करताना तसे ही बाई स्पष्टपणे सांगत नाही. उलट आपल्या वागण्याचे स्पष्टीकरण आपले पातिव्रत्य असल्याचे सांगते.

**शोभा भागवत**

आमच्या पाहणीत एकूणच सुशिक्षित दलित स्त्रीपेक्षा अशिक्षित दलित स्त्री

अधिक मोकळी, धीट आढळली. परंतु एवढ्या चर्चेनंतरही मला एक प्रश्न पुन्हा पुन्हा पडतो– दलित स्त्रीची खरी ताकद नेमकी कशात आहे? तिच्या शिक्षणात की आणखी कशात?

**गो. म. कुलकर्णी**

तिला जे बळ लाभलेलं आहे ते तिला जीवनाशी विविध पातळ्यांवरून जो संघर्ष करावा लागतो त्यातून आलेलं आहे, असं मला वाटतं.

तसेच सर्व समाजातील, एकूण तपशील बदलला तरी, मूळ व्यवस्था बदलत नाही. त्यामुळे उच्चवर्णीय आणि दलित स्त्रिया यांच्या पोषाखात बदल झाला तरी त्यांची मानसिकता एकाच पद्धतीची दिसते. (उदा:– 'बलुतं'मध्ये दलितांत मुलगी झाल्यानंतर व्यक्त होणारी नाराजी आणि मध्यमवर्गीयांतील या संदर्भातीलच नाराजी यांत फरक नाही.) तशीच त्यांची मूल्येही बदलत नाहीत, असे दिसते.

ज्याप्रमाणे आजची शिक्षणव्यवस्था आपल्याला पसंत नसली तरी त्याला पर्याय नाही, तसेच आजच्या समाजव्यवस्थेबद्दलही म्हणता येईल. मात्र 'मध्यमवर्गीयीकरण' किंवा 'ब्राह्मणीकरण' याबाबत सध्याचा विशिष्ट समाज व वर्ग डोळ्यांसमोर न घेता, मध्यमवर्गीयीकरण अगर ब्राह्मणीकरण म्हणजे तो काहीतरी उच्च विचारांच्या मानवी मूल्यांचा व्यवहार अंगीकारणं होय, हे आपण लक्षात घ्यायला हवं.

**प्र. ई सोनकांबळे**

आपल्याकडे समाजाचं एकीकरण अगर समाजीकरण होण्यासाठी आंतरजातीय विवाह व्हावेत. त्यासाठी दलित मुलगा – सवर्ण मुलगी असे विवाह तर व्हावेतच– तसे विवाह सध्या काही प्रमाणात होत आहेतच. पण त्याचबरोबर सवर्ण मुलगा आणि दलित मुलगी असा विवाह होण्याची गरज आहे.

**शिल्पा मुंब्रिसकर**

असे आंतरजातीय विवाह केल्यानं सरकारकडून कोणत्या प्रकारची मदत होते, हे सर्वांना कळलं पाहिजे, म्हणजे अशा विवाहांचं प्रमाण वाढेल.

**सुमित्रा भावे**

या बाबत अधिक प्रयत्न होण्याची गरज आहे. तसेच अशा विवाहांचा गाजावाजाही व्हायला हवा. असा विवाह करणाऱ्यांच्या मुलाखती घ्यायला हव्यात.

## ६ समारोप

या सत्राचा आणि एकूण अडीच दिवसांच्या चर्चासत्राचा समारोप या सत्राचे अध्यक्ष शंकरराव खरात यांनी केला.

### शंकरराव खरात

आपण परत जाताना आपल्या डोक्यात काही विकृत भावना, काहीतरी गैरसमज घेऊन जाऊ नये म्हणून या ठिकाणी बोलणं भाग आहे. मी काल म्हटलं त्याप्रमाणे ही पाच दलित आत्मचरित्रं म्हणजे प्रातिनिधिक नव्हेत, हे सर्व दलित समाजदर्शन नव्हे. हे जर समाजदर्शन तुम्ही मानत असाल, तर तुमचा गैरसमज होईल, समाजाचा गैरसमज होईल. दलित स्त्री ही भोग्य वस्तू आहे, दलित स्त्रीचा व्यवसाय म्हणजे वेश्याव्यवसाय ही समजूत खरी नाही. हा स्वतंत्र विषय आहे. वेश्याव्यवसायाच्या माझ्या अभ्यासावरून मी तुम्हाला सांगेन की, कर्नाटकातील कानडी बोलणारी स्त्री ही जशी सौंदत्तीच्या यल्लम्माला सोडलेली आहे, त्याप्रमाणे दहा घरांमध्ये एखाद्या दलित घरामधील स्त्री यल्लम्माला सोडलेली असते. नऊ घरं व्यवस्थित असतात. ती मुलगी पुण्यामुंबईकडे आली की वेश्याव्यवसाय करू लागते. म्हणून अशी एखादी मुलगी जर त्या व्यवसायात पडलेली असेल, तर त्यावरून दलित समाजातील स्त्रियांचा किंवा या समाजाचाच तो व्यवसाय आहे, असा गैरसमज होऊ देऊ नये.

दुसरा भाग असा- ज्या ज्या जोगतिणी आहेत, मुरळ्या आहेत, बसव्या आहेत, आराधन्या आहेत त्या, मला गडहिंग्लजला असं सांगण्यात आलं की, मराठा आहेत, वाणी आहेत, महार–मांगाच्यापण आहेत. माझा जो इतिहासाचा अभ्यास आहे, त्यात मला आढळलं की, भूमिपुत्र या मूळ आदिवासी जातीला काही वेगळा इतिहास आहे. माझ्या या अभ्यासात या जातीमध्ये वेश्याव्यवसाय आहे, असे कुठेही निदर्शनास आलेले नाही. वेश्याव्यवसायाचा मी आठ- दहा वर्षे अभ्यास केलेला आहे. पंडित नेहरू असताना यासंबंधी मी त्यांच्याकडे शिष्टमंडळ घेऊन गेलो होतो. इकडून येणाऱ्या वेश्यांचा व कर्नाटकातील वेश्यांचा दोन दोन महिने मी अभ्यास

केलेला आहे. त्यात मराठी बोलणारी वेश्या ही दलितच असेल असे नाही. त्यातील एक टक्का असली तर असेल. पण सुमारे नव्व्याण्णव टक्के दुसऱ्याच बाया आहेत. फसून आलेल्या आहेत, स्वखुशीनं आलेल्या आहेत. त्यात देशपांडेसारख्या कॉन्स्टेबलची स्त्रीसुद्धा होती. त्यांच्यापण मी मुलाखती घेतल्या होत्या. म्हणजे दलित स्त्री हीच फक्त वेश्याव्यवसाय करते, असा कृपा करून समज करून घेऊ नये. आता दलित स्त्रीवर अत्याचार होणं, दलित स्त्रीचा विनयभंग होणं आणि दलित स्त्रीवर बळजबरी होणं म्हणजे वेश्याव्यवसाय नव्हे. वेश्याव्यवसाय हा स्वतंत्र धंद्याचा भाग आहे. चरितार्थाचा भाग आहे. म्हणून जबरदस्ती, विनयभंग हे वेश्याव्यवसायात येऊ शकणार नाही. म्हणून दलित स्त्री ही भोग्यवस्तू होऊ शकणार नाही. आपण सगळे जाणते लोक आहात. आपला काही गैरसमज राहू नये म्हणून मला हा खुलासा करावा लागला.

### आशा मुंडले

बरं झालं आपण हा खुलासा केला. माझा जर आपण पेपर वाचलात तर आपल्या लक्षात येईल की, त्यांची भाषा आणि इतर वागणं यावरून तसा गैरसमज होण्याची शक्यता असते. आता लावणी म्हणणारी स्त्री- अगदी एकच एक माणूस तिला माहिती होतो, असं घडत नाही. राव म्हणून बाई आहेत. त्यांनी या लावणी म्हणणाऱ्या बायकांच्या मुलाखती घेतलेल्या आहेत. त्यात यमुनाबाई वाईकर या वयस्कर असल्यामुळे पूर्वायुष्याबद्दल सांगताना त्यांना कमी संकोच वाटतो. हा विषयच असा वर्मी घाव घालणारा आहे की, कसं याबद्दल बोलावं हे समजत नाही. पण काहीच जर होत नसतं तर लावणी हा करमणुकीचा प्रकार राहिला नसता. तुम्ही पुरुषमंडळी आहात. तुम्ही लावणी हा प्रकार ऐकलेला आहे. तेव्हा थोडा तरी सत्यपरिस्थितीचा विचार करा ना!

### बेबी कांबळे

निंबोरे हे माझे खेडेगाव आहे. त्या खडेगावात ऐंशी– पंचाऐंशी अशी घरं आहेत- म्हणजे आमची बौद्धांची. स्त्रिया व पुरुष दोघंही मजुरी काम करतात. पुरुषाची मजुरी किती? १० रु. स्त्रीची मजुरी किती? ५ रु. मुलं तीन–चार तरी असतात. या स्त्रिया आपल्या पतीचा संसार इतक्या जिद्दीनं करत असतात की, तिचं व्रत- भारतीय संस्कृती तिच्या नसानसात खेळते. एखादीला त्रास असला, जाच असला अन् आई– बाप म्हणाले की, नको जाऊ नांदायला, तर ती काय म्हणते? 'नाही बा, माझं कुंकू हाये ते. मेली तरी तिथंच मरीन.' तिच्या अंगावर जनता साडी- तीही बहुतेक दोन तुकडी. मुलांचं शिक्षण कंबर बांधून करते आणि त्या पतीला इतकं जपते की, मी म्हणते की 'काय या बाया! किती मन यांचं मोठं

आहे !' आता उच्च घराण्यातील पती बायकोंचे सगळे हट्ट, लाड पुरवतात. खेड्यातल्या आमच्या स्त्रीला ते काहीच मिळत नाही. तरी ती पतीवर इतकी खूष असते. सगळं समर्पण केलेलं असतं. संपूर्ण आयुष्य त्याच्या पायांवर घातलेलं असतं. याचं कारण भारतीय संस्कृती तिच्या अंगात भिनलेली आहे.

**शिल्पा मुंब्रिसकर**

हाच मुद्दा पुढे नेते. म्हणजे, लग्न झालं ना की नवऱ्याकडून काय अपेक्षा असतात याचा विचार करायचाच नाही. कुंकू भेटतं आणि आंगाला कपडा हीच अपेक्षा असते. मध्यमवर्गीय बाया जसं नवरा गंठण घालील, चांगल्या साड्या, घड्याळ घालील याचा विचार करतात, परंतु आमच्यात नवरा व्यवस्थित कसा नांदवील याचीच शंका असते.

**शंकरराव खरात**

जो समाज नवी मूल्यं स्वीकारतो, तो स्वतःचा मूळ गाभा व नवं स्वीकारलेलं असं दोन्ही घेतो. त्यामुळे त्याचं मध्यमवर्गीयीकरण होतं असं म्हणण्यापेक्षा, तो नवा समाज तयार होतो, असं म्हणणं योग्य.

अनेक दलित स्त्रिया प्राथमिक, हायस्कूल शिक्षिका अशा व्यवसायात तर होत्याच, पण आज कितीतरी स्त्रिया प्राध्यापिका, डॉक्टर्स झाल्या आहेत. डॉ. चंद्रिका पुरे या तर महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या संचालिका आहेत.

दलित स्त्री रूढीच्या विरुद्ध लढतेय. त्यादृष्टीने माझ्या जवळपासच्या, ओळखीच्या मुलींच्या संदर्भात घडलेले अनुभव कमालीचे बोलके वाटतात. त्यातील एका बी. कॉम्. झालेल्या मुलीचं तिच्या वडिलांनी लग्न ठरवलं. त्या मुलीच्या भावी पतीच्या बहिणीने स्कूटर मागितली, परंतु या मुलीने अशी मागणी करणाऱ्या स्थळाला ठाम नकार दिला. दुसरीही घटना अशाच स्वरूपाची आहे. एका दलित मुलीवर एका अदलित मुलाचे प्रेम बसले. त्यानंतर त्याला तिची जात कळली. त्यांचे हे बोलणे एका हॉटेलमधील फॅमिलीरूममध्ये चालू होते. त्याला तिची जात कळल्यानंतर त्याने लग्नाला नकार दिला– त्याचं हे वर्तन बघून तिला इतका संताप आला की, त्या भरात तिने त्याच्यावर चक्क चाकूचा वार केला आणि ती निघून आली. यातून एकूण सुशिक्षित दलित स्त्री बदलते आहे, हे आपल्या लक्षात येईल.

मात्र याचा अर्थ दलित समाजाचे मध्यमवर्गीयीकरण अगर ब्राह्मणीकरण होते आहे म्हणणे चुकीचे आहे, कारण ती एक सामाजिक प्रक्रिया आहे. मात्र हुंड्यासारख्या वाईट प्रवृत्ती दलित समाजात येत आहेत हे वरील उदाहरणातून दिसते.

याउलट, चळवळीतील अशिक्षित स्त्रीने विठ्ठलाची माळ टाकली आहे, ती पंढरपूर– आळंदीला जात नाही, बकरं, कोंबडं कापत नाही. एवढंच नव्हे, तर 'आम्ही बुद्ध' असं स्पष्टपणे ती सांगू शकते, हे फार मोठं असं तिचं मानसिक परिवर्तन आहे. तसंच, दलित स्त्रियांच्या संघटनांची 'आम्रपाली,' 'माया महिला

संघ' 'रमाबाई महिला संघ' ही नावंही बोलकी आहेत. त्यांच्या या संघटना आंबेडकरी प्रभावाखाली आहेत, हे यावरून स्पष्ट होतं. तसंच वैयक्तिक आयुष्यात उषा कोंडविलकरांसारखी स्त्री आपल्या भावांशीही झगडताना आपल्याला दिसते, हेही वैशिष्ट्यपूर्ण आहे.

जर धर्मांतरित दलित आपल्याला 'आंबेडकरी बौद्ध' म्हणून ओळखत असतील, तर जनगणतीमध्ये 'महाराष्ट्रात आठ लाख महार आहेत' अशी नोंद कशी काय होते ? ही नोंद करणाऱ्याच्या दृष्टिकोनाचा पडसाद आहे ! तसंच शाळेच्या दाखल्याबाबतही केलं जातं. खरं तर 'सप्रेम जयभीम' 'भगवान बुद्धाच्या कृपेवरून' असे शब्दप्रयोग करणाऱ्या महाराष्ट्रातील चर्मकार, दलित समाजात फार मोठा बदल होऊ लागला आहे– पण त्याची नीट नोंद घेतली जाते की नाही, ही शंका आहे.

महाडच्या सत्याग्रहापासून दलित स्त्री आघाडीवर आहे. १९४२ साली दलित महिला फेडरेशन स्थापन झालं. भूमिहीनांच्या सत्याग्रहात हजारो स्त्रिया आघाडीवर होत्या. त्यांपैकी अनेक स्त्रिया घरदार, संसार सोडून आघाडीवर राहिल्या.

आंबेडकर जयंतीच्यावेळी मुंबई अगर पुण्यातील त्यांच्या पुतळ्याजवळ उभं राहून त्या दिवशी येणारी दलित महिला पहा. तेव्हा तिचं खरं स्वरूप दिसेल.

आपल्या मुलांना शिक्षण दिलं पाहिजे ही तिची जिद्द आहे. त्याने नोकरी केली तर त्याचा संसार उभा राहातो, याची तिला जाणीव आहे. त्यासाठी वाटेल ते प्रयत्न करायला, झगडा द्यायला ती तयार आहे.

कौटुंबिक पातळीवर लढणारी ही दलित स्त्री अशिक्षित असो, सुशिक्षित असो, तिची आपल्या मुलांबाबतची जिद्द प्रामाणिक स्वरूपाची आहे.

शांताबाई दाणी, जिजाबाई गायकवाड (दादासाहेब गायकवाड यांच्या पत्नी) यांसारख्या दलित स्त्रिया राजकारणात आणि समाजकारणात आघाडीवर आहेत हे आपल्या लक्षात येते.

अशा या दलित स्त्रीचा, तिच्या व्यक्तिमत्वाचा, प्रतिभेचा विचार करणारी चर्चा घडवून आणल्याबद्दल 'स्त्रीवाणी' चे मी आभार मानतो.

अशा तऱ्हेने 'स्त्रीवाणी' या संस्थेतर्फे आयोजित केलेले अडीच दिवसांचे चर्चासत्र संपले. यानिमित्ताने मांडलेल्या विषयांवर सखोल चर्चा करण्यास हे अडीच दिवस तसे अपुरेच होते, परंतु त्यानिमित्ताने दलित स्त्रीसारख्या समाजातील अत्यंत उपेक्षित आणि शोषित घटकाकडे लक्ष वेधता आले, याचे समाधान तर वाटतेच. शिवाय नव्याने सुरू झालेला हा विषय पुस्तकरूपाने प्रसिद्ध केल्याने पुन्हा पुन्हा चर्चिला जाईल, अशीही अपेक्षा निर्माण झाली आहे. अर्थात या अपेक्षा पूर्ण करायच्या की नाही, हे दलित स्त्री आणि पर्यायाने दलित स्त्रीविषयी आस्था असणाऱ्या सुजाण व संवेदनाशील वाचकांनीच ठरवावयाचे आहे.

विभाग दुसरा

# शोधनिबंध


१) दलित स्त्रीची प्रतिमा— श्री. प्रल्हाद कुलकर्णी.

२) दलित स्त्रीची वास्तव प्रतिमा— श्रीमती शोभा भागवत.

३) दलित आत्मचरित्रातील स्त्री— श्रीमती सरिता पदकी.

४) बलुतं— स्त्रीजग, स्त्रीपुरुष नातं,
स्त्रीचं बदलतं स्थान— श्री. गो. म. कुलकर्णी.

५) दलित पुरुषांच्या आत्मचरित्रातील
स्त्री- विश्व— डॉ. नीलम गोऱ्हे.

६) दलित स्त्रीचा व तिच्याबद्दलचा
भाषाव्यवहार— श्रीमती आशा मुंडले.

७) दलित स्त्रीचं बदलतं स्थान— डॉ. गंगाधर पानतावणे.

१ दलित स्त्रीची प्रतिमा

प्रल्हाद कुलकर्णी
(पी. डी. कुलकर्णी)

* विकसित तंत्रज्ञान असणाऱ्या राष्ट्रातल्या स्त्रियांनाही गौण वागणुकीचे किंवा शोषणाचे प्रश्न पडतच असतील. तसेच भारतातल्या दलित स्त्रीच्या वाट्यालाही हे प्रश्न येतातच. शिवाय त्यात आणखीही जाचक भर असते.
* भारतात तरी 'दलित' या शब्दाने सामाजिक घडण आणि मूल्यव्यवस्था यांच्या बळावर ज्यांचे शोषण होते आणि दमन होते, आणि त्यामुळे ज्यांना बहिष्कृत आणि कष्टमय जीवन जगावे लागते, अशा साऱ्यांचा निर्देश होतो.
* काकासाहेब कालेलकर हरिजन, गिरिजन, आणि नारी-जन यांचा समावेश दलितांत करतात.
* स्त्रिया, पुरुष व मुले धरून दलितांची संख्या भारतीय लोकसंख्येचा अदमासे पाचवा हिस्सा भरते.
* या (मानहानीच्या) जीवनपद्धतीमुळे दलित स्त्री कणखरही होते आणि आश्चर्य वाटण्याइतकी लवचिकही बनते.
* तिची इच्छा असो–नसो, तिला त्यांची (नवऱ्याची) बिडीकाडी, दारूबाजी किंवा बाहेरख्यालीपणालादेखील पैसे पुरवावे लागतात.
* या अशा आयुष्याचे कुठल्या शब्दांत वर्णन करावे ? न टाळता येणाऱ्या कर्तव्यांची मालिका असे म्हणावे की सक्तमजुरीची जन्मठेप म्हणावे?
* स्वतः निवडलेल्या एखाद्या महान् कार्यासाठी आत्माहुती देणे हे गौरवाचे असते, पण लादलेले हौतात्म्य हा एक उःशापविरहित शापच म्हणावयास हवा.
* मुलींच्या बाबतीत शिक्षण बहुधा असंबद्ध किंवा निरुपयोगीच मानले जाते.
* इतरत्र अशा गरिबीची उदाहरणे आहेत की जिच्यात

घरातल्या सर्व स्त्रियांत मिळून एकच बरे वस्त्र असते आणि त्यामुळे एका वेळी एकच स्त्री घराबाहेर पडू शकते.

* दलित मुलीच्या वाट्याला दु:खाचा संसार आला तर तिचे दलित माहेर कुटुंब तिच्या बाबतीत अधिकच असहाय्य बनते.
* नवऱ्यांची अरेरावी दलित समाजापुरतीच मर्यादित आहे असे नाही.
* जीवनात येणाऱ्या सर्व संकटांना पुरून उरणारी प्रचंड शक्ती हिच्या अंगात येते तरी कशी?

## प्रास्ताविक

स्त्री, भारतीय स्त्री, भारतीय दलित स्त्री.

भारतातल्या आजपर्यंत केवळ उपेक्षितच राहिलेल्या नव्हे, तर ज्यांच्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीवही कुणाला नव्हती अशा जनतेच्या एका मोठ्या विभागाची प्राणभूत वैशिष्ट्ये या तीन शब्दांनी साकार होतात. वाच्यार्थाने आणि लाक्षणिक अर्थानेही तिचे वर्गीकरण "स्त्री" आणि "दलित" या दोन शब्दांखाली होत असे. मात्र यातल्या एकाही वर्गीकरणात तिचे स्वतंत्र व्यक्तिमत्व रेखाटले जात नव्हते किंवा तिच्या वेगळ्या गरजांचेही दर्शन होत नव्हते. भारताच्या विशाल आणि बहुरंगी लोकसंख्येच्या संदर्भात तिचे वेगळे आणि स्वतंत्र अस्तित्व लोपून गेले होते.

यामुळेच, दलित पुरुषांच्या आत्मचरित्रांतून दलित स्त्रीचे आयुष्य आणि तिची जीवनपद्धती यांचे, अगदी पूर्ण चित्रपटाइतके जरी नाही तरी, चांगल्या माहिती-पटाएवढे तरी चित्रण पहायला मिळेल, अशी अपेक्षा ठेवणे अधिक उचित ठरते. ही आत्मचरित्रे दलित पुरुषांची असल्यामुळे त्यातल्या चित्रपटाची लांबी प्रामुख्याने त्यांच्या आयुष्यांच्या चित्रणाला वाहिलेली असेल हे अर्थातच गृहीत धरणे आले. या पुरुषांच्या जीवनाच्या चित्रणात स्त्रिया येतात त्या त्याचा अंगभूत, पण दुय्यम व प्रासंगिक भाग बनूनच.

प्रारंभीच हे सांगून टाकलेले बरे की, दलित पुरुषांच्या आत्मचरित्रांतून दलित स्त्रियांचे चित्रीकरण पहाताना येणाऱ्या वस्तुनिष्ठ मर्यादांखेरीज इतरही मर्यादा या निबंधाला आहेत. याचा लेखक पुरुष आहे. तो दलितेतर समाजातला आहे. त्याचे आयुष्य पांढरपेशी आहे– या सर्व गोष्टींमुळे त्याच्या दृष्टीला आणि विचारांना स्वत:च्या समज– गैरसमजांच्या रंगाची छटा येणे हे अस्वाभाविक म्हणता येणार नाही. पण मी फक्त "समज–अपसमजाच्या रंगाची छटा" म्हटलं, पूर्वग्रहाचा रंग नाही म्हटलं, कारण या निबंधाच्या लेखकाचा समाजविषयक शास्त्रांचा थोडाफार अभ्यास आहे. आणि दुसरे म्हणजे हा निबंध लिहिताना स्वत:चे पूर्वग्रह शक्यतो बाजूला ठेवण्याचा त्यानं जाणीवपूर्वक प्रयत्न केलेला आहे.

### तीन वैशिष्टचे

या निबंधाच्या सुरुवातीच्या ओळीतच उल्लेखिलेल्या तीन वैशिष्टचांवर प्रकाश टाकला तर ज्या विस्तृत कॅनव्हासवर दलित स्त्रियांच्या प्रतिमा रेखाटायच्या आहेत त्याची कल्पना येऊ शकेल. स्त्री असणं– मानवाची मादी असणं– हे भारतीय दलित स्त्रीचं सुद्धा एक मूलभूत, जीवशास्त्रीय वैशिष्टच आहे–या विधानातून वरवर निघणाऱ्या अर्थापेक्षा पुष्कळ खोल अर्थ त्याला आहे. तिचं जीवननाटक खेळलं जातं हे याच वैशिष्टचाच्या रंगमंचावर. एवढंच नव्हे, तिचं जीवन मर्यादित, वलयांकित करून टाकणारं असं हे सर्वाधिक प्रभावशाली वैशिष्टच आहे. 'बाई गं-तुझी शरीरवैशिष्टचं हीच तुझी नियती ' हे वचन दलित स्त्रीच्या बाबतीत जितकं खरं ठरतं तितकं अन्य कुठल्याही बाईच्या बाबतीत ठरत नाही. जीवरसायनशास्त्रांचे नियम दलित स्त्रीच्या जीवनात इतर स्त्रीच्या जीवनातल्यापेक्षा अधिक भयंकर हैदोस घालतात. कारण पुरुषाची भोगदासी होणे आणि संततीची प्रसूती आणि संगोपन करणे यांवर ताबा ठेवण्याचे जीवशास्त्रीय व इतर संबंधित ज्ञान तिच्याजवळ नसते. आणि असेल ते तुटपुंजे ज्ञान वापरण्यास स्वातंत्र्य आणि साधनसामग्रीही नसते. या भूमिकांच्या कठोर आघातांच्या जखमांनी ती जन्मभर विव्हळत रहाते. बाकीच्या स्त्रियांच्या जीवनात याच भूमिकांमुळे सार्थकतेचा व निर्मितीच्या आनंदाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. दलित स्त्रीच्या वाटचाला मात्र या दोन्हींचा नगण्य अशा अंश येतो.

दलितत्वाप्रमाणेच भारतीयत्व हेही दलित स्त्रीच्या बाबतीत असेच अर्थपूर्ण ठरणारे आहे. इतर राष्ट्रांतल्या– विशेषतः विकसित तंत्रज्ञान असणाऱ्या किंवा श्रीमंत राष्ट्रांतल्या स्त्रियांनाही गौण वागणुकीचे किंवा शोषणाचे प्रश्न पडतच असतील. तसेच भारतातल्या दलित स्त्रीच्या वाटचालाही हे प्रश्न येतातच. शिवाय त्यात आणखीही जाचक भर असते– पाचवीला पुजलेली वंचितता, कायमची वखवख, पिचवून टाकणारे दारिद्रच, ग्रामीण अर्थव्यवस्थेकडे झालेले दुर्लक्ष आणि शहरांची झालेली योजनाहीन वाढ, अंधश्रद्धा आणि प्रारब्धवादाची, करणीधरणीची भारतीय लोकमानसाला लागलेली ढापणे, इत्यादी. दलित स्त्रीच्या भारतीयत्वामुळे तिच्या आयुष्यातील दुःखात भर घालणाऱ्या ह्या काही गोष्टी आहेत. या गोष्टी इतर देशातील स्त्रियांच्या वाटचाला इतक्या एकजुटीने येत नाहीत. आता या गोष्टी दलित पुरुषांच्याही वाटचाला येतातच, पण त्यामुळे होणाऱ्या जखमा दलित स्त्रीच्या बाबतीत अधिक खोल असतात.

भारतात राहणाऱ्या प्रत्येक माणसाला भारतीय म्हणावे लागते हे खरे असले तरी, भारतीय असणे हे दलित स्त्रीच्या बाबतीत सुऱ्याची तीक्ष्णता धारण करते. आपली परवानगी घेऊन असंही म्हणता येईल की, "भारतीय" हे दलित स्त्रीचे विशेषण न होता क्रियाविशेषण होते.

शिवाय त्या दलितही असतात. "दलित" या शब्दाची काही प्रमाणभूत, सर्वांना मान्य असणारी व्याख्या आहे की नाही, हे सांगणे कठीण आहे. केवळ पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांपुरताच हा शब्द सीमित राहिलेला नाही. माझ्या समजुतीप्रमाणे, भारतात तरी "दलित" या शब्दाने सामाजिक घडण आणि मूल्यव्यवस्था यांच्या बळावर ज्यांचे शोषण आणि दमन होते आणि ज्यामुळे त्यांना बहिष्कृत आणि कष्टमय जीवन जगावे लागते, अशा साऱ्यांचा निर्देश होतो असे मी मानतो. सुप्रसिद्ध गांधीवादी लेखक आणि सामाजिक कार्यकर्ते काकासाहेब कालेलकर "हरिजन, गिरिजन आणि नारीजन" या तिघांचा समावेश दलितांत करीत. अनुसूचित जाती, जमाती आणि स्त्रिया असे त्यांना भारतीय संविधानात म्हटलेले आहे. भारतीय संविधानात आणखीही एका समूहाचा उल्लेख आहे, तो इतर मागास वर्गाचा. या वर्गात ऋतुमानाप्रमाणे या वस्तीतून त्या वस्तीकडे जाणाऱ्या मानवी समुदायांचा समावेश होतो. यांना कायमचे असे वसतिस्थान नसते. दलित या संज्ञेने या सर्वांचा उल्लेख केला जातो असे मी मानतो. स्त्रिया, पुरुष व मुले धरून ही दलितांची संख्या भारतीय लोकसंख्येचा अदमासे पाचवा हिस्सा भरते. ऐतिहासिक संदर्भ आणि वर्तमानकालातील वापर या दोन्हींमुळे, विशेषत: दलितांच्या मनात, दलित या शब्दाच्या उच्चाराबरोबर ज्वलंत भावनांचा प्रभावी उद्रेक होतो. दलित लोकसंख्येतील स्त्रियांच्या संदर्भात या संज्ञेला प्राप्त होणारा विशिष्ट अर्थ समजावून घ्यायचा असेल तर त्या अर्थाची दाहकता कितीतरी पटींनी वाढवावी लागेल. काकासाहेब हरिजनांना दलित म्हणत ते काही विशिष्ट कारणांमुळे, गिरिजनांना दलित म्हणत ते वेगळ्या कारणांमुळे आणि स्त्रियांना दलित म्हणत ते या दोहोंहूनही निराळ्या कारणामुळे. पण दलित स्त्रियांच्या बाबतीत या तिन्ही गटांतील जवळजवळ सगळीच कारणे तीक्ष्णपणे एकवटतात आणि त्यामुळे दलित स्त्रियांचे आयुष्य दलित पुरुषांच्या आयुष्यापेक्षा कितीतरी अधिक हीनदीन केले जाते, एवढाच एक मुद्दा मला इथे मांडायचा आहे.

एवंच, भारतीय दलित स्त्री म्हणजे भारतीय जनतेचा सर्वाधिक शोषण आणि दमन झालेला विभाग आहे. समाजाच्या शिडीतली सगळ्यात खालची पायरी ती आहे. इतकी खालची की गरिबांनी पाळल्या–पोसलेल्या गाईला किंवा शेळीला देखील तिच्या वरचे स्थान असते की काय अशी शंका यावी!

## दलित स्त्रीच्या मनाची जडणघडण

दलित स्त्रीच्या मनाची जडणघडण कशी होते ? कशाकशाने होते ? या प्रश्नांची नेमकी उत्तरे देण्याइतका मजकूर आपण निवडलेल्या दलित पुरुषांच्या पाच आत्मचरित्रांतून मिळण्याजोगा नाही. तरी देखील त्यात ठिकठिकाणी विखुरलेल्या, बहुश: संदिग्ध असलेल्या, पुराव्यांवरून, आपल्याला तिच्या मनावरील प्रमुख प्रभाव आणि त्याची काही ढोबळ वैशिष्ट्ये शोधून काढण्याचा प्रयत्न करणे

शक्य आहे.

भारतातील सर्व पारंपरिक संस्कृतीत रुजलेली, मुलांमुलींना वेगवेगळ्या तऱ्हांनी वाढविण्याची पद्धती दलित समाजातही चालू आहे. आपण अगदी नकोशा जरी नसलो, तरी आपण मुलांच्या मानाने दुय्यमच आहोत ही भावना तिच्या मनात रुजत जाते. मुलग्यांच्या बरोबर तुलना होऊन मुलींना गौण ठरवल्याने त्यांच्या मनात न्यूनगंड निर्माण होतो. यावर सिमेंटचा थर बसतो निरनिराळ्या संस्कार-कृत्यांच्या वेळी. एकूण या दोन्हीतही पुरुषाचं श्रेष्ठत्व आणि अधिकारीपण गृहीत धरलेलं असतं. शिवाय, सगळे दलित कुटुंबच खरे म्हणजे वंचित आणि दरिद्री असताना त्यातल्या स्त्रियांना त्यातल्या तुटपुंज्या संधी—सवलती, इतकेच काय, दैनंदिन गरजेच्या गोष्टीही, इतर सर्वांपेक्षाही कमी मिळतात. त्यांच्या वाट्याला उष्टं अन्न, पुरुषांच्या वाट्यापेक्षा हलक्या प्रतीचं आणि कमी प्रमाणात शिल्लक रहातं. विश्रांती कधीकाळी मिळालीच तर तीही पुरुषांपेक्षा कमी वेळ असायची आणि कपडे जुनेपाने मिळायचे. मुलींना शाळेत पाठवायची किंवा शिक्षण द्यायची गरजच काय असा सामान्य विचार. लग्नातही मुलींची बाजू नेहमीच आणि नक्कीच पडती. बाकीच्या जातींतूनही पत्नीला दुय्यम स्थानच देण्याची परंपरा असली तरी पारंपरिक दलितांच्या समाजात मात्र पत्नीला वहाणेचे किंवा पायपुसण्याचेच स्थान मानले जात असल्याचे उल्लेख दुर्मिळ नाहीत. केवळ शारीरिक व सांसारिक काबाडकष्टापुरताच तिचा उपयोग.

नवऱ्याकडून शिवीगाळ, घालूनपाडून बोलणे, एवढेच काय, मारहाणही दलित स्त्रीच्या वाट्याला थोडी अधिकच येते. गावातील प्रतिष्ठित जातीच्या लोकांकडून आणि लहानलहान स्थानिक सरकारी अधिकाऱ्यांकडूनही तिच्या या मानहानीत भरच पडत असते. उदा- ' उपरा ' मधे आईला चोरीबद्दल पकडणे.

या जीवनपद्धतीमुळे दलित स्त्री कणखरही होते आणि आश्चर्य वाटण्याइतकी लवचिकही बनते. भावनिक आणि शारीरिक मारहाण सोसण्याइतकी कणखर आणि जीवनभर येणाऱ्या भयंकर संकटांना तोंड देण्याइतकी लवचिक.

जननक्षम वय चालू असेतो लादली जाणारी गर्भारपणे आणि बाळंतपणे, कधीच नीट न भरली गेलेली पोटाची खळगी, आणि खटाळभर पोरांना वाढवताना खर्ची पडणारी शारीरिक आणि भावनिक शक्ती— यामुळे ती शरीराने आणि मनानेही पोखरली जाते. याउप्पर दिवस उजाडल्यापासून ते रात्री उशीरा अंथरुणाला पाठ लागेपर्यंत पाठीचा कणा मोडणारी कामे तिला करावी लागतातच. यात भर पडते ती तिच्यावर अर्थार्जनही करण्याची जबाबदारी असते त्याची. अर्थार्जन करून नवऱ्याच्या मिळकतीत तिला भर घालावी लागते. कधीकधी तर एकटी तीच मिळवती असते. तिच्या नवऱ्याचे (किंवा वडिलांचे) उत्पन्न अपुरे असते, अनियमित असते किंवा कधीकधी त्याचा अभावही असतो! कसेही असले तरी भल्यामोठ्या कुटुंबाचे पोशिंदेपण तिला घ्यावे लागते. त्यातून तिची सुटका नसते. हे सर्व पुरेसे नसते

म्हणूनच की काय, तिला नवऱ्याची किंवा घरातल्या इतर पुरुषांची महागडी व्यसनेही पुरवावी लागतात. तिची इच्छा असो किंवा नसो, तिला त्यांची विडीकाडी, दारुबाजी किंवा बाहेरख्यालीपणाला देखील पैसे पुरवावे लागतात.

दलित स्त्रीचे जीवन हे असे कष्टाचे, मनाचा आणि शरीराचा कोंडमारा करणारे असते. तेव्हा साहजिकच प्रश्न असा पडतो की, या अशा जीवनाला तोंड देण्याची इच्छाशक्ती, सामर्थ्य आणि तकवा ती आणते तरी कुठून ? सर्वसामान्य माणसाला जी शाबासकीची गरज असते ती तिची कधीच पुरी होत नाही. मग कुणी तिची काळजी घेणे, प्रेम किंवा आदर दाखवणे तर दूरच. जीवनातले भौतिक यश तर तिच्यापासून नेहमीच लांब असते. या अशा आयुष्याचे कुठल्या शब्दांत वर्णन करावे ? न टाळता येणाऱ्या कर्तव्यांची मालिका असे त्याला म्हणावे की, सक्तमजुरीची जन्मठेप म्हणावे ? तिच्या आयुष्याचे दुःख कमी करणाऱ्या काही गोष्टी आहेत का ? निरपेक्ष कष्टांच्या या आयुष्याला काही भरपाई आहे का ?

एक काळ असा होता की, भारतातल्या इतर समाजातल्या बहुसंख्य स्त्रियांचेही आयुष्य असेच होते. गडकऱ्यांच्या 'एकच प्याला' मधल्या सिंधूला आदर्श भारतीय नारी समजत असत. किंबहुना, या अशा जिण्याला साहित्यात संतांच्या हौतात्म्याचा गौरव दिला जात असे. पण मानवी हक्कांची, आणि विशेषतः स्त्रियांच्या हक्कांची, जाणीव जशीजशी वाढली तसा हा प्रश्न विचारला जाऊ लागला की, या अशा आत्मविलोपी हौतात्म्याने स्त्रीने स्वतःचा गौरव होतो असे मानावे का ? उत्तरपक्षी, स्वतःच्या इच्छा, आशा आणि स्वप्ने पुरी करण्याची संधी व समाधान मिळणे ही तिच्या आयुष्याच्या यशाची, समाधानाची, निदान अधिक सार्थकतेची खूण मानावी इतपत परिवर्तन होऊ घातले आहे. स्वतः निवडलेल्या एखाद्या महान् कार्यासाठी आत्माहुती देणे गौरवाचे असते, पण लादलेले हौतात्म्य हा एक उःशापविरहित शापच म्हणावयास हवा.

## भूमिका आणि नाती

वाढत्या वयाबरोबर दलित स्त्रीच्या जगाचे रंगही बदलत जातात. अर्थात ते बहुधा काळे आणि अंधारे असतात.

कुणाची तरी मुलगी म्हणून ती जन्म घेते आणि आपण आईवडिलांना नकोशा आहोत किंवा मुलांपेक्षा गौण आहोत हे तिला उमगते. (याला अपवाद फक्त काही मातृसत्ताक समाजांचा किंवा स्त्रियांच्या गाण्यानाचण्यावर पोट भरणाऱ्या जमातींचा.) ती जर सगळ्या मुलांत मोठी असेल तर तिला घरगुती कामांत आईला मदत करावी लागते किंवा लहान भावंडांचा सांभाळ करावा लागतो आणि अशा तऱ्हेने ती स्वतःचे मूलपण हरवून बसते. तिने शाळेत जाण्याची चैन करणे हे घरच्या लोकांना परवडणारे नसते. एवढेच नव्हे, तर उगीच कशाला उपयोगी वेळ वाया घालवायचा, असेही त्यांना वाटत असते. मुलींच्या बाबतीत शिक्षण बहुधा 'असंबद्ध'

किंवा 'निरुपयोगी'च मानले जाते. (१९५१ साली भारताला स्वतःची घटना मिळाली आणि सर्व भारतीयांना प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे असावे, असे ठरले. सर्व भारतीयांना निदान प्राथमिक शिक्षण मिळावे असा प्रयत्न चालू आहे.) ज्या दलित कुटुंबांनी मुलींच्या शिक्षणाच्या कल्पनेचा स्वीकार केला आहे, त्यांनादेखील आपली सर्व मुले शाळेत पाठवणे परवडण्याजोगे नसते. कारण वह्या, पुस्तके, कपडे यांचा खर्चदेखील त्यांना झेपत नाही. शाळेतून कुणाला काढायचे आणि कुणाला ठेवायचे असा प्रश्न जेव्हा उपस्थित होतो तेव्हा अर्थातच, फुसक्या कारणावरून देखील, मुलींचा नंबर पहिला लागतो. या पाच आत्मचरित्रांतून जरी तसा उल्लेख नसला, तरी इतरत्र अशा गरिबीची उदाहरणे आहेत की, जिच्यात घरातल्या सर्व स्त्रियांत मिळून एकच चांगले वस्त्र असते आणि त्यामुळे एका वेळी एकच स्त्री घराबाहेर पडू शकते !

दलित मुलगी वयात आली की आसपासच्या बुभुक्षित पुरुषांच्या नजरा तिच्यावर रेंगाळू लागतात. खरे पहाता, समाजरचनेच्या दृष्टीने ती इतर दलितांसारखीच अस्पृश्य असते, पण ती स्त्री असते आणि म्हणून तिच्या बाबतीत ही अस्पृश्यता कोणाच्या आड येत नाही. तिच्या शरीराची विक्री तरी होते किंवा तिचा उपभोग एखादा खलपुरुष स्वतः तरी घेतो. दारिद्र्य आणि सामाजिक वंचितता या दोन गोष्टींचा भयंकर संगम झाल्याने आपल्या घरातल्या मुलीवर होणाऱ्या अत्याचाराच्या संदर्भात दलित आईवडिलांची प्रतिकारशक्ती क्षीण झालेली दिसते.

किंबहुना, कधीकधी खुद्द मुलीच्या गरजू बापानेच एखाद्या माणसाशी तिचे लग्न लावून द्यावे आणि तो फसव्या निघून त्याने तिला वेश्याबाजारात नेऊन विकावे, अशीही उदाहरणे घडलेली आहेत.

एखाद्या मुलीचे चांगल्या मुलाशी रीतसर लग्न झाले तरी तिच्या नवऱ्याने किंवा सासरच्या इतर माणसांनी तिचा छळ केला तर तिचे आईवडील काहीही करू शकत नाहीत. किंबहुना, तिचे भले व्हावे अशीच त्यांची इच्छा असली तरी एकदा लग्न झाले की 'मुलीची जागा तिच्या संसारातच असली पाहिजे, मग तिचे काहीही होवो' अशीच त्यांची धारणा असते. मात्र ही धारणा फक्त दलित समाजापुरती मर्यादित आहे असे मात्र नव्हे, तर हे इथे नोंदवायला हवे की, परंपरा मानणाऱ्या बाकीच्या जातींतूनही ही श्रद्धा आचारात आणलेली आढळते. मात्र इथे विचारात घ्यायचा मुद्दा हाच की, एखाद्या दलित मुलीच्या वाट्याला दुःखाचा संसार आला तर तिचे दलित माहेर कुटुंब तिच्या बाबतीत अधिकच असहाय्य बनते.

## बहीण

बहिणी म्हणून दलित मुलींचे जीवन कसे असते? या आत्मचरित्रांच्या वाचनाने मनावर ठसा उमटतो तो असा की, मुलगी किंवा बायको म्हणून दलित स्त्रीला जी वागणूक मिळते, तिच्यापेक्षा बहीण म्हणून तिला अधिक नर्माईची वागणूक मिळते.

पत्नी म्हणून त्यांना सतत काबाडकष्टाचे आणि ताणतणावाचे आयुष्य जगावे लागते, नवऱ्याच्या आणि, जवळ रहात असल्यास, त्याच्या नातेवाईकांच्या इच्छा आकांक्षांना पुरे पडावे लागते. पण बहीण म्हणून तिला कमी ताणाचे आयुष्य वाटचाला येते. अर्थात यामुळे थोडेसे आश्वासन मिळत असले तरी बहीण–भावांच्या नात्यातून फार मोठे प्रेम, फार मोठे साहचर्य किंवा हवा तेव्हा मिळणारा भावनिक आधार तिला लाभतोच असे दिसत नाही. हे नाते अगदीच भावनारहित किंवा शुष्क नसले तरी ते फारसे उल्हासकारक किंवा खात्रीचा आधार देणारेही नसते. दलित कुटुंबात रहाणाऱ्या बहीण–भावंडांच्या वाटचाला जे दारिद्र्य, वंचितता, अनिश्चितता आणि चिंता येते त्याचाही कदाचित् हा परिणाम असावा. मध्यमवर्गीय कुटुंबातील बहीणभावंडांना जे आर्थिक स्थैर्य असते, शिक्षणामुळे जी समज आलेली असते आणि त्यांना जी निश्चिन्तता असते, त्यामुळे त्यांच्या नात्याला एक उल्हासाचा रंग प्राप्त होण्याची परिस्थिती असते.

## पत्नीची भूमिका

दलित स्त्रियांच्या वाटचाला येणारी ही बहुरूपी भूमिका त्यांच्याकडून सर्वाधिक कष्टाची मागणी करणारी आणि मानसिक तणाव निर्माण करणारी असते. इतर समाजातील पत्नीच्या नात्यापेक्षा हे नाते नुसतेच अधिक अवघड नसते, तर त्याचे स्वरूप जात्याच वेगळे असते.

दलित स्त्रीला पार पाडाव्या लागणाऱ्या जबाबदाऱ्यांची यादी चांगली लांबलचक आणि भीतिप्रद असते. दळणे, स्वैपाकपाणी, धुणीभांडी, काटक्या गोळा करणे, पाणी आणणे, पोरांना भरवणे इतक्या गोष्टी करायला ती उठते ती दिवस उजाडायच्या आत आणि अंथरुणाला पाठ टेकवते ती रात्री बऱ्याच उशीरा. पण ही सारी कामे कष्टाची असली तरी ती करण्यातही गृहिणीचे समाधान असते. पण दलित पत्नीच्या आयुष्याला तलवारीच्या पात्यावर चालण्याची पातळी देते ते या नात्याला असलेले एकेरीपण. पतिपत्नीच्या नात्याला सहकार्याचे स्वरूप क्वचित, संकटप्रसंगी येते. दुष्काळात उपासमार होणे, सावकाराने घरावर जप्ती आणणे अशा प्रसंगी ते दिसते. किंवा मुलांच्या हिताहिताच्या जपणुकीचा प्रसंग आला म्हणजे ते दिसते. एरवी मुलांना लावायला हक्काचे आणि कायदेशीर नाव देण्यापलिकडे दलित स्त्रीचा पती सहसा स्वतःला कुठेही बांधून घेत नाही, असेच सर्वसाधारणपणे दिसते. तो स्वतः पुरेसे मिळवत नसेल किंवा अजिबातही कमाई करीत नसेल अशा वेळी कुटुंबपोषणाची, जरूर पडली तर सगळी, जबाबदारी पत्नीला घ्यावी लागते. एखादा स्वतंत्र धंदा करून किंवा मोलाचे काम करून कमाई केली तरी तिला घरकामाच्या रगाड्यातून थोडीही मोकळीक मिळत नाही, हे वेगळे सांगण्याची जरूर नाहीच. घरातली अगर बाहेरची, झेपतील तेवढी, बारकीसारकी कामे मुले करून देतील तेवढीच तिला सुटका किंवा विसावा.

या एकतर्फी जबाबदाऱ्या पुरेशा नसतात म्हणूनच की काय, ती बिचारी जवळजवळ कायम गर्भारशी किंवा बाळंतीण असलेली दिसते. तिचा छळ करून, तिच्या कमाईतून पैसे पळवून घरातले पुरुष स्वतःची विडीकाडीची, दारूची किंवा इतर चैनीची देखील तलफ भागवतो. या सगळ्यातून भांडणे निघतात, शिवी-गाळीला ऊत येतो, अपमान आणि बेसुमार मारहाणही होते. मुलांना, तिच्या शेजाऱ्यांना, सासरच्या माणसांना किंवा अगदी परक्या माणसांना देखील अगतिकपणे हे सारे पहाण्याखेरीज दुसरे काहीही करता येत नाही. काही दलित समाजांत लग्न-बन्धन हे तेवढेसे दृढ मानत नाहीत. अशा समाजातल्या देखील स्त्रिया आपल्या रिकामटेकड्या नवरोबांनी केलेला छळ आणि लुबाडणूक सोसून आपल्या संसारातल्या वेगवेगळ्या कष्टांच्या जबाबदाऱ्या पार पाडत रहातात हे खरोखर चमत्कार वाटण्याजोगे आहे. या स्त्रिया दुबळ्या असतात असेही म्हणता येत नाही. किंबहुना, काही काही वेळा तर असेही आढळून येते की, एखाद्या दलित स्त्रीला आपल्या मारकुट्या, व्यसनी नवऱ्यापासून वेगळे व्हायचा सल्ला तिच्या हितचिंतकांनी द्यावा आणि तिने तो धुडकावून लावावा. का, तर म्हणे, 'काही झालं तरी तो माझा नवरा आहे आणि माझ्या पोरांचा बाप आहे.' त्यांच्या कल्पनेतला आदर्श नवरा जरी जुलमी नसला, तरी वेळप्रसंगी थोडे गैर वागणारा, नेहमी पिऊन तर्र होणारा, दारूच्या नशेत मारहाण करून शुद्धीवर आल्यावर पश्चात्ताप करणारा, क्वचित माफी मागणारा नवरा हे त्यांच्या जीवनातले एक वास्तव आहे. काही स्त्रिया तर (आणि यात शिक्षित मध्यम आणि उच्चवर्गीय स्त्रियाही आल्या) अगदी स्पष्टपणे बोलून दाखवतात की, आमचे नवरे आमच्यापेक्षा वरचढ असलेलेच आम्हाला आवडतात. अर्थात ही भूमिका विवाद्य असू शकते.

जेथे दलित पुरुषाने दलितेतर स्त्रीशी लग्न केलेय तेथे मात्र पतिपत्नीसंबंध अगदी वेगळे असल्याचे दिसून येते. असे लग्न हे अर्थातच पारंपरिकरीत्या दाखवून-पाहून ठरवलेले नसते. ज्यांना सामान्यपणे प्रेमविवाह म्हटले जाते असे हे विवाह असतात. अशा विवाहांत काही गोष्टी सर्वसामान्यापणे आढळतात. उदा. वधूने आणि वराने परंपरा झुगारलेली असणे, आपापल्या कुटुंबियांचा विरोध असणे, दोघांनाही सामान्यांपेक्षा थोडे वरच्या दर्जाचे शिक्षण मिळालेले असणे आणि दोघांनी किंवा दोघांपैकी एकाने जातीचा परंपरागत व्यवसाय सोडून एखादा पांढरपेशा धंदा किंवा नोकरी पत्करलेली असणे. अशा उदाहरणांमध्ये पतिपत्नीसंबंध हे स्नेहल आणि जिव्हाळ्याचे होतात. निदान सुरुवातीला तरी ते तसे असतात. पतीचा सामाजिक आणि आर्थिक दर्जा सुधारल्यानंतरदेखील ते तितकेच प्रेमाचे राहातात की नाही, कोण जाणें? कारण नवऱ्यांची अरेरावी दलित समाजापुरतीच मर्यादित आहे असे नाही.

### आई म्हणून

आईची भूमिका ही दलित स्त्रीच्या आयुष्यातील केंद्रीय भूमिका होय. ति

बाकीच्या भूमिकांकडे वेगवेगळे किंवा एकत्रितपणे पाहिले तर तिचे आयुष्य म्हणजे दु:खाची अनंत गाथाच असावी असे वाटते. पण हृचा स्त्रीच्या बाबतीत जे सुदृढ जीवनेच्छेचे आणि त्या जीवनेच्छेला शोभेलशा शक्तीचे दर्शन घडते, ते आश्चर्यचकित करणारे आहे. जीवनात येणाऱ्या सर्व संकटांना पुरून उरणारी प्रचंड शक्ती हिच्या अंगात येते तरी कशी? हिचे आयुष्य नुसतेच शापित आहे का? त्याला उ:शाप नाहीच का? तिला समाधान, आधार आणि आनंद अखेर कशातून मिळतो? आईच्या या भूमिकेतच कदाचित तिला उत्साह आणि निर्मितीचा आनंद देणारा अदृश्य उगम आहे का? दारिद्र्य, अशवतपणा आणि सामाजिक वंचितता यांनी भरलेल्या तिच्या आयुष्यावर अतिशय अवघड असे मातृत्वाचे ओझे लादले जात असले, मुलांना जन्म देणे, त्यांना वाढवणे आणि मोठी करणे हे महान कठीण कर्म असले, तरी यातून तिला जे जीवशास्त्रीय आणि भावनिक समाधान मिळत असेल तेच तिच्या जीवनाचा आधार बनत असावे असे वाटते. या पाचही आत्मचरित्रांतल्या मातांच्या बाबतीत प्रचंड अडीअडचणींना तोंड देऊन, मुलांना वाढवून, सामर्थ्यवान करण्यात त्यांचा दृढनिश्चय आणि चिकाटी दिसून येते. केवळ बुद्धीने स्वीकारलेले कुठलेही तत्त्वज्ञान कुठल्याही व्यक्तीच्या, एवढ्या संकटांनी भरलेल्या, आयुष्याला पुरणारे नाही. मातृत्व हेच दलित स्त्रीला सामर्थ्य देते, असे म्हणणे जरी पूर्णसत्य नसले, तरी त्यात बराच अर्थ आहे.

'दलित स्त्रीच्या आयुष्याला कणा मिळतो तो तिच्या मातृत्वभावनेतून' हे विधान कदाचित् स्त्रीस्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्यांची कडक टीका ओढवून घेणारे होईल. निसर्ग जे करतो त्याला पुरुषी अहंकार साथ देतो आहे असे ते म्हणतील. पण मी इथे गुन्हा नाकबूलच करणार आहे, कारण दलित समाजातील आईवर येणारी कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या या तिच्या दुसऱ्या कुठल्याही भूमिकेतल्यापेक्षा कमी आहेत, असे मी म्हटलेलेच नाही. किंबहुना, मी वर म्हटलेच आहे की, दलित स्त्रीने एखादे वेळी कमाई नाही केली तरी आपले सगळे कुटुंब एकत्र ठेवून त्याचा प्रतिपाळ करण्याची महान जबाबदारी ती आयुष्यभर करतच असते.

आपल्या मुलांबद्दल दलित स्त्रीला जी माया आणि प्रेम वाटते, ते जीवशास्त्रीय आहे असे त्याचे स्पष्टीकरण देता येईल. पण तिची अगदी वाया गेल्यासारखी वाटणारी मुलेसुद्धा तिच्याबद्दल जो आदर आणि प्रेम दाखवतात– दैनंदिन जीवनातल्या बारीकसारीक गोष्टींतून किंवा आईवर येणाऱ्या संकटांच्या वेळी ती जेव्हा भीतिग्रस्त होत असेल तेव्हा– ते तिच्या, एरवी अतिशय उद्वेगकारक असणाऱ्या, आयुष्याला दिलासा देताना दिसतात.

## दलित पुरुषांच्या आयुष्यात इतर अनेक नात्यांनी येणाऱ्या दलित स्त्रिया

दलित पुरुषांच्या आयुष्यातला हा एक बहुरंगी भाग आहे. नातेवाईक, मैत्रिणी, शेजारणी, सहकारिणी किंवा ओळखदेख नसलेल्या परक्या स्त्रिया अशा स्त्रियांच्या

अनेक भूमिका आणि नाती दिसतात. या सर्वांच्या संदर्भात दलित पुरुषांच्या वागण्याची काही विशिष्ट तऱ्हा असते, असे म्हणता येणार नाही. फार तर एवढे म्हणता यईल की, कुटुंबातल्या स्त्रियांपेक्षा या स्त्रियांशी त्यांचे वागणे परकेपणाचे आणि तिऱ्हाईतपणाचे असणे स्वाभाविक आहे. किंबहुना, कुटुंबाबाहेरच्या स्त्रियांचे उल्लेख ज्या काहीशा ग्राम्य भाषेत केले जातात, तिच्यावरून एकूण स्त्रीजातीबद्दलच या पुरुषांच्या मनांत कितपत आदर आहे, असा प्रश्न उद्‌भवतो. कदाचित असेही असेल की, सर्व वयाच्या पुरुषांच्या बोलण्यात लैंगिक संबंधावर आधारलेली शब्दावली इतकी तोंडी बसलेली असते, की त्यामुळे त्यांचा स्त्रियांचा अपमान किंवा अनादर करण्याचा हेतू नसूनही असा भास मात्र होतो.

दलित स्त्री नणंदेच्या, सासूच्या अशा भूमिकेत गेली की, इतर समाजातल्या स्त्रियांइतकीच छळवादी होते, हाही सर्वसामान्य अनुभव आहे.

## दलितेतर समाजातल्या स्त्रिया

बहुसंख्य दलित जातीजमातींत स्त्रीपुरुष मैत्रीच्या नात्याने सामाजिकरीत्या मिसळत नाहीत. त्यामुळे दलितेतर समाजातील स्त्रियांभोवती दूरतेचे आणि अद्‌भुततेचे वलय असल्यासारखे दलित पुरुषांना वाटते. (किंबहुना निसर्गाची व्यवस्थाच अशी आहे की, सर्वच स्त्रीपुरुषांना एकमेकांभोवती अद्‌भुततेचे वलय आहे असे वाटते.)

जसजशी शहरीकरणात, सामाजिक आणि व्यावसायिक अभिसरणात, शाळा कॉलेजांतील व कारखान्यांतील एकत्र सहवासात वाढ होते आहे, सिनेमा आणि दूरदर्शन या माध्यमांचा प्रसार वाढतो आहे, तसतसे हे दलित पुरुष आणि दलितेतर स्त्रिया यांतील अंतर कमीकमी होते आहे आणि गूढतेचे वलयही विरू लागलेले आहे. पण अजूनही दलितेतर स्त्रिया या सामाजिक आणि आर्थिक दृष्टया उच्च स्तरातून आलेल्या असल्यामुळे त्या नाजुक, नीटनेटक्या, नटलेल्या, छान–छान वस्त्रांनी व भूषणांनी अलंकृत झालेल्या व विविध प्रसाधनांनी नटलेल्या असल्यामुळे सुंदर आणि हव्याहव्याशा वाटतात.

पण हेच वाटणे जेव्हा थांबते आणि उलटेपालटे होते तेव्हा त्यांना सामाजिक आणि लैंगिक दृष्टया वश करण्याची ऊर्मीही दलित पुरुषांच्या मनात उद्‌भवते. इतिहासात आणि कधीकधी वर्तमानकाळीही सवर्ण पुरुषांनी दलित स्त्रियांवर केलेल्या अत्याचारांची ते आठवण करून देतात.

दलित स्त्रियांची प्रतिमा रेखाटताना कुंचल्याचा शेवटचा फटकारा म्हणून एका स्त्रीच्या अनुभवाचे उद्‌गार आपण लक्षात घेतले तर ते अनुचित होणार नाही. ही स्त्री स्वतः मिश्रविवाहातून जन्माला आलेली आहे, तिची जडणघडण अपारंपरिक पद्धतीने झालेली आहे आणि तिने स्वतः एका पुरोगामी दलित कार्यकर्त्याशी विवाह केलेला आहे. तिच्या आत्मचरित्रात तिने भारतीय स्त्रीच्या प्रतिमेचे जिवंत आणि

प्रत्ययकारी रेखाटन केलेले आहेच, पण मुख्यतः स्वतःचे, एका उदयोन्मुख क्रांतिकारी दलित पुढाऱ्याबरोबरच्या वादळी जीवनात गरगणाऱ्या जीवनाचे, वर्णन केले आहे. ती म्हणते की, हरिजन आणि इतर अधिकृत मागास जातींपेक्षा भारतीय स्त्री ही अधिक दलित आहे, तिची अधिक पिळवणूक होते. तिला स्वतःला आलेल्या अनुभवांवरून आणि निरीक्षणावरून तिचे असे मत झाले आहे की, 'स्त्रीपुरुषसंबंधाबद्दल या सबंध (दलित) समाजात्त भयानक दूषित, विषम वातावरण जाणवलं मला. प्रत्येक माणसाची दोन-दोन लग्नं झालेली व शिवाय बाहेर एखादं प्रकरण -बहुतेकांनी पहिल्या बायकोला सोडलेलं... कारणे अनेक. (पृ. ११६) यामागे केवळ लैंगिक असमाधानीपणा नव्हता, पौरुष दाखविण्याचा तेवढाच एक मार्ग उपलब्ध होता.' (पृ. ११८)

शेवटी, स्वतःच्या आयुष्यातील आलेल्या वैफल्यदायक अनुभवांनी संतप्त होऊन लेखिका म्हणते की, पुरुषानं स्त्रीवर केलेल्या प्रत्येक अन्यायाचा जाब विचारला पाहिजे. एवढेच नव्हे, तर तिने पुरुषाविरुद्ध लढाईच पुकारली पाहिजे. मग या लढाईत काही स्त्रियांच्या आयुष्याचा नाश झाला तरी चालेल.

## आनंदाचे क्षण

वर रेखाटलेले दलित स्त्रीचे आयुष्य म्हणजे दुःखाची आणि दुर्दैवाची लांबलचक कर्मकहाणी वाटेल. तशी ती बहुसंख्य स्त्रियांची आहेही. एकदा तिचे सार्वत्रिकीकरण केले म्हणजे ती कोणा एका विवक्षित व्यक्तीची कथा उरतच नाही. तो एक साचा उरतो. अर्थात कुठलेही जीवन अगदी त्या साच्याबरहुकूम असत नाही. तेव्हा दलित स्त्रियांतलेही सर्वाधिक दरिद्री आणि दुःखी जीवन वाटचाला आलेल्या स्त्रीच्या आयुष्यातदेखील काही चढउतार असतातच.

आता हे आनंदाचे क्षण संख्येने थोडे असतील, अल्पजीवी असतील, पण ते त्यांच्या आयुष्यात येतात हे खरेच. सारेच दलित सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या एकाच थरावर नाहीत. त्यातल्या त्यात जे अधिक सुखवस्तू त्यांना अधिक यश, अधिक कृतार्थता, समाधान आणि आनंद मिळतो. आणि अगदी हीनातल्या हीन जीवनातही काही आनंदाचे क्षण येतातच.

चांगल्या साजुक अन्नाचा पहिला घास, पहिला नवा कपडा, जत्रेला किंवा सिनेमाला पहिली भेट, गावातल्या स्पर्धांमध्ये पहिला विजय, परीक्षेतले यश किंवा शिक्षकांनी दिलेली शाबासकी, एखादी नोकरी किंवा काम मिळणे, लग्न, पहिल्या मुलाचा- त्यातल्या त्यात पहिल्या मुलग्याचा-जन्म, घरामध्ये सून येणे, पहिल्या नातवाचे आगमन, हे कदाचित् असे अनुभव आहेत की, ज्यामुळे अगदी सर्वाधिक

---

टीप- मल्लिका अमर शेख- मला उध्वस्त व्हायचंय-
मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, ४००००४- जून १९८४

छळणूक झालेल्या जीवालादेखील आनंदाचा शिडकावा जाणवावा.

पण सध्याच्या परिस्थितीत तरी हे क्षण म्हणजे दलित स्त्रीच्या वाटचाला आलेल्या वेठबिगारीच्या प्रदीर्घ जन्मठेपेतली विरामचिन्हेच होत.

समृद्ध सांस्कृतिक वारसा लाभलेल्या आणि आधुनिक काळात घोडदौड करणाऱ्या आपल्या देशातले दलित स्त्रीचे जीवन, हे या दोन्हीवरीलही कलंक आहे. दलित स्त्रीचे विमोचन किती झाले आहे हाच आपल्या समाजाच्या प्रगतीचा मान-दंड व्हायला हवा–निदान यापुढे तरी.

❊

## २ दलित स्त्रीची वास्तव प्रतिमा

* देव येतो मान्साच्या अंगात, मग का वरं मान्साला कुजायला लावलंय् ?
* कशाला कुकू पुसून श्यान लावायचं?
* आपल्या मनात दलित स्त्रीची जी काही हीन, दीन, अडाणी, दुबळी, दुर्बल, असहाय्य, बळी जाणारी, खचलेली प्रतिमा आहे ती खरी नाही.
* वीज लकाकावी आणि भोवतीच्या गोष्टी दिसाव्यात तशी ही आत्मचरित्रं अनेक स्त्रियांवर प्रकाश टाकत आहेत.
* ती काय म्हणते आहे याला फारसं महत्त्व नाही. ते नवऱ्याच्या विरुद्ध आहे एवढं कारण मार खायला पुरेसं आहे.
* स्त्री–पुरुष संबंध आला की तो त्या स्त्रीची भानगड म्हणून उल्लेखिला जातो. भानगड करणारा पुरुष मात्र पड्यातच राहतो.
* ही काचेच्या भांड्याची प्रतिमा पूर्णपणे फोडून टाकल्याशिवाय बाईवरचे अन्याय कमी व्हायचे नाहीत.
* बाईचं दुःख भोगणं लहान वयात सुरू होतं, ते मरेपर्यंत तिची पाठ सोडत नाही.
* ह्या स्त्रियांचे आनंद, दुःख, भांडणं, अपमान, आपत्ती यांत खाजगीपणा नाही. सगळं जाहीर आहे.
* " लोक काय म्हणतील " हा प्रत्येक कृतीमागचा मोठा बाऊ असतो.
* कुठेही रूपाचं प्रत्यक्ष वर्णन न करता तराळ- अंतराळ मधे, उपरामधे, आठवणींचे पक्षी मधे अनेक बायकांची व्यक्तिमत्वं आपल्यापुढे उभी राहतात.

**शोभा भागवत**

'स्त्रीवाणी' च्या स्त्रियांच्या स्वतःबद्दलच्या प्रतिमेचा अभ्यास करणाऱ्या प्रकल्पात काम करताना अनेक दलित स्त्रियांनी मनमोकळेपणानं सांगितलेली त्यांची

जीवनं ऐकायला, पहायला मिळाली. सुरवातीला मोह पाडला तो त्यांच्या थेट चित्रपूर्ण, चमकदार भाषेनं. कधी या बाया 'मी तुमच्यासाठी रक्ताचं पाणी व हाडाचं मणी केलं' असं म्हणून कष्टाचं सांगून जात. 'आमचं आमाला वनवास आणि कुटं देव पुजत बसायचं' म्हणून वैतागून बोलत. 'आंगातलं बिंगातलं सगळं खोटं हाय. देव येतो मान्साच्या अंगात, मग का बरं मान्साला कुजायला लावलंय?' म्हणून पडलेला प्रश्न तळमळून विचारत. कधी 'पुरुषाच्या जातीनं बायकाच्या जातीला बोलायचं न्हाई, कायद्यानं बोला' असं नवऱ्याला ठणकावून सांगितल्याचं सांगत. 'ती काय परपंचाला धरून हाय का ती बाई?' म्हणून शेजारणीचं वर्णन करीत. 'आमी गेलो कार्पोरेशनला, म्हाईत पण नव्हतं काई. गेलो इचारत. म्हनलं, पाण्यासाठी कुठं जायचं वो? आमी महिलामंडळ आहे. त्यांनी दिलं आमाला लावून- जा इकून त्या तिकडं. मग गेलो. अर्ज टाकला' असं नवी जाग आल्याचं वर्णन करत, तर कधी 'नवरा वाईट वागवतो तर गावी ये, दुसरं लग्न करून देतो' असं भाऊ म्हणत असता 'कशाला कुकू पुसून श्यान लावायचं?' असा आपला आपला निर्णय घेतल्याचं सांगत. कधी या बायांच्या वेगळ्या अनुभवांनी अस्वस्थता यायची, कधी त्यांच्या चलाखपणानं मन थक्क व्हायचं. कधी एखाद्या प्रसंगाच्या साम्यानं त्यांच्याशी थेट नातं जुळायचं, तर कधी त्यांच्या अनेक प्रसंगांतून भरपूर शिकायलाही मिळायचं.

हा अभ्यास करण्यापूर्वी आपल्या मनात दलित स्त्रीची जी काही हीन- दीन अवलेची अडाणी, दुर्बल, असहाय्य, वळी जाणारी, खचलेली प्रतिमा होती, ती खरी नाही असं लक्षात येऊ लागलं. कधी पांढरपेशा, सुशिक्षित स्त्रियांपेक्षाही ह्या स्त्रियांत मनाची ताकद जास्त आहे हे पटू लागलं. त्यांचे कष्ट, मूल्यांशी- जगण्याशी प्रामाणिकपणा, खडतर जगण्यात पाय रोवून उभं असणं, हिंमतीनं मुलांना वाढवणं हे सगळं करायला एवढी ताकद येते कुठून असा प्रश्न पडू लागला, तर पांढरपेशा स्त्रिया आपल्या भावनिक, मानसिक दुःखांचा फार बाऊ करतात की काय अशीही शंका येऊ लागली. ह्या स्त्रिया पूर्णपणे समजल्या असं नाही, पण त्यांनी बरेच प्रश्न पुढे टाकले.

बलुतं, उपरा, मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे, आठवणींचे पक्षी, तराळ अंतराळ ह्या आत्मचरित्रांचा अभ्यास हाही आमच्या प्रकल्पाचा एक भाग होता. ही आत्मचरित्रं वाचता वाचता असं लक्षात आलं की इथे नानाविध स्त्रिया नानाविध प्रसंगांमध्ये, अनेक रूपांनी वावरताना आपल्याला भेटतायत. त्या पूर्णपणे समजत नाहीत तरी ही आत्मचरित्रं, वीज लकाकावी आणि भोवतीच्या गोष्टी दिसाव्यात तसा, अनेक स्त्रियांवर प्रकाश टाकत आहेत.

दुसरी गोष्ट अशी की, इथे आलेलं स्त्रियांचं वर्णन हे स्त्रियांच्या स्वतःच्या दृष्टीतून आलेलं नाही, तर पुरुषाच्या दृष्टीतून आलेलं आहे. ह्या दोनही गोष्टी ह्या अभ्यासात महत्त्वाच्या वाटल्या.

ही पाच आत्मचरित्रं अभ्यासासाठी निवडल्याच्या नंतरच्या काळात मुक्ता

सर्वगोंडांचं 'मिटलेली कवाडे' आलं. बेबी कांबळे यांचं 'जिणं आमुचं' स्त्री मधून प्रसिद्ध झालं. शरणकुमार लिंबाळेचं 'अक्करमाशी' लिहिलं गेलं. उत्तम बंडू तुपेचं 'काट्यावरची पोटं' आलं. मल्लिका अमर शेखचं 'मला उध्वस्त व्हायचंय्' आलं. पार्थ पोळके यांचं 'आभरान' आलं. ही सारी पुस्तकं ह्या अभ्यासाला पूरक म्हणून वाचली. बेबी कांबळेंनी स्त्री– जीवनातले अनेक बारीकसारीक तपशील लिहून वाचकाची जाण आणखी वाढवली.

अभ्यासासाठी निवडलेल्या आत्मचरित्रांमध्ये आई, बहीण, बायको यांची ठळक चित्रणं आहेत. ज्यांच्याविषयी आकर्षण वाटलं अशा काही स्त्रियांची चित्रणं आहेत. नात्यातल्या, शेजारणी, जमातीतल्या, काही अवघड प्रसंग ओढवलेल्या अशा अनेक स्त्रियांचे उल्लेख आहेत. मात्र या स्त्रियांमध्ये बरोबरीचं नातं असलेली एकही मैत्रीण नाही. (उपरामधले मित्र सोडले तर मित्रांचेही उल्लेख नाहीतच.)

इथं स्त्रिया अनेक प्रकारची कामं करताना भेटतात. धुणी, भांडी, मोल-मजुरी, स्वैंपाक, आया म्हणून काम करणं, शेतावरची कामं, गोधड्या शिवणं, लाकडं गोळा करणं, पाणी भरणं ही झाली नेहमी आढळणारी कामं. पण एखाद्-दुसरी बाई रस्त्यावर कसरत करते, दलित म्हणून तिच्या वाट्याला येणारी गाव-कीची कामं– मर्तिकाचा गावोगाव निरोप देणं, ढोर वहाणं, गावाची पट्टी भरणं, हेही ती करते. दलित म्हणूनच म्हाताऱ्याच्या प्रेताला फरफटत स्मशानात नेणाऱ्या दोन म्हाताऱ्या इथं दिसतात. खंडोबाची मुरळी होणं, वेश्या होणं, हेही प्राक्तन त्या स्त्रियांचं दिसतं. इथे गरीब वर्गातल्या स्त्रीचे कष्ट आणि दलित स्त्रीचे अधिकचे कष्ट यातला फरक कळतो.

ह्या स्त्रिया निरनिराळ्या प्रसंगांत निरनिराळ्या भावना व्यक्त करताना दिसतात. त्या प्रेमळ आहेत, त्यांना माया आहे, माणुसकी आहे. शंकरराव खरा-तांच्या आईचं आत्मचरित्रभर येणारं वर्णन यातले अनेक तपशील दाखवतं. ही बाई अन्याय सहन करत नाही. ती सासरहून पळून आलेल्या मुलीबद्दल भावकीला सवाल करते. माळ्यानं मुलाला मारलं तर त्याच्याशी भांडायला उठते. महाराचा लग्नात मान केला नाही त्याबद्दल जाब विचारते.

अन्याय जाणवला आहे पण त्याबद्दल काही करता येत नाही अशी अवस्था उपरामधल्या पारूमामीची होते.

ह्या स्त्रियांच्या जिद्दीची, पक्केपणाची, शहाणपणाची, सावधपणाची, हुषारीची अशी अनेक उदाहरणं देता येतील.

उपरामधली आई मुलाला 'शाळेत जाऊ नको' असं म्हणते म्हणून नवऱ्याचा मार खाते. तसंच नंतर त्याला शाळेत जाऊ दे असं म्हटल्यामुळेही नवऱ्याचा मार खाते. ती काय म्हणते आहे याला फारसं महत्त्व नाही, कारण ते नवऱ्याच्या मता-विरुद्ध आहे एवढं कारण माराला पुरेसं आहे.

ह्या साऱ्यांच्या जीवनक्रमात एक प्रकारचं चक्रात अडकलेपण आहे. त्यातून बाहेर

पडणं सोपं नाही. किंबहुना, त्यातून बाहेर गेलो की आपली सत्ता गेली हे समजण्याइतकं शहाणपण मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे मधली आई दाखवते. हे शहाणपण असल्यामुळेच ती, नवऱ्याचं आणि तिचं फारसं सख्य नसतानाही, भांडणांच्या रूपानं का होईना, नवऱ्याशी संवाद कायम ठेवते. पोटामागे धावण्याचा रेटा इतका जोरदार आहे की उपरामधल्या आईलाही नवऱ्याचा मार खाल्ल्यानंतर रुसत–फुगत बसायला वेळ नाही. बलुतं मधली आईही नवऱ्याच्या व्यसनांच्या आड येत नाही. कधी नवऱ्याला मोठेपणा देऊन, कधी त्याच्या नकळत काही गोष्टी करून (मुलाला पैसे देणं), कधी रागाचा झटका दाखवून देऊन (पिंगळी- उपरा) ह्या स्त्रिया संवाद करतायत.

या आत्मचरित्रांमध्ये आया दिसतात त्या मुलांसाठी काबाडकष्ट करताना. मुलं त्यांच्याबद्दल आदरानं लिहितात, प्रेमानं लिहितात. मुलांवरच्या प्रेमासाठी आई बऱ्याच गोष्टी करते. पण मुलानं जातीविरुद्ध, जमातीविरुद्ध, गावाविरुद्ध काही लिहिलेलं, केलेलं आयांना पटत नाही. मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे मधली आई एरवी स्वतः आजारी असताना मुलाला जेवायला वाढील, त्याच्या पायाला तेल लावेल, त्याची बाजू घेऊन नवऱ्याशी भांडेल, पण गावाबद्दल मुलानं पेपरात लिहिलं, गाव बोलू लागलं की ती अस्वस्थ होते, मुलाला माफी मागायला सांगते. आता गावात आपलं कसं होणार याची तिला चिंता वाटते. उपरा मधली आई सुद्धा मुलाच्या शिक्षणासाठी मदत करते, लग्न नको म्हणून मुलगा निघून गेला तरी त्याला परत ये म्हणून म्हणते. पण मुलानं जातीबाहेर लग्न केलं म्हणून मात्र ती त्याला माफ करत नाही. जातीनं त्याचं लग्न मान्य केल्यानंतरच तिची ही घालमेल थांबते. तराळ अंतराळ मधल्या आईसमोर जेव्हा जत्रा करायची की मुलाला घर सोडू द्यायचं असा प्रश्न उभा राहतो, तेव्हा ती ताबडतोब म्हणते, तू घर सोडून निघून जायचं मनात आणू नको. तू म्हणतोस तर जत्रा बंद करू. आई–मुलाच्या नात्यातले असे प्रसंग इतर आत्मचरित्रांमधून दिसत असताना आठवणींचे पक्षी मधली आई तिच्या नसण्यामुळं अधिकच जाणवते. ती नसल्यानं मुलाच्या वाटयाला आलेलं वनवासीपण त्याचं सगळं जगणं अधांतरी करून टाकतं.

भावा– बहिणींच्या प्रेमाचे उल्लेखही सर्व आत्मचरित्रांत आहेत. स्त्री–पुरुष नात्यामध्ये आई– मुलगा, वडील– मुलगी, नवरा– बायको, भाऊ– बहीण, सासरा- सून, सासू– जावई, नातू– आजी, नातेवाईक स्त्रिया– मुलगा अशी अनेक नाती दिसतात. बहुतेक नात्यांमधल्या स्त्रीनं पुरुषासाठी करणं, तिला त्याच्याबद्दल प्रेम वाटणं, माया वाटणं, हे नातं टिकायला आवश्यक दिसतं. यापलीकडची स्त्री- पुरुष नाती ही एकमेकांबद्दलच्या किंवा एकतर्फी आकर्षणावर उभारलेली आहेत. (सखू, मालती, शालिनी, सलमा, बानू, सगुणा, इ.) त्या सगळ्या नात्यांमध्ये पुरुष आपापल्या भूमिका कधी अंतरीच्या जिव्हाळ्यानं, कधी कर्तव्य म्हणून, तर कधी सामाजिक दडपण म्हणून पार पाडताना दिसतात.

या नात्यांपलीकडच्या समाजातल्या ज्या स्त्रिया आहेत त्यांच्याबद्दल लेखकांना कधी अभिलाषा वाटते म्हणून त्यांचे उल्लेख येतात, कधी दया येते म्हणून येतात, कधी त्यांच्या अवस्थेचं दुःख वाटतं म्हणून त्यांच्याबद्दल लिहिलं जातं. पण बहुतेक वेळा त्यांच्याबद्दलचं लिहिणं हे एक वेगळी घटना म्हणून, तटस्थ प्रेक्षकाच्या नात्यानं, लिहिलं जातं. त्यातले स्त्रियांना अन्यायकारक असे अनेक प्रसंग त्यातली स्त्रियांची बाजू अधिक लक्षात घ्यायला हवी अशी मागणी करतायत.

ह्या अन्यायकारक उल्लेखांमधे स्त्री – पुरुष संबंध आला की तो त्या स्त्रीची भानगड म्हणून उल्लेखिला जातो. ती भानगड करणारा पुरुष मात्र पडद्यातच राहतो. शरणकुमार लिंबाळेंनी अक्करमाशीच्या मनोगतात म्हटलंय, ' या बदमाष समाजातील पुरुषाच्या व्यभिचाराच्या समर्थनासाठी त्याला त्याची सत्ता, संपत्ती, समाज, संस्कृती आणि धर्माची पाठराखण असते. पण स्त्रीचं काय ? तिला तो बलात्कार पोटात वाढवावा लागतो.' या विधानाचे अनेक पैलू ह्या आत्मचरित्रांमधे दिसतात. आपलं मूल सोडून द्यावं लागलेल्या कुमारिकेचा ' कुंती ' सापडली, तिला पुढे शिक्षा झाली असा उल्लेख बलुतं मधे येतो, ' रांडेचा लफडा होता' म्हणून मापटचांच्या पोरीचा उल्लेख येतो.

सासरा सुनेच्या अंथरुणात शिरल्यानंतर पंचायत बसली असताना, नवऱ्यानं 'ही बायको माझे वडील आणि मी यांत समाईक आहे' असं म्हटल्याचा प्रसंग आहे.

बायको गहाण ठेवण्याचा प्रसंग आहे. बायकोचा संशय घेणं ही तर अतिशय सामान्य गोष्ट आहे. आजारी नवऱ्याचं औषध आणायला गेली असताना परतायला उशीर झाला म्हणून नवऱ्यानं लगेच ' कुणाखाली झोपलीस ? ' म्हणून त्रागा करणं आहे, बायकोला संशयावरून सोडून देणं आहे, बायको विकणं आहे, तिला मारणं आहे, बाईवरचा बलात्कार आहे. ह्या सर्व प्रसंगांमध्ये बाईच्या बाजूनं उभं रहायला कुणी नाही. गूळखोबरं चोरून खाते यांसारख्या क्षुल्लक कारणांनी मन्या वाणी बायकोला सोडून देऊ शकतो. लग्न मोडलं म्हणून, लगेच तासाभरानं जी घरंदाज घराची सून होणार होती ती रांड म्हणून उल्लेखिली जाते. इतकंच नाही, तर 'अशा छप्पन रांडा मी माझ्या मुलासाठी आणीन' असं बाप लग्नघरात सांगतो.

बाईची कोंडी होणं, ती असहाय्य बनणं, हतबल ठरणं हे त्या अशा प्रसंगांत घडतं, कारण बाई म्हणजे काचेचं भांडं हे मनोमन सर्वांना पटलेलं असतं. ही काचेच्या भांड्याची प्रतिमा पूर्णपणे फोडून टाकल्याशिवाय हे बाईवरचे अन्याय कमी व्हायचे नाहीत.

या आत्मचरित्रांमधे अनेक चटका लावणारे प्रसंग स्त्रियांच्या बाबतीत घडतात. बाभळीचे फोक कापले म्हणून बाईची अब्रू घेण्याचा प्रयत्न होतो, बलात्कार झाला म्हणून नवरा सोडून देतो आणि पारूमामीला कुणीच आधार देत नाही म्हणून तिला वेड लागतं. वेडातच ती मरते. कसरत करणाऱ्या शारदीचा रक्तानं भरलेला, धुगधुगी असणारा देह ओढ्याकाठी सापडतो. वेश्याव्यवसाय करून पोरं

वाढवल्यावर तीच पोरं गजरीच्या डोक्यात धोंडा घालायला उठतात. नवऱ्यानं विकलेली देखणी जमना वेश्या होते व शेवटी भिकारीण होते. हळद लागल्यावर लग्न न होणारी रत्ना बर्गे झिजून मरते. मातीत खेळण्याच्या वयात स्त्री लग्न होऊन सासरी जाते. सासरचे कष्ट काढून लहान वयात शेवंता थकून जाते. बाईचं दुःख भोगणं असं लहान वयात सुरू होतं ते मरेपर्यंत तिची पाठ सोडत नाही.

हे नुसते कष्ट नाहीत. त्या कष्टांबरोबर अपमान आहे, सासुरवास आहे, इतरांनी दाखवलेली बेपर्वाई आहे. त्यात स्त्रीच्या वाट्याला येणारी आणखी दुःखं म्हणजे मूल नसणं, मूल मरणं, बलात्कारातून दिवस राहणं, मूल सोडून द्यावं लागणं, देखण्या बाईकडे आसपासच्या पुरुषांनी अभिलाषेनं पाहणं, अशी अनेक.

ह्या सगळ्या त्रासातून पोरांच्या तोंडात कधी चांगला घास घालता येणं हे तिचं सुख आहे. नवऱ्यानं तिच्या खाण्यापिण्याची काळजी करणं हे सुख आहे. सून येणं, नातवंड होणं हे सुख आहे. कोंड्याचा मांडा करून हुन्नरीपणे संसार करणं, त्याबद्दल चार माणसांनी बरं म्हणणं हे तिचं सुख आहे. एरवी सणावाराच्या, देवधर्माच्या, जत्रेच्या निमित्तानं थोडंफार सुख ओढून आणण्याचाही प्रयत्न आहे.

ह्या स्त्रियांचे आनंद, दुःख, अपमान, भांडण, आपत्ती यांत खाजगीपणा नाही. सगळं जाहीर आहे. हे जाहीर असल्यानं दुःखाचा निचराही लवकर होतो. आणि काहीही जाहीर होऊ शकतं याचं दडपणही वागण्यावर सतत राहतं. त्यामुळे, लोक काय म्हणतील हा प्रत्येक कृतीमागचा मोठा बाऊ असतो.

या दडपणांमधूनही बायकांनी स्वतंत्रपणे धैर्य दाखवल्याची उदाहरणं या आत्मचरित्रांत आहेत. म्हाताऱ्याचं प्रेत ओढून नेणाऱ्या म्हाताऱ्या आहेत, भावकीला सवाल करणारी आई आहे, जातीयतेमुळे पाण्याच्या हालांनी कंटाळून धीटपणे विहिरीत पोहरा टाकणाऱ्या बाया आहेत, नणंदेला त्रास दिला म्हणून मुसलमानाला दगडावर आपटणारी ताईबाई आहे. हे लिहीत असतानाच असं मनात येतं की, एरवीच्या हलाखीच्या परिस्थितीतून वाट काढत जगत राहणं हेच एक मोठं धैर्य आयुष्यभर पुरत राहणारं इथे आहे.

बाई म्हटली की तिचं रूप आलंच. पांढरपेशा समाजात ज्याला इतकं महत्त्व आहे, ज्याचा बाजार होतो त्या दिसण्याला या जीवनात कितीसं महत्त्व आहे? कुठेही रूपाचं प्रत्यक्ष वर्णन न करता, तराळ अंतराळ मधे, उपरामध्ये, आठवणींचे पक्षीमधे अनेक बायकांची व्यक्तिमत्वं आपल्यापुढे उभी राहतात. बलुतंमधे मात्र अनेक स्त्रियांच्या दिसण्याची वर्णनं येतात त्यातल्या बहुतेक गोऱ्यापान, देखण्या असतात. आश्चर्य असं की, स्त्रियांच्या लेखनात अशी पुरुषांची दिसण्याची वर्णनं फारशी नसतात. तेव्हा दिसण्याला, रूपाला इथे महत्व किती? त्याचं वर्णन कशामुळे करावंसं वाटतं? पुरुषांचं का करावंसं वाटत नाही? की केवळ लिहिण्याची शैली म्हणून स्त्रीदेहाचं वर्णन येतं ?

अशा ह्या स्त्रिया ह्या आत्मचरित्रांमधून भेटतात, अनेकरंगी. त्यांच्या प्रतिमा

आपल्या डोळ्यांपुढे राहतात. दारिद्र्य, कष्ट, अपमान, ओढाताण यांतून पोट भरत राहण्यासाठी जगताना त्या जी माणुसकी दाखवतात, जे धैर्य दाखवतात, जे शहाण-पण दाखवतात ते थक्क करून टाकतं. ज्या परिस्थितीत त्या असहाय्य बनतात ती परिस्थिती पुरुषांच्या पुढाकारानं, समाजाच्या शिक्षणानं, नव्या विचारांनी बदलू शकेल असं वाटतं. त्यासाठी त्यांच्या वाट्याला येणारी दुहेरी मूल्यं बदलायला हवीत. त्या संपूर्ण माणूस आहेतच, पण त्यांच्याकडे माणूस म्हणून पाहिलं जात नाही ही व्यथा आहे.

या निवेदनांमधे काही उदाहरणं अशी आहेत की जी बदलाचे मार्ग दाखव-तात. ती सारी दलित स्त्रियांची आहेत असं नाही, पण ती दलित जीवनाशी संबं-धित आहेत. 'तू माझा संशय घेतोस, तर माझ्या चार पोरांना घेऊन निघून जाते' म्हटल्यावर नवरा मऊ होतो हे दाखवणारी पिंगळी आहे. तीन रुपयांत सागुती करून घाल म्हणून नवरा म्हणत असताना चिडून त्याच्याच उरावर बसणारी सरी आहे. ह्या तिच्या वागण्यानं पुढे नवरा तिला मारेनासा झाला असं उपरात आप-ल्याला दिसतं. घरातल्या सगळ्या विरोधाला तोंड देऊन दलित मुलाशी लग्न कर-णारी शशी आहे, पुढाकार घेऊन, ओळखीच्या मुलाला पत्र लिहून लग्नाची गळ घालणारी शिंदेची बहीण आहे, लग्नानंतर मुलीला शिकून डॉक्टर होऊ देईन असं लिहून मागणारी शकुंतला आहे. ह्या स्त्रीप्रतिमा दलित स्त्रियांना नव्या वाटा दाखवणाऱ्या आहेत.

ह्या चर्चासत्राचा एक हेतू दलित स्त्रियांची वास्तव प्रतिमा समाजासमोर आणण्यासाठी लेखक, समाजकार्यकर्ते, अभ्यासक काय करू शकतील त्याविषयी चर्चा करणं हा आहे. ह्या प्रतिमेचे आणखीही अनेक पैलू असतील. स्त्रियांनी मोकळेपणानं आपल्या जगण्याबद्दल बोलणं, स्त्रियांकडे पाहण्याचा पुरुषांचा आणि समाजाचा आणि स्त्रियांचाही दृष्टीकोन बदलणं, स्त्रियांबद्दल लिहिताना प्रत्येक प्रसंगात त्या स्त्रीची बाजू लक्षात घेणं झालं, तर दलित स्त्रियांची वास्तव प्रतिमा उभी रहायला मदत होईल.

त्या दृष्टीनं दलित स्त्रियांनी स्वतःच्या अनुभवांविषयी स्वतः लिहिणं फार महत्त्वाचं आहे.

३ दलित आत्मचरित्रा-
तील स्त्री

* आम्ही घरी राहतो, दळण दळतो, भाकऱ्या भाजतो, म्हणून अशा सभा घ्यायला तुम्ही मोकळे रहाता.
* तशीच वेळ आली तर पुरुषाने घरकामाची जबाबदारी उचलावी आणि घरच्या स्त्रीला वाचनासाठी, चर्चेसाठी वेळ द्यावा.
* दलित चळवळ ही दलितांच्या उद्धाराची चळवळ आहे की फक्त दलित पुरुषांच्या उद्धाराची आहे?
* वास्तवाशी फटकून, स्वतःचेच एक जग निर्माण करून त्याच्या मचूळ सुखदुःखात रंगून गेलेल्या मराठी लेखकांना आणि वाचकांना, जणू आसुडाचे फटके मारून, या आत्मचरित्रांनी जागे केले.
* अंगावर चिंध्या पांघरून फाटक्या पिशवीत रस्त्यावरचे कागद वेचणारी बाई ही एखाद्याच्या कथेतील पात्र असणे आणि ती बाई त्याची स्वतःची आईच असणे यात यात दोन जगांचा फरक आहे.
* माहेरी आलेल्या मुलीला, न्याय-अन्याय न पहाता, सासरी पाठवून 'चुलीतलं लाकूड चुलीतच जळू दे' म्हणणारी माणसं आजदेखील उच्चशिक्षित पांढरपेशांतही आहेत.
* देवाधर्माचे अवडंबर न माजवता, सदाचरणाने, कुटुंबावरील मायेने जणू मानवतेच्या अंतिम धर्माचे आचरण करणारी ही बाई आहे.
* शहरात राहणारी हरिजन स्त्री तुलनेने तरी सुखी आहे का ? आणि खेड्यात राहणाऱ्या अजून एकोणिसाव्या शतकात वावरणाऱ्या तिच्या आयाबहिणींच्या वाट्याला सावूबाईपेक्षा काही वेगळे आयुष्य येते का ?
* वास्तवाचे किरण आपल्या शब्दांच्या भिंगात एकत्र करून त्यांनी चटके देण्याचे काम दया पवार करतात.

सरिता पदकी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
संदर्भ शाखा

* भारतीय नवरा कधी चुका करतो का ?
* डाग देण्याच्या उपायांनी सीता निदान कायमची गप्प रहायला शिकली असेल. याहून दुसरं काय हवं- बाईच्या जातीला ?
* मार खाणारी बाई निमूटपणं ते सहन करीनाशी झाली तर मार थांबेल अशी आशा वाटते.

दोन चार वर्षांपूर्वीची गोष्ट. वृत्तपत्रात आलेल्या एका बातमीनं दलित चळवळीवर एका वेगळ्याच कोनातून प्रखर प्रकाश पडल्यासारखे मला वाटले. ती बातमी होती मराठवाड्यातील, जिथे महाराष्ट्रातील दलित अधिक शिक्षित, जागृत आणि संघर्षशील आहे, जिथे दलितांची चळवळ अधिक प्रभावशाली आहे. अशा या चळवळीच्या निमित्तानेच दलितांची एक सभा भरली होती. सभेत बाकीचे काय कामकाज झाले असेल ते असो, पण त्या सभेत एका दलित महिलेने काढलेले उद्गार मात्र माझ्या चांगलेच लक्षात राहिले आहेत. ती म्हणाली होती, 'आम्ही घरी रहातो, दळण दळतो, भाकऱ्या भाजतो, म्हणून अशा सभा घ्यायला तुम्ही मोकळे रहाता.'

त्या सभेची प्रतिक्रिया काय झाली, हे कळले नाही. परंतु– "बायकांचे बोलणे काय लक्षात घ्यायचे?" अशासारखीच झाली असणार. बायकांनी घरीच रहायचे, भाकऱ्याच भाजायच्या, एवढेच नव्हे तर, त्या भाकऱ्या भाजण्यातच सुख आणि अभिमान बाळगायचा हीच परंपरा आहे. बायकांनी चळवळीत भाग घेतला तरी पुरुष सांगतील तेव्हाच घ्यायचा आणि तेवढाच घ्यायचा. दलित चळवळीतही यापेक्षा वेगळे काही असायचे काहीच कारण नाही.

दलित स्त्रीबद्दलच्या एका वेगळ्या विचाराला अशी चालना मिळाली असतानाच एक विलक्षण अनुभव आला. अस्मितादर्श या दलित साहित्याला वाहिलेल्या मासिकाने दलित स्त्रीवर एक विशेष अंक काढला होता. साधना साप्ताहिकाच्या सभागृहात त्याच्यावर चर्चा होती. चर्चा होणार असल्याची बातमी वृत्तपत्रात आल्यामुळे मी अनाहूतपणेच तिथे गेले. पहाते तो काय, दलित स्त्रीवरच्या विशेषांकाबद्दल चर्चा करायला एकत्र झाले होते पुरुष कार्यकर्तेच! एकच दलित स्त्री आपल्या मुलाबाळांना घेऊन त्या सभेला आली होती. या वस्तुस्थितीवर प्रस्तुत लेखिकेने बोट ठेवले असता 'घरगुती कामांमुळे बायका येऊ शकल्या नाहीत' असे उत्तर मिळाले. 'घरगुती कामे स्त्रीपुरुषांनी दोघांनी मिळून करावीत. तशीच वेळ आली तर पुरुषाने एकट्यानेच घरकामाची जबाबदारी उचलावी, आणि घरच्या स्त्रीला वाचनासाठी, चर्चेसाठी वेळ द्यावा' अशी मी सूचना करताच एक कुचेष्टेचे हसू सर्वांच्या चेहऱ्यावर उमटले !

दलित चळवळ दलितांच्या उद्धाराची चळवळ आहे की फक्त दलित पुरुषांच्या उद्धाराची आहे, अशी शंका या सर्व घटनांनी माझ्या मनात उद्भवली. आपल्या

स्वातंत्र्य-संग्रामात भाग घेणाऱ्या मोठमोठ्या पुढाऱ्यांची तरी आपापल्या घरातल्या स्त्रियांशी वागणूक कशा प्रकारची होती, याची उजळणी मन करू लागले. मोठमोठे पुढारी मला काही जवळून पहायला मिळाले नाहीत, पण जिल्हापातळीवरच्या नामवंत काँग्रेस पुढाऱ्यांच्या मुलांच्या लग्नात हुंड्यापांड्याची, मानापानाची- म्हणजेच त्यांच्याही घरांत मुलीला, मुलीकडच्या बाजूला कमीपणाच असल्याची— हकीगत मी स्वतःच्या डोळ्यांनी पाहिली होती.

या साऱ्या पार्श्वभूमीवर असं वाटलं की दलित लेखकांच्या आत्मचरित्रांतून त्यांच्या त्यांच्या आयुष्यात नाना स्थानी आलेल्या स्त्रियांचे चित्रण ते कसे करतात ते तरी पाहू. हे सारे लेखक सुशिक्षित आहेत. आपल्या वाट्याला जे दारिद्र्याचे, उपासमारीचे आणि कष्टाचे जीवन आले त्याबद्दल त्यांच्या मनात संताप दाटलेला आहे. ज्या सवर्ण समाजाने हे उपेक्षेचे, लाचारीचे जिणे आपल्याला जगायला लावले त्याच्याबद्दल विद्रोहाचे अंगार त्यांच्या मनात रसरसत आहेत. हेच दलित आपल्या घरातल्या, शेजारच्या, परिसरातल्या स्त्रियांकडे कसे पहातात याबद्दल कुतूहल दाटून मी त्यांची आत्मचरित्रे बारकाईने वाचायला सुरुवात केली.

या दलित आत्मचरित्रांनी, विशेषतः दया पवार यांचे 'बलुतं' आणि लक्ष्मण माने यांचे 'उपरा' या सुरुवातीला प्रसिद्ध झालेल्या आत्मचरित्रांनी, मराठी वाङ्मयाला जो धक्का दिला तो अविस्मरणीय होता. वास्तवाशी फटकून, स्वतःचे एक जग निर्माण करून त्याच्या मचूळ सुखदुःखात रंगून गेलेल्या मराठी लेखकांना आणि वाचकांना जणू आसुडाचे फटके मारून या आत्मचरित्रांनी जागे केले. दारिद्र्य म्हणजे काय, उपासमारी कशी असते, शिक्षणासाठी कसे अपमान गिळावे लागतात, रात्रंदिवस कष्ट करूनही पोटाची खळगी न भरल्याचं दुःख कसं असतं ह्याचे दाहक अनुभव या आत्मचरित्रांनी वाचकांच्या पदरात बांधले आणि त्यांच्या जीवनाबद्दलच्या आणि वाङ्मयासंबंधीच्या संकल्पनाच बदलून टाकल्या. माधव कोंडविलकर यांचे 'मुक्काम पोष्ट देवाचे गोठणे', प्रा. प्र. ई. सोनकांबळे यांचे 'आठवणींचे पक्षी' यांनी हे वास्तव ठळक लाल शाईने अधोरेखित केले. शंकरराव खरात हे पाचही आत्मचरित्रलेखकांत सगळ्यात वडील असूनही त्यांचे आत्मचरित्र 'तराळ– अंतराळ' हे सगळ्यात शेवटी प्रसिद्ध झाले. वरील चारी लेखकांपेक्षा त्यांचे जीवन कुठल्याही प्रकारे कमी त्रासाचे गेलेले नाही. परंतु शारीरिक व मानसिक प्रौढतेच्या उंचीवरून त्यांनी आपले अनुभव तटस्थतेने मांडले आहेत आणि ही तटस्थताच त्या अनुभवांचे दाहकपण अधिक स्पष्ट करून गेली आहे.

दलित जीवनातील वेदनेबद्दल बोलता– बोलताच ही आत्मचरित्रे त्यांच्या आयुष्यात आलेल्या स्त्रियांबद्दलही खूप काही सांगून गेली. तसे पहाता दलित स्त्रीचे चित्रण मराठी वाङ्मयात अगदीच झाले नव्हते असे नव्हे. पण किती झाले तरी दुरून पाहून, कल्पनेचे रंग भरून केलेले ते चित्रण होते आणि तेही फार थोडे होते. दलित आत्मचरित्रांनी मात्र दलित स्त्रीचे अगदी जवळून, अंतरीच्या जिव्हाळ्याने

दर्शन घडवले. अंगावर चिंध्या पांघरून, फाटक्या पिशवीत रस्त्यावरचे कागद वेचणारी बाई ही एखाद्याच्या कथेतील पात्र असणे आणि ती बाई त्याची स्वतःची आईच असणे यांत दोन जगांचा फरक आहे. लग्नाच्या जेवणानंतर उकिरड्यावर टाकलेल्या पत्रावळीतील अन्न खाणाऱ्या व्यक्ती दुरून पाहिलेल्या असणे आणि स्वतःच तसे अन्न चवीने खाणे आणि पुन्हा पुन्हा ते खायला मिळावे म्हणून आईने ते उकळून वाळवून ठेवणे या दोन अनुभवांतल्या दाहाचा फरक कोणत्या तपमापकाने मोजणार? दलित स्त्रीच्या आयुष्याचे असे अस्सल आणि निकटचे दर्शन या आत्मचरित्रांनी आपल्याला घडविले म्हणून त्यांच्या लेखकांचे आभार मानावेत तेवढे थोडेच. कल्पना ताणूनही जे दिसणार नाही असे स्त्रीजीवनाचे भयानक वास्तव या आत्मचरित्रांनी आपल्याला दिले आहे.

या लेखकांच्या दलितपणामुळे त्यांचा संबंध दलित स्त्रियांशी अधिक आला हे खरे आहे. पण त्यांच्या आयुष्यात काही दलितेतर स्त्रियांचेही त्यांना दर्शन घडलेले आहे. दलित स्त्रीप्रमाणेच याही स्त्रीच्या पायात रूढीचे साखळदंड आहेत, जे तिचा प्रसंगी जीवही घेतात. ज्या मुक्त होतात त्या दलित आणि दलितेतर स्त्रियांना द्यावा लागलेला झगडा, करावा लागलेला संघर्ष वाचकांना थकवा आणणारा आहे.

आई, बहीण, शेजारीण, प्रेयसी, पत्नी, मुलगी अशा अनेक नात्यांनी या लेखकांच्या आयुष्यात स्त्री वावरते आहे. आत्मचरित्र लिहिताना या लेखकाचा उद्देश स्वतःचे अनुभव सांगण्याचा, स्वतःचे चरित्र रेखण्याचा होता. तेव्हा यातल्या स्त्रियांचे जे चित्रण झाले ते अपरिहार्यपणे नकळत झाले. या नकळतपणामुळेच की काय, ते अधिक ठसठशीत, जिवंत झाले. आणि यामुळे आपल्या हातात दलित व दलितेतर स्त्रीचेही अतिशय वास्तव असे चित्रण आले आहे. लेखकांच्या नकळतच त्यांनी आपल्याला ही देणगी दिलेली आहे.

या पाचही लेखकांचे बरेचसे आयुष्य– निदान शिक्षण पुरे होईपर्यंतचे संवेदनाक्षम आयुष्य- खेड्यापाड्यांत गेलेले आहे. ग्रामीण जीवनातील दारिद्र्याचे, अपार कष्टाचे असे स्त्रीजीवनाचे चित्रण त्यामुळे आपल्याला मिळाले आहे. दारिद्र्यामुळे आलेले कष्ट अपुरे वाटले म्हणूनच की काय, रुढींनी त्यांत भर घातलेली आहे.

दलित आत्मचरित्रातल्या स्त्रीजीवनाचे हे चित्रण भेदक, म्हणूनच अस्वस्थ करणारे आहे. या जीवनाला उजाळा देण्याचे प्रयत्न किती झाले, कुणी केले, चळवळीत याला वेगळे स्थान आहे का हे प्रश्न अनुत्तरितच आहेत. पण हे स्त्रीजीवन पाहिले म्हणजे दलित चळवळीला या दिशेने पावले टाकणे किती अपरिहार्य आहे हेही लक्षात येईल.

## तराळ अंतराळ

वर म्हटल्याप्रमाणे आतापर्यंत प्रकाशित झालेल्या पाच दलित आत्मचरित्रांतील स्त्रीजीवनाच्या दर्शनावर हा अभ्यास आधारित आहे. या पाचही लेखकांत शंकरराव खरात वयाने वडील. आत्मचरित्र लिहून होईपर्यंत एक दलित लेखक आणि आंबेडकरी चळवळीचा तळमळीचा कार्यकर्ता म्हणून ते स्थिरावलेले होते. यांचे

आत्मचरित्र वेदनेने भरलेले असूनही विद्रोहाची मूठ मात्र त्यात उगारलेली नाही. या संयमाला जसे वय कारणीभूत आहे, तसेच मातापित्यांच्या छत्राखाली सुरक्षित गेलेले त्यांचे बालपण व पांढरपेशा शिक्षकांचे प्रेम व मदत मिळालेले त्यांचे विद्यार्थी-जीवनही कारणीभूत असावे.

## सवर्ण स्त्रिया

शंकरराव खरातांच्या या आत्मचरित्रात स्त्री अनेक रूपांनी आलेली आपल्याला दिसते. ती जशी दलित आहे तशी सवर्णही आहे. सवर्ण स्त्रियांत त्यांच्या वडिलांकडून लाकडं फोडून घेणाऱ्या वाण्याउमद्याच्या, गावच्या शिक्षकांच्या बायका आहेत. गावच्या शिक्षकांच्या बायका आपल्या नवऱ्याच्या विद्यार्थ्यांना सरपण गोळा करण्याची, शेण आणून घालण्याची कामे सांगतात, असा जसा उल्लेख आहे, तसाच या सवर्ण स्त्रिया गरजेला जोंधळे देणे, भाकरी घालणे, ताकरताळी खायला देणे, (वरून) पाणी प्यायला घालणे अशा गोष्टी करीत, याचाही उल्लेख आहे. कॉलेजमधल्या रंगीबेरंगी कपडे घालून फुलपाखरासारखा वावरणाऱ्या मुली, टायपिंग क्लासमधली सहाध्यायिनी याही या पुस्तकात आढळतात. पण खरातांच्या आयुष्यावर खोलवर परिणाम केला आहे असे मात्र यातील एकाही सवर्ण स्त्रीबद्दल म्हणता येणार नाही. औंधमधल्या राजकन्यांची पुस्तके यांना मिळत, तीही त्यांच्याकडून समक्ष नव्हे, तर एका शिक्षकांच्या मार्फत. म्हणजे त्या पुरोगामी राजकन्यांशी देखील समक्ष परिचय होणे, नव्या विचारांची देवघेव होणे, एक नवी जागृत स्त्री पहायला मिळणे, असा योग खरातांच्या बाबतीत कधी आलाच नाही. त्यामुळे त्यांच्या आयुष्यात आलेल्या सवर्ण स्त्रियांचा हा एवढाच उल्लेख पुरेसा आहे.

याउलट दलित स्त्री मात्र अनेक नात्यांनी खरातांच्या भोवती वावरताना, त्यांच्या जीवनावर मूलगामी परिणाम घडवताना आपल्याला दिसते. आई, बहीण आणि शेवटी पत्नी या तीन स्वरूपांत तर ती फारच प्रभावीपणे या आत्मचरित्रात आलेली आहे. आईच्या शेजारणी, बहिणीची सासू अशा दुय्यम नात्यांनीही ती आलेली आहे.

## आई

खरातांचा जन्म १९२० सालचा. त्यांची आई गेल्या शतकाचा शेवट आणि या शतकाचा निम्म्याहून अधिक भाग असा काळ पाहिलेली आहे. हिच्या आयुष्याचा बराचसा भाग खेड्यातच गेलेला आहे. पुढे मुलाच्या संसाराच्या सोयीसाठी ती शहरात आली तरी तिचा जीव शहरात रमत नसे.

खरातांच्या आईच्या वेळचे खेडे यांत्रिकीकरणाला खेड्यांचा बळी जायच्या आधीच्या काळातले आहे. खेड्यातल्या तरण्याताठ्यांनी शहरात पळ काढावा आणि खेडी ओस, उजाड पडावीत हा काळ येण्यापूर्वीचे ते आहे. उसाचे मळे, पेरूच्या बागा, जोंधळ्याची शेती अशी समृद्धी असलेले ते गाव आहे. या शेतात आपल्या

गावच्या रहिवाश्यांना-पुरुषांना आणि बायामाणसांनाही-रोजगार द्यायची ताकद आहे.

स्पृश्यास्पृश्यतेच्या कल्पना कर्मठपणाने बाळगणारे हे खेडे आहे. महारांनी आपल्या अंगणात लाकडे फोडावीत, पण ती रचताना घरातल्या वस्तूंना शिवू नये, अशी अपेक्षा आहे. तसेच पाणी पितानाही स्पर्श न होण्याची अपेक्षा आहे. आणि ही अपेक्षा सवर्णांना तर गैर वाटत नाहीच, पण अस्पृश्यांनीही तिचा निमूटपणाने स्वीकार केला आहे. सगळी सवर्ण मंडळी जेवायच्या आधी आपल्याला सणाचे का वाढून मिळत नाही, असा प्रश्न मुलाने विचारल्यावर आई लगेच उत्तर देते, 'तसं कसं होईल? अशी उलटी रीत कशी पडेल?'

पण सवर्ण आणि अस्पृश्य यांत सलोखाही आहे असे आढळते.–अर्थात या आखीव चौकटीतच. रामा महाराने जोंधळे, भाकरी किंवा पाणी मागावे आणि कुणा माउलीने ते देऊ नये असे होत नाही. किंवा रामा महाराच्या दहा वर्षांच्या शेवाने सासरच्या जाचाला कंटाळून पळून येऊन ऊसवाल्याच्या मळ्यात आसरा मागितला, तर तिचा गैरफायदा न घेता तिला आश्रय मिळाल्याचीही हकीगत आहे.

अर्थात याही खेड्यात डॉ. आंबेडकरांच्या 'जनता'चे अंक येऊ लागले. त्यांचे वाचन खरातांसारखे नवशिक्षित मुलगे समाजापुढे करू लागले आणि मग गावकीची कामे करायला हरिजनांनी नकार दिला, अशीही पुढची पायरी आहे.

या खेड्यातली एक नमुनेदार गृहिणी आहे खरातांची आई. आपल्या मुलाच्या आयुष्यावर ती एखाद्या वत्सल क्षितिजासारखी ओणवलेली आहे. सुरुवातीला ती आपल्याला भेटते ती गळक्या झोपडीत पाण्याच्या धारांखाली गाडगीमडकी ठेवताना आणि शेवटी भेटते ती आपल्या व्हाइस चॅन्सेलर झालेल्या मुलाला 'तुमची उंच जागी नेमणूक झाल्याचे कळले. तरी प्रकृतीला जपून असावे' असे कळवताना.

खरातांच्या आईच्या बालपणाचाच काय, पण लग्न झाल्यानंतर माहेरच्याही कुणा माणसाचा उल्लेख तराळअंतराळमध्ये नाही. फक्त एका बहिणीचा उल्लेख आहे, पण तोदेखील तिचे मुलगे मारामारीच्या खटल्यात पकडले गेले आणि आईने हंडा गहाण टाकून वकीलाची फी भरून त्यांना सोडवले असा. म्हणजे दारिद्र्याच्या संसारापासून चार दिवसांच्या सुटकेसाठीदेखील आईला माहेर नव्हतेच.

प्रत्येक गृहिणीला आपल्या घराचा, संसाराचा, भांड्याकुंड्यांचा अभिमान असतो. पण या गृहिणीच्या वाट्याला आलेले घर इतके लहान, इतके गळके आणि मोडके आहे की, त्याचा अभिमान वाटणे अवघडच. त्याची एका बाजूची भिंत इतकी लहान की, तिला टेकून उभेसुद्धा रहाता येऊ नये. त्याच घरात चूल पेटवायची, पाच मुले आणि नवरा यांच्यासाठी स्वैंपाक करायचा. चार गाडगीमडकी एवढीच संपत्ती. घरावर गवताचे छप्पर आणि बाहेर ओट्यावर एखादी बकरी आणि तिची करडे. पावसाळ्यात ती भिजू नयेत म्हणून त्यांनाही आत घ्यावे लागे.

असा हा दरिद्री संसार चालवताना या पतिपत्नीचे मात्र विलक्षण सामरस्य जाणवते. एकमेकांची प्रतिष्ठा जपायचा प्रयत्न दोघेही करीत असतात. भांडणे होत

नाहीत असे नाही. विशेषत: नवरा सरकारी कामाच्या नादात घराकडे दुर्लक्ष करतो, हा राग आईच्या मनात कायमचा दिसतो. पण तोदेखील कामाचा तावेदारच ना? त्याचा तरी काय इलाज?

एरवी इतर दलित आत्मचरित्रांतून दिसणारे नवऱ्याने बायकोला बडवून काढणें, दारूच्या अधीन होऊन अद्वातद्वा बोलणे, बायकांचा नाद करून पत्नीचा अपमान करणें, एकमेकांशी सारखे करवादणे या गोष्टी या दांपत्याच्या जीवनात अस्पष्टशादेखील डोकावत नाहीत. आपल्या बायकोने लोकांची अंगणे झाडावीत हे खरातांच्या वडिलांना पसंत नव्हते. दारिद्र्यातही मानाने रहावे, प्रतिष्ठेने जगावे, मुलाबाळांचे, शेरडाकरडांचे संगोपन करावे, अशीच नवराबायकोंची धारणा आहे. अशा शांत, प्रेमळ कुटुंबात वाढल्यामुळेच खरातांच्या मनात विद्रोह धगधगला नाही असे म्हणावेसे वाटते. सासरच्या जाचाला कंटाळून गेलेल्या मुलीला माहेरी आधार मिळेल या खात्रीने आईकडे धाव घ्यावीशी वाटली, तेही या दांपत्याच्या प्रेमाच्या खात्रीमुळेच. पतीच्या तराळकीचा अभिमान वाटणाऱ्या या बाईची त्याच्या गावकीच्या कामातही मदत करायची तयारी आहे. चांगलाचुंगला घास मुलांनी खावा, गावातले एखादे लग्न निघाले तर त्यातले लाडू खायला सासरी गेलेल्या पोरीला बोलावून घ्यावे, असे अपत्यप्रेम या दांपत्याच्या मनात, दारिद्र्यातही, आहे.

आई म्हणून होणारे या बाईचे दर्शन खरोखर भारावून टाकणारेच आहे. अपार दारिद्र्य आणि पोटासाठी करावे लागणारे कष्ट यातूनही तिच्या कोमल भावना रसरशीत राहिल्या होत्या. एवढेच नव्हे, तर त्या आपल्या मुलाच्याही मनात याव्यात यासाठी तिची धडपड चालू असल्याचे आपल्याला दिसते.

होल्याची पिल्लं धरू पहाणाऱ्या मुलाला ही आई सांगते– पिल्लांचा आपल्याला शाप लागेल. त्यांची आई झुरत बसेल. माणसाप्रमाणेच त्यांचा जीव!

पिंडी ते ब्रह्मांडी बघणारे हे तत्त्वज्ञान या माउलीला कुणी शिकवलं असेल? कारण कथापुराणं वाचणं तर सोडाच, ऐकायलाही ती कुठे गेलेली नाही.

मनाच्या या मवाळपणानेच खरातांच्या आईने आपल्या पदरी पडलेल्या चारीपाची मुलांना वाढवलेलं आहे. पावसात घरात बदबद गळत असताना, त्यांची अंथरूणं भिजू नयेत म्हणून, त्या धारांखाली गाडगीमडकी ठेवणे, त्यांच्या पोटापाण्याचा विचार सदैव करणे, त्यासाठी स्वत:च शेतीत मजुरी करणे, लग्नातल्या पक्वान्नांसाठी त्यांना जेवायला पाठवणे, उष्ट्या पत्रावळीवरचं अन्न निवडून काढून त्यांना वाढणे व ते अन्न टिकावे म्हणून वाळवून पुन्हा त्यांना देणे, या गोष्टी तर तिने केल्याच, परंतु आपल्या मुलाशी कोणी गैर वागल्यास त्याचा जाब विचारायला तिने मागेपुढे पाहिलेले नाही. मुलाने राखणीला नेलेली गुरे बागेत शिरली म्हणून रखवालदाराने चाबकाने फोडून काढले. वास्तविक महाराच्या बाईनं– म्हणजे समाजातल्या सर्वांत खालच्या पायरीवर उभ्या असलेल्या व्यक्तीनं- असे अन्याय मुकाट्याने सहन करायचे आणि वर जुलूम करणाऱ्याचेच पाय धरायचे, अशी शतकानुशतकांची परंपरा. पण

या बाईनं ती मोडली आणि रखवालदाराला सरळ जाब विचारला. त्याची चूक त्याच्या पदरात घातली. कशामुळे तिला एवढी मानसिक ताकद आली?

याहीपेक्षा उज्ज्वल आहे तिचं लेकीला सासरी पाठवीत नाही म्हणून भावकीनं वाळीत टाकल्यावेळचं वागणं. मुलगी शेवंता लहानपणीच लग्न करून सासरी पाठवली. पण सासू तिच्याकडून मोठ्या बाईलाही झेपणार नाही एवढे काम करून घेऊ लागली. पहाटे उठून दळण दळायचे, पाणी भरायचे, स्वैपाक करायचा आणि शिळेपाके तुकडे खाऊन शेतात मजुरीने कामाला जायचे. परत आल्यावर पुन्हा घरकाम. अशा जाचाला कंटाळून मुलगी माहेरी आली.

एरवी अशा माहेरी आलेल्या मुलीला, न्याय- अन्याय न पाहाता, सासरी पाठवून 'चुलीतलं लाकूड चुलीतच जळू दे' म्हणणारी माणसे आजदेखील उच्चशिक्षित पांढरपेशांतही आहेत.

पण खरातांच्या आईनं पोरीवरचा अन्याय ओळखला. भावकीने पोरीला सासरी पाठवा म्हणून दिलेला हुकूम अमान्य केला. आणि त्याबद्दलची शिक्षा म्हणून वाळीत पडायची वेळ आली तर तिलाही नेटाने तोंड दिले.

वाळीत पडलेल्या घरातल्या माणसांना जमातीतल्या लग्नकार्यात जेवायला बसवीत नाहीत त्याचे मुलाला दुःख होऊ नये म्हणून तिने लग्नकार्याच्या दिवशी घरी चांगलाच स्वैपाक केला. शेजारचा विस्तव मिळणार नाही म्हणून चुलीपाशी कायम आगपेटी राहील अशी व्यवस्था केली. भावकीच्या निर्णयाला असे आव्हान देत या बहाद्दुर बाईने तब्बल एक वर्ष काढले. आणि जेव्हा मुलीच्या सासरच्यांनी 'जाच करणार नाही' अशी कबुली दिली तेव्हाच मुलीला साग्रसंगीत न्हाऊ घालून, नवे कपडे नेसवून, जावयालाही गोड–धोड घालून, मुलीची पाठवणी केली. हजारात नव्हे, लाखात एखादे असे हे उदाहरण आहे.

धाकट्या मुलाच्या दुखण्याला औषधपाणी करणे, देवऋषीकडे जाणे, देवाची जत्रा करून बोकड बळी देणे आणि शेवटी पोर जगत नाहीच असे कळल्यावर त्याला मांडीवर घेऊन चार चमचे शेवटचे दूध पाजणे हीही कामे या माउलीचीच. स्वतः शंकरराव खरातांचे डोळे आल्यावर त्यांना डॉक्टरकडे नेणे, त्यांच्या डोळ्यात पडलेली फुले नथीने काढणे हीही कामे हिचीच.

मुलाने झाडाचा डिंक गोळा करून पैसे आणले की 'घे तुला खाऊला' असे म्हणायचे, झाडाला लोंबकळणारे प्रेत सोडवायचे काम करून बारा आणे आणले की त्यातलेही काही पैसे त्याच्या हातावर ठेवायचे आणि 'तुझ्याही मागं गावकीची कामं लागली का रे?' म्हणून हळहळायचे, गावात मोठ्या घरी लगीन निघाले की चांगले खायला मिळेल म्हणून सासरी गेलेल्या मुलीला बोलवून घ्यायचे, असे अनेक हळवे रंग या आईच्या व्यक्तिमत्वात आहे.

धार्मिक परंपरेने आलेले आचार जरी ही बाई पाळीत असली तरी तिच्या व्यक्तिमत्वातले हे गडद आणि फिके रंग त्या आचारातून आले असतील असे म्हण-

वत नाही. कारण धर्माचरणाचे अवडंबर माजवण्याइतका तिच्याजवळ वेळच नाही- रोजच्या पोटाच्या विवंचनेच्या फेऱ्यात.

ती दर मंगळवार–शुक्रवार न्हाऊन देवाची पूजा करी असा उल्लेख आहे. धाकटा मुलगा आजारी असताना तिने देवऋषिणीकडे धाव घेतली होती हे वर सांगितलेच. देवाला बोकडही कापला होता. (आणि घरी आल्यावर, त्याच्या आठवणीने ओरडणाऱ्या बकरीला सांगितले होते की, 'बाई, आज तुझा लेक देवाच्या घरी गेला.') या बाईच्या आयुष्यात मारुतीच्या बाबतीत घडलेली गोष्ट मोठी मजेदार आहे.

ओलेत्याने मारुतीला प्रदक्षिणा घालायच्या नादात मुलाचे काढून ठेवलेले कपडे व घागर चोरीला गेले. ते कळल्यावर या माउलीने मारुतीच्या नावाने खडे फोडले. पण संध्याकाळी बाजारातून येताना मुलासाठी जसा तिने मांजरपाटाचा शर्ट आणला, तसा मारुतीसाठीही नारळ आणि खडीसाखर आणून त्याचे देणे फेडायला ती विसरली नाही.

दर वर्षी म्हसोबाची जत्रा करायची. त्याच्या पुढे बोकड कापायचा ही या कुटुंबाची पद्धत. या देवाच्या देखरेखीमुळे आपण सुखरूप रहातो आणि दर वर्षाचे देणे दिले नाही तर तो संतापी देव कोपेल अशी पोटात भीती. पण या पार्श्वभूमीवरही, कॉलेजात जाणाऱ्या मुलाने 'खंडोबाची जत्रा यापुढे बंद करायची, नाही केली तर हा मी घर सोडून चाललो, परत कधीच गावाला येणार नाही' अशी धमकी दिल्यावर, ती जत्रा आईनं बंद केली. एवढेच नव्हे, तर ज्या देवांची पिढयान् पिढया पूजा झाली ते देवही, धर्मान्तरानंतर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सांगण्यावरून, गंगामाईच्या स्वाधीन केले!

देवाधर्माचे अवडंबर न माजवता, सदाचरणाने, कुटुंबावरील मायेने, जणू मानवतेच्या अंतिम धर्माचे आचरण करणारी अशी ही बाई आहे.

अशा या बाईला तिच्या शेजारणी मान देत नसतील तरच नवल. शेजारणींची भांडणे झाली की त्यांचा न्याय करण्याचे, त्यांची समजूत घालायचे काम हिच्याकडे असे. तिने दिलेला न्याय सगळ्यांना पटतही असे. शेजारणींचा तिच्यावर इतका विश्वास की, ती वाळीत पडल्यावरही त्यांनी तिच्याकडूनच विस्तव नेला आणि अशा तऱ्हेने जणू, मुलीला जाच करणाऱ्या सासरी न पाठवायच्या तिच्या निर्णयाला, नैतिक पाठिंबाच दिला.

भावकीमध्ये बसायचा अधिकार, बाई असल्यामुळे, तिला वास्तविक नव्हता. पण आपल्या पोरीचे भवितव्य त्या बैठकीत ठरणार म्हटल्यावर ती तिथे रेमाटून बसली आणि भावकीच्या विरुद्ध वर्षभर लढली.

सवर्णांच्या समाजात हिला काय स्थान होते? तसे मानाचे कोणतेच स्थान नव्हते. सावूबाईने गावकीचे पडेल ते काम करावे आणि मिळेल ते खावे असेच ते स्थान होते. लग्नाचे लुगडे देतो म्हणून कबूल केलेल्या माणसामागे वणवण हिंडून

त्याने ते न दिल्यावरही तिला त्याच्यावर रागावता येत नव्हते. उलट, पोटासाठी केव्हाही त्यांच्याच दारात उभे रहावे लागते, म्हणून तोही अन्याय न बोलता सहन करावा लागत होता.

सावूबाईच्या शेजारणींबद्दल ओझरते पण बरेच उल्लेख तराळ– अंतराळमध्ये आहेत. एकमेकींच्या दिव्यावरून संध्याकाळचा दिवा लावणे, एकमेकीकडून विस्तव नेऊन चुली पेटवणे, असा शेजारधर्म त्या पाळतात.

गावच्या उतीम लोकांचा वाडा कोणी झाडावा यावरून त्यांच्यांत भांडणे होतात. कारण प्रश्न मिळकतीचा व तिथून मिळणाऱ्या शिळ्या अन्नाचा असतो. (या सर्व बायकांबद्दल एक विलक्षण गोष्ट म्हणजे कामावर मिळालेले अन्न घरी आणल्यावर त्या आधी ते मुलांपुढे ठेवतात. मुलांनी भिकाऱ्यासारखे त्या अन्नावर तुटून न पडता, नीट हातपाय धुवून ते खावे असे त्यांना बजावतात. विलक्षण दारिद्र्यातही उठून दिसणारे हे निःस्वार्थी मातृत्व आहे.) शेजारच्या घरची मुलगी, सासरी जाताना, स्वतःच्या आईवडिलांच्या पाया पडावी तशी त्यांच्याही पाया पडते. त्याही तिची ओटी भरतात. रडणाऱ्या आईची आणि लेकीची समजूत घालतात. असे हे या वस्तीचे शेजारधर्माचे जिणे आहे.

नवऱ्याच्या दरिद्री संसाराला, उण्याला पुरे करण्यासाठी सावूबाईला शेतमजुरीचे काम करावे लागते. दुधासाठी आणि बोकडासाठी पाळलेली शेळी अशा शेतावर ती नेते. काम नेहमीच जवळचेच असते असे नव्हे. लांबही जावे लागते.

लौकर उठून मुलाबाळांच्या व आपल्याही भाकऱ्या थापून, भाजी करून कामावर जायला बाहेर पडायचे ते तिन्हीसांजा झाल्यावरच घरी यायचे. येताना डोक्यावर जळणाची मोळी घेऊन यायचे. आल्यावर थोडा वेळ ओसरीवर टेकायचे. हंड्यातल्या पाण्याने चूळ भरायची, शेजारणीकडून दिवा पेटवायचा आणि परत संध्याकाळच्या स्वैंपाकाला लागायचे. हा स्वैंपाक अर्थातच नवऱ्याने कामावरून जोंधळे आणलेले असले तरच. ते नसले आणि भाकरी मिळालेल्या असल्या तर त्या खायच्या, नाहीतर साऱ्यांनी उपाशीपोटी तसेच झोपायचे.

नवरा परगावी गेला असला तर निरोप सांगायचे त्याचे कामही सावूबाईने करायचे. ते ती हुशारीने करते. गावचा पाटील मेल्यावर सरणाची लाकडे टाकायला सावूबाई आपल्या लहानलहान मुलांना हाताशी घेऊन नवऱ्याला मदत करते.

इथे एक लक्षात येते की, सावूबाईचा काळ हा खेड्यात काहीतरी उणापुरा रोजगार मिळण्याचा काळ आहे. यांत्रिकी युगात शहराकडे धाव सुरू झाली आणि खेडी ओस पडू लागली. शेतीकडे दुर्लक्ष झाले आणि बायकांना मिळणारे, वर उल्लेखिलेले छोटेमोठे धंदे बंद झाले. पोट भरायसाठी शहरात जाणे आणि शरीरविक्रय करणे एवढेच अशिक्षित अस्पृश्य समाजातील स्त्रीच्या हातात उरले. सावूबाईच्या कर्त्या काळात असे उदाहरण घडलेले नाही. खरातांच्या ओळखीतली, नात्यातली कुणी बाई पोटासाठी वेश्याव्यवसाकडे वळलेली आपल्याला पहायला लागत नाही.

अर्थात् जत्रेच्या वेळी नटूनथटून वसून सर्व बघ्यांचे लक्ष्य होणाऱ्या तमासगीर बायकांचा उल्लेख यात आहे. ही झाली लेखकाच्या लहानपणीची गोष्ट. मोठेपणी, तमासगीर बायकांच्या उद्धारासाठी काम करताना, लेखकाला त्यांच्या आयुष्याची चित्तरकथा कळलेली आहे. या मुली लहान असतानाच त्यांच्या पायात चाळ येतात. थोड्या मोठ्या झाल्यावर त्या तमाशात नाचायला लागतात. जरा वयात आल्या की त्यांच्याकडे पुरुषांची दृष्टी(!) वळायला लागते. योगायोगाने लग्नाचा नवरा किंवा एखादा पैसेवाला यजमान मिळाला तरच त्यांच्या आयुष्याला सुरक्षितता लाभते. नाहीतर त्यांच्या नशिबी शरीरविक्रय करणेच येते.

खरातांच्या आईच्या खालोखाल वर्णन येते ते त्यांच्यापेक्षा थोड्या मोठ्या असलेल्या बहिणीचे–शेवाचे–शेवंताचे. हिच्या सासुरवासाची हकीगत आपण वर पाहिलीच आहे. हे लग्न तिच्या वयाच्या दहाव्या वर्षी झालेले. तोवरचे तिचे आयुष्य झेपेल तेवढे कष्ट करण्यात व माहेरच्या पांघरुणात गेलेले आहे. प्रेताच्या सरणाची लाकडे टाकून मान अवघडली म्हणून गोवऱ्या टाकाव्या लागलेल्या आहेत. या तिघीही बहिणींना शिकवावे असा अस्पष्टसाही विचार कोणाच्याही डोक्यात आलेला नाही. किंबहुना तराळ–अंतराळमधील खेड्यातल्या हरिजन स्त्रियांच्या बाबतीतच शिक्षणाचा उल्लेखही आलेला नाही. ही शेवा पुढे लग्न होऊन, एक वर्ष माहेरी राहून, सासरी जाणे, ज्या कामाच्या रामगगाड्याला कंटाळून ती माहेरी पळून आली होती तो तिच्या मागचा चुकलेला नाहीच. पुढे मुंबईला गेल्यावर तरी शहरी वस्तीमुळे, स्वतंत्र बिऱ्हाड केल्यामुळे–तो चुकला असेल अशी आपण आशा करूया.

## पत्नी

आईच्या खेरीज खरातांच्या आयुष्यात आलेली दुसरी जबरदस्त स्त्री म्हणजे त्यांची पत्नी शकुंतला.

पण आईच्या आणि पत्नीच्या वयात जसे अंतर आहे, तसेच त्या ज्या परिस्थितीत वाढल्या त्यांतही आहे. महाराष्ट्रात तोवर झालेल्या समाजसुधारकांच्या कार्याचे निदर्शक असे हे अंतर आहे.

पोलिस अधिकाऱ्याची, त्यातही सामाजिक दृष्ट्या जागृत असलेल्या पोलिस अधिकाऱ्याची, मुलगी असलेल्या शकुंतलाबाईंना अस्पृश्यतेचे चटके बसलेले नाहीत. किंबहुना, पतीने आपल्या आठवणीतले मानहानीचे प्रसंग सांगताच त्यांनाही ते इतके अपूर्व वाटले की त्यांनी ते पतींना लिहून काढायला लावले. तेच हे आत्मचरित्र. लेखकाने ते आपल्या पत्नीला अर्पण केले आहे.

या मुलीला शिक्षणाची इतकी आवड की तिने डॉक्टर होण्याचे ठरवले होते. ती मॅट्रिकच्या आसपास आली आणि तिच्या नातेवाईकांत तिच्या लग्नाचा विषय निघू लागला. त्या काळीही हरिजन समाजात मुली जेमतेम मॅट्रिकपर्यंत जात होत्या. श्री. खरात हे स्वतः वकील झालेले, समाजकार्यात महत्त्वाचा भाग घेणारे असे

असल्यामुळे त्यांना पत्नीही सुशिक्षित असावी असे वाटत होते. मात्र मुलीलाही मुलगा पसंत असायला हवा, नुसत्याच एकतर्फी पसंतीवर झालेली लग्ने दु:खदायक होतात असा त्यांचा वकिली जीवनातील अनुभव होता.

कुमारी शकुंतला ही मुलगी गोरीपान, शेलाटी, शिकलेली, चांगल्या घराण्याची असल्याने ती खरातांना पाहताक्षणी पसंत पडली. (मुलगी पाहण्याचा हा कार्यक्रम मात्र मुलीच्या नकळत झाला.)

मुलीजवळ लग्नाचा विषय काढताच तिने सुरुवातीला लग्नाला नाहीच म्हटले. नंतर 'नवऱ्यामुलाने 'तुला डॉक्टर करीन' असे स्टॅम्पपेपरवर लिहून दिले तर लग्न करीन' अशी अट घातली. खरातांनी ती अट मान्य केली. कारण आपण स्वत:च्या शिक्षणाचा हट्ट कसा धरला होता हे त्यांना आठवत होतं.

साखरपुड्याचा दिवस ठरला. नवऱ्यामुलाकडे मित्रमंडळी गोळा झाली. खूप वेळ झाला तरी मुलगी येईना, म्हणून मंडळी तिच्याकडे चौकशीला गेली आणि हात हालवत आली. नवरामुलगा कामापुरते लिहून देईल आणि एकदा का लग्न झाले की माघार घेईल अशी मुलीला भीती वाटल्यामुळे ती लग्नाला तयार होत नव्हती.

अशा तऱ्हेने साखरपुडा पाण्यात विरघळला. पण चार महिन्यांनी मुलगी जुन्याच अटीवर लग्नाला तयार झाली. शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे कार्यकर्ते जमले असताना त्यांच्या साक्षीने हे लग्न लागले. त्यात देवाणघेवाण काहीही झाली नाही.

सौ. खरात यांना डॉक्टरीचे शिक्षण घेताना मात्र अस्पृश्यतेचा फार त्रास झाला. अस्पृश्यता मानणाऱ्या प्राध्यापकांशी व सहाध्यायांशी भांडत, झगडत त्यांना शिक्षण पुरे करावे लागले.

या त्यांच्या शिक्षणाच्या काळातच त्यांची तीन बाळंतपणेही झाली. (ती टाळता किंवा लांबणीवर टाकता आली नसती?) घरकाम, गरोदरपण—बाळंतपण—अपत्यसंगोपन या रगाड्यातच त्यांचे वैद्यकीय शिक्षण झाले व त्यांनी पुणे महापालिकेत नोकरी धरली. निरक्षर सावूबाईची डॉक्टर सून आता समाजसेवा करते.

अर्थात पती वकील व पत्नी डॉक्टर असूनही अस्पृश्यतेचा जाच या दांपत्याला सहन करावा लागलाच. शेजारच्या सवर्ण छोट्या मुलीने खरातकाकांच्या घरी चहादेखील घ्यायला नकार देणे, मुली वरच्या मजल्यावरच्या बिऱ्हाडात खेळून आल्या की जिना पाण्याने धुतला जाणे असे मानहानीकारक अनुभव आले.

मोलकरणींच्या बाबतीतही अस्पृश्यता अशीच आडवी आली. सवर्ण मोलकरणी मिळत नसत, मिळाल्या तरी टिकत नसत. एक सवर्ण मोलकरीण मिळाली तर तिच्या भावाने तिला त्रास द्यायला सुरुवात केली. तिने भावाला सांगितले की, 'साहेब वकिली करतात, बाई डॉक्टरी शिकतात, त्यांची मुलं इंग्रजी शाळेत जातात. ती मोठी माणसं आहेत, त्यांची जात काय बघतोस?' पण ते भावाला पटले नाही.

शेवटी तिने भावाच्या नकळत पहाटे चारला येऊन काम करून जायचा प्रयत्न केला. पण खरात दांपत्यालाच तो त्रासदायक झाल्यामुळे, शेवटी त्यांनी ती

मोलकरीण काढून टाकली,

मात्र शकुंतलाबाईंनी हा अस्पृश्यतेचा जाच निमूटपणे सहन केला नाही. त्या भांडल्या. जाच करणाऱ्यावर धावून गेल्या. शिक्षणाने व घरच्या वळणाने आलेल्या धिटाईने त्या या अन्यायाविरुद्ध उभ्या ठाकल्या.

त्यांच्या मुलींना जातपात माहीत नाही. पण शालेय अगर महाविद्यालयीन जीवनात त्यांना काय अनुभव आले याचा या आत्मचरित्रात उल्लेख नाही, कारण शंकरराव खरात मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू होतात इथेच या आत्मचरित्रातली हकीगत संपलेली आहे.

'तुम्हाला त्यांना कुलगुरू नेमायचं होतं तर मराठवाड्याचे का? पुण्याचे का नाही?' असा मोठा मार्मिक प्रश्न त्यांच्या पत्नीने विचारलेला आहे. यावरूनच सामाजिक न्याय- अन्यायाबद्दलची तिची समज दिसून येते.

शंकररावांच्या लहानपणातल्या आठवणीतल्या स्त्रिया खेडेगावातल्या. त्या अशिक्षित आहेत. दारिद्र्य तर त्यांच्या पाचवीलाच पुजले आहे. पडक्यामोडक्या घरसंसाराचे काम करून परत पोट भरण्यासाठी त्यांना शारीरिक कष्टाची कामे शेतावर, गावात करावी लागत होती.

समाजरचना त्यांची मानहानी करणारी होती. पण ती मानहानी आहे एवढीही जाणीव त्यांना नव्हती.

त्या मानाने शकुंतलाबाई फारच सुदैवी. शहरात, खुल्या वातावरणात वाढलेल्या, उच्च पदवीधर झालेल्या व सामाजिक न्याय—अन्यायाचे बारकावे ओळखून त्याविरुद्ध झगडणाऱ्या. अर्थात शकुंतलाबाईंचे उदाहरण विरळाच. पण शहरात रहाणारी हरिजन स्त्री तुलनेने तरी सुखी आहे का? आणि खेड्यात रहाणाऱ्या अजून एकोणिसाव्या शतकात वावरणाऱ्या तिच्या आया- बहिणींच्या वाट्याला सावूबाई-पेक्षा काही वेगळे आयुष्य येते का? हे मोठे विचार करण्यासारखे प्रश्न आहेत!

## बलुतं

१९७८ साली 'बलुतं' हे दया पवारांचं आत्मचरित्र प्रकाशित झालं आणि आपल्याच सुखमय तंद्रीत जाणाऱ्या, मध्यमवर्गीय मराठी वाङ्मयाच्या दोन्ही भिवयांच्या बरोबर मध्यभागी जणू गोफणगुंडा बसला आणि ती तीव्र कळ ओसरल्यावर त्याला भान झाले एका वेगळ्या, विलक्षण, जगापलिकडच्या जगाचे. जे जग त्याने स्वतःच्या प्रबुद्ध मनाच्या कक्षेबाहेर ठेवले ते जणू त्याच्या मानगुटीवरच येऊन बसले. आणि मग मराठी वाङ्मय हे आधीचे उरले नाही. वेदना आणि विद्रोह यांनी ठासून भरलेलं बलुतं आणि त्याच्याच आसपास आलेलं उपरा वाचल्यावर त्या परिकथेतला जणू तेरावा महाल उघडला गेला. या महालात होतं पराकोटीचं दारिद्र्य, जातिहीनतेमुळे येणारा अवमान, शतकानुशतकांचं गलितगात्रत्व, वेदना आणि त्या न बोलता सोसणारं मुकेपण. अपमानाविरुद्ध मूठ उगारणे दूरच, आप-

त्याला मिळणारी वागणूक ही अपमानाची आहे हेसुद्धा या बलुतं आणि उपरा मध्ये प्रतिबिंबित झालेल्या जगाला उमगत नव्हतं.

बलुतंचे लेखक आहेत दया पवार. खरं तर त्यांचं नाव दगडू मारुती पवार. पण लेखनासाठी म्हणून त्यांनी हे पांढरपेशी नाव घेतलेलं दिसतं. (इतर दलित आत्मचरित्रकारांनी मात्र असं नामान्तर केलेलं नाही, हे लक्षात घेण्यासारखं आहे.) बलुतं प्रसिद्ध होण्याआधी दया पवारांच्या नावावर काही कविता होत्या. कोंडवाडा या संग्रहात त्या समाविष्ट झालेल्या होत्या आणि दलित कवी म्हणून ते प्रतिष्ठित झालेले होते. संमेलनातून भाग घेऊन वाहवा मिळवत होते.

दया पवारांचे बालपण खेड्यात व मुंबईत असे विभागले गेलेले आहे. ग्रामीण जीवनात आणि मुंबईच्या झोपडपट्टीत होणाऱ्या दलित समाजाच्या ससेहोलपटीचं त्यांनी विलक्षण दाहक वर्णन केलेलं आहे.

दया पवारांचा जन्म १९३५ चा, म्हणजे शंकरराव खरातांपेक्षा ते पंधराच वर्षांनी लहान आहेत. पण दोघांनी पाहिलेल्या जगात जमीन-अस्मानाचा फरक आहे. शंकरराव बरेचसे खेड्यात वाढले. त्या खेड्यात चातुर्वर्ण्याची चौकट जरी भक्कम असली, तरी त्या चौकटीत राहून एकमेकांशी काहीशा माणुसकीने वागणारी माणसे होती. शिवाय शंकररावांचं बालपण औंधसारख्या प्रागतिक संस्थानात गेलेलं. त्यामुळे त्यांना सक्रिय सुधारक माणसं भेटली. त्यांच्या मदतीच्या हाताला धरून ते वर येऊ शकले. दया पवारांना असे साह्य मिळाले नाही.

शंकरराव खरात आणि दया पवार यांची साहित्यिक जातकुळीही वेगळी आहे. फडके, खांडेकर, सानेगुरुजी यांच्या छायेखाली शंकरराव वाढलेले आहेत. त्यांना ज्याबद्दल लिहायचे आहे ते वास्तवच इतके प्रखर आहे की, या छायेतूनही त्याची धग जाणवावी ! याउलट दया पवार हे मराठीत वास्तववादाची बैठक स्थिर झाल्यावर आणि त्यातही १९६० ची दलित साहित्य परिषद झाल्यावर लिहू लागलेले. वास्तवाचे किरण आपल्या शब्दांच्या भिंगात एकत्र करून त्यांनी चटके देण्याचे काम ते करतात.

हिंदू समाजानं जे दुःखाचं बलुतं आपल्याला दिलं ते आपण या आत्मचरित्रात सांगितलं, असं ते म्हणतात. ‘दगडू मारुती पवार याच्या वाट्याला आलेलं हे दुःखाचं बलुतं, भारतीय समाजव्यवस्थेनं त्याच्या पदरात बांधलेलं. मी फक्त भारवाहक, त्याच्या शब्दांत शब्दांकन केलेलं,’ असं ते आपल्याला प्रस्तावनेत सांगतात.

या पुस्तकात वर्णन केलेले, खुद्द लेखकाच्या आणि इतर वर्ण्य व्यक्तींच्या वाट्याला आलेले अनुभव वाचकांना– विशेषतः वाचनाच्या कलेचा जणू मक्ता घेतलेल्या मध्यमवर्गीय वाचकांना- कपोलकल्पितही वाटण्याचा संभव आहे, हे ओळखून लेखक सांगतो की, ‘या पुस्तकातील प्रसंग, घटना, पात्रे कुणाला काल्पनिक वाटल्यास तो केवळ योगायोगच समजावा.’

दया पवारांच्या वाट्याला आलेलं हे दुःखाचं बलुतं त्यांच्या आसपास वावर-

णाऱ्या स्त्रियांच्या वाटचाला वाढीदिढीनं आलेलं आहे. यात हरिजन तशाच सवर्णही स्त्रिया आल्या. हरिजन समाजाच्या पाचवीला पुजलेलं दारिद्र्य, कष्ट, अपमान, शहरात तरी उपजीविका मिळेल म्हणून खेड्यातल्या पिढ्यान्पिढ्यांच्या घरांचा त्याग आणि शहरी जीवनात आलेले जागेच्या अपार टंचाईपासूनचे स्वप्नभंग हे सारे हरिजन स्त्रियांच्या वाटचाला आलेले आहेतच. शिवाय स्त्री म्हणून नवऱ्याकडून, सासरच्या नातेवाईकांकडून आणि एकूणच समाजव्यवस्थेकडून होणारे अन्यायही त्यांच्या भरीला आहेतच. हरिजन स्त्रियांप्रमाणेच शेजारच्या, वर्गातल्या, गावातल्या सवर्ण स्त्रियांचेही दर्शन 'बलुतं' मध्ये घडते.

आजी, आई, वेश्या बनलेली सुंदर मावशी, प्रथम व द्वितीय पत्नी अशा काही हरिजन स्त्रियांच्या ठळक व्यक्तिरेखा जशा यात आहेत, तशाच वर्गातली मुलगी बानू, वेड लागलेली नर्मदा, लेखकावर प्रेम करणारी सलमा अशा हरिजनेतर स्त्रियाही यात आहेत. शिवाय शेजारपाजारच्या, नात्यातल्या अशा अनेक स्त्रियांची ओझरती वर्णनं यात आहेत.

एकूण, स्त्रीजीवनाचं वास्तव आणि खूपसं करुण दर्शन घडवण्यात 'बलुतं' हे आत्मचरित्र यशस्वी झालं आहे, असंच म्हणावं लागेल.

## आजी

स्वतःच्या घरातल्या चार पिढ्यांतल्या स्त्रियांची वर्णनं बलुतंमध्ये आली आहेत. शेपाऊणशे वर्षांच्या, महाराष्ट्रात स्त्रीविषयक सुधारणांच्या चळवळीच्या ऐन जोमाच्या, या कालावधीत दलित स्त्रीच्या जीवनात नवजीवनाचा प्रकाश कित-पत पडू शकला, हे पहाणे उद्बोधक ठरावे. लेखकाची आजी, आई, दोन पत्नी आणि प्रथम पत्नीची मुलगी यांच्या वाटचाला आलेल्या जीवनाचा पोत तपासून पाहिला तर काही निष्कर्ष मनात आपोआपच तयार होतील.

लेखकाची आजी खूप भाबडी आणि प्रेमळ. ती तिच्या तरुणपणी खेड्यात होती. तिच्या नवऱ्याला दारूचे व्यसन होते. त्यातच तो वारला. गावचं वेसकरकीचं काम करून तिनं आपल्या मुलांना वाढवलं. विधवा बाई म्हणून या कामात कुठ-लीही सूट नव्हती. 'गावात हाळी द्यावी, येस्करपाळी मागावी, मेलेल्या ढोराला खांदा द्यावा, गावात कुणाचं माणूस मेलं म्हंजी उन्हापावसात गावोगाव जाऊन सांगावा द्यावा' अशी म्हाराची बलुत्याची सगळी कामं या तरुण विधवेला करावी लागत. त्यातच भाऊबंद छळ करीत.

अशी कामं करीत असतानाच तरुण विधवेवर येऊ नये तो प्रसंग भर रस्त्यात या बाईवर आला. देवीची साथ आली तेव्हा 'गावात कोणी तळूपोळू नका' अशी हाळी देत असताना कोणी चावटपणानं म्हटलं की, 'अरे, ही बाई कोणी तळूघोळू नका म्हणतेय' असं म्हणून गावकऱ्यांनी तिच्याभोवती गराडा घातला. बाईच्या हातापाया पडण्याचा, काय निरोप दिला तो सांगण्याचा काही उपयोग होईना.

शेवटी महारवाड्यात चुलत दिराला बातमी कळल्यावर त्यानं धावत येऊन भावजयीची सुटका केली. नाहीतर कुठलाही प्रसंग ओढवला असता.

बाईला रात्रभर झोप आली नाही. या गावात शुद्ध अंगानं रहाणं कठीण हे तिनं ओळखलं आणि दोन लहान मुलग्यांना कडेखांद्याशी धरून तिनं मुंबई गाठली. तिथं कागद वेचणे, गुरांच्या दवाखान्यात आलेल्या कुत्र्यांचं खाणंपिणं करणे, असली कामे करून तिनं मुलांना रजाचा गज केलं.

हे करताना तिने 'रांडपण निभावलं' म्हणजे परपुरुषाला स्वतःचा गैरफायदा घेऊ दिला नाही.

ह्याच आजीच्या बाबतीतली एक प्रेमळ आठवण लेखक सांगतो ती अशी की" घरातील कर्ता माणूस जेवायला बसला की, ती त्याच्या पाठीवर मायेनं हात फिरवायची आणि म्हणायची, 'गवागवा खा.' (म्हणजे भरपूर खा.) उभा जन्म हलाखीत काढल्यामुळे भरपूर खाण्याचं कौतुक तिला वाटत होतं का ?

लेखकावरचं तिचं प्रेम असंच एका प्रसंगानं व्यक्त झालं आहे. नातवाला दाढीमिशा आल्याचं कळल्यावर तिनं त्याला (खास मुंबईवालं) दाढी करायचं मशीन पाठवलं होतं.

अशी ही कष्टाळू, प्रेमळ, नेकीनं राहिलेली बाई– हिने सोशीकपणानं सोसले, म्हणून त्या हालांचं भयानकपण कमी होत नाही. विशेषतः अशा या जिद्दीच्या बाईच्या हातचं खाऊन वाढलेल्या मुलानातवंडांनी तिच्या म्हातारपणात तिला रात्री लागणारा चहाही द्यायचं नाकारावं, हे अगदीच निष्ठुरपणाचं वाटतं.

वर वर्णन केलेली ही लेखकाच्या वडिलांची आई. आईची आई ही दुसरी एक आजी त्याच्या वर्णनात आहे. हिची गोष्ट थोडी आगळीवेगळीच आहे. हिला मुलगी झाली म्हणून सासरच्या माणसांनी छळ सुरू केल्याबरोबर ती घर सोडून पळून गेली आणि तिनं दुसरा घरोबा केला. त्या घरीही तिला मुलगा झाला नाहीच, पण त्या घरी झालेल्या मुलींनी लेखकाच्या आईला आणि लेखकाला खूप प्रेम दिलं, आधार दिला.

म्हाताऱ्या बायांच्या संदर्भातला आणखी एक उल्लेख फार हृदयस्पर्शी आहे. अशाच एका खेडेगावातली सगळी तरणीताठी माणसं शहरांतून गेलेली. खेड्यात मागे राहिलेला एक म्हातारा मरतो, तर त्याला मातीआड लोटायला कुणीही जवळपास नसतं. शेवटी दोघीचौघी म्हाताऱ्या बायांनी त्याला खड्डयात पुरलं. अवाजवी शहरीकरणाच्या दुष्परिणामांची पाळंमुळं ही अशी सामान्य रयतेच्या गळ्याशी वेटोळी घालतात.

लेखकाची आई हे या आत्मचरित्रातील जबरदस्त व्यक्तिमत्व आहे. आपल्या मुलाला इतर हजारो दलित मुलांपेक्षा वेगळ्या तऱ्हेनं वाढवायचा, मोठा करायचा ही जिद्द या बाईच्या मनात कशी शिरली कुणास ठाऊक, पण हरिजनांच्या वसतिगृहातल्या चुलाण्याच्या गॅसचेंबरपुढं बसून तिनं डोंगराएवढी रास होईल इतक्या

भाकरी भाजल्या आणि मुलाचं शिक्षण केलं. आईच्या या प्रेरणेमुळेच आपण शिकलो याची लेखकालाही जाणीव आहे. त्यानं आपलं हे आत्मचरित्र आईलाच अर्पण केलं आहे.

या आईला– वर उल्लेखिल्याप्रमाणे– मुलगी झाली म्हणून सासरच्या माणसांनी छळ चालू केल्यामुळे पळून जाऊन आईने दुसरा घरोबा केल्यामुळे– माहेरचं सुख असं मिळालं नाहीच. माहेरचं सुख न मिळायचं दुसरं आणि भयंकर कारण म्हणजे ती झोळीत असतानाच तिचं लग्न लावण्यात आलं.

या लग्नाला जबाबदार होती लेखकाची आजीच. आपला मुलगा लग्नाच्या वयाचा झाला आहे असं वाटल्यावर ती स्वतःच्या माहेरी गेली आणि मुलासाठी हक्कानं मुलगी मागू लागली. शेवटी मिळाली ती ही मुलगी. आपलं लग्न झालं आहे हे तिला ती परकरी वयात आल्यावर खरंच वाटत नसे. कुठलाही नवरामुलगा घोड्यावरून मिरवत आला की ती 'माझं लग्न करा' असा हट्ट करायची आणि तेवढ्यापुरतं त्या नवऱ्यामुलाच्या मागे बसवून तिची समजूत काढली जायची. लेखक बालवयाचा असताना काही दिवस वडील मुंबईला आणि ही मायलेकरं गावी असे गेले. ते मधून मधून येऊन यांना भेटत.

पण पुढे या सर्वांचंच बिऱ्हाड मुंबईला 'कावाखान्यात' झालं. दहा बाय बाराची खोली, त्यातच नळसंडास कॉमन. आई, आजी आणि चुलत्यांची कुटुंबंही त्याच खोलीत. वस्तीच्या एका बाजूला चोरबाजार, दुसऱ्या बाजूला कामाठीपुरा– गोलपिठ्यातली वेश्यांची वस्ती. अशा या लोकविलक्षण परिसरात आणि त्यात थाटलेल्या बिऱ्हाडात आईचा संसार सुरू झाला.

पदरी दोन मुलं आणि नवरा दारुडा व बायकांचा नादी. नवरा गोदीमध्ये कामाला. पगाराच्या दिवशी पैशासह गाठावं म्हणून बायकोनं मुलांना बोटाशी धरून गोदीच्या गेटपाशी वाट पहात तासन्तास तिष्ठावं आणि नवऱ्यानं कुठल्यातरी वाटेनं निसटून जावं अशी तऱ्हा.

त्यातल्या त्यात सुख एवढंच की, दारूच्या नशेत त्यानं बायकोच्या अंगावर कधी हात टाकला नाही. आणि बायकोचीही नवऱ्यावरची भक्ती की काय म्हणायची की, त्यानं मागितली की जवळची पैशांची पिशवी ती त्याच्या स्वाधीन करायची.

नवऱ्याला बायकांचा अतोनात नाद. कामावर असलेल्या बायका, वेश्यासाऱ्यांची त्याला चव. मुलाच्याही देखत बायांना भेटायला त्याची ना नाही.

पण लेखकाच्या आईचं विलक्षणपण असं की, असा हा नवरा गेल्यावर तिनं– माहेरच्या नातेवाईकांचा आग्रह होऊनही– दुसरं लग्न केलं नाही. ती त्या नवऱ्याला एकनिष्ठ राहिली, त्याचे गुण आठवत डोळे गाळीत राहिली.

नवऱ्याच्या पाठीमागे लेखकाच्या आईने कंबर कसली. आपला मुलगा आणि मुलगी यांना घेऊन ती गावी गेली. तिथलं आपलं काट्यानं भरलेलं अंगण तिनं

साफ केलं. घराची झाडसारव केली. शेताचा तुकडा खंडानं दिला आणि स्वत: शेतमजुरीचे कष्ट उपसत राहिली.

या साऱ्या कष्टाच्या आयुष्यातही मुलाला, मदतीसाठी कामाला न लावता, शिकवायचा ध्यास तिनं घेतला. आणि लेकाच्या आयुष्याचा पोतच बदलून टाकला. आज तो एक आघाडीवरचा दलित लेखक म्हणून गाजतो आहे, या कीर्तीचं बीज रोवलं ते आईनंच. 'आयुष्यात एकाला तरी सगळं खरं सांगावं' असं आईनं त्याला शिकवलं होतं. ही शिकवण अंमलात आणून त्यानं आपल्या अनुभवांना कवितांतून आणि या आत्मचरित्रातून वाचा फोडली.

मुलाचं शिक्षण होईपर्यंत आयुष्याशी अशी शूरवीरपणानं लढलेली आई घरात सून येताच सामान्य सासूसारखी वागायला लागलेली दिसते. मुलगा शिक्षित असल्यामुळे इतर पुरुषांच्या मानानें आपल्या बायकोशी सौजन्याने वागत असे. त्याचा अर्थ तो बाईलवेडा झाला असा घेऊन आई मुलाला 'बैल' म्हणू लागली. 'माझ्यापेक्षा भारी पातळ बायकोला घेतोस' असं गैरसमजुतीच्या पोटी त्याला बोलू लागली. विशेष म्हणजे सून एका मुसलमान मुलाशी बोलताना दिसली, तरीही सांगूनही मुलगा तिला रागावत नाही म्हणून स्वत: घर सोडून निघून गेली. वास्तविक, या प्रसंगी तरी तिनं सुनेशी व त्या मुलाशी बोलून खऱ्या– खोट्याचा छडा लावायचा होता, म्हणजे पुढचा अनर्थ टळला असता नि सुनेवर व तिच्या मुलीवर (म्हणजे लेखकाच्या आईच्या नातीवरच ना?) आलेली आपत्ती आली नसती, असे मनात आल्यावाचून रहात नाही. मात्र हीच आई मुलाला 'पुन्हा लग्न कर, भंग्याची का होईना मुलगी घरात आण' असं सांगते.

आपल्या मुलानं मुलींशी वागताना जपून वागावं अशी या आईची इच्छा असते. त्याने आपल्या वडिलांच्या वळणावर जाऊ नये म्हणून ती दक्षता घेत असते. गऊ नावाच्या वडारी मुलीशी तो जास्त लगट करताना दिसल्यावर ती त्याला रागावते. तसेच एका मुस्लिम मुलीच्या बाबतीतही घडते. असं असताना आपल्या बायकोशी तो आधी प्रेमानं वागतो ते तिला आवडत नाही आणि नंतर संशयानं त्यानं तिला व मुलीला टाकून दिलं, सुनेनं म्हाताऱ्या माणसाशी लग्न केलं व मुलीला मुरळी करायची धमकी दिली तरी ही बाई काही करत नाही.

एक तर ती इतक्या वर्षांच्या जीवनसंघर्षानं व वयानं थकली तरी असावी किंवा एका स्त्रीला दुसऱ्या स्त्रीवर झालेला अन्याय समजतच नाही, तसंच काहीतरी झालेलं असावं.

मुलाच्या शिक्षणासाठी जीव पाखडणाऱ्या या बाईनं मुलीला शिकवण्याचा मात्र विचार करू नये, हे मात्र खटकते. डॉ. आंबेडकरांनी मुलांना आणि मुलींना शिकवायचं असंच नव्हतं का सांगितलं? पण मुलीला शिकवायचे या बाईच्या मनात आले नाही हे खरे! मुलाच्या बाबतीत ती जनरहाटीच्या विरुद्ध झगडली, मुलीच्या बाबतीत तसं करायची तिला गरज भासली नाही. एवढेच नव्हे, तर

तिच्या लग्नाच्या खर्चासाठी ती मुंबईतल्या रस्त्यावरचे कागद वेचत राहिली !

अति कष्टाने, चुलीपुढे तासन्तास बसण्याने ही बाई आजारी पडते, पुढे पोटात गोळा होतो. पण शस्त्रक्रियेच्या खोलीत नेल्यावर तिथली चकचकीत शस्त्रे बघून ती शस्त्रक्रियेला नकार देते आणि मृत्यूला सामोरी जाते.

लेखकाच्या आईशेजारी त्याच्या जमनामावशीचं चित्र ठेवून पहाण्यासारखं आहे. ही दिसायला सुंदर. त्यामुळे नवरा सारखा तिचा संशय घ्यायचा. शेवटी त्यानं स्वतःच तिला वेश्यावस्तीत विकून टाकलं. नवऱ्याचा बायकोवर या मर्यादे-पर्यंत अधिकार समाजही मान्य करतो आणि ती बायकोही मान्य करते हे विलक्षणच! ‘उपरा’ मध्ये आपण सौंदर्यामुळे नवऱ्याच्या संशयाची बळी झालेल्या, आणि नवऱ्यानं पैशासाठी गहाण ठेवलेल्या दोघी बायकांची चित्रे पहाणारच आहोत.

वेश्यावस्तीतल्या एका पिंजऱ्यात जमनाचा मुक्काम मग होतो. योगायोगानं लेखकाचा एक नातेवाईक पोरवयातल्या लेखकाला या मावशीकडे घेऊन जातो. भाच्याला पाहून ही मावशी गहिवरते. तो निघताना त्याच्या हातावर खाऊसाठी पैसे ठेवते, आणि त्याला पुन्हा कपडे आणि खेळणी घेण्यासाठी पैसे न्यायला बोला-वते. तो तसा जातो. आईच्या नकळत जातो, पैसे घऊन येतो.

सर्व वेश्यांचे होतात तसेच जमनामावशीचेही उतारवयात हाल होतात. आता तरुण झालेला, प्रसिद्धीला आलेला लेखक आपल्या पांढरपेशा मित्रांबरोबर जात असताना त्याला एका भिकाऱ्यांच्या घोळक्यात ती दिसते. तीही त्याला ओळखते, लांबून त्याच्याकडे बघते. पण लेखक तिच्याकडे दुर्लक्ष करून निघून जातो. आपल्या मावशीकडे जायची त्याला लाज वाटते हे एक, आणि स्वच्छतेची खूप आवड अस-लेली आपली पत्नी, तिचा स्वीकार करील की नाही, अशी त्याला शंका वाटते, हे दुसरं कारण.

शेवटी या मावशीला वेड लागतं. वेडाच्या भरातच ती माहेरी जाते. मराय-लाच माहेरी गेल्यासारखी मरते. मग मात्र तिच्या तेराव्या– चौदाव्याचे थाटाचे जेवण द्यायला नातेवाईक मागेपुढे पहात नाहीत.

## काकू

लेखकाच्या आईच्या पिढीतील आणखी एक नातेवाईक स्त्री येते, ती त्याची काकू. लेखकाला दोन काकू आहेत, कारण पहिलीला टाकून देऊन काकानं दुसरं लग्न केलेलं आहे. कुठेतरी प्रवासात असताना पहिली बायको येऊन काकाभोवती घोटाळते, तेव्हा काका तिला बेसुमार बडवून काढतो.

दुसरी काकू जावेचा, पुतण्याचा द्वेष करते. आपण स्वस्थ बसून रहावं आणि विधवा जावेनं सगळं घरकाम करावं, अशी तिची इच्छा असते आणि जावेला ती नाइलाजानं पुरी करावी लागते. एवढंच नव्हे, तर स्वतःच्या इच्छेविरुद्ध मुलाला तिच्याकडे पाठवावं लागतं, कारण मग काका त्याला वर्षाला कपड्याचे दोन जोड

घेतो. पुतण्याचं लग्न झाल्यावर तो आणि त्याची बायको रात्री एकत्र येऊ नये, अशा बेतानं काकूची सगळी वागणूक होती.

एकूण लेखकाच्या आईच्या पिढीच्या वाट्याला आलेलं स्त्रीजीवन पहायला गेलं तर पुढील काही गोष्टी जाणवतात- मूळ गावी पोट भरेना म्हणून ही बिऱ्हाडं मुंबईला आली आणि मिळेल त्या जागेत राहू लागली. दहा बाय बाराच्या जागेत दोन बिऱ्हाडं रहात असल्याचा उल्लेख वर आलाच आहे. नवऱ्यांना कुठंतरी नोकऱ्या असल्या तरी दारूच्या व्यसनात पैशाची माती व्हायची. नवऱ्यानं अनेक बायकांशी संबंध ठेवणं यात फुशारकीच. पण बाईनं मात्र नेकीनं राहिलं पाहिजे.

नवऱ्याच्या कमाईला हातभार लावणे बायकांना सक्तीचेच होऊन बसे. कमाई-साठी कुठले उद्योग या बायकांना अवगत होते ? कागद-चिंध्या वेचणे व त्या विकणें, वेश्यावस्तीतील बायकांची लुगडी धुणे, त्यांना काही चवीचे खायला करून घालणे, असेंच कामधंदे त्या करीत.

सारेच उद्योग अपुरे पडले म्हणजे वेश्याव्यवसायाकडे वळणाऱ्याही काही बायका आहेत. त्यांचीही स्थिती फारशी उत्तम नव्हे. खाटकाच्या दुकानात कापलेले बोकड टांगलेले असावे तसे स्वतःच्या अवयवांचे प्रदर्शन करीत उभे रहायचे. वाट्याला आलेल्या लहानशा जागेतच गिऱ्हाईकाचे काम उरकायचे.

गृहस्थी जीवन नाकारल्या गेलेल्या या स्त्रियांना वाटणाऱ्या वात्सल्याचं वर्णन या पुस्तकात दोन-चार वेळेला आलेलं आहे ते फार हृदयस्पर्शी आहे. गिऱ्हाइकाच्या घरी जाणारी वेश्या त्याच्या मुलांसाठी खाऊ नेत असल्याचं आपण वाचतो, तेव्हा त्या धंदेवालीचं रूपांतर आपल्या मनात एका वंचित मातेमध्ये होतं. लेखकाच्या वडिलांनी हॉटेलमध्ये नेलेली वेश्याही पोरवयातल्या लेखकाचे लाड करते. आणि जमनामावशीने भाच्यासाठी काय केलं, ते आपण वर वाचलंच आहे.

## स्त्री- पुरुष संबंध

या स्त्रियांच्या वैवाहिक जीवनाच्या ओळखीतली एक अमानुष गोष्ट म्हणजे नववधूला तिच्या पहिल्या रात्री भांग पाजून नवऱ्याकडे पाठविण्याची पद्धत होय. लैंगिक जीवनाची सुरुवात अशी मारून, मुटकून होत असल्यावर त्या जीवनाची पातळी काय राहात असेल, याची कल्पनाच केलेली बरी. लैंगिक संबंधाला अनुत्सुक असलेल्या स्त्रीला अनेक स्त्रियांनी धरून पुरुषाला मदत केल्याचेही वर्णन यात आहे. खुद्द लेखकाच्या पहिल्या रात्री त्याच्या खोलीभोवती आसपासच्या बायकांनी पहारा दिला होता. शारीरिक संबंधातील हा एक प्रकारचा कोरडेपणा स्त्रियांना निश्चि-तच सुखावह होत नसेल.

लेखकाची पत्नी ही या पुस्तकातील दलित स्त्रियांच्या तिसऱ्या पिढीची प्रति-निधी. लेखक शाळेत शिकत असतानाच या लग्नाचा प्रस्ताव आलेला. लेखक नव-वधूला प्रथम बघतो तेव्हा ती परकरी पोरच असते. बाजारात काहीतरी विकायला

बसलेली असते. गोरीपान, घारे डोळे असलेली ही मुलगी पाहाताक्षणी लेखक भाळतो, भुलतो. मुलगी अशिक्षित असल्यानें त्याच्या मनाला येणारी नाराजी तिच्या रूपाच्या प्रकाशात केव्हाच उजळून निघते.

अत्यंत पारंपरिक पद्धतीने हे लग्न होते. मानपानावरून भांडणं होतात. सुपाऱ्या मुठीतून सोडवणे, एकत्र आंघोळ करणे, एकमेकांवर खोबऱ्याचा चुरा थुंकणे असले सर्व विधी होतात. जेमतेम मॅट्रिक असलेला लेखक हे सर्व विधी होत असताना चेकाळल्यासारखा वागतो.

मुंबईला लेखकाचे बिऱ्हाड होते. शारीरिक सुखाच्या स्वर्गाचे पहिले काही दिवस संपल्यावर एकमेकांतील मतभेद उघड होऊ लागतात. लेखकाला वाचनाची व समविचारी मित्रांची आवड–पत्नीला दोन्हींचाही राग. लेखकाचा एक मित्र पत्नीशी लगट करतो, शेजारचे मुसलमान तिला नोटा दाखवतात. या दोन्ही गोष्टी तिला संतापजनक वाटतात. ती नवऱ्याच्या कानावर दोन्ही गोष्टी घालते, तर त्याची प्रतिक्रिया थंडपणाची असते. मूल व्हावे म्हणून पत्नी भगताचा अंगारा लावते, तर तिला तो घराबाहेर काढतो व तिनं क्षमा मागितल्यावरच तिला घरात घेतो.

पण पतिपत्नींचे पूर्ण बिनसते ते एका शेरोशायरी करणाऱ्या तरण्या मुसलमान मुलावरून. लेखक पत्नीला मुलीसह हाकलून देतो. ती गेल्यावर स्वतःही सैरभैर होतो. शेवटी एका मुसलमान मुलीच्या प्रेमळ वागण्यामुळे त्याची शारीरिक व मानसिक अवस्था सुधारते.

स्वतःची ही अवस्था वर्णून सांगतानाच लेखकाने पत्नीच्या अवस्थेची दखल घेतली असती तर बरे झाले असते. ते लेखकाने टाळले आहे. तिने शेवटी एका म्हाताऱ्या माणसाशी का लग्न केले, हेही लेखकाला समजलेले नाही. पदरी मूल असलेल्या अशिक्षित परित्यक्ता स्त्रीने खेड्यात जाऊन याहून वेगळे काय करावे अशी लेखकाची अपेक्षा होती?

लेखकाची मुलगी ही या पुस्तकातली चौथी पिढी. ती अशी लहानपणीच आईबरोबर खेडेगावी परित्यक्त जीवन जगलेली. ती जन्मतः अतिशय सुंदर असल्याचं, वर्गातल्याच एका मुलीचं बकुळा हे नाव तिला ठेवल्याचं, ती आपली फार लाडकी असल्याचं लेखक सांगतो. पण खेडेगावात ती आजोळी असताना तिच्यासाठी काही करणे, तिच्या शिक्षणासाठी हेका धरणे, पैसे पाठवणे हे तो काहीच करीत नाही. त्याच्या पत्नीने सुडापायी तिला मुरळी करायचा बेत पाडला नसेल, एवढीच आशा आपण करूया. (दया पवारांनी सांगितले की, त्यांनी ह्या मुलीला मुंबईत आणून तिचं लग्न लावून दिलं– सं.)

लेखकाची द्वितीय पत्नी सुशिक्षित आहे. तिला स्वच्छतेची खूप आवड आहे. झोपडपट्टीतल्या नातेवाईकाच्या लग्नाला मुलींना घेऊन जायला ती साफ नकार देते. (ते नातेवाईक मात्र तिच्यासाठी साडी घेतात.) आपल्या दरिद्री मावशीला ती घरात थारा देईल की नाही, अशी लेखकाला शंका वाटते. लेखकाच्या मुस्लि

प्रेयसीने विणलेला गंजीफ्रॉक ती आठवणीने फरशी पुसायला घेते. या साऱ्या तपशिलातून नव्याने शिकलेल्या, पण स्वतःच्या समाजाशी फटकून वागणाऱ्या दलित सुशिक्षित स्त्रीचे चित्र डोळ्यांपुढे उभे रहाते.

याच काळात उभ्या रहाणाऱ्या रिपब्लिकन पक्षाच्या काही पुढाऱ्यांनी स्त्रियांशी गैरवर्तन केल्याचा उल्लेख पुस्तकात आहे. यातले एक तर सुशिक्षित, पार विलायतेला जाऊन आलेले, खेड्यात गेल्यावर उघड्यावर अंघोळ करायला संकोचणारे, इतरांनी धोतरांचा आडोसा केल्यावरच अंघोळ करणारे. पण या सुधारकी बाण्याचा स्त्रियांशी वागण्यावर काहीच परिणाम होत नाही.

लेखकाच्या जातीतील स्त्रियांच्या वर्णनात आणखी एका मुलीच्या चित्रणाची भर घातली पाहिजे. ती म्हणजे गऊ या वडार जातीतल्या मुलीची. ही चांगली देखणी, मक्याच्या कणसासारखी तांबूस रंगाची. ती वडारी पद्धतीचं नेसण नेसायची, गच्च आवळून. जिथे लेखक विद्यार्थी म्हणून रहात होता आणि जिथे त्याची आई स्वैपाकाचं काम करीत होती, त्या बोर्डिंगजवळ असलेल्या आपल्या बहिणीच्या पालात ती रहात होती.

गऊला वडील नव्हते. आई म्हातारी होती. ज्या बहिणीजवळ ती रहात होती, तिचं लग्न झालेलं होतं, पण तिला मूलबाळ नव्हतं. तिचा नवरा काळाकभिन्न, अक्राळविक्राळ होता. पत्नीपासून मूल झालं नाही की दुसरी पत्नी करायचा भारतीय पुरुषाचा हक्क (समान परिस्थितीत पत्नीला मात्र हा हक्क दिलेला नाही) तोही बजावू इच्छीत असतो व गऊशी लग्न करायचा त्याचा मनसुबा असतो. गऊला अर्थातच तो पसंत नसतो. आणि मूल देऊ न शकलेल्या तिच्या बहिणीचं मत विचारणार तरी कोण?

गऊ लेखकाच्या आईकडे अनेकदा येते, तिच्या कष्टाच्या आयुष्यात तिला मदत करते. तशी ती बहिणीकडेही कष्ट करूनच जगत होती म्हणा.

आपणावर गुदरू पहाणाऱ्या संकटात आधार म्हणून ती लेखकाकडे पहात असावी. तोही तिच्याकडे आकृष्ट झालेलाच होता. पण लेखकाच्या आईनं हस्तक्षेप केला आणि दोघांत काही वावगं घडत नाही. या दोघांचं लग्न होणं शक्य नाही (जातिभिन्नतेमुळे) हे त्याला एक कारण असावं. तसंच लेखकाचं शिक्षण पुरतं झालेलं नव्हतं हे दुसरं. गऊच्या बहिणीच्या नवऱ्याच्या हातातल्या चंद्रभान कुऱ्हाडीलाही लेखक भ्याला. आपल्या मुलानं नुसताच एखाद्या पोरीचा उपभोग घ्यावा आणि त्यात त्यानं आणि आपणही अभिमान बाळगावा, अशा मनोरचनेची मात्र ती नव्हती हे खरं.

शेवटी गऊच्या मेव्हण्यानं पंचायत पंचांना दारू पाजून आपल्या बाजूनं निर्णय करून घेतला. लग्नासाठी कापल्या जाणाऱ्या डुकराच्या किंकाळ्यांत गऊचा आकांत बुडून गेला.

हरिजन स्त्रियांच्या या वर्णनात दोन निसटते, पण आशेचा दिलासा देणारे

उल्लेख येतात. त्यातला एक आहे हरिजन मुलींच्या वेगळ्या वसतिगृहाचा. हरिजन मुलींच्या शिक्षणासाठी चळवळ सुरू झाल्याची ही निशाणी. दुसरा उल्लेख आहे हरिजन स्त्रियांनी सवर्णांच्या विहिरीत पोहरा टाकण्याचे धाडसी पाऊल उचलल्याचा.

लेखकाच्या वर्गात वाण्याबामणाच्या पोरी होत्या. त्या स्वच्छ रहायच्या, त्यांच्या अंगाला साबणाचा, पावडरचा गोड वास यायचा. त्या चांगल्याचांगल्या साड्या नेसायच्या आणि त्यातल्या प्रत्येकीला कितीतरी साड्या असायच्या. आपल्या या उच्चवर्णीय वर्गभगिनींचं आकर्षण लेखकाला आणि त्याच्या मित्रांनाही वाटायचं. त्या पोरवयात ते त्यांच्या प्रेमातच पडायचे. नुसती वह्यांची अदलाबदल झाली तरी स्वर्गाला हात लागल्याचा आनंद त्यांना व्हायचा. वर्गातल्या मुली घरी गेल्यावर लेखक त्यांच्यावर चावट कविता करायचा आणि त्या गाऊन दाखवून मित्रांना खूष करायचा. त्या कवितेत एका मुलीच्या सपाट छातीचाही उल्लेख असायचा.

या सवर्ण मुलींच्या सान्निध्यामुळे स्वतःच्या जातीतील मुली मात्र लेखकाला आवडेनाशा झाल्या. त्या घाणेरड्या रहात, पचापचा थुंकत, केस विंचरत नसत. आपल्या जातीतल्या मुलीच्या प्रेमात त्यामुळे तो कधी पडला नाही. एखादीनं धीटपणानं केलेली लगटही त्यानं झिडकारून लावली. त्यातल्याच एखादीशी त्याचं लग्न करायचे नातेवाईकांचे प्रयत्न त्यानं हाणून पाडले. त्याची प्रथम पत्नी त्याच्याच जातीतली होती, तिचं त्याला आवडलेलं रूप हेच त्यांच्या लग्नाचं एकमेव कारण होतं हे पाह्यलंच आहे.

वर्गातल्या सवर्ण मुलींपैकी बानू नावाच्या मुलीच्या प्रेमात लेखक पडला होता. तिचाही त्याला प्रतिसाद होता. अर्थात हे शाळकरी वयातलं प्रेम होतं. परीक्षा आटोपली की धावत जाऊन तिला पेपर आणि त्याची उत्तरं सांगायची, हा या प्रेमातला एक अविष्कार. मुलांची ट्रिप गेली तिथं ही दोघं गेली होती. नवऱ्याचं नाव घेताना लाजावं तसं लाजत बानू लेखकाचं नाव घेत होती. दोघं मिळून देवदर्शनाला गेले.

पण वर्गातल्या सवर्ण मुलांना त्यांची ही लगट बघवली नाही. त्यांनी त्यांची नावं सगळीकडे लिहून ठेवली. एक महाराचा मुलगा आपल्यातली पद्मिनी भुलवतो, हे त्यांना आवडलं नाही. लेखक घाबरून गावी निघून गेला.

पुढे मोठेपणी दोघांची अचानक गाठ पडली, तेव्हा बानू परित्यक्त स्त्रीचं जीवन जगत होती. लेखकाला तिनं आपल्या घरी खूपदा बोलावलं, पण तो गेला नाही. ती मात्र त्याच्या जात्या आकृतीकडे डोळे लावून बघत बसली. खरोखरच लेखक जर तिच्याकडे गेला असता, तर त्याच्या जातीसह त्याचा स्वीकार करण्याचं धारिष्ट्य तिला, आतापर्यंत बदललेल्या काळानं, दिलं असतं का ?

सलमा लेखकाची मुस्लिम प्रेयसी. त्याच्या समोरच्या चाळीत रहाणारी ही मुलगी नळावरून पाणी आणताना त्याच्या घरावरून जायची– यायची. अंगकाठी सडपातळ, वय सोळा– सतरा, काळेभोर बदामी डोळे. अशी ही मुलगी लौकरच

सिनेमाच्या गाण्याच्या भाषेतून लेखकावर प्रेम व्यक्त करू लागली. पहिल्या पत्नीला सोडून दिल्यापासून लेखक कोसळलेला होता, तो हळूहळू या प्रेमानं सावरू लागला. गाण्यांच्या ओळीतूनच तिला प्रत्युत्तर देऊ लागला.

दोघांचा शारीरिक संबंध येणं शक्यच नव्हतं, कारण सलमा कडक पहाऱ्यात असायची. घराबाहेर पडताना बुरखा घ्यायची. शिवाय तिचा बाप कर्दनकाळ होता. सलमाच्या आईपेक्षा तरुण मुलीशी त्यानं दुसरं लग्न केलं असलं आणि दुसरं बिऱ्हाड केलं असलं, तरी याही घरावर त्याचा तितकाच वचक होता. शिवाय गल्लीतल्या इतर मुलांनाही हे प्रेमप्रकरण पसंत पडलं नसतं. मुसलमान पोरीवर प्रेम करणाऱ्या एका महार तरुणाची त्यांनी मशिदीत नेऊन सुंताच केली होती. (ही मुसलमान मुलं हरिजन बायकांची छेड काढायला मात्र कमी करीत नसत. हरिजन तरुणांनी तालीम सुरू केली तेव्हा ही छेडखानी बंद झाली.)

सलमाचं लग्न करायचं घरातल्यांनी योजलं. तिला पहाण्यासाठी स्थळं येऊ लागली. तीही त्यांच्यापुढे नटूनथटून बसू लागली. पण तिच्या मनातून लेखकाशी लग्न करायचं होतं. तिनं पळून जाऊन लग्न करण्यासाठी लेखकाला चिठ्ठी पाठवली. पण तिच्या धर्मातील लोकांच्या दादागिरीला भिऊन लेखकाने माघार घेतली.

पुढे सलमाचं लग्न झालं. तिनं आपल्या घरी यायचा लेखकाला आग्रह केला. एके दिवशी लेखकाला रस्त्यावरनं जाताना गाठून तिनं घरात नेलंच व त्याचा आदरसत्कार केला.

हे प्रेमप्रकरण लग्नात जरी परिणत झालं नाही, तरी लेखकाची कोसळलेली मनःस्थिती त्यानं सावरली. जणू सलमानं त्याच्यावर औषधोपचार केला.

या सलमाचाही लेखकाच्या प्रथम पत्नीवर राग होता. ती इथं आली तर मी तिला काठीनं मारीन, असं ती म्हणायची. जो प्रकार झाला तो लेखकाची आई व बहीण यांच्या तोंडूनच तिला कळला होता. तिनं सत्यासत्याची शहानिशा केली होती का? का नकळतच पुरुषाच्या पदरात माप टाकलं होतं?

हिंदुमुसलमानसंबंधावर आणि तरुण मुलामुलींच्या प्रेमावर पडलेल्या हिंदी सिनेमाच्या प्रभावावर हे सलमा प्रकरण जाताजाता प्रकाश टाकून जातं, एवढं मात्र खरं.

आतापर्यंत या आत्मचरित्रात पाहिलेल्या दलित आणि दलितेतर स्त्रियांच्या जीवनाचं सार काढून कुणी तो बिंदू आपल्या हातावर ठेवावा अशी यातली सीता आहे. हिला नवऱ्यानं टाकलेली. वासना कोंडल्यामुळे ती हिस्टेरिक झालेली. वयात आलेली मुलं पाहिली की, हिची अवस्था बेभान व्हायची आणि ती लुगडं सोडून रानोमाळ पळायची.

नातेवाईकांची अब्रू या प्रकारामुळे जायची. ते तिला कोंडून ठेवायचे.

पण आपल्या नवऱ्यानं मुंबईत दुसरी बाई ठेवली आहे, हे सीतेला कळतं आणि तिचं वेड अनावर होतं.

या वेडाला आवर बसण्यासाठी सीताचे नातेवाईक आणि गावकरी काय करतात? त्यांच्यापैकी कुणी मुंबईला जाऊन तिच्या नवऱ्याला किंवा त्या ठेवलेल्या बाईला जाब विचारतं? किंवा घटस्फोटासाठी प्रयत्न करतं? किंवा निदान सीताला मनोरुग्णांच्या दवाखान्यात तरी ठेवतं?

छे, छे! हे सारं करणं म्हणजे सीता माणूस आहे, हे कबूल करणं झालं असतं. आणि तिच्या नवऱ्याची चूक झाली, असं कसं बरं म्हणता येईल? भारतीय नवरा कधी चुका करतो का?

शेवटी सीताला शहाणी करण्यासाठी योजिलेला उपाय आहे तिला डाग देण्याचा. डाग देण्यात ज्याचा हात धरता येत नाही, असा एक माणूस तिथे गावात असतोच. सीताच्या समोरच खैराच्या निखाऱ्यात दोन सळया लाल होईपर्यंत तापवल्या जातात. तिच्या कपाळाला, पोटाला त्याचे डाग दिले जातात. ती आभाळभर किंकाळ्या मारते. तरी डाग देणं चालूच रहातं. तिला अगदीच असह्य होऊ नये म्हणून त्या जखमांवर एरंडाची पानं ठेवली जातात.

सीतेचं वेड पुरं बरं झालं नसेल, पण ती या उपायांनी निदान कायमची गप्प रहायला शिकली असेल.

याहून दुसरं काय हवं? तेही बाईच्या जातीला ?

## उपरा

लक्ष्मण माने यांचे हे आत्मवृत्त प्रसिद्ध झाले तेव्हा त्यानेही 'बलुतं' सारखीच खळबळ उडवली. "बलुतं" मधील जगाची मराठी वाचकांना काहीशी तरी माहिती होती. "उपरा" मधील भटक्यांचं जग मात्र त्यांना सर्वस्वी अपरिचित होतं. त्याचं वर्णनही माने यांनी वास्तव शैलीत केलं होतं. त्यामुळे भटक्यांच्या जगाकडे पहायची एक वेगळीच दृष्टी मराठी वाचकांना प्राप्त झाली, असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही.

वर ज्या तीन आत्मवृत्तांचा उल्लेख केला, ती महार जातीतल्या लेखकांची आहेत. ही जात दलित असली तरी तिला खेड्यातील जीवनात एक स्वतःचे स्थान होते. समाजाकडून तिला बऱ्याच प्रमाणात संरक्षण होते. समाजनियमांच्या चौकटीत राहिल्यावर मग त्यांनी गावात नीटपणे रहायला समाजाची हरकत नव्हती. महार-वाड्याला, गावाबाहेर का होईना, जागा दिलेली होती.

पण लक्ष्मण माने ज्या कैकाडी जातीतले आहेत, तिला मात्र समाजात काहीही मान नाही. वास्तविक, सुपादुरड्यांपासून धान्य साठवण्याच्या कणग्यांपर्यंत नित्यो-पयोगी वस्तू बनवून देणारी जमात, पण तिला समाजात कुठलेही स्थान नाही. कच्चा माल जिथे असेल तिथे उतरावे, उतरल्याबरोबर किती कोंबड्या, डुकरं, मुलंमाणसं आपल्याबरोबर आहेत, त्याचा पाटलाला रिपोर्ट द्यावा, गावच्या हागंदरीला, जमेल तितकी स्वच्छता करून, उघड्यावरच रहावे, गावातल्या लोकांशी सौदा करून त्यांना छोट्या-मोठ्या वस्तू बनवून द्याव्यात. त्या वस्तूंची किंमतही ठरलेली अशी

नाही. गाव देईल तो भाव घ्यावा. गावाकडून भीक मागून आणलेल्या अन्नावर गुजारा करायचा आणि कच्चा माल संपल्यावर सामानसुमान- ते अर्थात् गाडग्यामडक्यांचं-व मुलंबाळं गाढवावर लादून पुढे निघून जायचं.

या अशा भटकेपणामुळे गावाचा या माणसांवर विश्वास नाही. आयुष्याला स्थिरता नाही. चालत्या वाटेतच बाळंतपणसुद्धा उरकायचं, तेव्हा मुलांना वाढवण्यातसुद्धा स्थिरता नाही. यामुळेच मुलांना शिक्षण नाही—खुद्द लेखकाचे शिक्षण निरनिराळ्या गुरुजींच्या कृपेने वेगवेगळ्या शाळांतून झालेले आहे- आणि प्रगतीही नाही. ज्या गावाबाहेर यांचा मुक्काम पडलेला असणार, त्यातले गावकरी कायम यांच्याबद्दलच्या संशयाने ग्रस्त. सगळा गाव मिळून यांना मनमानी शिक्षा देणार. असा एक चोरीच्या आळावरून लेखकाच्या आई-वडिलांना गावकऱ्यांनी बडवल्याचा प्रसंग लेखकाने वर्णिलेला आहे, तो या जमातीची असुरक्षितता अधोरेखित करणारा आहे.

अशा या परिस्थितीत लेखक शिकून निघाला हेच विशेष! लेखकाला शिकवावे असा विचार महिलांच्या डोक्यात आला तो बहुधा कुणा समाजकार्यकर्त्याच्या सांगण्यामुळे. लेकाला मास्तर नाही तर कारकून करायची अवाढव्य महत्त्वाकांक्षा त्यांच्या बोलण्यामुळेच वडिलांच्या मनात उत्पन्न झालेली. आपल्या भ्रमंतीच्या एका गावी तो पोराला शाळेत घालतो. पोरगा रीतसर पळून येतो.

या मुलाच्या शिक्षणाची पहिली पायरी घट्ट व्हावी यासाठी त्याची आई अप्रत्यक्षपणे कारणीभूत झालेली आहे. मुलगा शाळेत गेला तर शेरड्या, गाढवं राखायला कोण, हा तिला पडलेला एक प्रश्न. आणि दुसरं म्हणजे या शेंबड्या, गबाळ्या मुलाला सवर्ण मुलं वर्गात तर घेत नव्हतीच, पण चिडवीतही होती. म्हणून आई त्याला शाळेत घालायला विरोध करते.

हा विरोध मोडून काढायचा वडिलांजवळ उपाय एकच. तो चारपाच फोक एकत्र करतो, त्यांना पिळा घालतो आणि आईला बेदम फोडून काढतो. चारीपाची मुलं आईच्या अंगावर पडली तरी आईला मारायचा थांबत नाही. शेवटी आईला मार बसू नये म्हणून लेखक शाळेतनं पळून यायचं नाही असं ठरवितो. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण चालू ठेवतो.

मुलाच्या शिक्षणाला सुरुवातीला जरी आईचा विरोध असला तरी पुढे ती त्याच्या बाजूनं होते. मुलगा पहिली पास झाल्याचं कळल्यावर तर त्या दिवशी त्याला ती नजरेसमोरून हलू देत नाही. गाढवं, बकरी सांभाळायची कामं त्याच्या शाळेच्या आड येणार नाहीत, अशी ती मुलांच्यात कामांची वाटणी करते.

आणि पुढे आईवडिलांचे पक्ष उलटतात. मुलाच्या वरच्या यत्तेतील शिक्षणाला वडील विरोध करू लागतात आणि मुलाची शिक्षणाची प्रखर इच्छा आहे, हे पाहिल्यावर आई त्याच्या बाजूनं उभी रहाते. त्याला हस्तेपरहस्ते धान्य पाठवते. पैसे देते. मुलाच्या शिक्षणाच्या पैशांची, कपड्यांची सोय परभारे होत असल्याचं कळल्यावर तर तिला इतकं गहिवरून येतं की, ती कितीतरी वेळ मुसमूसून रडते.

मुलगा शिकतो आहे तर त्याच्या पाठच्या मुलीही शिकू देत, हा विचार मात्र आईच्या मनातदेखील येत नाही. एवढंच नव्हे, तर वरच्या यत्तेत गेल्यावर, वर्गातल्या इतर जातींच्या मुली पाहिल्यावरदेखील भावाच्यासुद्धा मनात येत नाही.

कसं आहे आईचं जीवन? तिचं गृहिणीपण कसं आहे याची झलक आपण पाहिलीच. चार गाडग्यामडक्यांचा संसार, तोही गाढवाच्या पाठीवर घालून मुलखापरमुलुखाला न्यावा लागणारा, हौसेची चार भांडी घ्यायला एक तर पैसा नाही आणि दुसरं म्हणजे सुरक्षित घर नाही. चोराला मोह होऊ नये अशीच भांडीकुंडी त्या फिरत्या घरात. तसेच कपडे.

पदरी चारसहा मुलं. एकाच्या कमाईवर कसं निभणार? रानावनात हिंडून फोक आणायचं काम पुरुषांचं. ते नवरा करील. पण फोक आल्यावर, ऑर्डर असेल त्याप्रमाणे, रात्रंदिवस राबून त्याच्या कणग्या विणायला मदत करायलाच लागे बायकोला. गावात घरोघर हिंडून नव्या सुपाटोपल्यांची ऑर्डर मिळवायची, जुनी दुरुस्त करून द्यायची, हे काम बायकोचं. घरोघर हिंडून शिळंपाकं भीक मागून आणणं आणि पोरांची व थोरांची पोटं भरणं हेही काम बायकोचं. कधीकाळी स्वैंपाक करण्यासारखं घरात काही असलं तर, ओलंसुकं जळण उघड्यावरच पेटवून, स्वैंपाक करणं हे कामही तिचं.

ज्या ठिकाणी मुक्काम टाकला असेल तिथले फोक संपले, मालाच्या नव्या ऑर्डरी मिळेनाशा झाल्या किंवा गिऱ्हाईक मालाच्या किमती फारच पाडून मागायला लागलं की, मुक्काम हलवायचा. घरातल्या पुरुषांनी चर्चा करून पुढचा मुक्काम कुठे टाकायचा ते ठरवायचं आणि बायकांनी मध्यरात्रीपासून तयारीला लागायचं. वाटेसाठी भाकरी आणि कालवण करून घ्यायचं. सामानाची गाठोडी बांधून ती गाढवांच्या पाठीवर लादण्यासारखी करायची. दिवस उजाडायच्या आत हा मुक्काम सोडायला हवा ना! मुलं व सामान गाढवांवर नीट लादून मोठ्यांनी पायी चालायला लागायचं.

पुढचा मुक्काम परत नव्या गावच्या हागंदरीला असल्यानं काड्याकुटक्यांचा खराटा करून पालापाचोळा झाडणं, जनावरांनी व माणसांनी केलेली घाण काढणं, उघड्यावरच्या संसाराला पहायला जमा झालेल्या मुलामाणसांना हाकलून लावणं, ही कामं आईनं करायची. पुन्हा गावातल्या लोकांच्या नव्या ओळखी, नवी कामं.

अशा या प्रवासातच लेखकाच्या आईचं बाळंतपण झाल्याचा प्रसंग आहे. आई गरोदर म्हणून लेखकाचे काका-काकू त्यांच्या मुलाबाळांसह त्यांच्याबरोबरच असतात. (भावाला तोडण्यापेक्षा लेखकाचे वडील भांडणाच्या प्रसंगी बायकोला बडवून काढीत) एका मुक्कामात रात्रीच्या वेळी आईचे पोट दुखू लागते, लगेच गूळ आणि चहाची पावडर आणून तिला गरम चहा करून दिला जातो. तिच्या डोळ्यांतून वेदनेनं पाणी वाहू लागतं. चार धोतरांचा तिच्यासाठी आडोसा केला जातो. जाऊ आणि एखाददुसरी वडीलधारी बाई तिच्याजवळ थांबतात. ती फारच ओरडायला लागली तर

'अगं, सोस मुकाटचानं ' असं सांगतात.

शेवटी आईचं ओरडणं थांबतं आणि नव्या बाळाचं टचँहां ऐकू येतं. लेखकाला भाऊ झालेला असतो. समुद्राच्या काठी झालेला म्हणून त्याचं नांव समिंद्रा ठेवलं जातं.

बाळंत झाल्यानंतरच्या सफाईसाठी आवर्जून गरम पाणी वापरलं जातं. नंतर चारच दिवसांत ती कपडे धुवायला, वाळत घालायला लागते. एवढचं नव्हे, तर मोठ्या मुलाला बाळाजवळ बसायला सांगून, काटक्याकुटक्याही गोळा करायला लागते.

बाळंतिणीला आहार म्हणून भात आणि माशांचं कालवण दिलं जातं. लेखकाच्या वडिलांचे देव असतात. नवरात्रात तर नऊ दिवस वडिलांच्या अंगात देव येतो. देवाचं सोवळं कडक. त्यामुळे आईच्या विटाळशीपणात आणि बाळंतपणात पोरं उघडी- नागडीच सोडलेली असतात.

ऐन धंद्याच्या वेळेला बायकोनं बाळंतपण काढलं म्हणून बाप तिच्यावर चिडतोच.

बाळाच्या पाचवीची पूजा गडद अंधारात, काळचा पाठीचं जनावर कापून, मोठी साग्रसंगीत केली जाते. या पूजेच्या आसपास बायकांना मात्र प्रवेश नसतो.

रस्त्यावर बाळंत होण्यासारखाच दुसरा एक लेखकाच्या आईवरचा प्रसंग आहे. चोरीचा आळ आल्याचा. दुरड्याटोपल्या विणायचा कच्चा माल संपला की, मोह होतो लोकांच्या कुंपणाची लाकडं चोरायचा. अशीच एका गावच्या लोकांनी पाळत ठेवून लेखकाच्या आईवडिलांना पकडून भरपूर चोप दिलेला आहे.

आता या दोघांना त्यांच्या गावच्या पाटलापुढे उभं करायचं. पण लेखकाचे वडील सुटून जायचा प्रयत्न करतात, तेव्हा लोक त्याच्या आईच्या लुगड्याला हात घालतात. तेव्हा वडील माघारी फिरून आपल्या अंगातला सदरा तिला घालायला देतात, आणि कसंबसं तिच्या अब्रूचं रक्षण करतात. मग या दोघांचे हात बांधून त्यांच्या गावच्या पाटलापुढे उभं केलं जातं. दोघंही माना खाली घालून उभी असतात. आईचा तर बिचारीचा जीव शरमेनं निम्मा झालेला असतो. लेखक आणि त्याची भावंडं रडून गोंधळ घालतात. त्यांचे मोठे नातेवाईकही सैरभैर झालेले असतात. करू मात्र काहीच शकत नाहीत. गावचे लोक चेकाळल्यासारखे झालेले असतात. चोरी करून या दोघांनी गावची अब्रू घालवली म्हणून संतापलेले असतात आणि त्यांना जबरदस्त शिक्षा लावायची भाषा बोलत असतात.

या सगळ्यात आशेच्या किरणांचा एक झोत रामराव नावाच्या कार्यकर्त्याच्या रूपात येतो. लेखकाच्या आईची होत असणारी विटंबना त्याला सहन होत नाही. सगळ्या गावकऱ्यांच्या विरुद्ध जाऊन तो तिचे हात सोडवतो व तिला घरी जायला सांगतो.

चिडलेले गावकरी तर रामरावाला काठ्यांनी मारतातच, पण लेखकाचे नातेवाईकही आपसात त्याला दोष देतात. एवढंच नव्हे, तर त्या दोघांत काही

पाणी मुरत असावं ' असाही संशय व्यक्त करतात.

सरकारी कामकाजात अडथळा आणल्याबद्दल रामरावाला पोलिस चौकीवर 'नेलं जातं. लेखकाच्या आईवडिलांनाही पोलीस व्हॅनमधून नेलं जातं. पण दुसऱ्या दिवशी सोडलं जातं. लेखक आईला विचारतो, 'फार मारलं का गं तुला ?' (म्हणजे संशयित गुन्हेगाराला पोलीस मारपीट करणारच, हे पोरंसोरंही गृहीत धरतात.) आई मानेनंच नाही म्हणते.

एखाद्या स्त्रीवर अन्याय होताना भल्याभल्यांनी निमूटपणे पहात उभं रहाणं, हे थेट महाभारतापासून चालत आलेलं आहे. पण या अन्यायाविरुद्धही उभं रहाता येतं, हे दाखवणारे रामरावासारखे कार्यकर्ते निघू लागले आहेत, हे स्फूर्तिदायक दृश्य लेखकाने बालवयातच पाहिलेलं आहे. अन्यायाविरुद्ध उभं रहायची जी भाषा तो आता मोठेपणी निर्धाराने बोलतो आहे, तिचा उगम या अनुभवातूनच झाला असेल काय ?

नवऱ्यानं दारू पिऊन बायकोला मारायचं आणि बायकोनं तो मार निमूट-पणे खायचा, हा अनुभव याही लेखकाच्या गाठीशी आहे. पण या लेखकाच्या वडि-लांनी बायकांचा नाद मात्र केलेला नाही. बायकोच्या डोक्यावरचं ओझं आपण होऊन उचलून घ्यायचं, आपणच मारून उठलेल्या वळांवर आपणच रात्री हळद लावून 'फार लागलं का गं ?' असं विचारायचं– असे दोघांच्या प्रेमाचे प्रसंग लेख-कानें वर्णिलेले आहेत.

आणि देवाच्या प्रसादाची दारू दोघांनीही पिऊन केलेल्या शृंगाराचा प्रसंगही यात आहे.

एका पारंपरिक अर्थानं का होईना, संसारात सुखी असणारी, मुलाचा शिक्ष-णाचा हट्ट पुरविणारी ही आई, मुलाचा जातीबाहेरचा प्रेमविवाह मात्र समजून घेऊ शकत नाही. मुलाच्या घरी गेल्यावर, सुनेच्या वागण्याचा, स्वभावाचा पड-ताळा न घेताच, ती मुलाला दोष देते. सुनेच्या हातचा चहादेखील प्यायला नकार देते. यात अर्थात आईचा स्वतंत्र, स्वतःचा असा विचार नाहीच. जातीनं लादलेल्या विचाराच्या चौकटीबाहेर ती जाऊच शकत नाही, हा त्याचा अर्थ आहे.

काही विधी करून जातीने मुलाला आणि सुनेला स्वीकृत केल्यावर मग तीही त्यांना घरात घेते.

जातीबाहेर न जाणं या कल्पनेचा अर्थ केवढा भयंकर असू शकतो ते 'उपरा' मधील पारूमामीच्या उदाहरणाने कळते. कैकाड्याची जात म्हणजे बिना घरा-दाराची, उघड्यावर चालणार, उघड्यावर निजणार. त्यांच्या बायका अशा सतत लोकांच्या नजरेत रहाणार. तेव्हा बघणाऱ्याची नजर वाकडी होऊ नये, म्हणून त्या बायकांनीच सावधगिरी बाळगायची. म्हणजे आठ–आठ दिवस केसांना फणी लावा-यची नाही, नीट अंघोळ करायची नाही, चांगलं लुगडं नेसायचं नाही. शक्य तितकं गलिच्छ रहाण्याचा प्रयत्न करायचा.

पण लेखकाच्या पारूमामीला हे पसंत नव्हतं. ती होती गोरीपान, सडपातळ. तिला रोज स्वच्छ आंघोळ करावीशी वाटे, नीट केस विंचरून वेणी घालावीशी वाटे. तिच्या नवऱ्याला तिचं हे वागणं आवडायचं नाही. तिचा त्याला सारखा संशय यायचा. ती अगदी वैयक्तिक शारीरिक कृत्य करायला गेली तरी याची नजर असायची. लेखकाच्या आईला सुद्धा तिचं हे स्वच्छ रहाणं गरती बाईवाणी वाटायचं नाही.

ती भल्या पहाटे आंघोळ करायला लागली की, कशी कोण जाणे, गावातल्या पुरुषमाणसांना चाहूल लागायची आणि मालाचे भाव विचारायचं निमित्त करून ते तिच्याभोवती घोंघावू लागत.

एक दिवस ही पारूमामी अशीच केस विंचरत बसली होती, समोर आरसा ठेवून. तिच्या नवऱ्यानं ते पाहिलं आणि तो संतापला. तोच आरसा तिच्या तोंडावर आपटून आपटून त्यानं तिचं तोंड फोडून काढलं.

एका रात्री पारूमामी नवऱ्याशेजारीच झोपली असताना गावातल्या दोघाचौघांनी तिचं तोंड बांधून तिला पळवली. तिचा स्त्रीधर्म चालू असतानाही तिच्यावर सगळ्यांनी बलात्कार केला आणि मग तशीच, तिचे हात– पाय– तोंड बांधून, तिला वस्तीवर आणून टाकली. भयानक शारीरिक यातना तिला सोसाव्या लागल्या.

यावर तिच्या नवऱ्याची प्रतिक्रिया काय ? त्यानं वाळूत गडाबडा लोळण घेतली आणि 'घात केला, घात केला' म्हणून बायकोलाच दूषण दिलं. त्यानं बायकोला आपल्याबरोबर रहायला मनाई केली. मुक्काम हलला तेव्हाही तिला येऊ नकोस म्हणून सांगितलं. लेखकाच्या आईवडिलांनी किंवा इतर मोठ्या माणसांनीही तिला आसरा द्यायला नकार दिला.

पारूमामीला पुढे वेड लागलं. 'मारत्याला (म्हणजे नवऱ्याला) मी पंचात खेचणार आहे' असं ती वेडातसुद्धा म्हणायची. खरोखरच, झालेल्या आघातानं खचून न जाता, तिनं पंचापुढे दाद मागितली असती तर? निदान या प्रश्नाची चर्चा तरी झाली असती. चुकलं कोण ? स्वच्छ रहाणारी पारूमामी की तिच्या शेजारी झोपलेला असूनही जागा न झालेला तिचा नवरा? की तिचा अपराध नसताना तिला आश्रय नाकारणारा तिचा आप्तसमूह ? याचाही विचार झाला असता.

लेखकाच्या आईचं मात्र शेवटपर्यंत मत राहिलं की, पारूमामी रोज वेणी घाली, स्वच्छ आंघोळ करी म्हणूनच तिच्यावर हा प्रसंग आला.

या समाजाच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनाचं दर्शन एका आगळ्यावेगळ्या प्रसंगात घडतं. हा प्रसंग आहे 'ओका'चा जातपंचायतीच्या बैठकीचा.

का बसली होती जातपंचायत ? कसला न्यायनिवाडा करायचा होता ? कोणी दाद मागितली होती ? कोणावर अन्याय झाला होता ?

दाद मागितली होती एका स्त्रीनं– आपल्या वकिलामार्फत. अडीचशे रुपये कर्जाच्या बदल्यात तिच्या नवऱ्यानं तिला एकाकडे गहाण ठेवली होती– चार वर्षे.

चार वर्षे ती त्याच्या 'सावकारा' कडे राहिली होती आणि त्यांना एक मूलही झालं होतं. आणि आता तिचा नवरा तिला परत ये म्हणत होता.

नवऱ्याच म्हणणं– मी वायको दिली होती, पण ती कामाला, 'वापरायला' नव्हे.

सावकाराचं म्हणणं– माझ्या पायाला चप्पल बसली म्हणून मी ती घातली.

बायकोचं म्हणणं (सगळ्यांची म्हणणी अर्थात् त्यांच्या– त्यांच्या वकिला-मार्फत) 'मी बोलून– चालून जनावर. चार वर्षे 'तशीच' कशीच राहू ? जो शेजेला देईल तो बाजेला घेणारच. त्यातून आता आम्हाला पोर झालंय. त्याला घेऊन मी नवऱ्याकडे कशी परत जाऊ ?'

पंच सगळ्या वकिलांचं म्हणणं ऐकून घेतात. 'जनावरा'ला ज्याच्या दावणीला जायचं असेल त्याच्याकडे त्यानं जावं, दुसऱ्यानं त्याला लग्नाचा खर्च द्यावा, असा न्याय दिला जातो.

पंचांना भरपूर दक्षिणा मिळालेली असते. तिची दारू अर्थातच भरपूर येते.

विसाव्या शतकात बायको गहाण ठेवली जाते, पंचांनी किंवा खुद्द बायकोनंही या कृत्याला हरकत घेतलेली नाही, हे लक्षात घेण्याजोगे आहे– या कृत्याला किंवा जनावर, चप्पल या संकल्पनांनाही.

मानणाऱ्यांनी समाधान एवढंच मानावं की, शेवटी आपण कुणाबरोबर रहायचं हे ठरवायचं स्वातंत्र्य तरी पंचांनी बायकोला दिलं– म्हणजे गहाण ठेवणाऱ्याबरोबर का चप्पल म्हणणाऱ्याबरोबर.

अर्थात् पंचांना दारू आवडते. त्यामुळे एखादा नवरा स्वतः वडार मुलीशी संबंध ठेवतो, त्या संबंधापासून त्याला चार– पाच मुलं होतात. पण तो पंचांना दारू पाजून त्यांना सांगू शकतो की, 'माझी बायको बदफैली आहे, तिचे एका वडार पुरुषाशी संबंध असून तिला त्याच्यापासून चारपाच मुलंही झाली आहेत, तेव्हा मला तिच्यापासून फारकत मिळावी.' ही मागणी अर्थातच मान्य होते.

जनरीतीला सोडून वागल्याबद्दल पारूमामीला जबर शिक्षा झाल्याचं आपण पाहिलं. गजरा नावाच्या बाईचा नवरा जनरीतीला सोडून वागला, पण शिक्षा झाली गजरालाच. तिच्या मुलांनीच तिला बडवून काढली, समाजानं तिला वाळीत टाकलं. मुलांना मात्र जातीत ठेवलं.

गजराला एके काळी नवरा होता. तो 'शेणाच्या पोवासारखा' बसून रहायचा. गजरानं, दोघांच्या पोटाला कमवायला, तिला शक्य असलेला एकमेव धंदा सुरू केला– शरीरविक्रयाचा. त्यात तिला सात मुलगे झाले. मुलांचे वेगवेगळे बाप. ते काही तिची किंवा मुलांची जबाबदारी घ्यायला तयार नव्हते. तिला तोच धंदा करीत रहावं लागलं. मुलं आणि ती एकत्र रहात होती.

या मुलांशी आपल्या मुलांनी खेळू नये, त्यांच्याकडचं पाणी पिऊ नये अशी इतर आयांची इच्छा असली, तरी मोठ्या मुलग्यांची लग्नं झाली होती. म्हणजे त्यांना

मुली द्यायला कुणाची ना नव्हती असं दिसतं.

आईचा धंदा अजूनही चालू असलेला. तो मोठ्या मुलांना नापसंत. पण हाच धंदा करून तिनं आपल्याला पोसलं, तेव्हा तिला घरातून हाकलून तरी कसं द्यायचं, असा त्यांच्यापुढे प्रश्न होता.

मात्र एके दिवशी– किंवा रात्री म्हणा हवं तर– या प्रश्नाला वेगळंच तोंड फुटलं. गजराची सून गजराशेजारी निजली होती. इतके दिवस गजराकडे येणारं तिचं एक गिऱ्हाईक सुनेच्या अंथरुणात शिरलं. सून जागी झाली, बिथरली. तिनं खूप आरडाओरडा करून सगळी वस्ती जागी केली.

आपल्या आईमुळे हा प्रसंग आपल्या भावजयीवर आला म्हणून गजराच्या मुलांनी तिला उभी– आडवी बडवली. एक जण तर डोक्यात दगड घालून तिचा जीवच घेणार होता, पण ती कशीबशी वाचली.

मग मुलगे वेगळे राहू लागले. वस्तीनं गजराच्या मुलांना व सुनांना आपल्यात सामावून घेतलं.

गजरा मात्र वाळीत पडली.

लेखकाच्या आईच्या पिढीतल्या या स्त्रियांचं जीवन हे असं आहे. या उदाहरणावरून या जमातीतल्या समग्र स्त्रीजीवनाची कल्पना यावी.

यानंतरच्या पिढीतील आहे समी, लेखकाची वहीण. हिचं बालपण आपल्याला या पुस्तकात भेटतं. ती परकराच्या चिंध्या झालेली, न विंचरलेल्या केसांच्या बटा तोंडावर आलेली, लहान मुलगी आहे. जत्रेच्या दिवशी– वर्षातून एकदा– तिला नवं परकर पोलकं मिळतं. भावाच्या बरोबर गाढवा– बकऱ्यांच्या मागे जायचं, थोडं जळण वेचून आणायचं हे हिचं काम. वडिलांनी भावाला शाळेत घातल्यावर तर तिच्या कामात भरच पडते. भावाला शाळेत घालण्यासाठी वडील आईला मारतात, मात्र आपल्याला शाळेत पाठवायचा विचारदेखील कुणी करीत नाही, हे तिच्या मनाला खटकू नये अशीच तिच्याभोवतीची परिस्थिती आहे.

आईच्या आणि स्वतःच्याही पिढीत कोणी बाई, मुलगी शिकताना ती पहातच नाही. भावाच्या पुस्तकात, खेळता– खेळता देखील, तिनं डोकावल्याचा प्रसंग नाही.

या समीला झोपेत असतानाच एकदम अंगात येतं. ती ओरडते, हातपाय पिळवटू लागते. मग वडिलांच्या अंगात देव येतो. त्यांचा अंगारा तिला लावला की मग ती शांत होते.

काय असेल हे अंगात येण्याचं प्रकरण ? स्वतःकडे सगळ्यांचं लक्ष वेधून घेण्याची ती क्लृप्ती असेल ? आसपास बोलल्या जाणाऱ्या भुताखेतांच्या गोष्टींमुळे मनात भीती बसलेली असेल ? की कुपोषणामुळे खरोखरच आकडी येत असेल ?

पण समी बरी होते. एका जागचा मुक्काम हालला की, गाढवावर बसून आईवडिलांबरोबर दुसऱ्या गावी जाते.

अशीच एका मुक्कामात समीची आत्या आली होती. वडिलांची चुलतबहीण. वडिलांनी तिचा पाहुणचार नीट केला. आईनं कुंकू लावून हातावर खण ठेवीत 'वइन्स या' म्हटलं.

पण आत्या खण घेईना. 'मी तुझ्याकडे खण घ्यायला नाही आले' असं भावाला म्हणू लागली. रडायला लागली. शेवटी तिनं सांगितलं की, माझं दार बंद झालंय, तुझी मुलगी माझ्या मुलाला दे, म्हणजे ते उघडेल. समी त्यावेळी वाळूत खेळत होती.

वडील हतबुद्ध झाले, पण बहीण माघार घेईना. त्यांनी आपल्या इतर भावांशी चर्चा केली आणि शेवटी समी बहिणीच्या मुलाला द्यायचं ठरलं. बघता बघता तिथल्या तिथेच समीचा साखरपुडा झालादेखील.

आणि काही महिन्यांतच लग्नही झालं. नव्या लुगडयाचा बोंगा समीला पेलवत नव्हता. ती बिचारी नवरदेवाबरोबर बसून होती. तोही लहानच. समीला बिचारीला भूक लागली. पण तिला लग्नविधी पुरे होईपर्यंत जेवायला मिळणार नव्हतं. ते मध्यरात्रीच्या सुमाराला पुरे झाले. त्यावेळेपर्यंत ती जागी राहिली असेल, तर जेवलीही असेल.

समी सासरी गेली तेव्हा तिचा भाऊ हमसून हमसून रडला.

पुढे एकदाच समीचा उल्लेख येतो. लेखक मोठा होऊन शिक्षणासाठी समीच्या गावात रहातो. त्या वेळेला त्याला वडील बजावतात, 'पाहुण्यांच्या घरी जायचं नाही, समीला त्रास द्यायचा नाही.' कारण काय, तर 'त्यांच्याकडे चूल पेटत नाही.'

म्हणजे आईपेक्षा समीची अवस्था वाईटच झाली म्हणायची. आईच्या हातात निदान टोपल्यादुरडया विणायचं कसब होतं. समीला ते काहीच न शिकवता संसाराची जबाबदारी मात्र तिच्यावर पडली होती.

दलित स्त्रीपेक्षा सवर्ण स्त्री खरोखरच सुखी आहे का, हा प्रश्न पडावा असा विलक्षण प्रसंग एका पाटलाच्या मुलीच्या बाबतीत घडलेला या पुस्तकात आहे. या पाटलाच्या मुलीचं– बर्गे आडनाव या कुटुंबाचं– लग्न ठरतं तशाच तालेवार घराण्यातल्या एका देखण्या, सुशिक्षित तरुणाशी.

मुलीच्या कुटुंबाचीच नव्हे, तर सर्व गावाचीच लगीनघाई उडून जाते. गावातल्या सर्व बायकांना बांगडया भरल्या जातात. वाजंत्रीवाले वाजवून वाजवून थकून जातात. एकशे एक गाडया वऱ्हाड येतं. हळदी लागतात.

नवऱ्या मुलाच्या मित्रांचे हास्यविनोद सुरू होतात. त्यातल्या एका मित्राजवळ कॅमेरा असतो. सर्वांच्या डोक्यात कल्पना येते– नवऱ्यामुलाचा आणि नवऱ्यामुलीचा एकत्र फोटो काढायची. नवऱ्यामुलीच्या भावाला तिला आणायला फर्मावलं जातं. आणि इथेच भांडणाची ठिणगी पडते. तिच्यात त्या मुलीचं आयुष्य जळून खाक होतं.

मुलीचा भाऊ म्हणतो की, 'अजून लग्न लागायचं आहे. तोवर दोघांचा एकत्र फोटो काढता येणार नाही.' हे म्हणणं रीतीला धरूनच म्हणायला हवं.

हे उत्तर ऐकून मुलाकडची माणसं चवताळतात. मुलाचे वडील शांत स्वभावाचे असूनही या नकारामुळे संतापतात. "अशा छप्पन रांडा आणीन तुझ्यासाठी" असं मुलाला सांगतात. लग्न मोडतं, वऱ्हाड परत जातं.

आपण घेतलेली भूमिका रास्तच आहे, अशी मुलीकडच्यांची खात्री असल्यानं त्यातलं कोणी रदबदलीला जात नाही.

एक लग्न मोडले. मुलीला तस तर ठेवता येत नाही. तिचं लग्न व्हायला हवं. शोध चालू होता. पण त्या मुलीशी लग्न करायला कोणीही तयार होत नाही. भरपूर हुंड्याची लालूचही कुणाला तिच्याशी लग्न करायला आकर्षित करू शकत नाही.

लग्न झालं नसलं म्हणून काय झालं? हळद तर लागली होती ना अंगाला? म्हणजे मुलगी बाटलीच म्हणायची! तिच्याशी कसं कुणी लग्न करायचं?

मुलगी घराबाहेर पडेनाशी होते. पार फिक्कट पडून जाते. हळूहळू हिस्टेरिक व्हायला लागते. अंगावर कपडा ठेवू देत नाही.

गावातल्या बायका म्हणतात 'बोहोल्यावर नवरा मेला असता तरी त्याच्या नावानं आयुष्य काढलं असतं. पण हे कुंवारी रांडवपण कसं निभवायचं?'

ते मुलीला निभवत नाहीच. एक दिवस तिची प्रकृती फारच बिघडते. तिला शहरातल्या दवाखान्यात नेलं जातं. पण औषधोपचारांचा उपयोग होत नाही. तिचा मुडदाच परत आणावा लागतो.

आपल्या पोरवयातल्या लेखकाला हळहळ वाटते. त्यानंही त्या पोरीला पाह्यलेलं असतं. त्याच्या आईला तिनं कधी कधी शिळंपाकं दिलेलं असतं.

लेखक आईला म्हणतो की, आपल्या जातीत बायका एका नवऱ्यापासून सोडचिठ्ठी घेऊन दुसऱ्याशी, तिसऱ्याशी लग्न करतात. वाटलं तर पुन्हा पहिल्याशीही करतात. मग या पोरीचंच हे असं काय झालं?

त्यावर त्याच्या आईनं दिलेलं उत्तर लक्षात घेण्यासारखं आहे. ती म्हणते, आपण काय बन भिकारी माणसं. आपण कसंही वागलं तरी चालतं. पण चांगल्या माणसांनी असं वागून चालत नाही.

स्त्रीवर होणाऱ्या क्रूर अन्यायांच्या कथेबरोबर या प्रवाहाच्या विरुद्ध जाणाऱ्यांच्याही कथा 'उपरा' मध्ये आहेत. या कथेची दिशा तरुण पिढीने पकडली तर समाजात फेरबदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यातली पहिली कथा आहे शिंदे आडनावाच्या मुलींची. या दोघी बहिणी शाळेत लेखकाच्या वर्गात असतात. त्याच वर्गातील मराठा जातीतील तरुणांशी लेखकाची मैत्री असते. ते सगळे कोल्हापूरला महाविद्यालयीन शिक्षणासाठी जातात.

आणि एक दिवस या शिंदे आडनावाच्या मुलीचं लेखकाच्या एका मित्राला आपली लग्नाच्या बाजारातली ससेहोलपट सांगणारं पत्र येतं. बघायला येणारे मुलगे कसे वाटेल ते प्रश्न विचारतात, त्यांची हजारो रुपये खर्चाची कशी मागणी असते, आपल्या गरीब वडिलांना ती मागणी पुरी करणं कसं अशक्य आहे आणि त्यामुळे

सगळं घरच कसं चिंतेत पडलं आहे, वगैरे ती पत्रातून लिहिते. ते पत्र ते मित्र सगळे मिळून वाचतात. मुलीला धीर देणारं एक पत्र पाठवलं जातं.

पण तिचं दुसरं धायकुतीचं पत्र येतं. ती लेखकाच्या मित्राला बोलावून घेते. आधी ठरवलेल्या जागी त्या दोघांची भेट होते आणि त्याला सरळच म्हणते की, इतर शंभर गोष्टी सांगण्यापेक्षा तूच का माझ्याशी लग्न करीत नाहीस?

मित्र चक्रावतो. आपल्या मित्रांत परत येतो. त्यांना सगळी हकीगत सांगतो. आणि हे गरीब घरातून आलेले, अजून विद्यार्थी दशेतच असलेले तरुण हे लग्न घडवून आणायचा घाट घालतात. मुलगी सज्ञान असते. ती पळून येते आणि दोघांचं लग्न लागतं.

नवरामुलगा बेकारच असतो. शिवाय त्याला रहायला जागाही नसते. जागेचा प्रश्न कसाबसा सोडवला जातो. आणि मित्रमंडळी आपापल्या मार्गांनी पैशांची जमवाजमव करून या जोडप्याला पोसते. यात खुद्द लेखकही, आता कॉलेज विद्यार्थी असूनही, वाजंत्री वाजवून पैसा कमावून मदत करतो.

दुसरं उदाहरण खुद्द लेखकाच्या प्रेमविवाहाचं आहे. त्याचं लग्न सवर्ण मुलीशी झालेलं आहे. तो कॉलेजमध्ये असताना युवा क्रांतिदलाचं कार्य करू लागतो. त्याला लायब्ररीत काम मिळतं. तो ज्या घरात रहात असतो त्याच्या मालकाला शशी नावाची मुलगी असते. ती शाळेत जात असते.

शशीला वाचनाचा नाद असतो. लेखक तिला पुस्तकं पुरवतो. दोघांच्या गप्पा होऊ लागतात. लेखक आपले पुरोगामी विचार ऐकवतो. तिलाही ते आतून कुठेतरी पटतात.

दोघांच्या गप्पा शशीच्या घरच्या लोकांच्या डोळ्यांवर येऊ लागतात. मग त्यांच्या नकळत एकमेकांना भेटणं सुरू होतं. आणि अशाच भेटीतून केव्हातरी लग्नाचंही ठरून जातं.

हे लग्न सरळपणानं होणार नसतंच. खुद्द शशीची अनुमती असली तरी घरच्यांचा पक्का विरोध असतो. तिच्यावर सक्त पहारा बसवला जातो.

आशेची गोष्ट एवढीच असते की, काही पुरोगामी मंडळींचा या लग्नाला पाठिंबा असतो. ती या दोघांच्या पाठीशी रहातात आणि हे लग्न पार पडतं.

दारिद्र्य, कष्ट, उपासमार या साऱ्या खडतर व्रतांना पार करीत ह्या लग्नाचे पहिले काही दिवस पार पडतात. आता हे लग्न स्थिर झालेलं आहे. या दांपत्याला दोन मुलंही आहेत. लेखकाला भटक्या जमातीत कार्य करण्यासाठी फोर्ड प्रतिष्ठानतर्फे मानधन मिळालेलं आहे. आपल्या समाजकार्यासाठी तो भ्रमंती करतो आणि पत्नी संसार सांभाळते.

या दांपत्याला त्यांचं लग्न नवीन असताना आलेले शेजारणीचे दोन अनुभव मजेशीर आहेत.

एक आहे वटपौर्णिमेचा. सर्व शेजारणी वडाची पूजा करण्यासाठी नटूनथटून

हातात पूजेची ताटं घेऊन शशीला बोलवायला येतात. नवीन विचारसरणीच्या कुठल्याही स्त्री ला, हाच नवरा सात जन्म मिळावा म्हणून वडाची पूजा करणं, ही कल्पना अमान्य होण्यासारखी. तशीच ती शशीलाही होते.

ती पूजेला येत नाही असं कळल्यावर शेजारणी तिच्यावर तुटून पडतातच, पण असल्या अगोचर बायकोला शिस्त लावीत नाही म्हणून तिच्या नवऱ्यालाही बुळा ठरवितात. वटपूजेचा नकार ठाम ठेवून, पण त्या बायकांच्या बोलण्याने घायाळ होऊन, नवऱ्याच्या खांद्यावर मान ठेवून रडण्यापलिकडे शशीच्या हातात असतं काय?

दुसरा प्रसंग आहे शशीच्या आजारपणात लेखक तिचे कपडे धुतो त्यावेळचा. एका पुरुषाने आपल्या बायकोचे कपडे धुवावे, हे एका शेजारणीला सहन होत नाही. बायको आजारी असली तरी तिनं नवऱ्याला हे असलं कमीपणाचं काम करू द्यावं हे तिला पसंत नसतं. ती लेखकाला तडातडा बोलते आणि त्याच्या पुढची बायकोच्या धुण्याची बादली उचलून स्वतः ते कपडे धुवून देते.

आणखी एक शेजारीण आहे. तिचाही किस्सा लक्षात रहाण्यासारखा आहे. हिचा नवरा जाम दारुडा. रोज संध्याकाळी दारू पिऊन बेहोष व्हायचं, बायकोचा संशय घ्यायचा आणि तिला बदडून काढायचं, हा ह्याचा आवडता उद्योग. बायकोही बिचारी तो रोजचा खुराक खात असते.

एके दिवशी नवरोजी बायकोच्या हातावर रात्रीचे तीन रुपये ठेवतात आणि 'मटणाचे जेवण कर' म्हणून फर्मावतात. तीन रुपयांत मटणाचं जेवण करणं अशक्य आहे, असं बायकोनं सांगताच नवरदेवांना राग येतो आणि ते बायकोला मारू लागतात.

बायकोला मार असह्य होतो. लेखक मध्ये पडू बघतो. घरापाशी गर्दी जमा होते, ती पाहून आणखीही एक कार्यकर्ता धावतो. लेखक आणि तो कार्यकर्ता त्या नवऱ्याला समजावायला लागतात, तर उलट तो त्या दोघांनाच शिवीगाळ करायला लागतो.

आपल्यासाठी या दोघा सज्जनांना आपला नवरा वेडंवाकडं बोलतो आहे, हे मात्र त्या बाईला सहन होत नाही. ती नवऱ्याच्या अंगावर चालून जाते, त्याला उताणा पाडते आणि अक्षरशः बडवून काढते. चार बायका तिला ओढून काढतात तेव्हाच नवऱ्याची सुटका होते.

मात्र तेव्हापासून तो बायकोला मारायचं बंद करतो.

या घटनेपासून काही सर्वसामान्य निष्कर्ष काढणं धोक्याचं आहे हे खरं. पण मार खाणारी बाई निमूटपणे ते सहन करीनाशी झाली तर मार थांबेल, निदान कमी तरी होईल, अशी आशा वाटते.

शेवटी उल्लेख करायचा तो सौ. पाटगावकर या पांढरपेशा, सुशिक्षित प्राध्यापकपत्नीचा. त्यांचे पती कोल्हापुरातील सुधारणावादी कार्यकर्ते म्हणून प्रसिद्ध आहेत. पतीच्या कार्याला त्यांचाही हातभार आहे. लक्ष्मण मानेसारखा मागास जातीतील एक तरुण कार्यकर्ता शिकत असताना या बाई त्याच्या पाठीशी उभ्या राहिलेल्या

आहेत, त्याच्या खाण्यापिण्याकडे तर त्यांनी लक्ष दिलेलं आहे, पण लग्नही या बाईं-च्याच घरी झालेलं आहे.

सुधारकांची वेगळी जात करायला हवी असं आगरकर म्हणाले होते. पुरोगामी विचारवंतांची अशी एक जात तयार होईल का ?

## मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे

आतापर्यंत आपण तीन दलित आत्मचरित्रे– किंवा आत्मनिवेदने म्हणूया हवे तर– पाहिली. आता माधव कोंडविलकरांच्या 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' यातील स्त्रीजीवन पहायचे आहे.

हे आत्मकथन दैनंदिनीच्या स्वरूपाचे आहे. लेखकाला आलेले अनुभव त्याने आपल्या प्रतिक्रियांसह तत्काळ नोंदवलेले आहेत. चांभाराच्या घरात जन्माला येऊनही हा मुलगा शिकला याचे नवल वाटत नाही, कारण याच्या दोघी मोठ्या बहिणीही शाळेत जात होत्या. किंबहुना, मोठ्या बहिणीचे बोट धरूनच आपण शाळेला गेलो असे लेखक सांगतो. यापैकी एका बहिणीचे पत्रही त्याने उद्धृत केले आहे. दलित आत्मचरित्रात, शिकणाऱ्या दलित मुलीचा उल्लेख असा हा पहिलाच आणि एकमेव. डॉ. आंबेडकरांच्या शिकवणीचा प्रभाव फक्त महार जातीवर पडला असे म्हणतात. मग चांभार जातीत जन्माला आलेल्या या मुली कोणामुळे शिकू लागल्या, हे समजून घेणे उद्बोधक ठरेल. विशेषतः, त्यातली एक मुलगी मरण पावूनही, भ्रामक समजुतीच्या आहारी जाऊन, दुसरीचे शिक्षण बंद केले नाही हे लक्षणीय वाटते. अर्थात चौथीपर्यंत शिक्षण झाल्यावर 'मुलीच्या जातीला जास्त शिकून काय करायचं ?' म्हणून ते बंदही केले जाते. आणि लग्नानंतर, संसारातल्या दारिद्र्याला तोंड द्यायला त्या शिक्षणाचा उपयोग झालेला दिसत नाही, हेही खरे. पण भाऊ-भावजय आपल्यासाठी करीत असलेल्या त्यागाची, तिला जी एक सखोल जाणीव आहे, ती या शिक्षणामुळे आलेली असावी का ? काहीही असो, ती या पुस्तकातील इतर स्त्रियांपेक्षा अधिक संवेदनाशील वाटते खरी.

या दैनंदिनीचा पुष्कळसा भाग व्यापलेला आहे लेखकाच्या सजातीयांनी केलेल्या त्याच्या, त्याच्या पत्नीच्या व लहान मुलीच्या छळानें. सखू नावाच्या मुलीला त्याच्याशी लग्न करावेसे वाटत असते– कारण तो मास्तर, बायकोला बसून खायला मिळणार, झुळझुळीत चार साड्या तिला मिळणार, लाकडं गोळा करायला तिला तो बाहेर पाठवणार नाही, इ. इ.– पण तिचा अडाणीपणा व भांडखोर स्वभाव लेखकाला आवडत नाही, त्यामुळे तो तिच्याशी लग्न करीत नाही. या अपमानानें चिडून जाऊन तिचे भाऊ लेखकाला सहकुटुंब सतावून सोडतात. त्या गावाहून बदली होण्यासाठी लेखकाने केलेले बरेचसे प्रयत्न अयशस्वी होतात. या साऱ्याची कहाणी आहे हे आत्मनिवेदन. चांभाराला कराव्या लागणाऱ्या घाणेरड्या कामाचेही वर्णन यात आहे.

लेखक नुसताच शिकलेला नाही, तर त्याला वाचनाची अतिशय आवड आहे. खेड्यापाड्यात वाचनालये कुठली ? तो आपल्या पगारातला बराचसा भाग पुस्तके खरेदी करण्यातच घालवतो. आणि मुख्य गोष्ट म्हणजे आपल्या छळाचे वर्णन करणारे पत्र मुंबईच्या वृत्तपत्रात प्रसिद्धीला देतो. त्या पत्रामुळे पु. ल. देशपांडे, प्रा. शंकर वैद्य, सौ. वैद्य, अशांसारख्या महाराष्ट्रातील मातबर माणसांचे लक्ष त्याच्याकडे वेधले जाते. त्याच्यासाठी ती माणसे हरतऱ्हेची कामे करतात.

मु. पो. देवाचे गोठणे यात जे संवाद आहेत ते चांभाराच्या कोकणी बोलीतच दिलेले आहेत. त्यामुळे ते संवाद वास्तवदर्शी झालेले आहेत आणि त्या व्यक्तिचित्रांनाही एक जिवंतपण प्राप्त झालेले आहे.

## आई

या आत्मचरित्रातील स्त्रियांच्या व्यक्तिचित्रांतही आईचे चित्रण स्पष्ट व ठळक झालेले आहे.

बाकीच्या चारी आत्मचरित्रांतल्या आयांपेक्षा या आईचे चटकन डोळ्यांत भरणारे वेगळेपण म्हणजे आपला दरिद्री संसार सावरण्यासाठी काही कमाई करण्याचे तिच्या मनातही येत नाही. गावातले रस्ते, थोरामोठ्यांचे वाडे झाडणे, शेतमजुरी, करणे, बोर्डिंगमध्ये स्वैंपाकाचे काम करणे, दुरड्याटोपल्या विणणे अशासारखे कुठलेही काम ती करीत नाही, किंवा तिने करावे अशी कोणाची अपेक्षाही दिसत नाही. लेखकाच्या जातीतील कोणीही स्त्रिया वरीलपैकी एखादे काम करताना आढळत नाहीत. आणि तरीदेखील त्यांना त्यामुळे काही कमीपणाची वागणूक मिळते आहे असेही दिसत नाही.

दुसरी पटकन लक्षात येणारी गोष्ट म्हणजे यातला चांभार हा गावचा बलुतेदार नाही. बलुतेदार गावच्या सर्वांचंच काम करीत असल्यानं गावातला प्रत्येकजण तो आपला खाजगी नोकर असल्याप्रमाणे त्याच्याशी वागत असतो. हे अपमानाचे जिणे यातल्या चांभाराच्या वाट्याला आलेले नाही. तो चपला शिवतो आणि गिऱ्हाईक पैसे देऊन त्या विकत घेऊन जाते. यामुळे इतर बलुतेदारांप्रमाणे हे बिऱ्हाड अन्नासाठी गावावर अवलंबून नाही. हक्काचे किंवा भिक्षेचे शिळेपाके अन्न गावकऱ्यांकडून मागून आणून आपले व आपल्या मुलाबाळांचे पोट भरण्याचा मानहानिकारक प्रसंग लेखकाच्या आईवर आलेला नाही. ती नवऱ्याच्या कष्टाचे मिळवलेले अन्न मानाने खाते, मुलाबाळांना भरवते, मग ते कितीही निकृष्ट दर्जाचे असेना का.

तसेच, लग्नाच्या पंगती उठतील, मग पत्रावळीतील उष्टेमाष्टे का होईना, पण अन्न भरपूर मिळेल, नाना उपायांनी आपण ते साठवून ठेवू व अडीअडचणीला पोट भरू असाही विचार यातल्या आईला करावा लागलेला नाही. दारिद्र्यात पण स्वाभिमानाने जगावे अशी तिची परिस्थिती आहे.

तसेच तिला, नवऱ्याने बांधलेले हक्काचे– लहानसे, मोडकेतोडके का होईना-

घर आहे. ओसरी, स्वैंपाकघर, पोटमाळा अशा त्याला सोयी आहेत. सणासुदीला ती ते साफ करते. झोपडपट्टीत रहाणाऱ्या बाईच्या नशिबी येणाऱ्या यातना तिच्या वाट्याला आलेल्या नाहीत. घरात साधीसुधी चार भांडीही आहेत. अगदीच गाडग्या-मडक्यांचा संसार नाही किंवा घरातच जागा व्यापणारी शेळीकरडंही नाहीत.

असं काहीसं सोयिस्कर तिचं जीवन असलं तरी त्यात दारिद्र्य आहे. आपला मुलगा एवढा शिकून नोकरीला लागला तरी त्या दारिद्र्याची आच कमी न करता पुस्तकं घेण्यात पैसा घालवतो हे त्या माऊलीला रुचत नाही. ते ती अनेक वेळा बोलून दाखवते. मुलानें समजा घरासाठी काही केले नाही तरी स्वतःसाठी सोन्याची अंगठी करावी अशी तिची मनोमन इच्छा. इतर चाकरमानी मुलं हे करीत असताना तिनं पाहिलेलं आहे. मुलाच्या शिक्षणाला तिचं सहकार्य असलं तरी मुलाचा वाचनाचा अफाट नाद मात्र तिला समजूच शकत नाही. किंबहुना, मुलाचे शिक्षण त्या मायलेकांत दुरावा आणण्यास कारणीभूत होते असे वाटते.

पण असे तरी कसे म्हणावे ? शिकलेल्या मुलाने नोकरीच्या जागेला जवळ पडावे म्हणून वेगळे बिऱ्हाड केलेले आहे, तर न शिकलेला मुलगा आईजवळ रहातो आहे. त्याची बायको व मुलगीही त्यांच्याजवळच आहेत. या सुनेचे आणि सासूचेही पटत नाही. आणि हा न शिकलेला मुलगा त्या बाबतीत फारसे काही करू शकतो असे दिसत नाही. घरकामावरून, मुलीला घेण्यावरून, सास्वासुनांचे भांडण झाले म्हणजे हा बायकोला बडवतो, बायको मुलीला घेऊन माहेरी जाते. माहेरचे लोक मुलीला न्यायला जावई आला तरच तिला पाठवतात आणि तेही जावयाला 'तुम्हाला बायको सांभाळता येत नाही' असे सुनावूनच !

मात्र या सुनेशी भांडणे होतात म्हणून आई स्वतःचे घर सोडून नोकरीवाल्या मुलाकडे रहायला जायला तयार नाही– त्याने कितीही बोलावले तरी. या बाबतीत तिने मुलाला दिलेले उत्तर तिच्या उपजत शहाणपणाचे द्योतक आहे. ती मुलाला सांगते की, आमची भांडणं झाली तरी घरात माझी सत्ता आहे. मुलींना माहेरी येता येतं, मुलगा घरी आला तर त्याच्या हातावर अंडी म्हणा, नाचणी म्हणा असं काही ठेवता येतं. घर सोडलं तर माझी ही सत्ता मी गमावून बसेन.

आईनं लेखकाच्या जन्माच्या वेळची आपल्या बाळंतपणाची सांगितलेली हकीगत लक्षात ठेवण्याजोगी आहे. या पाच आत्मचरित्रांत प्रत्यक्ष प्रसूतीचे तीन प्रसंग आहेत आणि एक गर्भपाताचा आहे. लक्ष्मण माने यांची आई खंडाळ्याच्या वाटेवर आडरानात प्रसूत झालेली आहे, माधव कोंडविलकरांच्या आईचे व पत्नीचे प्रसूतिस्थळ कोकणातले आहे. दया पवारांच्या आईचा गर्भपात देशावरल्या एका खेड्यात झालेला आहे, या कुठल्याही प्रसंगी या स्त्रियांना वैद्यकीय मदत मिळालेली नाही. लक्ष्मण माने यांच्या आईच्या प्रसूतीच्या वेळी नात्यातल्याच दोघी– चौघी स्त्रिया तिथे असतात. कोंडविलकरांच्या आईला वडिलांची मदत, तर पत्नीसाठी, प्रायमरी हेल्थ सेंटरवरील डॉक्टर स्वतःच एका गुलाबी प्रकरणात रंगलेला असल्यामुळे, एका

सुईणीची मदत मिळते. कोंडविलकर थोडेसे शिकलेले, आपल्या पत्नीच्या प्रसूतीच्या वेळी तिथे डॉक्टर असावा असे त्यांच्या मनात येऊन ते त्याला आणायला धडपड तरी करतात. पण बाकीच्या तिन्ही प्रसंगात आधुनिक वैद्यकीय मदत मिळवायची कल्पनासुद्धा त्या स्त्रियांना किंवा त्यांच्या पुरुष नातेवाईकांना सुचत नाही. आपल्या वद्यकीय सोयी सामान्य जनतेपासून किती दूर राहिल्या आहेत !

हे थोडे विषयांतर झाले. कोंडविलकरांच्या आईच्या प्रसूतीचा अनुभव आपण पहात होतो. तिच्याच म्हणण्याप्रमाणे नऊ महिने संपले तरी लांबून हंड्याने पाणी आणणे, घरची सर्व कामे करणे, एवढेच नव्हे, तर पायलीचे दळण दळणे ही तिची नित्याची कामे चालूच होती. अगदी प्रसूतीच्या दिवशीसुद्धा तिने दळण दळले होते. उलट, 'तू भरल्या हंड्यावरचा आहेस' असं मुलाला ती कौतुकाने सांगते. दळण दळून झाल्यावर आईच्या पोटात दुखू लागल्यावर डॉक्टर- नर्सला तर राहोच, अडाणी सुईणीलाही बोलवायचं नवरा– बायकोच्या मनात येत नाही. बाई घरीच बाळंतीण होते. नवरा मदत करतो. बाईला मुलगा होतो. आधीच्या सगळ्या मुलीच असल्यामुळे मुलगा झाल्याचाच आनंद आईला होतो. लेकीला मुलगा झाल्याची बातमी कळल्यावर आईवडील भेटायला येतात, पण आई लेकीच्या मदतीला रहात नाही. कदाचित तिलाही आपला दरिद्री संसार सोडून लेकीकडे रहाणे अशक्य असावे.

शिकलेला मुलगा पैसे मिळवीत असून आपल्याकडे बघत नाही ही त्याच्या वडिलांची तक्रार. मुलगा शिकला तरी केवळ प्राथमिक शिक्षक आहे. त्याला पगार कितीसा मिळणार ? पूर्ण खेड्यातील चांभारकी करून वडिलांना मिळणाऱ्या पैशा-पेक्षा तो नक्कीच जास्त असणार. आपली तक्रार वडील वरचेवर बोलून दाखवतात. खरे तर आईचीही तीच तक्रार आहे. पण वडील बोलायला लागले की त्यांनी शिक-वून, लग्न करून दिलेल्या व आता अजिबात न विचारणाऱ्या पुतण्याचं उदाहरण ती घेते आणि मुलाला संरक्षण देते. मुलाचे लग्न झाल्यावर सून काही दिवस आपल्या हाताखाली असावी असे वडिलांना वाटते, पण मुलाचे जेवणाचे हाल होतील म्हणून आई सुनेला मुलाबरोबर पाठवते. अशी बारीकसारीक गोष्टीत ती आपल्या मुलाच्या पाठीशी आहे.

पण खरातांच्या किंवा पवारांच्या आईसारखं कोंडविलकरांच्या आईने आपल्या मुलाचे चारित्र्य घडवले असे मात्र म्हणता येणार नाही. पाणी आणणं, दळण दळणं, घर साफ करणं, स्वैंपाक करणं अशा ओढगस्तीच्या संसारात दिवस काढत असताना मुलाकडे दिलं याहून जास्त लक्ष देणे तिला जमले नसावे.

## पत्नी

लेखकाच्या पत्नीबद्दल लिहिण्यापूर्वी त्यांच्या जातीतील विवाहपद्धतीबद्दल लिहिणे उचित होईल. ही माहिती याच पुस्तकात मिळते.

त्यांच्या जातीत, मुलगा लग्नाचा झाला की, त्याच्यासाठी उपवर मुलींची शोधाशोध सुरू होते. मुलाचे थोरले नातेवाईक मुलीला मागणी घालण्यासाठी तिच्या घरी जातात. मुलीकडची माणसे नीट चिकित्सा करून, मुलगा व त्याचे घरदार पाहून मग मुलगी द्यायची की नाही ते ठरवतात. एखाद्या थोडयाशा शिकून शिक्षिकेची नोकरी करणाऱ्या मुलीला डॉक्टर अगर वकील नवराच हवा असतो. मुलींच्या अशा चोखंदळपणामुळे काही तरुण इतके बाजूला पडतात की मुलगी मिळवण्यासाठी त्यांना भगत गाठावा लागतो.

आपल्या लेखकावरही अशीच पाळी आली होती. तो मुलीकडच्यांना नापसंत असायचे कारण काय होते ? तर तो चारचौघांत मिसळत नाही, कुणाला (गप्पा मारण्यासाठी) हाका मारीत नाही हे. लेखक थोडासा शिकलेला, स्वच्छतेची विशेष आवड असलेला. आईने केलेल्या भाकरीत केस, खडे सापडतात, ते त्याला आवडत नाही. त्याला गटारगप्पांचीही आवड नाही. चारचौघांचा कंपू जमून गावातल्या तरण्याताठ्या पोरींच्या अब्रूचे पंचनामे करतात, त्यात सामील व्हावेसे त्याला वाटत नाही. शिवाय वाचनाची विलक्षण आवड असलेला हा माणूस आपल्या जातीतल्या काय, गावातल्या इतरही माणसांपासून अलग पडलेला आहे. सत्यकथेचे संपादक, दया पवार, बाबा आढावांसारखे पुरोगामी विचारवंत, पु. ल. देशपांड्यांसारखे मान्यवर व्यक्तिमत्व, अशांशी त्याचा पत्रव्यवहार आहे. तो आपल्याभोवतीच्या सामान्य माणसांत रमत नाही. आपल्या वेगळयाच जगात वावरतो.

त्याच्या वेगळेपणाबद्दल त्याच्या ज्ञातिबांधवांनी दिलेली शिक्षा म्हणजे त्याला मुलगीं नाकारणें ही होय. त्याला पसंत असलेल्या एखाद्या शिक्षित मुलीला त्याच्यापेक्षा अधिक शिकलेला, चांगला पगारदार नवरा हवा असतो आणि अशिक्षित, रुक्ष मुलगी त्याला पसंत पडत नाही, असा लेखकाच्या लग्नाचा तिढा होऊन बसतो. अगदी कुठल्या बाजूला गेले असता मुलगी मिळेल, हे विचारायला भगताकडे जाईपर्यंत वेळ येते.

शेवटी मुंबईत राहणाऱ्या एका मुलीशी लग्न जमते. लेखक तिचे नाव उषा ठेवतो. उषा गोरी आहे. लिहितावाचता येण्याइतपत शिकलेली आहे. मुख्य म्हणजे स्वभावाने सौम्य आहे. आपल्या गरीब नणंदेला आपणहून मदत करण्याइतकी माणुसकी तिच्या अंगात आहे. चांभारकीचे काम करणाऱ्या आपल्या दिराच्या प्रकृतीची दुर्दशा तिच्याने बघवत नाही.

या तिच्या सौम्य स्वभावामुळे सखूच्या भावांनी केलेल्या तिच्या छळणुकीला ती रडण्यापलिकडे प्रत्युत्तर देऊ शकत नाही. वसावसा भांडणे, अपशब्द उच्चारणे हे तिच्या स्वभावाच्या बाहेरचेच आहे.

तिला स्वतःला वाचनाची आवड नसली तरी आपल्या नवऱ्याच्या वाचनाच्या नादाला ती आक्षेप घेत नाही. पुरोगामी विचारांच्या सभांना तो जातो त्यालाही ती विरोध करीत नाही.

तिची रहाणी अतिशय स्वच्छ आहे. हा थोडा शिक्षणाचा व थोडा मुंबईच्या रहाणीचा परिणाम. मात्र या स्वच्छ रहाणीमुळे ती भोवतालच्या बायकांच्या कुचेष्टेचा विषय ठरते. थोडेसे शिक्षण, चांगल्या रहाणीच्या काही प्राथमिक कल्पना, एवढ्याशानेही लेखक व त्याची पत्नी त्यांच्या आसपासच्या जगापासून तुटून पडलेली आढळतात.

लेखकाच्या दाट ओळखीची गावातली एक तरुण मुलगी असते. बहुधा सवर्ण म्हणून तिचे त्याच्याशी लग्न होऊ शकत नाही. स्वतःचे लग्न ठरल्यावर ती लेखकाला शेवटचे भेटायला म्हणून शाळेत येते, त्याच्याशी लगट करते. लेखक तिला तृप्त तृप्त करून परत पाठवतो.

जातींच्या उतरंडीत तथाकथित खालच्या जातीचा असल्यामुळे लेखकाचे त्याला आवडणाऱ्या मुलीशी लग्न होऊ नये, ही गोष्ट खेदजनक तर खरीच. पण लेखकानें स्वतःच्या पत्नीशी केलेली प्रतारणा, अधिकच खेदजनक आहे. त्या परिचितेला तृप्त तृप्त करून पाठवल्यावर लेखक घरी येतो व तांदूळ निवडीत बसलेल्या आपल्या पत्नीची मनोमन क्षमा मागतो. पण त्याचा हा अपराध क्षमा करण्यासारखा नव्हेच.

लेखकाच्या आईच्या प्रसूतीचा अनुभव वर दिला आहे. लेखकाच्या पत्नीच्या प्रसूतीचा अनुभव एका पिढीनंतरचा असूनही त्यात फारसा फरक नाही. फरक असेल तर एवढाच की, प्रसूतिवेदनेने तळमळणाऱ्या आपल्या पत्नीची सुटका करायची विनवणी करायला लेखक सरकारी डॉक्टरकडे जातो. पण तो डॉक्टर स्वतःच्याच प्रकरणात गुंतलेला असल्याने 'तुमची केस आमच्या दवाखान्याच्या कक्षेत येत नाही' असे सांगून लेखकाला सरळ वाटेला लावतो.

चांभार जातीच्या बाईचं बाळंतपण करायला सवर्ण जातीतल्या सुइणी तयार नसतात. शेवटी कशीबशी एक मुसलमान सुईण मिळते, नात्यातल्याही कितीतरी बायकांची मदत मिळते आणि अडली बाळंतीण कशीबशी सुटते.

प्रसूतीला मदत करणाऱ्या या सर्व बायकांना दारू पाजायची पद्धत आहे. खुद्द बाळंतिणीलाही उंची दारू पाजायची रीत आहे.

लेखकाच्या आईला नेहमी दारू लागे का ? कारण सून बाळंतीण झाल्यावर आई बाळंतिणीचे करायला तिथे न रहाता घरी निघून जाते तेव्हा तिला ओळखणारी एक म्हातारी म्हणते, ' तिची इथे सोय होत नसेल.'

लेखकाच्या नवजात मुलीचे नाव तो सोनिया ठेवतो. त्याच्या सुशिक्षित लेखकमित्रांना ते नाव आवडते. दलित जातींवर होणाऱ्या अन्यायाचा यशस्वी परामर्श ही सोनिया घेईल, अशी आशा पु. ल. देशपांड्यांसारखे मातबर मित्र व्यक्त करतात.

लेखकाच्या पत्नीने अबोलपणे मदत केलेली लेखकाची गरीब बहीणही आपल्या मनात घर करून रहाते. फारशी शिकलेली नाही. चांभारकीचा धंदा नवऱ्याला आवडत नाही, आणि शिकलेला नसल्यामुळे कुठली नोकरीही मिळत नाही, अशी

ही गरिबीतला संसार रेटणारी बहीण, साध्यासाध्या गोष्टींसाठी भाऊभावजयीवर अवलंबून आहे. ती दोघेही जमेल तेवढी मदत तिला करतात. भावाचा गावात झालेला छळ तिला बघवत नाही, पण त्याची बदली झाल्यावर आपला आधार गेल्याचे तिला वाईट वाटते. आपल्या नवऱ्याला धंदा आवडत नाही, तर तू त्याला नोकरी लावून दे, असे ती भावाला विनवते. भाऊही तिच्या समजुतीखातर हो म्हणतो, पण तो तरी मेहुण्याला कुठली नोकरी देणार ?

चांभाराची सावली चुकवण्यासाठी बाजूने जाणाऱ्या कुळवाडणी स्त्रियांचे वर्णन यात आहे. लेखकाच्या प्रेमात पडलेल्या, पण त्याची जात कळल्यावर दूर जाणाऱ्या ' मला विसरून जा' असे सांगणाऱ्या दोघी सवर्ण तरुणींचा उल्लेख यात आहे. त्यातल्या एकीला तर लेखकाचा शरीरसंबंधदेखील चालला.

पुस्तकासाठी लेखकाच्या पाठीमागे लागणारी, पैसा खर्च न करता वाचनाची हौस भागवणारी बाई जशी यात आहे, तशी एकशेपंचवीस रुपयांची साडी सहज विकत घेऊ शकणारी शिक्षिकाही आहे.

या सगळ्यांपेक्षा वेगळ्या असणाऱ्या एक सुशिक्षित सवर्ण बाई लेखकाच्या वर्तुळात आल्या आहेत त्या म्हणजे डॉ. प्रा. सरोजिनी वैद्य. खेड्यात रहाणाऱ्या, पण वाचनाची तीव्र आवड असणाऱ्या या गरीब शिक्षकाला हरतऱ्हेने पुस्तके पुरवणे याची जबाबदारी या वैद्य दांपत्याने घेतलेली आहे. लेखक पहिल्यांदाच घरी आला असता त्याचे मानाने आगतस्वागत करणे, त्याला आग्रहाने जेवू घालणे, त्याची मुलगी आजारी झाल्यावर डॉक्टरांना फोन करून तिच्या औषधोपचारांची सोय करणे, एवढेच नव्हे, तर बिलही भरणे, तिच्या पथ्यपाण्याबद्दल तपशीलवार सूचना करणे, एवढे अगत्यपूर्ण स्नेहशील आचरण त्यांनी दाखवले आहे.

नव्यानेच शिकून वर येऊ पहाणाऱ्या दलित पिढीला हा असा स्नेह फार मोलाचा वाटतो. सवर्ण-अवर्णांमधील शतकाशतकांचे तडे सांधून यायला या वागणुकीने फार मोठे साह्य होणार आहे.

## सखू

सखूचा उल्लेख वर आलाच आहे. लेखकाच्या गावात रहाणारी, त्याच्याच जातीची ही मुलगी. लेखक पांढरपेशी नोकरी करीत असल्याने त्याच्याशी आपले लग्न व्हावे अशी तिची इच्छा. नवऱ्याच्या आणि आपल्याही अंगावर स्वच्छ कपडे असावेत; लाकडे गोळा करायला आपल्याला रानोमाळ हिंडावे लागू नये एवढ्याच हिच्या संसाराबद्दल माफक अपेक्षा आहेत. तिच्या घरच्यांनाही ही सोयरीक हवी आहे.

पण एक तर ही अशिक्षित आणि शिवाय भांडकुदळ. दुसरीकडे लग्न जमायची शक्यता नाही असे काही वेळा वाटत असतानाही लेखकाचे मन हिच्याशी लग्न करायला तयार होत नाही. लेखकाच्या लग्नाच्या दिवशी त्याच्या अंगाला भरपूर

हळद लावून आपली इच्छा ती पुरी करून घेते.

लेखकाने आपल्या पसंतीच्या मुलीशी लग्न करताच सखू त्याच्यावर अनेक मार्गांनी जो सूड उगवते तो थक्क करणारा आहे. यात ती आपल्या भावांना सामील करून घेते. लेखकाच्या पत्नीला विहिरीवर पाण्यासाठी तासन् तास उभे करणे, तिची घागर पाण्यात टाकून देणे, तिला लाज वाटेल असे बोलणे, एवढेच नव्हे, तर लेखकाच्या छोटया मुलीलाही मारहाण करणे इतक्या क्षुद्र पातळीवरून हा छळ चालू रहातो. सवर्ण वस्तीत जागा मिळणे नाही, सजातीयांकडूनच छळ होत असल्याने शासनाची सहानुभूती नाही अशा परिस्थितीत हे जोडपे असहायपणे दिवस काढते.

## आठवणींचे पक्षी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अमुक एका जातीचे म्हणून त्यांनी आपल्याच जातीतल्या लोकांना 'शिका' असे सांगितले असे जरी नसले, तरी प्रत्यक्षात घडले आहे मात्र तसेच. सर्व दलित जातींत शिक्षणात अग्रेसर राहिली महार जातच. बाकीच्या दलित जातींतले लोक शिकले नाहीत असे नाही, पण त्यांचे प्रमाण तुलनेने नेहमीच कमी राहिले.

ह्याचे एक प्रत्यन्तर दलित आत्मचरित्रांतही दिसते का? पाचापैकी तीन आत्मचरित्रे महार जातीतल्या लेखकांची आहेत. त्यातले शंकरराव खरात तर साठी उलटलेले, म्हणजे लेखनाची इतकी जुनी परंपरा या जातीला आहे.

प्रा. प्र. ई. सोनकांबळे यांच्या 'आठवणींचे पक्षी' या आत्मचरित्रपर लेखनाचा विचार त्यांच्या जातीमुळे इथे केला आहे. अर्थात जात एक असली तरी त्यांचे रहाणे मराठवाड्यातले, आणि त्यांनी तिथल्याच भाषेचा बाज ठेवला आहे. त्यामुळे त्याची लज्जत वेगळीच आहे. बोलीभाषेचा धावतेपणा आणि ठोसपणा त्यांच्या या लेखनाला आहे. मराठीत माणदेशी, कोकणीची नाना रूपे आतापर्यंत वापरली गेली होती, पण मराठवाड्यातल्या बोलीभाषेचा वापर लेखनात असा हा पहिल्यांदाच झाला असावा.

इतर आत्मचरित्रांपेक्षा 'आठवणींचे पक्षी'चे लेखन फारच वेगळे आहे. लेखकाने कॉलेजात शिकत असताना आणि शिक्षण पुरे झाल्यावर वेळोवेळी लिहिलेले, हे आठवणींवर आधारलेले लेख आहेत. प्रत्येक लेख सलग असल्यामुळे आत्मचरित्राच्या लेखनात एक तुटकपणा जाणवतो, तशीच काही अनुभवांची पुनरावृत्तीही जाणवते. कालक्रमानुसार, सर्व अनुभव सांगणारे हे लेखन नव्हेच. जे आठवले ते सांगितले असे त्याचे रूप आहे.

या रूपामुळेच की काय, इतर आत्मचरित्रांप्रमाणे यातून भरीव अशी व्यक्तिचित्रणे मिळत नाहीत. माहितीचे लहान लहान तुकडे गोळा करून एखादे व्यक्तिचित्र जुळवावे लागते.

अशी जुळणी केल्यावर प्रामुख्यानें हाती लागतात ती लेखकाच्या दोघी बहि-

णींची व्यक्तिचित्रे. लेखकाचे आईवडील लहानपणीच गेल्यामुळे पालनपोषण, शिक्षण, मायाममता या साऱ्यासाठी तो या दोघी बहिणींवरच पूर्णतः अवलंबून होता. त्या दोघी बहिणींची त्याच्यावर माया होती.

पण दोघीही बहिणी सासुरवाशिणी होत्या, त्याही अगदीच गरीब घरांत पडलेल्या. गंमत अशी की या दोघींची लग्नं आतेभावांशी झालेली होती. त्यांचे नवरे हे लेखकाचेही आतेभाऊच. पण आपला हा धाकटा मामेभाऊ आपल्याकडे आलेला त्या दोघांनाही आवडत नसे. दोघी बहिणी- त्यातल्या त्यात धाकटी– मग नवऱ्याला चोरून भावाला खाऊपिऊ घालीत.

या दोघींत स्वभावचित्र अधिक ठळक उमटलं आहे मोठ्या बहिणीचं. ही मोठी उद्योगी बाई आहे. कुणाचं शेण काढणं, कुणाकडे लाकडं तर कुणाकडे गवत टाकणं अशी कामं ती करायची आणि त्यात धाकट्या भावानं मदत करायची ती अपेक्षा करायची. मटणाचे तुकडे वेळप्रसंगी उपयोगी पडतील म्हणून ती वाळवून ठेवायची. ती मोठ्या मायेनें धाकट्या भावाला खाऊपिऊ घालायची, पण रागावली तर शिव्याही अशा द्यायची की ज्या कोणत्याही डिक्शनरीत सापडणार नाहीत.

एकदा धाकट्या भावानं शेतात खांदून उरलेले हळदीचे तुकडे, लसणाच्या पाकळ्या आणल्या त्या तिनं साठवून ठेवल्या आणि मग विकून टाकल्या.

धाकटा भाऊ मृतमांस खात नसे. त्यानं ते खावं म्हणजे त्याचं पोट भरेल असं हिला वाटायचं. पण तो ते खायचा नाही. आणि दुसरं काही गरीब परिस्थितीमळे करता येत नाही म्हणून तिला वाईट वाटायचं.

परिस्थिती हलाखीची तर इतकी की लेखकाच्या मॅट्रिकच्या परीक्षेसाठी गावकऱ्यांनी वर्गणी जमवली, तर त्यातलेसुद्धा पाच रुपये त्याला बहिणीला द्यावे लागले.

बहिणीचा नवरा भाड्याने उंट घ्यायचा आणि त्यावरून भाड्याने वाटसरू, सामान हिंडवायचा. पण असं भाडं मिळालं पाहिजे यासाठी तो काही खटपट करायचा नाही. उलट स्वतः उंटावर बसून ऐटीत मिरवायचा. मुलं जेवायला बसली की त्यांच्याबरोबर जेवायला बसायला मात्र तो विसरायचा नाही. मग बहीण त्याच्या माघारी त्याला शिव्या घालायची. नवरा घरी आला की त्याची आई त्याला तिनं बोललेलं सांगायची की मग नवऱ्यानं तिला बडवून काढायची. असं मारणं झालं की पोरवयातला लेखक बिचारा घाबरून दुसऱ्या बहिणीकडे जायचा.

थोरली बहीण गरीब असली तरी तिला धाकट्या भावंडांचं करावं वाटायचं. अशीच एकदा तिनं धाकट्या बहिणीला बाळंतपणासाठी आणली आणि बाळंतिणीसाठी ठेवलेल्या चिमणीमुळे तिची झोपडी, आतल्या सामान सुमानासह, डाळीडळीसह आणि साठवून ठेवलेल्या उंटाच्या गादीतील कापसासह जळून गेली. मग शेजारच्या बायाबापड्यांनी नावं ठेवीत ठेवीत, पण कुणी कपडा, कुणी डाळी असं दिलं आणि बाळंतपण निभावून निघालं.

धाकट्या बहिणीचा स्वभाव त्या मानानं गरीब. तिला नवऱ्याचा धाकही तसाच. धाकटा भाऊ घरी आलेला त्याला मुळीच आवडायचा नाही. भावालाही हे माहीत होतं. तो बिचारा देवळात बसून रहायचा. मग कुणीतरी मुलं हे बहिणीला सांगायची. बहीण मग त्याला घरी घेऊन जायची, नवऱ्याच्या नकळत त्याला जेवू घालायची. नवऱ्याच्या धाकाला घाबरलेला भाऊ देवळात झोपायला जायचा आणि मग बहिणीला न सांगताच निघून जायचा. बहीण बिचारी ते कळल्यावर डोळे गाळत बसायची. अशी ही धाकटी बहीण मोठ्या बहिणीपेक्षा गरीबच होती स्वभावानं.

गुरं चारायला आणणाऱ्या मुलींचं लेखकानं केलेलं वर्णन मजेशीर आहे. डबक्यात बसलेल्या म्हशींना लेखक उठवायचा व त्यामुळे माशाच माशा उडायच्या अन् पोरींना चावायच्या. डबक्यातल्या म्हशींना उठवू नको म्हणून पोरींनी किती सांगितलं तरी लेखक ऐकायचाच नाही. शेवटी त्या पोरींनी लेखकाच्या नावचं भावलं केलं आणि त्याला काड्याकाटक्यांच्या ताटीवर निजवलं.

लेखकाच्या आत्येचा एक प्रसंग आहे. घरावरची अलाबला जावी म्हणून एका सवर्ण स्त्रीनं सात धान्यांची भाकर करून तिला बुरशी आल्यावर लेखकाला वाढली. आत्यानं ती भाकरी पाहिली आणि ती त्या बाईशी जाऊन भांडली. अर्थातच, दुसरे दिवशी ती बाई या पोराला ओरडलीच, भीक मागायला येतोस का माझी बदनामी करायला येतोस म्हणून.

खरूज, कावीळ अशा दुखण्यांना तोंड देत देत, पण लेखक जिद्दीनं शिकला, इंग्रजीचा प्राध्यापक झाला, लेखक म्हणूनही प्रसिद्धीला आला. त्याला त्याच्याच जातीतली, पण चांगली शिकलेली बायको मिळालेली आहे. त्याच्या लेखनाची मुद्रितं तपासण्याइतकी तिला जाण आहे. हिचं फारसं वर्णन आलेलं नाही. उंटावर बसायला ती घाबरते, सवर्णाच्या घरी चहाला बोलावलं जाऊन तिला, मोडकी का होईना, खर्ची दिली जाते असे काही पुसट उल्लेख आहेत.

मुसलमान पाटलिणीनं लेखकाचं आणि त्याच्या पत्नीचं अतिशय मनापासून स्वागत केल्याचं, ऐन रात्री जेवण करून वाढल्याचं वर्णन आहे.

सवर्ण स्त्रियांचा लेखकाचा– निदान पोरवयातला– अनुभव चांगला नाही. स्वच्छतेचं स्तोम माजवणाऱ्या या बायका रस्ते घाण करून ठेवीत.

एका म्हाताऱ्या बाईनं भाकरीच्या बोलीवर मरून, कुजून पडलेलं कुत्रं ओढीत न्यायला लेखकाला सांगितलं. ते काम झाल्यावर सुनेला त्याला भाकरी द्यायला सांगितलं, तर तिनं चतकोराहूनही कमी भाकरी त्या पोराला दिली.

महाराचा पोरगा शिवला म्हणून त्याच्या ओट्यातले बिब्बे एका बाईने काढून घेतले, तर एकीनं 'भीक मागायला येताना नीट झ्यार (जोहार) घाल की' म्हणून त्याला तंबी दिली. शेतात काम केल्यावर, या मुलाला जेवण वाढायची वेळ आल्यावर काही बायका वाढायच्याच नाहीत, तर काही जणी वाढताना अन्न मातीत पडल

तरी फिकीर करायच्या नाहीत.

एका डोळ्यात फूल पडलेली एक कुंभारीण मात्र– लेखक तिच्या भावाचा वर्गमित्र होता म्हणून- त्याला खायला द्यायची. बोर्डिंगमध्ये स्वैंपाकाला असलेल्या बायकांना लेखक मदत करायचा. त्याला कावीळ झाल्यावर त्यातली एखादी त्याला पथ्याचं काढून ठेवायची. काविळीसाठी एका गवळिणीनं त्याला गाईचं दूध द्यायचं कबूल केलं होतं.

असं हे 'आठवणींचे पक्षी'मधील स्त्रीजीवन. त्रोटक उल्लेखांवरून ते एकत्र केलेलं आहे. पण तरी दलित आणि सवर्ण स्त्रियांच्या जीवनाच्या छेदांचे दर्शन देण्यास ते समर्थ आहे.

या पाचही आत्मचरित्रांतील दलित स्त्रीचे व्यक्तिमत्व पहाता काही मुद्दे सुचतात, ते थोडक्यात असे:–

हे पाचही लेखक कमीअधिक प्रमाणात शिकलेले आहेत.यांपैकी एकाची बहीण शिकल्याचा उल्लेख आहे. बाकीच्यांच्या बहिणी निरक्षर आहेत. स्वत: शाळेत जात असतानादेखील बहिणींनी शाळेत जावं असं त्यांच्या आईवडिलांच्या मनात आलं नाही की ह्या भावांच्याही. खुद्द त्या त्या मुलींनीही कधी भावाचे पाटीपुस्तक, कुतूहलानेदेखील, हातात घेतल्याचा उल्लेख नाही. सरकारने केलेल्या सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा नियम मुलींच्या बाबतीत का डावलला गेला?

आपल्या जातीतील मुलींनी शिकायचेय नसते असे मुलींच्या, मुलांच्या आई-वडिलांच्या आणि सरकारच्याही केवढे पक्के बिंबले आहे हे या पाचही आत्मचरित्रां-तून स्पष्ट दिसते आहे. विशेषत:, आपापल्या वर्गात दिसणाऱ्या 'वाण्याबामणांच्या' गोऱ्यागोमट्या, अंगाला सुगंध येणाऱ्या मुलींच्या वर्णनात दंग होत असताना आपल्या बहिणी, किंवा जातीतल्या इतर मुली अशा का शाळेत येत नाहीत याची खंत कुणा-लाही वाटलेली नाही.

बहुतेक दलित स्त्रियांचे बालपणीच विवाह झालेले आहेत. हे या लेखकांच्या आयांच्याही नव्हे, तर बहिणींच्या पिढीच्या बाबतीतही घडलेले आहे. कुठल्याही प्रकारचे शिक्षण अथवा कला अंगात नसताना नवऱ्याचा दरिद्री संसार रेटणे या बायकांच्या नशिबी आलेले आहे, याची एकाही लेखकाला खंत वाटलेली नाही.

रस्ते, तालेवारांची अंगणे झाडणे, शेतमजुरी करणे, टोपल्या- कणग्या विणणे, यातले काहीही न जमल्यास शरीरविक्रय करणे हेच या स्त्रियांच्या नशिबी आलेले आहे. त्यांना वेगळी कलाकौशल्ये शिकवून आधुनिक जगात सन्मानाने कमाई कर-ण्याचे मार्ग दाखवले पाहिजेत.

नाइलाज झालेली दलित स्त्री जितक्या सहजपणाने वेश्याव्यवसायाचा स्वीकार करते तितक्या सहजपणाने, त्याच परिस्थितीत सवर्ण स्त्री करताना दिसत नाही. आत्मसन्मानाचा अभाव दलित स्त्रीत अधिक दिसतो. तसेच, दलित स्त्रीने वेश्या-व्यवसाय करायचा ही त्यांच्यातील पुरुषांची व सवर्ण पुरुषांची समजूत असते. त्यांच्या

व स्वत: दलित स्त्रीच्या मनातून हीनभावना काढून टाकण्याचे हरप्रकारे प्रयत्न केले पाहिजेत.

दलित समाजात वैद्यकीय मदत घेणे अज्ञातच आहे असे दिसते. त्यातल्या त्यात मुलगे आजारी पडले असता बाया औषध आणतील, पण स्वत:वर आलेल्या प्रसूतीच्या किंवा गर्भपाताच्या प्रसंगी डॉक्टरकडे धाव घेणार नाहीत. त्यांच्या नातेवाईकांना आणि त्यांना स्वत:लाही यात काही गैर वाटत नाही. दलित स्त्रीबद्दलची ही भावना बदलली पाहिजे.

'शहरात जा म्हणजे तुम्ही जातीच्या बंधनातून सुटाल' असा डॉ. आंबेडकरांनी आपल्या बांधवांना उपदेश केला. दलित बंधू शहरात गेले व त्यांचे काही फायदे झालेही. पण आता ही शहरे त्यांना पुरेसे उद्योगधंदे देऊ शकत नाहीत. तिथे त्यांच्या बायकांना त्यांच्या संसारात उण्याला पुरे करावे लागते. इथे मात्र ती अगदीच असहाय ठरते. चिंध्या, कागद गोळा करणे अशी अगदीच हलकी कामे तिला करायला लागतात.

शिवाय आता शहरांतून रहायला जागाही मिळत नाहीत. दहा बाय बाराच्या खोलीत चार चार बिऱ्हाडे रहात असल्याचे उल्लेख येतात. अशा बिऱ्हाडात स्त्रीची संसाराची, मुलाबाळांचे कौतुक करायची हौस काय पुरणार? पाणी, संडास सगळ्यांचाच अभाव. त्यामुळे तिचे कष्ट व मानहानी यांना अंत रहात नाही. तेव्हा दलित स्त्रीची स्थिती सुधारायला शहरीकरण हा उपाय आता पुरेसा उरलेला नाही. त्यांच्या त्यांच्या गावीच, सन्मानाने कमाई करीत, स्थायिक होण्याचे उपाय शोधायला हवेत.

दलित पुरुषांच्या आपल्या स्त्रीच्या पावित्र्याबद्दलच्या कल्पना अतिरेकी आहेत. आपण तसे उघड्यावर रहाणारे. आपल्या स्त्रियांवर साऱ्या समाजातल्या पुरुषांची नजर जाणार. तेव्हा त्या स्त्रियांनी गलिच्छच रहावे, वेणी- अंघोळ करू नये अशी समजूत स्त्रीपुरुषांची झाली आहे. स्त्रियाच अस्वच्छ राहिल्याने त्यांचे कुटुंबच नव्हे, तर सारा समाजच अस्वच्छ रहातो. स्वच्छता म्हणजे छचोरपणा नव्हे, हे आता या समाजाने शिकायला हवे आहे.

बलात्कार झालेल्या स्त्रियांची जी दोनतीन उदाहरणे या आत्मचरित्रांत आहेत त्यांना त्यांच्या पतींनी, नातेवाईकांनी थारा द्यायला संपूर्ण नकार दिलेला आहे. वेड लागून मरून जाणे एवढाच उपाय त्यांच्या हाती ठेवलेला आहे. बलात्कार होण्यात बाईची काहीही चूक नसते हे आता दलित स्त्री - पुरुषांनी शिकून घ्यायला हवे आहे.

थोडक्यात म्हणजे स्त्रीच्या, आणि तेही दलित जातीच्या स्त्रीच्या, जन्माला आल्याबद्दल असलेली दलित व सवर्ण स्त्रीपुरुषांच्या मनातील क्षुद्र भावना जाण्यासाठी सर्व समाजाने प्रयत्न करायला हवे आहेत. शिकलेल्या दलित स्त्रीपुरुषांनी तर हे प्रयत्न, त्यांना आपल्या स्त्रियांचे प्रश्न अधिक जवळून माहीत असल्याने, अधिक निकराने करायला हवे आहेत.

अन्यथा, दलितोद्धाराची चळवळ ही पांढरपेशा समाजसुधारकांच्या चळवळीसारखीच एकारलेली रहायची भीती या आत्मचरित्रांतील स्त्रियांच्या दर्शनाने ठळकपणे अधोरेखित केलेली आहे.

४ बलुतं

गो. म. कुलकर्णी

* पुरुषी मन तत्त्वतः स्त्रीमुक्तीचा कैवार घेत असले, तरी वृत्तितः या संदर्भात संकुचित आणि अहंकेंद्रिच आहे.
* बहुतेक पुरुष दलित लेखक स्वतःला क्रांतीचे पाईक म्हणवून घेतात, पण तळागाळातील अगदी तळाच्या गाळात रुतून बसलेल्या स्वसमाजातील स्त्रीच्या मुक्तीसाठी काही हालचाल करीत असल्याचे दिसत नाही.
* आजतरी या दलित स्त्रिया शरीराने विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात असल्या तरी मनाने मध्ययुगीन तमोयुगातच वावरत आहेत.

## 'बलुतं' मधील स्त्रीचं जग

'बलुतं' हे एक आत्मचरित्र आहे आणि कोणत्याही आत्मचरित्रातील जीवनदर्शन वा व्यक्तिचित्रण सामान्यतः आत्मचरित्रलेखकाच्या काळाशी, व्यक्तित्वाशी, परिस्थितीशी अनुबंधित असते. लेखकाच्या 'स्वविशिष्टतेचे' रंग त्यावर चढलेले असतात. यामुळे आजच्या कोणत्याही दलित वा दलितेतर पुरुषाच्या आत्मचरित्रात अवतरणाऱ्या स्त्रीजगाचा विचार करताना, पार्श्वभूमीदाखल आजचे भारतीय जीवन, या जीवनातील राजकीय-सामाजिक-आर्थिक-सांस्कृतिक ताणतणाव, स्त्रीकडे पाहण्याची भारतीय मनाची पुरुषसत्ताप्रधान दुहेरी किंवा दुटप्पी दृष्टी विचारात घ्यावी लागते. आधुनिक प्रबोधनयुगाचे काही उदार संस्करण सुशिक्षित पुरुषी मनावर झालेले असले तरी हे संस्करण फार खोलवर रुजलेले नाही. हे मन तत्त्वतः स्त्रीमुक्तीचा कैवार घेत असले तरी वृत्तितः या संदर्भात संकुचित आणि अहंकेंद्रीच आहे. एक भोग्यवस्तू हीच स्त्रीकडे पाहण्याची त्याची वृत्ती आहे. यातून सवर्ण किंवा अवर्ण सुशिक्षित पुरुष मुक्त नाही. कारण आजचा सुशिक्षित दलित हा, दलितांचे काही खास प्रश्न वगळता इतर बाबतींत, सवर्ण सुशिक्षित पुरुषाचीच प्रतिकृती आहे. सवर्ण सुशिक्षित निदान क्रांतीचा उद्घोष तरी करीत नाही, पण बहुतेक दलित पुरुष लेखक स्वतःला क्रांतीचे पाईक म्हणवून घेतात, सर्वकाळ 'क्रांती, तळागाळातील व्यक्तींचे सर्वांगीण विमोचन' हे स्वतःचे ब्रीद मानतात, पण तळागाळातील, अगदी

तळाच्या गाळात रुतून बसलेल्या, स्वसमाजातील स्त्रीच्या मुक्तीसाठी काही हालचाल करीत असल्याचे दिसत नाहीत. 'बलुतं' मधील दगडूही याला अपवाद नाही.

दगडू स्वत:ला सुशिक्षित म्हणवून घेतो, आंबेडकरी चळवळीशी तो या ना त्या प्रकारे संबंधितही आहे. तो वाङ्मयाचा रसिक भोक्ता आहे. अशिक्षित दलित पुरुषाच्या तुलनेने दगडूची स्त्रीकडे पाहण्याची दृष्टी अधिक उदारही आहे. पण मूलभूतपणे त्याची स्त्रीसंकल्पनाविषयक पारंपरिक पुरुषी चौकट बदललेली नाही. त्याने आपल्या प्रथम पत्नीचा त्याग ज्याप्रकारे केला किंवा जमनामावशीसारखी जवळच्या नात्यातील स्त्री रस्त्यात भणंग अवस्थेत पाहूनही तिच्याकडे त्याने ज्याप्रकारे काणाडोळा केला, त्यात या वृत्तीच्या खुणा आढळतात. त्याचे हे वागणे समजण्यासारखे किंवा क्षम्यही म्हणता येईल. खुद्द दगडूच्या मनातही याबाबत खंत आहेच. प्रस्तुतचा मुद्दा आहे तो दगडूत आढळणाऱ्या पारंपरिक पुरुषी वृत्तीचा, त्याच्या स्त्रीविषयक विचारांवर पडलेल्या सांप्रदायिक बंधनांचा.

परिवर्तनाच्या चळवळीशी संबंधित असलेल्या, सुशिक्षित, विचारी दगडूची जर ही स्थिती, तर त्या संपर्कापासून दूर राहिलेल्या वंचित दलित स्त्री-मनाबद्दल काय बोलावे? दलित स्त्रीमुक्तीची उद्याची दिशा काय असेल ती असो, पण आज तरी या दलित स्त्रिया शरीराने विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जगत असल्या तरी मनाने मध्ययुगीन तमोयुगातच वावरत आहेत. मग ते जग शहरातील असो किंवा खेड्यातील, त्यात तसा काही फरक पडत नाही. या स्त्री जगातील अभावग्रस्तता, अज्ञान, दारिद्र्य, वैफल्य, कोंडमारा, अगतिकता इत्यादी विचारात घेता परंपरेने दलितांवर लादलेल्या साऱ्या दु:खाचे मूर्तीकरण स्त्रीजगाच्या रूपाने झाल्याचे दिसते. 'बलुतं'मध्ये या संदर्भात वापरलेले 'गुहाजीवन' हे शब्द फार बोलके आहेत. या जगात स्त्री म्हणून जन्माला येणे हाच मुळात फार मोठा अपराध ठरतो. केवळ यासाठीही जन्मदात्या मातेचा छळ होऊ शकतो. बायकोला मारणे, टाकणे, छळणे, किंबहुना गहाण टाकणे, विकणे चालू शकते. प्रसंगी वेश्यावृत्ती पत्करणाऱ्या, रस्त्यात भणंग भिकारी होऊन भटकणाऱ्या स्त्रिया या विश्वात भेटतात. या विश्वाच्या परिसराचे 'बलुतं' मधील हे पुढील वर्णन पहा.

एका एका खुराड्यात दोन किंवा तीन पेटा भाडोत्री. मध्ये लाकडी पेटीचं पार्टिशन. ह्या लाकडी पेटीत सारा संसार. रात्रीच्या वेळी वलाण्यावर जुनेराच्या आसऱ्यानं तात्पुरत्या भिंती उभारल्या जायच्या. पुरुष हमाली करीत. कुणी गिरण्या-कारखान्यात कामाला जात.

स्त्रियांना कुणी पड्यात ठेवीत नसत. उलट पुरुषांपेक्षा ह्याच जादा राबत. दारुड्या नवऱ्यानं कितीही बदडलं तरी त्याची सेवा करीत. त्याचे व्यसनाचे लाड पुरवीत. रस्त्यावर पडलेल्या चिंध्या, कागद, फुटलेल्या काचा, लोखंड, बाटल्या वेचून आणणे, रात्रभर त्यांची वेगवेगळी वर्गवारी करणे आणि सकाळीच नेऊन विकणे, हा त्यांचा धंदा. काही बाया जवळच्या कुंटणखान्यातील वेश्यांची पातळं धूत. खिमा-

पावाला कंटाळलेल्या वेश्यांना काही स्त्रिया बाजरीची भाकर आणि बरबाट पुरवीत (पृ.५ आ. दुसरी)

हे स्त्रीजग बाह्यउपाधींनी जसे पछाडलेले आहे, तसे ते आंतरिक ताणतणावांनी पिचलेले आहे. पारंपरिक एकत्र कुटुंबपद्धती, त्यातील हेवेदावे, ताणतणाव, अज्ञान-जन्य रूढी, परंपरा, संकेत, समजुती यांचा या जगात सुकाळ आहे. दिवसभर ढोर-कष्ट उपसून येथील स्त्री कुटुंबसंस्था चालविते, या संस्थेचा तीच आधारस्तंभ असते. पण या संस्थेत तिला स्वतःचा असा कसलाच अधिकार असत नाही.

येथील पुरुष कसाही वागला तरी ते सहन करणे हे या जगातील स्त्रियांचे भागधेय आहे. हिंदुधर्माने सांगितलेल्या पारंपरिक सतीधर्माचे पालन ही स्त्री इमानाने करते. पतिनिधनानंतर पुर्नविवाह करण्यास या समाजात मान्यता आहे. तरीपण पति-निधनानंनर पुर्नविवाह न करता व्रतस्थ वृत्तीने राहण्यालाच या जगात प्रतिष्ठा आहे. या दृष्टीने दगडूची आजी आणि आई यांची उदाहरणे लक्षणीय आहेत. पुर्नविवाहाचा कुटुंबियांकडून आग्रह किंवा त्याबाबतीत छळ होऊनही तसे करण्यास त्या ठामपणे नाकारतात. या जगात बाह्यतः जरी अनैतिकता पसरलेली दिसत असली, तरी येथील स्त्रीचे स्वतःचे असे काही परंपरेने घालून दिलेले नैतिक दंडक आहेत, त्यांचे पालन करण्यात तिला सार्थकता वाटते. वेश्याजीवनासारखे घृणास्पद जीवन परि-स्थितीने वाटचाला येऊनही दगडूवर वात्सल्यभावाचा वर्षाव करणारी जमनामावशी या दृष्टीने संस्मरणीय वाटते.

' बलुतं ' मधील स्त्रीजगात दगडूच्या कुटुंबातील जशा स्त्रिया आहेत, तशा कुटुंबाबाहेरीलही स्त्रिया आढळतात. त्यात मंजुळेसारखी एखाद-दुसरी कजाग स्त्री असली तरी सामान्यतः या सर्वच स्त्रिया संथ, सोशिक वृत्तीच्या आहेत. आपापल्या दुःखात मग्न आहेत. (उदा- अपत्यासाठी झुरणारी विठाबाई) दुःख हा सर्वांचाच स्थायी-भाव असला तरी त्यात प्रकृतिभेद आहेतच. उदा- दगडूच्या कुटुंबातील काकू, आजी आणि आई. काकू काहीशी अहंमन्य आणि कुढ्या वृत्तीची आहे, तर आजी मोकळ्या, प्रेमळ व गोष्टीवेल्हाळ स्वभावाची. आई त्या मानाने अबोल वाटते. 'बलुतं' मध्ये दगडूने आपल्या आजीचे व आईचे केलेले चित्रण जिव्हाळ्याने भरलेले आहे. विशिष्ट दलित स्त्रीजीवनाच्या त्या प्रतिनिधी आहेत. या मायलेकींच्या जीवनात तशी समानता आहे. दोघींच्याही वाटचाला बालपणापासून पोरकेपण आलेले आहे. दोघींचेही पती व्यसनाधीन होऊन अकाली मरतात. या दोघीही कोणाचाही आधार नसता जिद्दीने अनेक प्रकारचे कष्ट उपसून, आपल्या मुलांना वाढवितात. आजीच्या तुलनेने दगडूची आई नव्या पिढीला अधिक जवळची आहे. आपल्या मुलांनी शिकलेच पाहिजे यावर तिचा कटाक्ष आहे. यासाठी ती सर्व प्रकारचे त्रास सहन करते. कष्टा-खेरीज आयुष्यभर दुसरे काहीच तिच्या वाटचाला आलेले नाही.

'बलुतं' मध्ये दगडूची आई सातत्याने वावरते. तिच्या निधनाबरोबर पुस्तका-चाही शेवट होतो. 'बलुतं' हे पुस्तक दगडूने आपल्या आईलाच अर्पण केलेलं आहे.

मानवी मनाच्या गुंतागुंतीच्या दृष्टीनेही दगडूच्या आईचे चित्रण लक्षणीय आहे नवसासायासाने जगलेल्या मुलावर कमालीचे प्रेम करणारी, त्याच्या शिक्षणासाठी सर्व प्रकारचे कष्ट उपसणारी, सून यावी म्हणून त्यासाठी हौसेने पुढाकार घेणारी, पण सून आल्यानंतर आपला मुलगा तिच्या आहारी जातो आहे, या कल्पनेने दोघांचाही दुस्वास करणारी ही स्त्री आहे. मात्र सून आणि मुलगा यांची ताटातूट झाल्यानंतर मुलाची दयनीय अवस्था पाहून ती कमालीची अस्वस्थ होते, धास्तावते. 'वाटल्यास भंग्याच्या मुलीबरोबर लग्न कर, पण लग्न कर' असा मुलाला ती निर्वाणीने उपदेश करते. (येथे भंगी जातीचा आलेला विशिष्ट पद्धतीचा उल्लेख लक्षणीय आहे. जातीजातीतील उच्चनीचतेची मुळे भारतीय समाजात सहजपणेच किती खोल रुजली आहेत, ते त्यातून सूचित होते.)

'बलुतं' मधील स्त्री चित्रणात दगडूच्या दोन्ही बायकांचा उल्लेख आलेला आहे. दुसरी बायको शिकलेली दिसते, पण तिचे उल्लेख 'बलुतं' मध्ये ओझरत्या स्वरूपात आलेले आहेत. जे आले आहेत त्यावरून तुरळक का होईना, पण शिकलेल्या दलित स्त्रियाही पारंपरिक मनोवृत्तीच्याच आहेत, असा समज होतो. दुसऱ्या पत्नीच्या मानाने दगडूची पहिली पत्नी सई बलुत्याच्या संदर्भात अधिक महत्त्वाची आहे. स्त्री-पुरुष नात्याच्या दृष्टीनेही तिचे दर्शन महत्त्वाचे आहे. म्हणून तिचा विचार 'बलुतं' मधील स्त्री पुरुष संबंधाच्या चित्रणाच्या अनुषंगाने करणे इष्ट ठरेल.

## 'बलुतं' मधून प्रकट झालेले स्त्रीपुरुषसंबंध

'बलुतं' मध्ये स्त्री पुरुषसंबंधाचे विविध प्रकारचे चित्रण आले आहे. 'बलुतं' ने या प्रकारच्या चित्रणाला एवढे स्थान दिल्याबद्दल काहींनी 'बलुतं' काराजवळ तीव्र नापसंती व्यक्त केली आहे, तर काहींनी 'सेक्स' बद्दल लेखकाच्या परस्पेक्टिव्हचे कौतुकही केलेले आहे. याबद्दलचे आपले म्हणणे श्री. दया पवार यांनी 'बलुतं' च्या दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने केलेल्या निवेदनात स्पष्ट केलेले आहे. आजच्या दलित जीवनाच्या संदर्भात या प्रकारच्या चित्रणाला महत्त्वाचे स्थान आहे. अगदी एक सूर आहे. सर्व प्रकारच्या सांस्कृतिक सुविधांपासून वंचित राहिलेल्या समाजात या प्रकारच्या संबंधांनाच सनातनी महत्त्व प्राप्त व्हावे, त्यातून एक प्रकारचा उत्तानपणा, उघडेनागडेपणा व्यक्त व्हावा, हे स्वाभाविक आहे. या स्त्री पुरुषसंबंधदर्शनात कुमारकालीन, विवाहपूर्व, विवाहोत्तर, वैधव्यावस्थेतील, अवैध, चोरटचा संबंधांतून उद्भवलेले, वेश्यावृत्तीच्या पातळीवर गेलेले, असे अनेक प्रकार आहेत. यात काफ लव्हचा जसा उल्लेख आहे (उदा- बानू-दगडू संबंध) तसा 'प्लॅटॉनिक लव्ह'चाही (सलमा प्रकरण) आहे कामभावनेने पछाडलेली, वेडाच्या पातळीवर गेलेली (सीता), प्रसंगी पशुसंभोग घेणारीही माणसे 'बलुतं' मध्ये आलेली आहेत. स्त्रीपुरुष संबंधातील उदात्त–अनुदात्त व करुण अशा सर्वच अंगांचे चित्रण येथे आलेले आहे. यात जातीय विषमतेचा जसा भाग येतो, तसा आर्थिक दुरवस्थेचाही येतो. रोकडे-

कुलकर्णी संबंध शोकांतिका ही जातीय दुरभिमानाची द्योतक आहे, तर टोपलीभर भाकरीसाठी देहभोग देणारी स्त्री आर्थिक दुरवस्थेची निदर्शक आहे. चोरटचा संबंधापासून झालेली अपत्यप्राप्ती, अपत्याचा त्याग करण्याचे प्रकरण उघडकीस येणे आणि त्याबद्दल त्या स्त्रीला समाजाने जबर शिक्षा देण्याचा भाग जसा 'बलुतं' मध्ये आढळतो, तसा सासऱ्याने सुनेच्या शय्येत प्रविष्ट होण्याचा केलेला प्रयत्न, जातपंचायतीसमोर त्याची होणारी छाननी आणि मुलाने आपली पत्नी आपण व आपले वडील यांत समाईक असल्याचे दिलेले उत्तरही दिसते. उच्चवर्णीय गणल्या गेलेल्या स्त्रियांच्या घरातील अस्पृश्य नोकराशी असलेल्या चोरटचा संबंधाचा जसा संदर्भ 'बलुतं' मध्ये आहे तसा महार वधू- ब्राह्मण वर यांच्या वैध मार्गाने पार पडलेल्या विवाहाचाही उल्लेख येतो. स्त्रीच्या ताटतुटीमुळे वेडी झालेली किंवा आत्महत्या करणारी माणसेही यात आढळतात. यात बलात्कारांचे उल्लेख जवळजवळ नाहीतच. अजाण विवाहित स्त्रीला तिच्या जेवणातून नकळत भांग चारणे व ती गुंगीत असताना तिचा पतीने उपभोग घेणे, हा प्रकार 'बलुतं' मधील उल्लेखांवरून बराच रूढ असावासा वाटतो. अपुऱ्या जागेमुळे नवविवाहित दांपत्याची होणारी कुचंबणा किंवा परवड आणि आर्थिक दारिद्रचामुळे पत्नीची हौसमौज करता न आल्याची खंतही येथे उमटलेली आहे. स्त्रीपुरुषातील मानसिक, शारीरिक आकर्षणाचे, त्यातील अर्थाचे आणि अनर्थाचे सूचन 'बलुतं' मधून होते.

दगडूच्या जीवनात आलेल्या सलमा आणि सई या स्त्रिया याच्या प्रतिनिधी म्हणता येतील.

दगडू-सई संबंध हा पति-पत्नी-जीवनातील एका वेगळचा पातळीवरील शोकांतिकेचा निदर्शक आहे. हे लग्न नेहमीच्या सांकेतिक पद्धतीने ठरलेले असले, तरी सई दगडूला मनापासून आवडते. आई-सई ताणलेल्या संबंधात तो, आईला न दुखवता, सईला शक्यतो न्याय देण्याचा प्रयत्न करतो. या दांपत्याला अपत्यप्राप्तीही झालेली आहे. तथापि या दोघांत असलेले मूळचे मानसिक अंतर उत्तरोत्तर वाढत जाते. सईचे दगडूवर प्रेम आहे, पण ते मुख्यतः शारीरिक पातळीवर वावरणारे आहे. ती काहीशी पझेसिव्ह प्रवृत्तीची आहे. दगडूने जास्तीत जास्त आपल्याच सहवासात रहावे असे सईला वाटते. दगडूला इतरही अनेक गोष्टींत रस असल्यामुळे सईची ही अपेक्षा तो पूर्ण करू शकत नाही. सई त्रागा करते, हळूहळू मनाने आणि शरीराने ती दगडूपासून दूर जाते, दगडूची वंचना करण्याचा प्रयत्न करते. परिणामी दगडू तिचा त्याग करतो. या सर्व प्रकरणात सईला तसे दोषी धरणेही कठीण आहे. सईच्या विरहाने काही काळ दगडू वेडापिसा होतो, या अनर्थातून सलमासारखी मुलगी दगडूला वाचविते. सई-दगडू-संबंध हे शारीरिक पातळीवरच वावरतात. पण दगडू सलमा संबंधात असा शारीरिक संदर्भ नाही, उलट मानसिक ओढीचाच तो भाग आहे. 'एका स्त्रीमुळं मी पुरा उध्वस्त झालो होतो, तर दुसऱ्या स्त्रीनं मला जीवदान दिलेलं होतं. स्त्रीचं आयुष्यातील सामर्थ्य नव्यानंच ध्यानात आलं होतं.' (पृ. १७८)

हे दगडूचे या अनुषंगाने निघालेले उच्चार या नात्यावर प्रकाश टाकतात.

**स्त्रीचं बदलतं जग**

'बलुतं' पुरताच विचार केल्यास आणि 'बलुतं' मधील एकंदर स्त्रीजीवन पाहिल्यास त्यात काही बदलतेपणा जाणवत नाही. पारंपरिक स्थितिशील जीवनाचाच येथे मुख्यत: प्रत्यय येतो. परंपराग्रस्त स्त्रीमनाला मुलाच्या शिक्षणाबद्दल निर्माण झालेली ओढ किंवा अपवादभूत का होईना, पण वैध पद्धतीने महारब्राह्मण विवाह होणे या, या अंधारमय जीवनातील प्रकाशरेषा म्हणता येतील. एकंदरीने विचार करता, येथील स्त्रीमन नव्या संदर्भात जागृत झाले आहे. नव्या दिशेने वाटचाल करीत आहे असे दिसत नाही. किंवा तसे संकल्पही सूचित होत नाहीत. तसा विचार करण्याजोगी मानसिक अवस्थाच या स्त्रीजगात अद्यापी आलेली नाही. दलित कार्यकर्तेही या दिशेने काही उपक्रम करीत असल्याचे आढळत नाही. 'अंध अंधारी बैसले' अशीच याबाबतची स्थिती आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
3280
वा. क्र. 24428
23155
संदर्भ शाखा

## ५ दलित पुरुषांच्या आत्मचरित्रातील स्त्री विश्व

* मला काय हवं आहे ? आणि मला काय मिळतं आहे ? ह्या संघर्षातून दलित स्त्री अनेकदा वास्तवावर चिडलेली, नाराज दिसते.
* सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा ह्यांच्या मक्तेदारानी तिला करकचून बांधून ठेवलेले दिसते. 'गुरासारखी राब, अर्धपोटी रहा, नाहीतर भोग घ्यायची परवानगी दे' असेच जणू तिला व्यवस्थेने बजावले आहे.
* दलित लेखकांनी घरातल्या स्त्रियांचे आक्रोश आपल्या साहित्यात शब्दांकित केले आहेत.
* वरकरणी मोकळ्या वाटणाऱ्या लैंगिक व्यवहारात स्त्रियांची अधिक परवड, अवहेलना होताना दिसते.
* कुटुंबातील स्त्रीचा स्वतःच्या शरीर- मनावर हक्क आहे हे आजच्या वास्तवातही समाजाला जाणवत नाही.
* आपल्या समाजात प्रत्येक जातीचा, वर्गाचा बंदिस्त कोष आहे. विश्व आहे. ह्या विश्वांची दारे, भिंती चिरेबंदी आहेत. ह्या भिंती आम्ही कशा तोडणार ? आणि वेगवेगळ्या विश्वात पूल कसे उभारणार ? संवाद कसा साधणार ?

डॉ. नीलम गोऱ्हे

### दलित पुरुषांच्या आत्मचरित्रातील स्त्री विश्व

(विशेषतः बलुतं, उपरा, तराळ अंतराळ, मुक्काम पोस्ट देवाचं गोठणं, आठवणीचे पक्षी, संदर्भाने.)

संपूर्ण जगात गेल्या दीडशे वर्षांत समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्व ह्यांचे वारे खेळू लागले. विज्ञानाच्या शोधामुळे बुद्धी आणि शक्ती ह्यांच्या वापराला नवी दालने मिळाली. एकाधिकार, जुलूम, दडपशाही ह्या माणसाच्या मनातीलप्र वृत्तींना वळण लागायला हवे, त्यात बदल घडायला हवेत असे वाटणारी माणसे ह्या प्रवृत्तींविरोधी उभी राहू लागली. माणसाच्या मूलभूत हक्कांचा जाहीरनामा केवळ व्यक्ति-

गत पातळीवर नव्हे, तर सामूहिक पातळीवर महत्त्वाचा भासू लागला. भारतातही इंग्रजी शिक्षणाच्या प्रभावाबरोबर उदारमतवादी विचारांचा प्रवाह उदयाला आला. जगातील वेगवेगळ्या राष्ट्रांतील विचारप्रणाली समजत गेल्यावर विचारी माणसे तुलना करू लागली. अस्वस्थ होऊ लागली. स्वतःला वाटते ते व्यक्त केले नाही तर आपले आयुष्य अपुरे राहील असे ज्यांना वाटू लागले त्यांनी लिखाणातून, भाषणातून आपले विचार मांडायला सुरुवात केली. संस्था उभारायला सुरुवात केली.

'स्त्रिया आणि शूद्रातिशूद्र जातीजमाती ह्यांनी आपली धर्माने सांगितलेली कर्तव्ये केलीच पाहिजेत. समाजातील प्रत्येक माणसाला परस्पराशी बरोबरी करावीशी वाटणे समाजाच्या हिताचे नाही या सनातनी कर्मठ विचाराशी संघर्ष करू पाहणाऱ्यांत विविध प्रवाह होते. धर्मशास्त्रात सुधारणेला वाव आहे का हे शोधून शास्त्राच्या आधारे धर्मसुधारणेचे समर्थन करणारा प्रवाह होता. तर दुसरा प्रमुख असा फुले– डॉ. आंबेडकरांचा प्रवाह चातुर्वर्ण्य, कर्मविपाकाचा सिद्धांत ह्यांना नाकारून नवे पर्याय शोधणारा होता.

दलित पुरुषांची आत्मचरित्रे लिहिण्यामागील प्रेरणा म. फुले आणि डॉ. आंबेडकरांच्या विचाराची आहे. ह्या आत्मचरित्रांपैकी, विशेषतः दलितांपैकी बौद्ध धम्माच्या समर्थकांनी इतिहासात बुद्धाशी नाते जोडलेले आहे. अशा परिस्थितीत खूप अपेक्षा उंचावून आत्मचरित्रे वाचण्याच्या अगोदर वस्तुस्थितीचे निरीक्षण करून त्याचा अर्थही समजावून घेणे महत्त्वाचे आहे. 'जी माणसे स्वतःचे माणूसपण शोधत आहेत ती माणसे आपल्या घरातील स्त्रियांबाबत काय दृष्टीने पहातात' एवढ्याच दृष्टिकोणातून आत्मचरित्रे समजून घेता येणार नाहीत. बलुतं, उपरा, आठवणींचे पक्षी, तराळ अंतराळ, मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे हे सामाजिक उलथापालथीच्या सुरवातीचे हुंकार आहेत. ही आत्मचरित्रे १९७० नंतर प्रसिद्ध झाली असली तरी लेखकांच्या आयुष्यातील पूर्वार्धावर आत्मचरित्रांत अधिक जोर देण्यात आला आहे. ही आत्मचरित्रे, तसेच गबाळ, गावकी, अक्करमाशी, प्रिय बाबा, माज्या जलमाची चित्तरकथा, हाडकी हाडवळा, कार्यकर्ता, या पुस्तकांनी मध्यमवर्गीय पांढरपेशा वाचकाच्या अनुभवविश्वाला धक्का दिला. परंतु ह्या आत्मचरित्रांचे बहुतांशी लेखक आंबेडकरी चळवळीच्या दुसऱ्या पिढीतील आहेत. ज्या माणसांनी या चळवळी कृतिशीलतेने आकारल्या, उभ्या केल्या त्यांतील, १९२० साली तरुण असणाऱ्या, माणसांनी फार कमी लिहिले आहे. ह्यांतील अनेक पुस्तकांत स्थित्यंतर, बदलाचे संदर्भ जरूर येतात, परंतु निर्णयाच्या केंद्रापासून त्या त्या काळात लेखक मंडळी दूरच होती. संवेदनाक्षम माणसे म्हणून त्यांनी हा व्यक्तिगत जीवनप्रवास आपल्यासमोर मांडला आहे. म्हणूनच ह्यात सभोवतालचे अनेक संदर्भ येतात. चळवळीचा प्रकाश पोचल्यावर होणारे बदल नोंदले जातात. पण चळवळीचे दिशादर्शक, निर्माते ही या लेखकांची भूमिका नाही. आणि म्हणूनच स्त्रीप्रश्नाबाबतच्या अनेक मर्यादा, सीमित भूमिका या पुस्तकांतून आपल्याला दिसतात.

'प्रस्थापित मराठी साहित्यातील पुरुषांच्या आत्मचरित्रात स्त्रियांच्या विश्वाला विशेष काहीच स्थान दिसत नाही, याउलट मराठी साहित्यातील स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्रात पुरूषांना खूपच मोठे स्थान आहे' असे मत मध्यंतरी मराठीतील प्रसिद्ध समीक्षक डॉ. भीमराव कुलकर्णी ह्यांनी एका परिसंवादात व्यक्त केले. ह्या पार्श्वभूमीवर तर दलित साहित्यात, त्या तुलनेत स्त्रियांना अधिक स्थान आहे, तिच्या सुखदुःखांचे महत्त्व दलित लेखकांना अधिक वाटते असे नक्कीच म्हणावे लागेल. कारण दलित लेखकाच्या आत्मचरित्रात स्त्रियांच्या विश्वाचे अनेकविध पैलू समोर येताना दिसतात.

दलितपुरुषाच्या बरोबरीने वाट्याला आलेले दलितपण आणि समाजातील पुरुषप्रधानतेमुळे भोगाव्या लागणाऱ्या स्त्रीत्वातील वेदना ह्यांतून दलित स्त्रीचे विश्व घडत गेले आहे. मला काय हवं आहे आणि मला काय मिळतं आहे, ह्या संघर्षातून ती अनेकदा वास्तवावर चिडलेली, नाराज दिसते. 'बलुतं' मधील आई, जमना, सई, सलमा, बानू, काकू, विठाबाई, मंजुळा, गऊ, वेणू, जावजीबाबाची आई, लेखकाची बाळंतपणाला आलेली सासू अशा अनेक स्त्रिया आई, पत्नी, मैत्रीण, शेजारीण म्हणून भेटतात. 'उपरा' तील आई, पारू, शशी, 'मुक्काम पोस्ट देवाचं गोठणं' मधील उषा, आई, सखू, तराळ अंतराळ मधील शेवंता, लेखकाची सुविद्य पत्नी, 'आठवणींचे पक्षी' तील बहीण, पत्नी ह्या स्त्रियांत काही सारखेपण आहे. या स्त्रियांची जवळची माणसं म्हणून त्यांचे अनुभव लेखकापर्यंत पोचतात आणि लेखकांच्या चिंतनाच्या दृष्टीतून, त्यांच्या प्रतिभेच्या सामर्थ्यानुसार आपल्यापर्यंत पोचतात. लेखक ह्या स्त्रियांच्या विश्वापर्यंत पोचण्याचे मध्यस्थ आहेत.

आदिवासी, कामगार, शेतमजूर स्त्रियांनाही आपल्या पोटासाठी संघर्ष करावा लागतो, हाल काढावे लागतात. स्त्रियांच्या शरीराकडे नवरा, समाजातील मालदार, जमीनदार आणि ज्यांना काही सत्ता असते असे बहुतांशी पुरुष उपभोगाची वस्तू म्हणून पाहतात. ह्या भोगाबरोबरच दलित स्त्रीच्या विश्वात बलुतं मागणं, तराळाची काठी मिळणं, मेलेल्या जनावराचे वाटे मिळावेत म्हणून होणारी भांडणं, तिचा विटाळ होणं, हे दलितपणाचे अनुभव आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने एक नवा जीवनमार्ग सापडणं हादेखील अनुभवविश्वाचा एक भाग आहे.

## पाण्याभोवती फिरणारे जीवन

दलित स्त्रीच्या विश्वात इतर हजारो भारतीय स्त्रियांप्रमाणे पाण्याला मोठे स्थान आहे. पाण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी तिची अवहेलना होते, दूरवरून पाणी घ्यावं लागतं. 'मुक्काम पोस्ट देवाचं गोठणं' मध्ये लेखकाच्या पत्नीला सखू सूडाने पेटून विहिरीवर खूप त्रास देते. 'उपरा' त पाणी जवळ असेल तिथे बिऱ्हाड टाकण्याचे संदर्भ येतात. 'तराळ अंतराळ' मध्ये पाणी घरात घुसून होणारी पाचटाची त्रेधातिरपिट आणि घर शेकारलं नाही म्हणून होणारा आईचा संताप दिसतो. तर

' बलुतं ' मध्ये वडिलांनी दारूची भट्टी लावल्यावर आईला दोन फर्लांगावरून पाणी आणावं लागतं. स्त्रियांना पाण्यासाठी जो त्रास सहन करावा लागतो त्यातून आपल्याला समाजाच्या मानसिकतेचे दर्शन होते.

## स्त्रियांच्या कामांचे स्वरूप

ह्या आत्मचरित्रात सर्वसामान्य व्यवसाय मिळाला तरी स्त्रिया ते कष्ट सोसतात. रानात राबणारी आणि सांडलेल्या कचऱ्यातून धान्य म्हणजे बिदवा गोळा करणारी स्त्री 'आठवणींचे पक्षी' त दिसते. 'उपरा'त रानोमाळ संसार फिरवणारी आणि त्या संसाराची बांधाबांध करणारी स्त्री दिसते. कागद गोळा करणारी, हॉस्टेलमध्ये स्वयंपाकी म्हणून काम करणारी, विड्या वळणारी, वेळप्रसंगी वेश्याव्यवसाय करणारी अशी कामे ' बलुतं ' मध्ये दिसतात. ' बलुतं ' आणि ' उपरा ' मध्ये आईवर चोरीचा आरोप येऊन तिची प्रचंड अवहेलना झालेली दिसते. गावात झाडण्याची कामे स्त्रियांना करावी लागत. ह्या कामात कसलेही अधिकार तिला समाजव्यवस्थेने दिलेले नाहीत. सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा ह्यांच्या मक्तेदारांनी तिला करकचून बांधून ठेवलेले दिसते. 'गुरासारखी राब, अर्धपोटी रहा, नाहीतर भोग ध्यायची परवानगी दे,' असेच जणू तिला व्यवस्थेने बजावले आहे. आणि अनेकवेळा तिला जबरदस्तीने, भुलथापा देऊन वश करायचे आणि थुंकल्या पानाप्रमाणे रस्त्यावर टाकायचे असेही घडलेले दिसते.

## स्त्रियांना होणारी मारहाण

हा तिच्या विश्वाचा एक अंगभूत भाग आहे. चोरीच्या आरोपावरून तिला परकीयांकडून मारहाण होते, साडी फेडून लैंगिक दृष्ट्या अपमानित करण्यात येते. पण कुटुंबातही काही वेळा ती मानसिक दडपणाखाली, भीतीखाली वावरते. 'उपरा' तील पारू ' भयान ' देखणी आहे म्हणून मामा तिचा चेहरा आरशाने विद्रूप करतो. लेखकाला शाळेतून पळून यायला परवानगी देते म्हणून लेखकाच्या आईला बाप बडवतो. ' मुक्काम पोस्ट देवाचं गोठणं ' मध्ये दारूवरून लेखकाच्या आईवडिलांत प्रचंड भांडणे होतात. 'आठवणींचे पक्षी' मध्ये बहीण दाजींना खूप घाबरताना दिसते. ' तराळ अंतराळ ' मध्ये शेवंताचे सासरी हाल होतात. हाताला घट्टे पडेपर्यंत ती दळण दळत रहाते. ' बलुतं ' मध्ये लैंगिक भावना अनावर झाल्याने साडी सोडून पळणारी सीता दिसते. तिला डागण्यात येतं, चटके देण्यात येतात. ' बलुतं ' त लेखकाचे वडील वारल्यावर आई रडत रडत म्हणते की, ' तुझ्या दादाने माज्या अंगाला कधी पाच बोटं लावली नाहीत. ' वडिलांनी मारले नाही हे त्यांचे चांगलेपण आहे असे त्यांना जाणवते. मध्यमवर्गीय संकुचित नजरेतून ही मारहाण पाहून ' ह्यांचे हे असेच असते ' असे म्हणणे ही आत्मवंचना ठरेल. कारण समाजातील विविध आर्थिक स्तरांत आणि सर्व जातीजमातींत स्त्रियांना छुपी मारहाण होते हे दिसून आले आहे. परंतु महत्त्वाचा फरक असा आहे की, दलित लेखकांची

घरे रस्त्यातच आहेत, त्या घरांच्या भिंती पातळ पाचटाच्या आहेत व या लेखकांनी हृया घरातील स्त्रियांचे आक्रोश आपल्या साहित्यात शब्दांकित केले आहेत. पण ज्यांच्या घरांच्या भिंती इतक्या जाड आहेत की त्यात आक्रोशाचे हुंदके आतल्या-आत दडपता येतात, त्या भिंतींआडची मने अजूनही मोकळी झालेली नाहीत. उलट दलित घरातील स्त्रीने मारलेली किंकाळी लवकर उघड झाली आहे.

## स्त्रियांचे देव- धर्माबाबतचे विश्व

धर्मांतराअगोदरच्या काळातील लग्नपद्धतींची तपशीलवार वर्णने हृया आत्म-चरित्रात आहेत. ' उपरा ' वर जातपंचायतीचा अंमल असल्याने देवाची प्रचंड भीती आणि दडपण जाणवते. बहिष्काराचा आसूड हृया पंचायतीने उगारलेला आहे. शशीला म्हणून दत्तक जावे लागते. ' मुक्काम पोस्ट देवाचं गोठणं ' मध्ये लग्नप्रसंगात लिंब सोडण्याच्या प्रसंगाचे वर्णन आहे. ते काम विधवेनं करायचं असतं, लेखकाची बहीण विधवा आहे तिला ते काम सांगितलं जातं, म्हणून ती व्यथित झालेली आहे. तराळ अंतराळमध्ये नागपूरचा धर्मांतराचा प्रसंग येतो. ' बलुतं ' मध्येही धर्मांतरानंतर गावकीची कामे सोडण्याचे उल्लेख येतात.

## स्त्रियांबाबतच्या सामाजिक व लैंगिक कल्पना

स्त्रियांबाबतचे सामाजिक जीवन व लैंगिक कल्पना पाहिल्या तर दिसते की, धर्मात राजसत्ता आणि पुरुषप्रधानता हृयांचा संगम झाला आहे. त्यामुळे धर्मांनी पुरुषांसाठी सोयीस्कर नियम बनविले. आत्मचरित्रातील अनेक प्रसंगांतून हे दुहेरी, दुटप्पी नियम दिसून येतात. पतीचा लग्नात अपमान होतो, तो लग्न मोडतो आणि नवरी वेडी होते असा प्रसंग ' उपरा 'त आहे. पुरुष व्यभिचार करतो आणि जात-पंचायतीसमोर खोटा कांगावा करतो, पैसे चारून पत्नीवरच आरोप करतो आणि तिला उघड माथ्याने, भरपाई न देता, टाकून देतो. शशीशी प्रेमविवाह ठरल्यावर प्रतिक्रिया येते की, ' नुसती ठेवली असती तर चाललं असतं.' बलुतं मधे दया पवार म्हणतात की, ' पुरुषानं रांडबाजी करणं म्हणजे छातीवर एखादं मेडल लटकवण्या-सारखं वाटायचं.' वरकरणी मोकळ्या वाटणाऱ्या लैंगिक व्यवहारात स्त्रियांची अधिक परवड, अवहेलना होताना दिसते. गऊ हृया वडार समाजातील कोवळ्या मुलीला मोठ्या मेव्हण्याची दुसरेपणाची बायको व्हावं लागतं. कावाखान्यात वेश्या आणणं कोणालाच चमत्कारिक वाटत नसतं, पण संशयावरून सईला टाकण्यात येतं. सासऱ्याने सुनेशी अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केल्यावर तिच्या माहेरचे लोक नवऱ्याकडे तक्रार करतात, तेव्हा तो सांगतो की, 'मी बायको दोघांत केली आहे.' चळ-वळीतील एक पुढारी देखील ज्या घरात उतरलेले असतात त्याच बाईला भोगायला सिद्ध झाल्याचं दिसतं. कुटुंबातील स्त्रीचा स्वतःच्या शरीर, मनावर हक्क आहे हे आजच्या वास्तवातही समाजाला जाणवत नाही. तसेच चित्र हृया आत्मचरित्रांतून दिसते.

'श्रीमंतांची मालमत्ता आणि स्वकीयांची दासी' ह्या दोन पर्यायांत भरडले जाताना माणूस म्हणून तिचा विचार दूर आहे. असे असले तरीही 'सलमा' 'शशी' ह्यांसारख्या स्त्रियांच्या सुखद अनुभवांची नोंद आत्मचरित्रांतून होते. 'मुक्काम पोस्ट देवाचं गोठणं' मध्ये पतीच्यासाठी पत्नी त्रास घेताना दिसते. 'बलुतं' मध्ये सई आणि लेखकाच्या लग्नानंतर दोघांचे जीवन आनंददायी झालेले दिसते. तराळ-अंतराळ मध्ये लेखकाची पत्नी विवाहानंतर डॉक्टर झालेली दिसते. दुःखांचा वणवा पेटलेला असताना स्त्रीपुरुषांच्या जीवनातील चांगलेपणाचे हृद्य दर्शन देणारे प्रसंग-ही आत्मचरित्रांत आहेत.

## दलितेतर स्त्रीचेदेखील स्वतःचे विश्व आहे

दलित आत्मचरित्रातील दलित स्त्रीच्या विश्वाप्रमाणेच दलितेतर स्त्रीचे-देखील स्वतःचे विश्व आहे. दलितेतर, विशेषतः ब्राह्मण, स्त्रीच्या गोरे– घारेपणा-बद्दल विशेष आकर्षण 'बलुतं' मध्ये जाणवते, उपरातही जाणवते. निग्रो चळवळीशी 'ब्लॅक इज ब्यूटिफुल' ह्या घोषणेशी कुठेतरी विसंवाद झाल्याचे अशावेळी जाण-वते. दलितेतर स्त्री स्वतःच्या जातीय अहंकाराच्या पगडयाखाली वावरते आहे. बरोबरीचा तरूण म्हणून एका सुशिक्षित मुलीशी लक्ष्मण मानेंचा परिचय होतो. ती नकार देताना म्हणते की, 'निदान मराठा असशील वाटलं होतं.' 'बलुतं' मध्ये रोकडे आणि कुलकर्णी ह्यांच्या किशोरवयीन आकर्षणाच्या फुलोऱ्याबाबत कुलकर्णी म्हणते की, 'शाळेतलं तू खरं कसं समजलास?' 'बलुतं' मधील नटी 'हे लोक कधीच सुधारायचे नाहीत' असं म्हणते. 'बलुतं' मधील बानू, सलमा ह्यांच्या बाबतची आकर्षणे परिस्थितीच्या दडपणाखाली विझत गेलेली दिसतात. 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' मध्ये एक तरुणी येते आणि परत आपल्या कोशात जाते. 'बलुतं' मध्ये दया पवार लिहितात की, काही मराठा स्त्रिया दलित तरुणांचा उपभोग घ्यायच्या, पण भाकरी वरून वाढायच्या. स्त्रीपुरुष संबंधाच्या बरोबरच बलुतं, गावकीची कामं करून घेणारी सवर्ण स्त्री आणि ते काम राबवणारे स्त्री-पुरुष असंही एक शोषक– शोषितांचं नातं आत्मचरित्रात दिसतं.

'आठवणींचे पक्षी'त 'परक्षा' ह्या आठवणीत लेखक सडलेला कुत्रा ओढत नेण्याचे काम करतो. त्या कामासाठी एका घरातील सासू भाकरी कबूल करते. 'तराळ-अंतराळ' मध्येही खराब, कुजके अन्न देणाऱ्या स्त्रिया दिसतात. त्याचबरोबर धर्मांतरानंतर बौद्ध स्त्रिया पांढऱ्या साडया नेसू लागल्या म्हणून मुंबईत दलितेतर समाजातील स्त्रिया पांढऱ्या साडया टाळू लागल्या असाही संदर्भ येतो.

ह्या सोबत 'मुक्काम पोस्ट देवाचं गोठणं' मध्ये संवेदनाक्षम हुशार साहि-त्यिक, प्राध्यापिका दिसतात. 'आठवणींचे पक्षी' मध्ये वर्गबंधूला आग्रहाने जेवण घालणारी पुतळाबाई भेटते. जातीपातीच्या पलिकडे पोचून ह्या स्त्रिया लेखकाकडे माणूस म्हणून पाहण्याचा प्रयत्न करतात.

## स्त्रियांच्या विश्वातील इतर स्त्रिया आणि मुले

आपल्या वाट्याला जे आलं त्या दुःखामुळे कावलेली स्त्री दुसऱ्या स्त्रीला कातरताना, जखमी करताना दिसते. 'बलुतं' मध्ये सयाजीची पत्नी झुळझुळीत साड्या नेसते, पण सयाजीला अंगाला हात लावू देत नाही. म्हणून इतर स्त्रिया तिचे हातपाय धरून कार्यभाग उरकायला सांगतात. बलुत्यावरून स्त्रियांस्त्रियांत भांडणें होतात. सुनेचा व्यभिचार सासू बोंब मारून बाहेर काढते. ह्याचबरोबर लेकीच्या सुखासाठी ठामपणे उभी राहिलेली व वेळप्रसंगी जातीच्या बहिष्काराला तोंड देणारी आई तराळ-अंतराळ मध्ये दिसते. मुले हा स्त्रियांच्या विश्वातील खूपच मोठा विषय.

स्त्रियांचा जगात बाळंतपण, गर्भपात, जवळच्या माणसांचे औषधाअभावी मृत्यू घडताना दिसतात. 'तराळ अंतराळ' मध्ये लेखकाच्या भावाचा मृत्यू औषधा-अभावी होतो. 'उपरा'त आई माळरानावर बाळंत होते. तिला प्रथेप्रमाणें दारू देण्यात येते. 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणें' मध्ये उषाला बाळंतपणात डॉक्टर न मिळाल्यानें खूप हाल काढावे लागतात. अशा प्रसंगात स्त्रियांनी एकमेकीला साथ, सोबत दिल्याचं दिसतं. स्त्रियांच्या विश्वात म्हातारपणाची काठी म्हणून मुलांचे स्थान असले तरी म्हातारपणी काहीवेळा त्यांचे हाल होताना दिसतात. जावजी-बाबाची आई 'बलुतं'त भेटते. तिला वेळेवर जेवण मिळत नाही, परसाकडे न्यायला कुणाची सोबत नाही. दारिद्र्याच्या झळांनी वृद्ध स्त्रीला अगतिक केल्याचे दिसते. छोट्या छोट्या मुलींची 'उपरा'त लग्ने लावलेली दिसतात. 'बलुतं'त धाकट्या बहीणीला मुलांसमोर हॉस्टेलमध्ये नाचताना पाहून लेखक अस्वस्थ होतो, चिडतो. स्त्रियांना स्वतःचे पशुजीवन जगावे लागतेच, पण त्याचबरोबर त्या जीव-नात बदल घडविण्यास स्त्रियांना आणि पुरुषांना संघर्ष करावा लागतो. 'आठवणींचे पक्षी'त कुटुंबियांनी पत्नीला स्वीकारावे म्हणून लेखकाला तिच्यासह उंटावरून प्रवास करावा लागतो. 'उपरा' तही शशीला दत्तक जावे लागते, तर 'मुक्काम पोस्ट देवाचं गोठणं' मध्ये लहानग्या सोनियाला देखील गावातील वादाचे बळी व्हावे लागते.

### स्त्रीच्या विश्वाचा अर्थ

दलित आत्मचरित्रातील स्त्रीच्या विश्वाचा अर्थ हाच आहे की तिला माणूस-पण नाकारले गेले आहे. दुःखाबरोबर कुटुंबियांकडून जे सुख मिळते त्यातून ती जगण्यासाठी शक्ती शोधते. तिच्या विश्वातील प्रश्नांनी केवळ दलित पुरुषाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केलेले नाही, तर समाजव्यवस्थेला आरोपी बनविले आहे. ही दुःखे 'त्यांची' नसून आपल्या समाजाची आहेत. आज स्त्री जेव्हा भविष्याचे आकाश आपल्या हातात घेण्याचा प्रयत्न करते तेव्हा तिच्या हातामागे दलित स्त्री आणि पुरुषांच्या अनुभवांचा अर्थ उभा आहे. तो अर्थ असे विचारतो आहे की,

'मानवमुक्तीच्या कोणत्या विश्वात उभे राहून आपण हे प्रयत्न करत आहोत? आपल्या समाजात प्रत्येक जातीचा, वर्गाचा बंदिस्त कोश आहे, विश्व आहे. त्या विश्वाची दारे, भिंती चिरेबंदी आहेत. ह्या भिंती आम्ही कशा तोडणार? आणि वेगवेगळ्या विश्वात पूल कसे उभारणार? संवाद कसा साधणार?'

कोणी असाही प्रश्न विचारेल की, 'इतक्या लवकर ह्या विश्लेषणांची गरज आहे का? पण साहित्य ही एक कृती आहे म्हटल्यावर त्याची तपासणी, विश्लेषण होणारच. दलितांनी प्रश्न विचारला की 'आमच्याच वाट्याला हे का? आम्ही ते नाकारणार.' तसाच स्त्रियांनी प्रश्न विचारला आहे की आम्ही आमचे जग मोठे करायला निघालो आहोत. माणसाच्या मुक्तीसाठी आमचा लढा आहे, प्रयत्न आहे. त्या जगाच्या कक्षा विस्तारण्यासाठी कोंबडा आरवण्याची वाट का म्हणून पहावी? आम्ही अगोदरच सुमारे चाळीस वर्षे सुप्तावस्थेत, थंडपणे काढली. कळ्यांच्या निश्वासांनंतर फुले पूर्णपणे उमललीच नाहीत. आता अजून थांबणे शक्य नाही. म्हणूनच दलितांच्या आत्मचरित्रांतील स्त्रीचे विश्व शोधणे, समजून घेणे ही गरजेची गोष्ट आहे. वृथा हळव्या भावनांचे डोंगर उभे करण्यात अर्थ नाही. जे कठोर नियम आम्ही दलित साहित्याला लावू ते शत्रुत्वाच्या भावनेतून नव्हे, तर समान ध्येयातील सहकारी म्हणून लावलेले आहेत.

# ६ दलित स्त्रीचा व तिच्याबद्दलचा भाषाव्यवहार

* मुलगे निदान बाहेरच्या जगात थोडेतरी मिसळतात, पण मुली कोंदट, लहान तोंडाच्या मडक्यात मांजर कोंडावे तशाच 'लग्नात' दिल्या जातात व राबता-राबता लवकरच वयस्क होतात.
* इतर स्त्रियांच्या बाबतीत व्यभिचार हा निषिद्ध आणि अपवादात्मक, आणि दलित स्त्रियांवर मात्र व्यभिचाराची एक प्रकारे सक्तीच, हा जो विलक्षण 'न्याय' परंपरागत समाज निर्लज्जपणे अनुसरत आला त्याची प्रगट चीड आता कुठे दिसू लागली आहे.
* दलित स्त्रीची अस्मिता नेहमीच संघर्षातून आकार घेणारी. त्यामुळे दलित स्त्री आर्टिक्युलेट जास्त आहे. तिची भाषा ठसठशीत आहे.
* दलित स्त्रीचे प्रत्ययकारी चित्रण अजून व्हायचे आहे; आणि त्यातला मुख्य अडसर तिच्या अबोलपणाचा नसून ती बोलली तर हा समाज ते ऐकू धजणार नाही हा आहे.
* मानवी अनुभवांना दलित स्त्रीच्या बाबतीत घरबशा जातीतील स्त्रियांपेक्षा अधिक सखोल परिमाण आहे.
* शाळा किंवा मुक्तशाळा या प्रकारापर्यंत जोपर्यंत स्त्रिया पोचत नाहीत तोपर्यंत त्यांच्या भाषाव्यवहारावर फार बंधने राहणारच, आणि जिथे सुसंवाद नाही तिथे भांडणे आणि शिव्या यांचेही महत्त्व कायम राहणारच.

आशा मुंडले

## प्रास्ताविक

भाषेचा विचार का करायचा? माणसाच्या जीवनात भाषाव्यवहाराचे स्थान काय? या प्रश्नांचे उत्तर प्रत्येक संस्कृतीने प्रत्येक कालात भिन्नभिन्न पद्धतीने दिले

आहे. सर्वांच्या परिचयाचे एक उदाहरण घेऊ. 'Children are to be seen & not to be heard' ह्या व्हिक्टोरिअन दंडकाखाली वाढलेली मुले आणि आता फ्लॅटमधे वाढणारी छोट्या कुटुंबातली, आईबापांच्या डोक्याला कान चिकटावे इतक्या अभिन्नपणे चिकटलेली मुले यांच्या भाषाव्यवहारात फरक आहे ना?

उच्चशिक्षित कुटुंबातली, घराबाहेर पडून अर्थार्जन करणारी, दारिद्र्याने ग्रस्त नसलेली व आरोग्यसेवा उपलब्ध असलेली स्त्री आणि दलित–भटकी स्त्री-यांच्या भाषाव्यवहारातही तसेच जमीन-अस्मानाचे अंतर आहे.

आपल्याकडे अजूनही समज आहे आणि तो वस्तुस्थितीवर आधारित आहे की, बायकांना टिपिकल विषयांवरच बोलायला आवडते–मुले, कपडे, दागिनें, फार फार तर नातेवाईक, सणवार, लग्नकार्य इ. दलित स्त्री कशावर बोलते? पाणी, अन्न, रोगराई, त्या रोगराईला कारण असणारे म्हणजे देवदेवस्की, जादूटोणा, भुताटकी हे घटक, मुलांचा मृत्यू, नवऱ्याची मारहाण, व्यसन आणि गरिबी. भटक्या जमातीच्या स्त्रिया तर फारच कमी बोलतात. त्यांचे विषय- बाजारहाट, भुताटकी, देवदेवस्की, रोख पैशाची गरज, दागिनें, (कुणगा या स्वरूपात), आणि पोलीस इ. पुरुषांना भीती. मारहाण-गरिबी यांवर चर्चा होत नाही. ते तर त्यांचे रोजचे वास्तव. भटक्या जमाती कोणत्याही गावाबाहेर उतरल्या तरी त्यांना परंपरेनें जी legitimacy होती ती दिवसेंदिवस कमी होत आहे. यात जमिनीचा- पाण्याचा तुटवडा, पारंपरिक माळरानांचा अन्य उपयोग ही कारणे तर आहेतच, वाढणारी लोकसंख्या, ग्रामीण दारिद्र्य ही पण कारणे आहेत.

माणसाच्या सुरक्षित भावनेचे केवढे तरी मूल्य आधुनिक बालसंगोपनात सांगितले जाते. या जमातीच्या मुलांना आणि मुलींना त्यातलं काय मिळतं? आणि मुलगे निदान बाहेरच्या जगात थोडेबहुत तरी मिसळतात; मुली कोंदट, लहान तोंडाच्या मडक्यात मांजर कोंडावे तशाच 'लग्नात' दिल्या जातात व राबता-राबता लवकरच वयस्क होतात.

मुख्यत्वे त्यांच्या भाषाव्यवहाराचा सामाजिक पैलू मी इथे विचारात घेते आहे. त्यांच्याबद्दलची विधानें ही, एखादा नकाशा bold relief मधे मांडून त्यातील शिखरे, दऱ्या यांना उठाव आणावा तशा पद्धतीने, ठाशीव मांडली आहेत. कारण जेव्हा अंधारात क्षीण टॉर्चच्या साह्याने उडी घ्यायची असते, तेव्हा चाचपडत पायऱ्या उतरण्यापेक्षा खोलीचे मोजमाप स्मरणात ठेवून दमदार पाऊल उचलणे अधिक सोईचे आणि मुक्कामाला पोचवणारे असते. जवळजवळ अज्ञात अशा भावविश्वांचा शोध घेताना भाषिक पुरावा वापरताना माझी हीच दृष्टी आहे.

या विषयावरच्या कामाची ही सुरुवात ठरावी एवढ्याच अपेक्षेने हा पेपर वाचला जावा, अशी मी विनंती करते.

## दलित स्त्रीचा व तिच्याबद्दलचा भाषाव्यवहार

'दलित स्त्री' हा शब्दप्रयोग खरं पाहिलं तर पुनरुक्तिदोषाने ग्रस्त आहे. कारण कोणतीही स्त्री घेतली तरी आजच्या समाजव्यवस्थेत ती थोडीबहुत दलितच आहे. पण तरीसुद्धा दलित याचा मर्यादित अर्थ जो रूढ आहे, तो घेऊन त्यांच्या-मधील स्त्रियांचा वेगळा विचार करणे आवश्यक आहे. दलित हा कॅचवर्ड आहे. पण त्यामुळे सूचित केले जाणारे लोक म्हणजे परंपरेने ज्या जाती पूर्वी उघडपणे अस्पृश्य होत्या आणि आज ज्यांना तसं समजायला कायद्याची संमती नाही, त्या जातींचे लोक. भटक्या जमाती किंवा आदिवासी स्थायिक जमाती यामध्ये येत नाहीत. व्यापक अर्थाने दलित शब्द वापरायचा प्रयत्न पुष्कळ होतो. पण दलित म्हणजे कोण, असं सामान्य माणसाला विचारलं तर त्याचं उत्तर 'हरिजन, महार-मांग, नवबौद्ध, अस्पृश्य, खालचे लोक' अशा शब्दांतून येतं. तेव्हा या पेपरमधे या अर्थीच दलित स्त्रीचा विचार केला आहे.

अ– दलितांमधे पुरुष आणि स्त्री यांच्या दर्जामध्ये व्यवस्थांतर्गत असमतोल आहेच. कुटुंबजीवन सोडलं तर इतर क्षेत्रातली बहुतेक सर्व निर्णयप्रक्रिया पुरु-षांच्या हातात आहे. तिचं समर्थनही केलं जातं. नैसर्गिक कर्तृत्वाच्या मर्यादांमुळे हीच व्यवस्था चालू राहणार, रहावी असाही युक्तिवाद जगभर केला जातो, तसाच इथेही होतो. कुटुंबजीवनातही तिला फार समाधानकारक स्थान आहे, असं नाही. पण बाह्यजीवनात तिचं अस्तित्व नगण्य आहे, तसं इथे नाही. ते निसर्गतःच अशक्य आहे. म्हणून तिची दखल जास्त घेतली जाते.

याशिवाय जातिव्यवस्थेबाहेर परंतु समाजमान्य असा स्त्रियांचा वर्ग आहे, तो म्हणजे वेश्या. यात भरती होणाऱ्यांत दलित स्त्रिया इतरांपेक्षा तुलनेने फार जास्त आहेत का, याची निश्चित आकडेवारी उपलब्ध नाही. परंतु नेपाळी, तिबेटी, परंपरागत वेश्यांच्या मुली, फसलेल्या किंवा पळवलेल्या स्त्रिया आणि दलितांनी स्वखुशीने देवाला सोडलेल्या मुली असे वर्गीकरण मात्र सुपरिचित आहे. या स्त्रिया सोडल्या तर इतर सर्व स्त्रियांच्या तुलनेत दलित स्त्रीची अवस्था जास्त गहिऱ्या दुःखाने व्यापलेली आहे, यात शंका नाही.

याचे मुख्य आणि ठसठशीत कारण असे की, परंपरेनेच दलित स्त्री ही वरिष्ठ जातीच्या उपभोगासाठी, त्यांच्या संसारजीवनाबाहेरचे परिशिष्ट म्हणून ठरवली गेली आहे. वास्तविक हिंदू समाजात एकूण 'चारित्र्य', अर्थात स्त्रीचे चारित्र्य, या कल्पनेचा बडेजाव फार. लग्न होईपर्यंत मुलगी कुमारिका रहावी यासाठी खूप कडक निर्बंध आणि सतत राखण ठेवण्याची व्यवस्था, तसेच पत्नी झाल्यानंतर इतर पुरुषांशी लैंगिक संबंध येऊ नये याची दक्षता. विधवा झाल्यावर केलेला पुनर्विवाह हा उच्च जातीत निषिद्ध आणि मध्यम जातीत स्वीकारला, तरीही ती पहिल्या लग्नापेक्षा दर्जाने गौण, म्हणजे कौमार्य, सतीत्व अथवा एकशरीरनिष्ठा आणि मातृ-

त्याचे मोठेपण ही स्त्रीकडून अपेक्षित इमेज. आणि त्यातून घसरलेल्या स्त्रीला, तो बलात्कार होता का स्वेच्छा असला 'किरकोळ' तपशील विचारात न घेता, फक्त शरीरसंबंध घडला की नाही हे विचारात घेऊन, समाज स्त्रीवर बहिष्कार टाकतो. तिला कठोर शिक्षासुद्धा होते. उदाहरणार्थ, बदफैली बायकोचे नाक-कान कापण्याची एवढी हौस की, त्या नाकांची प्लॅस्टिक सर्जरी यशस्वी रीतीने करणाऱ्यांचेही एक अख्खे गाव उत्तर हिंदुस्थानात आहे. कोणत्याही परिस्थितीत अशा स्त्रीशी पुन्हा 'संसार' सुरू करणारा नवरा बुळा, षंढ वगैरे वगैरे मानला जातो. त्या स्त्रीला मागचा पुढचा आधार न ठेवता सासर आणि माहेर या दोघांनी हाकलून देणे ही मान्य अवस्था !

मग त्या स्त्रीने विहीर जवळ करावी, वेश्या व्हावं किंवा तिला वश करणारा पुरुष खबरदार असेल, तर त्याची रखेली म्हणून रहावं ही पद्धत. पण या सर्वांहून दलित स्त्रीची स्थिती मात्र वेगळी.

एकाची पत्नी, परंतु त्याचवेळी नवऱ्याच्या बॉसची भोगदासी, अशी अवघड दुहेरी भूमिका तिच्या वाट्याला आणि बॉस एकटाच असेही नाही. वरिष्ठ जातीतील कोणताही धटिंगण, इतर धटिंगणांच्या सहकार्याने किंवा त्यांना डावलून, दलित स्त्रीकडे यायला मोकळा. बिहारमधील, बंगालमधील अशी वर्णने उपलब्ध आहेत. आपल्याकडे विशेषतः महार स्त्रियांबद्दल अशी माहिती उपलब्ध आहे. शेतमजूर म्हणून आणलेल्या तरण्याताठ्या महारणींकडे 'शरीर दे नाहीतर तुझा विळा देणार नाही' अशी मागणी केल्याचे आपण वाचतो.

शिवाय या स्त्रियांचे संसार तर चालू रहायचेच. त्यांचे नवरे काही त्यांना घराबाहेर काढू शकत नव्हते. कारण शरीरसंबंधापुरता तिच्याशी स्पर्श करणारा उच्च पुरुष दिवसा तिला अस्पृश्य नोकरच समजणार. तिच्या हातचे पाणीसुद्धा पिणार नाही. योनिसंबंध संपला की घरी येऊन अंघोळ करणारेही शुचिर्भूत महाभाग होते.

यातूनच दलित पुरुष आणि दलित स्त्री या दोघांच्याही मानसिकतेवर कायमचे गंभीर परिणाम झालेले दिसतात. इतर स्त्रियांच्या बाबतीत व्यभिचार हा निषिद्ध आणि अपवादात्मक, आणि दलित, स्त्रियांवर मात्र व्यभिचाराची एक प्रकारे सक्तीच हा जो विलक्षण 'न्याय' परंपरागत समाज निर्लज्जपणे अनुसरत आला, त्याची प्रगट चीड आता कुठे दिसू लागली आहे आणि तीही तुरळकच.

दलित स्त्रीच्या मानसिकतेवर या परिस्थितीचा झालेला परिणाम उद्‌बोधक आहे. नाईलाजातून काय जन्म घेते याचा ठळक पुरावा, आपल्याला बेबी कांबळे यांच्या आत्मकहाणीत मिळतो. 'स्त्री' मासिकाने १९८४मधे ती क्रमशः प्रकाशित केली. त्यामधे छानछोकी आणि आर्थिक फायदा याचा विचार करून नवऱ्याच्या खेरीज इतरांशी संबंध ठेवणाऱ्या बायकांचा उल्लेख आहे. शिवाय इतर गरीब जातींतून न दिसणारा, न परवडणारा गाणे बजावणे, नाच– तमाशा यांचा षौकही इथे दलितांमधे– विशेषतः महारांमधे– दिसतो. 'महाराघरी गाणं आणि बामणाघरी लिवणं' अशी म्हणच आहे. पुरुषांचे– वरिष्ठ जातीतील श्रीमंत आणि किंवा बलदंड पुरुषांचे

मतोरंजन योग्य रीतीने व्हावे यासाठी स्वत:चा साजशृंगार, रहाणीतील स्वच्छता वगैरेबाबतची दक्षता हळूहळू विकास पावलेली दिसते. गुप्तांगावरचे केस काढून ते साफ ठेवणे, नग्न अंघोळ करून स्वच्छ रहाणे, नीटनेटके चोपून नेसणे हे सगळं मध्यम मागास जातीत न आढळणारं, पण दलितांत दिसणारं. शिवाय तिची अस्मिता नेहमीच संघर्षातून आकार घेणारी. त्यामळे दलित स्त्री आर्टिक्युलेट जास्त आहे. तिची भाषा ठसठशीत आहे. कोणत्याही दलित वस्तीत जाऊन समाजकार्य करणाऱ्या स्त्रियांना याचा अनुभव असेल की, एकदा विश्वास उत्पन्न झाला की, त्या धिटाईने, हुशारीने आपले विचार मांडतात. परिष्कृत वक्तृत्वाचा नमुना पुणे झाडू कामगार संघटनेच्या पुढारी स्त्रियांमधे दिसतो.

घाबरून, पायाच्या अंगठ्याने जमीन टोकरणारी व तोंडातून पुरुषांसमोर आवाज न फुटणारी अशी दलित स्त्री नाही. आवाज टिपेला चढवून, खड्या सुरात, शिव्यांचा आणि अलंकारिक भाषेचा उपयोग करून चारचौघांत उत्तम भांडू शकणारी, प्रसंगी मधाळ बोलणारी दलित स्त्री आहे. 'रोजचे मढे, त्याला कोण रडे?' या म्हणी-मागची वृत्ती, तिखट निसूक वृत्ती तिच्या वागण्या- बोलण्यात दिसते. लैंगिक संबंधा-विषयी बोलतानाही तिच्यात आत्मविश्वास, ग्राफिक इमेजरी नि:संकोच आणि 'मॅटर ऑफ फॅक्ट'पणा दिसतो. कोणी कुणाला पालथा केला, अंगाखाली घातला, गोडीत चेपला, आडवा घोळसला, पिरगाळला (म्हणजे स्त्रीने ऐन वेळी इंद्रिय हाताने मुरडून घेतलेला पुरुषाचा सूड) वगैरे त्या आपापसात बोलू शकतात. या तुलनेत वरिष्ठ स्त्री अगदीच पुचाट. तिचे अनुभवविश्व तोकडे.

मागे डेक्कन जिमखान्यावरील एका बंगल्यात मी रहात असताना बागेच्या कुंपणभिंतीपलीकडे बोगनवेलीच्या सावलीत रस्त्यावर सकाळी झाड काम संपवून अनेक स्त्रिया, एखादा- दुसरा मुकादम पानतंबाखू खात, शिळोप्याच्या गप्पा करीत रोजच्या बसत असत. वरच्या मजल्यावरील माझ्या खोलीतून त्यांचे संभाषण सहज ऐकू येई. सध्या कोण कुणाशी झवतंय यावर त्यांची चर्चा चाले ती तपशिलाने युक्त असे. एखादी बाई कशी बूड हलवत चालते इतपत जरी आपण तथाकथित 'ग्रामीण' कथेत वाचलं, तरी मध्यमवर्गीयांच्या जिभेला लाळ येते. तसल्या लोकांना या बायांचे बोलणे ऐकून झीटच आली असती.

हक्काची आणि बिनपैशात मिळणारी भोगदासी ही सामाजिक भूमिका वरिष्ठ जमातींनी खेड्यांमधून दलित स्त्रियांना बहाल केल्याने त्यांच्या मानसिकतेवर निश्चितच गंभीर परिणाम झाले आहेत. ते पिढ्यान्‌पिढ्या रुजले आहेत. भटक्या जमातींच्या स्त्रियांवर अत्याचार होतात, पण ते अत्याचारच समजले जातात समा-जात. उदा- फासेपारधी व बागायतदार इत्यादी.

परंतु या विषयावर लिहिताना एक फार मोठी अडचण आहे. ती म्हणजे ओझरत्या उल्लेखांवरून किंवा अपुऱ्या माहितीवरून काढलेले निष्कर्ष (Inferen-ces) असेच याचे स्वरूप राहणार. sex हा विषय आधी इथे taboo. एकीकडे खजु-

राहोची शिल्पं आणि प्रत्यक्षात कोंदट खोलीत, अंधारात गुपचूप शृंगार उरकणारे पतीपत्नी. परंतु sex चे taboo पार केल्यावरही दलित स्त्रीला दिलेल्या या विशिष्ट role बद्दलचे taboo. कारण यावर स्पष्ट बोललं की, संबंधित नसलेलाही दलित पुरुष वर्मी दुखावला जाणार. आणि ज्याच्या वाटचाला हे प्रत्यक्ष येतंय– तो किती मूक आहे याचे कलात्मक रूप शापित मधल्या 'बळी'ने आपल्याला दाखवलेच आहे.

दलित पुरुषांचा दबलेपणा हा एक परिणाम झालेला, कारण इतर पुरुषांप्रमाणे त्यांना हक्काची बायको नाही. शिवाय दारिद्र्यामुळे ते पैशाच्या जोरावर रंगढंग करण्याचाही संभव अत्यल्प. तराळ– अंतराळ मधल्या शंकररावांच्या वडिलांचा दिनक्रम किती कष्टाचा आहे हे वाचलं आणि त्यांची स्थिती इतरांहून बरी होती हे लक्षात घेतलं, तर मग त्यातून मनसोक्त शरीरक्रीडेला वेळच कुठे राहतो? अशाही सामाजिक व्यवस्थेत कटाक्षाने सत्शील असणारी त्यांची आई वेगळी आहे म्हणून तिला इतर अगतिक स्त्रियांमध्ये विशेष मान आहे, असं त्यांचं पुस्तक वाचून जाणवतं. त्यांच्या स्वभावातल्या सुसंस्कृतपणाचे बीजही सापडते.

दबलेपणाखेरीज व्यसनाधीनता, बायकोच्या श्रमावर फुकट खाण्याची किंवा निरुद्योगाची महत्त्वाकांक्षा, अधून मधून तावात येऊन मारहाण, अर्वाच्य शिवीगाळ हेही परिणाम दिसतातच. शिवाय लहान वयातच स्त्री–पुरुषसंभोगाचे निरीक्षण (उदा- फटीतून आईचा शृंगार बघणारा शरणकुमार लिंबाळे–अक्करमाशी) बरोबरच्या मुलांमुलींनी लगट, चाळे करणं वगैरेही परिणाम दिसतात.

आतापर्यंतचं ऐकता ऐकता आपल्याला कदाचित वाटेल की, स्त्री-पुरुष नातं हा विषय तर या परिसंवादात डॉ. अनिल अवचटांकडे दिलेला. मग मी माझ्या नियोजित विषयाकडे म्हणजे दलित स्त्रीची भाषा आणि तिच्याबद्दलची दलित आणि दलितेतरांची भाषा याच विषयाकडे एकदम का वळत नाही? याचे कारण असे की, सर्वात खालचे स्थान दलित पुरुषांचे आहे आणि दलित स्त्रीचे स्थान ambivalent आहे, ते त्या पुरुषाहूनही कनिष्ठ आहे असे मानण्यात अडचणी आहेत, हे स्पष्ट झाल्याखेरीज त्यांच्याबद्दलची आणि त्यांच्या भाषाव्यवहारासंबंधीची माझी जी निरीक्षणं मी यापुढे मांडणार, त्यांचा आशय पुरेसा स्पष्ट होणार नाही. तो कदाचित संदर्भहीन राहील. एवढी पार्श्वभूमी मला वाटतं, पुरे झाली.

तिच्या दांडग्या, रगेल भाषेचा उल्लेख मी यापूर्वी एकदा केलाच आहे. त्यामागची मनोभूमिका स्पष्ट विश्लेषणाने मांडणारी स्त्रीसुद्धा आमच्या पहाण्यात आली होती. दांडेकर झोपडपट्टीत डॉ. चित्रा नाईक यांच्या संस्थेतर्फे काम करताना आमच्यापैकी एकीने 'तुम्ही इतक्या शिव्या का देता?' असं एका बाईला स्पष्ट विचारलं. त्यावरचं तिचं उत्तर हे समाजशास्त्राच्या पाठ्यपुस्तकांतून समाविष्ट करावं असं आहे. ती म्हणाली, 'बाई, बाप्यांना दारूची, सिगारेटची तलफ येते. मारहाणीची, लाथा घालायची तलफ येते. तुमच्यासारख्या शिकलेल्या बायांना सिनेमाची, चांगल्या कपड्यांची 'किक' येते. आम्हाला शिव्यांची तलफ येते. जसं ५१ रु. चं, १०१ रु. चं

भारीपैकी पान असतं, तशा अगदी भारी ५०१ रु. च्या शिव्यापण मी देईन.'

दलित स्त्री रगडलेली असली तरी चिरडलेली नाही. ती मूक, अबोल तर नाहीच. दुःख असं की तिचं ऐकून ते लिहायला अजूनपर्यंत तरी सुरुवात झालेली नाही. आज दिगाणारी तिची आकृती, हिरा बनसोड, बेबी कांबळे यांसारखे तुरळक अपवाद सोडता, पडद्यामागची धूसर आकृतीच वाङ्मयापर्यंत पोचली आहे. दलित पुरुषांच्या आत्मकथनातून ती जेवढी जाणवते तेवढीच तिची झेप मर्यादित आहे. किंवा दलितेतर पुरुषांच्याही लिखाणातून ती अशीच धूसर जाणवते. कोकणस्थ विधवेसाठी- तिला लक्षात घेण्यासाठी—हरिभाऊंची यमुना जन्मली, घराघरातून परिचित झाली. दलित स्त्रीचे असे प्रत्ययकारी चित्रण अजून व्हायचे आहे आणि त्यातला मुख्य अडसर तिच्या अबोलपणाचा नसून ती बोलली तर हा समाज ते ऐकू धजणार नाही हा आहे.

पठ्ठे बापूरावांना काय वाटलं ते आपल्याला थोडंबहुत तरी माहिती आहे, पण पवळा अजून अज्ञातच आहे. स्त्रीवाणीने मला विनंती केली होती की बलुतं, आठवणींचे पक्षी, उपरा, मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे, तराळ—अंतराळ ही पाच पुस्तके मी विचारार्थ घ्यावीत. आपल्या लक्षात आलं असेल की, यांपैकी 'उपरा' हे पुस्तक वरील विशिष्ट अर्थाने दलितांत मोडत नाही. त्याचा विचार मी स्वतंत्रपणे करणार आहे आणि उरलेल्या चार पुस्तकांबरोबरच मी शरणकुमार लिंबाळे यांचं अक्करमाशी हे पाचवं आत्मकथन विचारात घेतलं आहे. कारण मी वर जी दलित स्त्रीची, ग्रामीण शेतमजूर दलित स्त्रीची सामाजिक आणि लैंगिक पार्श्वभूमी सांगितली तिचा उघड वाङ्मयीन पुरावा देणारं हे एकच पुस्तक माझ्या समजुती-प्रमाणे मराठीत आहे. प्रत्येक दलित स्त्री ही स्वतंत्रपणे वासनेची शिकार होत नसून as a class दलित, आणि विशेषतः महार आणि कोल्हाटी, स्त्रियांना एकाच वेळी एकाची पत्नी आणि अनेकांची भोगदासी ही मानसिक शिझोफ्रेनियाची नांदी ठरणारी भूमिका वठवायला या समाजाने भाग पाडले आहे.

गुळगुळीत गांधीवादी, पोथीनिष्ठ समाजवादी आणि कट्टर हिंदुत्ववादी अजूनही अशा भ्रमात दिसतात की, एका एका स्त्रीवर 'उत्तम' (म्हणजे काय? ) संस्कार करून तिला बदलता येईल. वरिष्ठ वर्गातील पुरुषांच्या लैंगिक अपेक्षा बदलायला त्यांना भाग पाडल्याखेरीज ग्रामीण दलितांचे पुनरुत्थान अशक्य आहे. ग्रामीण दलित शहराकडे धावतात, तिथेच राहिले तर जाळले जातात, हिंदू दलितांपेक्षा नवबौद्ध दलित माणसे समाजाला जास्त डोळ्यात खुपतात, यामागची लैंगिक कारणेही तपासली पाहिजेत.

मी जरी तीन राजकीय प्रणालींचा काहीशा उपहासाने उल्लेख केला असला तरी उरलेल्या दोन प्रमुख विचारधाराही पुरेशा प्रगल्भ नाहीत. दलितांची म्हणून जी स्वतंत्र राजकीय चळवळ आहे, तीत दलित स्त्रीचा पुरेसा विचार आलेला नाही. उलट, दलितांतील पुढारलेपणाची जणू काही खूण म्हणजे त्यातील पुरुषांच्या

वैयक्तिक कुटुंबजीवनाचे 'पांढरपेशा मध्यमवर्गीकरण.' खरातांचे आत्मचरित्र तर हे दाखवतंच, परंतु दया पवारांनी केलेले दुसरे लग्नसुद्धा एका प्रकारे त्यातलेच. अव्वल इंग्रजीतले ब्राह्मण पुरुष स्वतःच्या अशिक्षित बायकोला कायमची टाकून देऊन विलायती मड्डम किंवा एखाद्या रावबहादुरांची यसफ्यास करणारी मुलगी द्वितीय पत्नी म्हणून आणत त्याची आठवण अपरिहार्यपणे येते.

याशिवाय उरलेला राजकीय मतप्रवाह म्हणजे पोथीनिष्ठ कम्युनिझम. त्या विचाऱ्यांना तर हिंदुस्थानात नुसता वर्गविग्रह पुरेसा नाही, हे कळायलाच स्वातंत्र्योत्तर काही दशकं उलटून जावी लागली. आणि अजूनही जातिसंस्था विचारात घेऊन केलेली कम्युनिझमची सैद्धांतिक पुनर्रचना उपलब्ध नाही. अस्सल भारतीय बाण्याचा स्वतंत्र कम्युनिझम आणू पाहणाऱ्या अगदी अल्पसंख्य तरुण गटांच्या बोलण्यातून काही आशेचे किरण दिसतात तेवढेच.

सामूहिक पुरुष-न्यूनगंडाशी जोडली गेलेली दलित स्त्री तिच्या जातीच्या दलित पुरुषांना कशी दिसते? कशी ऐकू येते? ती त्यांच्याशी कशी बोलते? प्रत्येक वेळी तिच्या कौटुंबिक भूमिकेशी विरोधात्मक तुलना म्हणून तत्सम प्रस्थापित स्त्री जरूर मनात आणून पहावी. मी ज्या भाषाव्यवहारासंबंधी बोलते तो वर दिलेल्या पुस्तकांवरच फक्त आधारित नाही. मला भेटलेल्या दलित स्त्रिया, त्याचप्रमाणे इतर कार्यकर्त्यांनी त्यांच्या अनुभवांवरून जे काही बोलले, लिहिले, त्यांचाही विचार यात आहे. उदाहरणार्थ, माझ्या विवेचनावरून हे स्पष्ट होईल की, सुभाष जोशी ज्या निपाणीच्या विडीकामगार स्त्रियांच्यात काम करतात, त्यांची लैंगिक स्थिती ग्रामीण शेतमजूर दलित स्त्रीशी जुळती–मिळती आहे, परंतु शेतीऐवजी त्याला विडी व्यावसायिक पार्श्वभूमी आहे. त्यांच्या भाषाव्यवहाराबद्दल तरी पुरेशी माहिती उपलब्ध कुठे आहे? परंतु एका ठिकाणी लेखात डॉ. अनिल अवचट म्हणतात '...ती बाई म्हणाली, आम्ही म्हणतो, निदान एकवेळ अंगावर पालथे पडा. पण, लिंग तोंडात घेऊन चोखायला सांगू नका...' त्या बाईला ते विकृत वाटलं. (आणि अर्थात अवचटांनाही त्यांचा हा लेख आणि मुंबईतील कॅबेरे डान्सरपुढे अंगठा धरणाऱ्या शेठजीच्या विकृतीबद्दल त्यांनी लिहिलेला लेख यातूनही दिसतं.)

ग्रामीण दलित शेतमजूर स्त्रीच्या अनुभवविश्वाची आणि भावविश्वाची समृद्धी, ताकद तिच्या भाषेत दिसते. समृद्धी हा शब्द गुणवत्तानिदर्शक आहे. परंतु याचा अर्थ चाललंय ते उत्तम आहे असा नसून, मानवी अनुभवांना दलित स्त्रीच्या बाबतीत घरबशा जातीतील स्त्रियांपेक्षा अधिक सखोल परिमाण आहे असा आहे.

महारांची लावणी ही तर स्त्रीवरच असते. यातल्या शृंगाराचा उघडपणा, जोम आणि ग्राफिक इमेजरी- दलित स्त्रीच्या अनुभवातून उत्कट झालेली- शरीरसुखाचं ज्ञान व प्रकार यांत दलित स्त्री मध्यम जातीतील स्त्रीपेक्षा जास्त धीट, रसिक व चंचलही आहे. आजही तिच्या बोलण्यातून याचा प्रत्यय येतो. अमुक माणसाची हॉर्सपॉवर जादा आहे, असं वर्णन मी एकदा एका स्त्रीकडून ऐकलं. 'तमका

लई रगेल–अगदी चटणीगत चेंदामेंदा करतुया' असंही ऐकलं. असं मनमोकळं आणि तुलनात्मक डिस्कशन इतर मध्यम जातीतील स्त्रिया अर्थातच करीत नाहीत.

आपण जर ही पाच पुस्तकंच फक्त विचारात घेतली (पवार, कोंडविलकर, सोनकांबळे, लिंबाळे व खरात यांची) तर काय दिसतं?

मुलगे आईकडे फार सहानुभूतीनं पाहताना दिसतात. काबाडकष्ट करून आलेला बाप घरी तरी स्वस्थ बसतो. पण आई सततच राबणारी. तिची कणव येऊन ही मुलं घरकामात मदत करतात. आई आणि जिला सांभाळायची पडते ती छोटी बहीण यांच्याबद्दलच्या भावना मधुर आहेत. प्रोटेक्टिव्ह आहेत. आईला–बहिणीला आपला आधार वाटावा अशी धडपड आहे. आणि बराच मार खावा लागला तरी त्याचा कडवटपणा आईबद्दल कुठेही नाही. आई पोरांना बडवणारच हे सहज स्वीकारलं गेलंय. त्यानंतर आई जास्तीच माया करते हेही उमगलंय. खरात आणि त्यांची आई यांतलं बोलणं आईची प्रगल्भता दर्शवतं. कोंडविलकरांची स्थिती वेगळी आहे. त्यांनी अगदी मनापासून पांढरपेशी मूल्यव्यवस्था स्वीकारली आहे. त्यामुळे पुस्तकात पैसा घालण्याऐवजी तू एखादी अंगठी करायला हवी होतीस, असं सांगणाऱ्या आईशी त्यांचा सुसंवाद नाही. भावनिक दुरावा व त्या वेगळेपणाची खंत आहे. पण त्या खंतीचे स्वरूप 'कधी एकदा हे सगळे लोक बदलतील' असे एकतर्फी आहे. कोंडविलकरांचे निवेदन इतके आत्मकेंद्रित आहे की, चुकून वि. स. खांडेकरांच्या वाङ्मयातला नायक इतर जातीत जन्माला आल्यावर जसा कावराबावरा होऊन वागेल तसा वाटतो. त्यांच्या प्रतिक्रिया वाचून 'आपण इतके नीट वागायला धडपडतो, पण लोक का क्रूर आहेत' हाच त्यांचा मुख्य प्रश्न आहे. त्यांना आईची, बहिणीची, पत्नीची दया येते. पण आई–बहिणीची अशुद्ध भाषा खटकते, त्यांच्या 'कोत्या' महत्त्वाकांक्षा खटकतात (अर्थात त्यांना त्या कोत्या वाटत नाहीतच), घरातली अस्वच्छता खटकते.

व्यवस्थेमधेच जो संघर्ष आहे त्याचे भान त्यांच्या लिखाणात नाही. ह्या घरानीच आपला सत्यानाश केला, असा एखादा ठोकळेबाज उल्लेख आहे. सोनकांबळे यांची सामाजिक जाणीव प्रखर आहे. दलितांच्या सामाजिक जागृतीचे भान त्यांना आहे. आणि आपल्याबरोबरच आपल्या समाजातील स्त्रियाही शिकाव्या, पुढे याव्या यासाठी त्यांना मूल्यात्मक अडचण नाही. समाजात जे दिसलं ते त्यांनी कॅमेऱ्यासारखं मांडलंय. त्यामधून पुरुषी वर्चस्वाखाली चेपलेली संसारी स्त्री दिसते. एकाअर्थी त्यांच्या पहाण्यातल्या स्त्रिया या स्त्री मुक्ती चळवळीतून जी कौटुंबिक स्त्रीची प्रतिमा आहे, त्या प्रतिमेशी खूप जवळच्या आहेत.

दया पवारांच्या आत्मचरित्रात मात्र नुसतीच ग्रामीण पार्श्वभूमी नाही. त्यांचे दादा शहरात काम करणारे. महानगरी दुःखाची चाहूल त्यात आहे. दादा बाहेरख्याली पण आहेत. Data म्हणून हे पुस्तक खूप उपयुक्त आहे.

शरणकुमार लिंबाळचांची 'आई' ही प्रातिनिधिक दलित स्त्री म्हणता यावी-

ग्रामीण जीवनातील या स्त्रिया कष्ट करतात मरमर, पण त्या कष्टांचं त्यांना अप्रूप नाही. अपार शारीरिक कष्ट हे सर्वच स्त्रियांनी जीवनाचा अपरिहार्य भाग म्हणून स्वीकारलेले. आम्हाला घरकामामुळे बोअर होतं, व्यक्तिमत्व कोंदटून जातं म्हणणाऱ्या स्त्रियांनी या स्त्रियांबरोबर त्यांच्याइतकं काम करून एक दिवस जरी काढला तरी त्या निपचित पडतील. माणसाचं शरीर, पण ओझ्याच्या जनावरां-सारखं राबणारं आणि तेही अपुऱ्या अन्नावर. हा अन्नाचाही मुद्दा दलित स्त्रीच्या संदर्भात फार महत्त्वाचा आहे. शिळं, उष्टं, मागून आणलेलं, बुरसलेलं अन्न उन्हात वाळवून, साठवून ठेवायचं, ते पाण्यात उकळून सर्वांना पुरवायचं, स्वत: कमी घेऊन नवरा, मुलंबाळं, आला–गेला यांची सरबराई करायची ही तिच्या गृहिणीपदाची मिरासदारी. संसारदक्षता या क्षेत्रात त्या सर्वच स्त्रिया अगदी कुशल. अन्नाबद्दल उठवळ किंवा बेपर्वा अशी स्त्री कुठेच दिसत नाही. आणि विशेष म्हणजे जेव्हा या मागून आणलेल्या किंवा मेलेल्या जनावरांच्या अन्नातला अपमान बाबासाहेबांनी समजावून सांगितला तेव्हा निक्षून त्याचा त्याग करण्याइतकी ती बाणेदारही आहे.

दलित पुरुषांना एखादा इश्यू कळला, पण स्त्रिया मागेमागे राहून विरोध करताहेत असे आजही होत नाही. दलित स्त्रियांची बौद्धिक आणि भाषिक जाणीव त्यांच्या पुरुषांच्या बरोबरीची आहे.* चावडीवर चर्चेला गेल्या नाहीत तरी आपसात त्या तेच इश्यू घेऊन बोलताना दिसतात. सुरुवातीपासूनच त्यांना स्वतंत्रपणे पोटा-साठी राबावं लागतंच. 'बसून' खाणारी बाई अस्तित्वातच नाही. शिवाय ती 'संर-क्षित' ही नाही. तिच्या मदतीला वडील, भाऊ किंवा नवरा, पुत्र हे मनुस्मृतीतले धोंडे नाहीतच. तिच्या पायातली चप्पल, तिच्या कमरेचा विळा आणि तिची तिखट जीभ ही तिची संरक्षक कवचकुंडलं. या बाबतीत तिचे साम्य अमेरिकेच्या दक्षिणे-कडील संस्थानातून पूर्वी गुलाम म्हणून राबणाऱ्या निग्रो स्त्रियांशी आहे. कित्येकदा घराचा भावनिक आधारस्तंभ ती स्वत:च आहे. आणि पुरुष हा कुटुंबाचा महत्त्वाचा घटक असला तरी निर्वाणीच्या वेळी ती त्याच्यावरही अवलंबून नाही. एकटीच आहे मानसिक दृष्ट्या. तिला सोबत आहे तिच्यासारख्या इतर स्त्रियांचीच.

त्यामुळे संघटित कृती उभी करताना दलित स्त्रियांची एकजूट घडवणे तुल-नेने सोपे पडते हा अनुभव समाजपरिवर्तन करू इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांनाही आहे. परंतु दुर्दैवाने त्याचा योग्य तेवढा राजकीय उपयोग अजून केला गेलेला नाही. स्त्रीमुक्तीच्या संदर्भात तिला झोपी गेलेली जागी करायची असा प्रश्न नसून, तिच्या तिखट शिव्यांनी परिपूर्ण भाषेचे सोवळे–ओवळे न मानता, तिच्या चारित्र्याची मध्यामवर्गीय मूल्यातून चिरफाड न करता, तिला समानतेच्या लढ्यात ओढण्याचा

---

* आंबेडकर ज्या ज्या घरात पोचले त्यात स्त्रियाही होत्याच. स्त्रियांनी स्वतंत्र-पणे 'भीमा'ला स्वीकारलं.

हा प्रश्न आहे. राजकीय दृष्टया वेडर दलित स्त्री ही आगामी काळातले प्रभावी हत्यार आहे. तिच्या भाषेत पुनर्जन्मावर भार टाकून निमूटपणाने भोगण्याचा दैव-वाद जवळजवळ नाहीच. 'आपलं काय चालणार पुरुषांपुढे?' याऐवजी 'तो मुडदा ढीग सांगतोय. मी माराला हटणार नाही, त्याचं ऐकणार नाही' ही रग तिच्या बोलण्यात आहे. पुरुषाला 'देव' मानणारी ही स्त्री नाही.

आपल्याकडे जसा भाषेचा अभ्यास फार कमी, तसाच gesture चाही अग-दीच अभावात्मक. पण इन्डायरेक्टली पहाता येते. लावणी नृत्यातली शारीरिक भाषा, हसणे, उठणे, बसणे, चालणे यात पांढरपेशी स्त्री 'सिमटी हुई, मुरझाई हुई, वगैरे. पण दलित स्त्रीला पाहूनच तिचा ठसठशीत निःसंकोच जाणवतो. सत्ता आणि संपत्ती या जोरावर त्या दबवल्या गेलेल्या असल्या तरी केवळ पुरुष म्हणून एखाद्याला भिणाऱ्या त्या नाहीत.

लावणी नृत्यात या निःसंकोचपणाचा कलात्मक आविष्कार आहे. लावणी-नृत्य पॉप्युलर का हे या दृष्टिकोनातून पहाण्यासारखं आहे. त्यातला शारीरिक आणि शृंगारिक उघडपणा स्त्रियांनाही थरारून सोडतो.

मला विचारार्थ दिलेल्या पुस्तकांतून कोटेशन्स देऊन मी काही लिहिलं नाही, कारण या आत्मकथनांपेक्षा मोठा कॅनव्हास माझ्या डोळ्यांपुढे आहे.

दलितेतर पुरुषांना त्यांच्या भाषेतून दिसलेली दलित स्त्री लावणीतून दिसते. मदनाची मंजिरी, वय माझं सोळा– जवानीचा मळा, वगैरे. तिच्या काबाडकष्टांचे किंवा दारिद्र्याचे सोयरसुतक त्यांना नाही.

दलित पुरुषांना त्यांच्या भाषेतून दिसणारी स्त्री ही दुभंगलेली आहे– आई, बहीण म्हणून प्रेमळ, हवीहवीशी आणि पत्नी म्हणून असमाधानकारक, कारण ती आपली एकट्याचीच आहे ही खात्री नाही. दारू पिणं, मारहाण, रडारड, पश्चात्ताप, लाड करणं, नवे कपडे– खायला आणणं, परत दारू पिणं, असं दुष्टचक्र–वैफल्या-तून वैफल्याकडेच जाणारं.

दलितेतर स्त्रियांना दिसणारी दलित स्त्री एकतर घरापलिकडे ठेवण्याची. तिचे कष्ट शेतात घेतले तरी तिला शिवायचं नाही. रोज पाणवठ्यावर तिला पाणी वरून घालायचे. ती तिरस्करणीय. तिच्याबद्दल, ती इमानाने कष्ट करणारी असली तरच ममता, नाही तर लगेच ती माजलेली. आणि शिवाय रात्रीच्या जीवनात तर तमासगीर या स्वरूपात ती अदृश्य सवत, प्रतिस्पर्धी. तिला मध्यमवर्गीय व्हाईटवॉश केला तरच ती त्यांना जवळची वाटणार, नाही तर दूरचीच.

दलित स्त्रीला स्वतःला ती कशी दिसते हा शेवटचा भाग. तर त्याविषयी फारच कमी माहिती उपलब्ध आहे. परंतु या सर्वच पुस्तकांतून बहिणी– बहिणी, मैत्रिणी, मायलेकी, क्वचितच सास्वासुना ज्या एकमेकींशी वागताना, बोलताना दिस-तात, त्यामध्ये त्यांच्यातील भावबंध उत्कट आहेत हे जाणवतं. प्रेम आणि द्वेष ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजूही दिसतात.

मल्लिका अमर शेखांच्या पुस्तकात त्यांना जी दरी त्यांच्यात आणि ढसाळांच्यात जाणवली तिचा उगम असा सांस्कृतिक आहे. आकर्षण-तिरस्कार, प्रेम-द्वेष या रस्सी-खेचीत त्या सापडलेल्या दिसतात, त्या पांढरपेशा वातावरणात वाढलेल्या आहेत हेसुद्धा कारण आहेच. इतरही दलित पुरुषांच्या दलितेतर पत्नींनी स्पष्ट लिहिण्याजोगं आहे.

मला नेहमी वाटतं की राखीव जागांसारख्या प्रश्नावर जे लोक खवळून उठतात त्याच्यामागे जो भावनिक प्रक्षोभ आहे त्यात कुठेतरी, कळत– नकळत, दलित आपल्यासारखे झाले, आपल्या बरोबरीला आले तर मग आपण हक्काने कुणाला दडपणार ही चिंतासुद्धा, नेणीवेत तरी, असावी. थंडपणे विचार करणे त्यामुळे अशक्य होताना दिसते.

दलितांचा प्रश्न कायमचा गाडण्याकरता दलितच संपवून टाका, असे म्हणणारे अतिरेकीसुद्धा दलित स्त्रियांना संपवण्याची भाषा बोलत नाहीत. भारतात तर सर्वत्रच, पण पाकिस्तानात आणि बांगला देशातसुद्धा, झाडूकाम, भंगीकाम करायला हिंदू दलित स्त्रिया आहेतच.

आता 'उपरा'कडे वळू. त्यातली दलित स्त्री मात्र खरोखरच 'जनावर' समजली गेलेली आहे. तिची खरेदी-विक्री होते. ती गहाण ठेवली जाते. कर्जफेडीसाठी दिली जाते. 'जिवंत मालमत्ता' हे तिचं स्थान. ती दररोज करीत असलेले शारीरिक कष्ट व भटकेपणामुळे येणारे कष्ट यांची तुलना केली तर दलित स्त्रीची स्थिती बरी म्हणावी लागेल. यथास्थित लाडू, खिरी, शेकशेगडीसहित सव्वा महिना माहेरी बाळंतपण करणारी स्त्री आणि ही स्त्री यांच्या मातृत्वाची तुलना मनाशी करून पहावी.

या स्त्रियांच्या मनात काय आहे, ते कळणे आणखी दुरापास्त होते, कारण कचाकच भांडण किंवा शिव्या सोडल्या तर संभाषण हे कला म्हणून किंवा सुसंवाद म्हणून वापरले जाण्याचे प्रसंगही कमी आणि त्यातला स्त्रीचा सहभागही कमीच. शिवाय या सर्व जमातींच्या बोलीभाषा मराठीहून खूपच भिन्न आहेत. त्या जमातीबाहेर बोलल्याही जात नाहीत. तेव्हा त्या जमातीतील थोड्या पुढारलेल्या पुरुषांकडून ती भाषा शिकून घेऊन नंतर या स्त्रियांशी बोलावे लागणार किंवा या जमातीतील स्त्रियांचे बोलणे टेप करून घेऊन नंतर त्याचे ॲनॅलिसिस करावे लागणार. आजतरी यातले काहीच झालेले नाही.

सध्या जर भाषाविषयक निरीक्षणे करायचीच झाली तर, असे म्हणता येईल की, मिश्र समाजात बसून संभाषण, एखाद्या गोष्टीच्या बरेवाईटपणावर उलटसुलट चर्चा, तसेच आपल्या प्रेम, द्वेष, राग, लोभ, वात्सल्य इत्यादी सर्वच भावना शब्दांतून व्यक्त करण्याची क्षमता आणि तशी सामाजिक संधी, त्यासाठी समाजमान्य प्रसंग या सगळ्या सुसंस्कृत समाजातल्या चालीरीती आहेत. इंग्लंडमधील एका प्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञाने समप्रमाण दाखवून दिले आहे की, शाब्दिक प्रक्रियेची संधी अंतर्गत पॉवर रिलेशन्समुळे जिथे नाकारली जाते, तिथे मनोविकास आणि बुद्धिविकासही खुंटतो. बुद्धिमत्ता आणि भाषाज्ञान यांचा बराच जवळचा संबंध आहे.

नुसता अनुभव घेत जगणे पुरेसे नसून त्या अनुभवावर भाष्य, टीका, टिप्पणी करता येणे, हे समृद्ध समूहजीवनाचे लक्षण आहे. त्या दृष्टीने या स्त्रिया सांस्कृतिक दारिद्र्यातच जगत आहेत. या प्रश्नांच्या मुळावर कुऱ्हाड घालायची, तर या जमातीची सध्याची अस्मिता जशीच्या तशी कायम राखणे अगदी अशक्य आहे. तशा भ्रमातही कार्यकर्त्यांनी राहू नये. आधुनिक समाजाच्या मूल्यांशी– उदा. लोकशाही आणि समान दर्जाचे सर्व नागरीक– जर जुळवून घ्यायचे असेल, तर सध्याच्या त्यांच्या जगात प्रचंड उलथापालथ होणार. 'म्यूझियम पीस' म्हणून त्यांचे रक्षण करणे करीत बसणे, हे परिणामी घातक ठरेल.

साधा स्वयंपाक जरी बिनधुराच्या चुलीवर होऊ लागला, घरात ताठ उभे राहण्याइतकी घराची उंची वाढली, पिण्याचे पाणी स्वच्छ आणि मुबलक, तेही नळातून मिळाले, तरी या स्त्रिया फारच बदलतील. जगाकडे पहाण्याची त्यांची नजरच बदलेल.

फार दूरचा विचार करून योजना आखण्याची कुवत आदिवासी किंवा भटक्या लोकांत नसते. यावर पुष्कळ बोललं जातं. पण त्यांच्या जीवनाची सध्या जी जेमतेम पोट भरण्याइतकी परिस्थिती आहे व त्यात स्त्रियांना जे जिवंत मालमत्तेचे स्थान आहे, ते बदलल्याशिवाय नवा विचारही अशक्य आहे. आधी भाषाविषयक समृद्ध जाणिवा की आधी राहणीमध्ये परिवर्तन हा अंडे आणि कोंबडीसारखा यक्षप्रश्न आहे. फ्रेअरेने 'बोलते व्हा' इथून सुरुवात केली खरी, परंतु बोलायचे शिक्षण व राहणीत आर्थिक आणि सामाजिक परिवर्तन जोडीनेच चालावे लागते. अव्वल इंग्रजीत ब्राह्मण समाज कसा बदलत गेला, याचा इतिहास मार्गदर्शक ठरावा. स्त्रिया बदलल्या तर राष्ट्र बदलतं, हे लेनिनचं निरीक्षण अचूक आहे. शाळा किंवा मुक्तशाळा या प्रकारापर्यंत जोपर्यंत स्त्रिया पोचत नाहीत, तोपर्यंत त्यांच्या भाषाव्यवहारावर फार बंधने राहणारच. आणि जिथे सुसंवाद नाही तिथे भांडणे आणि शिव्या यांचेही महत्त्व कायम राहणारच.

उंदराची गोष्ट सांगतात की, त्यांना काही कठीण पदार्थांवर दात चालवता आले नाहीत, तर त्यांचे दात इतके वाढतील की, ते जबडा फाडून बाहेर येतील.

दडपणाखाली ठेवलेल्या मनुष्यप्राण्यांच्या मनांची ही गोष्ट त्या उंदरांच्या दातांसारखी आहे. ज्याच्या मनोविकासाला वाव नाही, शारीरिक कष्ट अपार आहेत, त्यांच्या अंतर्मनात विध्वंसक विचार येतच राहणार आणि त्याचा उद्रेक मारहाण, भांडणे, शिव्या यांतूनच होणार. त्यातली अगदी टोकाची क्रिया म्हणजे मारामारीतून खून.

आपल्या लक्षात येईल की बाचाबाची, मारामारातून खून होण्याचे प्रमाण समूहांच्या सांस्कृतिक दारिद्र्याबरोबरच वाढत जाते. हे आकडेवारीतूनही दाखवता येईल.

शब्दांच्या मदतीने समूहजीवन नियंत्रित करणे आणि समूहातील प्रत्येकाला

बोलायची संधी असणे या फार मूल्यवान गोष्टी आहेत. त्यांचे राजकीय व सामाजिक महत्त्व अगदी अलिकडे समजू लागले आहे. ग्रीक संस्कृती गुलामांच्या श्रमावर चालत होती, भारतातले अनेक समूह स्त्रियांच्या गुलामगिरीवरच टिकून आहेत. स्त्रिया बोलू लागल्या की, त्या समूहांचे स्वतंत्र अस्तित्व नक्कीच डळमळेल.

एवढे सर्व सांगितल्यावर आपल्या लक्षात आले असेलच की, आपण ज्याला हाडं म्हणतो त्याला महार लोक गुडसा म्हणतात, अशा प्रकारच्या तांत्रिक चर्चेसाठी हा लेख नाही.

परंतु तरीही 'अस्मिता' या एका मुद्यापुरता तांत्रिक विचार करूया. प्रतिष्ठितांचा बाबूराव आणि आदिवासीतील मात्र 'बाब्या' या भेदावर अनूताई लिमये, चित्रा नाईक आदींनी बोट ठेवलेले आहे. 'स्त्री' ही अमक्याची मुलगी, पत्नी, आई म्हणून ओळखली जाते, यावर स्त्रीमुक्ती चळवळ बोट ठेवते. माझ्याही अनेक लेखांत यावर मी लिहिले आहे.

पण दलित स्त्री ही व्यक्ती म्हणून ओळखली जाते. तिच्या वैवाहिक इतिहासात उलथापालथ हाच नित्यनेम. तिचे नाव गावात ती ज्यांच्या दारी जाते त्या सर्वांना माहीत असते. तिच्या स्वभावाचाही विचार होतो. उर्मट, भांखोरी, माजोरी, गरीब, रूपवान, वगैरे, विशेषणे तिला असतात, दलितेतरांच्या मनामधे ती कोणाची पत्नी आहे, हे तिच्यासाठी कोणाला दम भरावा एवढ्यापुरतंच महत्त्वाचं.

भटकी स्त्री मात्र कळपातील एक एवढ्याच ओळखीने वावरते. तिचे व्यक्तित्व विशेषच प्रभावी असल्याखेरीज तिचा सामाजिक प्रभाव जवळजवळ शून्य असतो. तिच्या जमातीबाहेर तिचा संबंध तिच्या पुरुषवर्गाच्याच नियंत्रणाने येतो. आणि बाहेर जर लैंगिक संबंध आला, तर तिच्या प्राणावरच बेतते.

आधुनिक नागरी संस्कृतीबद्दल तिच्या मनात विश्वास आणि आपुलकी निर्माण करण्याचे काम अंगावर घेणाऱ्यांना, हे आवाहन स्वीकारताना, भाषा- वैज्ञानिकांची मदत घ्यावीच लागेल.

**७ दलित स्त्रीचं बदलतं स्थान**

* १८४८ साली म. जोतीराव फुले यांनी महारमांगांच्या मुलींसाठी शाळा काढली आणि दलित स्त्रीच्या मुक्तीचे पहिले पर्व आरंभले
* दलित स्त्रियांच्या मनातून सर्वप्रथम न्यूनगंड निपटून टाकून त्यांना आत्मोन्नतीसाठी प्रवृत्त करणे, त्यांना स्वसामर्थ्याची जाणीव करून देणे आणि दास्यमुक्तीच्या लढ्यासाठी सज्ज करणे ही भारतीय स्त्री–चळवळीच्या संदर्भात अत्यंत मोलाची घटना ठरावी.
* काळाराम मंदिराच्या सत्याग्रहाने दलित स्त्रीला आत्मबळ दिले आणि तिच्यातील सामर्थ्याचे व लढाऊ प्रवृत्तींचे दर्शन घडविले, हक्काची भाषा दिली.
* दलित स्त्रीची अप्रतिष्ठा करणाऱ्या वाङ्मयाकडे अत्यंत जागरूकतेने ह्या काळात पाहिले गेले आहे.
* १९४२ साली भरलेल्या अखिल भारतीय दलित महिला परिषदेस पंचवीस हजार महिला उपस्थित होत्या.
* आजची दलित स्त्री सजग, स्वाभिमानी, आणि अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी सज्ज झालेली दिसते.

**डॉ. गंगाधर पानतावणे**

१८४८ साली म. जोतीराव फुले यांनी महारमांगांच्या मुलींसाठी शाळा काढली आणि दलित स्त्रीच्या मुक्तीचं पहिलं पर्व आरंभलं. तिच्या भविष्याची ती नांदी होती. समाजव्यवस्थेला आणि समाजविचाराच्या मूळ गाभ्यालाच हात घालून फुल्यांनी एकूण स्त्रीला सन्मान बहाल केला होता. 'मुक्ताबाई मांग' हा स्वातंत्र्याचा पहिला हुंकार होता. ह्या मुलीने आपल्या छोट्या निबंधात महार–मांगाच्या वेदना शब्दबद्ध करून परंपरा, धर्मशास्त्रे व रूढीलाच आव्हान दिले. दलित स्त्रीने आत्ममुक्तीच्या चळवळीसाठी केलेला हा पहिला संघर्ष होता.

दलित स्त्रीची चळवळ ही समग्र दलित चळवळीच्या अंतर्गत राहिलीच आहे. प्रत्यक्ष जीवनात ती पुरुषांच्या बरोबरीने आर्थिक वाटा उचलण्यात सहभागी झाली. शारीरिक कष्टाची कामे आणि नंतर बदलत्या काळाप्रमाणे शिक्षणाच्या उंबरठ्यावर

ती उभी राहिली. विसाव्या शतकाच्या अगदी पहिल्या- दुसऱ्या शतकात जातपंचायतीने तिला काही अधिकार दिले. तिला नवऱ्याला सोडचिठ्ठी देण्याचा वा घेण्याचा अधिकार होता. पुनर्विवाह ती करू शकत असे. पाट लावण्यास तिला मुभा होती. विधवाविवाहाच्या बौद्धिक चर्चेत तिला रस नव्हता. इतर स्पृश्य स्त्रियांच्या तुलनेत तिचे कौटुंबिक स्थान नगण्य नव्हते. असे असले तरी स्त्री–पुरुष संबंधातील नैतिकतेचा, अधिकाराचा प्रश्न दुर्लक्षिला जात नसे. नागपूर येथे १३, १४ व १५ एप्रिल १९१३ रोजी झालेल्या महार परिषदेतील 'लग्नाचा नवरा असून स्त्रीने विनाकारण चावटपणाने त्याचा त्याग केल्यास अथवा भ्रताराने स्त्री सोडल्यास, होतपावेतो, उभयतांचा संगम करून द्यावा'[1] ह्या ठरावातून स्त्री–पुरुषांच्या कर्तव्याची जाणीव स्पष्ट होते. लग्नाच्या स्त्रीने दुसरा घरोबा केल्यास तिचा दिवस किंवा तिच्या नावाने जातीजेवण करू नये, स्त्रियांनी तमाशाला जाऊ नये, स्त्रियांनी डोक्यावर गॅसबत्त्या नेऊ नयेत, अशा प्रकारच्या ठरावातून स्त्री–सुधारणांच्या व तिच्या प्रतिष्ठेच्या प्रश्नांना समाजात स्थान दिले जात असे, असे म्हणावे लागते. शिवराम जानबा कांबळे ह्यांसारख्या दलित कर्त्या सुधारकाने दलितांतील देवाला वाहिल्या जाणाऱ्या मुरळीच्या प्रथेला पायबंद बसावा म्हणून पराकाष्ठेचे प्रयत्न केले आणि १९०९ साली शिवुबाई जाधव नावाच्या देवदासीचा विवाहही जाहीर रीतीने घडवून आणला. त्याचा परिणाम म्हणून शिवराम जानबांना समाजातील रूढिनिष्ठांकडून टीकेचे प्रहार सहन करावे लागले. पण हे गृहीतच धरावे लागते.

आंबेडकरपूर्वकाळात दलित- समाजचिंतक गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, किसन फागू बंदसोडे यांनी दलित स्त्रीच्या प्रतिष्ठेसाठी, तिला समाजात समान स्थान मिळावे म्हणूण शिक्षणजागृती व विचारजागृती करण्याचे अधिक प्रयत्न केले. त्यासाठी सभा–सम्मेलनें, परिषदा आयोजिण्यात येत. दलित स्त्रीला तिच्या अस्तित्वाची जाणीव करून देणे, अनिष्ट चालींपासून परावृत्त करणे, बालविवाहापासून परावृत्त करणे, या बाबींवर सातत्याने भर दिला जाऊ लागला. बालविवाह आरोग्याबरोबरच कुटुंबसौख्यावरही परिणाम करतात म्हणून, मुलाचे वय २२ व मुलीचे वय १६ वर्षाचे झाल्याखेरीज आईबापांनी त्यांची लग्ने करू नयेत.[2] असा दंडक घालण्यात येऊ लागला. दारिद्र्य व अज्ञानात खितपत पडलेला समाज विवाहप्रसंगी कर्जबाजारी होत असे. त्यावर लक्ष केंद्रित करून समाजपंचायतींनी काही निर्बंध घातले. ही बाबही लक्षणीय मानावी लागेल. नापूर येथील लाडवन महार पंचकमेटीने मुलीच्या लग्नासाठी येणारा खर्च १६ रुपयांपेक्षा जास्त नसावा, साक्ष गंध ५ रु. त, सगाई ९ रु. त आणि लग्नासाठी २ रु. असे एकून १६

---

१) दलितांचे प्रबोधन : गंगाधर पानतावणे, पृ. १६

२) बहिष्कृत भारत : १६ सप्टें. १९२७ (अंबरनाथ जि. ठाणे येथील सभेचा वृत्तांत)

रुपयांत मुलीचा विवाह व्हावा, असा आग्रह धरला होता.[३] दलितांच्या समग्र चळवळीचाच दलित स्त्री हा एक महत्त्वाचा घटक असल्याने पारंपरिकतेला नकार देण्याचा, तिच्या सन्मानाचा, आणि परिवर्तनाच्यां दिशेने भक्कम अशी वाटचाल करण्याचा, हा विसाव्या शतकाच्या आरंभीचा भाग, पुढील दलित स्त्री चळवळीच्या व तिच्या बदलत्या स्थानाच्या दृष्टीने उपकारक ठरला यात शंका नाही.

दलित स्त्रीसंबंधाने पुरुष कार्यकर्त्यांनी तिच्या स्वतंत्र अस्तित्वासंबंधी विचार करणे, तिला विचारप्रवृत्त करणे हा भागही चळवळीच्या दृष्टीने महत्त्वाचा होता. पण त्याहीपेक्षा महत्त्वाचा भाग प्रत्यक्ष स्त्रीने चळवळीत सहभागी होणे हा होता. त्या दृष्टीने महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागांत प्रयत्न होताना दिसतात. १९०६ साली नागपुरात स्थापन झालेल्या 'महार समाज' या सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थेत, श्रीमती तुळसाबाई बंदसोडे ह्यांचा स्त्री-प्रतिनिधी म्हणून समावेश होता. आणि आपल्या कुवतीप्रमाणे त्यांनी दलित स्त्रियांना संघटित करण्याचा प्रयत्न केला होता. किसन फागू बंदसोडे ह्यांनी १९०७ साली नागपुरात स्थापन केलेल्या अस्पृश्य मुलींच्या शाळेत जाईबाई चौधरींनी शिक्षण घेतले आणि प्राथमिक शिक्षण आटोपल्यावर, मिस ग्रेगरी संचालित एका शाळेत शिक्षिकेची नोकरी मिळवली. परंतु जाईबाई ह्या अस्पृश्य आहेत हे कळल्यावर सवर्णांनी आपल्या मुलींची नावे शाळेतून काढून टाकायला आरंभ केला. परिस्थितीचा अंदाज घेऊन मिस ग्रेगरींनी जाईबाईंना ख्रिश्चन व्हायला सांगितले. पण त्यांनी नकार देताच त्यांना नोकरीला मुकावे लागले.[४]

१९२० साली नागपूर येथे छ. शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली 'अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषद' भरली होती. ह्या परिषदेच्या निमित्ताने दलित स्त्री किती जागृत झाली आहे आणि ती विविध क्षेत्रांत कशी समर्थपणे उभी राहू शकते, ह्याचा जणू प्रत्ययच आला. या अत्यंत महत्त्वाच्या परिषदेत 'प्राथमिक शिक्षण मुलांना आणि मुलींना मोफत व सक्तीचे, शक्य तितक्या लवकर सुरू करावे' असा ठराव झाला. तेव्हा ठरावाच्या बाजूने ह्या दोन स्त्रिया म्हणजे सौ. तुळसाबाई बंदसोडे आणि कुमारी रुक्मिणीबाई कोटांगळे ह्या होत्या.

दलित स्त्रीच्या परिवर्तनाचा अत्यंत प्रभावी आविष्कार दिसतो तो डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी आरंभ केलेल्या चळवळींतून. महाडचा १९२७ चा चवदार तळ्याचा सत्याग्रह ही त्याची नांदी ठरावी. समग्र दलित स्त्रियांच्या भविष्याचा तो चिरंजीव लेख होय. तिच्या उत्थानाचा तो जाहीरनामाच मानावा लागेल. पुरुषांच्या बरोबरीने तिनेही समाजपरिवर्तनाच्या चळवळीत सहभागी होऊन नैतिक दृष्टीने सबल झाले पाहिजे, असा बाबासाहेबांचा आग्रह होता. तिचे मानसिक परिवर्तन

---

३) नागपूर येथील महार पंचकमेटीची सभा : २२-१०-१९१२

४) जाईबाई चौधरी : डॉ. वि. भि. कोलते, अस्मितादर्श दिवाळी अंक '७५

हा मूळ गाभा होता. तिच्या ठिकाणी महत्त्वाकांक्षा रुजविणे आणि तिला सर्वप्रथम तिच्या अस्तित्वाची जाणीव करून देण्यासाठी व तिला अंतर्मुख करण्यासाठी बाबासाहेब आंबेडकरांनी महाडच्या परिषदेत जे भाषण केले, ते ऐतिहासिक तर आहेच, पण समग्र मानवी स्वातंत्र्याच्या इतिहासात अग्रस्थान द्यावे इतके मोलाचे आहे. त्यातील काही अंश असा–

'तुम्ही विचार करावयास पाहिजे की, ब्राह्मणांच्या स्त्रियांत जेवढे शील आहे तेवढे तुमच्यातही आहे. ब्राह्मण स्त्रियांत जितके पावित्र्य आहे तितके पावित्र्य तुमच्यातही आहे. आणि तुमच्यात जितके मनोधैर्य, करारीपणा व धमक आहे, तितकी ब्राह्मण स्त्रियांतही नाही. असे असताना ब्राह्मण स्त्रियांच्या पोटी जन्मलेले बालक का सर्वमान्य व्हावे व तुमच्या पोटी जन्मलेले बालक सर्व ठिकाणी का अवमानिले जावे, त्याला साध्या माणुसकीचा हक्क का असू नये, याचा तुम्ही कधी विचार केला आहात काय? मला वाटते, त्याचा तुम्ही कधी विचार केला नाही... तुम्ही प्रतिज्ञा करा की, अशा कलंकित स्थितीत आम्ही यापुढे जगणार नाही.' [५]

ह्या विचारांच्या मागे दलित स्त्रीच्या स्वोद्धाराची कल्पना आहे. दलित स्त्रियांच्या मनातून सर्वप्रथम न्यूनगंड निपटून टाकून त्यांना आत्मोन्नतीसाठी प्रवृत्त करणे, त्यांना स्वसामर्थ्याची जाणीव करून देणे आणि दास्यमुक्तीच्या लढ्यासाठी सज्ज करणे, ही भारतीय स्त्री-चळवळीच्या संदर्भात अत्यंत मोलाची घटना ठरावी. दलित स्त्रीला नवी दृष्टी देऊन तिला नव्या जगाचे भान देण्यासाठी केलेला हा साक्षेप होता. 'गुलामीच्या ज्या ज्या खुणा अंतर्बाह्य स्वरूपात असतील, त्या पुसून टाकण्यासाठी, सामान्य वाटणाऱ्या पण अतिशय मूलभूत परिवर्तनाची साक्ष देणाऱ्या घटनांचाही विचार दुलक्षून चालणार नाही. वरिष्ठ वर्गातील स्त्रीसारखे लुगडे नेसले पाहिजे, गळ्यात भाराभर गळसऱ्या, हातात कोपरभर कथलाच्या किंवा चांदीच्या गोठपाटल्या घालण्याची गरज नाही. त्यामुळे नवऱ्याचे आयुष्य वाढते किंवा शरीराला शोभा येते, असे नाही. उत्तम कपडे घालावे आणि दागिनाच घालायचा असेल तर एखादाच व तोही सोन्याचा घालावा,' अशा प्रकारे बाबासाहेब आंबेडकरांनी महाडच्या स्त्री- परिषदेत मांडलेले विचार दलित स्त्रीच्या संदर्भात अत्यंत क्रांतिकारक होते. मानसिक गुलामगिरी, न्यूनगंड टाकून देऊन तिला आत्मप्रतिष्ठित करणे जरुरीचे होते. दलित स्त्रीमुक्ती चळवळीची ही जणू पहाटच होती. कारण ह्या विचारांनी पुढे सबंध महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राच्या बाहेरही नवी चेतना निर्माण झाली. देवदासींच्या प्रश्नाला पुन: एकदा जाग आली. कर्नाटकातील नेर्ली या गावच्या बहिष्कृत परिषदेत पाच हजार महार जोगत्या आणि दोन मांग जोगत्यांनी स्व खुशीने इच्छित पुरुषांबरोबर लग्न केले.[६]

---

५) डॉ. भीमराव रामजी आंबेडकर (चरित्र) : खंड– ३, चां. भ. खैरमोडे पृ. १९४

ह्याच सुमारास इंदूर येथे दलित मुलींसाठी वसतिगृहाची स्थापना करण्यात आली. मिश्रविवाहाला चालना मिळू लागली. पश्चिम महाराष्ट्रात मार्च १९२९ मध्ये देवकीबाई गायकवाड (मातंग) व श्री. साठे (सवर्णीय) यांचा विवाह घडविण्यात आला, तर विदर्भात पतितपावनदास ह्यांच्या पुढाकाराने ब्राह्मण वर व महार वधू यांचा विवाह वर्धा मुक्कामी संपन्न झाला.

येथे आणखी एका बाबीचा उल्लेख आवर्जून करावसा वाटतो. दलित स्त्रीची अप्रतिष्ठा करणाऱ्या वाङ्मयाकडे अत्यंत जागरुकतेने ह्या काळात पाहिले गेले आहे. पुण्यात 'स्थानिक स्वराज्य' ह्या नाटकाचे प्रयोग होत असताना, या नाटकात दलित स्त्रीची नालस्ती करण्यात आली आहे, म्हणून ते नाटक बंद पाडले पाहिजे असा आवाज १९२७ च्या सुमारास प्रखरपणे मांडला गेला आहे. पुण्याच्या अहिल्याश्रमात झालेल्या सभेत असा ठरावच करण्यात आला—

'सध्या पुणे शहरात 'स्थानिक स्वराज्य' या नावाचे नाटक होत असते. या नाटकात अस्पृश्यांच्या स्त्रीवर्गाची नालस्ती व बेअब्रू होईल, असे काही प्रवेश घातले आहेत. त्यामुळे अस्पृश्य वर्गात क्षोभजनक परिस्थिती उत्पन्न झाली आहे. तरी सदर नाटक अजिबात बंद करण्यास किंवा त्यातील आक्षेपार्ह प्रसंग अथवा प्रवेश अजिबात काढून टाकण्यास सदरहू कंपनीस भाग पाडावे, अशी ही सभा सरकारला विनंती करीत आहे.' [७]

आजच्या 'कन्यादान' किंवा 'पुरुष' या नाटकांसंबंधीच्या प्रतिक्रियांच्या पार्श्वभमीवर साठ वर्षांपूर्वीच ही जाणीव कशी रुजू लागली होती, ह्याचे हे प्रत्यंतर होय.

दलित स्त्री—चळवळीचा एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा म्हणजे ह्या स्त्रियांनी स्वतःच निर्माण केलेल्या संस्था. १९२७ नंतर महाराष्ट्रभर ह्या संस्था जन्माला आलेल्या दिसून येतात. सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील लढ्यात तिने केलेला प्रवेश असा आत्मजागृतीचा होता. ह्या संस्थांमार्फत स्वतंत्रपणे सभा, परिषदा भरविणे व त्यांतून विविध ठराव पारित करणे, असे एक स्वरूप प्रतीत होते. अवतीभवतीच्या इतर प्रश्नांसंबंधीची जागरुकताही त्यातून ठळकपणे दिसते. शारदा बिलास पाठिंबा, सक्तीचे शिक्षण असे ठराव व त्याचा पाठपुरावा ही त्याची साक्ष.

दलित स्त्री सत्याग्रहात सहभागी होऊ लागली, ह्याची प्रचीती महाडच्या चवदार तलावाच्या सत्याग्रहाच्या वेळी आली असली, तरी त्याचा स्फोटक आविष्कार नासिक येथील १९३० च्या काळाराम मंदिर सत्याग्रहाच्या वेळी दिसून येतो. मंदिराच्या सर्वच दरवाज्यांवर त्यांनी सत्याग्रह केला आणि ह्या स्त्रियांनी एक महि-

---

६) बहिष्कृत भारत : ३ जून १९२७ (नेर्ली- जि. बेळगाव येथील बहिष्कृत परिषदेचा वृत्तान्त)

७) बहिष्कृत भारत : ३० सप्टें. १९२७ (अहिल्याश्रम येथील सभा)

न्याचा तुरुंगवासही भोगला. पुढे अनेक सत्याग्रहांत, विशेषतः भूमिहीनांच्या आंदोलनात, सहभागी होऊन त्यांनी कारावास पत्करला. पण काळाराम मंदिराच्या सत्याग्रहाने दलित स्त्रीला आत्मबळ दिले आणि तिच्यातील सामर्थ्य व लढाऊ प्रवृत्तीचे दर्शन घडविले, हक्काची भाषा दिली.

दलित स्त्रियांनी स्वतंत्रपणे निर्माण केलेली महिला मंडळे म्हणजे त्यांच्या आत्मविश्वासाचे आणि हक्काच्या जाणिवांचे प्रकट रूपच होते. नासिकच्या सत्याग्रहानंतर दलित स्त्रियांच्या संघटनांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सर्वच चळवळींना सक्रिय पाठिंबा दर्शविला आणि स्वतंत्रपणे स्त्रियांचे प्रश्न व सामाजिक जबाबदाऱ्या यांवर भर दिला. या संघटनांनी ज्या काही प्रश्नांचा उहापोह केला आणि सक्रियतेने त्यांचा पाठपुरावा केला, अशा काही बाबींचा निर्देश करणे जरुरीचे आहे. धर्मांतर चळवळीला पाठिंबा, डॉ. आंबेडकर जयंती साजरी करणे, अस्पृश्यांतील जाती–पोटजाती नष्ट करणे, स्त्रियांनी जलसे–तमाशाला जाऊ नये, उच्च शिक्षण घ्यावे, वक्तृत्व–चर्चा ह्यांत भाग घ्यावा अशा काही महत्त्वाच्या बाबींचा पाठपुरावा करणे हे दलित स्त्रीच्या आमूलाग्र परिवर्तनाचे द्योतक होते, असे मानावे लागेल. दलित स्त्रीच्या चळवळीची केंद्रे नासिक, नागपूर, मुंबई ही राहिली. ह्या महिला मंडळांनी, परिषदांनी व सभांनी कोणते एक महत्त्वाचे योगदान दिले असेल तर महाराष्ट्रात असंख्य स्त्री–कार्यकर्त्या उदयाला आल्या. कुटुंब आणि घर ह्यापुरतेच मर्यादित जग असलेल्या स्त्रिया एका नव्या जगाच्या निर्मितीसाठी सिद्ध झाल्या ही फलश्रुती होय. आत्मजाणिवेबरोबरच सामाजिक व सांस्कृतिक जाणीव बहराला आली. त्याचा परिणाम असाही झाला की, महाराष्ट्रात स्थापन झालेल्या सवर्णीय महिलांच्या संस्थांनाही दलित स्त्री–कार्यकर्त्यांची दखल घ्यावी लागली. त्याची काही कटू फळेही दलित स्त्री–कार्यकर्त्यांना अनुभवावी लागली. पण अशा प्रसंगांना त्यांनी चोखपणे दिलेली उत्तरं म्हणजे त्यांच्यातील आत्मसन्मानाची पावतीच होय. या संदर्भातील एका घटनेचा उल्लेख प्रस्तुतच ठरावा.

१९३७ च्या डिसेंबरात नागपूर येथे 'अखिल भारतीय महिला परिषद' भरविण्यात आली. दलित स्त्री कार्यकर्त्यांना निमंत्रित करण्यात आले. वरवर पाहता, ही परिषद सर्व स्त्री–जातीची समानदृष्टीची होती, असा बनाव करण्यात आला होता असे म्हटले पाहिजे. कारण भोजनाच्या वेळी दलित कार्यकर्त्या जाईबाई चौधरी आणि इतरांना दूर बसविण्यात आले होते. ह्यासंबंधीचा संताप व चीड व्यक्त करण्यासाठी दलित स्त्री कार्यकर्त्यांनी एक परिषद भरविली, ती १ जानेवारी १९३८ रोजी. या परिषदेत सौ. अंजनाबाई मेश्राम व सौ. सखुबाई मेश्राम ह्यांनी अत्यंत जहाल भाषणे केली. अस्पृश्य स्त्रियांना आपली संपूर्ण सुधारणा व उन्नती करून घ्यावयाची असेल, तर त्यांनी स्वाभिमानाची व स्वावलंबनाची चळवळ करून समाजाचे निःस्वार्थीपणे काम केले पाहिजे. दुसरे लोक आपली सुधारणा करतील, ही भ्रामक कल्पना सोडून देऊन आपल्याच पायावर उभे राहून, स्वतःची, आपल्या

कुटुंबाची व आपल्या समाजाची सुधारणा करणे आवश्यक आहे, असे विचार मांडण्यात आले. मुख्य म्हणजे अखिल भारतीय परिषदेतील अपमानासंबंधीचा जळजळीत ठराव येथे पारित करण्यात आला.

'नागपूर येथील नाताळात नुकत्याच होऊन गेलेल्या ऑल इंडिया महिला परिषदेतील स्पृश्य भगिनींनी अस्पृश्य समाजातील सौ. जाईबाई चौधरी वगैरे बायांना जेवणाचे वेळी स्पृश्य भगिनींच्या पंक्तीच्या दूर बसवून जेवण वाढले व अस्पृश्य समाजाचा विटाळ मानून अपमान केला, त्याबद्दल ही अस्पृश्य भगिनींची सभा अखिल भारतीय महिला परिषदेचा तीव्र निषेध व अविश्वास प्रकट करते.'[८]

निर्भयता, आत्मप्रतिष्ठा आणि प्रतिपक्षाशी सामूहिकरीत्या झुंज देण्याची ईर्षा आता दलित स्त्रीत प्रकर्षाने निर्माण होऊ लागली. बौद्धिक पातळीवरचे हे तिचे दर्शन म्हणजे नव्या वैचारिक नेतृत्वाची चाहूल होती. असे दर्शन १९४२ साली भरलेल्या 'अखिल भारतीय दलित महिला परिषदे'तून अधिक प्रभावीपणे प्रत्ययाला येते. पंचवीस हजार स्त्रिया ह्या परिषदेस उपस्थित होत्या. सौ. सुलोचनाबाई डोंगरे ह्या शिक्षित कार्यकर्तीने परिषदेचे अध्यक्षस्थान मंडित केले होते. शिक्षण आणि कुटुंबनियोजन यांवर भर देऊन सुलोचनाबाईंनी अन्याय आणि जुलूम लादणाऱ्या हिंदू धर्माच्या जोखडातून मुक्तता करून घेण्यावर भर दिला होता. ह्या परिषदेला खुद्द डॉ. बाबासाहेब आंबेडकर उपस्थित होते व त्यांनी एवढ्या मोठ्या प्रमाणावर दलित स्त्री एकवटल्याने ती किती जागृत झाली आहे, ह्याची प्रशंसा केली. वैचारिक आणि संघटनात्मक या दृष्टीने ह्या परिषदेचे यश लक्षात घ्यावे लागते. यानंतरही परिषदा झाल्या, त्यांतून दलित स्त्रीची नवी प्रतिमा दृग्गोचर होत राहिली.

स्वातंत्र्योत्तर काळात उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात दलित स्त्री अधिक मार्गक्रमण करीत राहिली. दलित पुरुषांबरोबरच आपल्या हक्कासाठी मोर्च्यात, तुरुंगात जाणे, विहिरीचे सत्याग्रह, कोर्ट–कचेऱ्या हे नित्याचेच झाले. दलितांच्या उत्थानाच्या राजकीय व सामाजिक लढ्यात तिने आपले पाऊल रोवले. जीवनाच्या विविध क्षेत्रांत ती आज उभी आहे. आजची दलित स्त्री जी सजग, स्वाभिमानी आणि अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी सज्ज झालेली दिसते, त्याचे एकमेव कारण स्वातंत्र्यपूर्व काळात दलित व दलित स्त्री–कार्यकर्त्यांनी पराकाष्ठा केली हे आहे. आजची दलित स्त्री कालच्या दलित स्त्रीच्या खांद्यावर उभी आहे.

आज दलित स्त्रीचे शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे ह्यात शंकाच नाही. पण गेल्या काही वर्षांत एक चित्र दिसते. शिकलेल्या अनेक स्त्रियांमध्ये एक नवा गंड निर्माण होऊ पहात आहे. एकीकडे काही शिक्षित दलित स्त्रिया आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार करताना दिसतात आणि समाजाचे एक नवे चित्र अपेक्षितात, तर

---

८) जनता : २२ जानेवारी १९३८.

दुसरीकडे काही शिक्षित स्त्रिया जुन्याचा आग्रह धरू पाहताना दिसतात. धर्मांतराच्या चळवळीमुळे जुन्या रूढी, कल्पना, अंधश्रद्धा नाकारणारा एक समूह दिसतो, तर दुसरा जुन्याला कवटाळून त्याचे भूषण मानत गीतापठण, देवदर्शन याही बाबींना उजाळा देऊ पहात आहेत. असे प्रमाण अल्प असले तरी, पुनरुज्जीवनवादी प्रवृत्ती काही शिक्षित दलित स्त्रियांत स्थिर होऊ पहात आहे. देव व दैववादाच्या आहारी जाऊन 'सवर्णसदृशता' प्रक्षेपित करण्याचा प्रकार दिसू लागला आहे. सामाजिक सरमिसळीचे तत्त्व उदात्तपणे प्रतिपादताना आत्मविसंवादाचे विस्मरण होणे स्वाभाविक आहे. अनुकरणप्रियता सामाजिक व सांस्कृतिक संदर्भात गंडप्रदर्शन करते, संघर्षोन्मुखता नष्ट करते. ही प्रवृत्ती काही शिक्षित दलित स्त्रियांत बळावत असली तरी फार मोठा इतर वर्ग परिवर्तनाचा झेंडा खांद्यावर घेऊन वाटचाल करीत आहे. मात्र महाराष्ट्रातील अशिक्षित व रांगडी दलित स्त्री ही अधिक क्रांतिसन्मुख व नव्याचे स्वागत करणारी आहे, हे चित्र आजही आशादायी आहे. ती अधिक मुक्त आणि आंबेडकरी विचाराला कृतिप्रवणतेचा स्पर्श होण्यासाठी सतत उद्युक्त आहे, ही फार मोठी जमेची बाजू आहे.

विभाग तिसरा

आत्मचरित्रांमधले स्त्रियांसंबंधीचे

# निवडक परिच्छेद

१) बलुतं

२) उपरा

३) आठवणींचे पक्षी

४) मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे.

५) तराळ अंतराळ.

प्रत्यक्षात स्त्रियांच्या संदर्भातले अनेक परिच्छेद या आत्मचरित्रांत आहेत, पण ज्यांच्यातून स्त्रियांच्या ठळक प्रतिमा उभ्या रहातात ते निवडक परिच्छेद इथे दिले आहेत.

संपादक.

# बलुतं

दया पवार

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
32845
दा. क्र.
दि. 25-5-65
ग्रंथ. शाखा (स्थळ प्रत)

## आई

दादा दारूच्या पूर्ण आहारी गेलेले. आई बिचारी मार्केटात जाऊन कागद गोळा करायची. तिच्या कमाईवर कशीबशी गुजराण व्हायची. कधी कधी आई वैतागायची, पण दादांपुढं तोंड उघडायची छाती नव्हती.

आईची बहुधा तोंड दाबून बुक्क्यांचा मार अशी अवस्था होत असावी. दादा तसे कोळश्यासारखे काळे, पण काळेपणाला शिसवी लाकडाची चमक. आई त्यांच्या मानानं खूपच उजळ, गव्हाळी रंगाची. दादा ताडमाड उंच तर आई अटकर बांध्याची. दहाबारा मुलं होऊनही तिच्या अंगकाठीत विशेष फरक पडला नव्हता. नऊवारी लुगडं नेसायची, अहेवलेणं म्हणून मोठं कुंकू लावायची. गळ्यात मात्र नेहमीच काळी पोत, कधीमधी डोरलं आणि दोन-चार सोन्याचे मणी. दागिने म्हणजे तरी काय? हातात चांदीच्या बांगड्या. त्याही कधीकाळी दादा वाण्याकडं गहाण ठेवायचे.

दादा प्याले म्हणजे दादा रहात नसत, मूर्तिमंत खवीस व्हायचे. अशा वेळी आई पुढं जात नसे, पण त्यांच्या प्रेमाचं इंगीत शेवटपर्यंत कळलं नाही. दादांबद्दल तिला काडीमात्र घृणा वाटायची नाही. पिशवीत असतील नसतील तेवढे पैसे ती मुकाट त्यांच्यापुढे ओतायची.

### आईला न मारणे

दादांनी आईला, दारूच्या नशेत का होईना, झोडपल्याचा प्रसंग पाहण्यात नाही. एक प्रसंग आठवतोय, तो वेगळ्या कारणासाठी. त्यातून दादांच्या मनाचा एक वेगळा कोपरा उलगडत जातो. एकदा त्यांच्या काय अंगात आलं कुणास ठाऊक, घरातील सर्वांना बाहेर काढलेलं, आत फक्त आई. त्यात दारंखिडक्या बंद करून घेतलेल्या. बहुधा सखूचा आज घाम निघणार ही चाळीतल्या बायकांची कुजबूज. मी रडकुंडीला आलेलो. आईचा मोठमोठ्यानं किंचाळण्याचा आवाज आणि दादांच्या काठीचे धपाटे. समोरच्या क्लबमधील यहुदी मंडळीही धावत आलेली. दादा बाहेरच्या धक्क्यांनाही दाद देत नाहीत. आता बहुधा. सखू मरणार ही बाहेर चिंता. यहुदी मंडळी दरवाजा तोडतात. आत जाऊन बघतात तो दादा बिछान्यावर काठी आपटीत आहेत आणि आई कोपऱ्यात रडते आहे... एवढी वर्षं झाली पण ह्या घटनेचा अर्थ कळू

शकला नाही.

**आई– वैधव्य**

आईचं माहेर जवळच दोन मैलांवर. त्यांची शेतीपाती होती. चुलत आजोबा धावत आले. आईनं पुन्हा लग्न करावं हा आजोबांचा हट्ट. कुणीतरी दुसवटयाचा नवरा, त्यानं आईला पाहिलेलं. आम्ही दोन लहान लेकरं. मी तर मुठीएवढा. बहीण सातआठ वर्षांची. महारवाडा तर असा कापल्या करंगळीवर मुतणार नाही. शिवाय फट् म्हणता अब्रूचं खोबरं व्हायचं. आजोबा इज्जतीला जपणारा. आजोबांच्या म्हणण्यावर आई वीज कडाडावी तशी कडाडलेली. एक तर माहेराबद्दल तिच्या मनात लहानपणापासून राग धुमसत होता. तिला ही आजोबाची कसाबकरणी वाटली-'मी काही तुमच्या दारात पडले नाही. मी मोलमजुरी करून माझ्या कच्च्याबच्च्यांना मोठं करीन.'

आई जन्माला आली त्या वेळेसच तिचा बाप वारला. बाप मातीआड झाला आणि ओल्या बाळंतिणीच्या छळाला सुरुवात झाली. मुलगा झाला नाही हा राग होताच. आजीला उपाशी ठेवू लागले. गुराढोरासारखं काम करून घेणं, पीठ चाळून जो भुसा राहील त्याच्या भाकरी आजीला देणं असा छळवाद मांडला.

त्या काळी सासुरवाशिणीचं जिणं म्हणजे तुरुंगच. ह्या छळाला कंटाळून आजी माहेराला गेली. माझी आई तेव्हा बाळुत्यात होती. तिला आजीपासनं तोडलं गेलं. आई सांगायची, 'तुझी आजी एकदा माहेरी गेली ती परत आलीच नाही. तिनं दुसरा घरोबा केला.'

आईनं पुरुषासारखी कंबर कसली. आयुष्यभर कमालीचे कष्ट उपसले. तिच्या सामर्थ्यानं मी खरा दिपून गेलो. दादांनी जेवढ्या लाडात वाढवलं नाही तेवढ्या लाडात आईनं वाढवलं. तळहाताच्या फोडासारखं जपलं ... आईनं जो त्याग केला त्यामुळं ह्या खाचरातून वर निघण्याची ऊर्मी मनात तरारून उठली. दादांची वाट ती आपली वाट नाही, त्यांनी जे जे केलं ते ते आपण टाळायचं अशीच मनात खूणगाठ बांधली नव्हती काय ?

**आईचं लग्न**

आईला एकदा सहजच विचारलेलं आठवलं, 'आये, काय ग बघून तू दादांशी लगीन केलंस ?'

त्यावर ती डोळ्यात पाणी आणून सारा जन्माचा इतिहास कथन करायची. दादांशी केव्हा लग्न झालं ते आईला आठवतच नाही. त्यावेळी ती झोळीत होती. झोळीतच बाशिंग बांधलं म्हणतात. जेव्हा ती परकर पोलकं नेसू लागली तेव्हा आपलं लग्न लहानपणीच झालंय यावर तिचा विश्वास बसायचा नाही. वेशीपाशी कोणाचाही नवरदेव आला म्हणजे 'महं लगीन करा' असा हट्ट चुलत आजीआज्याजवळ धरायची. तिच्या गळ्यातली काळी पोत तिला खोटी वाटायची. वडीलधाऱ्यांनी

समजूत काढली तरी तिला ती पटायची नाही. तिच्या समजुतीसाठी मग नवर-देवाच्या पाठीमागं तिला बसवायचं. लुगड्याचा बोंगा. डोक्यावर नारळ ठेवलेला तांब्या अशा पोझमध्ये तिला कळशीन म्हणून बसविलं जायचं. आईला वाटायचं, माझंच लग्न आहे.

आईच्या लग्नाचा किस्सा मोठा गंमतीदार आहे. दादांची आई देवकीचं आणि आईचं माहेर एक. दोघींचं माहेरचं आडनाव एकच. कसबे. आजी तेव्हा मुंबईला होती. दादांचं लग्न करायचं ठरलं तेव्हा आजीला आपलं माहेरचं ठिकाण हक्काचं वाटलं. 'पोरगी परणून आणीन तर औरंगपूरची' हाच तिचा हेका होता ... आई-वर मागणं टाकलं. अर्थात आजोबानं हे मागणं फेटाळून लावलं. आमच्या गावाचं नाव त्यांच्या लेखी खूपच बद्दू झालेलं. मवाल्यांचं धामणगाव असंच ते म्हणत... अशा उधळ्या गावात लेक द्यावी आणि भेटायची शिराणी व्हावी ही अवस्था. पण आजी तशी मागे हटणारी नसते. ती महारवाड्यातून उठते ती गावात जाते. तिथं जाऊन पाटलापुढं गाऱ्हाणं मांडते, 'मी तुमच्या गावची लेकबाळ. तुमच्या गावची सून मला पाहिजे. माझा तो हक्कच आहे.' ... पाटलापुढं कोण बोलणार ? आजा-आजीला चावडीवर बोलावण्यात आलं. गावच्या निर्णयापुढं आजाआजीची विरोध करण्याची काय बिशाद होती ? असं झालं दादांबरोबर आईचं लग्न.

**आई व दादा**

दादा जिवंत होते तेव्हा आई, ते घरात नसले म्हणजे, त्यांच्या नावानं बोटं मोडी, शीसराब देई. 'माझं कपाळच फुटकं !' म्हणून नशिबाला दोष देई. पण दादा मेल्यानंतर आईच्या स्वभावात कमालीचा फरक पडत चाललेला. दादांच्या आठवणी काढून ती आता तासन् तास गळा काढायची. 'तुझ्या दादानं कसं माझ्या अंगाला पाच बोटं लावली न्हाईत' म्हणून हुंदके द्यायची. आई सांगायची, 'तुझा दादा जेवायला बसला म्हंजी त्याचं सारं ध्यान चुलीकडे, मागं बायकोला टोपलीत भाकर हये का नाही, तवलीत कोरड्यास राहिलं की न्हाई, याची तो काळजी घ्यायचा.'

**पाहुणचार**

एकदा असाच दूरचा एक नातेवाईक घरी आलेला. त्या दिवशी चूल थंड. आम्ही येसकरपाळीच्या भाकरीवर भागवणार होतो. पण पाहुण्याला येसकरपाळीच्या भाकरी कशा द्यायच्या ? दादांनी आईला काय खूण केली कुणास ठाऊक, आई एकुलता एक तांब्याचा हंडा घेऊन घराबाहेर पडली. पाहुण्याला वाटलं असेल, बाई पाण्यालाच गेली. आई परत येते तेव्हा तिच्या ओटीत बाजार असतो.

**आईच्या गोधड्या**

एवढ्या सुंदर गोधड्या उभ्या महारवाड्यात फक्त आमच्याच घरात होत्या. आई गोधड्या फार सुंदर शिवायची. वर्तुळात एक एक वर्तुळ कमीकमी होत गेलेलं. आजही माझ्या आईच्या हातची गोधडी जपून ठेवलेली, आईच्या मायेसारखीच !

**मुलांचं शिक्षण**

(चौथीच्या) पुढं मला शिकवावं की नाही हा प्रश्न बहुधा आईपुढं असावा. महारवाड्यातल्या उमाआज्याचा आईला सल्ला:

'सखू, कह्याला पोराला साळंत धाडतेस ? आपन का वानीबामन हावोत ? फिरंल गल्लोगल्ली आन् खाईल डालीडुली. न्हाई तर जाईल गुऱ्हांकडं. तेवढीच राखुळी यील, व्हईल तुला मीठमिरचीला !'

आईनं उमाआज्याचा सल्ला मानला नाही. आपल्या मुलाला शिकवावं, मोठा करावा ही ऊर्मी तिला त्या काळी कुणी दिली असावी बरं ? बाबासाहेब म्हणत,

'महाराच्या बाईला मुलांसंबंधी डोहाळे कोणते लागतात ? तो प्यून व्हावा, शिपाई व्हावा, पण ब्राह्मणाच्या बाईला डोहाळे लागतात- आपला मुलगा कलेक्टर व्हावा ! असे डोहाळे महार आयांना का बरं लागू नयेत ?'

ह्या भाषणाचा तर नकळत आईवर परिणाम झाला नसावा ना ? मी तालु-क्याच्या गावी शाळेत जाऊ लागलो.

**आईचं चारित्र्य**

आईच्या चारित्र्याबद्दल संशय घ्यावा आणि तोही मुलानं ? ... एके दिवशी शाळेतून घरी आल्यावर उमाआज्याकडे पारावर गप्पा मारत बसलेलो. म्हातारा कावेबाज होता. एखाद्या गवताच्या गंजीत पटकन् काडी टाकावी तसं त्यावेळी घडलं. मला म्हणतो कसा, 'काय रं पोरा, तुहा बा मरून गेलाय आन् तुझी आई पोटुशी, हे रं कसं ?' झालं ! त्या पेटत्या काडीनं माझं मन धडाड पेटलं. जीव कासावीस होऊ लागला. डोक्यात प्रश्नांचं काहूर, काय करू आणि काय नाही, असं झालं. मुंबईला असताना कावाखान्यात अनेक किस्से मी ऐकलेले. एकदा तर कच-ऱ्याच्या डब्यात नुकतंच जन्मलेलं कोवळं मूल मी पाहिलेलं. घरी धुमसतच येतो. बघतो तो आई समोरच. आईचं तोंड पाहूसं वाटत नाही. तिच्याबद्दल नसानसांतून घृणा भरलेली. शेजारची म्हातारी बाई चुलीवर पाणी तापवत असते. म्हातारी मला सरपण आणण्यास पिटाळते, 'ए पोरा, पळ, तुही आई दुपावलीय !'

माझा तोल जातो. मी नाही नाही ते बोलतो. बाप मेला असताना गरोदर कशी हा माझा प्रश्न. आईला हसावं की रडावं ते कळत नाही. ती बावळटासारखी माझ्या तोंडाकडे पहाते. म्हातारी माझी समजूत काढते. आईचं आणि माझं दोन-तीन दिवस भाषण नाही. पुढ्यात येईल ते खात होतो आणि शाळेला जात होतो. शेवटी एका रात्री आईच्या मनाचा बांध फुटतो. ती गळ्यात पडून धाय मोकलून रडू लागते. सारा प्रकार खुलासेवार समजावून सांगते. खरं म्हणजे, दादा असता-नाच आईला दोनतीन महिने गेलेले असतात. हे सारं जेव्हा समजतं तेव्हा चरकातून काढल्यासारखी माझी अवस्था होते. आपल्या समजुतीच्या घोटाळ्यामुळं आईला केवढं मरणाचं दुःख दिलं. पुढील आयुष्यात आईला कधी दुखवायचं नाही याची मी मनात खूणगाठ बांधतो. आई मात्र कधी हा प्रकार विसरली नाही. बायकांत ती

गप्पा मारत बसली असता तिला हा प्रसंग हटकून आठवे आणि साऱ्या बाया माझ्या बावळटपणाला हसत. ... एकाला तरी आयुष्यातील सारं खरं सांगावं, हा माझ्या आईचाच वसा. तिनंच हे बळ दिलंय !

**मृत गाय आणि आई**

आईच्या आणि गाईच्या डोळ्यांत मला कमालीचं साम्य दिसायचं. आमच्या घरावर पाळी आली म्हणजे ढोर वहाण्याचं काम आईवर यायचं. आईची ती दमछाक पहावयाची नाही. वाटायचं, आपण थोडं मोठं असतो तर किती बरं झालं असतं ! आईचा भार खांद्यावर झेलला असता !

**आईची जमीन**

बलुतं, येसकरपाळी बंद झाल्यानं त्याचा खरा फटका बसला तो आमच्या घराला. उपजीविकेचं दुसरं काहीच साधन नाही. आई आता कष्टाकरिता सारखी उभी. डोंगरावर मोळीसाठी गेली म्हणजे तिथंही फॉरेस्ट शिपाई चिरीमिरी मागायचा. सुगीच्या दिवसात आई सरवा वेचायची. ढेकळातून गाडीरस्त्यानं शिवारातून नेताना पडलेली कपासं वेचायची. कशीतरी थंड चूल पेटायची. अनेकदा मी आईबरोबर ढग्या डोंगरावर जायचो. त्याची नकटी पायरी चढणं म्हणजे दिव्यच. आमची थोडीशी शेती होती. आईनं ती जिवापलिकडे जपलेली. रंडकीच्या जमिनी घशात घालणं हा भावबंदांचा खेळ. पण आईनं डोळयात तेल घालून तुकड्याचा सांभाळ केलेला. आई गावच्या मराठ्यालासुद्धा जमीन वाट्यानं लावीत नसे. आई नेहमीच ठाकराकडे जमीन वाट्यानं लावी. आमचा सरकती ठाकर कमालीचा प्रामाणिक माणूस ... घरी, महारवाड्यात डोक्यावरनं धान्य घेऊन यायचा.

**आईचे कष्ट**

जुनेर, तोंडावरची लाचारी, पांढरं कपाळ हे सारं उठून दिसायचं. का कुणास ठाऊक, माझ्या मनात मात्र कालवाकालव व्हायची. त्यात आईला गंडमाळा झालेल्या. एक गाठ फुटून बरी झाली की दुसरी फुटायची. गाठीचं सारखं ठसठसणं, तिच्या अंगाची लाहीलाही व्हायची. पण मुंबईवाल्या काकूला कोण काम सांगणार ? माझा आतल्याआत संताप अनावर व्हायचा ! अंगावरचं दुखणं सांभाळून आई सारखी हलत रहायची.

घाण्याच्या बैलासारखी आई राबत होती. आपली पिलं आपल्या डोळयांसमोर आहेत एवढंच तिला समाधान असावं.

**परीक्षा, आई–आजी**

परीक्षेला अहमदनगर इथं गेलो होतो ... आईला गाडीखर्चाकरिता अनेकांकडे तोंड वेंगाडावं लागत होतं. त्या वेळी माझ्या अंगात चमत्कारिक बुशशर्ट होता... आजीनं तो गाववाल्याच्या हाती पाठवलेला. बहुधा तिला कुणा तरी श्रीमंत मडमेनं दिलेला.

**आईची मासिक पाळी, विटाळ**

आईला बोर्डिंगमध्ये येऊन महिनाभरही झाला नसेल. आईची मासिक पाळी आलेली. तिच्यावर तसे जुने संस्कार. विटाळात केलेला स्वयंपाक मुलांना कसा घालावा या विवंचनेत आई. आई आपली शंका सुपरिंटेंडेंटजवळ सांगते. काय करावं म्हणून तेही बुचकाळ्यात पडलेले. बाहेरून चार दिवसांकरता मोलकरीण आणावी तर ही दर महिन्याला पोटदुखी व्हायची ! त्यानं काय होतंय असं म्हणून ते त्या दिवशी स्वयंपाक करण्यास भाग पाडतात. आईचा नाइलाज होतो. अर्थात ही बातमी मुलांपर्यंत कशी जाते कुणास ठाऊक ... सारी मुलं एका कोरसमध्ये गात असतात, 'पचका झाला रं ऽ पचका झाला...' कुणी जेवावयास तयार नाही... बहुधा कोरड्यास बिघडलं असावं अशी माझी कल्पना. कारण कोरड्यास कधी खारट झालंय, तर कधी पुचाट अशी मुलांची सतत तक्रार. माझ्यासमोर आईला बोलण्यात काहींना अघोरी आनंद मिळत असावा. त्यातले एक– दोघे तर खूप पाताळयंत्री. आईच्या नकळत एकदा– दोनदा त्यांनी मूठमूठ मीठ पातेल्यात टाकलेलं. अशी छळणूक सतत चालू ... भावना अनावर झाल्या म्हणजे रात्रीच्या वेळी आईच्या कुशीत जाऊन रडायचो. आईच्याही डोळ्यातील अश्रू थांबत नसत ... मी ताटावरून उठतो आणि आईकडे काय प्रकार झालाय याची चौकशी करतो. ती झालेला प्रकार सांगते. धरती दुभंगावी आणि आम्हा मायलेकरांना तिनं आत घ्यावं असं वाटलं. समाज ज्यांचा विटाळ मानीत होता, त्यांनीच स्त्रीदेहाचा विटाळ करावा, ह्याचा संदर्भ कळायचं त्यावेळी वय नव्हतं !

**आईवर चोरीचा आळ**

एकदा आईवर चोरीचा आळ आला. आई खूपच हादरली. तोंडचा घास जाणार हीच तिला भीती. चोरी काय तर पिठाची. तसा ह्या पिठाच्या चोरीशी आईचा काहीच संबंध नव्हता... सुपरिंटेंडेंट तसे वयानं उतरलेले आणि (नियोजित वधू) मुलगी तशी तरुण. त्यामुळं मास्तरांचा हात जास्तच दिलदार होऊ लागला. एकदा असंच मागील दारानं सोयऱ्याच्या बायकोला टॉवेलात पीठ नेताना एका मुलानं पकडलं. हा आळ आईवर आलेला. मास्तरांच्या दडपणामुळे आम्ही मात्र मास्तरांचं प्रकरण जाहीरपणें बोलू शकलो नाही... त्या रात्री मुलांच्या मंत्रिमंडळाच्या सभेत आईवर जाहीर दोषारोप होतो आहे आणि आई किंवा मी तोंड उघडीत नाही, अशी चमत्कारिक कोंडी झालेली!

**आईमुलाचे प्रेम**

आईचे आणि माझे संबंध खूपच मोकळे होते. मी तिच्यापासून काही लपवत नसे. तिची शिकवण होती की आयुष्यातल्या साऱ्या बऱ्यावाईट गोष्टी एका तरी माणसाला खऱ्या सांगाव्यात. ती हे तत्त्वज्ञान कुठं शिकली कुणास ठाऊक, पण ह्या तिच्या सांगण्याचा माझ्यावर खोल परिणाम झालाय. आज हे जे मी सांगतो आहे ते त्याच श्रद्धेने. बराच मोठा घोडमा होईपर्यंत लाडात आलो म्हणजे आईच्या मांडी-

वर झोपायचो. आई अशावेळी केसांतून हात फिरवायची. आईचा आवाज खूपच सुरेख. ती एखादं गाणं गुणगुणायची. गावी असताना तिची जात्यावरची गाणी ऐकणं हा माझा आवडीचा छंद. ती गात असताना आपोआप डोळ्यातून धारा लागायच्या. बोर्डिंगमध्ये असताना तिला सुट्टी असली म्हणजे मी काही पुस्तकातल्या गोष्टी तिला वाचून दाखवत असे. एकदा तिला मानिनी नावाची गोष्ट वाचून दाखवत असताना तिला तिचं माहेर आठवलं. आपली दुबळवाडी. त्यामुळे माहेरचे लोक कसे कस्पटासमान धरीत ह्याची आठवण तिला यायची. नवरा मेल्यानंतर पुन्हा दुसरा नवरा आईनं करावा ही माहेरची इच्छा ती आयुष्यभर कधी विसरली नव्हती. आईच्या कष्टाच्या कमाईवर अंगावर नवीकोरी कापडं येतात.

**आईचे कष्ट**

आईनं बोर्डिंगात किती कष्ट उपसलेले. तिनं थापलेल्या भाकरींची चवड रचली तर डोंगराएवढी होईल. आणि ह्या भाकरींनं आम्हाला आयुष्यभर छळलेलं. पोटाची आग विझवण्यासाठीच आईनं हे दिव्य केलेलं. आता तिला दम्याचा आजार उपटलेला. थोडंसं चालतानाही धाप लागायची. चुलाण्याच्या ढणढणत्या उजेडात विस्तवाच्या धगीपाशी ती बसलेली, अंगात फोपरी वाढलेली. बहुधा तिला ब्लडप्रेशरचा त्रास होत असावा. पहाटे पाचला तिला उठावे लागे, सकाळच्या न्याहरीला उसळ शिजवावी लागे. मुलं न्याहरी करीत नाहीत तो तीनचार पायलींच्या बाजरीच्या भाकऱ्या तिला बडवाव्या लागत. बोर्डिंगमध्ये मात्र जेवणाचे विविध प्रकार नव्हते. भाकरी आणि पातेलंभर कोरड्यास. पोरं म्हणायची, 'बाई, हे काय कोरड्यास? त्यात वरचं आढं दिसतंय.' आई बिचारी काय करणार? दिलेल्या मालातच तिला हे सारं रांधावं लागे. तीनचार वर्षं आई तिथं होती. ना कॅज्युअल लीव्ह, ना भरपगारी रजा. ढणढणत्या चुलाणापुढं बसलेली आई दिसते आहे. सारी स्वैंपाकखोली धुरानं कोंदलेली. जशी काय गॅसचेंबर. आईनं ह्या मरणयातना केवळ आपल्यासाठीच सोसल्या. शाळेला सुट्टी पडली, म्हणजे तेवढीच सुटका. एखादा कैदी पॅरोलवर सुटावा, तसं...

**आईचे मुंबईतील कष्ट**

आईला पुन्हा कामाच्या घाण्याला जुंपणं क्रमप्राप्त होतं. आई कावाखान्यातील बाकीच्या बायांबरोबर मार्केटमध्ये कागद वेचायला जायची... कागदाचं ओझं घेऊन आई रात्री दमूनभागून घरी यायची. कागदाचे वेगळाले प्रकार निवडायचे. खाकी कागदाला चांगला भाव यायचा. बाहेरच्या दुकानात कागदाच्या पिशव्या करायला हे कागद विकले जात. कारखान्याच्या पाठीमागेच कागद विकत घेण्याचं गुदाम होतं. तिथं जुन्या चिंध्याही विकत घेत. आजूबाजूच्या बायांना नेमकं माहीत असे की लोखंड कुठे विकावं, काच कुठे विकावी, तर तांब्यापितळेचे तुकडे कुठे विकावेत. आई घरी येताना खाऊसुद्धा मजेशीर घेऊन येत असे. केकचा भुगा किंवा बिस्किटाचे तुकडे कुठे स्वस्त मिळतात हे तिला नेमकं माहीत होतं. एकदा वापरलेली

चहाची पत्ती हॉटेलात पुन्हा वाळवीत, ती स्वस्त मिळे. हाच सेकंडहँड चहा घरात व्हायचा. साले आपण एवढे शिकलो, अजूनही आईच्या कष्टांवर जगतो आणि आईचं काम काय, तर कागद वेचणे. समाजात त्याला कोणती प्रतिष्ठा?

आता मला नोकरी लागलीय, तेव्हा आईनं यापुढं मार्केटमध्ये कागद वेचायला जाऊ नये असं मला वाटे, आई मार्केटमध्ये कागद वेचते हा आपल्या प्रतिष्ठेला धक्का आहे, असं खूपसं आईला सांगून पाहिलं. 'मी लेका, कागद वेचायला जाणार नाही' असं आश्वासन द्यायची. पण मी नोकरीवर गेल्याबरोबर पाटी डोक्यावर घेऊन आई मार्केटचा रस्ता चालू लागायची. संध्याकाळी घरी आलो म्हणजे बायकोकडून सारा वृत्तांत कळे. आईला ह्या संदर्भात विचारायचो. आई लेकीच्या लग्नाचं कारण पुढं करायची. 'तू लेकीच्या लग्नाची काळजी करू नकोस' असं तिला खूप बजावलं तरी ती ऐकायची नाही.... घरातील बायको–आईची भांडणं. मानसिक शांतता कमालीची ढासळलेली... घरात भिंतीवर एक आरसा होता तो फरशीवर आदळला. 'लेकाला मह्या येड लागलं' म्हणून आईनं आकांत केलेला. 'पुन्हा आम्ही दोघी भांडणार नाही' असं कबूल करून घेतलं तेव्हाच माझा भडका शांत झालेला. भांडणाला काहीही कारण पुरत असे. 'तू बायकोला उंच–उंच लुगडी घेतोस, मला साधं लुगडं घेतोस' ही आईची नेहमीची तक्रार. आईला पाच–दहा रुपयांनीही भारी लुगडं घेतलं असलं तरी ही गोष्ट आईला खरी वाटत नसे. साड्या घेताना मग आईला दुकानात न्यावं लागे.

सईला गोल पातळ नेसवावं असं मनापासून वाटे, पण आईचा ह्याला सक्त विरोध. गोल पातळात सई कशी वाण्याबामणावाणी दिसेल ही माझी कल्पना, पण केव्हाच वास्तवात ती उतरवता आली नाही.

एकदा डबेवाला घरी डबा नेण्यास वेळेवर आला नव्हता. आपला नवरा ऑफिसात आज उपाशी रहाणार या चिंतेत सई. तिच्या मनात काय आलं कुणास ठाऊक, तिनं माझ्या बहिणीला सोबत घेतलं आणि डबा हातात घेऊन ऑफिसवर आली. एकीकडे तिच्या भाबड्या प्रेमामुळे भारावून गेलेलो असतो, तर दुसरीकडे ऑफिसचे मित्र काय म्हणतील हा प्रश्न सतावत होता. काहींनी टोमणा मारला की, 'काय रे, घरी कामवाली माल ठेवलीस.' ऑफिसमधील मित्रांना कधी घरी घेऊन आलो नाही किंवा तिला घेऊन कधी पांढरपेशा मित्रांकडे चहालाही गेलो नाही.

**शेवटचा आजार**

शिवडीला बहिणीकडे रहायला गेलो. तिथं बहीण नवऱ्याबरोबर रहात होती. आई मात्र दुभंगून गेली होती. तिला वाटलं, सईनं माझ्यावर करणी केली. ती भगत पहात होती. एकदा आठवतं, तिनं कोकणी भगत घरी आणलेला. त्यानं कोंबडं, काही उतारा माझ्यावरून उतरून टाकला होता. मी हे सारं सुन्नपणे पहात होतो.

आई खूपच आजारी असल्याची तार मिळाली तेव्हा काय होणार आहे ते

मनोमन समजलो. बहिणीच्या गावी जाऊन पहातो तो आई शेवटची घटका मोजत होती. माझं काही चांगलं झालं नाही म्हणून ती खूपच कष्टी होती. मला जवळ बसवून सांगते, 'लेका, तू आता लगीन कर. हवं तर घरात भंग्याची पोरगी आण. पण असा एकटा राहू नकोस!'

आईच्या मरणाच्या रात्री संगमनेरला गेलो होतो. संध्याकाळी परत येऊ असं वाटत होतं ... घरी आलो तर आई शेवटची घटका मोजत होती. आईचं मरण खूपच जवळून पाहिलं. मांडीवर आईचं डोकं, मी चमच्यानं दूध पाजतो आहे. बहीण रडवेला चेहरा घेऊन जवळ बसलेली.

आईचा जीव केव्हा गेला हे कळलं नाही. आई जणू झोपलीय असंच वाटत होतं.

नदीकाठी आईला जाळलं जातं. तिच्या पोटातील मांसाचा गोळा फुटताना मी पाहिला होता. वाटलं, आपण आईला शेवटी वाचवू शकलो नाही ना?

आईच्या मरणाच्या वेळी मात्र रडलो नाही. मोठ्या धीरानं आईचं क्रियाकर्म केलं ... आईची रक्षा बराच काळ मेव्हण्याच्या घरी जपून ठेवली होती ... मेव्हणा सांगायचा, 'अरे, ही रक्षा मुंबईच्या समुद्रात सोडून ये'.

आईची रक्षा आणि माती यांत मला फरक वाटायचा नाही. शेवटी कधी तरी मेव्हण्यानं ती रक्षा नाशिकला गोदावरीत नेऊन सोडली .. आईचं आयुष्यातील जाणं ही कमालीची जीवघेणी पोकळी होती. आईनं आपल्यासाठी एवढे डोंगराएवढे कष्ट उपसले. उभ्या हयातीत मी तिला काय सुख दिलं ?

## मुंबईच्या कावाखान्यातल्या स्त्रिया

स्त्रियांना कुणी पडद्यात ठेवीत नसत. उलट, पुरुषांपेक्षा ह्याच जादा राबत. दारुड्या नवऱ्यानं कितीही बदडलं, तरी त्याची सेवा करीत. त्याचे व्यसनाचे लाड पुरवीत.रस्त्यावर पडलेल्या चिंध्या, कागद, फुटलेल्या काचा,लोखंड, बाटल्या वेचून आणणे, रात्रभर त्यांची वेगवेगळी वर्गवारी करणे आणि सकाळीच नेऊन विकणे हा यांचा धंदा. तिथून जवळच मंगळदास मार्केटात कापडाचा व्यापार चाले. त्या दुकानातून झाडलेला कागद ह्या बाया गोळा करीत. प्रत्येकीची नेमून दिलेली दुकानं असत. कचरा कुणी घ्यायचा यावर तुंबळ भांडणं होत. तेथील नोकराला चिरीमिरी दिली जायची. काही बाया जवळच्या कुंटणखान्यातील वेश्यांची पातळं धूत. खिमापावाला कंटाळणाऱ्या वेश्यांना काही स्त्रिया बाजरीची भाकर आणि 'बरबाट' पुरवीत. एखादं बाजिंदं गिऱ्हाईक या आयांचीच मागणी करी. अशावेळी काचेसारखी आपली अब्रू सांभाळताना ह्यांना पळता भुई थोडी होई.

## स्त्रिया आणि भाकरी मागणे

भाकरी मागायला जाताना घरातल्या स्त्रियाच बहुधा जात... गावात महारीण आली म्हणजे कोणत्याही चिरेबंद वाड्यातून कुत्र्याची हावळ उठायची. आमच्या घरी पाळी आली म्हणजे मीही आईबरोबर जायचो.बहुधा महारणीकरता कोनाड्यात

रात्रीचीच भाकरी ठेवीत असावेत. एखादी उदार बाई लोणच्याची फोड टाकायची तेव्हा नक्कीच जिभेला पाणी सुटायचं. आई लांबूनच दरवाज्यापाशी दीनवाणेपणानं म्हणायची, 'भाकर वाढा येसकरणीला!'

## जमनामावशी

गोलपिठ्यातून घराच्या दिशेनं येत असताना सहादबाला (हिजडा नातेवाईक) एक आठवण झाली. म्हणाला, 'अरे, तुझी मावशी जमना तुला आठवतेय का? ती इथंच असते. चल, तिला भेटायला जाऊ.' वेश्यांच्या गल्लीत कुणी माझी मावशी आहे याची मला स्वप्नातही जाणीव नसते. आईनंही कधी सांगितलेले आठवत नाही. वाघाचे लोखंडी पिंजरे असावेत तसे गोलपिठ्यात दोन्ही बाजूंनी पिंजरे असतात. पिंजऱ्यापाठीमागे अर्धनग्न स्त्रिया. काहींनी लांडे झगे घातलेले. त्यांच्या पुष्ट मांड्या प्रेक्षकांच्या वासना चाळवत होत्या. पिंजऱ्यातल्या भुकेल्या वाघांनी मांसखंडाची वाट पहावी, तसं हे दृश्य माझ्या मनावर कोरलेलं. अशाच एका पिंजऱ्यात सहादबा मला घेऊन गेला.

वेश्येच्या घराची पायरी चढण्याचा हा माझ्या आयुष्यातील पहिला प्रसंग. दहा बाय बाराची रूम असते. मध्ये कापडी पडदे टाकलेले. भिंतीला यल्लम्माचा देव्हारा. पैसे टाकण्याचा लाकडी गल्ला. भिंतीवर बाबासाहेबांचा फोटो पाहून मला अचंबा वाटतो. सहादबा एका सडपातळ, गोऱ्यापान बाईशी माझी ओळख करून देतो. ती जमना असते. मूळचा गोरा रंग पिवळा पडलेला. तिच्या अंगावर उंची साडी असते. हाताची नखं रंगवलेली. चेहऱ्यावर जादाच मेकप. जमना तशी खूपच आकर्षक वाटते. मी सखूचा मुलगा हे ऐकून तिचे डोळे पाण्यानं भरतात. ती मला मायेनं कुरवाळते. बाहेरवाल्याला बोलावून थंड पेय पाजते. दुसऱ्या दिवशी जमना बोलावते.'तुला छान कपडे घेते' असं आश्वासन देते. जाताना काही नोटा माझ्या हातात कोंबते. मला त्या नाकाराव्याशा वाटत नाहीत. मी बाहेर पडतो तेव्हा सहादबाला जमनाबद्दल खोदून विचारतो. तो सांगतो, 'अरे, ही तुझ्या आईची दूधबहीण. आई एक आणि बाप दोन.' मग ही इथं कशी आली? ह्यावर सहादबा जे सांगतो त्यामुळं मी अंतर्मुख झालेलो. जमना जवळच तंबूच्या मागे नवऱ्याबरोबर रहात होती. तिच्या देखणेपणामुळे नवरा तिच्यावर सारखा इसळायचा. तिला मारझोड करायचा. शेवटी त्यानंच तिला इथं आणून विकलं. स्वतःची बायको नवरा विकतो हे मला खरंच वाटत नाही.

दुसऱ्या दिवशी मी जमनाच्या पिंजऱ्यात एकटाच जातो. जाऊ की नको अशी रात्रभर मनात घालमेल चालू असते. जमनामावशीची एकदम वाटलेली आपुलकी, नवे कपडे मिळणार याचं वाटलेलं आकर्षण यांपैकी कोणतं वरचढ झालं हे सांगता येत नाही, पण मी दुसऱ्या दिवशी गेलो हे मात्र खरं. जमनानं मला त्या दिवशी छान-छान कपडे घेतले, घोडागाडीतून दूरवर फिरवलं. 'पुन्हा कधी सुट्टीत आलास तर

नक्की माझ्याकडे ये' हे सांगायला विसरली नाही.

जमनामावशीचा पुढील आयुष्यात कधी शोध घ्यावासं मात्र वाटलं नाही. गावी गेलो तेव्हा तिनं दिलेल्या कपड्यांविषयी आईला काही सांगितलं नाही. आईला काय वाटेल याचीच भीती मला होती. तिच्या संदर्भात बातम्या मात्र कानावर येत. तिनं धंदा सोडलाय, रस्त्यात भीक मागतेय, तिला वेड लागलंय अशा कितीतरी, वेगवेगळ्या.

अगदी अलीकडची गोष्ट. झाली असतील दोन– तीन वर्षं. मी दादरच्या पुलाखालून चाललेलो. माझ्यासोबत काही बडी लेखक मित्रमंडळी. पुलाखाली फारच मोठा भिकाऱ्यांचा घोळका... त्या दिवशी भिकाऱ्यांच्या घोळक्यात दीनवाणी मुद्रेच्या, लक्तरं फाटलेल्या, झिज्या सोडलेल्या अशा अवस्थेत मी जमनाला ओळखलं. जमनाच ती. एवढ्या वर्षांनी तिनंही मला ओळखलेलं असतं. ती माझ्याकडे एकटक बघत असते. मी पुन्हापुन्हा मागं वळून बघत असतो.

तिची नजर आज माझा पिच्छा पुरवतेय. तिच्याशी साधा संवादही मी करू शकलो नव्हतो. वाटलं, टेरिलीनच्या कपड्यात आपण किती पांढरपेशे झालोय! भोवतालच्या मित्रांना काय वाटेल हाही प्रश्न असेल. आणि समजा, जमनाशी बोललोच आणि तिला घरी घेऊन गेलो तर आपली सुशिक्षित बायको तिला घरात घेईल काय? बायको तर दिवसातून चारपाच वेळा घर धुते, आरशासारखं चकचकीत करते, आणि जमना तर ही अशी, अंगावर खंडीभर मळ.

त्या रात्री झोप काही येऊ शकली नाही. जमनामावशीची नजर तीक्ष्ण बाणासारखी अंधारतही काळीज चिरीत जात आहे.

'अरे, जमना मरणाच्या टायमाला गावी आली.'

आपलं माहेर तिनं कसं बरं शोधून काढलं? जमना मग वेडी कशी? मावसभाऊ सांगत असतो. काकानंच तिला मूठमाती दिली. अर्थात भाऊबंदांना दिवस घालण्यास मावसभाऊ विसरला नव्हता.

## गऊ – वडार मुलगी

गऊशी जवळीक करावी असं धाडस मला होत नसायचं. तिच्या डोळ्यांतून इच्छा प्रगट व्हायची, पण आईचं माझ्यावर लक्ष असायचं. मी गऊजवळ जादा रेंगाळलो तर आई वैतागायची. म्हणायची, 'शेवटी तू बापासारखाच होणार.' हा घाव मात्र माझ्या खूपच वर्मी बसायचा. माझे सारे अवयव कासवासारखे आकसत.

पुढे गऊचं लग्न झालं ते मेव्हण्याशीच. त्यानं जातपंचायत भरवली होती. गऊला वडील नव्हतेच. आई बिचारी कितीसा विरोध करणार?

बहिणीची सवत म्हणून तिनं आईचं पाल सोडलं. लग्नाच्या वेळी डुक्कर कापलं गेलं त्याचा कानठळ्या बसविणारा चीत्कार बोर्डिंगभर पसरला होता. ... रात्ररात्र डुकराचं चीत्कारणं ऐकू यायचं. त्यामागं गऊचा निष्पाप चेहरा दिसायचा.

...पुढील काळात गऊ केव्हाच दिसली नाही.

## बानूचं प्रेमप्रकरण

ह्याच दरम्यान तालुक्यातील एका मुलीचं मला आकर्षण वाटू लागलं होतं. नाव काय बरं? आठवलं. बानू. तिचं का तिच्या जातीचं आकर्षण वाटलं होतं हे आज सांगता येत नाही. ती जातीनं मराठा होती. रंगानं खूपच गोरी-केतकीच्या पानासारखी. उन्हात चालली म्हणजे तिचे गाल लाल व्हायचे. गावी आलो तरी तिचंच स्वप्न पडायचं. तिच्याशी ओळख होण्यास एक व्यावहारिक कारण घडलं. गावात सोनार मित्राच्या घरी मी जायचो. केव्हा केव्हा अभ्यासाच्या निमित्तानं तिथंच झोपायचो. त्याच्या गॅलरीत उभं राहिलो म्हणजे केव्हा केव्हा ती दारात दिसायची. पाहून खुदकन् हसायची. मीही तिच्याकडे ओढला जात होतो. तिनंच ओळख वाढवली. मी मराठी शाळेत त्या वेळी सहावीच्या वर्गात होतो आणि तीही मुलींच्या शाळेत माझ्याच इयत्तेत होती. सकाळी आमची परीक्षा व्हायची. दुपारी तिचा वर्ग भरत असे. आमच्या आणि तिच्या शाळेची प्रश्नपत्रिका एकच असायची. शाळा सुटली म्हणजे मी धावतपळत नदीकाठी येत असे. मी तिला खुलासेवार प्रश्न-पत्रिका सोडवून द्यायचो आणि ती दुपारी शाळेत जाऊन मी सांगितलेली उत्तरं लिहायची. एका रोमँटिक अवस्थेतच मी दिवसभर रहायचो. मुंबईत कधीतरी पाहि-लेले पिक्चरचे सीन आठवायचे. घोडा घेऊन मी वाळवंट तुडवीत प्रेयसीच्या भेटीला निघालो आहे असं दृश्य आठवायचं. आमचं खरं म्हणजे काफ् लव्ह होतं. शारीरिक गोष्टी समजत असूनही तसं धाडस माझ्यात नव्हतं. आई कधीकधी मोळी घेऊन तालुक्याला यायची. बानू स्वतःच्या घरापुढं आईला थांबवून घ्यायची. केव्हाकेव्हा हाती तांब्या घेऊन पाणी पाजायची. स्वतःच्या आईला काहीबाही सांगून मोळी विकत घ्यायला सांगायची. माझी आई मोळी विकते आहे हे मात्र मी तिला कधीच सांगितलं नव्हतं. तिनं कुठून माहिती काढली होती कुणास ठाऊक.

बानूबरोबर आयुष्यात प्रथम मी देवळात गेलो. पुढं तिनं अगस्तीच्या देवळात नेलं...देवळात बानूबरोबर गेलो असताना कमालीचा भेदरलो... बराच वेळ तिनं अगस्तीची पूजा केली... तिनं तोंडात कोंबलेला पेढा खाण्यास मात्र विसरलो नाही.

एकदा तिच्या मोसंबीच्या बागेत आम्ही काही मित्र गेलेलो. तिनंच आग्रहान बोलावून घेतलेलं. तिथं आम्ही लपंडाव खेळलो' मी जिथं लपलो. असेन तिथंच बानू मला पकडायला यायची. आणि ती जिथं लपली असेल तिथंच मी शोधायला जायचो...

लग्नात नाव घेतात तसं तिनं माझंच नाव लाजत-लाजत सर्व मित्रांच्या समोर घेतलं...

एका महाराच्या पोरानं यावं आणि आपल्या गल्लीतली राजकन्या भुलवावी हा त्यांना घोर अपमान वाटला. त्यांनी भांडण उकरून काढलं. बानूला आणि मला ते घाण, अश्लील शिव्या देऊ लागले... सकाळी उठून बघतो तो बानूच्या आणि माझ्या

नावाच्या पाटचा शहरात लागलेल्या...मी हादरूनच गेलो. बानूचा बाप तालुक्यातील काँग्रेसचा पुढारी... मी कुणाला न विचारता गावी येतो, आजारपणाचं निमित्त करून तालुक्याला तोंडच दाखवत नाही. सातआठ दिवसांनी दबकतच मी शाळेला येतो. आता आपल्याला झाडाला बांधून चाबकाचे फटके मिळतील असं वाटत असतं. पण गावात काहीच घडलेलं नसतं. हा माझ्या मनाचाच खेळ असतो.

बानू म्हणजे आकाशाला लागलेलं फळ आहे आणि आपण तिथं केव्हाच पोचू शकणार नाही याची कल्पना येते. मी तिचा नाद सोडून देतो. ती मात्र बराच काळ पाठलाग करीत असते. एकदोनदा रस्त्यात बोलण्याचा प्रयत्नही करते. पण आपण बर्फाच्या लादीसारखं गोठलेलो असतो.

बानू पुढं भेटली तेव्हा २५-३० वर्षं लोटून गेली होती. मोठ्या कष्टानंच मी तिला ओळखली ... ... माझा उभ्यानंच (एस्. टी. चा) प्रवास चाललेला. एका कोपऱ्यात माझं लक्ष जातं. बानू बसलेली असते. खूपच थकलेली. डोळ्यांभोवती काळी वर्तुळं पडलेली. साधारण माझ्याच वयाची, पण आहे त्यापेक्षा जादा वयाची भासते. मी गर्दीत वाट काढीत तिच्या दिशेने सरकतो. मी हळूच तिला विचारतो, 'तुझं नाव बानू का?' ती केवढ्यानं तरी दचकते. ती काही मला ओळखत नाही. मी काही जुन्या खाणाखुणा सांगतो. भूतकाळाचं मोठं ओझं तिच्या नजरेवरून हललेल्या-सारखं होतं. तिचे डोळे लकाकतात. बानू या नावानं आता तिला कुणीच ओळखत नसतं. तिच्या आयुष्याची परवड तिच्याच तोंडून कळते. नवऱ्यानं तिला सोडून दिलेलं असतं. सध्या ती विड्यांच्या कारखान्यात विड्या बांधत असते. हे ऐकून मी क्षणभर दुभंगतो. थोडा वेळ काय बोलावं हे समजत नाही. ती घरी चलण्याचा खूप आग्रह करते. आई अजून ओळखील असा विश्वास देते. मी नोकरीचं निमित्त सांगून तिच्यापासून सुटका करून घेतो. पुढच्या स्थानकावर ती खाली उतरते. गाडी दूर जाईपर्यंत ती मजकडे एकटक पहात असते.

## जावजीबाबाची आई

जावजीबाबाची आई हयात होती. दोन्ही डोळ्यांनी ठार आंधळी. नाव चंद्राव. केसांच्या अंबाड्या झालेल्या भुवयांचे केसही पिकलेले. हाताच्या कातडीला झिरमिळ्या पडलेल्या. चंद्रावचा मला मात्र खूपच लळा लागलेला. म्हातारीला घरातले सारे सतावीत. तिचे हाल मला पाहवत नसत. तिला कुणी वेळेवर जेवण द्यायचं नाही, तिचे कपडे कुणी धुवायचं नाही. घरातील कुणी पोरसोरही तिला परसाकडे घेऊन जात नसे. तिला पाहिलं की माझं आतडं तुटायचं. मी तिच्याशी तासन् तास गप्पा मारायचो. तिला काठीला धरून परसाकडे घेऊन जायचो. तिच्या-कडे गोष्टींचा खूपच स्टॉक होता. एखादी गोष्ट सुरू केली तर ती आठवडाभर चालायची. ती गोष्ट सांगताना मी तिच्या खाचा पडलेल्या डोळ्यांत खोलवर पाह्यचो. नुसता अंधार दिसायचा. तिच्या बोलण्याचीही गंमत वाटायची. तिचा आणि माझा

मजेशीर खेळ चालायचा. तिला सिनेमा हा शब्द उच्चारता यायचा नाही. सिनेमाचा उच्चार ती सिडीमा असा करायची. अनेकदा प्रयत्न करूनही ह्या शब्दाचा तिला उच्चार करता यायचा नाही. तिला मातीआड लोटलं तेव्हा मी गावी नव्हतो. मरणाच्या वेळी तिनं माझा खूपच धावा केला म्हणतात. तिच्या मरणाच्या वार्तेनं मी गलबलून गेलो होतो.

## वेणू

वेणूला नवऱ्यापासून कमालीचा जाच सुरू होतो. नवरा रात्ररात्र तिला झोप येऊ देत नाही. तिच्यावर इसळतही असतो. बाहेर शेतावर गेला म्हणजे कडीकुलपात तिला बंद करीत असे. शाळेत असताना एकदादोनदा मीही तिचा जाच वाचावा म्हणून प्रयत्न केलेले. नवरा क्षुल्लक कारणावरूनही चिडत असे. गुराढोरासारखं बडवत असे. शेवटी मुलीला बबननं एका सणाच्या निमित्तानं माहेराला आणलं आणि पाठवायची नाही असा निर्णय घेतला. जावई वेडापिसा झाला. हातात नंगा चाकू घेऊन मुलीच्या बापाच्या घरापुढं येऊन उभा राहिला. बबन तसा फाटका माणूस, पण डगमगला नाही. पुढं तर त्यानं रामोश्यांची टोळीही आणली. मुलगी कचेरीत फौजदारापुढं उभी राहिली. 'साहेब, मला समोरच्या आडात ढकलून द्या. पण जीव गेला तरी मी नांदायला जाणार नाही.' 'तिची सुटका होते. पुढे ती खूपच वयस्कर माणसाशी लग्न करते... आज म्हाताऱ्या नवऱ्याची नोकरी सुटली आहे. बंगल्यात आयाचं काम करून वेणू नवऱ्याला आणि कच्च्याबच्च्यांना पोसत असते.

## चंदरची बायको

चंदरचं लग्न कसं झालं ह्यालाही इतिहास आहे. कावाखान्यात आमच्या शेजारीच रहाणारी मंजुळा ही चंदरची सासू. मोठी जहांबाज. तिच्या तरुणपणातच नवरा मेलेला. कावाखान्यातील बाकीच्या बायकांबरोबर तीही कागद वेचायला जायची. ही बाई तशी खूपच आक्रमक. विजय तेंडुलकरांच्या 'सखाराम बाइंडर' या नाटकात चंपा नावाचं एक पात्र आहे. थोडंफार तसंच व्यक्तिमत्त्व., बोलणं, चालणं. कुठंही पचकन् थुंकणं हा तिचा खाक्या. कावाखान्यातील पुरुषही तिला वचकून असत. कुणाच्या अंगावर कधी धावून जाईल आणि त्याचा शर्ट पकडेल हे सांगता यायचं नाही. तिच्या शिव्या अफलातून. भांडणाच्या वेळी ती पुरुषासारखी आक्रमकपणं उभी राही. पदर खोचलेला. हातवारे करीत म्हणायची. 'ये भाडखाव! तुझ्या आंडाला धरून मी झुमकुळा खेळीन.' किंवा म्हणायची, 'तुझं शेमनं रबरावानी ताणीन!' शिव्यातल्या प्रतिमा ऐकून मी थक्क व्हायचो.

## वर्गातील मुली

मराठी शाळेत बानूच्या घटनेनं तोंड पोळल्यामुळे ताकही फुंकून पीत होतो. सवर्णांच्या मुलींशी लगट करावी असं धाडस होत नव्हतं....पण त्यांच्याबद्दल कमा-

लीचं आकर्षण वाटायचं. मी आणि खांबेकर वसायचो तेच मुळी मुलींच्या बेंचच्या मागं. त्यांनी केलेल्या मेकपचा सुगंध जाणवायचा. केसांना हात लावावा असंही वाटायचं. खांबेकरशी बोलताना चावट विनोदही करायचो. पोरी लाजायच्या. मुली वेगळचाच बसायच्या. विशेष कुणी मुलांशी बोलत नव्हतं. मधली सुट्टी झाली तर एकही मुलगी थांबत नसे. भुर्रकन् उडून जायच्या. अशा मुली नसलेल्या वर्गाचा मी ताबा घ्यायचो. मुलं जमवून चावट विनोद सांगायचो... वर्गातल्या मुलींवर 'वर्गातल्या बाई चार मुली, बुद्धी माझी करती खुळी' असं गीत लिहिलेलं आठवतंय... शेवटच्या ओळीत त्यांच्या शारीरिक व्यंगाचा उल्लेख असायचा. ह्या कवितेत 'सपाट लोशन' हा शब्दप्रयोग केलेला. ज्या मुलीची छाती सपाट असेल तिच्या संदर्भात हा शब्दप्रयोग करीत.

## पहिलं लग्न

तात्यांनी आईला किंवा मला न विचारताच माझं लग्न जमविलेलं असतं... आजी सांगत असते, 'लेका, तात्यांनी दिलेलं वचन मोडू नकोस. टाकलेला थुका परत गिळायचा नसतो. आणि तुला ठरवलेली बायको किती नाटक आहे. वाण्या-बामनावाणी, चंद्राला म्हणती उगवू नको आणि सूरयाला म्हणती मावळू नको, अशी!' कावाखान्यातल्या बायकाही दुजोरा देतात. ह्या बायांत मावसचुलत्यांच्या बायका आघाडीवर असतात. मुलीचे पालक आणि मावसचुलत्याचा खूपच घरोबा. गावातल्या मुलीचं लग्न जमविण्याचं क्रेडिट त्यांना हवं असतं. दोन्ही घराण्यांचा भाऊपणा खूपच दाट. ह्यात माझा बकरा तर होत नाही ना, अशी मला शंका. आपण मुलगी पाहिली नसताना आपलं लग्न ह्या मंडळींनी निश्चित करावं, त्यामुळं मनातून मला खूपच चीड आलेली. त्यात मुलगी ही खेड्यात होती. सहीची निशाणी अंगठा उठवणारी. असली गोरीपान म्हणून काय झालं.? एवढ्या कमी वयात लग्नाचं लोढणं गळ्यात अडकवून घेऊ नये असं मनापासून वाटत होतं. आंबेडकरांसारखं खूप शिकावं ही ऊर्मी दाटून येत होती... आणि मनाच्या एका कोपऱ्यात मुलीचं सौंदर्यवर्णन ऐकून माझ्या मनातही एक चेहरा उभारून येत चाललेला. माझ्या डोळ्यांपुढं जे बायकोचं चित्र आहे, खरंच तशीच ही असेल का? तिला न पहाताच तिच्या संदर्भात मी विचार करू लागलेलो. आईला मात्र आनंद झालेला असतो. तिचे डोळे नातवाचं तोंड पहाण्यास आसुसलेले होते.

तिचं गाव संगमनेरापासून पाचसहा मैलांवर... एकदा असाच बाजाराच्या गर्दीतून फिरत असताना एका नातेवाईकानं तिच्याबद्दल सांगितलं. तिला दुरूनच दाखवलं. लाह्या फुटाव्यात तसं रणरणतं ऊन होतं. ह्या उन्हाचं चांदणं झालं असं काही मी म्हणणार नाही, पण तिला पहाताच चांगला उडालो होतो... तिच्या पुढ्यात पाटी असते. आपल्या आईबरोबर ती आलेली असते. ती गिऱ्हाइकांना माल तागडीनं तोलून देत असते. तिच्या आईवडिलांचा छोटासा मळा आहे हे मला कळलेलं असतं.

मी दुरूनच तिच्याकडे एकटक पहात असतो. रणरणत्या उन्हामुळे तिचे गाल लाल झालेले असतात. तिनं चिटाचा परकर आणि चिटाचाच पोलका घातलेला. अस्ताव्यस्त केस कपाळावर येत असतात. ती खूपच देखणी असते. तिचे निळसर डोळे, नाकाचे कट्यारीसारखे धारदार वळण आणि गुलाबी रंग हे सारं पाहून मी जागीच थिजून गेलेलो असतो. तिचं वय बहुधा दहाबारा वर्षांचं असावं. ती शेलाट्या अंगकाठीची असते. संगमनेरच्या बाजारात भाजीपाला विकण्यास ही कुणी अस्मानची परी तर आली नाही ना अशी शंका चाटून जाते. मनात विचार येतो, आपल्या वर्गातील मुलींसारखा हिला पेहेराव घातला तर हिच्यापुढं कुणी पासंगालाही उभ्या राहू शकणार नाहीत.

जवळ जाऊन बोलणं शक्यच नसतं. मी बोर्डिंगवर परततो तेव्हा लक्षात येतं की, आपल्या मनाला पंख फुटले आहेत... ती केव्हाच शाळेत गेलेली नाही, तिला लिहिता-वाचता येत नाही, हे प्रश्न फालतू वाटू लागतात. लग्न करायचं तर ह्याच मुलीशी हा ध्यास मनाला लागतो. शनिवार उगवण्याची मी वाट पाहू लागलो. तिला दूर उभं राहून पहाणं हा मात्र मनाला चाळा लागला. तिला मात्र याची जाणीव शेवटपर्यंत आली नाही.

मी तिचं मनोमनच सई नाव ठेवलेलं. नाव तसं गावठी होतं, पण तिला ते शोभून दिसत होतं. पुढं एकदा देवगडच्या यात्रेत तिचं जवळून दर्शन झालं... त्या यात्रेत सई भेटलेली. भेटलेली म्हणजे काय पाहिलेली. टोपपदरी भडक लुगड्यात तिला पाहिलेलं. लुगड्याचा बोंगा, नाकात नथ. मला पाहून ती चक्क लाजत असे. एखाद्या सशासारखी थरकत असे. तिच्या वयाच्या पोरी तिला म्हणायच्या, 'हा बघ तुझा नवरा.' ती दूरवर पळून जायची. तिला मी आवडलो आहे याची खूण तिची नजरच सांगायची. लग्नाच्या आधी नवऱ्याशी बोलावं हा काही रिवाज नव्हता. त्यामुळं बोलण्याचं धाडस व्हायचं नाही. एक मात्र खरं की, मी जिथं जाईन तिथं ती रेंगाळताना दिसायची. नुकंतच लग्न झालेला एखादा नवरोबा आपल्या बायकोला घेऊन (कडेवर) गडाच्या पायऱ्या चढताना दिसायचा. वाटायचं, आपल्यालाही सईला घेऊन अशाच पायऱ्या चढाव्या लागतील का? आपल्याला सईला उचलता येईल का?

एकदा तर तिच्या गावी जायचा प्रसंग येतो. आजी मुंबईहून आलेली. तिच्याबरोबर मी सईच्या गावी जातो. संध्याकाळ झालेली असते. माझी नजर सईला धुंडाळत असते. रात्रीचं जेवणखाण आटोपतं तरी दिसतच नाही. रात्रभर बैचेनी असते. सकाळी उठून बघतो तो सई अंगणात कोकराशी खेळत असते. मला पाहून लाजून धुमाट घरात पळून जाते. मुंबईत पाहिलेला 'शकुंतला' चित्रपट आठवतो... सईच्या घरी मोठा बारदाना असतो. चारपाच भावांचं एकत्र कुटुंब असतं. घरी मुबलक मेंढ्यांचं खांड. सईचा बाप... रंगानं काळा, डांबरासारखा... बगळ्यासारखा रहायचा... एवढ्या काळ्या माणसाला एवढी गोरी पोरगी कशी बरं झाली असावी,

याचं उत्तर आईकडे पाहिलं म्हणजे मिळायचं. आई सईसारखीच उजळ होती. पण सईचे घारे, निळसर डोळे हे तिचं वेगळं व्यक्तिमत्व होतं. कोब्रा मुलगी दिसावी ना तशी ती दिसायची. आपला नातू एवढ्या गोकुळात पडला म्हणून आजी हरखून जायची.

**लग्नात**

सकाळी नवरानवरी पाण्यावर नेणं आलंच. प्रत्येक ठिकाणी मात्र वाजंत्री हे असतातच. नवरानवरीला आंघोळ घालणं, सुपारी सोडविणं, खोबरं खाऊन एकमेकांच्या तोंडावर थुंकणं हा प्रमुख कार्यक्रम. सईच्या हातातील सुपारी आपल्याला सुटणार नाही आणि मंडळीत आपलं हसं होणार याची जाणीव होती. सर्वांना ऐकू जाईल अशा पद्धतीनं मी बायकोच्या कानात 'सुपारी सोडून देण्यास' सांगतो आणि सारं वऱ्हाड माझ्या संवादामुळे हसू लागतं.

आंघोळ झाल्यावर बायकोला उचलून घेणं ही एक प्रथा. आपण बायकोच्या थोडं जवळ जायचो आणि आपल्याला बायको उचलणार नाही असा आविर्भाव करून परत फिरायचो. ह्यामुळं तर हास्याचा कळस होतो. आपण बायकोला उचलून घेऊ शकू की नाही ह्याबद्दल मीच साशंक होतो.

वरातीच्या वेळी धेडगा नाचवणं हा आणखी एक प्रकार... धेडग्यात नवरानवरीला वेगवेगळी माणसं उचलून घेत. विगर तेलाच्या चपात्या नवरीच्या हातात देऊन वाजंत्र्याच्या तालात गोलगोल नाचणं म्हणजे धेडगा नाचवणं. यावेळी बायको नवऱ्याला चपात्यानं बडवते आहे हे दृश्य. मला वाटतं, पुढील काळात पुरुष स्त्रियांना आयुष्यभर बडवीत असतो, त्यामुळं तर लग्नाच्या दिवशी का होईना, नवऱ्याला बडविण्याची परवानगी ह्या रूढीनं दिली नसावी ना?...

**विहिणींचा खेळ**

रात्री जेवणखाण आटोपल्यावर विहिणीबाईचा रुखवताचा खेळ सुरू झाला. विहिणीच्या डोक्यावर कुरड्या फोडणें, चावट उखाणे घेणें हा प्रकार. त्यात सांडिणीचा खेळ असायचा. चार पुरुषांनी प्राण्यासारखे खाली वाकायचे. त्यांनी लाकडी वाज अंगावर घ्यायची. तिच्यावर विहिणीला बसवून नाचवायची हा एक प्रकार. वाजंत्री वाजवीत आहेत, त्यांच्या गोंगाटात विहीणबाईच्या टिरीला खालून पुरुष चिमटे घेत आहेत आणि या कल्लोळात विहीणबाईचा सुटकेचा आवाज कोणीच ऐकत नाही हा सारा प्रकार.

**लग्नानंतर**

नवरी जेव्हा नवऱ्याच्या घरी आली तेव्हा तिची खडूस आजी तिच्या बरोबर आलेली. रात्रीची झोप येत नाही. बायको आजीच्या पुढ्यात झोपलेली. बायकोशी दोन शब्द बोलणंही कठीण... एकदोन दिवसांत बायको पुन्हा आजीबरोबर माहेरी चाललेली. खट्याळ नजरेनं ती बघते आहे आणि मी मात्र भुकेलेल्या माणसाच्या तोंडचा घास काढून घ्यावा अशा अवस्थेत... नोकरीचा कॉल येतो. 'पोरगी

लई गुणाची. तिचा पायगुण चांगला ठरला,' म्हणून आई खूष असते.

**बायकोशी शृंगार**

बायको मुंबईला येते. तिचा बाप घेऊन येतो. पावसाळ्याचे दिवस. पावसाची उघडीप असली की मी फूटपाथला पथारी टाकून झोपायचो...

बायको येऊन साताठ दिवस झालेले असतात. बायकोच्या हळदीच्या अंगाची तकाकी जास्तच वाढलेली असते. घरातल्या गर्दीतही मी तिच्या नजरेचा शोध घेत असतो. आमचं लग्न नुकतंच झालंय, आम्हासा आडोशाला का होईना, झोपायची व्यवस्था करावी असं कुणालाच वाटत नसतं. बायको दिवसा कामधंद्याला आमच्या-कडे आणि रात्री झोपायला बाजूला तात्याच्या खोलीत. तात्याकाकू पलंगावर, तर ती पलंगाखाली.

...फूटपाथला झोपलो असताना मधेच पाऊस येतो.... मी खुशीतच बिछाना काखोटीला मारून तात्याच्या घरातच गोधडी पसरतो. खाली पाय पसरतो तो बायकोच्या पावलाचा स्पर्श. अंधारातही मी तिला ओळखतो. मी मांजरीच्या डोळ्यांनी रोखून बघतो. तिची चुळबूळ चाललेली. ती जागीच असते. दोघांच्याही पायांच्या तळव्यांचा स्पर्श एकमेकांच्या पायाला होत असतो.

बाजूला पडलेलं लादी पुसण्याचं बारदान मी तिच्या अंगावर फेकतो. ती ते पुन्हा माझ्या अंगावर फेकते. तिच्याजवळ जाण्याचं धारिष्टच मात्र होत नाही... हक्काची बायको असूनही तिच्या शेजेवर जाता येत नाही.

चाळीतल्या बायकांना बहुधा माझी दया आली असावी. माझ्या काकूला त्यांनी झापलं. या प्रश्नावरून आईची व काकूची नेहमी धुसफूस व्हायची... दोन-चार दिवसांसाठी तरी आम्हाला घर मोकळं करून देण्याचं, बहुधा ठरलं असावं. मागं कावाखान्यात नवरदेवांच्या पहिल्या रात्री खूप गाजलेल्या. लग्न झालेली मुलगी सहजासहजी नवऱ्याला हात लावू देत नसे. प्रचंड आरडाओरड, नवऱ्याला लाथा मारणं हा प्रकार. त्यामुळं नवऱ्यामुलीला जेवताना ताटात भांग कालवून घालणं हा प्रघात. मुलीला मात्र याची अजिबात कल्पना नसे. एखादी चाणाक्ष मुलगी असली आणि तिला हा प्रकार माहीत असला म्हणजे ती वेगळी जेवायला बसायला कचरत असे. सासूबाईबरोबर अगर नणंदेबरोबर एका ताटात जेवायला बसण्याचा आग्रह ती धरी. अशा वेळी सूनबाई ज्या बाजूला जेवत असेल त्या बाजूला भांग घातलेला भाग फिरवणं आणि नकळत तिला भांग चारणं, ह्या कामात म्हाताऱ्या स्त्रिया तरबेज असतात.

शिवातात्याचं लग्न झालं आणि त्याच्या नुकत्याच वयात आलेल्या बायकोला अशीच फसवून भांग चारली गेली हा लहानपणचा प्रसंग आठवतो. मुंबईला तरी नवराबायकोची शेज दिसायची. पण गावी हा प्रकार नाही. एकत्र कुटुंब असलं तर बघायलाच नको. नवरा जेवायला आला म्हणजे चंची किंवा पागोटं विसरल्याचा बहाणा करायचा. त्याच्या बायकोनं ही खूण ओळखायची. मग— चोरीलपीनं एकत्र

यायचे. खळयात किंवा वाडयात चोरून कारभार उरकला जायचा ...

भांग देणं हा मला पाशवीपणा वाटायचा. हा प्रकार माझ्या बाबतीत चाळीतल्या स्त्रियांना शक्य नव्हता. संध्याकाळपासून प्रचंड हुरहूर मनात दाटलेली. खऱ्या अर्थानं स्त्रीचा तो पहिला स्पर्श होता. लैंगिक पुस्तकं वाचल्यामुळं खोलीत फुललाईट ठेवणं हे मनोमन पटलेलं. सई मला पहाताच रडू लागलेली. धसमुसळेपणानं हातातील बांगडया फुटलेल्या. ती कमालीची भेदरलेली. तिच्या अंगाला गावरान वास असतो. नुकताच पाऊस पडून जावा आणि मातीला सुगंध यावा तसा. मी तिला सर्व काही समजावून सांगतो आहे. 'तुझा विरोध असल्यास मी तुला स्पर्श करणार नाही' असंही सांगतो आहे. अर्थात हे सारं पुस्तकी पांडित्य. एक मोठं लेक्चर दिल्यामुळं सई अंतर्मुख होते आहे.

सकाळी उठतो तेव्हा चाळीतल्या स्त्रियांचा संवाद कानावर पडतोय.

'काय बाई, दगडू किती शहाणा ! नव्या बायकोला त्यानं कसं मथवलंय' आमच्या खोलीच्या शेजारीच अंगणात रात्रभर बायकांनी ठाण मांडलेलं... सईच्या सहवासाची मात्र ओढ लागलेली. ... आम्ही दोघं काकूच्या पलंगाखाली अडगळीत झोपायचो ... रात्री बराच वेळपर्यंत इतर चाळीतल्या बायकांबरोबर गप्पा मारीत फूटपाथला बसत असे. काकू वयानं खूपच तरुण. तात्यापाठीमागे तिनं मोठ्या निष्ठेने रांडपण घालवलेलं. पण शरीराचाही काही गुणधर्म असतो. ... काकूला याची जाणीव असावी. त्यामुळं ती सकाळीच उठून निंबाच्या पानाचा कडू काढा पीत असे. आपल्या शरीरातील वासना मारण्यासाठी काकूचा हा प्रामाणिक प्रयत्न. काकू मीठही खात नसे. पण ती रात्री खूप वेळ गप्पा मारीत बाहेर का बसते हे कळायचं नाही. केवळ आमचा छळ करण्यात तर त्यांना मानसिक आनंद होत नसावा ना ? आम्ही कंटाळून शेवटी घर सोडून जावं याकरिता तर हा काकूचा आडाखा नसावा ना ? केव्हा केव्हा तर रात्रीचे बारा वाजून जात. काकू येण्यापूर्वी लाइट बंद करणं हेही आम्हाला शक्य नसायचं. एकदा असाच आम्ही घरात अंधार करून बसलेलो. शेवटी आम्ही दोघं किती वेळ काढणार ? काकू अचानक घरात येते आणि दिवा लावते. ... आमची उघडी शरीरं अंथरुणात लपवता–लपवता त्रेधातिरपीट होते.

काकू आम्हाला अशी छळते याची जाणीव बहुधा आईला होत असावी. ती सकाळीच तोंड उघडायची ... एकदा तर तुंबळ भांडण ... 'ह्या घरात आमचाही वाटा' हे आईचं म्हणणं, तर 'तुम्ही पोट जाळायला गावी गेलात, तेव्हा हे घर आम्ही सांभाळलं' असा काकूचा युक्तिवाद... एकदा तर भांडणात आई काकूला काय बोलली हे माहीत नव्हतं. काकू धावतपळत येऊन मला धरते आणि ओरडते, 'ये रे लेका, कर तुहया मनाची शांती. तुझ्या आईचा जीव थंडगार होईल !' आई, बायको मधे पडून माझी सुटका करतात. ... त्या वेळी कोळीवाडयाच्या झोपडपट्टीत एक झोपडंही ठरवून आलो ... पण आजीआईनं आकांत मांडला.

'एवढी देखणी बायको घेऊन तू झोपडपट्टीत कसा जाशील ? तिथं मवाल्यांचं राज्य, दारूचे अड्डे, जुगार.' त्या वेळी आपल्या गोऱ्यापान बायकोला एखादा अल्लाउद्दीन खिलजी पळवून तर नेणार नाही ना, असं वाटलं. ह्या मायाजालात आपली बायको सुरक्षित आहे अशी खूणगाठ मी मनाशी बांधली असावी ... माझी आजी, आई, बाजूचे नातेवाईक यांचा, मी कावाखाना सोडू नये म्हणून आग्रह होताच.

## सई

सईला सुरुवातीला २-३ वर्षे मूलबाळ नव्हतं. मुलासाठी ती खूपच कष्टी असायची. एकदा ती अशीच माहेराहून परतलेली असते. तिथं तिनं मूल व्हावं म्हणून भगत पाहिलेला. त्याचा अंगारा घेऊन ती आलेली असते. मी तिच्यावर रागावलो. हुसकून लावलं. 'पुन्हा असं करणार नाही' म्हणाली तेव्हा कुठं तिला घरात घेतलं.

**सईला टाकले**

भारतीय समाजातील नीतीचं जे ओझं आहे ते माझ्याही मानेवर आहे. पुरुषाबद्दल, त्याच्या भानगडीबद्दल कुणाला काहीच वाटत नाही. पण स्वतःच्या स्त्रीचा साधा संशय जरी आला तरी केवढं मोठं रामायण घडतं ते अनेकांना माहीत आहेच.

ह्यात सईचा दोष किती आणि परिस्थितीचा दोष किती ह्याचा मला आजही संभ्रम पडलाय ...

घटनेला सुरुवात झाली ती आम्ही रहात होतो त्या चाळीला तोडण्याच्या प्रकरणावरून ......

जवळच्याच इमारतीत आम्ही, म्हणजे आई, बायको, मुलगी असे रहायला गेलो. त्या दरम्यान सईसंबंधी अवतीभोवती कुजबूज सुरू झाली ... इमारतीच्या कोपऱ्याला एक सायकलचं दुकान होतं. तिथं मेहबूब नावाचा मुसलमान तरुण कामाला होता. माझ्यापेक्षा थोडासा ठेंगणाच असेल. रंगानं गोरापान. सायकलच्या दुकानात कष्टाची कामं करायचा, त्यामुळे त्याचे दंड खूपच धष्टपुष्ट वाटत. हा स्वभावानं खूपच गोड होता. त्याला शेरशायरीचा चांगलाच नाद होता. मला तो मनापासून आवडायचा. एकदा दोनदा मी घरातील पुरणपोळी मोठ्या आग्रहाने खायला दिली होती. एकदा तर आजारी असताना दवाखान्यात घेऊन गेलो होतो. घरी आल्यावर सईलाच वेळेवर औषध देण्यास सुचवलं होतं. त्याचं मुंबईत कुणी नव्हतं. तो खाट टाकून आमच्या गॅलरीत झोपायचा. आजूबाजूची कुजबूज माझ्या लक्षात येत होती ... आईनंही एकदा– दोनदा सईचं पाऊल घसरत चाललंय म्हणन नकळत सूचना देऊन पाहिली. मी उलट आईवरच रागावलो, 'मला पुरावा दाखव.' अर्थात कोणती आई असा पुरावा दाखवील ? आई गप्प बसली. मी ऐकत नाही हे पाहून ती मुलीकडे गावी गेली. आता गावगप्पांना ऊतच आलेला ...

संशय घेण्यास काहीच जागा नसते. उगाच तिला सुळावर देण्यात काय हशील आहे ? लग्न झाल्यानंतरचं तिचं मनस्वी प्रेम आजही तसंच उचंबळत असतं. तिनं आपल्याच मित्राबद्दल केलेल्या तक्रारी आठवत असतात. त्यामुळे तिच्याबद्दल संशय घेण्यास काहीच जागा नसते.

पण ह्याच दरम्यान एक घटना घडली. कामावरून आलो म्हणजे जोरानं मुलीच्या नावानं ' बकुळा ' म्हणून ओरडणं हा माझा परिपाठ. लहान मुलीचं मला मनस्वी वेड लागलेलं असतं. चाळीत चांगलाच अंधार. घरात बघतो तो सई नाही. माझा आवाज ऐकून ती संडासाच्या दिशेनं येते. तिच्या हातात राखेचा टोप असतो. मी कुतूहलानं संडासाच्या दिशेनं डोकावतो. तिथं नळावर मेहबूब कपडे धूत असतो. माझ्या मनात संशयकल्लोळ जन्म पावतो. ती रडायला लागते. मुलीच्या नावानं आणाशपथा घेते. काय करावं हे मला कळत नाही. विचारानं रात्रभर माथा फुटलाय.

सकाळी रविवार असतो. कामावर जाण्याची घाई नसते. ही दोघं बाहेर कुठं भेटत असतील ? सईला ' सभेला जातो ' असं सांगून घराबाहेर सटकतो. सई दररोज बाजाराकरिता कामाठीपुऱ्यातील हागरी बाजारात जात असे. तिथं जाऊन एका कोपऱ्यात उभा रहातो. प्रियकराला भेटायला जायचं तर शृंगार करतात. पण सई मूल झाल्यापासून खूपच गबाळी रहायची. तिला ' घाणेरडं का रहातेस? ' म्हणून विचारलं तर सांगायची, ' मला काय करायचंय नटूनसजून ? ' ह्या वेळीही ती अशीच गबाळ्या जुनेरात मार्केटात आलेली. पण त्या जुनेरातही तिचं सौंदर्य उठून दिसत असलेलं. आपण ह्या निष्पाप चेहऱ्यावर उगाचच आळ घेतोय असंही वाटत असतं. ती बाजारातून परतताना चमत्कार घडतो. तिथं मेहबूब एका कोपऱ्यावर तिच्याशी बोलत उभा. जमीन फाटावी आणि आपल्याला धरतीनं आत घ्यावं असं वाटतं. मी तसाच पुढे होतो. मला पहाताच सई घाबरलेली. मी तिला घरी जावयास सांगतो. मेहबूबला घेऊन एका इराणी हॉटेलात जातो. आता तोही रडायला लागलेला. ' कुरानकी कसम है, वो मेरी बहन है ' असं बडबडायला लागला. काय करावं हे कळेना. मी त्याला लगेच मुंबई सोडायला सांगतो.

घरी येऊन पहातो तो मेहबूब गावी जाण्याच्या मार्गाला लागलेला. तेव्हापासून तो पुढं कुठंच दिसत नाही.

आपल्या मनात मात्र सैतान जागा झालेला. खरं काय, खोटं काय, म्हणून रात्ररात्र सईला बोलत असतो. ती काहीच सांगायला तयार नसते. तिनं नन्नाचा पाढा धरलेला. आजवर आपण अनेक पुस्तकं वाचलेली. रसेलचं 'नीतिशास्त्र ' वाचलेलं. पण अशा वेळी हे ग्रंथ उपयोगी पडेनात.

दहापंधरा दिवस विचारातच गेले. खूपच हताश झालो. नव्वद पौंडावर आलो. एकदा मात्र वाटलं की विचार– विचारानं आपण मरणार. डोळ्यांपुढे काजवे चमकू लागले. दिवाळी आठवड्यावर आलेली. मी सईला, मुलीला नवे

कपडे घेतले. सईला माहेराला नेऊन सोडावं हा विचार पक्का झाला. सईला मात्र माझ्या मनाचा अंदाज लागला नाही. तिच्या माहेराहून निघताना 'आपल्याला टी. बी झाला आहे, काही दिवस सईला माहेरालाच ठेवा' असं सासरच्या मंडळींना सांगायला विसरलो नव्हतो.

## सलमा

सईची आणि बकुळाची आठवण विसरू शकत नव्हतो... आई हवालदिल झालेली. काय करावं हे तिला कळेना.

अशा मानसिक अवस्थेतच सलमा भेटली... सलमाचं घर समोरच्या चाळीत... नळावरून पाणी आणायची. सलमाची वाट आमच्याच घरापासून गेलेली. वाटेत किंवा अंगणात बसलं म्हणजे सलमाचं घर दिसायचं.

सलमा अंगकाठीनं सडपातळच. काळचासावळचा रंगाची. तिचे बदामी डोळे काळेभोर. सोळा सतरा वर्षाची असावी. कुरतापायजामा घालायची, छातीजवळ सुळसुळीत दुपट्टा. पाठीवर लांबलचक केसांची वेणी ती सोडायची. सलमा खूपच आकर्षक होती... तिच्या शरीराला कातीव आकार होता. वस्तीत तरुण मुलं तिला नर्गीस म्हणून चिडवीत.

एकदा तिनं प्रश्न विचारला 'आपको क्या होता है. बडे उदास बैठते हो?' मी ह्यावर खिन्न हसलो होतो. बहीण आणि (बहिणीच्या बिऱ्हाडातील) चंपाताई ह्यांच्याशी दोस्ती. केव्हा केव्हा भिंगरीसारखी घरात नाचून जायची. तिला माझ्या आयुष्याची एव्हाना कल्पना आली होती. ती म्हणायची 'तेरी औरत यहाँ आयेगी तो मैं उसे लाठीसे मारूँगी.' हिनं माझ्यात काय पाह्यलं होतं कुणास ठाऊक...

एकदा तर तिनं चक्क अंगावर पाणी टाकलं. विशेष काहीच वाटलं नाही. ही पोरगी आपल्याला का छळते आहे म्हणून वैतागलो होतो.

हळूहळू सलमा माझ्यावर प्रभाव टाकू लागली...सलमाचा बाप या भागातील एक प्रसिद्ध दादा होता. त्याला जाता-येता एकदादोनदा मी पाहिलं होतं... सलमाच्या आईकडे त्याचं विशेष लक्ष नसावं. त्यानं दुसरं लग्न केलं होतं. ती बाई सलमाच्या आईपेक्षा खूपच तरुण होती. तिला घेऊन सलमाच्या बापानं वेगळं बिऱ्हाड थाटलं होतं. पण या घरातही त्याचा तेवढाच वचक होता. तो मनात आलं म्हणजे चक्कर टाकायचा.

सलमा काही माझा पिच्छा सोडायला तयार नव्हती. तिच्याबरोबर उघडपणे बोलणं शक्यच नव्हतं. तिच्या घरात कडक गोषा होता. ती कधी बाहेर पडलीच तर बुरखा घालूनच बाहेर पडे. सलमा खूपच चतुर वाटली. तिचं उर्दू चौथीपर्यंत शिक्षण झालं होतं, पण तिला जीवनाची समज मोठी होती.

आम्हा दोघांत आमची अशी कोडभाषा सुरू झाली. सकाळीच ती उठली म्हणजे तिच्या घरातून गाण्याची एक दर्दभरी लकीर सोडायची. 'अभी ना जाओ छोडके, ये

दिल अभी भरा नही'...ह्या गाण्याच्या ओळी आजही आठवतात. अर्थात् मीही पुढं गाण्यातच उत्तर द्यायचो. गाण्याच्या सुरावटीमुळंच मला जाग यायची. लहान मुलांशी बोलता-बोलता माझ्या लक्षात यायचं की, 'अरे, ही तर आपल्याशी बोलते.' संध्याकाळी मी लौकर घरी यावं म्हणून आग्रहानं सांगू लागली. अर्थात् हा सारा संवाद तिच्या लहान भावंडांबरोबर चाले. मी काय समजायचं ते समजून चुकायचो. ऑफिसात फाइलच्या पानांतून तिचेच हसरे डोळे दिसायचे.

कालपरवापर्यंत सईचा विचार करीत होतो, आता सईची जागा सलमानं घेतली. ही जाणीव व्हायची. मी खूप रात्री घरी येणारा. आता लौकर घरी येऊ लागलो. चाळीत घुसताना लक्षात यायचं की, सलमा नटूनसजून माझीच वाट पहात आहे. कुणाच्या लक्षात येणार नाही अशी ती कुर्निसात करायची.

चाळीतील मुसलमान स्त्रियांत कुजबूज व्हायला वेळ लागला नाही. मी आलो म्हणजे स्त्रिया माझ्याकडे संशयानं पहायच्या. कधी नळावर गेलो तर म्हणायच्या' 'रोशन, दिखता नही क्या जावई आया.' ... घरात आलो म्हणजे आई हातापाया पडायची. म्हणायची, 'अरे लेका, तिचा बाप कर्दनकाळ आहे. तुहं तुकडं-तुकडं करीन.' मी म्हणायचो, 'आये, मी हद्द सोडली नाही. मी काही तरी आक्रीत करतो काय?' आईचा माझ्यावर पूर्ण विश्वास होता. एक गोष्ट खरी की सलमामुळं आपला मुलगा माणसात येतोय, हसतोय, बोलतोय. ह्यामुळं आई सलमाचा केव्हाच राग करायची नाही. त्यावेळी आईनं मला खारीकखोबरं लावलेलं. सलमा घरी आली तर आई हा खुराक तिला आग्रहानं खाऊ घालायची.

मुसलमान स्त्रियांना संशय जरी आला होता, तरी कुणी आपल्या नवऱ्याला माझ्यासंबंधी सांगत नव्हतं हे विशेष. त्यांना बहुधा हे माहीत असावं की हे एकदा पुरुषांत गेलं तर नाहक खूनखराबा होईल. एक धेडका बच्चा आपल्या पोरीच्या नादाला लागलाय एवढी गोष्टही त्यांचं माथं फिरवायला पुरेशी होती.

सलमाचा आणि माझा शारीरिक संबंध येणं शक्यच नव्हतं. तिच्यावर खूपच पाळत असावी. पण शरीराचा मी वीट येईपर्यंत भोग घेतला होता. तिच्या बाबतीत तसं आकर्षण मला वाटत नव्हतं. पण तिला पहाताच माझी लैंगिक विकृती आपोआप जात चाललीय याचा साक्षात्कार होऊ लागला. इंद्रियाची थरथर थांबली...

एका स्त्रीमुळं मी पुरा उध्वस्त झालो होतो, तर दुसऱ्या स्त्रीनं मला जीवदान दिलं होतं. स्त्रीचं आयुष्यातील सामर्थ्य नव्यानंच ध्यानात आलं होतं.

सलमाची प्रेम करण्याची पद्धतही काव्यासारखी, हुरहूर लावणारी होती. तिला जर सांगितलं की डोक्यावरचा दुपट्टा खाली कर, ती मुळीच ऐकायची नाही. अर्थात् आमचं सारं संभाषण खुणेनं चालायचं. पण दुसऱ्या वेळी समोर आली म्हणजे दुपट्टा डोक्यावर नसायचा...ईदच्या दिवशी सलमा खूपच सजायची. हाताला मेंदी, डोळ्याला सुरमा, भांगात मोत्याचा चुरा. रंगीबेरंगी फुलाफुलांच्या डिझाइनचे कपडे. तिचा थाट बघत रहावासा वाटे...एकदा सलमा माझ्यासाठी शिरखुर्मा घेऊन आली

व बहिणीच्या हाती काचेचा प्याला देऊन ती म्हणाली 'इन्हे दीजिए.' असं म्हणून ती आली तशी भुर्रकन जाऊ लागली. मी त्यावेळी काचेच्या ग्लासात चहा पीत होतो. माझ्यातला खटचाळपणा जागा झाला. आमचा ही मंडळी बाट धरतात हा राग मनात धुमसत होताच. मी सलमाला थांबवलं आणि हळूच म्हटलं. 'क्या तू सचमुच मुझसे प्यार करती है?'

त्यावर ती म्हणाली, 'तू क्या जाने, वह तो उपरवाला ही जानता है!' असं म्हणून तिनं हात वर केला.

ह्यावर मी सलमाला कैचीत पकडायचा प्रयत्न केला. मी तिला म्हणालो 'तो मेरा यह बचा हुआ जूठा चाय पिओगी?' ह्यावर ती म्हणाली, 'चाय क्या, तुमने जहर दिया तो भी पिऊँगी!' असं म्हणून माझा उष्टा चहा त्या दिवशी ती प्यायली.

...ह्या दरम्यान तिला पहावयास काही स्थळं येत होती...कुणी पहाण्यास येणार म्हणून की काय, त्या दिवशी तिनं खूपच छान कपडे घातले होते. पायात पैंजण रुणझुणत होते. तिनं केसात दीडदोन रुपयांचा मोगऱ्याच्या फुलांचा गजरा माळला होता. अशी ती नटूनसजून आलेली. आणि तिच्या घराच्या दाराच्या चौकटीला धरून मोठ्या आकर्षक पोझमध्ये येऊन उभी राहिलेली...तिनं विचारलं, 'आज मैं कैसी दिखती हूँ?' ...मी घुश्श्यातच म्हणालो, 'मालूम है किनके लिये नखरा है यह सारा!'

झालं. सलमा खूपच वैतागली. माझ्या पुढ्यातच तिनं आपला दीडदोन रुपयांचा गजरा वेणीतून उपसला आणि चोळामोळा करून माझ्या पुढ्यात फेकून दिला... पाय आपटत ती रागानं आतल्या खोलीत गेली आणि कपडे बदलून आली. ह्या वेळी तिच्या अंगावर चुरगळलेले जुने कपडे होते. घरात जाऊन रडल्याच्या खुणा तिच्या चेहऱ्यावर दिसत होत्या. ह्या वेळी मी खरा घाबरलो. मी ह्या प्रकरणाकडे केवळ गंमत म्हणून पहात होतो, पण पोरगी खरंच प्रेमात पडली की काय म्हणून मी चिंतातुर झालो.

मी किती डरपोक आहे याची प्रचीती मला लगेच आली. तिनं एकदा एका लहान मुलापाशी चिठ्ठी पाठवलेली. बघतो तर ती उर्दूत लिहिलेली. एका लहान मुलांच्या उर्दू शाळेपाशी जाऊन उभा राहिलो. एका मुसलमान मुलाकडून ती वाचून घेतली. 'मेरे शहजादे' ह्या पहिल्याच शब्दानं उडालो. पुढचं ऐकलं तेव्हा माझ्या अंगाला घाम सुटला. घरातून पळून जाण्याची सूचना तिनं केली होती. आपण खरंच हिला पळवून कुठं बरं जाणार?...समजा पळवून नेली, तर तिचा बाप आपल्याला जमिनीतून खणून बाहेर काढील...असाच एक महाराचा पोरगा एका मुसलमान पोरीच्या प्रेमात पडला. गवगवा झाला. त्याला गल्लीतल्या मुसलमान समाजानं मशिदीत नेलं आणि त्याची सुंता केली. पुढील दहापंधरा दिवस कमरेला लुंगी लावून गरमी झाल्यागत चालत होता...सलमा आणि माझ्यामध्ये धर्माच्या किती मोठ्या प्रचंड भिंती उभ्या आहेत याची जाणीव झाली. पुढंपुढं मी सलमाची नजर

टाळू लागलो. ती 'डरपोक' म्हणून मला येता-जाता चिडवायची.

...फुलाफुलांचा अंगभर सेहरा बांधून दुल्हा सलमाच्या दारापुढे उभा राहिला. सलमाच्या घरात मुसलमान स्त्रिया ढोलक्यावर गाणी गाऊ लागल्या. लग्नाच्या दिवशी सलमाचं नखही दृष्टीस पडेना. खूप बेचैन झालो. पण सईच्या वेळी कोसळलो तेवढा काही कोसळलो नाही...तिच्या लग्नात मोठा तोफा देण्यास मात्र मी विसरलो नाही. सलमाचं सासर भेंडीबाजार इथं होतं. तिला कुणीतरी फिटर नवरा मिळाला होता....असाच एकदा संध्याकाळी फिरत असताना दुसऱ्या मजल्यावरच्या गॅलरीतून सलमानं मला पाहिलं. मला ऐकू जाईल अशा पद्धतीनं तिनं माझ्या नावाचा पुकारा केला...आवाजाच्या दिशेनं वर बघतो तर सलमा मला वर बोलावीत होती... तिच्या घरातील मंडळींना आपला संशय तर येणार नाही ना? तसाच घरी परतलो. सलमाचं धारिष्टच पाहून अचंबाही वाटला.

सलमा जेव्हा पुढं केव्हा तरी दोन दिवसांसाठी माहेरला आली तेव्हा तिनं मला फैलावर घेतलं. तू घरी का आला नाहीस म्हणून विचारणा केली. ...तिच्या सासरच्या माणसांना ही माझ्याबद्दल काय बरं नातं सांगेल? एक हिंदू मुलगा मुसलमान मुलीकडे प्रेमाच्या भावनेनं बघतो आहे ही कल्पनाच त्यांना अशक्य कोटीतली वाटली असती. सलमा ज्या ज्या वेळी माहेरी यायची तेव्हा मला 'लग्न कर' म्हणून आग्रह करायची. माझं असं पतंग तुटल्यासारखं एकाकी आयुष्य तिला छळत असावं.

एकदा मी खरंच तिच्या घरी जायचं धाडस केलं. दुपारची वेळ होती. तिचा नवरा कामाला गेला होता. म्हातारी सासू होती. माझ्या येण्यामुळं सलमाला खूपच आनंद झालेला दिसला.

माझा आदरसत्कार कसा करावा म्हणून ती भांबावून गेलेली. तिनं सासूला थंड लेमन आणण्यासाठी खाली पाठवलं. मी ह्या वेळी सलमाकडं निरखून पाहिलं. ती गरोदर होती...मी तिला हसत म्हणालो, अर्थात् तिच्या ठसठशीत पोटाकडे पहात- 'इनमें मेरा भी हिस्सा है ना?' ती ह्यावर जे उत्तर देते ते ऐकून चाट पडतो. म्हणते कशी, 'अभी मुंह धोके आ !' तिनं एकदा तिचा फोटो दिला होता. तो आजही पेटीच्या तळाला असेल. एवढ्या वर्षांतही मला तो फाडावासा वाटला नाही. तिनं आणखीही वस्तू दिली होती. तिला विणकाम करण्याची खूपच आवड होती. चक्क पांढऱ्या दोऱ्यापासून तिनं माझ्यासाठी बनियन विणलं होतं. बराच काळ ते माझ्या घरी होतं. अंगात घातलं म्हणजे चिलखत घातल्यासारखं वाटायचं. पुढं शिकलेली बायको आली. तिच्यापासून ह्या घटना मी लपवून ठेवल्या नव्हत्या. शिकलेल्या बायकोनं काय करावं? तिनं ते बनियन लादी पुसण्यासाठी केलं. बराच काळ तिनं ते फेकूनही दिलं नव्हतं. साफसूफ करून ती पुन्हा त्यानं लादी पुसायची. खूप मळला म्हणजे उंदीर पकडतात तसं त्याला पकडायची आणि म्हणायची, 'ही बघा तुमच्या प्रेमाची निशाणी!'

सलमाचं लग्न झाल्यानंतर शिवडी आम्ही लगेच सोडली. जसं काय मी शिवडीला उपचाराकरिता गेलो होतो आणि सलमानं माझ्यावर उपचार केला होता.

## तात्यांची पहिली बायको

महारकुंडापाशी सर्वांनी यात्रेत पथारी टाकली. अशा वेळी एक काळीसावळी बाई सारखी आम्ही बसलो होतो तिथं चकरा मारू लागलेली. आईनं त्या बाईला ओळखलेलं असतं. ती तात्यांची सोडलेली पहिली बायको असते. तात्यांना एकाएकी काय वाटतं कुणास ठाऊक, ते झटक्यानं उठतात, समोर उसाची गाडी असते. त्या गाडीतून एक लांबलचक ऊस उपसतात आणि त्या बाईला गुराढोरासारखं बडवू लागतात. यात्रेतील माणसं त्या बाईची सुटका करतात. बहुधा तात्यांचा अहंकार तिनं दुखावला असावा. सोडलेल्या बाईनं एवढं ताठ्यानं वागावं याचा त्यांना राग आला होता. बाईची बरी खोड मोडली असाच भोवताली सूर. त्या सोडलेल्या काकूचाच मी पुढं बराच काळ विचार करतोय. काकूनं मनाचा कोपरा निश्चित हलवला.

## तात्या आणि काकू

पिऊन आले म्हणजे (तात्या) काकूला हमखास बडवायचे. एकदा तर फळीवर लटकावलेल्या कपबश्या धुतलेल्या नव्हत्या म्हणून कपबश्याच तात्यांनी फोडून टाकल्या. काकूला मारलं म्हणजे दोन–तीन दिवस ती रुसून माहेराला जात असे. एकदा तर काकूवरून सखाराम वस्तादाच्या पोरांनी तात्यांना चांगला मार दिला. त्यामुळे ते जादाच प्यायचे. त्यांच्या खिशात नेहमीच पैसे खुळखुळत असत. तात्या संध्याकाळी यायचे तेच मुळी पिऊन. अशा वेळी त्यांच्या खिशातील पैसे काकू लंपास करीत असे. काकूला बहुधा तात्या आवडायचे नाहीत. शिवाय तिचा माहेरकडे फारच ओढा. पैसे गेले म्हणजे ते काकूवर संशय घ्यायचे. पण काकू ताकास तूर लागू देत नसे.

## आजी

आजी मात्र खूपच भाबडी. तिचं नाव देवकी. ऐन उमेदीत नवरा वारलेला. तिनं मोठ्या धैर्यानं रांडपण पार पाडलेलं. कोंड्याचा मांडा करून तिनं आपली मुलं रजाचा गज केलेली. तिला जर विचारलं, 'आजे, तू कवा गं ममईला आलीस?' तर ती दूरवर पहात सांगायची,

'त्याचं काय हये लेका, तुजा आजा भागा दारूताडीत मेला. तुजा बा व्हता गुडघ्याएवढा. तात्या तर तान्हा. गावात तवा लई जुलूम. तालुक्यात मामलेदार तोडल्याचा काळ. म्हारकीची पाळी यायची. घरात कुणीच कर्ता न्हाई, तवा भाईबंदबी छळ करीत. रांडकीनं गावात हाळी द्यावी, येस्करपाळी मागावी, मेल्याल्या

ढोराला खांदा द्यावा, गावात कुणाचं माणूस मेलं म्हंजी उन्हापावसात गावोगाव जाऊन निरोप दयावा, अशी कामं.

आसंच एकदा पाटलानं गावात हाळी द्यायला धाडलं. शिमग्याचा सण व्हता. गावात देईची साथ आल्याली. मरीआईचा गाडा येशीयेशीवरून पुढल्या गावाला चाललेला. त्यो म्हारांना ओढून न्यावा लागे. तवा सणाला तळलं- घोळलं तर देई कोपायची. 'तळू घोळू नका' अशी हाळी पाटलानं गावात द्यायला सांगितलेली. तवा हातात घुंगराची काठी घिऊन मी हाळी देत चालल्याली. इठोबाच्या पारावर तरणा-बांड कोंडिबा बसल्याला. त्याला काय लहर आली कुणास ठावं! मही गंमत करावी असाही इचार आसंल. तो आडवा झाला आणि म्हणाला, 'धरा रे म्हारणीला. बांधा चावडीला. ग्यान गेलंय काय हिचं? खुश्शाल 'तळू फळू नका' म्हणतीया.' त्यावर पाचुंदाभर माणसं जमल्याली. कुणाला हसू येत व्हतं, तर काही महचावर फु झाले होते मी गावकऱ्यांच्या हातापाया पडले, कंची हाळी दिली ते शपथेवर सांगितलं. पर गावकरी ऐकंनात. म्हारूडचात चुलत दिराला बातमी कळली. त्याला गावात किंमत होती. त्यो आला, तवा कुठं गावकऱ्यांनी सोडलं. रात्रभर झोप आली न्हाई. इचार केला, माय पंढरीत ऱ्हायला नको. दोन लेकरांना घेऊन ममईला आले. इथं बहिणीच्या आसऱ्याला राहिले.

सासऱ्याच्या पलिकडे आजीला कुणाचंच नाव आठवायचं नाही.... आजी मनात रुतून बसलीय ती एका वेगळ्या घटनेमुळे. घरात कर्तसवरतं माणूस जेवायला बसलं म्हणजे त्याच्याशेजारी आजी बसून राह्याची. त्याच्या पाठीवर हात फिरवीत असताना तिच्या तोंडातून सारखं पालुपद यायचं, 'लेका गबागबा खा'.

दादा कर्ते होते,पगारपाणी घरी आणून देत होते, तोपर्यंत आजी त्यांच्यापाशी बसायची. दादांनंतर नंबर लागला तो तात्यांचा.

तात्या जेवायला बसल्यानंतर आजीचं पालुपद चालूच, 'लेका, गबागबा खा!' तात्या त्या दिवशी खूपच भडकले. रागाच्या भरात समोरचं ताट त्यांनी घरापुढील अंगणात फेकून दिलं....

दोनचार दिवस आजी गप्प असेल तेवढीच, पण तिची सवय काही गेली नाही. पुढे मी जेव्हा मोठा झालो, नोकरीला लागलो, दिडक्या घेऊन घरी येऊ लागतो, तेव्हा आजी मी जेवत असताना जवळ बसायची. पाठीवरून तसाच हात फिरवायची आणि तोंडाने पुटपुटायची, 'लेका, गबागबा खा.' माझे डोळे पाण्याने डबडबायचे. आज आजी हयात नाही. मातीआड लोटलीय. मी जेवायला बसलो, म्हणजे आजीची आठवण येते, तिचे शब्द कानात घुमतात. तसं पाहिलं तर उभ्या ह्यातभर आजीनं काडीचही सुख पाहिलं नव्हतं. पण तिच्या स्वभावातील हळवेपणा कठोर वास्तवतेनं खुरटून कसा गेला नाही याचंच आज मला नवल वाटतं.... आजीला मुंबईला जेव्हा समजलं की मला दाढीमिशा आल्या, तेव्हा तिला याचा किती आनंद

झाला म्हणून सांगू? तात्याकाकूला समजणार नाही अशा पद्धतीनं तिनं गाववाल्यांच्या हाती मशीन पाठवलं.

## आजी–काकू

आजी हमसून हमसून रडत होती. आजीचा वडिलांपेक्षा तात्यांवर विलक्षण जीव होता. माझ्या डोळ्यांतून टिपं गळत नव्हती. तात्यांनी आईचा अनेकदा केलेला उद्धार मी अजून विसरलो नव्हतो. माझं मला नवल वाटण्यापेक्षा काकूचंच नवल वाटत होतं. कुणाचंही प्रेत असो, काकू कधी त्याचं तोंड पहात नसे. तिला म्हणे धडकी भरायची. ती गळ्यात नादाळी घालायची. पण नवरा मेला असताना तिनं बाहेर येऊ नये याचं नवल वाटत होतं. सारा कावाखाना काकूसंबंधी कुजबुजत होता. शेवटची अंघोळ पत्नीनं घालावी हा प्रघात होता. पण काकूनं बाहेर यायचं नाकारलं. काकूला एकदाची सुटले हेही समाधान वाटत असावं.

## कागद वेचणारी श्रीमंत काकू

अेक मावसचुलता बर्मा शेलमध्ये नोकरीला होता.... बायकोच्या अंगावर दागिन्यांची- नथ, वज्रटीक ह्यांची- रेलचेल. पण हे फक्त सणासुदीला दिसायचं. ह्यांच्याकडे पैसा जरी होता तरी बायको मात्र सकाळ झाली म्हणजे लंकेची पार्वती होऊन इतर बायांबरोबर कागद वेचायला जायची.

## आईची आई

आजी आमच्या घरी अनेकदा यायची. आजी आंधळी झालेली. काठीला धरून तिच्या गावावरून मी घेऊन यायचो. तिला दुसरा घरोबा करूनही मुलगा झाला नाही. तिथं तिला एक सोडून तीन मुली झाल्या. ह्या आजीचा आणि काका- मावशीचा आम्हाला मोठा आधार वाटायचा. आजी आणि तिच्या मुलींचा सारा संसार गरिबीतला. पण ही माणसं खूपच मायाळू होती. आईच्या माहेरच्या मंडळींपेक्षा हे लोकच आम्हाला लहानपणी खूपच जवळचे वाटत.

## म्हातारी विधवा आणि पट्टी

अशीच एकदा शेजारच्या खेड्यातून एक विधवा म्हातारी पट्टी भरायला आलेली. बिचारी भोळी म्हातारी. कारकुनाला पट्टी देते, पण पावती घ्यायला ती विसरून जाते. कारकूनही माणुसकीला जागत नाही. दुसऱ्या दिवशी म्हातारी पावती घेण्यासाठी कचेरीत धावत पळत येते. कारकून ब्राह्मण असतो, ताकास तूर लागू देत नाही. म्हातारी दोन्ही हातांनी आपलंच तोंड झोडीत गावाला परत जाते. अर्था-

तच पैसे खाण्याबद्दल तिच्यावर रीतसर खटला होतो. म्हातारी पुष्कळ गयावया करते. माय पांढरीचे पाय धरते, पण कुणालाच तिची दया येत नाही. सर्व लोक तिची छी थू करतात. तिला हातकड्या घालून तालुक्याला आणलं जातं. पट्टीचे पैसे खाल्ल्याचा गुन्हा कोर्टात सिद्ध होतो. कचेरीतला कारकून वर हात करून मोकळा होतो. दोनतीन महिन्यांची सजा काटून ती परत येते.

## म्हाताऱ्या

म्हातारी होती तोपर्यंत जावजीबावाची गावी ठेप चांगली होती. पण म्हातारी मेल्यावर म्हातारपणात जावजीबावाचे हाल होऊ लागले... अेखादी मुलगी आपल्या जवळ ठेवावी, तेवढीच भाकरी थापून देईल, ही साधी गोष्टही बाबानं कधी मान्य केली नाही.... सकाळी मोलानं पाणी देणारी शेजारी बाई आली तेव्हा म्हातारा मरून पडलेला तिला दिसला.

म्हातारा मेला तेव्हा महारवाड्यात अेकदोन विधवा म्हाताऱ्या. बाकी सर्व घरं बंद. त्यांनी काय करावं? म्हाताऱ्याला जवळजवळ खासेपर्यंत फरफटत नेलं. जुन्या बारदानातच म्हाताऱ्याला जाळलं.

## अंगात येणारी बाई

लग्न लागून गेल्याबरोबर अेका बाईच्या अंगात येतं. केस सोडलेली, कपाळाला मोठा मळवट भरलेली बाई घुमत असते. समोर रिंगण भरलेलं, त्यात लिंबू, टाचण्या नारळ असा प्रकार. दादांना काय वाटतं कुणास ठाऊक, ते पुढं जातात, रिंगण लाथेने उडवतात आणि बाईला आईवरून सणसणीत शिवी देतात. बाईचं झाड आता जादाच बेताल झालेलं. बाई घुमत म्हणते, 'आयझव म्हणाला.' सखा त्याच लयीत उत्तर देतो, 'जाऊ म्हणून परता-घरचाच व्हता!' ही रंगीत तालीम बराच वेळ चाललेली. सारं वऱ्हाड हसण्यात दंग झालेलं. दादा तिच्या ढुंगणात जेव्हा बाभळीचा काटा टोचतात, तेव्हा कुठं तिच्या अंगातलं जातं.

## सटवाच्या बाया

पठ्ठे बापूरावाची पवळा मी नाचवलीय असं तो (सटवा) अभिमानानं सांगे, पवळाच्या सौंदर्याचं वर्णन करी. तशी ही पवळा आमच्या जिल्हयातली, मुरळी सोड-लेली. पान खाताना तिच्या गळयातून पानाची लालजर्द पिंक दिसायची एवढी ती गोरी होती, हा किस्सा सटवा सतत सांगे. जवळच्याच दोन मैलांवरच्या, वाशेरे हयाचा गावचा राहणारा. दोन बायकांचा धनी. त्या बिचाऱ्या रात्रंदिवस मोलमजुरी करत आणि हयाला पोसत.... हा रहायचा त्यांच्या जिवावर. बगळयासारखा सकाळी

उठायचा तो तालुक्याच्या किंवा आमच्या गावी यायचा. सटवाच्या या दोन बायकांना भांडताना मी अनेकदा पाहिलेलं. दोघींच्या तोंडात अर्वाच्य शिव्या. वाटायचं, ह्या आता एकमेकींच्या नरडीचा घोट घेतील. भांडता- भांडता ह्या मध्येच थांबत, चुन्याची- तंबाखूची देवाण- घेवाण करीत, पुन्हा भांडणं सुरू करीत.

## बाया

दादा मुंबईला येण्यापूर्वी एका ब्राह्मण जमीनदाराकडे सालानं होते. तिथं असताना काही बाया गवत कापायला यायच्या. त्यांचे विळे लपवून ठेवून 'निजायला द्या, तवा इळे देतो' म्हणून त्यांना अडवत. अर्थात् हा खुशीचा सौदा होत असावा. नाहीतर दादांना कुणीही गावातल्यांनी बडवलं असतं. ह्या बाबतीत लहानपणी तसं खूपच मोकळं वातावरण होतं.

'निजायला द्या तवा शेळचा निवडा' ही म्हण का पडली असावी, याचं कारण सापडतं.

मास्तर बायांच्या बाबतीत तसे खूपच चालू असतात. डोंगराच्या पलिकडल्या गावावरून दोन बायका नेहमीच अंड्यांनी भरलेल्या पाट्या घेऊन यायच्या. त्या तो माल तालुक्याला पोचवीत असत. त्या दोन बायांशी कसं काय संधान बांधलं कुणास ठाऊक. बहुधा त्या शाळेच्या व्हरांड्यातच, येताजाता विश्रांती घ्यायच्या. शाळेची किल्ली मास्तरांजवळच असायची.... चुलता तात्या मास्तरांचा दोस्त.... ते दोघे या बायांची टवाळकी करायचे.... टोपलीभर येसकरपाळीच्या भाकऱ्या अडल्या— नडलेल्या बाईला दिल्या की ती वश व्हायची.

चवथीच्या वर्गातली गोष्ट. मराठ्याची एक थोराड मुलगी वर्गात होती. तिला पहिली पाळी आली आणि तिचा सारा परकर रक्तानं भरला, तेव्हा ही मुलगी बाई झाली याचा शोध प्रथम मलाच लागला.

मुंबईला कावाखान्यात असताना दारं— खिडक्यांच्या चिरीतून, पोराटोरांच्या नादी लागून, संभोगाची अनेक दृश्यं मी लहान वयातच पाहिलेली.

एक प्रसंग तर चांगलाच स्मरणात आहे. माझे एक मावस चुलते होते. त्यांचं नाव शिवा. लग्न झालं आणि बायको मेली. विधुरपणाचे दिवस काढीत होते. रस्त्यावर कसरतीचे खेळ खेळणारी एक काळी धुमाळी बाई त्यांनी ठेवलेली. ही बाई तशी मजेशीरच. पुरुषासारखी पँट शर्ट घालायची, लांबसडक केसांचा बुचडा बांधायची. तात्याला कावाखान्यात भेटायला यायची ती सायकलवरून. रस्त्यात तिचे खेळ व्हायचे. केसांनी ती मोठी शिळा उचलायची, आपलं सारं शरीर लोखंडी रिंगमधून पास करायची. कावाखान्यातील सर्व स्त्री— पुरुष कामाला गेले म्हणजे

शिवातात्या तिला खोलीवर घेऊन यायचा. म्हाताऱ्या बायांना शिवातात्यानं चहा-पाण्याला पैसे दिले म्हणजे त्या लांब फूटपाथला जाऊन बसायच्या. कसरतीचे खेळ करणारी बाई तात्यापुढे कशी गाईसारखी लीन होते याचीच आम्हा पोरांना गंमत वाटे ... ते भिंतीवरचा आरसा जमिनीवर कोन करून ठेवीत. स्त्रियांच्या दोन मांड्यात केस असतात याचं पुढं बराच काळ मला सारखं नवल वाटायचं.

पुढे कसरत करणारी बाई कुठं दिसेनाशी झाली. शिवा त्यामुळे खूप कावला. अफू खाऊन मेला.

## सयाजीची बाई

सेक्सची चर्चा ही उघडपणे चाले. कुणाला हा प्रकार अश्लील वाटत नसे. कावाखान्यात सयाजी नावाचा एक इसम होता. खूपच दुबळा ... त्यात त्याला दम्यासारखी धाप लागायची. याचं, एका काळी, म्हणतात लग्न झालेलं. पण बुळ-ग्याला काय पद्मिनी ? त्याची ती तरणीबांड बायको निघून गेली. पण सयाजी तसा काही बुळगा नव्हता. त्यानं एक उंचधडंग, गोरीपान बाई ठेवलेली. बाई फूट-पाथला केळी विकायची. पावसाळ्यात मक्याची कणसं भाजून विकायची. ह्या दोघांनी एकत्रितपणे फोटोही काढलेला ... बाई त्याला धुवून खायची. एके दिवशी चाळीतल्या बाया सयाजीची फिरकी घेतात. सयाजी आपल्या मनातील व्यथा बायां-समोर उघडी करतो. केळेवाली बाई सयाजीला रात्रीची हात लावू देत नाही. त्याचा सारा माल खाते. त्याच्या जिवावर चांगली झुळझुळीत लुगडी वापरते. पानाच्या पट्ट्या खाते. ही सयाजीची घोर फसवणूक आहे म्हणून चाळीतल्या बाया सयाजीला मदत करायचं ठरवतात. ... सयाजीला एक अडगळीतली खोली रिकामी करून दिली जाते. सयाजीची त्या दिवशी हनीमूनची रात्र असते. पण बाई महावस्ताद. मोठमोठ्यानं ओरडून कावाखाना डोक्यावर घेते. बायांना दम पडत नाही. मंजुळा सर्वांच्या पुढं असते. त्या घरात शिरतात. कुणी तिचे पाय पकडतात, कुणी डोकं. आणि सयाजीला कार्यक्रम उरकण्यास सांगतात. आम्ही हे सारं दृश्य खिडकीतून पहात असतो. बाईनं आता हातपाय झाडायला सुरुवात केलेली. शेवटी कुठूनतरी अंधारातून बाबा उठतो. बाईची सुटका होते. सयाजी मात्र यापुढं कुणा बाईच्या वाटेला जात नाही. केळेवाली बाईचा मी जेव्हा विचार करू लागतो, तेव्हा तिची मानसिकता समजून घेताना मनात खूपच गोंधळ उडतो.

## जाधवची बायको

कावाखान्यात जाधव नावाचा एक मित्र रहात असे. सुरुवातीला तो काकू-कडेच खानावळी होता ... जाधवचं ह्या दरम्यानं लग्न झालं. चिनी मातीची एखादी सुबक बाहुली असावी तशी त्याची बायको होती ... लग्न झाल्यावर जाध-

वची रहाण्याची अडचण असते ... तो कुलाब्याला रहायचा. तिथं एका बंगल्यात त्याची थोरली बहीण आया म्हणून कामाला ... सर्व्हंट क्वार्टरमध्ये ही जोडी राही... बहीण घरी नाही हे पाहून एका कामवाल्या मुलीच्या साह्यानं त्यानं एका ख्रिश्चन मडमेचा पोशाख घरी मागून आणला. त्यानं आपल्या बायकोला स्कर्ट, उंच टाचेचे बूट घालायला भाग पाडलं. चांगला मेकअप करायला सांगितला आणि तिला समुद्र-काठी फिरावयास घेऊन गेला. साहेबासारखा कमरेला हात घालून, तोंडात शीळ घुमवताना तो आम्हाला दिसला. आम्हाला पाहून बायको गोरीमोरी झाली. बहिणीला जेव्हा हे समजलं तेव्हा तिनं खूप शिव्या दिल्या ... पण मी मात्र बायकोला साधं गोल पातळ शेवटपर्यंत नेसवू शकलो नाही.

## ठेवलेल्या बाईचं बाळंतपण

माझ्या सासऱ्यानं ठेवलेली बाई. देशमुखीण. मराठा जातीतली ... बाईचा लग्नाचा नवरा ऐन उमेदीत मेलेला. देशमुखीण असल्यानं पुन्हा लग्न करायला परवानगी नाही. बाई सासऱ्यावर कशी बरं भाळली ? सासरा तर डांबरासारखा काळा आणि बाई खूपच नाटक, उजळ अंगकांतीची. सासऱ्यानं बाईला चक्क बाळंतपणासाठी गावावरून आणली मुंबईला. तेही जावयाकडं. बाई पिवळीधमक पडलेली. बाईचं पोट भरलेलं दिसायचं. बाई मात्र लाजेनं खूपच खजील झालेल्या. नजर वर करीत नसत. अशा बाया पूर्वी पंढरपूरला जायच्या. सासऱ्यानं मुंबईची शक्कल लढवली होती. बायको आणि सासूबाई एकाच दवाखान्यात बाळंत झाल्या ... सासूबाई जेव्हा घरी आल्या तेव्हा मूल सोबत आणलं नाही. बाईला गोरापान मुलगा झाला. कावाखान्यातील बायका कुजबुजत असतात. म्युनिसिपालिटीच्या दवाखान्यात तळालाच एक पाळणा असतो– बेवारशी मुलांकरिता. त्यात बाईनं मूल ठेवून दिलेलं. बाई उजळ माथ्यानं गावी जातात.

## सीता

सीताची घटना. वासना आतल्या आत कोंडल्यामुळं हिची हिस्टेरियाची भयानक केस झालेली. अर्थात त्या काळी हिस्टेरिया हा काय प्रकार होता हे समजत नव्हतं म्हणा. पण सीताला नवऱ्यानं सोडलं आणि तिला वेडाचे झटके येऊ लागले. वयात आलेली पोरं पाहिली की सीता बेभान व्हायची. लैंगिक हावभाव करायची. चक्क लुगडं फेडायची आणि रानोमाळ पळायची. तिचे नातेवाईक तिला घरात कोंडून ठेवत. तिच्या नवऱ्यानं मुंबईला दुसरी आवा ठेवलीय आणि तो सीताला नांदावयास नेणार नाही हे जसं सीताला समजलं, तसं तिचं वेड जास्तच झालं. गावानं काय करावं ? चक्क तिला डाव देण्याकरिता साखळदंडांनी बांधून मारुतीच्या देवळापुढं आणलं. स्त्रियांनी नागडं फिरणं म्हणजे त्यांच्या इभ्रतीला तो डागच

होता. तिला वेडाचा झटका आला म्हणजे एकदोन पुरुषांनाही ती सहज हेलपाटत असे. डाव देण्याचा प्रकार म्हणजे खूपच अमानुष ... गावात एक म्हातारा माणूस डाव देण्याकरिता प्रसिद्ध होता. डाव देताना वेड्या माणसाच्या बाजूला खैराच्या लाकडांची धुनी पेटवली जायची. त्यात लोखंडी सळ्या लालजर्द तापविल्या जात. डाव देणारा हातात पेटती सळई घेऊन उत्साहाने पुढं सरसावायचा. डाव कसे देतात हे बघण्यासाठी भोवताली गर्दी जमलेली. ह्याच गर्दीत मीही श्वास कोंडून उभा. जेव्हा माथ्याला, दोन्ही खांद्यांजवळ, आखांना आणि पायाला घोट्यांजवळ डाव दिले गेले तेव्हा तिनं आकाशभर मारलेल्या किंकाळ्या अजूनही आठवतात. पैशाएवढ्या जखमा झाल्या. डाव दिल्यावर एरंडाच्या पानांवर तूप लावून जखमेवर थंडावा देण्यास मात्र ते विसरले नव्हते. एवढं होऊनही सीताचं वेड गेलेलं नसतं. ती जादाच वेडी होते. सीतासारखे डाव शंकरला का बरं देत नाहीत याचंही कोडं वाटायचं.

## एक कुंती

नदीच्या वाहत्या पाण्यातून कपड्यात बांधलेलं गाठोडं वाहात चाललेलं. एक मुलगा सपासप हात मारत जातो आणि गाठोडं किनाऱ्याला आणतो. सोडून बघतो... गाठोड्यात नुकतंच जन्माला आलेलं मूल असतं. नदीच्या वरच्या बाजूला जेवढी घरं असतात तिथं 'कुंती'चा शोध घेतला जातो. शेवटी पिवळी पडलेली अेक गोरीपान कुमारिका पकडली जाते. तिची डॉक्टरी तपासणी होते. बाजार रस्ता ते कचेरी अशी तिची धिंड निघालेली. पाठीमागून हुर्यो करणारं पब्लिक. पुढं तिला शिक्षा झाली म्हणतात.

## मामाची सासू

मामाची वाशेरे या गावची सासू होती. तिला मूलबाळ काही झालं नाही. मामीला मात्र पुढं बरीच मुलं झाली. पण तिचा गर्भ दुपावतो याला पिढ्याचा भगतच कारणीभूत हा मामाच्या सासूनं सर्वांचा गैरसमज करून दिलेला.

मामाच्या सासूच्या अंगात देवी यायची. रात्र झाली, जेवणखाण आटोपलं, म्हणजे मामाच्या सासूच्या अंगात यायचं. कपाळावर लालभडक चांदीच्या रुपयाअेवढं कुंकू, केस सोडलेली ही गोरीपान बाई जेव्हा रात्रीची घुमू लागे तेव्हा माझ्याही जिवाचा थरकाप व्हायचा. तिच्यापुढं रिंगण धर, कोंवडं उतर, तीन वाटेवर जाऊन उतारा फेक, हा प्रकार सतत व्हायचा.

## सुनेवर समाईक हक्क

पांढरपेशा समाजातील नीतीच्या कल्पना म्हणजे बाहेर वास उडू देऊ नये अशी, चार भिंतींच्या आत अेखादी घटना झाली तर ती आतल्या आत वुझवली जाते. तिचा समाजात बभ्रा होऊ देत नाहीत. पण महार समाजात अेखाद्याच्या घरात असं काही झालं तर प्रथम सासूच अंगणात उभी रहायची, महारवाड्याला, अेकू जाईल अशा मोठ्या आवाजात गर्जायची, 'काय ग सटवे, कुठं शेण खायला गेली होतीस? ...' त्या घटनेत सासराच सुनेच्या अंथरुणावर गेलेला. सून खूपच नेकीची असते. नवरा नोकरीनिमित्त मुंबईला. मुंबईला रहावयास घर मिळत नाही. त्यामुळं नुकतंच लग्न झालेल्या बायकोला तो मुंबईला नेऊ शकत नव्हता. सासरा विधुर, चारचौघांत बसणारा–उठणारा. ज्या रात्री सासरा अंथरुणावर येतो त्याच रात्री सून बोंब मारून उठलेली. सकाळीच स्वतःच्या माहेराला निरोप पाठवते, नवऱ्याला तार करून बोलावलं जातं. सारी मंडळी त्याचा निवाडा करायला पारावर बसलेली... पण नवरा मुलगा हा प्रश्न वेगळ्याच पद्धतीनं हाताळतो. तो म्हणतो, 'ही मी जी बायको केली आहे, ती माझ्यात आणि बापात समाईक केलेली आहे. मी काही म्हाताऱ्या बापाला दुखावणार नाही. पायजे असेल तर सासऱ्यानं मुलगी घेऊन जावी.'

या उत्तरानं सारेच दिपून जातात.

## विठाबाई

तळाला (तळमजल्यावर) विठाबाई नावाची गोरीभुरकी बाई रहायची. तिचं गोरेपण म्हणजे पांढरं कोड फुटलेलं. तिळभरही कातडीचा रंग नाही. डोळ्यांच्या पापण्याही भुरक्या, पण डोळे मात्र निळसर. पाठीवर रुळणारे रेशमाच्या रंगाचे पिंगट केस. तिची भरदार शरीरयष्टी. येणारे–जाणारे क्षणभर तिच्याकडे पहाण्यास चुकत नसत. महार समाजात जन्माला येऊनही तिची भाषा, तिची राहणी ही पांढरपेशा समाजातील स्त्रियांसारखी. उन्हातून चालली तर गाजरासारखी लाल व्हायची. तिच्या मानानं तिचा नवरा खूपच कुरूप, काळ्या जांभ कातळासारखा. एक डोळा अधू, तोंडावर देवीचे वण. हा दिसायला असा सामान्य असला तरी याची मिळकत चांगली होती.... आमच्या सर्व परिवाराच्या घरांपेक्षा बाईचं घर खूपच आकर्षक. दरवाज्याला झुलता पडदा, घरात पलंग, कोच, उंची फर्निचर, आरसे लावलेलं कपाट. जेवायचं झालं तर काचेच्या नक्षीदार बशीत, काट्या चमच्यांनी. ह्या घराचा मला लहानपणी खूपच लळा लागलेला. त्याला कारणही होतं. विठाबाईला ऐश्वर्यातही मूलबाळ नव्हतं. त्यामुळे ती माझे खूपच लाड करायची. मूल नसल्यानं बाई सतत बेचैन. त्यामुळं तिनं एकदा काय करावं? चक्क गरोदरपणाचं नाटक

केलं. ओटीपोटावर चिंध्या बांधल्या. पण ही बात कावाखान्यात फुटली. सर्व बायकांनी तिची शोभा केली.

माझ्यावर तिचा जीव की प्राण. छानछान खायला मिळतं, सिनेमानाटकं पहायला मिळतात, याचं खूप अप्रूप वाटायचं... घरात कुणी नसलं म्हणजे ती मला उरीपोटी धरायची. पलंगावर ती उताणी झोपायची. मला मांड्या चेपायला सांगायची. अशा वेळी ती पातळ वर करीत असे. तिच्या केळीच्या गाभ्यासारख्या मांड्या चेपताना मनात मात्र चमत्कारिक काहूर उठायचं. तसं माझं वय खूपच लहान होतं. पण सारं बघताना घालमेल व्हायची, एवढं मात्र खरं.

## पाण्यासाठी झुंज

मारुतीच्या देवळापाशी गावची गार पाण्याची मोठी विहीर होती. तिच्यावर सारखं चाक गरगरायचं. महारमांग स्त्रिया तासन् तास पोहराभर पाण्यासाठी ताटकळत बसत. कुणाला दया आलीच तर एखादा पोहरा ओतला जाई. कायदा तर महारांच्या बाजूचा होता... शेवटी त्यांनी एके दिवशी संघटित होऊन विहिरीत पोहरा टाकला. स्त्रिया कंबरा कसून सर्वांत पुढे. गावात खळबळ माजली.

## पांढऱ्या साड्या

ऑफिसमध्ये जाणाऱ्या मुली हौसेनं पांढऱ्या साड्या नेसून जात. पण पांढरी साडी नेसलेली मुलगी ही पूर्वाश्रमीची महार आणि आताची बौद्ध आहे ही जेव्हा खूण म्हणून ओळखली जाऊ लागली, तेव्हा सवर्ण मुली पांढऱ्या साड्या वापरण्याचे कटाक्षाने टाळू लागल्या.

## बहिणीचा नाच

दृश्य पाहून मी कमालीचा हादरलो. नऊ दहा वर्षांची माझी छोटी बहीण नाचते आहे आणि पोरं आनंदानं गात आहेत, हे दृश्य. एका शृंगारिक लावणीवर बहीण नाचत असते 'काठेवाडी घोड्यावरती पुढ्यात घ्या हो मला राजसा, जाऊया जेजुरीला' ही लावणी असते. ते दृश्य पाहून माझा माथा भडकतो, शिरा ठसठसू लागतात. मी जोरजोरानं दारावर लाथा हाणतो. मला एकाएकी काय झालं म्हणून पोरं दार उघडतात. मी शिव्या देऊ लागतो, 'भोसडीच्यांनो, तुमच्या आयाबहिणींना का नाचवत नाही?' कुणीही मला विरोध करीत नाही... त्या दिवशी मी खूपच बेचैन असतो. बहिणीला पोटाशी धरून ढसाढसा रडतो.

## ठाकर नीतिशास्त्र

एखाद्या (ठाकर) मुलीला परपुरुषापासून दिवस गेले हे ठाकरांच्या पंचांना समजलं की त्या मुलीला पंचात आणलं जायचं. त्या वेळी असाच ऐकलेला एक फैसला आठवतो. त्या वेळी ती मुलगी चक्क म्हणाली, 'कुडाकडं केलं माय अंग, त्यात किडूक गेलं का काडी गेली, माय काय ठावं?' अशा वेळी पंचांची बोलती बंद व्हायची. तिला निर्दोष सोडलं जायचं. कधीकधी पोरं मांडीवर असायची, तिचं लग्न व्हायचं. 'मुलाचा बाप कोण' असा फालतू प्रश्न नवरा विचारायचा नाही.

## मराठा नीतिशास्त्र

महारवाड्यातील काही तरुण श्रीमंत शेतकऱ्यांकडे सालानं होतं. अशा वेळी त्यांचा मराठा बायांशी हमखास संबंध यायचा. ह्या स्त्रिया त्यांचा उपभोग घेत, पण त्यांना पाणी वाढताना किंवा भाकरी देताना वरून देत. त्यांचा मात्र त्या स्त्रियाही बाट धरीत.

# उपरा

लक्ष्मण माने

## आई

आई हातानं भाकरी, कालवण आन काय काय घेऊन येत होती. बानं तिच्या डोस्क्यावरचं गठूडं घेतलं. दोघं तरातरा बोलत आली. लाली, पुष्पी, किसन्या आईच्या पदराला धरून भेदरलेली. सारी माझी भावंडं. मी थोरला, बाकी सारी लहान. आईबरोबरच गावाला गेलेली. साऱ्यांच्या पोटात भुकेचा डोंब झालेला. आईनं बऱ्याच भाकरी आनलेल्या. तीन उफन्या पाटलिनीला दिलेल्या. तिनंच दिलं होतं रात्रीचं राहिलेलं. अन् आयाबायांची सांधनं केलेली. त्यानं आईचा वठा गच्च भरलेला. सारी जेवायला बसलो. बानं हातातच भाकरी आणि झुनका घेतला. आई जेवली नाही.

शाळा सुटून गेली तरी लेक येईना म्हणून आई शाळेकडे गेली होती. तिच्या तोंडाचा पट्टा सुरू झाला होता. ती बाला म्हणत होती, 'तू लक्षाला मारून टाक, जाळून टाक, म्हंजी तुला बरं वाटंल. ह्यो शिकतुया आन हापीसर होतुया!'

तसा बाचा पारा चढून गेला. त्यानं काही न बोलता चारपाच हिरवंगार फोक घेतले. त्याला पिळा घातला. आईचं तोंड दुसरीकडे होतं, बानं पायाचा आवाज देखील केला नाही. आणि सापसाप आईच्या अंगावर आसुडासारखे फोकाचे फटके बसायला लागले. एका हातानं आईच्या झिंज्या धरलेल्या आन दुसऱ्या हातानं मार चालू. आईनं बोंब मारायला सुरुवात केलेली. समी, लाली, पुष्पी, किसन्या आणि मीही जाऊन आईच्या अंगावर पडलो. जयश्या, महाद्या बापाचे चुलत भाऊ सोडवायला आले. बाचं तोंड चालू झालं-

'गलीचा कुत्रा होऊन फिरू दे. मी कशाला साळंत घालतुया? रांड, त्याला काय उरसांडं करायचाय व्हय? त्याला शाळेत घालून मास्तर करीन, हपीसर करीन. तू कोण?' आणि असंच....

माझा मार चुकला होता. पण आईच्या अंगावरचे वळ बघून कळवळलो होतो. झक मारली आनी साळंतनं पळालो, असं वाटलं. मनात एकच इचार, आता साळंतनं पळायचं नाही. बा म्हणतोय मास्तर करीन. आपण शिकायचं, साळंत जायचं.

रात्री बराच उशीर. तीन दगडाची चूल ढाणढणत होती. बाप हळद आओीच्या

अंगाला लावीत होता. समी, मी, लाली, पुष्पी, किसन्या झोपलो होतो. आई जेवली नव्हती. सकाळी तीन कोरभर भाकर खाल्ली होती. मला झोप येत नव्हती. आई–बा बोलत नव्हते. गप बसून काम करीत होते. मार खाल्ला होता तरी आई चिरून देत होती. बा कणगीला कट घालीत होता. बरीच रात झाली तरी असं चालू होतं. मला झोप लागली असं वाटून बा आईजवळ गेला. (कैकाडी भाषेत काहीतरी म्हणत) बाप तिच्या डोक्यावरनं, अंगावरच्या वळांवरनं हात फिरवत होता. मी झोपेचं सोंग घेऊन पडलो होतो.

आई म्हणत होती, 'तुझा हात हाय, का दगड? लई लागलं.'

मघाचं फोडनं कुठल्या कुठं पळालं होतं. आई म्हणत होती, 'उद्या चार मनाची कणिंग आलीया. आनखी आठ दिवस इथं भागंल. आठ दिवसानं बिराड हलवावं लागंल.'

दुसरा दिवस उजाडला. पुन्हा बा पहाटेच निघून गेला. आईनं चा केला. मला उठवलं. लहान पोरांना उठवलं. आई म्हणत होती, 'लक्षा, शाळंच्या वक्तापतुर तू गाढवं घिऊन जा. पोरं साळंत जायाला लागली की मी समीला गाढवाकडं घालवीन आन तू साळंत जा. साळंतनं पळून जाऊ न गं. नाहीतर बा जीव जास्तंवर मारील.

**आई–चालणं**

आईनं भाकरी अन् हिरव्या मिरच्याचा खरडा समीला, मला दिला. गाढवा-वरचं आमचं खाणं सुरू झालं....

'कुठं जायाचंय' म्हणून मी आईला इचारलं. आई म्हणाली, 'आपून बनभिकार ...जिथंवर दिसंल आन् तुझा बा म्हणंल तिथं जायचं'.... अखेर आईनंच बाला इचारलं, 'कुठं बिराडं उतरायची?'

बा इचार करीत होता.

...चालून चालून आई वैतागली होती.

**आई–पोरांची भूक**

सकाळी बा दिसलाच न्हाई. आई पण नव्हती. पारी तेवढी बिऱ्हाडात होती. आयाबाया डोक्यावर टोपली घेऊन रानात निघाल्या होत्या.

आईबाचा पत्ता नव्हता. आओ विकायला गेलेली, बा फोकाला. चुलीत पानी वतलेलं. पाण्यानं पोट भरीत होतो.

समी, लाली, पुष्पी, किसन्या बिऱ्हाडाजवळ खेळत होते. त्यानला भूक लागली होती. समी माझ्याकडं आली, म्हणाली, 'दादा, लई भूक लागलीय.'

मी तिला गाढवामागं उभी केली. हातात वाटकं घेतलं आन दारोदार 'भाकरी वाढ ग माई, शिळंपाकं वाढा वं काकू' म्हणून फिरू लागलो. कुणी भुरा आलेले

भाकरीचे तुकडे, कालवण, कुणी शेंगा देत होतं. तासा दोन तासांत वटा भरला ... आम्ही साऱ्यांनी खाल्लं. उरल्यालं झाकून ठेवलं.

दिस माध्यानीला आला होता. आई- बा आले. मी समीला गाढवामागं जायला सांगितलं, फाटकी पिसवी हातात घेतली आन् थाटात साळंत गेलो.

आओी, पारी, जयसिग्या, सारी मानसं, काम नव्हतंच, वाळूत बिऱ्हाडाजवळ बसली होती. चूल पेटवाया जळणं आली आणि आओी, पारी उठल्या. चुली पेटवल्या तीन दगडांच्या. वाऱ्यानं वैर मांडलं होतं. जाळ फाकत होता. तवा तापत नव्हता. आई वैतागली होती. धुरानं डोळे गळत होते. हातानं नाक पुसत होती आन् कणकीला तिंबत होती. कणीक बराबर झाली, तशा चपात्या हातावर करायला लागली. कणकीचा गोळा हातावर गोल करायचा, पातळपातळ करायचा आन् तव्यावर टाकायचा. एक चपाती एका अंगानं भाजली की दुसरी तिच्यावर टाकायची. नुसती बाजू बदलायची. तव्यावरच चवड साठवायची. तिच्या मनात आलं की टोपल्यात टाकायची. आम्हाला भूक लागली होती. तोंडाला पाणी सुटलेलं. मी हळूच आईचा डोळा चुकवला, चपातीचा तुकडा घेतला आन तोंडात घातला, आईनं बघितलं आन सनसनीत मुसकाटात बसली.

'मुड्द्या, अजून देवाला निवद दाखवायचाय, आन् उस्टावलंस व्हय?'

एकाएकी कालवा वाढला. बा सगळ्यांच्या म्होरं हुता. त्याच्या मागं आई. आईच्या आंगात चोळी नव्हती. बाचं आंगारकं घातलं हुतं. लुगड्याच्या चिंध्या लोंबत हुत्या. बा नुसत्या धोतरावर व्हता. साऱ्या आंगावर काळंशार वळ उठलं होतं. त्यांच्या मागोमाग चारपाच बापे होते. आई बोंब मारत होती. बा तिला गप्प बसायला सांगत हुता.

आमचा कालवा झाला. आमी रडत आडवं पळत गेलो. आईनं किसन्याला उचलून पोटाशी धरला. त्याच्या डोस्क्यावरनं हात फिरवाय लागली. मी आईजवळ गेलो. तिचं दोन्ही हात रक्ताळलं व्हतं. डोक्याच्या खाली सारं त्वांड सुमारलं होतं. मी रडून रडून कालवा करू लागलो. बाचं हात बांधलं होतं. बानं मान खाली घातली हुती. आईला, बाला घरी आनलं न्हाय, चावडीम्होरं नेलं. तवर बघ्यांची गर्दी झाली. माझ्या आईची आब्रू... बाच्या आंगारक्यात झाकली हुती. मी मनात पेटलो व्हतो. वय फार नव्हतं, पर चांगलं कळत हुतं. आई चावडीवरनं 'घरी जाऊ दे' म्हणून कुळवाड्याच्या पाया पडत होती.

त्यो म्हणत व्हता,

'कशाला हुचालपाटायला गेली व्हतीस? तुझ्या ...... घातला पाय.'

मला काय करावं सुचत नव्हतं. बघता बघता साऱ्या गावभर वारं गेलं. गाव चावडीम्होरं जमलं. आमच्या आळीतल्या म्हाताऱ्या- कोताऱ्यांनी पदर पसरला. दंड

बांदा म्हनले, पण गावाला चेव आला व्हता.

'आयला ह्यांच्या! लई माजल्याती!! बांधाला हिरवा ढाळा ठिवंनाती का रानात कणसं ठिवंनाती. बघता बघता उचलत्याती. काय म्हून ठिवायची सोय न्हाय. बांदा भडव्याला झाडाला आन् वता कुलाचं पानी.'

सारं गाव बेभान झालं हुतं. कुनी काय, कुनी काय. चोरीपास्नं कुनासंगं लफडं हाय, हितपातुर चाललं हुतं. सारा कैकाडवाडा गयावया करीत हुता, पर कुनाला पाझर फुटत नव्हता.

'चार दिस झालं, गावात अेक बाभळीचा फॅस राहचला नाय. रातचं येत्याती आन बाभळीचं फॉक आन् काट्याचं फॅस उचलून नेत्याती. आज या दोगान्ला धरलं. पळून चालली हुती. ह्यो आयघाल्या निसटला व्हता. त्यातनं बी, ह्या रांडंच्या गांडीचं लुगडं फेडल्यालं बघितलं, तसा ह्यो माघारी पळत आला. लई मारलं न्हाय. तुमापातुर आनलं. काय ते तुमीच ठरवा. पुना आमच्या शिवंच्या आत पाय ठेवनार न्हाईती ते बघा. न्हाय तर जिती सोडणार न्हाय. पुना म्हनाल, आसं तसं झालं... यांच्यासाठी आपल्यात (म्हणजे शेजारच्या दोन गावातल्या माणसात) वाकुडपणा नगं!'

'ह्यांची घरं पाडून टाका. ह्या–चोराच्या पोटच्यान्ला आपल्या गावातनं हाकला. ह्यांच्यापायी सोनवडीकरांनी आमची आबरू घेतलीया. आताच्या आता ह्यान्ला हात दाखवा.'

एक एकाचा हात मिशावरनं फिरत व्हता. 'आता आपल्याला गाव सोडावं लागतंय, आपल्या आईबाला जिवं मारत्यात' ह्या इचारात मी बोंबलत हुतो. जयसिंग्या, पारी, तात्या, आप्पा सारी मानसं मयतीला गेल्यागत सुतकी तोंड करून बसली व्हती.

हे सारं एक तरणाबांड, लालबुंद चेऱ्याचा पोरगा ऐकत व्हता. ठुनगुसा, चेऱ्यावर तेज व्हतं ... शिकल्या– सवरलेला पोरगा, रामभाऊ त्याचं नाव. तिरमिरीत उभा राहिला, तसं बोलणाराचं नरडं आवाळलं. सारीजनं रामभाऊकडं बघाय लागलं. रामभाऊ तरातरा चालत गेला. आईचं हात सोडलं. आईच्या अंगावरची कळा बघून त्यानं डोळं पुसलं आन् घोगऱ्या आवाजात त्यो म्हणाला,

'आनवरी, तू जा. मी सोडलंया तुला. तू जा.' आई जीव मुठीत घेऊन उभी राहिली. सारी भुतं शांत. पन सारी बगाय लागली. पाटलाचा चेरा लाल झाला हुता.

'रामभाऊ, तुमी काय केलंत? समज हाय का तुमाला? तुमी सरकारी कामात आडकाठी करताय. तुमाला मला वरदी दिऊन आटक करावी लागेल.'

रामभाऊ म्हणाला, 'त्या आनीच्या आबरूपेक्षा तुमच्या भनीला आसं उभं केलं असतं तर तुमी ते सोसलं आसतं का? तुमाला बी आयाभइनी हायेत का न्हाय? मी दितो तुमच्या काठ्या. किती काठ्या आनल्या सोनवडीच्या? आन् काठ्यापायी शिक्षा करायला तुमाला कुणी अधिकार दिला? तुमी वरदी द्या. तुमच्या बाय-

लीला हिथं चावडीवर आनल्यावर कसं हुईल?'

पाटील चिडला. त्यानं रागानं पायातली वहान काढली आन रामभाऊच्या आंगावर फेकली. तसं रामभाऊची भावकी उसाळली. कलागत वाढत गेली...

रामभाऊला बरंच लागलं व्हतं. डोस्क्यातनं रक्त वहात होतं. आईनं आंगातलं राहिलेलं खमीस फाडला आन् डोस्क्याला बांधला. तिचा नुसता कलवा झाला होता.

**कष्ट**

आई मिळंल ते सारवान, भांगलान, टुपलान करायची. मजुरी पैश्यात नसायची. वटाभर मिरच्या, कणसं, शेंगा, भाकरी, कालवण, आसं जे कुळवाड्यात आसंल ते आणायची ...

पावसाला उघडीप आसली की काम करायची. आकाड, सरावन वैरी होऊन यायचं. आई चारचार दिवस जेवताना दिसायची न्हाई ...

सुट्टी दिवशी मी, समी, आई, बा सारी कापूस येचायला जायाचो. आईबाला पुरा रोज मिळायचा, एक एक रुपया, आम्ही बहीन– भावंडांना मिळायचे चार-दोन आणे. तेवढीच मीठमिरची.

आई- बाचं दांडगं कष्ट. रातभर मी वाला, आईला झोपल्यालं बघायचो न्हाई. दिवस उजाडला की दोघं कनगी बांधून पसार झालेलं असायचं. येताना बा फोकाची भलीमोठी मोळी घिऊन याचा. आई सामानसुमान आनायची.

**गोतावळा**

आमच्या बिऱ्हाडाबरूबर आप्पा, तात्याची– माझ्या चुलत्यांची बिऱ्हाडं आली होती. आई गरवार होती म्हून बिऱ्हाडं एका जिवानं राह्याची. कष्ट करायची, खायाची, पण जिवाभावाला आलं तर जीव टाकायची.

नानी, काकी, आई कंदी भांडल्या न्हाईत. बा भावांच्यासाठी आईला मारायचा, पण भावान्ला तोडायचा न्हाय.

**आईचं बाळंतपण**

सारी जेवायला बसलो होतो. आईच्या पोटात दुकत व्हतं. बानं अंगारा लावला. आई सारखी रडत व्हती. जेवनं बाजूला सारली. बानं धोतराचं धडपं जोडलं. चार काटचा उभ्या केल्या, खंदील मोठा केला. पळत जावून म्या रॉकेल आनलं, आपानं दोन हांडं पानी आणलं. नानी, काकी कामाला लागल्या. धोतराच्या आडूशाला त्या तिगीजणी काय काय करीत व्हत्या. ... आई विवळत व्हती. नानी 'आगं गप, सोस' म्हणत व्हती ... अखेर आईचं इवाळनं थांबलं तसं बारकं पोर रडल्याचा आवाज आला. तात्या, आप्पा, बा साऱ्यांना सुटल्यागत झालं. साऱ्यानला आनंद झाला. नानी आतनं पानी मागत व्हती. आप्पा पानी देत व्हता. नानीनं

आप्पाला शिव्या दिल्या– ' आरं गार, बर्फासारखं पानी हाय. काय मारतूस का ?' म्हनत व्हती.

बानं चूल पेटवली. पानी गरम केलं. काटा फुटला की पानी धोतरामागे गेलं. मूल रडत व्हतं. आईला मूल झालं. मला भाऊ झाला व्हता. समिंदराच्या कडंला ल्योक झाला व्हता. बा म्हणत व्हता, ' समिंद्रचा नाव ठेवूया.'

**शिक्षण**

आता आई तंबाकूला दोन आनं देत हुती ... बानं आता (शिकू नकोस म्हणून) सारकं काट्यावर धरलं होतं. आई तळमळायची. चोरून दानं पाठवायची. हातानं– परहातानं जेवढं जमेल तेवढं करायची. बासंगं सारका कज्जा करायची. मार खायाची.

परीक्षेला (परगावी) जायाचं तर पोरातनी गट पडल्यालं. मी गांगारलो हुतो. आईला सारकं भ्या वाटायचं. ह्यो नीट जगू द्याचा न्हाय, म्हनून रोज डुली सिनगारीत व्हती. सारी पोरं निगाली. चार दिस फलटण्यात न्हायाचं. जेवनं घरनं आणायची हुती. माजं जेवान कोन आणील ? आई जेवान कुटनं आनील ? कोन जेवायला देल ? ' एक भोकपडका पैसा जवळ न्हाय ' बानं ठेका धरला हुता. आईनं दोन रुपये दिलं. जेवान पाठवीन म्हणाली.

**लेक पळून जातो**

रातच्या आठनऊ वाजल्या असतील. समीनं रकटं घालून दिलं. त्याच्यावर जाऊन झोपलो व्हुतो. तेवढ्यात बा– आई सारी आली. मी हाय ह्याची आईनं खात्री केली. बाला गप्प बशिवला. माझ्याजवळ आली आन जवळ घिऊन रडायला लागली.

' लक्षा, हाडाचं काडं करून जगीवतुया आन परमिसरानं ह्यो कसं तुझ्या डोस्क्यात घातलं !' म्हनून थाडथाड हानून घियाला लागली ... आई, बा, सारी माणसं रडत हुती.

रातची रात बगडीकडं राहिलो. समी, आई, बा, बगडी सारी बोलत बसली... बगडीनं सारी रात भावाला ग्यान शिकीवलं ... बानं मावळणीला-त्याच्या भइनीला निसा धाडला– आवंदाच्या वरीस लगीन रहित केलंया. बहिणीनं कुरकूर करीत टपालानं कळवलं.

**सून यावी वाटत होतं**

आता आईला पयल्यासारखी कामं होत न्हवती. तिला सून यावी असं सारकं वाटत हुतं. तिनं माज्यामागं सारखं टुमनं लावलं हुतं. मावळणीची पोरगी किती चांगली हाय ते सांगायची. मी बी कदी– कदी पागळायचो, पण का कुणाला ठावं, लग्नाला मातूर तयार होत नव्हतो.

**श्रद्धा**

जवा जवा संकट येतं तवातवा तिची (काळूबाईची) ढाल आपल्याला संबाळती, म्हनून आई सांगायची.

**मुलाच्या लग्नानंतर**

मध्येच गावाकडून आई, वडील, आप्पा, तात्या, सारी माणसं आली ... आई उंबऱ्यात उभी. मी अवसान आणून आईला आत बोलावलं. शशी गुपचूप बसली होती ... मारक्या म्हशीसारखे सारे तिला बघत होते ... वीज कोसळावी तशी आई हातपाय चोळायला आणि गहिवरून रडायला लागली. ' आमचं वाटूळं केलंस रं बाबा ! आरं, तुला पैदा करण्याऐवजी दगडधोंड्याला काढला असता तर बरं झालं असतं रं ' ती सूर लावून रडायला लागली. ' आरं, जलामलास तवाच का मेला न्हाईस ? आमचं नाक कापलंस. आमाला माणसातनं उठवलंस. तुला डुकराचा मूत मी पाजीन. तुला जाळायला न्हेला.' आई शेलक्या शिव्या देत होती, ' तुला लहानाचा मोठा केलं. ... कोंड्याचं मांडं केलं ... भीक मागून शिकिवला, त्यो तू आमच्या तोंडात मुतलास.' मी, शशी दगडागत गप्प बसून होतो. शशीनं चहा ठेवला हाता, त्याबरोबर आई म्हणाली, ' ए औदसा, आमच्या घराची घरफोडी केलीस, मानसातनं उठवलंस आन् वर च्या करतीस व्हय?' शशीनं स्टोव्ह बंद केला.

बा आईवर खेकसला तशी आईची टकळी बंद झाली.

## समीचा साखरपुडा

तिसऱ्या पाराची येळ आसंल. बगडी फलटणकरीन आमच्या बिराडावर आली व्हती.

ती माझ्या बाची चुलत चुलत बहीण. भावानं भईनीला ठिवून घीतली ... त्या दिवशी ती आमच्या बिराडात राहिली, जेवली, झोपली. सकाळचं झुंजूमुंजू व्हताना वश्या, शाम्या, लाल्या, नाऱ्या सारी तिची पोरं आमच्या बिराडात त्यांच्या आईकडं आली व्हती. बानं पावूनचार केला. भयनीला चोळीबांगडी केली, जेवण केलं. आईनं चोळीच्या खणाला कुंकू लावलं– ' वईनूसं या ' म्हणून म्होरं गेली. तशी बगडी बिगाडली.

' मी काय तुझ्या चोळीबांगडीसाठी आलीया व्हय ? माझं दार बंद झालंया ' म्हनत रडायला लागली ... बगडी रडत हुती. ' माझी वाट चालू दे. माझा उंबरा चालू राव्ह दे ' आसं काय काय म्हणत व्हती.

समी आईच्या मागं मातीत खेळत व्हती. बा बगडीला म्हनत व्हता, ' आगं बगडे, काय करू सांग. तुला ल्येक न्हाय. लक्षाला करून घीतली आसती.'

बगडी रडतच होती. ती म्हणत व्हती, ' बापू, माझ्या वश्याला ही मातीत खेळतीया तिला दे.'

झालं. बा सावरला. ‘बगू’ म्हनाला. पन बगडी चोळीबांगडी घीईना. बा कोडच्यात पडल्यागत चिताकती झाला. आप्पा, बा, तात्या एक बाजूला गेले. तिघा भावांनी इचार केला. समी, मी, वश्या, लाल्या मातीत खेळण्यात रंगून गेलो.

थोड्या येळानं आईनं समीला हाक मारली. समी व्हती तशीच मानसात गेली. भावकीची माणसं जमली व्हती ... समीची मजा चालली व्हती. ती बगडीच्या मांडीवर बसली व्हती. वश्या आईच्या मांडीवर बसला हुता. दोगान्च्या कपाळाला कुंकू लावलं व्हतं ... समीचा साकरपुडा झाला हुता. बाचा पाय ठरत नव्हता. बगडीनं चुळीबांगडी घीतली व्हती. भावकीला साकरपुड्याचं जेवान मिळालं व्हतं.

सारा दिस समी बासिंग बांधून बसली व्हती. तिला लुगडं नेसिवलं व्हतं. तिला ते झेपत नव्हतं. गुंडळून गुंडळून नेसिवल्यालं लुगडं पायात अडकायचं ...

लगनाची येळ झाली तरी देवाक गेलं नव्हतं. सारीजन ल्हास व्हते. आईचा जीव तुटत व्हता ...

कपाळाला बासिंग बांधून समी आन् वश्या मोठ्या मानसावानी गपचीप बसली व्हती. समी मला जवळ बसवत व्हती.

‘दादा, लई भूक लागलीया ... उपास कवा सोडायचा ?’

## पिंगळ्याची बायको

पिंगळा, चारपाच पोरं आन् बाईल. तिला तो सारखा रांडीचे म्हणायचा... ह्याला कनकनी भरली व्हती, तापानं नुसता फुलला व्हता. बाई घाबरून गेली व्हती, ती बाकडं आली. आयच्या बिराडातनं अंगारा नेला. बानं उतारा सांगितला. त्यो टाकला, पन काय उपेग हुईना, उतार पडंना. सारी पालं काळजीत व्हती. बाईल एकलीच, पण धीराची होती. तिला बानं कायतरी झाडपाल्याचं औषध आणायला सांगितलं, आन् कडूसं पडताना ती आली.

...पिंगळी पळतपळत औषध घिऊन तिच्या बिराडावर गेली. तो आगुदरच तापल्याला. त्यात बाईल दीस गेल्यावर आली. बाबा खाडकन् उठून बसला आन् ‘रांडं, उंडगे, तुझ्या आईला गाढव लावतो. कुठं शेण खाल्लीस?’ म्हणत अंगावर गेला. बाई धीरानं त्याला खाली निजवीत झाडपाल्याचा रस त्याच्या तोंडात वताय लागली, पण म्हातारा काय पीना. ‘आगो रांडे, आता संबंध काय उरला? उठ, उठ, माझ्या म्होरं थांबू नगंस. म्हातारपणात चळ भरलाय गो तुला’ म्हणून औषध सोडून दिलं.

...बानं त्याला औषध दिलं तर घेईना. ‘मी मरू दे मेलो तर. मरू द्या. रांडंनं तोंडाला डांबूर फासलं गा!’ म्हणून किंचाळायला लागला.

तिनीसांजचं वकूत. माणसं जमाय लागली ... बाईल आगदी काळी ठिक्कार पडली हुती. आईनं तिला इचारलं तवा तिनं भोकाड पसारलं. ती सांगत हुती, 'आमच्यात दीस बुडायच्या आत बिराडावर यावं लागतं, न्हाय तर बाय वाईट चालीची म्हणत्यात. ह्यात ह्याच्यासंगं काढली. हाड आन् हाड ह्यानं चेचला. आन् वर त्वांड करून निघाला हुता म्हणून ग्येलो ह्या दादानं सांगितलेलं औषध आणायला. पर ह्यो माजी शंका घेतुया- आता चळ भरला काय?'

बाईनं पोरं घेतली. चुलीत पाणी वतलं आन् पचापचा थुकली, आन् लगीच निघाली. आईनं आडवली तवा 'त्याच्या शेमण्यात रग हाय. दुसरी करू दे. चार कच्चीबच्ची कशीबी जगवतो' म्हनाली आन् झणक्यात निघाली.

आता म्हाताऱ्याच्या डोक्यात उजेड पडला. त्यो मोठ्यानं नुसतं वरडायला लागला.

'आगे रांडे, कुनाखाली निजलीस? मला सोडून कुठं चाललीस ...' बिचारी म्हातारी आन् चार पोरं मागारी आली. आता ह्याची मिजास उतरली हुती. इजावलेली चूल पुना आमच्या घरातला इस्तू नेऊन पेटावली. चार दामटं केलं आन् पोरास्नी, म्हाताऱ्याला घातलं.

जाताना म्हातारा बाकडं आला. 'निगतू' म्हनाला. 'तुझ्या औषधानं बरा झालू. बाईल लई चांगली हाय, म्हन खातूया'... म्हणत निगून गेला.

## वर्गमैत्रीण

कॉलेजातली एक मुलगी त्यावेळी आवडत होती. तिच्याबरोबर निमित्त काढून बोलायचं. आणि लायब्ररीत लागल्यावर तर सतत मुलींचा संबंध येऊ लागला. त्या आपण होऊन बोलूही लागल्या. पण आपण आपलं मनातल्या मनात चित्र रेखाटत रहायचं. बोलायला धाडस काही व्हायचं नाही.

अखेर त्या मुलीनं पुस्तकातनं चिठ्ठी धाडली. घाबरत घाबरत संडासमध्ये जाऊन चिठ्ठी वाचली. तिनं बरंच काही लिहिलं होतं. मी हळूहळू तिच्यासंबंधी विचार करू लागलो. इतकी देखणी पोरगी आणि त्यातही ब्राह्मण. आपल्या तर काही दिवस डोक्याचा तमाशा झाला होता. काहीही करीत असो, मनात विचार असत ते त्या पोरीचेच. तिला प्रतिसाद देत होतो. प्रेमाचा रंग बराच गडद होत चालला होता. एकदा न राहवून सारं प्रकरण नारायणला सांगितलं... त्यानं चांगलं झापलं. वास्तवाचं भान दिलं. ती लग्नाला तयार आहे का विचार म्हणून सांगितलं. मी तिला विचारलं, अर्थात चिठ्ठीतनं. त्याला तिचं उत्तर आलं ते भारी. 'मी लग्न करण्याचा विचार केलेला नाही. आणि आपण मोकळेपणानं बोलू.' झालं, तिच्याशी बोललो. ती म्हणाली, 'किमान मराठा असशील असं वाटत होतं. तुझी जात पहाता मला जमेल असं वाटत नाही.' आणि इतक्यावरच आमचं प्रेम खलास झालं...

इतक्या साऱ्या बाबी जमवून घेऊ पहाणारी मुलगी जातीचा मुद्दा निघाला की हद्दपार करून गेली. मी तिच्या नादाला लागलो नव्हतो. तिनंच सुरू केले होतं आणि तिनंच संपवलंही होतं.

## घरमालकाची मुलगी

ज्या घरात रहात होतो त्या घरमालकांची एक मुलगी होती. वाचायची हौस खूप. त्यामुळं मी लायब्ररीतनं पुस्तक आणून दयायचो आणि ती वाचायची. आम्ही एकत्रच राहात असल्यानं खूप मोकळं बोलायचो. तारुण्यसुलभ ओढ असेलच, पण विचार करायला लागल्यापासून मला समजलं तेवढं तिला समजावून सांगत होतो. भाऊसाहेब खांडेकरांची सारी पुस्तकं वाचून झपाटून गेलो होतो. सार्वजनिक कामाची आवड निर्माण होत होती. समोर तीही घडत होती. थोडाफार पुरोगामी विचार समजत होता. मैत्री खूप जमली होती. पण विचार आणि वाचन यापलीकडे आम्ही काही विचार करीत नव्हतो.

मी जरा जपून पावलं टाकीत होतो. लग्नाचा विचारही डोक्यात येत नव्हता. आपली योग्यता नाही या विचारानं कासावीस होत होतो...

आमचे असे धंदे चाललेले होते (मोर्चे, मिरवणुका इ.) त्याचे काही परिणाम होत होतेच. एका बाजूला घरमालकाच्या मुलीच्या मनात परिवर्तन होत होते, तसंच ज्यांच्याबरोबर हायस्कूल, कॉलेज करीत होतो त्या मित्रांच्यातही एकूण बदल होत होता. मी हे करू नये असं बहुतेकांचं मत होतं. त्यातच घरमालकाच्या मुलीशी माझे काही संबंध आहेत याचाही वास त्यांना येत होता. आणि मी तिच्याशी लग्न करण्याचा विचार करतोय म्हटल्यावर आमच्यातल्या मराठा मित्रांना काही बरं वाटेना. तू इतरत्र असं कर, इथं नको. आणि हे बरोबर नाही, असं सांगू लागले. मतभेद वाढत गेले आणि कित्येक वर्षांचे संबंध तुटले... मी त्या रात्री खूप उशीर रडत बसलो होतो... मानसिक दृष्टया खूप दुखावलो गेलो होतो. जे मित्र ताटात घेऊन जेवले, त्यांनीच पुन्हा जातीचा मुद्दा काढून बाजूला टाकलं होतं... (मेसचा स्वैंपाक करताना) भाकरी करण्यात एवढा तयार झालो की स्वयंपाकीणबाईला माझ्यासारख्या भाकरी येत नसत. एवढं सगळं काम करून खोलीवर परत यायला रात्री अकरा तरी वाजत... कितीही उशीर होवो, खोलीवर यायचोच. कारण पहाटे मालकाच्या पोरीला, शशीला, भेटायचं असे. कारण दुसरी वेळच नसे. ती रोज भल्या पहाटे उठत असे... त्या वेळी आम्ही बोलत असू. फक्त पंधरावीस मिनिटं वेळ मिळत असे, पण तेवढ्यात चान्स. एरवी बोलायचो, पण सारं जनरल. खाजगी बोलण्याची, भेटण्याची वेळ सकाळीच असे. तिच्या मनाची तयारी करीत होतो. पण लग्न करण्याचं त्यावेळी नक्की काहीच होत नव्हतं...

शशी हायस्कूलला जात होती. कबड्डी हा तिचा अतिशय आवडता विषय.

खूप चांगलं खेळत होती. ती अकरावीला गेली होती. तिचीही परीक्षा जवळ आली होती. पण का कुणास ठाऊक, मुलीच्या जातीला काय करायचं शिकून, म्हणून ऐन परीक्षा जवळ आली असताना तिला शाळेतून घरी ठेवलं. बहुधा तिच्यासंबंधी घरात संशयाचं वातावरण होतं. अगदी गावात जातानासुद्धा कुणाला तरी—घरातल्या—घेतल्याशिवाय बाहेर जायचं नाही इथंपासून, तो माझ्याशी बोलायचं नाही इथंपर्यंत बंधनं आली. पण आम्ही कुठंच वाईट वागत नव्हतो किंवा संशयाला जागा ठेवत नव्हतो.

परीक्षा जवळ आली होती आणि ज्या दिवशी पहिला पेपर होता त्याच दिवशी अचानक शशीचा भाऊ म्हणाला, 'आक्काचं रात्री ऑपरेशन झालं, ती खूप आजारी आहे.'

खरंच वाटेना...मी शशीला भेटायला गेलो, तर मला दवाखान्यातही जाता येईना. तिची चुलती, आई तिथं होत्या. अखेर धाडस करून आत गेलो, तर हिला गॅसवर ठेवली होती. खूप वाईट वाटलं. तिला मनातलं सांगावं असं वाटत होतं. पण ते शक्य नव्हतं. थोडा वेळ बसून परत आलो.

प्रेमाच्या प्रकरणानं जोर धरला होता. गावामध्ये शशी तिच्या मैत्रिणींबरोबर येत होती. आम्ही बोलत होतो. तसे जवळ येत चाललो होतो.

शशीशी लग्न करण्याचं पक्कं ठरलं होतं. तिच्या मनाची तयारी झाली होती, परंतु कॉलेज संपल्याशिवाय लग्न करायचं नाही हेही ठरलं होतं. सारं बोलणं चिठ्ठ्यातूनच असे आणि चिठ्ठ्या, संधी मिळेल तशा, परस्परांना मिळत होत्या.

शशीनं एक खलिता पाठवला होता. तो वाचून अवाकच झालो. तिच्या घरच्यांनी तिचं लग्न अन्यत्र जमविण्याचा घाट घातला होता. एक मुलगा बघून गेला होता. आणि जर या सीझनच्या आत मी तिच्याशी लग्न नाही केलं तर... तर तिचं लग्न दुसऱ्याबरोबर होणार होतं.

मी रात्रभर विचार केला. पहिला विचार म्हणजे आपण लग्न करावं का? ही इतकी सुखवस्तू कुटुंबातली मुलगी आपल्या पायदळीतल्या आयुष्याशी एकरूप होईल का? हिला आपण निदान नीट तरी सांभाळू शकू का? आपल्यामुळे हिचं नुकसान होणार. मी तिला नकार कळवण्याचं ठरवलं. रात्रभर पत्र लिहीत होतो आणि फाडत होतो. काय लिहावं? नकार दिला तर तिचा गैरसमज होणार...

अखेर मी कसा झालो, भविष्यात काय आहे, ही नोकरी सोडल्यावर फूटपाथवरही जागा मिळणार नाही, तुला दोन वेळ जेवायलाही देऊ शकेन याची खात्री नाही इ. बरंच लिहून कळवलं. सबब, तू इतरत्र लग्न कर म्हणून सांगितलं. त्याला तिनं उत्तर दिलं. 'आपण दोघं मरतानाही एकत्र मरूया, जे व्हायचं ते होईल. मी फूटपाथची तयारी ठेवली आहे. तू नाही म्हणू नकोस. तू नाही म्हणालास तर...' वगैरे.

जातिव्यवस्था, समाजवाद सारं तीच ऐकवत होती. माझ्या परीनं मोडता घालण्याचा प्रयत्न केला, पण काही उपयोग झाला नाही.

दुपारी कुणी नाही असं पाहून शशीनं कपडे चोरून आणून माझ्या बॅगेत ठेवले होते...पुन्हा दुसरं पातळ माझ्या बॅगेत ठेवताना तिला तिच्या भावानं पाहिलं आणि सारं बिंग फुटलं. शशी नुसती रडत होती. तिला आई, चुलतीनं विचारलं, 'तुला मान्यानं ठेवायला सांगितल्या काय?' तिनं अकलेनं उत्तर दिलं, 'नाही, मीच ठेवत होते. त्याला यातलं काही माहीत नव्हतं' वगैरे. तिला बराच मार बसला... शशी-वर सारं घर आग ओकीत होतं...पहारा कडक झाला होता.

मी शशीला चिठ्ठी लिहिली...चिठ्ठीत शशीनं कुठं यावं हे लिहिलं होतं... शशी हातावर तुरी देऊन सुखरूप आली होती. मला पहाताच रडू लागली. पण रडायलाही वेळ नव्हता...माझी चिठ्ठी मिळाली होती. पण निघणार कशी? चुलती एका उंबऱ्याला अन् आई दुसऱ्या उंबऱ्यात उसं देऊन झोपल्या होत्या. त्यांच्या दृष्टीनं संकट टळलं होतं. बस, हिनं फायदा उठवला. पायात चप्पलही न घालता ही बाहेर पडली...लग्नसोहळा पार पडला. तिच्या अंगावर नेसूचं पातळ होतं... शशी एका वस्त्रानिशी बाहेर पडली होती. ऊर्मिलाकाकूंनी तिला कपडे, आरसा, कंगवा, कुंकू सारं दिलं.

शशी खूप चालल्यानं थकली होती....पॅसिंजरच्या फलाटावर झोपली.... (पोलिसानं )शशीच्या अंगावरची चादर ओढली...ती पुरती जागी झाली. पदर सावरला आणि त्याला साफ शब्दांत 'मी ह्यांची बायको आहे' असं सांगितलं... लग्नानंतरची पहिली रात्र गेली ती पोलीस स्टेशनमध्ये.

शशीनं सारं निभावून न्यायचंच अशी अगदी खूणगाठ बांधली असावी. खरं तर मला हिजडा ठरवून तिनं हाकून दयायला हवं होतं.

शशी सकाळपासून सायंकाळपर्यंत पिशव्या शिवत असे. दोन्ही वेळचा स्वयंपाक मी करीत होतो. तिला मदत करीत होतो. पण बायको कमावते आहे आणि आपण खातो आहोत हे पटत नव्हतं...राबराबून शशीला आठवड्याला १५ ते २० रुपये मिळत होते.

शशीला दिवस गेले होते...शशी घरात बसून कागदाची पाकिटं चिकटवत असायची. कंबर मोडेस्तवर काम केलं की दिवसाला रुपया -दीड रुपया सुटायचा. तिचे कष्ट बघवायचे नाहीत. गाढवावाणी पोट घेऊन काम करायचं. स्वयंपाकपाणी करायचं.

## पंचायत

माझं लग्न झाल्यास घरी गेलो नव्हतो. शशीनं घर, जात काहीच पाहयलं नव्हतं. ... गाडीनं स्टँडवर उतरलो. हातात बॅग. शशी, आत्या, मामा असे सोमंथळीत प्रवेश करते झालो.

बायका दारात उभ्या राहून मला आणि बहुतेक शशीला अशा पहात होत्या की शरमेनं मान खाली घालावी ... आईनं बघून न बघितल्यासारखं केलं ... शशीची फार पंचाईत, तिला काहीच समजत नव्हतं, कळत नव्हतं, वळत नव्हतं. नुसतं बघत बसायचं होतं.

पंचायत सुरू झाली ... मी माहितीसाठी बायको मराठा असल्याचं सांगतो.

पंच विचारतो, ' तिच्या येळी उशापायत्याला बसला हुतास काय ? ती मराठ्याची हाय याला पुरावा काय? आन् ती बामनीन आसली तरी आपल्या जातीत चालत न्हाय. तुझ्या बापजादयांनी केलं होतं का ? ती म्हारीन हाय की मांगीन हाय म्हाईत न्हाय. तू तिला सोडून दे. निदान लगीन केलं न्हाय म्हन. गडयानं बाय ठेवली तर चालंल, लगीन चालत न्हाय. तू तिला ठिवली म्हन, तरच इचार होईल.'

## शेजारीण

शशीला बरं नव्हतं ... मी आपला तिच्या पातळाला साबण लावत होतो. आणि शेजारच्या आयाबाया टवकारून बघत होत्या, कुजबुजत होत्या. त्यातलीच एकजण आली आणि म्हणाली, ' गुरुजी, असं काय करताय ? पाप हाय हे. बायकूला काय रगतपिती फुटली व्हय? का हांडयावरून झाला? तिची कापडं धू नगा... गुरुजी, जात बाटलीय म्हन रीत बाटलीया का ? नवऱ्यानं बायकूचं धुणं धुवायचं म्हंजी हे पाप ती कुठं फेडील ? नरकात जावं लागेल का न्हाय ? ... आमच्या वक्ताला नुसतं वरनं पानी घाला म्हटलं तर नवऱ्यानं जीव जास्तंवर हानली हुती. नजरंला नजर भिडंल काय ? जीव जाया लागला तरी करायचं. ना करून कोणाला सांगायचं ? आपल्या कर्माला आलं म्हन बायानं करावं. बाई हाय का गाडाव! ...' त्या बाईनं हातातलं धुणं हिसकून घेतलं आणि तेवढ्यापुरतं का होईना, पण कसं जिरल्याच्या थाटात धुतलं.

एकदा वडसावित्रीच्या पूजेवरनं असंच शेजारणीबरोबर शशीचं बिनसलं होतं... ५– ७ बायका घरात घुसल्या ... त्यांच्या हातात ताटं होती. त्यात पंचारती, कापूस, साखर, आंबा, नैवेद्य आणि दोरा ... असं पूजेचं सामान होतं. साऱ्याजणी ' वैनी, चला ' म्हणून बसल्या होत्या. शशी सांगत होती–

, मी उपवास केलेला नाही. मला पटत नाही. माझा असल्या बाबींवर विश्वास

नाही. आणि अशी नाटकं करून हाच नवरा सात जन्माला मिळेल असंही मला वाटत नाही.'

बाँब टाकावा तशा बायका उडाल्या होत्या. 'नवऱ्याच्या म्होरं ही बया असं बोलतीया आन् ह्यो बैल नुसतं ऐकतुया. ही कसली अवदसा आसंल!'

एक पोक्त बाई म्हणते कशी, 'आवो, त्या सावित्रीनं सत्यवानाचा जीव यमाच्या हातातनं मागारी आनला ती गाढव होती का? पतीवर्ता, गर्ती बाया कशाला म्हणत्यात? येसवा ह्यांच्यापरीस वेगळ्या असतात का? मेल्यावर नका पाळू, पण जितं हाय तवर तरी पाळा! रीत कशाला केलीया?'

शशी रडकुंडीला आली. माझ्या खांद्यावर डोकं ठेवून मूकपणे उभी होती.

## तानी

तानीनं पोर पाठीला बांधलं. तिची दोनतीन पोरं, दोन तीन पोरी आन् मी– सारी नदीच्या कडंला आलो. तानीनं माती बघितली आन् केऱ्याला गाढवं थांबवायला लावली. केऱ्यानं गाढवं थांबवली. तानीनं काष्टा घातला. तान्या पोराला खाली जमिनीवर झोपावलं. त्याच्याहून मोठ्या पोरीला पोराजवळ बसवलं. आन् टिकावानं खांदायला लागली. केऱ्या 'आता येतू' म्हनून सांगून कुठं गेला हुता त्यो बराच येळ आला न्हाय. मी तानीकडं बघत हुतो. ती खाली मान घालून खांदत हुती. घामानं सारं आंग निवाळलं हुतं. आजून केऱ्या आला नव्हता. ती चिडली हुती. गाढवं एका जागी बांधल्यावानी उभी हुती. ती दमून खाली बसली आसंल नसंल, तेवढ्यात केऱ्या आला. धोतराचं खोचं खवतच आपल्या बरबर बोलतच जवळ आला आन् तानीला बसल्याली बगीतली तसा वडारी भाषेतनं शिव्या देतच आला.

'गांड माजलीया व्हई गा, बसलीयास ते?' तानी आदी कावली व्हतीच. तिनं बी शिव्या द्यायला सुरुवात केली ... त्यानं तिच्या पाठीत, ढुंगनावर चार-पाच खोऱ्याची दांडी हानली व्हती. तिच्या आवाजानं कालवा झाला हुता ... मी तानीला घमेली उचलाय लागलो, तसं ती म्हणाली,

'आंडात आव न्हाय आली तुज्या. तूबी तसलाच.'

मी मग मागं झालो. तिनं भरारा गाडवाच्या पाठीवर गोन्या भरायला सुरुवात केली.

केऱ्या पिऊन आला हुता.

## गुरुपत्नी

असाच तिरीमिरीत दुपारी ऐन उन्हाचा पाटगावकरांच्याकडं गेलो. ते घरी नव्हते. बाई होत्या. माझा चेहरा सुकलेला होता. खरं तर चहाही घेतलेला नव्हता. जेवणाला दोनतीन दिवस सुट्टीच होती ... बाईंच्या बरोबर इकडचं तिकडचं बोलत

होतो. पेपर समोर धरला होता, पण पोटात कावळे ओरडत होते. बाईंनी ते हेरलं असावं. त्यांनी मुद्यालाच हात घातला. 'माने, अरे जेवणाचं काय करतोस ?' मी 'जेवलोय' असं सांगितलं, पण त्यांना पटलं नाही. त्यांनी खूप आग्रह केला म्हणून जेवायला बसलो. खाली मान घालून जेवत होतो आणि डोळयांचं पाणी वाटीत साठत होतं. बाई काही हवं का म्हणून विचारीत होत्या. मी मानेनंच नको म्हणत होतो ... पोटात भडभडून येत होतं. आईची आठवण येत होती. घरी जेवायला भीक मागून आणलेलं असायचं, पण आई वाढायची.

## जोशी बायका

आमच्या बिराडाशेजारी जोश्यांचं बिराड उतारलं व्हतं. नवरा, दोन बायका. असा तिगांचा संसार फिरत व्हता. रोज सांची तिगांची भांडणं ठरलेली असायची. नवरा रोज बेवडा हानत होता आन् रात जागवीत व्हता. बाया डोस्क्यावर पाटीत जरमलीची भांडी भरीत होत्या, साकरंवार मोडतोड करीत सारा दिस उनातानात पायाला भवरा बांधून हिंडत होत्या.

सयपाक झाला की जारी– सरी (जोश्यांच्या दोन्ही बायका) हाका मारायच्या. मग 'रांडा बोलवत्यात. घटकाभर बसू दयाच्या न्हाईत' करीत उठायचा... आईभनीवरनं सारकं शिव्या दियाचा. पचापचा थुकत रहायचा. बाया लई राबायच्या.

## पारूमामी

मी तिला पारूमामी म्हणत व्हतो. आता ती समीपेक्षा माजं लाड करायची त्यानं ती मला आवडायची. बाई भयान देकनी व्हती. गुरीपान, उभ्या चवळीच्या शेंगंवाणी. नुसती वाऱ्यागत चपळाईनं हलायची. माझ्या आईला आठआठ दिस आंगाला पानी मिळायचं न्हाय. पण पारूमामी मातर रोज आंगूळ करायची. तिन्हीसांजा, न्हायतर फटफटीत होताना. रस्त्याच्या कडेलाच न्हायाची. ती न्हाया बसली की घारी–गिदाडावानी तरनी पोरं उगाच आमच्या बिराडाकडनं हुंगायची. ह्याचा भाव काय आन् ह्याची किंमत काय ? बा लई चिडायचा. चिडला की म्हनायचा, 'देणं कुसळाचं आन् झवनं मुसळाचं. तुला घ्याचं तर बोल, न्हायतर मी रिता न्हाय' म्हनून हाकून लावायचा. तर ती आंगूळ कराय लागली की मारतीमामा तर नुसता दातव्हट खायाचा. 'ये, तुझ्या आईला गाढव लावला, तू बामनीन हाईस का आंगाला गू भरलाय, सारकं आंगूळ करतीयास ते?' म्हणून लई शिव्या दयायाचा.

आसंच एकदा तिनं आंगूळ केली आन् बिराडातला आरसा घिऊन केस इचरत व्हती. मारतीमामा आसला की ती नुसती केसाचा बुचडा बांधायची. पन त्यो नसला की फनीनं केसं इचरायची. आई बी तिला लई नावं ठेवायची.

'आपून गरीब मानसं, कुठंबी ऱ्हानारी. ही बाय आपल्या भावाच्या जिवाला तात लावंल तवा ऱ्हाईल ' आसं काय काय म्हनायची...

ती केसं इचरतीया हे लांबनंच मारतीमामानं बघितलं आन् गडचानं कुऱ्यानं झेप घालावी तशी झेप घेतली आन् पारूमामीला खाली पाडून तो तिच्या उरावर बसला. हातातल्या आरशानं तिचं त्वांड हानायला लागला. आरशाच्या फुटक्या काचा लागून तिच्या गालाला रक्ताचा लोट लागला. ती बोंबलत व्हती. आई, बा आणि सारं मानसं मदी पडली. तिला सोडवलं. तिला लई लागलं व्हतं. नवराबाय-कोची भांडणं. कोन काय करणार? तो म्हणत होता, 'लई वाणी–उमदीन झालीस व्हय?' आन् आसंच काय काय. त्यो तिला आंगूळ करू देत नव्हता, केस इचरू देत नव्हता. 'घानीत राहूचाचं, घानीवानी ऱ्हावा. लई तालीवारावानी करू नगं. रस्त्या-वरची मानसं आपून, कुणीबी येत्यात, जात्यात. कुनाचं ध्यानं गेलं तर?'

त्यांची दोघांची सारकी भांडणं चालायची. मामा काय मामीला नजरंआड करायचा ऱ्हाय. ती धुवायला गेली तर हयो मागं हायच. फोकाला जाताना संगं. इकायला जाताना संगं. एवढंच काय, ती लगवीला गेली आन् जर येळंवर आली ऱ्हाय, तर 'हिच्या आईची गांड. ही कुठं जाऊन बसली?' म्हनत लगीच जायाचा. आई त्याला म्हनायची,

'ती हागायला गेली की तू पानी घिऊन जात जा. आरं, ती कलीन हाय, लाजआबरूची हाय. एवढं का तिला सोनं लागलं हाय ते खुडून खातील?' आन् सारी हासायची. मामा जरा नरमायचा. पण जरा कुठं गेली की गडी लगेच कावरा-बावरा.

आन् एका रातीला पारूमामीच्या आंगावर आभाळ कोसळून पडलं. आमी सारंजण जेवून झोपलू होतो. निमी रात झाली आसंल. काळूक पडल्यालं व्हता. आन पारूमामी आरडत, वरडत, बोंबलत पळत येत होती. सारी बिराडं जागी झाली. 'आरं उठा, उठा-' 'म्हनत सारी भराभरा उठलो. एकच कालवा झाला. काय झालं, काय झालं? एकच गलका. पारूमामीचं त्वांड धडप्यानं बांधलेलं व्हतं. ती सांगत-बोलत नव्हती. नुसता जिवाचा आकांत मांडला व्हता. जमिनीवरची माती तोंडात घालीत व्हती, पायाच्या टाचा घाशीत व्हती, डोस्क्याची केसं तोडत व्हती. तोंडात मारून घेत व्हती. साऱ्यास्नी वाटत व्हतं, मारत्यानंच हानलीया वाटतं. पण तो तर नुसता भात करापल्यागत उभा ऱ्हायला हुता.

कुणी तिला शिवत बी न्हवतं. तिला शिवायचं नव्हतं ती आज एकलीच झोपली व्हती. शेजारीच मारती मामा झोपला व्हता. त्याला काय म्हाईत नव्हतं आन् ही बया नुसतीच बोंबलत व्हती. आकीर आई आन् सरीनं तिला धरली आन् आमच्या भाषेतनं इचाराय सुरुवात केली. साऱ्या बिऱ्हाडातल्या बायांनी तिला बाजूला नेली. सारे बापे एका बाजूला बसले. तिला भुतानंच धरलं आसंल असा बाचा कयास हुता. मी आईच्या पदराला धरून बायकांत बसलो हुतो.

लई येळ गेला आन् पारूमामीचं वराडनं संपलं. सुस्कारत–सुस्कारत तिनं सांगितलं. भेदारली व्हतीच, हातापायांचं कापरं झालं व्हतं. ती म्हटली,

'मी पोत्यावर झोपली हुती. झोप चांगली लागली हुती. आन् काळानं डाव साधला...'

आन् पुन्हा रडायला लागली. बाया पुन्हा खोदून इचारायच्या. ती पुन्हा म्हटली, 'म्या बाहेरची हाय म्हटलं, तरी सोडलं न्हाय...' पुन्हा रडू लागली.

'दोगंचौगं हुतं. कोन व्हतं... म्हाईत न्हाय. झोपंतच मला उचाललं आसंल. मी जागी झाली तवा माझं त्वांड बांधल्यालं व्हतं आन् मला दोगाचौघांनी उचलून चालवलं व्हतं.' आन् पुन्हा रडायला लागली. त्या तिकडं अंधारात बोट दाखवून ती सांगत व्हती...

'लई जुलूम झालं. आरं बाबा, आता काय करू?' म्हणून रडाय लागायची.

'लई कळा सोसल्या... लांडग्यांनी सोडली न्हाय. देहयाचं फुटाणं झालं.' आसं काय काय म्हणायची आन् भवतल–भवतलून रडायची.

आता साऱ्यास्नी समाजलं हुतं. तिला बायांनी धरून ठेवली होती. ती सारखी म्हणत होती, 'मला मरू दे. आता देहयाला ठिवाचं न्हाय,' आन् उठून पळायची. बाया धरायच्या. तिला गडी कोन व्हतं, माहीत नव्हतं, सांगता येत नव्हतं.

आईनं येऊन बाला आन् मारतीमामाला सांगितलं, तसा मारतीमामा गडाबडा लोळायला लागला. 'रांडंच्या गांडीनं तमाशा केला. मला वाटलंच व्होतं... ही शिंदळ नांदायची न्हाय. आपलं नाक कापलं आन् रडाय लागली.' त्याला बाप्यांनी धरला, समजावला. दोगांनी आक्की रात जागावली.

मामाचा लई दिसाचा संशय होता. 'देकनी बाईल नव्हं आपली' म्हणून फडाफडा तोंडात मारून घेत हुता.

कैकाडचाच्या बिराडावर लई कालवा झालाय. मानसं जमाय लागली. फटफटीत झालं होतं.

'आता हितं राहाण्यात सानपन न्हाय' बा म्हनत होता. 'हयास्नी सोडून चालायचं न्हाय. काय करावं?'

सकाळ झाली, तसं मारतीमामा मामीकड बघून म्हनला, 'आता आपल्या वाटा वायल्या झाल्या. तुजं त्वांड कुठंबी काळं कर. माजा संबंध न्हाय. सारी आबरू नाशिवलीस. आता देसूधडीला लागलूयाच, तू बी लाग ' म्हनत बिराड बांदाय सुरुवात केली.

पारूमामी उठून निगाली. आता काय करतीया हे बगायला आई, बा मागंमागं गेलीत. आमी बिराडावर बसलो. सारी मोठी मानसं दोगांच्या मागं गेली होती. मामानं पारूमामीला न्हेली न्हाय. 'भोग रांडं कर्माचा भोग ' म्हनत गाडीनं निगून गेला.

पारूमामी येडचावानी धापाच गावं आमच्या बिराडासंगं फिरली. जेवायची

न्हाय, खायाची न्हाय. जवा बगावं तवा रडायची. आई, बा तिच्यासंगं फटकून वागायचे. एका रातीला ती निगून गेली. कुठं गेली कुनाला ठावं. चुकल्याचुकल्यासारखं वाटत हुतं. आई तिला निसूक शिव्या दियाची. काय झालंय ते समजत नव्हतं, पन काय तरी वाईट झालं येवढंच समाजलं.

म्होरं बऱ्याच दिसांनी काळूबायच्या जत्रंत पारूमामीचा बा आईला म्हनत व्हता,

'ती माझ्याकडं आली व्हती. पन तिला याड लागलं व्हतं. आणि त्यातच ती खितपून खितपून मेली. मरतानासुद्धा सारकं बडाबडा करत होती. नुसत्या शिव्यांचा तडाका लावायची. म्हनायची- मी पंचात मारत्याला वडनार हाय.'

मारतीमामानं दुसरं लगीन केलं व्हतं. पण आई म्हनायची, 'भिकारानं गरतीवानी न्हावं. तमाशातल्या नाचनारनीवानी नट्टापट्टा करून वागू न्हाय. न्हाईतर पारीवानी व्हतं.'

आन् खरंच आईनं डोक्याला कदी फनी लावल्याचं मी पहात नव्हतो.

## शारदी कलावंतीण

एक कोट घातलेला म्हातारा गुनगुनत बसला होता. डोंबारी जातीचा. लहान पोरीला डोक्यावर उभं करून काहीबाही सांगत होता.

बानं खुशाली इचारली. सारं बेस हाय म्हणाला. 'बापू, शारदी मेली रं' म्हणून डोळ्याला धारा लागलेल्या. त्याला काय बोलाय सुचंना. बानंच इचारलं,

'आरं शंकरदादा, काय झालं ते सांगतुयास का रडायलाच लागलास? काय, झालं काय सारदीला?'

म्हाताऱ्यानं डोळं पुसलं. म्हनला 'बापू, पोरगी कशी चवळीच्या शेंगगत वाकत होती. व्हट पिळला असता तर दूध निघालं असतं रं! म्हातारपनात हे वाट्याला आलं. न्हाईतर आज जत्रा कमावली आसती.'

'त्या खोकड्यात ब्रिऱ्हाड हुतं. दिवसभर गाव मागितला. लय नाचली. दोरीवर उड्या मारल्या. केसानं दगूड उचलला. रातीला घरी आलू. शारदीनं दामटं केलं. धाकलीला निजावली. म्या चिलीम वडली आन् कवा झोपलू कळलंच न्हाय. रातीला जागा झालू तर शारदी न्हाय. बापू, रातभर हिंडलो! साऱ्या गावातनं ऊर बडवून घेत हिंडलू, पर शारदी घावली न्हाय. फटफटीत झालं. शारदी वड्याच्या वाळूत घावली. नुसती धुगधुगी ... बापू, सारं आंग रक्तानं माकलं हुतं. तिनं डोळं उघाडलं, पर बोलली न्हाय, सांगितलं न्हाय. काय झालं आसंल, बापू? दोन दिवस ती जगली. पाण्याचा घोट नरड्याखाली गेला न्हाय. बापू, तिनं कसं सोसलं आसंल ...'

## गजरा कैकाडीण

आमची आई सांगायची, 'गजरीचा उंबरा चढायचा न्हाय. येसवा रांड, तिचं त्वांड बगायचं न्हाय.'

गजरा तशी दिसायला बरी. जरा सुटल्याली, उंचीपुरी, सात लेकांची आई. आई म्हनायची, 'नवरा जिता हुता, पन शेनाच्या पोवावानी नुसता बसून न्हायाचा आन् ही रांड गावात वाटत हिंडायची. सात पोरं सात जनांसंगं काढल्याली हायती. त्यांच्यावर वाळीत हाय. जात त्यान्‌ला पंगतीत घेत नाय.'

मला समजत नसायचं, पन आईसंगं इकायला गेलं की वाटंत ती सारं सांगायची गजरीच्या पोरात खेळू नगं म्हणून तिचं सारकं टुमनं असायचं. तिची पोरं आमच्यातलीच पन त्यांचं कुनासंगंच पटायचं न्हाय. सारा कैकाडवाडा एका बगलंला आन् हे घर दुसऱ्या बगलंला. मयतीलासुद्धा कुनी जायाचं न्हाय. गजरीची पोरं तरणीताठी, पण जातीवर हात चोळण्यापलिकडे काय करत नसायची. आईचं वागणं त्यांनापण दिसायचं. पण बा गेल्यापास्नं तिनं साऱ्यान्‌ला ह्यो धंदा करून लहानाचं मोठं केल्यालं.

एकदा रातचा असाच कालवा झाला म्हनून आमी आलो हुतो बाहीर. तर गजरीच्या दाराम्होरं मारामारी चाललेली... गजरी बाहीर निजली हुती. तिच्याजवळ थोरली सून तिच्या पोराला घिऊन निजली हुती. ल्योक गावाला गेला हुता. आन सद्या भाडयानं डाव सादला हुता. सदया उंडगत फिरणारा गावातला पोळ. वरच्या आळीच्या पाटलाचा पोरगा. गजरीकडं सारका येऊन बसायचा. बसता बसता सासू सोडून सूनच डोळ्यात भरली होती. पन सुनेच्या बिचारीच्या धेनातच आलं नव्हतं. ती सासूजवळ झोपली आन् तिला ही खरूज उतली. सद्या तिच्या सासूला सोडून तिच्या हातरुणात घुसला हुता. ती बोंबालली तवा कालवा झाला आन् तिच्या बाकीच्या दिरांनी सदयाला धरून हाणामारी सुरू केली हुती.

मानसं पांगली आन् मिटवामिटवी झाली म्हून झोपायला घरात गेलू तर रातचीच बोंबाबोंब पुन्हा झाली. आईनं घरात शिव्या हासडल्या. पन तसाच बाहीर आलो तर आमच्या भाषेतनं सदयाचा भाव आपल्या आईला शिव्या देत व्हता. एकजन इंगळावाणी डोळं करून आईला हानत हुता. आई बोंब मारीत हुती. आन् ल्याक 'तुझा जीवच घेतो, म्हंजी ही खरूज बरी हुईल.' म्हणत आईवर तुटून पडत होते. सुनाबी हानत हुत्या. बिचारी गजरी आता जगत न्हाय- मी मनोमन या लोकान्‌ला शिव्या देत हुतो. आन् हे ल्याक आईला मोठमोठयानं शिव्या देत होते. आखिर तर मदल्या लेकानं तिचं केस धरून फरफटत भाईर आनली आन ह्यो मोठा धोंडा तिच्या टाळक्यात हाणणार येवढयात त्याच्या पाठच्यानं त्याला ढकलला. म्हन न्योम चुकला. न्हाय तर... न्हायतर गजरी रामराम म्हनाय लागली असती.

'तुला गाव पुरंना! आई हास का कसाबीन? आता आमाला पैदा झालू तवाच का न्हायी नरडं दाबून जीव घेतलास? निदान ही आबरु तरी अशी येशीवर टांगली नसती. तुझ्या पायी मानसातनं उठलो...'

गजरी हामसून हामसून रडत हुती. पण तिच्याकडं कुनाचंच लक्ष नव्हतं.

## कैकाडी बाई

कैकाडयाच्या उफाडयाच्या पोरीनं वडारी ठेवला होता, ती नवऱ्याकडं नांदत नव्हती. आतापातुर चारपाच वेळा पोटचं पाडलं होतं. आन् आता ती गरवार होती– (असं सगळं तिचा नवरा सांगत होता) नवरा जातीला सांगत होता.

'ही शिंदळ हाय... हे माझ्या पोटचं न्हाय. हिला मी सोडतुया. काडीमोड दया!'

झालं. साक्षीपुरावे, कौ, जामीन– सारं त्याच गतीनं झालं. दोगांच्याकडनं तिदळकी (कोर्ट फी) काढली होतीच. दारूचं फुगं फुटलं होतं. बाईला न्याय दयायचा का बाबाला न्याय दयायचा? एकजण म्हणाला, 'लेका, तुझ्या आंगात पाणी न्हाय, मग म्हस दुसऱ्याच्या पाणवठयावर पाणी प्याली तर का झालं रं? दुसरी तुझ्याजवळ नांदल कशी?'

आसं बोलल्यावर नागानं डंक मारावा तसं त्यो उसासला आन त्याला म्हणला' 'आरं, तुझी बाईल इथं पंचात आन. तिला इथंच गाबन करतो का न्हाय ते बग.'

झालं. दोगांची छन्नाछन्नी झाली. आता मारामारी होणार म्हणून सारी जमात पळाली. पोरंसोरं चेंगारली. आयाबाया पळाल्या. आन् पंचांनी मिटवामिटवी केली. पंचांनी त्या बाईला बाहीर टाकली. तिच्या नवऱ्याला काडीमोड दिली, घरभरणी घेतली आन् दुसरं लगीन करायला परवानगी दिली. ती बाई सारकं रडत होती. तिच्या डोळयाचं पाणी पुराच्या लोटावानी वहात होतं. सारी तिच्याकडे बगून हासत होती. आन ती गाबन गाय पोराच्या बापाचा पत्ता शोधायला रानोमाळ भटकत होती. म्होरं तिच्या डोक्यावर परिणाम झाला. नवऱ्यानं सारं बनवाबनवीनं पंचानला दारू पाजून घडवलं होतं. त्यानंच वडाराची बाई रांड ठेवली होती. त्या बाईला जे वेड लागलं ते कायमचं. ती बाळंत झाली, पण पोराचं काय झालं कुणास ठावं?

## बाई आणि पंच

एकांदी बाई शिंदळ निगाली तर त्या घरालाबी वाळीत असायचं. वाळीत विटी फिरली की ते गाव, ते घर सोडायचं. आशी कैक जनांनी गावं सोडल्याली असायची. सांचं, कडुसं पडायच्या आत बाईनं घरी आलं पायजे, न्हायतर नवरा तिला घरात घियाचा न्हाय. तिनं बाकडं जायाचं. तिला कुनी आसरा दियाचा न्हाय. बा घिऊन पंचात यायचा. पंचांनी बांदल ती शिक्षा भोगायची. आन् पुना तिनं

नवऱ्यासंगं राहयाचं. एक बाय चार चार लग्नं करायची. एका बाईसंगं लगीन लागल्यालं. तिला सोडली म्हनायची आन् पुन्हा नांदवायची आसं बी व्हायचं.

## बर्गेच्या पोरीचं लग्न

थोरल्या बर्ग्याच्या पोरीचं लगीन.. साऱ्या गावाला आवतन. पोरीची साखरचिर्डी झाली तीच गावजेवान घालून. सारा गाव लाडवाचं जेवण जेवलेला. नुसता कासार बांगड्या भरत व्हता दोन दीस. म्हारामांगापासनं मुसलमानापातुर साऱ्यांच्या बायापोरीन्ला साखरपुड्याला बांगड्या भरल्याल्या...ईवाईबी तसाच तोलामोलाचा होता...लई सुखी घरात पोरगी जाणार म्हणं सारा गाव आनंदात होता. १०१ गाड्या वराड निघालं होतं. तरण्या बाया ज्या गाडीत बसलेल्या त्या गाडीवानान्ला लई चेव यायचा. आपली गाडी म्होरं गेली पायजे म्हणून परतेक जण बैलाची शेपटी दामटायचा...

ढोल वडवून हाताचं बावकं दुकून आलं होतं तरी हाळदीच्या बाया काय संपत नव्हत्या...नवरीची हळद जानवसघरी लागली होती...

नवऱ्याकडच्या, नवरीकडच्या तरण्या पोरापोरींची चेष्टामस्करी चालली होती ...नवरानवरीचा फोटो काढायची इच्छा (नवरदेवाच्या) दोस्तांनी सांगितली असावी. नवऱ्याचा भाऊ नवरीच्या भावाला म्हणाला, 'बर्गे, नवरदेव फोटो काढायचा म्हणतुया. जरा नवरी मुलगी झोपाळ्यावर बसवा. झोपाळ्यावर बसून फोटो काढायचाय.'

वर्गे बगतच राहिला. त्यो म्हणाला, 'पावणं, अहो लगीन अजून लागल्यालं न्हाय, तंवरच फोटूचं काय घिऊन बसलाय? लगीन लागू दे, मग पायजे तेवढं फुटू काढा म्हणावं!'...'जावाय, आपल्यात लगीन लागल्याबिगर नवरा नवरी एकत्र येत न्हाईत. तवा फुटू लग्न लागल्यावर काढा. ...पर आता हट्ट धरून बसू नका!'...

नवरदेवाच्या बाचा शांत स्वभाव, पर भडकून त्योबी, 'ह्यांच्या आईला घोडा लावला! आसल्या चालीची असत्याल हे माहीत नव्हतं.... फुटू काढू दिला तर लगीन लागंल, न्हाई तर जा म्हणावं आई घालीत मागारी. अशा छप्पन रांडा जमा करून आणीन म्हणावं!'...म्हणू लागला.

नवरीच्या चुलतभावानं रागरंग बघितलं., नवरीला गाडीत घातली आन् गाडी वाऱ्यागत सांगवीकडं धुमाट पळाली...बगता बगता बायामान्सांना गाड्यांत घालून गाड्या गेलेल्या. लगनाचं इगीन झालं होतं. आता पोरीचं काय करायचं? बर्ग्याम्होरं मोठं कोडं पडलं होतं. पैका खूप होता, पण आता पैक्याचा उपेग काय होता? पांढऱ्या कापडावर डाग पडावा तसा पोरीच्या काळजावर डाग पडलेला... तिनं जेवणखान टाकलं होतं. पोरगी खचून गेली होती...आता पोरीला दुसरा घरबा मिळणंबी सोपं नव्हतं. लगीन लागलं न्हाय हे खरं, पण हाळद तर लागली

होतीच...दिवस उलटायला लागले...पण रत्ना काही घरातून बाहेर दिसंना. तिनं हातरून धरलेलं. लई जबर घाव बसल्याला...

बर्‍याच्या रत्नाचं लगीन काय जमत नव्हतं. तोळ्यांची आन् नोटांची लई लालूच दाखवली, पण काय उपेग हुईना...पोरगी सुकाय लागली. पांढऱ्या पायाची म्हणून आयाबाया बोलायच्या. भोवल्यावर रंडकी झाली आसती तरी परवाडलं असतं. निदान त्याच्या नावानं दीस काढलं आसतं. पण हे कुमारी रांडवपन कसं होणार, म्हणून बायाबापड्या बोलायच्या. मधीच कवातरी बा सांगायचा, 'पाटलाची रत्ना वरडत उठतीया.' मधीच सांगायचा, 'ती बग त्येंच्याकडं बगून हासतीया. अंगावर कापड ठिवंना झालीया. तिला झटकं येत्यात, पाटील लई खचलाय. पाटलीनबी जेवत न्हाय की पाहिल्यावानी घडाघडा बोलत न्हाय...ह्या पोरीच्या लग्नाच्या भानगडीपास्नं (वाडा) नुसता सुतकात न्हातुया.'

...लगीनसराया यायच्या आन् जायाच्या, पण रत्नाचं लगीन काय जमत नव्हतं...

**शेवटी रत्ना गेली**

'पोरगी लई गुनाची हुती' आई बगता बगता रडाय लागली. तिनं वाढलेलं शिळंपाकं, दिलेल्या मिरच्या आन् गवारी आन् कायबाय सांगत होती. जनू घरचं माणूस गेलं असावं तसा तिचा ऊर भरून आला होता. मलाबी रडायला आलं होतं. आमीबी लांबनं लांबनं, पण तिला खेळताना बगितलं होतंच. 'तिच्याबरबर लगीन कुणीच का केलं न्हाय? आपल्यात तर एकएक बाय कितीबी नवरं करती. एका नवऱ्यानं सोडून दिली तरी ती पुन्हा दुसऱ्या नवऱ्यापास्नं उठून पयल्या नवऱ्याकडं नांदती. हे कसं?'

आई म्हणत होती,

'आपुन बनभिकार. आपल्यात चालतंय, त्यांच्यात चालत न्हाय. बाबा, बाय म्हंजी काचेचं भांडं.'

## कॉलेजातल्या पोरी

मुलंमुली एकत्र बसायची. त्यामुळे लक्ष वर्गातल्या शिकवण्यापेक्षा गोऱ्या गोऱ्या पोरी बघण्यातच अधिक रंगायचं. अशा देखण्या पोरी वर्गात असायच्या, पण आम्ही मात्र चारच काय, पाचपन्नास हात लांब रहायचो. शहरातली मुलंमुली एकमेकांशी इतक्या मोकळेपणानं रहायची की आपण आपलं बघतच रहावं. सिनेमातल्या नटनट्या जशा वागतात, तशीच ही मुलं. आपण दोन्ही ठिकाणी प्रेक्षकच.

## शिंदे मुलगी

आम्ही हायस्कूलला असताना शिंदे नावाच्या एका मित्राकडं आम्हा मित्रांचं जाणंयेणं होतं. शिंदे कुटुंब तसं गरीब. जमीन नावापुरती ...आई विड्या वळण्याचा उद्योग करी...

शिंद्याला दोन उपवर बहिणी होत्या. खरं तर त्या आमच्याहून जरा मोठ्याच, किमान बरोबरीच्या असाव्यात. दोघी लग्नाला आलेल्या आणि हुंड्यापायी नुसता 'बघण्याचा तमाशा' व्हायचा, पण लग्नं काही जमत नव्हती. मुली स्वभावानं, रूपानं चारचौघींसारख्या. पण लग्नाची डाळ काही शिजत नव्हती. त्यातल्याच एकीचं पत्र होतं. नुक्तंच टी. बी. झालेल्या एका मुलाला ह्या मुली दाखवल्या होत्या. मुलीला मुलगा पसंत नव्हता आणि वडिलांच्या हाती पैसा नव्हता. लग्न होत नाही तेव्हा जीव द्यावा आणि गरीब वडिलांना यातून वाचवावं अशा आशयाचं पत्र त्या मुलींनी लिहिलं होतं. पत्र वाचून आम्ही बराच विचार केला. काय करावं समजत नव्हतं. नुसतं 'असं करू नये' म्हणून कोरडा आशीर्वाद देणं बरं दिसत नव्हतं.

अडचणी अनेक होत्या. मुख्य म्हणजे मुलींना जातीतलाच हवा होता आणि जातीतली मुलं हुंड्याशिवाय लग्न करायला राजी होणं शक्य नव्हतं...

तोच दुसरं पत्र त्यांनी अगदी हातघाईवर येऊन लिहिलेलं. एक मुलगा बघायला आला होता. त्यानं प्रश्न काय विचारावा? 'पायथागोरसचा सिद्धांत सांगा.'... पुरुषजात मुलींना बाजारातल्या खाटकानं कोकरू हेरून घ्यावं तसं कसं पारखत होती, हे लिहिलं होतं... चार दिवसांनी पुन्हा एक पत्र आलं. त्यात आम्हाला फलटणला बोलावलं होतं. आम्ही फलटणला गेलो. एका निर्जन जागी संकेतानुसार त्यातली एक मुलगी आली...आम्ही खूप बोललो. बिचारी साऱ्या प्रकारांना विटली होती. तिनं सरळच नारायणाला विचारलं,

'येवढे चांगले विचार तू बोलायचास. तूच का नाही तयार होत?' नारायणनं तिला खूप समजावलं, प्रेम वगैरे सारं सांगितलं, पण ती उठताना म्हणाली, 'तू एकटा कोल्हापूरला गेलास, तर मी जिवंत रहाणार नाही!'

आता मात्र आम्ही चक्रावलो. काय करावं सुचेना. अखेर घरी बोलून सांगतो म्हणालो. तिनं होकार दिला...

नारायणाचे मामा, आई, वडील सर्वांशी बोललो...पण एका जातीतले असूनही मुलींची चाल चांगली नाही इथपासून तें, अगोदर शिकून पायावर उभे रहा इथपर्यंत, आणि चार आकडी हुंडा देतील काय इथपर्यंत सारं ऐकून झालं. मार्ग तर दिसत नव्हता.

अखेर नारायणनं साऱ्या मित्रांना एकत्र केलं. साऱ्या मित्रांनी पाठिंबा दिला. मुलगी घेऊन कोल्हापूरला जावं, तिथंच लग्न करावं आणि मारुती काळोखेनं सर्वांना सांभाळावं, निदान नोकरी लागेपर्यंत मदत करावी, सर्व कोल्हापूरच्या मित्रांनी

काटकसरीनं रहावं, नारायण आणि त्याच्या पत्नीला मदत करावी. नोकरी, लागली की ते स्वतंत्र व्हावेत असं ठरलं आणि आम्ही त्या पोरीला घेऊन ट्रकनं लोणंद गाठलं. लोणंद ते कोल्हापूर रेल्वेने प्रवास केला. मुलगी सज्ञान होती. शाळेच्या मास्तरला खोटंच, मी तिचा भाऊ आहे असं सांगून, दाखला घेतला... मी कोल्हापूरला जाईपर्यंत नारायणनं बाकी सर्व तयारी केली होती... नारायणचं लग्न लागलं. एक प्रचंड क्रांती केल्याचा अनुभव आला.

इकडे फलटणला मुलीच्या आणि नारायणच्या घरच्यांनी गोंधळ घातला होता... इतका चांगला मुलगा बिघडला. आता त्याचा संबंध घरच्यांनी तोडून टाकल्याचं कळवलं. तर मुलीच्या बापानंही तेच केलं होतं... मध्येच एकदा त्याच्या सासूनं येऊन गोंधळ घातला होता. 'माझी पोरगी काढून आणलीस,' म्हणून तिची तक्रार होती. पण पोरीनं तोडीस तोड जबाव दिला आणि तिचं तोंड बंद केलं.

## साखरपुडा मोडलेली मुलगी परत लग्न करते

घराकडनं... असंच एक पत्र आलं. त्यात लिहिलं होतं, 'मी लग्न करीत नाही आणि मावळण मुलगी ठेवू शकत नाही. तेव्हा साखरपुड्याचं लग्न मोडलंय आणि तिचं लग्न लावून देत आहो.'

बरंही वाटत होतं, कारण आता ती मुलगी तरी मार्गाला लागली होती.

## (खटला) गहाण बायको

'माझी बायको धर्म्याकडं चार वर्षं झाली, गहाण ठिवलीया. त्यानं पन्नास-पन्नास रुपये चार येळा दिले. मी चार वर्सात मागारी देतू म्हणालू. आता मी देतूया. पर ह्यो माजी बाईल मागारी दीना झालाय...' सांगनारा मानूस कँ (वकील) होता, पन त्यो सारं आपलं सांगत असल्यागत सांगत हुता. ह्या खटल्यात असंच सांगायचं असतं.

दुसरा कँ सांगत होता, 'जनता जनार्दन पाच पंच तुमी परमीसर हाय. तुमी न्याय कराल त्यो आमी मानून घिऊ. पुन्नाप्पा म्हणतुया ते खरं हाय. त्याला पैका पायजे हुता, त्यानं बाईल ठेवली. सनांग चांगलं हुतं. म्या ठिवून घेतलं. इस्त्यावर दूध ठेवल्यावर त्ये उतू जाईल का न्हाय ते सांगा मंडळी. चार वर्सं जनावार 'येशान' केल्याशिवाय राहील का? म्या त्याला नुसतं खायला घालाय घेतलं नव्हतं. पायात चप्पल बसली, म्या घातली. पर म्या घुणा कंचा केला? चार वर्सं झाली आता, त्याला माज्या पोटचं नानगं पोर हाय. त्यानं पैका दयावा, मी सनांग मागारी देतो. मी का नाकबूल हाय?'

पुन्नाप्पा म्हणत होता,

'मालक परमेसरा, मी इस्वासानं माजी दौलत ह्याच्याजवळ ठिवली. आता का ठिवली, तर मला गरज व्हती. मी गरज्या व्हतो. म्या बाई ठेवली ती कामाला, निजायला न्हवं. आन् ह्यानं एक पोर काढलंय. मला पोर नगं. नुसती बाईल पायजे.'

त्या बाईचा कै म्हणत हुता,

'महाराज, मी मुकं जनावर. हिरवा घास दिसला, खाल्ला, रीतरिवाज कशाला केलाव? ह्यो मला चार वर्सं घाण ठिवून भाड खायाची म्हनतुया. शेजंला दील त्यो बाजंला घील. त्यो का फुकाट खाया घालंल का? त्यात बायांची जात आन् ढोराची जात सारखीच. ह्यानं मला त्याच्या दारात बांधली, ह्योच खाटीक हाय. महाराज, मला आई पांढरीनं न्याय दयावा. मी आता एक पॉर घेऊन ह्याच्या-बरोबर कशी नांदू? आपन परमीसर हाय. आजून झाडाझडती घीऊ नका. मी तुमच्या लिकीसारखी हाय.'

प्रत्येक जण बाजू मांडत होता. प्रत्येकाचं ऐकून झालं. सारा कालवा थांबला होता. पंच उठले, गटागटानं बाजूला जाऊन चर्चा केल्या. कुजबुज चालली हुती. सारे थळावर आले. आपलं म्हननं ऐकल्यावर सांगू लागले. आपल्या आपल्या म्हन-न्याचा आग्रह धरू लागले. सगळ्या पंचांचं ऐकून घेतलं आन् इचार करायला बैठक संपली. पुन्हा सांचं बसायचं ठरलं.

हिकडं बघ्यांचं सारं लक्ष त्या बाईवर होतं. तिच्या कडंला तानं मूल होतं. ते आनंदानं आईच्या थानाला लागलं होतं.

सांच्याला ओक ऐकायला बासंगं गेलो. ते दोन म्हातारे ओकाळे होते. त्यातला जरा कमी म्हातारा व्हता त्यो उठला आन् निकाल सांगितला. 'जितराब ज्याच्या त्याच्या दावनीला बांधलं पाहिजे. पर लुणी पाघाळलंय. येणा झालाय, पाना फुट-लाय, आता पुन्नाप्पाला खन्नी (लग्नाचा खर्च) दयावी. पुन्नाप्पानं याज आन् मुद्दल दोनी पंचानला द्यावं. अशी रीत हाय. जनवार ज्याच्या मागं जाईल त्यानं दुस-ऱ्याची खन्नी दयावी. सुला (मावळखंड) मामाला दयावा. त्यो हिथल्या हिथं. सारा पैका जनवार ज्याच्या दावनीला बांधलंय त्यानं दयावा. बाईची चूक न्हाय. त्ये मुकं जनवार. चालवलं तसं चाललं. पायातली व्हान पायात ठिवावी, पर त्ये पुन्नाप्पाला जमलं न्हाय. धर्मानं रीतीनं केलंय.'

## वेश्या

अंधारातनं एक मध्यम वयाची बाई म्होरं आली. 'ए पोरांनो!' म्हणून हाक मारली. आमी उभं राहिलो. इठल्यानं तिला काय म्हणून इचारलं तसं... पावडर तोंडाला फासून, पान खाऊन तोंड लालभडक झाल्याली बाई म्हणती कसं,

'आरं बोंडूल्यानू, बसाचं का?' आमाला कायच समजंना. मी म्हणालो, 'कुठं?' ती म्हणाली 'या माझ्यासंगं.'

आमी दोगांनी एकमेकाला खुनीवलं आन् काय भानगड हाय ते बगू म्हणून तिच्यामागनं निगालो. चारपाच झोपड्या वल्यांडल्या. 'गटारात पाय पडला तर सारं हातरून नासवाल' म्हणत तिनं कोपीचं दार ढकाललं.

आत रॉकेलची चिमणी ढणढणत होती. खाली पोतं हातारलं होतं, त्याच्यावर चादर टाकली होती. एका कोपऱ्यात चहाचं रिकामं भांडं, मोडका कप आन् च्या गाळायचं फडकं पडलं होतं. आमी दारातच उभं राहिल्यालो, काय करावं समजत नव्हतं. ही बाय काय म्हनती ते नीटसं कळत नव्हतं. आदी इठल्या आत गेला. त्याच्या मागं मी आत गेलो. बाई सफाईनं बोलत होती. ती काय बोलत होती ते समजावं म्हणून मी म्होरं झालो. ती उठली आन् दार लावाय लागली तसं माझ्या काळजानं ठाव सोडला. हयाच्या आईला, ही काहीतरी बिलामत दिसतीया म्हणून उठाय लागलो. इठल्याला चिमटा घेतला, चल म्हणून. तिनं निवांत दार दाबलं आन् इठल्याकडं बगून म्हणाली,

'आरं किती पैसं हायती जवळ, बोलाल का न्हाय? नुसतं बगायचं का बसायचं?'

आता मातर आपल्या आंगात थंडी वाजल्यावाणी व्हायला लागली. इठल्या म्हणाला, 'कश्याला पैसं?' तसं ती म्हणाली, 'फुकटचं बसायचं आसतंया व्हय रे शेमण्या?'

इठल्या काय ऐकंना– मला तर मुतायला आलं होतं. आयला, इथं काय तरी भानगड हाय. इठल्याला मी खुणीवला. तसं तिनं 'ए, आरं बस खाली. पान खा. सिगरेट वड. आसं मूत हातात धरून काय आलंयास?' म्हणत पचकन् थुकली.

मी गप्प झालो. इठल्याकडे बारा आणे होते. माझ्याकडे पैसे नव्हते. ती म्हणाली, 'पाच रुपयं लागतात बसायला आन् बारा आण्यात काय हुतंय?' म्हणत तिनं बारा आणे घेतले. बाई इतक्या सरावानं फाजील बोलत व्हती की इचारायची सोय न्हाय. इठल्याचं खिसं बगितलं आन् मला म्हणाली,

'तुझ्याकडं किती पैसं हायती रं कांड्या?' मी खिशात हात घातल्यावाणी केला. आपल्याकडं पैसं न्हाईत म्हणून उठलो. तशी ती गराजली. 'वींदाड्या, नुसतं फुकटात भाली मिळत न्हाय आन् भाडू आलाय घासायला. ऊठ ऊठ!' म्हणत धावून आली.

मी इतका गोंदळलो होतो की माझं मलाच समजलं नाही. धूम पळत स्टँडवर आलो. इठल्या पाच मिनिटात मागनं चालत आला. मनातनं त्याला शिव्या देत होतो. पण ती बाई काय म्हणत होती ते इठल्याला म्हाईत आसंल म्हणून त्यो येईस्तंवर उभा राहिलो. त्यो आला त्यो हासतच. आयला ही काय भानगड हाय ... हयो रांडच्या हासतुया आन् मला तिनं हुसकावलं. जे काय सांगायचं ते त्यालाच सांगतीया. मनात उत्सुकता होती ...

'आयला, तू इतकं शिकलायास पर तुला आकाल काय आली न्हाय. आरं,

आठ आण्यालासुद्धा भागतंय ... आनखी चार आणे आसत तर मी बसूनच आलो असतो. ... आरं, तू गेलास पळून आन् तिनं मला दाकिवली सरकस! ... आरं, तू भाईर गेल्यावर तिनं लुगडं फेडलं. मला बग म्हनाली. मीं बगितलं आन् झालं. बारा आण्यात एवढीच मजा. रुपया आसता तर पुढचं.'

## चोरटचा बायका

बायका इकायला जायाच्या. जाताना दोगी– चौगींनी जायाचं ... पैसं जवळ आसल्यावाणी दान्याच्या व्यापाऱ्याला चौगीनं चौकडं भाव इचारायचं. घासाघीस करायची आन् माप घ्यायला लागायचं. माप घेताना पिसवीची तोंडं जोडून धरायची. बरीच मापं आलटून पालटून घ्याची. यापारी मोजण्यात गुंगला की एकीनं दुसरी पिसवी लांबवायची आन् मधीच, 'ये बाबा, किती मापं घातलीस ?' म्हनून वरदळीवर यायचं. बाकीच्या दोगी– तिगींनी कालवा करायचा, आमाला तुजं दानंच नगंत म्हणून पिसव्या रिकाम्या करायच्या आन् फुडं जायाचं. ह्याला 'उज्ज काढणं' असं म्हनत्यात. चोरी करायची, पन समजायला न्हाय पायजे. आन जर घावल्या तर कुत्र्यावानी मरस्तंवर मार खायाचा, हातापाया पडायचं.

## नारायण

'लेका मान्या, आपल्याला बायको जरा कोरी मिळायला पायजे आसंल, तर आपून इतरांच्या पोरी बाटीवता कामा नये. बाई म्हंजे काचेचं भांडं....'

कदीकदी वेश्याव्यवसाय करणाऱ्या बायका दिसल्या की म्हणायचा,

'या बायकांनी काय केलं असेल ... मानूसच ना त्या ?' त्याच्या बोलण्याने मनावर खोल संस्कार होत गेले.

... स्त्री आणि खालच्या जातींच्याबद्दल त्याला अतिशय जिव्हाळा.

## पाटलाची मुलगी

बा म्हनला,

'... ह्यो परक्षाला गेला हुता. गावातल्या पाटलाची पोरगी बी परक्षेला हुती. फुटु काडला म्हनत्यात, पर मला समाजलंय त्ये न्यारंच हाय.

त्या पाटलाच्या पोरीसंगं त्यातलाच एक पोरगा हुता. त्याचं आन पोरीचं जमत न्हवतं. आन त्ये तर पॉर 'तिला धरीन' म्हणून बसलं हुतं. पोरगी मीठ घालू देत न्हवती. तवा तिला एकतर निजवीन न्हाय तर उठवीन म्हणून त्ये बसलं हुतं. निजलं तर न्हाय, पन तिला उठवायची तर काटयानं काटा काढावा, म्हंजी आपून आलगत भाईर पडू, म्हनताना माझ्या लेकरावर आळ घेतला की 'कैकाडयाच्या

लक्षानं त्याला सांगितलं की फुटु काढताना म्या तिच्या गळ्यांत हात घातला आसता तर ती माझी बायकू झाली आसती आन् मी तिला धरली आसती.' पोरगी मॉप वापंला आली व्हती. पर सोसंल ते तरी बोलावं.'

## होलार बाई

माझ्या घराच्या बाजूला अशीच एक बाई होती. आठनऊ पोरं. सारी चिल्ली-पिल्ली. गल्लीतनं फिरत असायची. आई सकाळपासून सांजपर्यंत मरणाची कामं करायची आणि कडूसं पडलं की तिचा नवरा झोकांड्या खात यायचा. आला की तोंडाचा तमाशा सुरू व्हायचा. इतक्या विचकट शिव्या द्यायचा की विचारू नका. मध्येच तिच्याबद्दल त्याला शंका यायची. आन एकदा कलागत जुंपली की सारी रात 'ह्याच्या खाली निजलीस आन् तुझ्यावर चढला' अशी भंकस सुरू व्हायची.

एकदा रात्री ८–९ वाजता बाई बोंब मारीत आणि नवऱ्याला शिव्या देत पळत आली आणि माझ्या घरात शिरली ... तिच्या मागं हातात दगडाचं गोटं घेऊन तिचा नवरा आला ... 'गुरुजी, सरीला भाईर काढा, न्हायतर आई झवून टाकीन' अशी शिवीगाळ सुरू झाली. बाई काही बाहेर जाईना. मी तिला विचारलं तर ती रडत सांगत होती, 'गुरुजी, सकाळधरनं कष्ट करून आलीया. माझ्याच रोजाचं दाणं आणल्यात, कोरड्याशाला काय न्हवतं तर खरडा करून पोरान्ला दिला. अन ह्यो किरडीवाला मूत पिऊन आलाय आन तीन रुपये आंगावर टाकल्याती आन् सागुतीच करून घाल म्हन मारायला उठलाया. इतक्या रातची सागुती ह्याच्या आईच्या गांडीत मिळायची व्हय ? आता मी बायमानूस पडली. कुंकवासाठी जिता ठिवतीया. न्हाईतर याचं आंड दाबून जीव घीन.'

आणि तिरमिरीत बाई बाहेर गेली. 'शेजारपाजारची मानसं देवावानी हायती. त्यान्ला मेल्या माझ्यासाठी शिव्या देतुयास व्हय ?' म्हणत पळतच नवरा उभा होता तिकडं गेली आणि काय होतंय समजायच्या आतच तिनं त्याला खाली पाडला अन् त्याच्या उरावर बसली. दोघांची झटापट सुरू झाली ... तिनं राग शान्त होस्तंवर हाणला.

'ये रांड, अगं, नवऱ्याला मारतीस व्हय ?' म्हणत गर्दीतली मंडळी तिला शिव्या द्यायला लागली. आता मात्र तिला लोक मारतील असं वाटलं ... मग पुढं झालो आणि सगळ्यांना ओरडून म्हणालो, 'नवरा बायकोचं भांडण हाय ... आपल्याला काय करायचंय ? ती भांडतील आणि एक होतील ... सारखा बायकोनं मार खायचा, आता जरा नवऱ्यानं खाल्ला तर कुठं बिगडलं?'

अखेर बायाच मदी पडल्या आणि तिला सोडवली. तेव्हापासून तो पीत होता, पण बायकोचा आवाज वाढला की पड खायचा.

# आठवणींचे पक्षी

प्र. ई. सोनकांबळे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## वहीण

मी हमेशा शाळा नसली किंवा संपली की कुठंना कुठं कामावर जात असे अन् कामावर जाण्याचा हेतू हाच असायचा की, मज्या बहिणीवर जो मजा बोजा पडतोय ती थोडाफार कमी पडावा, किंवा तिला निदान वाटावं की माझा भाऊ लगेच आयतं खायला बसत नाही, काही तरी त्याच्या लहानग्या जीवापरमाणं करतोय. मी जरा आक्काला भिऊनच रहायचो, कारण अक्का लई प्रेमळ. पण कधी कधी लईच खवीस व वंगळपणे बोलायची व जे शिव्या किंवा जे शब्द आजच्या नवीन डिक्शनरीत सापडणार नाहीत ते खास ठेवणीचे सनाटून माझ्यासाठी वापरायची व ते ऐकून मला खूप अवघड वाटायचं. 'कशाला इच्या इतं पडलोय गड्या बिनडिकीचं उगीचच?' वाटायचं...पुन्हा कधी तिनं असे खास ठेवणीतले शब्द वापरू नयेत म्हणून खूप मन लावून कुठंना कुठं कामावर जायचो व दिलेला थोडालई मुशारा आणायचो. मुशारा आणल्यानंतर कधी आणल्याला चांगलं म्हणावं म्हणून अक्काला दाखवलं की ती म्हणायची की, 'अरं, खायला लागत नाही का रं दुदग्या? केलाच तर मला काय उशान है? पोटासाठी कुणालाबी काम करावंच लागतंय.' ती सबावानं जरा आरकटच है. अर्थात् प्रेमळ पण तशीच. तिचं बोलणं ऐकून मला वाईट वाटायचं, कारण मला कळायचं नाही. पण मी जसजसा मोठा होऊ लागलो तसतसं मला कळायला लागलं की तिच्यावर दाजी व आत्याचा धाक है म्हणून ती मला बोलतीया. नसता कशाला बोलली असती बिचारी? कारण ती व मी एकाच कुसातले शेवटी.

## दोघी बहिणींचे नवरे

मजे दोन दाजी. एकाचं नाव धोंडिबा व दुसऱ्याचं किशन. धोंडिबा अक्काचा नवरा तर किशन न्हानग्या बाईचा. धोंडिबा चेऱ्याचा तर किशन जगळपूरचे. ते दोघे सक्के मावसभाऊ, कारण तेंच्या माया म्हंजे माझ्या बापाच्या सक्क्या बहिणी, म्हंजे मज्या आता. दोगीबी मज्या बापावून वडील. मी मायबाप मेल्यापासून धोंडिबाच्या इतं न्हात होतो. तो गरीब सबावाचा. राकायचा लोकाचा हुंट पातीनं. लोकांचे पैसे,

हेयची निसती अंगमेहनत व्हायची, व जे किराया लागला, आर्दा मिळायचा तेयला. त्याच्यात काई भागायचंच न्हाई. आक्का निसतं वनवन करायची पसाकुसा मिळंल म्हनूनशीन. दाजी हुंटावर बसून टेलत गैरा द्याचे नी कुटंबी फिरायचे. व किराया लागला काय नि न लागला काय तेयला परवा नव्हती. काम तर करायचाच न्हाई, पण पोरायसंगं जे असंल ते गळागळा गिळायला हजरच न्हाचा. म्हनूनशीन आक्का त्याच्यावर लई चिडायची व शिव्या देयाची. दाजी तसाच निघून जायचा. पण कधी कधी असं व्हायचं की त्याची माय, म्हंजे मजी आत, जे लावून देयाची व म्हणायची 'अरं धोंड्या, तुला सकीनं काय काय बोलली रं- तुझा खाना खराब व्हवू दे. त्याला संसार करता येत न्हाई, मग लेकरं कशाला हळजात्रं निसपुरी भाड्यानं, गोसायानं?'

मग दाजी लई मायचं ऐकून चिडायचा व मज्या अक्काला जे बेहद मारायचा ते कधीकधी तिचं डोस्कं फुटायचं व रगत भळ्ळ येयाचं भाईर. भईन 'मेलो मेलो बाप रे' म्हनीत शिव्या देत खाली बसायची. तरी माय लावून देयाचीच व दाजी लगावायचाच...

## आक्काचे कष्ट

बिचारी आक्काच जरा धडपड करायची. लेकरंबाळं हायत म्हणून कोणाचं शेन काडायची, तर कुणाच्या इतं लाकडं आणून टाकायची, तर कुणाच्या इतं गवत आणून टाकायची. मी बी संगं न्हायचो. मला कदीकदी नगं म्हणावं वाटायचं. पण आक्का शिव्या देईल वाटायचं, म्हणूनशीन तसंच चुंबीत जायचो कुटंबी, जितं आक्का न्हेईल तितं.

## आक्कानं भावाला काम लावलं

सगळे म्हणू लागले, 'आगं सकू, ह्या तुज्या भावाला शाळाबिळाला जाऊ नको म्हण. ठिव त्याला नोकर कुठंतरी.' भईन म्हणायची, 'जी माय, जरा न्हनगा हाय जी जीव त्याचा.' लोक म्हणायचे,' 'आगं, तसं पोमाळून ठिवू नको त्याला. चांगला बारा-तेरा वर्षाचा हाय. त्याला काय झालंय दुदग्याला?' मला बाया म्हणायच्या, 'अरं परल्या, न्हातूस का रं नौकर किसंडा पाटलाच्या इतं नसता आप्पा मोन्यांच्या इतं?' मी गप्पच बसायचो. भइनीला जरा बरं वाटायचं, कारण पैसे मिळतील व त्याचं पोटबी भाहीर पडंल म्हणून.

मग ठिवलं आक्कानं नौकर मला...सगळ्यांना वाटलं की आता सकीचं बरं झालं. एक तर पोराचं पोट भाईर पडंल व दिसरं तर वरीस सहा म्हईन्याचे पैसे उचलून सकीला घराचं काही तरी बघता येतंय.

## आक्का

भईनीचं तसं मन नव्हतं बिचारीचं, पण तिच्या घरची राखरांगोळी झाली

व्हती व ते बी भईनीच्या कोणी निगण्यानं. म्हणून लोक तिला चिडवायचे. म्हणून आक्का मला म्हणायची, 'अरं बापू, नवकरी जरा चांगलं मन लावून कर तू बावा. व्हईल जाळभाज घराची.'

मला वाटायचे, मजेच जर मायबाप असते तर तेयनी बाईचं बाळातपण केलं असतं व आक्काला अशी पाळी आली नसती.

## मृतमांस खाणे व आक्का

मला आक्का बकळ म्हणायची, 'अरं खा रं, जरा घे पोट भरून.' .पण मी हातभर दूरच रहायचो. दिलेली आर्दी चतकोर रोटी व कांदाफिदा खावून टाकायचो एक तर मज्यासाठी खास काई करायची नाही आक्का. एक तर नसायचं काही व दुसरं तर असं नाही केलं तर कंटाळून, आज ना उदया, मी करीन सुरू खायला वाटायचं तिला. पण मी खाल्लंच नाही...तसं म्हंजे मी जरी खात नसलो तरी अशानं तशा सुरुपात खायचो म्हणाना. कारण अक्काचे हात कितीही धिवलेले असले तर रगटयानं पुसले तरी कुठं तरी नकावर तेलकट चोपडंच रहायचं. तिच्या हातची रोटी खावूनी वाटायचं, पण नाईलाज...मी हमेशा रोटी नसली की चिंचोके भाजून कडमकडम खायाचो तर कदीकदी भिजवून खायाचो. असं चालायचं माझं नि माझ्या आक्काच्या घरचं. ती जरी शिवीगाळ देयाची, पण कदीकदी जवळ बी करायची. बिचारीला खूप वाईट वाटायचं. एक तर सागोती खाऊन पोट भरून घेत नाही म्हणून व दुसरं तर काही करून देयाला नाही म्हणून. ती खूप म्हणायची, 'आरं बापू, चिचोक्यानं पोट भरत नाही. खा रं. आज जरा लई है म्हणून सुके खांड केल्यात.'

आक्काला तसं चाण्या करून ठेवायची लई हौस. लोटकंचटकं वाळवून भरून ठिवायची व कसारबिसार आली की तोंड वंगळ पडतंय म्हणून भाजून खायाची. लोकं बी कदीमदी मागायचे, पण आक्का तशी देयाचीच नाही. कदी तर मुस्कीलीनं देयाची, ते बी जरा जवळच्या माणसाला. सगळयांना वाटायचं की सकी जरा लावून ठिवतीया. 'लई हुनेरी है सकी' काही काही वडीलधाऱ्या बायका म्हणायच्या.

हे सगळं बघून जगळपूरचा मामा लई सकू सकू करायचा...जरा काही खावं वाटलं की चेऱ्याच्या सकूची आठवण येतीया असं पोतराजमामा म्हणायचा.

## जोहार

एक व्हती बाई जरा आरदकांडी. तिचं नाव शावूबाई. ती म्हणायची की, 'जोरात म्हण भाडया, काय खालास का नाही? आमचे पयलंचे महार व्हते तर ते झ्यार येवढया जोरात टाकीत की सुताराच्या माळाला घुमे. मग आता काय झालंय रे तुला दुदग्या? चांगला आता जरा जेवान व्हयालाईच थोडा थोडा. मग म्हण पुना.' मी म्हणायचो, 'झ्यार मायबाप! रोटी वाडाजी.' 'जी लांबून घेत जा जरा.

लहान हँस जरा, जमेन पुडंपुडं' अशी ती बिचारी म्हणायची.

## शेतावरल्या बाया

बाया मातर लई खराब. 'जेवण वाढा ह्याला परलू महाराजाला' असं गडी सांगायचे, पण त्या देयाच्याच नाहीत. दिल्या तरी थोडंसं टाकायच्या. अंधारात कदी कदी दिसायचं नाही. कदी पत्रावळीत तर कदी मातीवर खाली पडायचं. पण मी घेयाचो व खाऊन घेयाचो, नाईलाज म्हणून.

## कुंभारीन

आली लक्ष्मीबाई. मी तिला मोठी बाई म्हणायचो, कारण व्हत्या तिच्यावरून लहान जावा. ती आली व लगेच्यालगे कडंकडनं चिकुल लागली घेयाला. मी भानात नव्हतो. तिचा हात तुडवला गेला. खरोखरच अजाणपणे- बाई गप्पच बसली व बसायचा प्रयत्न करू लागली. झालं काय, आली तितं धाकटी बाई...नाव तिचं पुष्पाबाई. म्हणाली, 'प्रल्हाद लागला, प्रल्हाद लागला.' मोठी बाई म्हणाली, 'आग नको म्हणून तसं. वनवासी आहे बिचारं.' ती म्हणाली, 'मलाच दिसलं नाही.' कारण ती व्हती एका डोळयानं आंधळी, फूल पडलेली. तरी काही केल्या पुष्पाबाई गप बसेना. ती फारच चपळ होती. तिनं तोंडाचा पट्टा सुरू केला. तिथल्या छोटयाशा भिंतीवरून मी उडी जे मारली पुन्हा बराच वेळ तितं आलोच नाही. लक्ष्मीबाई पाठीमागच्या आडावर आंघोळ करून आली पाणी भरण्याला. तिनं पाहिलं मला व बोलावलं, पण मी लाजतच व्हतो...

लक्ष्मीबाईकडे काहीच गुन्हा नव्हता. कारण ती मला वोटीत आणून कदी हुरडा तर कदी शेंगा देत असे व दुसऱ्या जावा नसल्या म्हणजे भरपूर जेवायला देई. कारण तिला माझी कीव येयाची. कारण ती आंधळी एका डोळयानं व तिचा भाऊ...व्हता माझ्या वर्गात.

## वरटयावरची बाई

एका वरटयाच्या घरी सात धानाची भाकरी करून भुरटा आल्याली रोटी माझ्या दुरडीत टाकली एका बाईनं. तिचा मनसुबा की तिच्या घरची कसारबिसार सगळी मज्यावर जावी. पण मी आलो घरी, तर आत्यानं वगला तो तुकडा. ती म्हणाली, 'काय रं बाबा, कुणं दिला हा कुटका?' मी सांगितलाच नाही. पण आत म्हातारी सांग म्हणाली व म्हणाली की, मज्या भावाचं लेकरू किडुकमिडुक येथे राहायलंय ते लोकांना बघवत नाही. मी सांगितलो तर म्हातारीस वाईट वाटलं. तिनं गावभर डांगोरा दिला. मी पुना एक बार त्या गल्लीत रोटी मागायला गेलो.

तर ती वरटयाची बाई चवताळून मज्यावर आली व म्हणाली की, 'परदिशाला असेच गुण असतात. का रं, तू रोटीला येतूस की माझी बदनामी करायला येतूस?' मी घाबरुन गेलो, कारण ती बाई मोटी लट होती व मी कितीही केलो तर लहान व महाराचा पोरगा, तोही पोरगा... पण ती बाई म्हणाली, 'ये की रं बेटा. मज्या सजना. तुझे असे गुण. खबरदार येशील तर मज्या दारावर मागून.'

## एक म्हातारी व सूनबाई

मला रस्त्यावरूनच एका म्हातारीनं पाहिलं. ती व्हती मराठयाची. तिचं नाव गंगाबाई नि होता तिचा कान फुटका नि थोडीशी गेंगानीही पण व्हती ती...

म्हातारीनं मला सांगितलं की, 'अरं आमच्या वालात कुत्रं मरून पडलंय. जरा काढून तर टाक रं. देईन तुला अर्दी–चतकोर भाकर ...' त्या म्हातारीनं म्हनलं, 'अरं, ही घे दोरी नि बांध गच्च शेपटाला नि घेऊन जा ओढीत.' तसा केलो पण त्याचे सालवे–सीलवे निघत होते... मी त्या कुपाटीला टाकणार तर तितं व्हत्या पांदणीवर परसाकडल्या बाया. त्या म्हणाल्या, 'जरा दूर टाक रं. नसता वाटंवर जाता-येता नुसता वास घान दरवळंल.' मी थोडं पुढे गेलो व लवणाच्या कोपऱ्यात टाकलो तो कुत्रा.... म्हातारीनं हातावर पाणी घातलं पण, वास यायचा तो येतच व्हता.... तर तितक्यात तिची सून आली व म्हणाली, 'आता लई नवसाचा झालाई रं.' एवढं म्हणून तो घरातच गेली. पुन्हा नाही पाहिलं मर्दिनीनं. मला आशा वाटत होती की घरात गेली बाई आणील काई. पण झालं काय ते दुसरंच. म्हातारीनं मोप बोललं इतं. पण तिचा हातच चालंना व जबानही व्हईना देगं म्हणून म्हणायची. मी तसाच उभा राहचलो तर ती सून आली व म्हणाली 'जा की रं आता.' मी म्हातारीकडंच लक्ष देत व्हतो. मी थोडा थांबलो व म्हणालो, 'गंगामाईनं मला बोलणं केलंय की आर्दी–चतकोर देतीय म्हणून.' ती सून डोळे मोडीत, कपाळाला आटयागाटया पाडीतच बुटबुटत गेली मध्ये व आणली एका चिवटीमदली अर्दी भाकर, जी की आमच्या गरीबाच्या चतकोरी येवढीसुद्धा नसंल व तिच्यावर आवघे मोचकेच भेंडर. मला म्हणाली, 'बलुतं घेतात मांग लेकाचे व भाकरही मागतात. निग जा.' ती बाई गावातल्या गावात दिली व्हती बरं का.

# मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे

माधव कोंडविलकर

## आई

'पुतन्याचा त्यास काय सांगताव् ? ता तुमचा लाडका. खाय्ल तेव्डा थोडा आनि हगंल तेवढं मॉप ! म्हनू आता बाय्कोस घेव्न बसलाय– फुकटची मिळाली ना ? आता घ्या नोटाच्या नोटा– कोऱ्या कर्करीत !' आई पुतण्याच्या रागाने बावांना म्हणाली.

'तूज मदी बोलास कुनी सांगतलान् ? त्येचा नाव काडूस नाय की हिचा कालीज जल्ला !'

'आता इतकी वर्सां मुंबै कर्तोय– पन इकड्ची काय आट्वन हाय काय ? तवा मी म्हनत व्हता, 'आदी लगन करुच्या भानगडीत पडा नुका.' पन माजा कोन आय्कताय ?'

'पन मी म्हंता, नाय द्येलान् पैसा म्हनू काय त्येच्यावर रुसाचा हाय ? मुंबाबाय त्येचं डोलं उग्डील तवा उग्डील. ती हाय ना थंय बसलेली ! तीस काय डोलं नाय् हाय्त ?' बाबा म्हणाले.

'मग ह्येचेच कमाय्स कसं भांडताव ? त्येचे कसं नाय भांडत ? ता तुमचा लाडका !'

'व्हय– ता माजा लाडका- हा, बोला काय वोलताय, रांडू !' बाबा आईला रागाने म्हणाले.

आता दोघांचं भांडण होईल म्हणून मी भीतभीत आईला म्हंटलं, 'अगे, तू तरी गप्प बस, उगीच भांडण कशास ?'

'येव्डी वर्सां पुतन्या कमाय कर्तोय, पन इकडं कदी काय द्येलान् नाय आनि तुज्या पगारास मातर सग्लं भांड्तात. येवडा पगार घेतो, पन घरास काय द्येत नाय– आजून घरचा परपन काय कलत नाय ! न्हेमीची आप्ली रसगस हाय् !' आई बाबांना उद्देशून म्हणाली.

'व्हय– मी रसगस कर्ता ! फुटतील तुजं डोलं ते !'

'तुजंच फुटंनात– येवडा म्हातारा झाला तरी आजून माज्या पाटीवर ह्येचा जाच हाय ! लगन झाल्या येलंपासून ह्येनं माज् कदी सुख घेलान् नाय. खय माज्याच नसिबात व्हता ता ! ह्या घरात पडल्यापासून असा मी दुक् काड्ताय. असा दुक आताच्या सुना काडू घेत– घटकंत घरास आग लावून पल्तील ! मी म्हनू ह्या घरात दिवस काड्लं. रांडा नंदा व्हत्या. त्येंच्या नावानं रडरड रडला. हा काय हल्का नाय हाय ! नंदा सांगत तसा वागे आनि माज् मार मार मारी !' आई डोळ्यांना पदर लावीत म्हणाली ... आईचे आणि बाबांचे भांडण झाले नाही असा एक दिवससुद्धा गेला नसेल.

मी आईला म्हंटलं, 'आये, आता झोप. उदया लवकर उटास हवा. मला शाळेत हजर व्हायचं आहे.'

'तू सकाली खाऊन काय जासील ?' आईनं विचारलं.

'सकाळीच काय खाणार ? थोडी भाकरी दे. तिकडे खाईन.'

'पन घवाचा पीट नाय हाय ! नाचन्याची भाजू ? खासील ?'

'चालेल कसलीही !' मी म्हटलं.

घरी आल्यावर अंग ठणकायला लागलं. सान्या शरीरातली शक्तीच नाहीशी झाली. आईनं अंगाला तेल लावलं. मग गरम गरम पाण्यानं आंघोळ केली, तेव्हा जरा बरं वाटलं. आई म्हणाली, 'गावात बदली झाली खरी, पन तूज ह्या जाना-येना झेप्ता कसा ? तुजा जीव आदी सुक्वार ! येवडा लाम्च्या लाम सडा, चडा-उत्रायच्या दोन घाट्या. तूज ह्या झेपनार कसा ? माज् अगदी भरान पड्लीय– पूर्वी लाम व्हतास खरा– पन माज् ही काल्जी न्हौती.' आईला माझी काळजी लागलीय ... शिवाय आईला रोज त्रास. तिला पहाटे उठून जेवण करावं लागतं– सकाळी सहाला डबा भरावा लागतो.

डब्यात भाकरी उरलेली पाहून आई म्हणाली, 'बाबू, भाक्री का खाल्ली नायस ?'

'खूप कडक झाली होती–'

'नवं दानं तं– चिवट झाली असंल' असं म्हणत ती बाबांना म्हणाली, 'त्येच्या पुर्ते थोडं घव तरी आना. ता काय दान्या– कुंड्याची भाक्री खातोय ?'

झोपताना आई म्हणाली,

'बावू, आता तरी लग्नाचा इचार कर. असा तरास किती दिवस काडसील ? येकदा लगन झालं की माज पन मंग काल्जी नाय. मग थय कोनाची तरी जागा

घेवन् बिराड करून न्हासील.'

जरा थांबून आई पुढे म्हणाली, 'माज् जेव्डी तेव्डी मान्सा इचारतात की 'चांबारनी, झिलाचा लगीन कदी कर्तस ?' पन उत्तर काय द्येव्चा ता माज् कलत नाय– मी आप्ला त्यास्नी समजावता, 'त्येचा अब्यास हाय– ता पुरा झाला की करील' ... बाबा, आता यंदा तरी मनावर घे' आई म्हणाली.

'बघू गे. लगन करायचं म्हणजे काय सोपी गोष्ट आहे ?' मी माझा नेहमीचा प्रश्न ढालीसारखा पुढे केला.

'बावा, असा म्हनान्, मग कदीच होव्चा नाय. करजपान काडूस हवा– त्या-सिवाय लगन व्हता ?'

### आई– वारलेल्या मुलीची आठवण

आई म्हणाली, 'माजी मरनारीन पन याच सालंत व्हती– माज्या बाय्चा डोका लय चांग्ला व्हता. मास्तर म्हनत, 'चांबारनी, तुजी लेक लय हुशार हाय– सग्ल्या सालंत तिचा पैला नंबर हाय !' आई एकाएकी कष्टी होत पुढे सांगू लागली, 'बाय माजी धडा वाचूस लागली की धडाधडा वाचायची. सालंतना आली रे आली की पाटीपुस्तक घेऊन अब्यासास बसायची. अब्यासाचा असा तीस कदी कंटाला न्हौता– सारका अब्यास नि अब्यास ! मी म्हनायची 'बाय, इत्का अब्यास करू नुको– लोकांची नजर चांगली हाय काय ?' तरी आप्ला तिचा याक ध्यान ! अब्यास ! तिच्या पाटोपाट तू सालंत जावंस लाग्लास. तू तवा ल्हान ! माज् तुजी भीती वाटं. पन माजी बाय् माज् म्हनं– 'आये, तू घाबरू नुको– बाबूस मी संबा-लून आनीन !' आनि तसी बाय तूज धरून न्हे, धरून आनी. माज् मग धीर वाटं– माजी बाय माज् म्हन्, 'आये, मी मॉप शिकंन– मोटी व्हय्न्–' पन दयेवास ता बगावला नाय– बाय माजी खेलता खेलता त्यास हवीसी झाली.'– असं म्हणून आईनं पदर डोळ्यांना लावला. 'आता आस्ती तर केव्डी झाली आस्ती ! बायस् माज्या तापाचा म्हनू निमित्त झाला आनि बायनं माज्या हातरून धरलान, ती काय पुन्ना वर उट्ली नाय. द्यावधरम खयचं ठेवलानी नाय– अंतू तेलाचा वसेद झाला. इल्यातल्या राम परवडयाचा झाला. गोवलातल्या आन्याचा झाला. पन कशाचा म्हनू गून आला नाय. तवा काय ती आमच्यावर कुणी तरी मेल्यानं कर-नीच करून ठेवलेली. अग्दी वशीदपान्यास गून पडा नये, असी ! तीस ताप येव्स लाग्ला, पाटोपाट तुजा आंग गरम होव्स लाग्ला आनि माजा कालीजच चराकला. बाय्चा खेल जे दिवशी खलास झाला, त्ये दिव्सी तुजा जास्ती झालेला– येनी पुत्न्यास तार केलानी, 'थंय जेव आनि हंय् हात धौस ये'– तसा ता मुंबैसून आला. तूज दोनतीन दिवस कसली ती सूद न्हौती– मग कुनी तरी सांगत्लान् 'आता हय्गय करू नुको, ताबडतोब राजापुरास न्या,' म्हून हयेंनी गड़बड करून

तूज राजापुरास न्हेलानी– म्हनू तू हातास लाग्लास– नायतर तुजी तरी ते येलंस आशा कशास व्हती ? बाय मातर माजी अयोगती गेली.'

आईनं ही माझ्या आधीच्या बहिणीच्या मरणाची हकीकत आम्हाला अनेकदा सांगितली होती.... 'तवापासून अनोपतीची माज् भीतीच वाट्ते. जरा कोनाचा दुकास लाग्ला, की माजा जीव पलतो. आन गोड लागत नाय– आता तुजी बदली झाली, पन तूज इतक्या लाम झेपता कसा हृचेची माज काल्जी लाग्लीय. आदी तू हल्वा– जरा तरास सोसत नाय.' थोडचा वेळानं आई उठली आणि घरात गेली.

माझं हातातलं पुस्तक मिटलेलंच होत. मी माझ्या बहिणीचा विचार करू लागलो. ती असती तर किती छान झालं असतं. तिनंही नोकरी केली असती– बाबांना मदत झाली असती. थोडचा वेळानं आई चहाचा कप घेऊन आली– आणि माझ्या हातात देताना म्हणाली, 'येवडीच साकार व्हती, आता उदचापासून साकारच नाय हाय !'

आई म्हणाली,

'आतासा अग्दी बोलत का नाय्स ? अग्दी गप्प गप्प न्हातोस ?' आईला काय सांगणार ?

'सगल्यांसी आप्ला गोड बोलान् न्हा- कुल्वाडी माल्वाडी कोन दारात आल तर त्यास्नी सादसबद मारुचा– नायतर मेलं म्हन्तील– त्यास बोलास नुको– घमेंडकोर हाय– आदी मेलं तुज्यावर जल्तात, म्हनू म्हंता.' आई मला समजावून सांगत होती.

बाबा मध्येच म्हणाले, 'त्यास आदी कोनासी बोलास हवा ?'...

'बाबूची वचावचा करून बोलाची सवय नाय. नेमकं चार सबद बोलणार!' माझी बाजू घेऊन आई म्हणाली.

**लग्न**

जेवताना पाहुणा आईला म्हणाला, 'बायो, माजी एक पोर्गी लग्नास झालेली हाय ! चौती पास झालेली हाय. चांगल्या घरात द्येव्ची माजी इच्छा हाय. तुज्याकडं म्हनू मी बोल्ताय– लक्षात ठेव.' पाहुणे जेवून बाहेर गेल्यावर आई मला म्हणाली,

'बाबू, पावन्यानं काय म्हंटलान ता तुज्या लक्षात आला ?'

'काय ?' मी दुर्लक्ष करीत म्हटलं.

'काय म्हंजे ? त्येच्या मनात आप्ली पोरगी द्येव्ची हाय.'

'मला सध्या लग्न करायचं नाय. आणि हृचाच्या पोरीबरोबर लग्न कोण करील ? हा दारुडचा !' मी माझं मत स्पष्ट बोलून दाखवलं.

'तू जवातवा असा म्हंतोस 'माज् लग्न करुचा नाय!' ता काय तू असाच ऱ्हानार हाय्स ?' आई जरा रागानंच मला म्हणाली.

अधिक बोलायला नको म्हणून मी पटकन उठून बाहेर गेलो.

**पाहुणा**

रात्री पाहुण्यानं माच्याखाली ओकून ठेवलं. तो परसाकडे गेल्यावर आईनं त्यावर राख ओतून ते केरसुणीनं सुपात भरलं आणि उकिरडयावर नेऊन टाकलं.

**वहाना**

'व्हाना भाय्र कशास फेकतोस ? आसंनात थय ! भंगल्या, सांड्ल्या तर मेलं खाव्स उट्तील. नव्या देव्स आप्नास काय ताकत हाय ?' आई समजावून सांगू लागली ... रात्री झोपताना आई म्हणाली,

'तुज्या तल्व्यांना जरा त्याल लाव्स हवा होता. पन आज माझा हात दुक्तोय. भावास लावूस सांग.'

मी म्हटलं, 'नको– तोही दमून आलाय. मी लावतो स्वतः...' आणि मी कोकमतेल चोळू लागलो. शेवटी आई आली आणि नकोनको म्हणत असताना माझे तळवे घासू लागली.

रात्री झोप कशी गाढ लागली. आईनं पायाला तेल लावलं की अशी शांत झोप लागायलाच हवी ! खरं म्हणजे आपणच आईच्या पायांना तेल लावायला हवं होतं– पण तिच्याकडूनच आपण लावून घेतो. यापुढं तिला त्रास देता कामा नये.

आई म्हणत होती, 'माज् आता वाडीत तोंड दाक्वूस नुको असा झालाय. सग्ले लोक म्हंतात, 'चांबारनी, तुजा लेक लय फुडं गेला. त्येनं गावाचा नाव घालवलान्. आता गावास काय जबाब द्येव्चा ?'

'तू काय बोलू नकोस. ते काय करणार आहेत आपलं ?' मी आईला म्हटलं.

'अरे, काय कर्नार म्हंजे ? त्येंच्या जिवावर आपली जिनगानी ! उद्या त्येनी आप्ली मल्नीमूट बंद केलानी तर आपून खाव्चा काय ?'

'कसं करतात ते पहातो !'

'अरे, काय बोलतोस काय ? सिक्लेला ना तू पोर्गा ? गावगिरम आजून कसा कलत नाय ?' आई रागानं मला म्हणाली. मी गप्प बसलो.

आई खूप बडबडत होती.

आई म्हणाली, 'तू तरी जा आणि सगल्यांच्या पायावर डोका ठेव. चुकला म्हन.'

मी का म्हणून त्यांच्या पायांवर डोकं ठेवू ? माझं काही चुकलंय का ? पण आईला हे कसं पटवून देऊ ? ती थरथर कापतेय !

'नस्ता दुक्ना ओडवून घेतलास– आता काय करू ?'

आई काळजी करतेय, मला जाण्याचा आग्रह करतेय. मी विचार करतोय– मी आईला हे कसं समजावून सांगू ? माझ्यावर नेहमी प्रेम करणारी आई आज माझ्यावर इतकी का बरं रागावली आहे ? मी काय गुन्हेगार आहे ?

'आये, मी तिथं जाणार न्हाय ! ते माझं काही करू शकणार नाहीत' मी तिला जरा रागानंच म्हटलं.

'जा नाय तर न्हा ! तू आप्ल्या मनाचा राजा ! एव्डा सिक्लास, पन काय उपयोग नाय ! आता तं आलं का माज खातील. त्यास्नी मी काय सांगा ?' आई रागारागानं म्हणाली. आई घाबरून गेलीय.

सकाळीच येऊन कोणीतरी सांगितलं, 'तुमी आमच्याकडे आता मल्नीमूट मागास येव नुका– आम्चा काम करू नुका.'

हे ऐकून आई हबकून गेली. दाटलेल्या स्वरात म्हणाली, 'काय केलास ह्या? आता पोटास काय बिब्बे घालूचं ?'

आई सारखं बडबडतेय. आई आणि तुकाराम हळू आवाजात काहीतरी बोलताहेत ...

सकाळी बाबा आले. आल्याबरोबर आईनं सारी हकीगत त्यांना सांगितली. तेही खचून गेले.

**मावशी, जागा**

आई म्हणाली, 'काय दिवस तू माव्सीकडं न्हावस ना ? हयसून रोज जाव्चा येव्चा तरास तरी वाचंल. आनि त्या तानाजीस इचार, खोली घेतीव काय म्हून.'

आज मावशीला विचारलं. ती म्हणाली, 'त्यास्नी इचार. मी काय सांगा ?' मग त्यांना म्हटलं, 'काकानू, मला खानावळीस ठेवता काय ? घराकडून यायचा रोज त्रास होतो.'

'मी काय नुको म्हताय ? न्हावा– पन आम्चा पोराबाळांचा घर. तुम्ची चांगली सोय होणार नाय.'

... शेवटी पुस्तकं आणि वळकटी तातीच्या घरात आणून टाकली.

... तातीला माझ्यामुळं त्रास होतोय. तिची तीनचार मुलं, सासू, नवरा एवढ्या माणसांचं करायचं म्हणजे तिला नकोसं होतंय – त्यात मी. शिवाय तिचे आता दिवस भरत आलेत. अशात तिला आपण किती त्रास देणार ?

**पसारा**

आई म्हणाली, 'वाकळा सारख्या ठेव, नायतर तं काय तरी बोलतील–'

मी आईला म्हंटलं, 'आपल्या घराला शिस्त नाही.'

'आनि कसा रे? कुल्वाड्या– माल्वाड्यांची घरां बग जा– त्यापेक्षा आप्ला किती तरी बरा हाय! सग्ली लोका माज्या जाग्यास नावाजतात– पूर्वी सासूसासऱ्यांच्या येलंस असा ऱ्हौता. घरात नुस्त्या हाड्या पड्लेल्या असत. तवा दारात इतकी घान असायची, लॉका व्हानवादी लाव्स आली तर खल्याच्या भाय्र उबी ऱ्हायत. आता दारात तरी येतात!'

'अगे, तू साफसफाई करतेस– पण इतरांना नकोय,' मी बाबांना उद्देशून म्हटलं.

'त्यास्नी सवय झाली घानीत ऱ्हाय्ची त्यास काय करनार? अरे, आप्ला घर किती बरा हाय. त्या पड्व्यात किती घान्वाडा असतो. तू थंय पानीपन पिनार न्हाय्स!'

**नमून रहा**

आई वड्यांसाठी तांदूळ व उडीद दळीत होती ... इतक्यात धोंड्या पटपटे आला. थोड्या वेळानं आई बाहेर आली. 'भावोजी, का आला व्हताव?' आई नम्रपणे म्हणाली.

'कामासिवाय कोन येल तुम्च्या दारात? व्हान तुटली म्हनू आला!'

'पन तं घरात नाय्त्–'

'ता कल्ला. तुज्या मास्तरान् सांगतलान्– पण खय गेला म्हन इचारला तर माज म्हंतो 'म्हाय्त नाय!' चांबारनी, तुजा धाकला लेक हाय, पन असा नाय!'

... 'भावजी, जावू दे. त्येचा काय मनावर घेताय? तुमचा काय तुटला व्हता?' आई विषय बदलीत म्हणाली.

'आंग्ठा तुट्लाय–'

'संध्याकाली या– तं आल्यावर त्यास्नी सांग्ता' आई म्हणाली.

'संदयाकाली येव्न काय करू? माज् आता हवाय!'

'पन आता कोन लावनार?'

'मास्तर हाय ना?' गावकार गुरगुरत म्हणाला.

'त्यास ह्यात्ला काय जमत नाय!'

'नुस्ता आंग्ठा टेकवून जमत नाय! मग पोरा कसी सिक्वनार?'

'नाय, त्यास जमत नाय. तुमी तं आल्यावरच या!'

तो निघून गेल्यावर आई मला म्हणाली, 'तू त्यास काय म्हटलास?'

'काय नाय! मी फक्त एवढंच म्हटलं– कुठे गेले ते मला माहीत नाय!'

'बावा, ह्येंच्यासी जरा नमान घेत्स हवा. म्हाराचांबारांनी उलट बोल्लेला मेल्यांस्नी सन होत नाय! त्यात हा वाडीचा अदीकारी गावकार... तू ऱ्हातोस

आपल्या आबिमानात— हे मेलं काय ऐकान् घेनार हाय्त?'

'काय करतील?'

'अरे, काय कर्तील, म्हंजे काय? ही जमीन, जागा त्येंची. झाडमाड आमी लाव्लीला अस्ला, तरी आजून तं आप्ला हक्क सांग्तात. त्यांस्नी नमान नाय न्हायलं तर हंय आप्ल्यास न्हाव्स तरी हवं? तू आप्ला सिक्लेला, म्हनू तूज काय ह्यात्ला कलत नाय! तस्लीच व्हताव म्हनू आमी आप्लं ह्या गावात दिवस काड्लाव. बाबा, त्यास बाबादादा करून हवा —तूज कोनास हाक मारुस नुको—त्यास काय चांगलं म्हंतात?'

'गावकार असले तरी आपल्या घरचे. आता त्यांना कोण नाय विचारत.'

'तूज चांग्ल्याचा सांगास नाय—का तू असा कर्तोस? तू सिक्लेला ना पोर्गा?' आई रागानं म्हणाली.

मी गप्पच बसलो.

आईला तरी काय बोलणार? दोष काय एकट्या तिचा आहे?

**पूजा**

जरा वेळानं आई म्हणाली, 'आता किती बोलतीव? आंगूल करून पुजा करा —बाबू पन भुकेलाय!'

'मंजे? आजून पुजा पन केलेली नाय?' बाबा अधिकच भडकले.

'कोन कर्नार?' आई

'कोन म्हंजे? ता व्हता ना घरात?'

'बाबू पूजा कदी कर्तोय, सांग्ताव ता? आनि माज वाटला, तुमी लौकर येताव. मी त्यास जरा भाक्री द्येली. त्यास न्हेर्येची सवय.'

...पूजा करतानाही बाबा बडबडत होते.

...'आवो, पन किती बोल्तीव? ता नाय करीत पूजा—तुमी हायत ना? तुमी करा.'

**पगार**

जागा झालो तेव्हा आई म्हणत होती, 'जेव्स चल. जेवान वाड्लाय.'

माझी भूक केव्हाच उडाली होती. त्रासिकपणे म्हटलं, 'मला नकोय.'

'नको कसा? चल, त्येंचा कस्ला मनावर घेतोस? ऊट, जेवान थंड व्हयूल—'

असं म्हणून आईनं माझा हात धरला. तिचा शब्द मोडवेना, म्हणून उठलो आणि तोंड धुवून तिच्या पाठोपाठ चालू लागलो...

'...आता जेव्चा आनि सरल भाय्र जाव्चा' आई बाबांना म्हणाली. 'पोर्गा कदी आला तरी त्यास सुकानं न्हाव्स कोन द्येय्चा नाय, न्हेमी आप्ली त्येच्या

पाटीवर रसगस. मगासी बोलान् झाला–आता तरी सुकानं जेव्स घेवचा, ता नाय.'
...दोघं भांडतच होती.

'हातात चांगल्या नोटा दिसास हव्यात–मग चांग्ला. इतर काय घेलान् तरी ता खिसगनतीत नाय. येव्डं कपडंपान घेतोय–काय नाय काय घेतोय. पन त्येचा नाव नाय. गेल्या वर्सा सग्ली मान्सा सीक पडलाव. त्यास दोन्शा रुपयं तरी लाग्लं अस्तील. ता सग्ला खर्च येकटयानंच ना केलान्? तवा पुत्न्या नाय धावान् आला? खंयचा भावांड सिकखान पडान दे-येक्टा धावान् जायल, तरी त्येच्येवरच जलनूक.. ...पुतन्यास येवडा ल्हानाचा मोटा केलास, त्येचा लगनकार्या केलास, ता नाय बरा सिकपनास धावान् आला? माज पोर व्हता म्हन सग्ल्यांस्नी दुकन्यात्ना वर काडलान्–आनि येवडा करुन सवरुन त्येचेवरच रसगस? कोन पावनापड येवस नाय, काय त्येंच्या तोंडावर म्हनंल, 'आमचा मास्तर येव्डा पगार घेतो, पन आमास काय घेत नाय–येवडा पगार काय कर्तो ता कलत नाय.' घरात्ला आब असा कोन भायर दाकवील?' आई माझी बाजू घेत म्हणाली.

'खरा कलीचा मूल हया रांडेकडं हाय ' बाबा फाट्कन म्हणाले.

**भांडण**

घरी आल्यावर आई म्हणाली, 'असा रिकामा फिर्तोस. त्यापेक्षा घरचा कायतरी कामधंदा बगूचा. तूज बोललेला माज् ऐकवत नाय– म्हनू मी तुजी बाजू घेता, म्हनू माज् बोल्तात.'

रात्री बाबा दारू पिऊन आले. पुन्हा आईचं आणि बाबांचं भांडण. माघार कोणीच घेत नव्हतं.

भल्या पहाटे उठून आई बडबडत होती, 'मी म्हनू हयेंच्या घरात दिवस् काड्लं. दुसरी बिस्री आस्ती, तर घरास आग लावून कदीच गेली अस्ती. लगन झाल्यापासून हया घरात मी हाल काडताय्. कदी आंगावर चांग्ला कप्डा मिल्ला नाय का कोनाचा सुकाचा शब्द नाय. आता मेल्या, म्हनू त्येंची कुटाल्की करूची नाय–पन रांडा नंदांनी माज् रडरड रडवलानी हाय. त्येंनी नाय नाय ता सांगायचा आनि मग हयेंनं मारमार मारुचा. हा तरी काय हल्का नाय हाय. हलद न्हाल्यापास्नं हयेनं माज कस्ला ता सुक देलान नाय.'

'उजाड्ला– लाग्ली तोंडास फुट. साली जातच हल्कट ' बाबा झोपून उठत रागारागानं म्हाणाले.

'मेला, न्हेमी न्हेमी हलकट म्हंतो, ता खय गेला व्हता मी हलकटपना करुस? कोनाचा नाक कदी खाली पडला व्हता? जवातवा माज हलकट म्हंतो– गेली मेल्याची वाचा ती.'––

मी उठून घरात गेलो– आई चुलीजवळ मशेरी लावीत बसली होती– तिच्या शेजारी बसत म्हटलं, 'उजाडण्यापूर्वी कशाला गे बडबडत रहातेस? आम्हाला ऐकयला बरं नाही वाटत. आता तुम्ही म्हातारी झाला आणि अजूनही तुम्ही भांडता-एकमेकांना वाईट– वाईट शिव्या देता, हे बरं दिसतं का?'

'तू बग्तोस ना आजून माज कसा जाच हाय ता? नात्रा पात्रा झाली तरी आजून माज् सुक नाय. तू तरी याचा न्याय कर्तोय्स?'

'कस्ला न्याय करुचा?'

'तूज सांगतला का तू असा म्हंतोस. भावास सांगाचा तर भाव तसा म्हंतो. यात माजा कोंडमारा झालाय. येक्दा असा वाटता तोंड घेव्न तरी जावा.'

'काय तरी' काय म्हंतेस? तू आता जरा गप्प रहा. आज सण आहे. उगाच वताग नको, 'आईला समजावीत म्हटलं.

'खा जा सन करून–माज त्या सनाची गोडीच नाय.'

### बायका शान्या असल्या तरच खरा सौंसार

बाबांनी सारी हकीगत त्याला कथन केली. आईही मधून मधून आपली बाजू मांडीत होती.

'भात्रोजी, माज्या पन घरात हीच तरा. सनावनी घरात दोन दिवस भांडान चाल्लाय. कोंबडा मिलंना म्हनू म्हनत व्हता–घरात ल्हान पॉर हाय, त्येच्येवर भागवूया– पन कोनास पटंना. बायको म्हनास लाग्ली, वर्सादिवसा सन! येवडासा पॉर कसा पुरंल?'

त्यावर बाबांना जरा सपोर्ट मिळाला. 'भावोजी, बायका शान्या असल्या तरच खरा सौंसार' बाबा म्हणाले.

### सामुदायिक विवाह

'लगन काय उट्ला आनि केला असा हाय?... पूर्वी न्हौरान्हौरीस उबा केला का झाला लगन. पूर्वी काय आसं दागिना आनि कपडं व्हतं? गल्यात कालं मनी आनि साडीचोली अस्ली का झाला लगन. तूज म्हायृती आसंल, एक वर्सा इल्यात येका मांडवात एकदम सात लग्ना झाली. त्यांत फक्त दोन लग्नं आदीची ठरलेली... बाकी सग्ली आयत्या वक्ती ठर्ली. गोप्या पाटनकर सग्ल्यांचा पुढारी. ता म्हनंल ता सग्ल्यांस्नी कायम. तेनं म्हटलान्, 'पोरांनो, लग्नास उबो ऱ्हाताव काय रे?' पोरांस्नी वाटला हा गंमतीनं म्हनंत आसंल. पोरांनी 'व्हय' म्हटलानी–लगेच व्हराडातल्याच पोरी जमावलान् आनी लावलान् लग्ना. बायो, गोप्या पाटनकर कसाही आसो, पन आस्ल्या कामात लय हुशार. तेनं असा इरंस पेटान् काम केलान् नस्ता ता ह्या नाऱ्या उंबरकराचा आन केश्या पावस्कराचा लगान तरी झाला अस्ता काय? आनि

सग्ल्यास्नी बायका मिळाल्या त्या पन चांग्ल्या. नान्यास मिळाली तस्ली त्यास कंदी जल्मात मिळाली नस्ती.'

### गौरीची पूजा

तुकारामानं गौरीचा खांब तासून त्यावर तिचा मुकुट बांधला. मी फुलांचे दोन हार केले. आईनं आणि बाबांनी गौरीला साडीचोळी नेसवली. आईनं चांदीवर सोन्याचा मुलामा चढवलेली आपली नथ गौरीच्या नाकात घातली. मग तिनं तांदुळानं ओटी भरली आणि पाया पडून म्हणाली, 'असीच वर्सानिवर्सा ये आनि असीच सग्ल्यांना सुक्पती दे.'

### आईचं दुखणं

घरी गेलो तेव्हा आई पांघरुण घेऊन झोपलेली होती. मी विचारलं, 'आये, झोपून का?'

'गेलं चारपाच दिवस थंडीताप भरान् ग्येतोय. पन कोन बगीत नाय. दोन दिवस तुजी वाट बगताय.'

मी अंगाला हात लावून पाहिला. अंग खूपच गरम होतं. म्हटलं, 'पडव्यातल्या डॉक्टरकडून औषध घेऊन येऊ?'

'आता आल्याबरोबर खय जातोस? जरा प्याज तरी खावून जा. सकाळपास्नी उपासी आस्सील.' असं म्हणून आई उठली आणि चुलीजवळ गेली. चूल थंडगार होती.

'शारदा कुठं गेली?'

'मायेरास– आठ दिवस झालं– आजून पत्ता नाय– ' आई तुटकपणे बोलली. औषध घेऊन आलो... आज परत गोठण्यास जायला हवं होतं, पण आईला बरं नसल्यामुळं जावंसं वाटेना. रात्री बाबा बडबडत होते. मी सारं निमूटपणे ऐकून घेतलं. म्हणणार होतो, 'इतके दिवस आईला बरं नाही. नुसती बडबड काय कामाची?'

पण बोललो नाही. आगीत तेल ओतल्यागत झालं असतं.

पहाटे उठून शाळेला आलो. उठवत नव्हतं तरी उठून आईनं भाकरी भाजून दिली. आई किती त्रास घेते आपल्यासाठी! दिवसभर सारखी तिची आठवण येत होती.

### लग्न

आई म्हणाली, 'आता तरी लग्नाचा इचार कर. लॉक मला इचारतात लेकाचा लगीन कदी करतेस? धकट्या लेकाचा केलीस– मोट्याचा का नाय करीस? त्यांना काय सांगावा?'

मी म्हटलं, 'जरा थांबा – घाई करू नको. शिवाय पैसे हवेत ना?'

त्यावर आई म्हणाली, 'आता इतकी वर्सा नोक्री कर्तोस. कुलवाड्याचं पॉर एकदोन वर्सा मुंबैत ऱ्हातं की लग्नाच्या तयारीनं येता. आनि तू आज दाबारा वर्सा नोक्री कर्तोस, पन हातात एक आंगठी नाय की गल्यात चैन नाय–आप्ली पुस्तका घेतली म्हनू झाला...'

आईचं पण बरोबर आहे. माझ्या बरोबरीच्या किती मुलांची लग्नं झाली. मी आजपर्यंत फक्त पुस्तकांचाच विचार केला. आता लग्नाचाही केला पाहिजे.

एक दिवस घरात धान्याचे काही नव्हते. आई सारखं म्हणत होती, ' घरात काय नाय हाय–भाकरेस तरी आना'.

वडिलांनी चामड्याचे होते नव्हते तेवढे सारे तुकडे जमवून एक जोडा जोडला. पण तो कोणी घेतला नाही.... आई म्हणाली, 'तुमचा कसबच बुलका! कशी कोनास पसन पडंल?'

जखम चुना लागून झोंबावी तसं आईच्या बोलण्यानं त्यांना झालं. मग आईनं कोंबड्याच्या करंड्यांत टाकायची करलं व्हैनात घालून, मुसळानं कुटून त्याचा कोंडा केला आणि त्यात थोड्या नाचणीचे दाणे टाकून ते दळले व त्या पिठाच्या भाकऱ्या आम्हाला वाढल्या.

### लग्नातलं जेवण

'अरे, त्या मटनाची लयच भालेरावी झाली. जो जो येय, तो टोपच्या टोप भरून ऱ्हेय. कोणाची दाद कोनास नाय, असा झाला. काय काय बायकांनी वडं व्हटयेत दडवून ऱ्हेलानी' आई म्हणाली. 'आपल्या काय लोकांची सवय अगदी हलकट हाय! ...अरे, याक याक बायल माणूस सेरासेराचा भात खायत.'

### सू तिकडे धागा

बाबा म्हणाले, 'आदी तीस कशास ऱ्हेतोस? मग मागसून ऱ्हे!'

'मग मागसून कदी? इतकं दिवस आपल्या हातानं करून खाल्लान – आता बरोबर ऱ्हेवस नुको? सू तिकडे धागा!' आई म्हणाली.

'माज वाटला म्हैना–दोन म्हैनं आमास पानी देल' बाबा म्हणाले.

'पुतन्यास बायको करून घेलाव, ता तिनं कितीदा पानी घेयलान्, हिच्या पान्यास रुस्ताव ता?'

'मी जरा काय बोल्ला का हीस आदी लाग्ता. ऱ्हे बाबा, माजा काय म्हन्ना नाय. आमचं हाल हायत, तं काय चुकत नायत'.

'तुमच्या अस्ल्या बोलल्यानंच घरात येवस ता कंटाळतो ना? आता त्येनं

बायको न्हेलान् तर काय झाला?'

आम्ही उभयतांनी आईच्या व बाबांच्या पायावर डोकं ठेवून नमस्कार केला.

**आई, भावजय**

'तू शारदाला जरा समजावून सांग. ती आईला नको नको तसल्या शिव्या देते.'

'ती शिव्या देते ह्ये माज् पन कबूल, पन म्हातारी काय कमी हाय? ...रात दिवस सार्की किरकिर करीत न्हाते. तिनं किती काम केलान् तरी केलान् असा म्हनाची नाय. तीस वाटता, सग्ला करता ता मीच ...मागं ही घरातल्या रागानं तुज्येकडं गेली आणि परत आल्यावर तिकडचा सांगास लाग्ली– 'तिचा येवार लय सुस्ता– पान्यात आणि कपडचात सगला येल घालवते– जरा लाकूड– सिपूंट बगूस नको'...

'उजाडल्यापास्ना राती झोपेपर्यंत सार्की किरकिर हाय'.

'कोण करतं?'

'दुसरा कोण? म्हातारी!' भाऊ तुटकपणे म्हणाला.

'संसारासाठी ती थोडंफार बोलत असेल. तिकडे तू दुर्लक्ष कर'.

'लक्ष द्येव नुको तर काय करू? पर्वा राती दोगींचा जोरात भांडान झाला, तसी ती सकाळी उटली आणि पोर्गेस घेव्न मायेरात गेली. बरा, ही काय पैलीच येल न्हवं. असा सताट येला झाला. म्हातारेस जरासा कारन मिळाला की सग्ला उक्रून काढते. आणि ती पन ऐकात नाय. घरात आतासा रोज कल्लेव हाय! बरा, आता म्हातारा आनूस गेला तरी तीस सासरा पाठवीत नाय– म्हनू आता म्हातारा तिकडं जात नाय– तवा परत्येक येला आता माज् जाव्स लागता आणि माज् तिकडं बोलान् घेवस लागता. सास्रा म्हंतो, 'तुमास बायको नांदवस येत नाय.' आता म्हातारेस बोलावा तर तीस वायट् वाटता, आणि बायकोस मारावा तर तीस लाग्ता. ह्यात माजा कोंडमारा झालाय. तू आप्ला तिकडं असतोस म्हनू तूज ह्येतला काय कलत नाय.'

आई, बाबा, भाऊ, भावजय आणि भावाच्या दोन मुली. सारी एका रक्ताची माणसं. पण असं असूनही आईशी कुणाचं पटत नव्हतं. खरं म्हणजे कुणाचंच कुणाशी पटत नव्हतं....

वाटतं, आईचंच चुकत असेल. तिनं एवढी कटकट कशाला लावायची? पण त्यानंही समाधान होत नाही. आई बोलते ते जरी खरं असलं, तरी तिला संसाराची खरी तळमळ आहे. आई आहे, म्हणून घर इतकं चांगलं आहे.

**आई (पाणी भरणे)**

थोड्या वेळानं आई पाण्यावरून आली. 'काय आई, बरं आहे ना?' असं म्हणत

तिच्या डोक्यावरची घागर उतरून मी घरात नेऊन ठेवली आणि बाहेर येऊनं पुन्हा बाकावर बसलो. ओले हात फडक्यानं पुसून माझा मुका घेत आई मला म्हणाली, 'उशा बरी हाय ना?'

'बरी आहे.'...

तिचे सारे केस पिकले होते. सर्वांगावर सुरकुत्या पडल्या होत्या. दात पडायच्या बेतात आले होते. हातपाय आणि चेहरा पांढरा फटफटीत झाला होता. तिची ही अवस्था पाहून मला कसंतरी झालं. 'तू कदीसा आलास?'

'बराच वेळ झाला. तू पाण्याला गेलीस आणि मी आलो. तुला पाण्याला खूप वेळ लागला. पाणी कुठं धरणावर गेलंय की काय?'

'व्हय बाबा, ह्या पान्यामुलंच सग्ला सौसार बुडाला.' आई आटलेल्या झऱ्यागत क्षीण आवाजात म्हणाली. 'जल्ली वाट तरी काय चांग्ली हाय, धावत धावत जाय्न आणि पटापटा आनीन आसं म्हनास? घल्नीतना जाताना जीव नुस्ता घाबारतो—त्यात आणि गोर्वावास्रांची वर्दल!'

'गाववाल्यांना वाट चांगली करायला काय झालं?' मी.

'मेलं आपसात भांडत -हातील, पन कोन म्हन्नार नाय—पान्याची वाट तरी चांग्ली करुया म्हून!'

'त्यांच्या बायकांनाही त्रास होत असेल.'

'सगल्यांस्नीच व्हतो. वानी, तेली, सोनार, कुल्वाडी. त्यात मुसलमानांनी मातर आप्ली सोय करुन घेत्लानी.'

'तुम्ही त्यांच्या विहिरीवर का जात नाही?'

'थय पन जाताव तर काय झाला! पन मुसलमान्नी आमचा काडना वावीत बुडवूस द्येत नाय्त आणि त्येंचा पानी पियास मन पन घेत नाय!' आई म्हणाली.

'धरणात आपल्याला भरायला देतात?'

'अरे, त्येंच्याबरोबर भरुस मिल्ताय? जरा खाली भरुस हवा.' आई म्हणाली.

'पण ते घाणेरडं असेल ना?' मी तोंड वेडंवाकडं करीत म्हटलं.

'अरे, चांग्ला नि वायट! हवा ना, मग कर्नार काय?' असं म्हणून आई उठली आणि 'तूज आता भूक लाग्ली आसंल—आदी जेवान कर्तो' असं म्हणत घरात गेली.

आई सारवत होती. 'आई, मी आता निघतोय' मी आईला म्हटलं.

'इतक्या लौकर?'

'तीन वाजून गेले—निघेपर्यंत तेवढं होईल.'

'जाताना थोडं कुलीद आणि याक कवट हाय ता घेवन् जा. दुसरा द्येवस काय नाय, आणि आता काय द्येव्ची पन भीती झाल्याय.' असं म्हणून आईनं हात धुतले...

आई घाटीपर्यंत पोचवायला आली. 'त्येची बायको माज् नाय नाय तसल्या सव्या देते. रांडफॉड कर्ते. जरा काय काम सांगास नाय, का जलजलते, आदलआपट

कर्ते. हल्ली माजी कापडं पन धवीत नाय.' आई धापा टाकीत माझ्या मागून येत बोलत होती. 'पर्वा काय झाला, त्येची पोर्गी जरा रडत व्हती. मी कस्ला तरी काम करीत व्हता म्हनू पटकन घेतली नाय–तसी म्हनास लागली 'रांडं मर्तेस तरी सुटला असता. तूज मार्गफुडं करूस कोन हाय? सगल्यांचं हात मोडलायत!' मी म्हटला, 'तू ह्या म्हंतेस ता कोनास?' तसी लागली उदान्यास. माज् अगोतुगो करुन सिव्या द्येवस लाग्ली. ता आनि म्हातारा दुकानास बसलेलं व्हतं, पन दोगातल्या येकानं येका सब्दानं म्हटलानी नाय का 'तू ह्या म्हंतास कोनास? ती काय कोन भिकारीन हाय?' उलट माजच बोलास लाग्लं–अशानं ती का चडंना? म्हातारा पन तस्लाच! त्येचा एक सबद गोड नाय. तवा नंदांनी सल्ल्यानी, आता ही सल्ल्याय. झाल्या जल्माचा मी दुक काड्ताय!' असं म्हणून आई रडू लागली.

'तू रडतेस कशाला? घरी त्रास होतो तर तू माझ्याकडे चल.'

'तुजकडं येन, पण इचार पडतो. आजच चूल सोडून गेलो तर माज पुन्ना घरात येव्स नुको–आणि सत्तंन ऱ्हावस नुको. तू कदी तरी येनार-माजी गोट्न्यातली भिकारीन कदीतरी येनारी– मुंबैस माज्या दोन लेकी, त्या कदीकाली आल्या तर त्यास्नी हातान् उचलून द्येव्ची माजी सत्ता ऱ्हायची नाय-आता मी माज्या हातानं उचलून देता. म्हून जल्ला वाटता, घर सोडू नये' आई पदरानं अश्रू टिपीत म्हणाली.

तिचे कढ थांबत नव्हते आणि मीही थांबवू शकत नव्हतो.

कसाबसा निरोप घेऊन मी घाटी चढू लागलो. आई खालून हात दाखवीत होती आणि डोळे पुशीत होती...

### लहानपणची कामं

शाळेतून येताच आई मला म्हणाली. 'बाबू, अंतू तेल्याचा रेडा मेलाय. ते काय आज येनार नायत. चामडा फुकट घालवलाव तर ते वराडतील. म्हनू तू जरा गोटन्यात जा आणि नारू म्हारास बोलवून आन.'...

'इतक्या लांब मी जाणार नाय.'

'तुकारामास सोबतीस न्हे.'

'मी नाय जा.'

'असा काय कर्तोस? त्यांस्नी कल्ला तर रागावतील. म्हंतील, 'मी नाय, पण येवढा चाम्डा फुकट घालवलानी!' जावा लौकर. आता सडचावर मान्सा भाजावली करीत असतील. त्येंची सोबत व्हयंल.' आई माझ्या पाठीवर हात फिरवीत म्हणाली.

शेवटी आम्ही दोघांनी नारूनानाला बोलावून आणलं.

### उषाचं बाळंतपण

घराकडून आई आली. म्हणाली, 'काय काल्जी करू नकं. द्येव हाय- त्योच्या-

वर इस्वास ठेवा' आणि दोन्ही हातांनी पदर पसरीत तिने देवाला प्रार्थना केली. 'द्येवा, भर्ला बांदला जीव हाय. त्येची आप्ली सुकानं मोक्लीक कर.'

'पहिलं बाळंतपण कठीण असतं असं म्हणतात. गावात डॉक्टर नाही, नर्स नाही किंवा गाडीनं पटकन राजापूरला नेईन तरी सोय नाही. म्हणून जिवाला काळजी ' मी आईला म्हटलं.

'काय काल्जी करू नुको. पन पोटात दुकास लागला की आपुनच सग्ला करूचा. हे कदी कदी तरी ढोपार लावीत आणि द्येवानं पन माजा अड्ता बगतलान नाय. तुज्या येलास हे पण घरात न्हौता. बाबी, बाया आणि माजी मरणारीन बाय तेवढी घरात– पन ती ल्हान ल्हान. दिवसभर मी कामा केली. चारपाच खेपा पानी आन्ला– रानातल्या लाकडाची येक भारी आन्ली- दोन कुडू भात जेवान केला आणि माज्या पोटात दुखास लागला', आई माझ्या जन्माची कहाणी सांगू लागली.– 'तू भर्लेल्या हांडच्येवर्चा हाय्स. तू झालेला बगून सग्ल्यास्नी आनन झाला. माज पैल्या सग्ल्या लेकी माजा पैला येक लेक गेला. तो अस्ता तर आता केवडा तरी झाला आस्ता– त्यांनी दुकानावर्नां एक नारल, खोबऱ्याच्या दोन वाटच्या, ववा, मेती आनलीनी. बावी, बायानं पानी तापवलानी. त्यांनी भात केलानी आणि नारलाचा चून घालून माज वाडलानी. दोनतीन दिवसांनी बापसास कल्ला. तसी माजी आयस आणि बापूस आला. तूज बगतल्याबरोबर आये म्हणास लाग्ली, 'काला हाय'. असं म्हणून आई हसली. 'तुजं नाव पन तिनंच ठेवलान्. बारशास माज्या बापसानं आठधा बाटल्या माडी वाटलान्. त्येंनी मोटा कोंबडा कापलानी– तवा काय असी म्हागाय न्हौती. रुपयात चार जुन्या पायल्या तांदूळ मिलत. नारल दोन आनं, नायतर धा पैसं. सुपाऱ्या आन्याच्या बारा. तवा पैसं पन कमी. चांगला पायतान रुपाया- दिड रुपयात खपं. आता सग्लाच बदालला– दुन्या पन बदालली आणि मानसा पन बदालली' आई म्हणाली.

आई सकाळी घरी गेली. जाण्यापूर्वी म्हटलं,

'इतक्यात जाऊ नको. उषाला अजून ताप येतोय. मला बरं नाही. दुसरं कोण माणूस नाही. माझी शाळा आहे. जेवण तरी मिळायला हवं! '

'घरा माजी वाट बगतील. येवंन बरंच दिवस झालयंत. हे आगोसचं दिवस –चुना, रंग करूस हवा. थोडी भाजावल हाय– ती भाजूची हाय– घरा म्हंतील – आजून काय करीत व्हतीस?'

'पण इथलं कोण करणार?'

'घ्या कसा तरी करून– मद्ना– मद्ना सेंत्यास सांग.'

'तिचं नाही तिला होत– ते आमचं काय करणार?'

इतकं सांगूनही आई गेली.

संध्याकाळी म्हातारी म्हणाली,

'तुम्ची आयस हंयच ऱ्हाते तर काय वायट झाला आस्ता? आता ही वली वालत. घरात्ला करील का पोर्गेचा बगील?'

'मीही सांगत होतो. पण घरी अडचण म्हणून आई गेली.'

'तिची हय् सोय होत नसंल, म्हनू कंटाल्ली आसंल!'

म्हातारीच्या स्पष्ट बोलण्यानं मला कसंतरी झालं.

**भिक्षान्न**

आज तिघंही घरी आलो. आईनं आणून दिलेला चहा मी घेतला आणि सोनियाला खेळवीत माच्यावर बसलो होतो. इतक्यात बाबा आले. त्यांनी सोनियाचा मुका घेतला आणि ते खांबाला टेकून बसले... 'तू खातोस? वडं चांगलं हायत!'

'छे, मला नको'.

'बाबू कदी वाडीतला जेवान खातोय, इचारताव ता?' आई बाबांना म्हणाली

होळी, दसरा, गौरीगणपती इ. सणाला जेवण पुष्कळ जमायचं. भात तसाच ठेवला तर तो आंबायचा– म्हणून आई दुसऱ्या दिवशी गरम पाण्यानं तो धुवायची आणि कोकमाच्या कढीबरोबर वाढायची.

**भाकरी**

आईला म्हटलं, 'कसली भाकरी केलीस ही?'

'बाबा, मी काय करू? दानं व्हतं ते सोपलं. जोंदलं आना म्हनू म्हंताय ता कोण ऐकत नाय.'

'कुंडा जरा बारीक घ्यायचा होता. भाकरी दाताखाली धरवत नाय.'

'तूज चांगला खाव्ची सवय झाला, ता हृचा कसा गोड लागंल? पन आमास ता सुदा मिलत नाय.'

'रोज दारू प्यायला दोनदोन तीनतीन रुपये कसे मिळतात? त्याऐवजी जरा चांगलं खायचं.'

'तू काय आमास दयेत नाय्स ना? आम्ही आमच्या कमाय्ची खाताव!' बाबा रागानं म्हणाले.

'माझी कमाई सगळयांच्या डोळयात खुपतेय. तिकडे त्या भडव्यांनी नकोसं केलंय, इकडं ही कटकट! ...'

'सिकलेला ना रे तू? हृचा बोलतोस ता तूज सोबता ?'

'आग लागो त्या शिक्षणाला...सगळयामुळे माझं डोकं फिरायची वेळ आलीय.'

'कोन म्हणताय काय तूज? तूच आप्ला आल्यावर हृचा आपट, ता आपट कर्तोस. सकाली चाय्त खय चार मुगल्या दिसल्या म्हन् वैतागलास. आता भाक्रे-

वर्ना वैताग्लास. तूज अग्दी किती जपान् वाड्ला तरी मिल्ताच. आता आणि जपाचा तरी किती?'

'प्रत्येक वेळी असं कसं होतं? कधी केस असतात, कधी खडे असतात, कधी मुंग्या असतात. जरा बघून व्यवस्थित वाढलंत तर काय बिघडेल?'

'आणि कसा येवस्तित ता मज् कलत नाय. तुज्या बायकोस आल्यावर कदी सांग्तला तर ती आंग काढून न्हाते. भावजयस जमत नाय... ह्यात माझा सग्ल्यांनी कोंडमारा केलानी' आई बडबडू लागली.

आई म्हणते, 'पुस्तकात पैसं घालवण्यापेक्षा एखादी अंगटी करूची व्हती!'

तिचं काहीच चुकत नाही. खरं म्हणजे तिच्याच अंगावर एखादा दागिना घालायला हवा होता.

उषाचं मंगळसूत्र अद्याप बँकेतच आहे.

**घराची सफाई**

'बाबू, तू खल्यात बस. मी माळा झाडून घेताय. अंगावर केर पडंल' आई म्हणाली.

गणेशचतुर्थीची पूर्वतयारी म्हणून आई घराची साफसफाई करीत होती.

'थांब, मी पण येतो. तू एकटी किती करशील?' मी म्हटलं. शारदा माहेरी गेली होती. तुकारामही घरी नव्हता. तेव्हा एवढं घर आतून– बाहेरून झाडणं एकटच्या आईला शक्यच नाही.

'मग डोक्यास हा फडका बान!' आईनं हातात रुमाल आणून देताच जुन्या आठवणींचे कोळिष्टक मी दूर फेकले आणि रुमाल बांधून माळ्यावर चढलो.

'पाय आस्ते ठेव. कामटा मोडास झाल्यात. आणि घरू तेवडा खाली पाड' आई मला सूचना देत म्हणाली.

इतक्यात आई चहा घेऊन आली.

'बग बा तूज चालला तर–सग्ल्या चाय्त अर्दा कोप दूद टाकला तरी चाय रंगली नाय. मेल्याचा गॉडच वायट.'

आई माझ्या हातात चहाचा कप देत म्हणाली.

**मोठ्या बहिणीचं पत्र**

मोठ्या बहिणीचीही काही पत्रं आहेत. एका पत्रात ती म्हणते, 'तुझे पत्र आले, ते पोचले. लिहिलेला मजकूर समजला. आम्हाला पत्र लिहायला वेळ मिळत नाही, त्यामुळे पत्रास वेळ लागतो. त्यामुळे आपण राग मानू नये. बाकी आम्ही सर्व मुले

माणसे खुशाल आहोत. काळजी करू नये. बाया आणि तिची मुले खुशाल आहेत. असेच पत्र पाठवीत रहावे.'

ही आम्हा सर्व भावंडांत साधीभोळी ! आई हिला गाय म्हणते. दहाबारा वर्षांची असताना हिचं लग्न झालं. नवऱ्याला बायको लहान झाली म्हणून त्यानं दुसरं लग्न केलं आणि मोठी बायको घरात आणली. पुढे बायो उपवर झाल्यावर नांदायला गेली. नवरा दारू पिऊन खूप मारायचा. पण हिनं मुकाटपणं सारं सहन केलं. गायच ती!

**शांता (बहीण)**

दुपारी शांता आली आणि म्हणाली, 'दादा, तू बदली करून घेतो आहेस?'

'तर काय करू? इथं आता रहायचं कसं? सांग. गेली सहा वर्षे किती कटकटींना तोंड दयावं लागलंय हे तू पहातेस ना? बदलीचे प्रयत्न चाललेत, पण तीसुद्धा होत नाही. सगळा वशिल्याचा कारभार.'

'तू आल्यापासून माज् धीर वाटतोय. कसली कालजी वाटत नाय. कांय नसलं तरी वाटतं, माझा दादा हाय, वैनी हाय, माज् भियास नुको.'

'आम्ही काय देतोय तुला असं?'

'काय नाय कसा? कांदा म्हनास नुको, तेलपानी म्हनास नुको, वाटेल ता मी हक्कानं वैनीकडना मागान् न्हेता घरा. मज कोन आजारी पडला तरी कालजी वाटत नाय. माज् वाटता माजा दादा, माजी वैनी हाय.'

'अगं, हे काहीच नाही. आपल्यावर वहिनीदादांचे फार उपकार झाले आहेत असं तू मनातही आणू नकोस.'

बोलता बोलता उषानं चहा करून आणला. शांताला आत बोलावून नेलं.

ही माझ्या मागची बहीण. चौथीपर्यंत शिकली आणि 'पोरीच्या जातीला अधिक काय करायचं आहे शिक्षण?' असं म्हणून आईवडिलांनी तिला शाळेतून काढली. दुसरं कारण दारिद्रय हेही होतं.

मी आईचा लाडका, तशी ही बाबांची लाडकी. आम्हा पाच भावंडांत शांता सर्वांत गोरी दिसायची. आता काळीठिक्कर पडली आहे. डोळे खोल गेले आहेत. गालफटं बसली आहेत. एवढ्याशा वयात पाच मुलं झाली. पोरीची दशा दशा झाली. हिच्या अंगावरची फाटकी पातळं पाहिली की माझं मलाच अपराध्यासारखं वाटतं. माझ्या अंगावरचे कपडे मला खुपल्यासारखे वाटतात. हिचं दारिद्रय कधी जाईल का? हिच्या अंगावर चांगली पातळं कधी येतील का?

चहा पिऊन झाल्यावर ती परत माझ्याजवळ येऊन म्हणाली, 'दादा, माज् काय दयेव नुको–आजपर्यंत मला पुष्कळ दयेलंस. फक्त त्यांस्नी खय तरी नोक्री बघ. त्यांस्नी पैल्यापासून नोक्रीची आवड. धंदयात त्यांस्नी रस नाय–'

शांतालाही वाटतं माझ्या खूप ओळखी आहेत. 'अग, माझी ओळख असती तर मी असा येथे राहिलो असतो का? त्यातूनही पाहीन. माझ्या लक्षात आहे. त्यांनीसुद्धा मला दोनतीन वेळा सांगितलं आहे.' तिच्या समाधानासाठी मी म्हटलं.

देशातल्या काही स्त्रिया शेकडो रुपये किंमतीच्या साड्या वापरतात आणि माझ्या बहिणीला, माझ्या आईला साधी 'गरीबी हटाव' पातळं मिळू शकत नाहीत. केवढी ही विषमता!

**उषा, शांता**

आज माझी राजापूरला बदली झाल्याचा हुकूम आला.... उषाला खूप आनंद झाला.

शांता मात्र रडत होती. म्हणाली, 'माज् आता कोनाचा आधार नाय.'

**बहीण**

सकाळी निघताना बहीण रडू लागली. म्हटलं, 'रडू नको–काळजी करू नकोस. मी तुला विसरणार नाही.'

'दादा, मला इतर काय दयेव नुको, फक्त त्यांच्या नोकरीचं कुठं तरी बघ' डोळ्यांना पदर लावीत ती म्हणाली. तिच्या खोल गेलेल्या डोळ्यांत अश्रूही आटले होते. तिच्या समाधानासाठी मी म्हटलं, 'बघेन. तू काळजी करू नको.' –आणि मी तिचा निरोप घेतला.

बायोक्का आली आणि भीत भीत म्हणाली, 'दादा–'

'काय? बोल.'

'काय बोलनार? तूज येवडा लग्नाचा खर्च आला. येव्डा लगन येकट्याच्या सिरावर केलास, कर्जाचा डोंगर करून घेत्लास आनि मी काय सांगा?'

ती स्पष्ट बोलायला घाबरली याचा अर्थ तिला काहीतरी अडचण आहे हे मी ओळखलं.

'पैसे हवेत?'

'तं उदया चामडा आनूस लांज्यास जानार व्हतं, पन पैशास तोटा आला. गावात दोगातिगांकडं जाऊन आलं. पन सगल्यांनी नायरी भरली,' बायोक्का कड-वटपणे म्हणाली.

'किती पैसे हवे होते?'

'इस रुपये.'

मी खिशातले पैसे काढून देत म्हटलं, 'त्यात एवढं भियाचं कशाला?'

'तुज्याकडं कितीदा माग्नार? तुजी तरी काय परिस्तिती हाय?'

'परिस्थिती असो अथवा नसो, एकमेकांनी अडचणीला उपयोगी पडायचे नाही तर कोणी?'

ती गेल्यावर मी उषाला म्हटलं, 'तुला सांगायला नको, पण कधी काही मागायला आली तर देत जा. आपल्याला शक्य होईल तेवढं दयायचं. आणि हे बघ, इथली कोणी माणसं कधी बसायला आली तर त्यांना चहा वगैरे दयायचा. त्यांच्यात मिळून–मिसळून रहायचं. ही सारी आपलीच माणसं आहे.'

'तशा येतात सगळया जणी, पण ती सखू मात्र येत नाही आणि माझ्याशी फारशी बोलतही नाही.'

'आपण बोलायचं.'

'ती बोलत नाही. समोरून जाऊ लागली की तोंड फिरवते. मग कसं बोलू?'...

सखूशी मी लग्न केलं नाही म्हणून कदाचित ती उषाशी बोलत नाही. पण त्यात उषाचा काही दोष नाही. मला जी सहचारिणी पसंत पडली तिच्याशी मी लग्न केले. मला सखूचा तो भांडखोर स्वभाव आवडत नव्हता.

## पत्नी

**बायकोचा चुलता**

उषाचा चुलता म्हणाला, 'जावयानू, आमी तुमास आमची पोर्गी द्येताव हाय- आता तिचा चांग्ला परतीपाल करा. तीस कस्ला तरास होता नये. ह्या तुमास आताच सांगान् ठेवता– मग म्हंतीव, असा झाला आनि तसा झाला. ता मी ऐकान् घेनार नाय. मी हायतं चांग्ला हाय, नाय तर माज्यासार्का जगात दुसरा कोन वायट नाय ! ... हा ! आनि तीस सेताच्या कामाची सवय नाय हाय. तवा तीस तुम्ही घरा ठेव नुका. तुमच्या सोबत ठेवा. आनि आता पावनेपाव चांग्ला संबाला!'

आता स्वयंपाक वगैरे काही करावा लागत नाही. शाळेतून आलो की वाचत बसायचं. उषा सारं करते.

(गोंद्याचं बोलणं) ऐकून उषा कावरीबावरी झाली. शेवटी जवळ घेऊन धीर दिला. तशी हमसाहमशी रडायलाच लागली. म्हणाली, 'मेला मघाशी म्हणत होता- पांढरी, पांढरी !'

उषा दुपारी नदीवर कपडे धुण्यासाठी गेली होती. कपडे धुताना कुळवाडणी तिला म्हणाल्या, 'अगो, आमच्या अंगावर पाणी उडात. तुमका हल्ली काय अगदी कळत नाय. अग्दी आमच्या पुडं धुवूक जातास. तुजी सासू मातर असा कदी करत न्हवती. तुमका अग्दी रीतच नाय.'

'तू ऐकून का घेतलंस ?' मी उषाला म्हणालो.

'अशा वेळी काय बोलायचं ते मला समजत नाही. त्या बायका अगदी गांगरून टाकतात.'

घरी आल्यावर उषा म्हणाली, 'तिकडे गेलेत ते बरं झालं. नाहीतर इथं वैतागला असता.'

'तुझ्याशी कुणी भांडण केलं ?'

'काय सांगू ?' उषा काळजीच्या स्वरात म्हणाली, 'तो मेला अगदी वैऱ्यागत वागतोय– तुम्ही गेल्यावर सगळ्यांनी अगदी उच्छाद मांडला होता. 'एका माणसाचा ढोल वाढलाय ' असं माझ्याकडे पाहून म्हणत होता.'

मी दबलेल्या छातीत ओढून हवा भरली.

रोज काहीना काही कटकट आहेच. सकाळी (घरमालकाचा मुलगा) उषाबरोबर विहिरीवर भांडू लागला. म्हणाला, 'आमची भांडी भरून झाल्यासिवाय रहाट देनार नाय.'

बऱ्याच वेळानं उषा परत आली आणि रडकुंडीस येत म्हणाली, 'रहाट अडवून बसलाय, किती वेळ थांबू ?'...

उषा विचार करीत बसली होती. आता तिचे दिवस भरत आलेत. त्यात ही डोकेदुखी.

**सुईण**

दुपारनंतर काशीराम सुइणीला घेऊन आला. तिला पहाताच मला बरं वाटलं. आल्याबरोबर तिनं साडी बदलली. पिशवी खुंटीला अडकवून ठेवली आणि ती उषाच्या खोलीत गेली. उषाला तपाशीत म्हणाली, 'काय काल्जी करू नुको. पोरीची एका तासात सुटका करून देता.'

'बाय, तुज्या तोंडात साकार पडा दे. आमच्या जिवात जीव नाय हाय. सग्ला जीव पलान् गेलाय. रातभर कोनाच्या डोल्यास डोला नाय्– पोर्गा काल सकालपासून वनवन फिर्तोय. कलपासून काय खाल्लान नाय हाय' आई सुईणीला म्हणाली.

'आजीबाय, भिया नुको. अशा कितीतरी केसी सोडवल्यात मी' पानाला चुना लावीत सुईण आत्मविश्वासानं म्हणाली, 'अहो, एकदा काय झाला, असाच एक मानूस माझ्याकडे धावत आला. पायावर डोकं ठेवीत म्हणाला, 'काय पन करा आनि चला. बाई लय अडलेली हाय.' पान तोंडात टाकून ती पुढं म्हणाली, "मी ताबडतोब गेला. अवो, बगतीव तर काय ? पोराचा डोका भायर आलेला.

बाईचं हाल बगवंनात. मी पदर खोवला आनि द्येवाचा नाव घेवन् कामास लाग्ली... बाईचा जीव जातो की न्हातो असा झालेला. पोर्गी हमसाहुमसी रडत होती. मी आतापर्यंत लय बालतपना केली, पण असा खंय बगतला नव्हता. मनात म्हटला, द्येव आपली परिक्षा बगतोय. पण तोच उबा न्हायला. बाईची पाच मिनिटात सुटका केली. तवा तुमी बिलकूल घाब्रा नुको.'

असं म्हणून तिनं पदर खोवला. हात जोडून देवाला म्हटलं, 'आजपर्यंत जसा मदतीस धावलास तसा आता धाव. अडचणींच्या मानंवर पाय दे.'

**उषाचं बाळंतपण**

आई बाबांना म्हणाली, 'इतकी बालतपना मी बगतली पन असा नाय. काल फाटफटीपासून पोटात दुकताय – तिनं कला सोसाव्या तरी कशा ?' थोडं थांबून आम्हा दोघांकडं पाहात हळू आवाजात म्हणाली, 'माज् वाटता, ह्या जागेत काय तरी अडचण असावी. ह्यापूर्वी त्येनी काय पूजस लावलेला व्हता ?' आईनं आपली शंका व्यक्त केली.

'माज् पन ताच वाट्ताय – पूर्वी हंयच्या सान्यात त्यांचा नारल पुजलेला होता' बाबा म्हणाले.

'तुम्ही जरा जावा आनि त्यास म्हणावा, 'तुमी आपल्या द्येवास गाराना घाला. तुमच्या जागेत आमचा पोर्गा न्हातोय – आज बालत अडलेली हाय – ती हालवनवस न व्हता बालत व्हवू दे. तुमचं उपकार व्हतील.' आई बाबांना म्हणाली.

'जाता' असं म्हणून बाबा उठले.

'आनि मग तुमी देवलात जावा. आपल्या नवलादेवीस कवूल घ्या. आनि बाबू, तू पन द्येवास हात जोड – चुकला माकला माप कर म्हनं' आई म्हणाली.

उषा विहिरीवर घडलेल्या प्रकारानं वैतागली होती.

'आपणही त्यांच्यासारखं वागायचं का ?' मी म्हटलं.

'तुमचं आपलं हे नेहमीचंच !'

'मग काय त्यांच्याबरोबर भांडत बसायचं– हातवारे करून शिव्या देत ? अन् भांडखोराला शहाणं म्हणतात असं तुला कोणी सांगितलं ?'

'अहो पण...'

'मला ते पणबीण काही सांगू नको.'

'मग घ्या ऐकून गपचीप. जळली मेली रोजची कटकट ! कुणाकुणाचं म्हणून किती ऐकून घेणार ?' उषा व्याकुळतेनं म्हणाली. 'तुम्ही असं गप्प रहाता, ऐकून घेता म्हणून एवढी–एवढीशी पोरंसुद्धा नको नको ते बोलतात, नाचून दाखवतात, चेष्टा करतात. आज विहिरीवर प्रथम मी गेले. दुसरं कोणी नव्हतं. म्हटलं, भांडी

भरून घेईन. सोनियाला त्या म्हातारीकडे नेऊन ठेवली. एक काढणं ओढून भांडी धुवायला घेतली. इतक्यात पोरांची झुंड गेली. पांड्यानं रहाट अडवला. मी त्याला म्हटलं, 'माझी दोनच भांडी आहेत. तेवढी भरभर भरून घेते. मग घ्या तुम्ही.' पण ऐकूनच घ्यायला तयार नाही. उर्मटपणे गुरगुरला, 'आमी नाय कोनास देनार. बाव आमची हाय. न्हाट आमी उलावलाव हाय – कोनास भिनार नाय' माझी घासलेली भांडी सुकून गेली. राखेचे हात घेऊन मी तिथेच बसले. घरीही येता येईना, पाणीही मिळेना.'

'मग ?'

'मग काय ? पांड्या पाणी ओढी, मुलं घरी हवमीत. यात खूप वेळ गेला. अगदी कंटाळले. म्हटलं, 'पांडू, असं काय ? मला फक्त चार काढणी लागतील. मग घ्या तुम्ही दिवसभर.'

'दिलंन ?' पाण्याइतका पातळ होऊन मी म्हटलं.

'छे ! बऱ्याच उशिरानं काशी आली. मला पाहून म्हणाली, 'वैनी, तुमी आजून पानी भरताव आणि तिकडे सोनिया रडतेय.' 'काय करणार ? विहीर काय आमची आहे ?' मी तिला म्हटलं. 'ह्या मेल्यानं देलान् नसंल. मेल्या, काय झाला रे, तुज ? त्या आदी आल्या व्हत्या ना ?' तसं दोघांचं केवढं भांडण ! दोघंही एकमेकांना आईबहिणीवरून शिव्या देऊ लागले. मला वाटलं, डोक्यातच घालतो की काय काढणं? सरसरत येऊन धबकन् टाकलन्, सगळं णीपा गढूळ झालं. माझ्या हातात रहाट होता. मी त्याबरोबर काय घाबरलेय ! शेवटी दोघांची चांगली जुंपली. काशी काय ऐकणार ? दिलंन चांगल्या दोनतीन कानशिलात. मग गेला बोंबलत घरी. मीही मग घरी आले. सोनियाला पाजायला बसले, तशी त्याची आई लागली शिव्या द्यायला.'

'तू तिला समजावून सांगायचं.'

'ऐकून घेईल तर ना ? तो पोर तिचा लाडका. एक शब्द बोलायला देत नाही. उलट, बोलणाऱ्याला मूर्खात काढते...अहो, एवढासा पोर, पण दारू पितो, सिगरेट ओढतो. आई म्हणे पैसे देते. लाडका ना ? अन् शिव्या काय देतात ! ऐकवत नाही अशा. मला बाई, हिची काळजी वाटतेय.'

**सोनिया**

सोनिया उपडी वळायचा प्रयत्न करतेय.

...उषा म्हणाली, 'मला अगदी कंटाळा आलाय !'

'का ?'

'अहो, का काय ? तुम्ही आपले शाळेत जाता म्हणून सुटता. पण मला सारखंसारखं ऐकावं लागतंय.'

'काय म्हणतात ?'

'सकाळी म्हातारी आणि सखू काहीतरी हळूहळू बोलत होत्या. मला पहाताच डोळे मिचकावीत गप्प बसल्या. मी गोल साडी नेसते ना? त्यावरून काही-तरी बोलत होत्या. 'भोंगला काय ता बरा दिसताय ?' असं निसुटकं बोलताना मी ऐकलं.'

शाळेतून आल्यावर उषा सांगू लागली, 'गोंद्या खूप त्रास देतो. मला 'पांढरी पांढरी' म्हणतो. पडवीच्या पत्र्यावर काठ्या मारतो. खोलीत येऊन रेडिओ लावून बसतो. सोनियाला चिमटे घेतो. पाण्यावर गेल्यावर तिथे काही ना काही बोलतो. पलिकडच्या पोरींना नको ते म्हणतो. अगदी ऐकवत नाही. आता पुन्हा खूपच मस्ती करायला लागलाय. मला भीती वाटते!'

शाळेतून येताच रडत रडत उषा सांगू लागली, 'नदीवर पाणी भरीत अस-ताना गोविंदानं हातातली कळशी काढून घेतली आणि खोल पाण्यात नेऊन बुडवली. मग अंगावर पाणी उडवू लागला. सगळं पाणी गढूळ करून टाकलं. दीपक कळशी काढून देऊ लागला तसा त्याला दम दिला. शेवटी आपण काढून फेकून दिलंन.'

त्याची आई आमच्याशी भांडायला आली, शिव्या देऊ लागली. नवऱ्यानं तिलाही गप्प करण्याचा प्रयत्न केला, पण त्याचा उपयोग झाला नाही. उलट ती नवऱ्यालाच शिव्या देऊ लागली.

उषा खूप वेळ रडत होती.

शाळेतून आलो, तेव्हा सोनिया रडत होती.

'का रडते, ग ?'

'ती पोरं आहेत ना? त्यांनी गालाला धरून ओढलं. पोरं खेळत होती. हीही गेली. मी चुलीजवळ होते. एकाएकी किंचाळली म्हणून बाहेर गेले. किती रडलीये! आन् गाल बघा किती लाल झाला.'

'कोणी ओढला ?'

'त्या नामूनं. विचारलं, तर उलट बोलायला लागला, 'आमच्यात येता कशास?' लक्ष तरी किती ठेवणार? एकसारखी खोड्या काढतात. कोण चिमटा काढतो, तर कोणी पाठीत ढोसकतो. कोण पाय ओढतो, तर कोण वेडावून दावतो. शिव्या तर असल्या देतात, आई ग! ऐकवत नाही. आईवरून काय, बहिणीवरून काय! ही आताशी शिकली त्यांचं ऐकून.'

मी जिभेवर आलेली थुंकी गिळली. माझा अबोलपणा उषाला सहन झाला नाही.

'हिच्यासाठी तरी बघा दुसरी जागा. मला तर इथला कंटाळा आलाय. नाही

तर बदलीच करून घ्या ना ! हे किती सहन करायचं ? ' उषा अगतिकतेनं म्हणाली.

घरी आलो तो उषा रडत बसलेली. ' का रडतेस ? ' मी घाबरून म्हटलं, तशी अधिक मुसमुसू लागली.

' बरं नाहीय का ? अग, सोनियाकडे बघ. तिला वाईट वाटेल. आधी डोळे पूस. '

' तुमचं बरं ! शाळेत जाता. इथं मला रात्रंदिवस ऐकावं लागतं. '

' आज काय झालं ? '

' मेले हलकट लोक ! निर्लज्ज कुठले. कुणाशी कसं बोलावं याची अक्कल नाही '...ती डोळे पुशीत सांगू लागली. ' हे पुरुष किती घाणेरडे बोलतात ! तो थोरला म्हणत होता, ' सोनियाला आता भाऊ होणार. आम्हाला इथे पेढे मिळणार. हा कितवा महिना ?' नालायक मेले ! '

गेले दोन दिवस घरी गेलो होतो. परत आल्यावर पहातो तो उंबरठ्यात मातीदगडांचा हा...ढीग. दार उघडून पाहिलं. खोलीत सर्वत्र माती, शेणाचे गोळे. मी आश्चर्याने पहात राहिलो.

' बघा, पोरांनी काय करून ठेवलंय ते ! ' उषा म्हणाली.

मी बॅग खाली ठेवली. कपडे काढले. ' तू सोनियाला घेऊन तिकडे बस. तोपर्यंत मी साफ करतो. '

' अहो, पण त्यांना दाखवा. पोरांशिवाय हे दुसरं कोणी नाही केलं. उंदीर काय अशी माती टाकत नाहीत. त्यांनी भितीवरून टाकली असेल. तुम्ही बोलत नाही म्हणून फारच चढलीत. एकेकांची कानशिलं फोडायला हवीत. नालायक मेली ! '

' ह्या शब्दांचा काही उपयोग नाही. टरफलांसारखे ! मारले तरी लागत नाहीत.'

' मग उपसा असे नेहमी ढीग ! यांचं आपलं नेहमीचंच आहे. जरा इथं नसलो की कचऱ्याचा ढीग करून ठेवतात. दारावर नि भिंतीवर बघा काय लिहिलंय ते! ' उषा कपाळावरचा घाम टिपीत म्हणाली.

' चकणा डोळा मारतो गोळा ' कोणीतरी लिहिलं होतं.

' त्या पांडूनंच लिहिलं असेल. त्याला दाखवा. '

'आल्या आल्या वैताग नको. तुम्ही जा. मी झाडून काढतो. ' असं म्हणून मी केरसुणी हातात घेतली. उषानं सोनियाला म्हातारीकडे नेऊन ठेवलं अन् तीही पदर खोवून कामाला लागली. टोपली कचऱ्यानं भरली.

शाळेतून आल्यावर उषा सांगू लागली, ' गोंद्या सोनियाला दम देत होता.

म्हणाला- आपटून टाकीन. मी म्हटलं- तिला का बोलतोस? तसा म्हणाला- माझ्या वार्तेत कुणी पडा नुका. मी एकेकाचं चांगलं करीन.'

'मग तू काय म्हणालीस ?'

'काय म्हणणार ? गप्प बसले.'

तानाजीच्या घरातील सारी माणसं बोलायची बंद झाली आहेत. उषा म्हणत होती, त्या पोराची आई बडबडत होती, 'आमच्या घरात राहून आम्हासच भीती ! माझ्या पोराला कोण कसा पोलिसात देतो ते मी बघते. मग एकेकाचं चांगलं वारा वाजवून टाकीन !'

मी म्हटलं, 'तू काही बोललीस का ?'

'छे ! मुळीच नाही. हल्ली मी काहीच बोलत नाही. कोणी काही म्हटलं तरी ऐकून घेते.'

दिवसेंदिवस त्रास वाढतच आहे. उषाला म्हटलं. 'आपण ग्रामपंचायतीमध्ये जाऊन बसूया आणि सांगूया– 'जागा द्या, नाहीतर उपोषण करतो.'

'तुम्ही जा – मी पोरीला घेऊन येत नाही. आणि एवढं सामान कुठं न्यायचं ? उद्या तुम्ही उपोषण केलंत तरी तुमच्याकडे कोणी बघणार नाही' उषा स्पष्ट बोलली.

**आब्बासची आई**

आमच्या गंगूच्या खेपंस असाच झाला. गावातली कोण सुईण येवस तयार नाय. एकजन आली, लांब बसान् सांगास लागली- असा करा नि तसा करा. बालतीस आपडास तयार नाय. मुसलमानीन असान आब्बासची. आयस आली. म्हनास लाग्ली, 'परसंगाच्या येलंस कुनी मजा बगू नये.' आप्ल्या लोकांची तिनं लय बालतपना काडलान्. ह्या मराठनींचीच सोवली. आब्बासची आयस असती तर आमास असा धावास नुको होंता. कलल्याबरोबर धावत आली असती. तिच्या हातास पन गून लय. गरोदर बाईस बगल्याबरोबर सांगायची कदी बालत व्हयल ती. ती आस्ताना कालजीच वाटायची नाय! ...तुमास ती वार्नी गोसावीन म्हायती हाय? तिच्या पोटात दोन दिवस दुकत व्हता. गावात जेवड्या सुईणी व्हत्या, तेवड्यांनी परयत्न करून बघतलानी. पन कोनास काय जमंना. सगल्याजनी छातीवर बोट ठेवून म्हनत 'मी सुटका कर्ता, पन पिंडाचा माज् भरवसा नाय!' लय हाल केलानी बाईचं. काय जनींनी हात चालू करून बगतलानी. पन कोनास काय जमंना. बाई बेसूद पडास आली. अक्केर सेवट आब्बासची आयस आली आनी तिनं तिची सुटका केल्यान. त्या येलं ती बाई मरायची, पण तिच्या हातगुणानं जगली. पिंडास जरा नाय धक्का

लावलान. तुमास म्हायती आसंल, आता आमच्या सुरेशएवढा तिचा पोर्गा हाय!

**बाळंतपणासाठी डॉक्टर**

डॉक्टरांच्या दारात जाताच मी हळू आवाजात हाक मारली, 'डॉक्टर आहेत का घरात?'

'ते तिकडे बागेत आहेत,' आतून एक अस्पष्ट आवाज आला. लगेच मी मागे परतून बागेच्या दिशेने गेलो.

'हवा किती छान सुटलीय नाही? मस्त वाटतंय!'

'तुमच्या मांडीवर डोकं ठेवून असंच बसून रहावं असं वाटतंय.' आणि जीभ खुंटल्यागत एकाएकी तो आवाज नाहीसा झाला.

'कोण आहे रे?' काळोख कापीत प्रश्न आदळला.

'डॉक्टर आहेत का?' मी भीत भीत विचारलं.

'काय काम आहे इतक्या रात्रीचं? आणि इकडे यायला तुला कोणी सांगितलं?' अंधारातला माणूस पुन्हा तुसडेपणानं म्हणाला.

'नाही डॉक्टर, मीच आलो.'

'कशाला?'

'बायकोचं पोट दुखतंय, बाळंतपणाचं.' मी खुलासा केला.

'कुठल्या गावाचा?'

'देवाचं गोठणं.'

'ते गाव आमच्या कक्षेत येत नाही आणि एवढ्या रात्री कसं यायचं? त्यापेक्षा तुझ्या बायकोलाच इथं आणतोस तर? उठले, सुटले डॉक्टरकडं. रात्र नाही, दिवस नाही. नॉन्सेन्स!'

'साहेब, तिला इथं कसं आणायचं?'

'अरे, डोली नाही का?' तो पुन्हा गरजला.

'साहेब, डोलीला गावात कोणी गडी मिळत नाहीत.'

'का? गाव ओस पडलं का?'

'साहेब आम्ही दलित. आमच्याकडे कोणी येत नाहीत. म्हणून म्हटलं, तुमची गाडी आहे.'

'एकदा नाही म्हटलं ना? चला, चालायला लागा!' असं म्हणून तो जवळच्या व्यक्तीला म्हणाला, 'चल आपण घरात बसूया. नाहीतर दुसरं कोणीतरी इथं कडमडायचं'. आणि त्यानं तिचा हात हातात घेतला.

**बाळंतीण बाईजवळच्या बायका (दारू)**

'त्या बायकांनी लय म्हेनत घेतलानी हाय. त्यास्नी राती काय तरी देघवस्

हवा.' आई जवळ येऊन मला सांगू लागली.

काय तरी म्हणजे काय?' मी म्हटलं.

'अरे, त्येंनी बालतीस हातबॉट लावलाय– तवा त्यास्नी चायपानी देव्स हवी.'

'मग त्यांना चहा दे ना.'

'अरे, ही चाय नाय, पावसेर पावसेर दारू द्येव्स हवी – तूज कलत नाय कसा ?' आई मला म्हणाली.

'आई, आपण त्यांना मागाहून पैसे देऊ' मी म्हटलं,

'अरे, पैसे द्येवसच हवे, पन ही त्येंच्या मानाची,' आई माझी समजूत घालीत म्हणाली.

'कितीशी लागेल ?' मी आईला विचारलं.

'दोनतीन बाटल्या तरी हवी – तो काशीराम कलपासून सार्का फिरतोय – त्येची बायको, वरची म्हातारी, तिची सून, काशीचा लेक, बाक्र्याची बायको– कलपासून धडपडतायत – त्यांस्नी सगल्यांस्नी थोडी थोडी द्येव्स हवी.' असं म्हणून आई माझ्या कानात हळू सांगू लागली, 'आनि बालतीस पन थोडी द्येवस हवी. तिच्यासाठी जरा चांगलीसी आन – काशीरामास सांग. ता आनून द्येल – त्यास सग्ली म्हायती हाय.'

**पाचवीची पूजा**

भावानं पाचवीचा मांड मांडला. आईनं बायकांच्या ओटया भरल्या. पाचवीला गाऱ्हाणं घालताना आई म्हणाली, 'गाराना घाल–'

'मला घालता येत नाही – तूच घाल.'

'तू तरी घाल रे,' आई भावाला म्हणाली, 'त्यास काय द्येवाधर्माचा कलताय ?'

दोन कोंबडयांचं मटण केलेलं आहे. भावानं दोन बाटल्या दारू वाटली. सगळे लोक झिंगले आहेत, मात्र मी अस्वस्थ झालोय.

यातून आपली कधी सुटका नाही का व्हायची ? उषाला ताप आलाय.

**रूढी**

या साऱ्या धावपळीत गेले पाचसहा दिवस दाढी करायलाही वेळ मिळाला नाही, म्हणून दाढी करायला बसलो. इतक्यात आई म्हणाली, 'बायको बालत झालेली आणि दाडी काय कर्तोस ? लॉक काय म्हणतील ? सुवेर हाय ना ?'

**सुवेर**

'पर्वा सुवेर जातोय. पोर्गेस पालन्यात घालूस हवा. बारसा घालूस हवा'

भीतभीत आई मला म्हणाली...मी मेहुण्यांकडे पुरेसे पैसे काढून दिले. म्हटलं, 'जे जे लागेल ते आणा.'

'आणि ह्या बग – त्यास्नी बालतीस जरा चांगल्यापैकी आनूस सांग. तिच्या-पूर्ती – अर्दी बाटली पुरो !' आई मला म्हणाली, हळूच.

'आई, ती घेत नाही.'

'अरे, पण बालतीस लागते. नाय तर फुडं तरास व्हयल.'

'आनि हृया बग, उद्या भटाच्या हातचं पाणी लागंल. हयचं भट आमच्या वलकीचं नायत. तवा ता मेव्हन्यास सांगान ठेव. तं आनून देतील.'

'पाणी नाही घेतलं तर ?'

'तूज काय सांगावा – तवा तू असा कर्तोस ! अरे, भटाच्या हातचा पानी घेतल्याशिवाय सुवेर कसा जायल ? तूज कसा कलत नाय ?'

### सुवेर आणि भटाच्या हातचं पाणी

उद्या मुलीचं बारसं आणि आडिवऱ्याला समता परिषद ! तिथे बाबा आढाव आणि पन्नालाल सुराणा येणार आहेत. गेलं पाहिजे.

आई म्हणाली, 'उद्या बारसा आणि जातोस खय ? लॉक काय म्हंतील ?'

'आई, मला तिथं जायलाच हवं. मोठी माणसं येणार आहेत.'

'जा, नाय तर न्हा ! तुज्या मनास वाटंल ता तू कर ! मी काय बोलत नाय. बरा, हृया ग्लासात भटाच्या हातचा पानी ठेवलाय. ता पी.' असं म्हणून आई आत गेली.

भटाच्या हातचं पाणी !

वाटत होतं, आईला सांगावं, हृया साल्या भटांनी देश मोडीत काढला तरी तू अजून मला त्यांच्या हातचं पाणी प्यायला सांगत आहेस. अग आई, मला माझ्या नारू महाराच्या हातचं पाणी प्यायला आवडेल, पण त्या भटाचं तू नाव घेऊ नकोस ! अगं, त्यांनीच तर ही आपली अशी दशा केली.

आईच्या नकळत मी ग्लास मोरीत ओतून दिला.

### पाण्याचे हाल

उन्हाळयात सोगमवाडीवर पाण्याचे फार हाल ! पाटाला पाणी असेपर्यंत जरा सुख, पण तो एकदा आटला की सगळयांना त्रास ! कधी कधी दीड–दोन मैलांवरून पाणी आणावं लागतं. पण त्या सर्वांत अधिक हाल आमचे ! स्पृश्य बायकांचं भरून होणार तेव्हा आम्हाला मिळणार. किंवा त्यांच्याखाली भराव लागतं.

## मुलीचं नाव

संध्याकाळी घरी आल्यावर आई म्हणाली, 'पोर्गेस तांदूळ लाव आनि काय ता नाव ठेव.' तांदूळ लावल्यावर सगळी माणसं जमली.

'दादा, पोर्गेचा चांग्लासा नाव ठेव तूच' शांता.

'मास्तर, पैलीच पोर्गी हाय– चांगला नाव ठेवा' शेजारची म्हातारी.

'आदी आयसीस इचार. म्हातारी हाय ना आलेली?' सखूची आई म्हणाली.

'आजी, काय ठेवतेस नातीचा नाव?' सखू आईला म्हणाली.

'मरनारनीचा नाव ठेवूची माझी इच्छा व्हती.'

'तुलसा– चांगला नाव हाय' शांता म्हणाली.

'मास्तर, ठेवता काय? तुमच्या आयसीची इच्छा हाय' म्हातारी मला म्हणाली.

मला प्रश्न पडला. आईच्या इच्छेप्रमाणे खूप वर्षांमागे मेलेल्या बहिणीचं नाव जर ठेवलं नाही तर तिला वाईट वाटेल. मी बराच वेळ काही बोललो नाही.

'त्येंच्या मनात दुसरा आसंल तर ते दुसरा ठेव देत– माजा काय म्हन्ना नाय' आई म्हणाली.

'मी सोनिया नाव ठेवणार होतो' मी धीर करून बोललो.

'सोन्या– सोनिया– शी! ह्या कसला नाव.? जरा काय तरी चांगला ठेवा' म्हातारी म्हणाली.

'मागं बायकोचा ठेवलास ता सुद्धा ह्यास्नी आवडला नव्हता. आता ह्या ठेवतोयस– तापन त्यास्नी आवडणार नाही. ते पाठीमागं म्हन्तात, आमास इचारीत नाय. आपल्या इचारानं वागतो' आई म्हणाली.

'सोनिया काय वायट नाव हाय? बाबास मी सांगन–त्यांस्नी ह्या आवडंल. दादा, तू ह्याच ठेव' शान्ता वादविवाद नको म्हणून म्हणाली.

'बरा, आता वाद नुको– नारळ फोडा' मेहुणा म्हणाला.

## सखू

विहिरीवर कपडे धूत असताना सखू आली आणि म्हणाली, 'तुम्हास कंटाला नाय येत?'

'कसला?' मी दुर्लक्ष करीत म्हटलं.

'ह्या कामाचा?'

'मग कोण करणार? आपले कपडे आपण धुवायला नकोत?'

'लगन करायचा– मग बायको धोवील' तिनं एकदम विषयाला हात घातला.

'लग्नाचा विचार आहे. पण मुलगी कुठं सापडत नाही.'

'मुलीस काय तोटा गेलाय? आपून ताट अस्ल्यावर पोरी काय हव्या तेवड्या

येतील!' मी आश्चर्यचकित झालो. झटकन् कपडे पिळून परत निघालो.

बहीण म्हणाली, 'सोरगत जमली की नाय?'

'नाही.'

'दादा, इथली सखू का नाय करीस? त्येंच्या मनान् दयेवची हाय.'

मी काही बोललो नाही. मनात म्हटलं, असल्या अडाण्या पोरीबरोबर आयुष्य कसं घालवायचं? हिच्याबरोबर रोज भांडत रहायला हवं. त्यापेक्षा लग्न न झालेलं बरं.

संध्याकाळी अंगणात खुर्ची टाकून बसलो असताना सखू आली आणि समोर धक्क्याला टेकून उभी राहिली व म्हणाली, 'बोलत का न्हाय?'

'काय बोलणार?'

'होय, आता आमच्याशी कशाला बोलाल?'

'मला वाटत होतं' असं म्हणून ती बोलायची थांबली. पुढं काय बोलणार हे मी ओळखलं आणि जेवण करायचं निमित्त करून उठून खोलीत आलो.

घरचा निरोप आलाय, 'काम झाला नाय.' सालं एकदा वाटतं ह्या सखूशीच लग्न करून मोकळं व्हावं. आयुष्यात सगळ्याच अपेक्षा कशा पुऱ्या होतील?

कधी कधी वाटतं सरळ सखूच्या गळ्यात माळ घालून मोकळं व्हावं. सध्या चाललेली परवड नको.

माझं लग्न. आज सात–आठ स्त्रियांनी माझ्या आंगाला गाणी म्हणत हळद लावली. त्यात एक सखू. ती हळद लावायला येताच मी म्हटलं, 'सगळ्यांनी कशाला लावायला हवी? खूप झाली आता.' आई म्हणाली, 'लावं दे. येका तरी कुवारनीचा अंगास हात लागास हवा.' तिच्यासमोर नुसत्या चड्डीवर उभं राहायचं आणि तिचा हात अंगाला लावून घ्यायचा. मला कसं तरी वाटायला लागलं. आणि तिनं तर कमालच केली. माझ्या हातापायांना, पाठीपोटाला आणि तोंडाला पुन्हा पुन्हा हळद फासू लागली. म्हटलं, 'पुरे.' तरी ऐकेना. म्हणाली, 'आता पुना आंगास हात लावूस कदी मिल्नार हाय?' आणि खो खो हसली.

रात्री सखू येऊन उषाला म्हणाली, 'तुम्हाला काय, शेतात जायला नको, घरातल्या घरात काय ते करायचं– तुमची आपली मजा.'

मी म्हटलं, 'तू सुद्धा मास्तर नवरा बघ. मग तुझीसुद्धा मजा होईल.'

'आम्हाला मास्तर मिळतोय!' ती निराशेनं म्हणाली.

'का नाही मिळणार? तुझ्यासारख्या चांगल्या मुलीला नक्की मिळेल.'

तशी माझ्याकडे बघून हसली. मग म्हणाली, 'तुम्ही राजापूरला कधी जाणार आहात?'

'का?'

'सांगेन मग' असं म्हणून निघून गेली. हृचा पोरीचं कुठंतरी जमलं असतं तर बरं झालं असतं.

दुपारी जेवताना म्हातारी वाकून बघून गेली. उषा सांगत होती. 'माझ्या दांडीवर वाळत घातलेल्या साड्या सखू निरखून पहात होती. विचारणार होते 'काय बघतेस' म्हणून. पण नाही विचारलं. यांना माझ्या चांगल्या साड्या बघवत नाहीत.'

'अग बरोबर, कुणालाही वाटतं आपल्याला चांगलं मिळावं असं. बरं झालं, साडीवरून आठवण झाली- आपल्या बयोक्काला एखादी जुनी साडी दे. तिच्या अंगावर नेहमी फाटक्या साड्या असतात. आणि एक पोलका.'

'अहो, पण साड्या कुठं आहेत जास्त? हृया तीनच आहेत ना? आणि ती एक साफ फाटत आली.'

'अग, त्यातलीच एक दे. मला तिचे हाल बघवत नाहीत.'

'घेऊन दया दुसरी नवीन' उषा जरा रागात म्हणाली.

'अगं, शक्य होईल तेव्हा घेऊ. पण सध्या एक दे.'

त्यावर ती पुढं काही बोलली नाही. मी तिला समजावून सांगणार इतक्यात बयोक्का, उषाचंच पातळ नेसून दत्त म्हणून हजर. मी पहातच राहिलो. मग जरा नाटक केलं.

'काय ग उषा, ही आपली पातळं देतेस दुसऱ्यांना– मग तुला कोण घेईल, तुझा काका?'

'आता पुरे झालं. ताईला वाईट वाटेल,' असं म्हणून तिनं बयोक्काला बसायला पाट दिला. त्या दोघी बोलत बसल्या. पाठोपाठ तिची मुलं येऊन बसली.

लाकडं पेटेनात म्हणून उषा वैतागली. शेवटी मी उठून फुंकू लागलो तरी पेटेनात. खोली संपूर्ण धुरानं भरली. डोळे लाल झाले, तसा डोळे चोळीत मी अंगणात जाऊन उभा राहिलो. बायकांना असा पळ काढता येत नाही.

थोड्या वेळानं सखू आली आणि म्हणाली,

'डोळे का चोळता?'

'लाकडांनी रडवलं.'

'म्हणजे?'

'अग, खोलीत धूर झालाय.'

'आमच्या घरात इतका नाय बा होत.'

'तुमची चूल कोपऱ्यात. आमची दारासमोर पडते. शिवाय लाकडं ओली'

'सोधनीची लाकडा चांगलीच असतात. तुमच्या बायकोला रानात जायला नको.'

आत आल्यावर उषा म्हणाली,

'एवढं काय बोलत होता?'

'तू कुठून पाहिलंस?'

'मी कुठूनही पाहीन. बोलत होता की नाही, सांगा.'

'अग, बोलत होतो, नाही कुठं म्हणतोय? पण काय माहीत आहे का?'

'माहीत आहे सगळं' उषा घुश्शात येऊन म्हणाली.

'अग, उगाच गैरसमज करून घेऊ नको. ती म्हणाली, 'डोळे का चोळता?' तेव्हा मग मी लाकडांबद्दल बोललो.'

'काय पण बोला. माझे कानावर हात आहेत. मागे एकदा काय झालंय ते तुम्हाला ठाऊक आहे ना? तुम्ही जाता साधेपणानं बोलायला , पण उदचा हे लोक त्याचा गैरफायदा घेतील आणि मग बसाल पस्ताव करीत. मी काय बोलतच नाही. पण एक सांगून ठेवते. तिचं वागणं, बोलणं मला जरा वेगळंच वाटतं. तुमच्याबद्दल ती खूपच बोलत असते. परवा तुम्ही शाळेत गेल्यावर ती आली होती. तुमचा नवा रुमाल हातात घेऊन म्हणत होती, 'किती छान आहे रुमाल! मास्तरांस्नी कपड्यांची पारख लय चांगली हाय.' तसंच एकदा तुमचे दोन्ही गंजीफ्रॉक्स दांडीवर होते. ते पाहून म्हणाली, 'आज मास्तर बॉडी घालून नाय गेले शाळेत?' मी म्हटलं, 'नवी घालून गेलेत.' अशी अगदी बारीक सारीक गोष्टींची चौकशी करीत राहील.'

'अग, ती मूर्ख आहे. तू कशाला काळजी करतेस? तुला जेव्हा संशय येईल ना, तेव्हा तू माझा कान धर. बस्स?'

'तुमची मला खात्री आहे हो. पण ह्या अशा पोरीचं काय सांगावं? म्हणून म्हणते.'

**पत्नी, सखू**

**खोलीवर** आल्यावर उषा म्हणू लागली,

'सखू टोमणा मारत होती.'

'काय म्हणाली?' मी म्हटलं.

'गोरी माणसं घाणेरडी असतात.'

'पण तू कुठं घाणेरडी आहेस? जगाचं सांगत नाही, पण आपल्या वठारात तुझ्याइतकी स्वच्छता पाळणारं दुसरं कोणीच नाही. बायको म्हणून कौतुक करीत नाही, खरं ते बोललो. तेव्हा तू लोकांचे मनाला लावून घेऊ नकोस.'

सखू म्हणत होती, 'आमच्या बाबांचा तुमच्यावर लय भरवसा व्हता, पण ता

घालवलात. येवडा चांगला करून सवरून आमीच वायट झालाव्.' म्हणजे मी हिच्याशी लग्न केलं नाही याचा असा हे लोक सूड घेताहेत तर.

## गंगू चर्चा

'अरे, ते मटक्याची गंगू हल्ली खय दिसत नाय रे?' पदू पावटचाची शंका.

'भडव्या, आजून तू झोपेत हस की काय? साल्या, तिना वाजवल्यान् ह्या नाय तुवा ठावक? गावात न्हावन् गावातला कळत नाय? भडव्या, जीव दे जा शिपीभर पान्यात!' वासू पटवे.

'नाय बा, खराच म्हायत् नाय. देचवाशपत! सालो, नग मोतर अस्सल व्हतो. खय दिल्यान्?'

'साल्या दिल्यान् खयची? हात धरून गेली.'

'कोनाबरोबर?'

'तो देवी डाक्टर व्हतो ना– त्येच्याकडे न्हावक त्येच्याबरोबर गेली.'

'त्येंचा व्हता येवढा म्हायत् व्हता. पुड्चा ह्या ठाव्क नाय.' पदू खो खो करून हसत म्हणाला.

## चांबारनीचा वडा

वडे तर एकेक नमुनेदार असायचे, नुसते पिठाचे गोळे आणि मधे भोक. असे वडे पाहिल्यानंतर मला वाटायचं, हे लोक 'चांबारनीचा वाकडा वडा' असं का म्हणतात? खरं म्हणजे कुळवाडणीचेच वडे वाकडे असतात.

एकदा आईला मी म्हटलं, 'आये, असा का गे, लॉक म्हंतात– चांबारनीचा वाकडा वडा?'

'मेलं! येकीनं खय तरी केलान् आसंल, ता सग्ल्यांस्नी लाग्ला,' आई म्हणाली.

## सवर्ण मुलगी

मागे एकदा अशाच एका मुलीशी ओळख झाली होती. दिसायला बऱ्यापैकी होती. हसायची– गप्पा मारीत बसायची. पण शेवटी माझी जात कळल्याबरोबर यायची बंद झाली. वाटेत भेटली तेव्हा म्हटलं,

'हल्ली बोलत का नाहीस?'

त्यावर म्हणाली 'काय बोलायचं?'

'पूर्वी बोलत होतीस, तसं!'

'तेव्हा मला माहीत नव्हतं!'

'म्हणजे काय?' मी जरा आवाज चढवून बोललो.

'तसं नव्हे, पण आमच्या बाबांना आवडत नाही. एकदा ते म्हणाले, 'ते आपल्यापैकी नाहीत, ते मागासलेले आहेत,' तेव्हा मला कळलं. तुमच्या बोलण्यावरून, वागण्यावरून मला वाटायचं तुम्ही....'

'चूप ! पुढे बोलू नको ' मी चिडूनच बोललो.

'रागावलेत की काय ?'

म्हटलं, 'जा आता.' आणि मी चालू लागलो.

'हे बघा, माझी दोन पत्रं असतील तुमच्याकडे–'

'ती काय करू ?'

'प्लीज, परत द्या !'

'नाहीत मिळणार !'

असं म्हणून मी सटकलो– आणि तेव्हापासून कुठल्याही पोरीशी संबंध ठेवू नयेत असं वाटत होतं. पण मालती दिसली की मात्र कसंतरी होतं.

## मापट्याची पोर (आत्महत्या)

'काय मास्तर, तुम्ही ऐकलाव ?'

'काय बरं ?' मी म्हटलं.

'त्या मापट्याच्या पोरीनं ईस घेतलान्.'

'खरंच ? कधी ?'

'अवो, आज सकालची गोस्ट.'

'मग ?'

'अवो, मग काय ? धावाधाव केलानी म्हनू वाटावली, नाय तर मोटा पेच व्हता. तुमास म्हायतच नाय का काय ? सगल्या गावभर झाला.' हातातली काठी गोल फिरवीत दोरकू बोलला.

'नाही बुवा, मला खरंच नाही ठाऊक. विष का घेतलान् रे ?'

'अवो, काय गुरुजी, रांडेचा लफडा होता, ता उघडकेस आला. पान्यात हगला म्हनू काय उमटाचा र्‍हाता ? वर आला.'

## मन्या वाण्याच्या मुली

मन्या वाणी ! ... बायको दुकानातला गूळ आणि खोबरं चोरून खायची म्हणून त्याने तिला घरातून हाकलून लावली. आणि एका कुणबी बाईला घरात ठेवली. तिला चार मुली झाल्या. पण त्या शिंदळकीच्या म्हणून त्यांची लग्नं जमेनात. मन्या म्हणे, 'लग्नं झाली तर जातीतल्या जातीत, नाहीतर पोरी जातील मातीत !'

बाई म्हणे, 'आपण आमच्या समाजातल्या मुलांना देऊया.'

पण हाच तयार होईना. शेवटी तीन पळून गेल्या आणि एक झुरून मेली.

## दाजी खोताच्या मुली

दाजी खोताचा आता काय ऱ्हायला नाय ! त्यास पैल्या सग्ल्या पोरी झाल्या. मोटी कांती राजाबरोबर व्हती, दुसरी भानू साटमाबरोबर आणि धाकटी केशव जुवेकराबरोबर पलान् गेली ... फुडं खोत मेला. पाटोपाट त्येची बाय्को पन मेली आणि घराची दानादिस्पीट लागली. कूलकायद्यात सग्ली जमीन गेली आणि पोरास्नी कोन जुमानी नाय– पैसा अडका व्हता ता सग्ला सोपला. म्हनू मग बंग्ली कांतीनं सिव्न्यातल्या दुकानदारास इकलान् आणि आपून काय दिवस सोप्यात ऱ्हाव्स लागली. तवा त्या जवान पोरी आनि दिसास पन काय गोऱ्या गोऱ्या, नुस्त्या पिटासार्क्या ! पन हुंडा द्येव्स पैसं नायत म्हनू लग्ना व्हयत ना ! मग अशा कोनाबरोबर आसत. आमच्यात तर किती हसलं आस्तं ! पन आमच्यात अशा कोन ऱ्हायत नाय– पोर जरा जानती झाली की तिचा लगन झालाच. पन त्येंच्यात तसा नाय– ऱ्हौरा हुंडा घेनार तवा लग्नास उबा ऱ्हानार, म्हनू अशा कोनाबरोबर पन जातात-पन मोटयाच्या पोरी म्हनू कोन बोलंना. मोटं कस्लं ? काप गेलं आनि भोकं– ऱ्हाली तशातली म्हन ! सेव्टी बरंच दिवस झालं– ती पन कंटाल्ली एक दिवस-घरात हांडाभांडा काय व्हता– ता सग्ला गोला करून राजापुरास इकलान् आनि मुंबैस गेली, ती काय आजमितीस परत आली नाय. काटयातली आमी जमीन कर्ताव ती त्येंच्या पैकी हाय. येकदा पत्र आला व्हता खंड पाठवून दे म्हनू. त्येनंतर पत्र नाय आनि तोंड पन दिसला नाय. आता सग्ली जमीन– जागा ह्येनें (दुकानदारानं) आपल्या ताब्यात करून घेतलाव. गेल्या वर्सा माज् म्हनास लाग्ला,' कांतीचा खंड आता माज्याकडं आनून द्याल– तिचा सग्ला आता माज्याकडं हाय,' पन मी काय द्येला नाय. मी म्हटला, स्वोता बाई हय आल्यासिवाय आनि तिनं सांगतल्याखेरीज मी कसा द्येनार?' मग गप्प बसला.

## चांभाराची बायको

आपल्या बायका त्यांच्या बायकांपेक्षा गोऱ्या किती आहेत ते लिहा. अहो, आता विषय आला म्हणून सांगतो, अगदी माझ्याच बायकोचे उदाहरण देतो. ती इतकी गोरी आहे की माझ्याकडे एकदा बर्वे नावाचा माझा एक ब्राह्मण मित्र आला होता. माझ्या बायकोला पहाताच त्याने मला विचारले की 'अहो जालगावकर तुम्ही तुमची बायको आमच्या कुळातली आणलीत की काय?' त्यावर मी त्याला म्हटलं, 'नाही बा! माझी धर्मपत्नी माझ्याच जातीतली आहे.' त्यावर तो तिच्याकडे पहातच बसला.

## गोष्ट

एका गावात एका चांभाराची अशीच एक सुंदर बायको होती. भटणीपेक्षा दिसायला गोरीगोमटी होती. तिच्यावर एका भटाची नजर होती. तीही चांगली जवान बाई होती. दोघांची बोलाचाली झाली. पण भटास प्रश्न पडला की हीस भोग दिला तर आपण बाटणार. तेव्हा काय करणार? पण भटच तो! त्याने युक्ती काढली. त्याने केळीचे एक मोठे पान काढले आणि त्याला योग्य ठिकाणी भोक पाडून ते तिच्या अंगावर ठेवले आणि मग आपली इच्छा पूर्ण करून घेतली. केळीच्या पानाला बाट नाही. तात्पर्य काय, की आपल्या बायकांचा भटांनाही मोह आवरत नाही.

## बाबूरावची बायको

शाळेतून आल्यावर बाबूरावाच्या घरी गेलो. बायको म्हणाली, 'कुठे गेलेत ते मला माहीत नाही.' थोडा वेळ वाट पहावी म्हणून बसलो. इतक्यात त्याच्या बायकोनं चहाचा कप आणून बाजूला ठेवला व जाता जाता म्हणाली, 'चहा घेऊन झाल्यावर कप त्या कोपऱ्यात ठेवा. आज जरा आमच्याकडे भटजी येणार आहेत. एक धार्मिक विधी आहे.'

वाटलं, कप असाच जमिनीवर आपटावा. पण मग चहावरोबर रागही गिळला.

## शेजारच्या सास्वासुना

शेजारी कडाक्याचं भांडण जुंपलं. देवकी आणि म्हातारी एकमेकींना शिव्या देत होत्या. मग म्हातारी लेकाला उद्देशून म्हणाली,

'बग बग तुज्यासमोर कशी शिव्या देतेय ती. पण तुजा धाक असता तर अशा शिव्या देलान् नसत्या.'

तरी सखाराम आपला गप्प. फळीवर बसून आरीनं वहाण टोपीत होता. शेवटी म्हातारी वैतागली. मग जमिनीवर बसून कपाळ आपटून घेऊ लागली. मोठमोठ्यानं ओरडू लागली, 'मेल्याचा कुलक्षा व्हयल! ह्या रांडनं माजा थारा मोडलान् ' वगैरे.

मग सखाराम भडकला. हातातली वहाण घेऊन बायकोला धोपट धोपट धोपटू लागला. तसा म्हातारीचा जीव शांत झाला.

मग देवकी नवऱ्याच्या हातून सुटून आमच्या खोलीत धावत आली आणि मला म्हणाली, 'मास्तर, बगा बगा मेल्यानं किती मारलान् हाय ता. मी आता पोलीस पाटलाकडं जाता आनि हिचा बरोबर करता. तुमास साक्षी देवस हवी.'

आमच्या पाठीस उगाच लफडं नको. आम्हास काय सगळीच सारखी. म्हणून म्हटलं,

'जरा तुम्ही शांत व्हा—उगाच घरातलं भांडण बाहेर कशाला नेता? आणि तुम्हा दोघींच्या भांडणामुळं त्याचं डोकं फिरायची वेळ आली. तुम्हाला हे समजायला हवं.'

मी तिला समजावून सांगितलं तरी ती ऐकेना. तेव्हा मग उषाला म्हटलं, 'आता तू तरी तिला समजावून सांग.'

ह्यांच्या भांडणाचं कारण काय, तर सासू सुनेला भरपूर वाढीत नाही आणि सून सासूच्या नकळत चोरून भाकरी खाते. म्हणजे खरं कारण भूक.

## शाळेतल्या बाई

शाळेच्या मधल्या सुट्टीत नवी पुस्तकं चाळत होतो. इतक्यात एक बाई आल्या आणि म्हणाल्या, 'तुम्ही हल्ली खूप पुस्तकं वाचता, एक छानसं मला द्या ना !'

म्हणणार होतो, वाचनासाठी खर्च करावा लागतो, पण बोललो नाही. म्हटलं, 'यातलं तुम्हाला हवं ते घ्या आणि वाचून होताच लगेच आणून द्या !'

ती बराच वेळ पुस्तकंच चाळत राहिली. मी मनात घाबरलो. म्हणत होतो, 'बाई, दूर रहा. दोघांना एका वर्गात पाहून कुणाच्या तरी डोक्यात काहीतरी यायचं आणि नस्तं वादळ उठायचं.' मागच्या प्रसंगापासून कुठलीही बाई समोर आली की भीतीच वाटते.

मी म्हटलं, 'घ्या लवकर.' तरीही ती घुटमळत राहिली. काही ना काही बोलत राहिली. मग मीच उठून बाहेर गेलो.

## शिक्षिका

'आम्ही शाळेत गेलो नाही तरी आमास सगळं समजतं. कोण मास्तर कसा आहे, कोण बाई कशी हाय, ह्या आमास बरोबर कल्ता. हल्ली ती मटकर की कोण बाई आलीय ना, ती काय बाई हाय ? तिचा लक्षण काय चांग्ला दिसत नाय.'

'राकुदा, कोण तरी आसात सोयरो. त्यासिवाय काय येवढी पातला पेन्ता ?'

## साडी

सकाळी शाळेत एक बाई दुसऱ्या बाईची साडी पाहताना म्हणाली, 'का हो बाई, केवढ्याला ही घेतलीत साडी ?'

'एकशेवीस रुपयांना !' मानेला विशिष्ट झटका देत ती म्हणाली.

'अय्या, खूपच छान आहे हो ! मीही घेणार असली!'

मी ऐकून चकित झालो. इतक्या भारी साड्या यांना परवडतात तरी कशा ? बरं, एक नाही दोन नाही, दहा बारा साड्या !

## सरोजिनी वैद्य

प्रा. शंकर वैद्यांच्या घरी गेलो. बेल वाजवताच बाईंनी दार उघडलं आणि म्हणाल्या, 'कोण पाहिजे ? '...

मी म्हटलं, 'मी माधव कोंडविलकर. '

तसा त्यांना खूप आनंद झाला. त्या म्हणाल्या, 'बसा, वैद्य जेवताहेत....बाई थोड्या वेळानं, नव्हे, लगेच पुन्हा बाहेर आल्या आणि म्हणाल्या, 'तुम्ही जेवणार का ? '

'माझं जेवण तिकडे तयार असेल. '

'बरं असू दे. चला – थोडं जेवून घ्या. '

...सरोजिनीबाई आम्हाला वाढत होत्या. वैद्यांनी त्यांची ओळख करून दिली, 'या सरोजिनी वैद्य, माझी पत्नी ! '

बाईंचा मौजेत एखादा लेख मी वाचलेला होता. या पलिकडे त्यांची मला काहीच माहिती नव्हती. नंतर आमचं खूप बोलणं झालं. दोघांनी विचारपूस केली.

खाली सौ. सरोजिनीताईंनी चार ओळी लिहिल्या.

'तुम्ही सुट्टीत आमच्याकडे या. तुमची पुढील सर्व वर्षभराची वाचनाची सोय मी करून देते. सर्वांचा प्रश्न सोडविता आला नाही तरी तुमचा निश्चित सोडविता येईल. '

सौ. सरोजिनीताईंचे पत्र आणि त्यांनी पाठवलेले 'समग्र फुले वाङमय' हे पुस्तक मिळालं. बाई आपल्या पत्रात लिहितात,

'सोबत तुम्हाला हवे असलेले फुले वाङ्मय पाठवीत आहे. तुम्ही मागच्या खेपेस मागितलेली पुस्तके पुन्हा कधीतरी पाठवीन. त्यांची नावं लक्षात आहेत. सुटीत इकडे आलात तर जरूर भेटालच. '

'विद्यापीठास महात्मा फुले समग्र वाङ्मय पुस्तक हवं आहे. मार्चमध्ये सर्व पुस्तके परत करून, हवी असल्यास पुन्हा घ्यावयाची असतात. तसे न केल्यास मला नवीन अजिबातच मिळत नाही. तुम्ही पुस्तक कोणाबरोबर तरी पाठवून द्या. सुट्टीत येणार का? '

म्हणजे कदमांची कमाल आहे. अजून त्यांनी पुस्तक पोचवलं नाही ?

सौ. सरोजिनीताईंचं पत्र आलं. त्या म्हणतात, 'कदम यांच्याकडून मला अद्याप पुस्तक मिळालं नाही, त्यांचा पत्ता मला कळवून ठेवा. '

काय एकेक माणसं असतात! गृहस्थानं अद्याप त्यांना पुस्तक नेऊन दिलं नाही.

सौ. सरोजिनीताईंनी दुर्गा भागवतांना फोन करून कळवलंय. आता जायला हरकत नाही.

अडचण सांगताच सौ. सरोजिनीताईंनी शंभर रुपये काढून दिले.

सौ. सरोजिनीताईंचं पत्र आलंय. त्यांनी आपल्या पत्रात लिहिलंय, 'तुमचं पत्र आणि मनीऑर्डर मिळाली. दोन्हीसही उशीर झाला असे माझ्या मनातही आले नाही. चि. सोनियास फिरून बरं नव्हतं हे ऐकून मात्र वाईट वाटले. तिची तब्येत अजून पूर्ववत झाली नाहीं असाच ह्याचा अर्थ दिसतो. तुम्ही योग्य ती काळजी घ्यालच. तिचा आहार हळूहळू, अंदाज घेत घेत वाढवा. एखादा पदार्थ सोसत नाही असं ध्यानात आलं तरच तो वर्ज्य करा. बाकी जेवढे साधे आणि नेहमीचे, तेही वेळच्या वेळी तिला दिल्यास ती लवकर चांगली वाढीला लागेल. या खेपेस एका विचित्र योगायोगात तुमची अधिक ओळख झाली. आपण बोलत होतो त्याप्रमाणे तुम्ही तुमच्या अनुभवातून, दैनंदिनीतूनही खूप साधू शकाल असा मला विश्वास वाटतो. जरा पूर्ववत होताच त्या दिशेनं विचार करा.

'आयुष्य जगण्याची संधी चांगल्या रीतीनं उपयोगात आणायची आहे.'

सोनियाला अद्याप बरं नाही. उलटया आणि जुलाब. काय करावं ? औषधं चालू आहेत. दिवाळीत मुंबईला मजा करायला आलो आणि ही अशी मजा होतेय. सोनियाला जपलं पाहिजे. दुपारी सोनियाचं जास्तच झालं. धावत धावत सौ. वैद्यांकडे गेलो. दार उघडताच माझ्या घाबरलेल्या चेहऱ्याकडे पहात म्हणाल्या, 'लेकीचं कसं आहे ? '

'काही कमी नाही. उलट जास्त झालंय.'

'कुणाला दाखवलंत ? '

'तिथल्याच एका गल्लीतल्या डॉक्टरांना.'

'मग असं करा. माझ्या ओळखीचे दादरला एक डॉक्टर आहेत. मुलांचे स्पेशालिस्ट. त्यांना आपण दाखवूया.'

'खर्च कितीसा येईल ? '

'तुम्ही घाबरू नका. तुम्ही असं करा. तिला तिथे घेऊन जा. इकडून मी येते.'

असं म्हणून वैद्यताईंनी ताबडतोब डॉक्टर पोतदारांना फोन केला. नंतर माझ्याकडे एक चिठ्ठी दिली. लगबगीनं चहा करून आणला आणि मला म्हणाल्या, 'तुम्ही काळजी करू नका. ते डॉक्टर चांगले आहेत. आमच्या निरंजनचे तेच डॉक्टर.'

सायंकाळी आम्ही सोनियाला घेऊन गेलो. पाठोपाठ बाई आल्या. डॉक्टरांना भेटल्या. त्यांना सारं सांगितलं. तेव्हा जरा धीर आला.

सकाळीच सौ. वैद्यबाईंचा दवाखान्यात फोन. 'लेकीची तब्येत कशी आहे ?

थोड्या वेळानं मी येते. '......

वायावायो आणि तिच्या नवऱ्यानंही आमच्यासाठी खूप त्रास घेतला.

आज सोनियाला सौ. बायाबायोच्या झोपड्यावर घेऊन आलो. प्रा. सरोजिनी-ताईंचे किती उपकार झालेत ! डॉक्टरांचे दीडशे रुपये त्यांनीच दिले. त्यांची ओळख नसती, त्यांनी धावपळ केली नसती तर आपल्या सोनियाचं काय झालं असतं?

बाई किती थोर आहेत! आयुष्यात या दाम्पत्याला कधी विसरता येणार नाही.

## मालती

मालती पुन्हा गावी आली. वाटेत येताना भेटली. मी बोलायचं टाळीत होतो. मग म्हणाली (हसून), ' विसरलेत की काय ? '

' कसा विसरेन ? चांगली आठवण आहे. '

' मागे दोनतीन पत्रं पाठवली – उत्तर दिलेत नाही. '

' काय लिहायचं ? अन् कोणाच्या तरी हातात पडलं तर अनर्थ व्हायचा. मला येथे दिवस काढायचे आहेत. तू चार दिवस येशील नि जाशील. '

' इतकं भिता कशाला ? ' ती निर्भीडपणे म्हणाली.

' अगं, भिण्याचा प्रश्न नाही. आपण जरा कुठे बोलत आहोत असे असं जरी कुणाला कळलं, तरी सगळे कान टवकारून ऐकू लागतील अन् नस्तं रान उठवतील, म्हणून म्हणतो.'

' उद्या आमच्या घरी या ना. '

' तुझ्या वडिलांना मी आलेलं आवडेल का ? '

' मग असं करते. उद्या तुमची शाळा सुटल्यानंतर मीच येते. तिथं आमची शेती आहे. शेत पहायला म्हणून येईन अन् मग भेटेन. संध्याकाळी तिकडे फारसं कोणी नसतं ' असं म्हणून ती घराकडे वळली.

ह्या पोरीला कितीही टाळलं तरी ती यायची, बोलायची बंद होत नाही.

(शाळेत) मालती आली आणि दरवाज्याच्या आत भिंतीला टेकून उभी राहिली. बराच वेळ मी बोललो नाही, तसं म्हणाली,

' रागावलेत की काय '

' कशाला ? '

' बोलत नाही म्हणून म्हणते. '

' तू येतेस, पण मला त्रास होतो. '

' कसला ? '

'मला निवांतपणे वाचता येत नाही. शिवाय लोक काहीतरी म्हणतील.'

'त्यांना इतकं कशाला भिता ?'

'मालती तुला वाटत असेल, आपण अजून मुंबईत आहोत. पण तशी भ्रमात राहू नकोस. अगं, हें खेडं आहे. अगं इथं भा म्हणताच भानगड म्हटल्याशिवाय लोक रहाणार नाहीत, म्हणून म्हणतो.'

'आता पुन्हा नाही येणार बरं का. अगदी कधीच नाही येणार !'

तिचा स्वर ओलाचिंब होता. 'म्हणजे ?' मी चकित होऊन विचारलं.

'मी एकदोन दिवसात मुंबईला जाणार आहे म्हणून म्हटलं, एकदा शेवटची भेट घेऊन जावं. माझं आता लग्न जमलंय.'

तिनं जाणार म्हणताच मला कसंतरी झालं. 'मग पुन्हा कधीच येणार नाहीस ?' मी न राहवून म्हटलं.

'येईन, पण कधीतरी—' असं म्हणून ती लाजली आणि झटकन् जवळ येऊन माझ्या हाताशी चाळा करीत उभी राहिली. बोलता बोलता माझा हात नकळत तिच्या गोऱ्या गोऱ्या लुसलुशीत अंगावरून फिरत होता.

ती तृप्त होऊन घराकडे जाताना हात हालवीत होती व मला म्हणाली, 'मला कधी विसरू नका !'

थोड्या वेळानं मी खोलीबाहेर आलो.

उषा खुर्चीत बसून तांदूळ निवडीत होती. तिच्याकडे पहाताच मला अपराध्या-सारखं वाटलं. मनात म्हटलं, 'बाई, मला क्षमा कर !'

## जानूची आई

होळीतल्या जानूची आई आली आणि जमिनीला टेकता टेकता रडू लागली. आई बावरून म्हणाली, 'वारन्या, का रडतास ?'

पदराने डोळे पुशीत ती म्हणाली, 'लेकानं मारलानं आणि घरान्‌ना हाकलून लावलान्.'

...मुलगा आईला मारतो. हे मी कधी ऐकलंच नव्हतं.

'काय झाला मारूस ? त्यास काय मस्ती आली ?' आई म्हणाली.

'मेला बायकोच्या बुदीनं वागतो आणि माज मार्तो.' जानूची आई सांगत होती.

आईनं तिला चहा करून दिला आणि जेवण झाल्याबरोबर तिला प्रथम वाढलं.

## म्हातारी

रात्री पांड्याची म्हातारी आली आणि हळू आवाजात म्हणाली, 'मास्तर, तुमास मनभर भात हवा काय ? इतरांपेक्षा मी सस्ता घेन...'

'मला नकोय–'

'थोडा तरी घ्या,'

'उद्या सांगेन.' असं म्हणताच गेली. रात्री मी तातीला म्हटलं, 'देवकी भात का विकते ?'

'पैसे कर्ते.'

'पण असं का ? गुपचूप ?'

'पैसे साठवून ठेवते.'

'त्यांची शेती फार थोडी दिसते.' मी म्हटलं.

'शेती कस्ली ? सग्ला धाबारा मन भात पिकत असंल – पण तिची सवय वायट. भात चोरून इक्ते आनि तिकडे लेकीची भर करते.'

काय म्हणावं याला ? लेकाचं खायचं अन जावयाचं नाव सांगायचं. त्यातलाच हा प्रकार !

## राम्याची म्हातारी आई

दोघेही आपापल्या घरी गेल्यावर म्हातारी हळू आवाजात म्हणाली,

'हा मेला राम्याच लय लबाड हाय्. गावातलं सगळं गिराक गुरफटून टाकील. सग्ला आपना येक्टयास खाव्स मिलास हवा अशी त्येची बुद्धी ! दुसऱ्यास काय पॉटच नाय ?' म्हातारी अनुभवाचं बोलत होती.

## हरीची बायको

(रात्री बाराच्या सुमाराला) हरीच्या घरात आरडाओरड सुरू झाली, म्हणून उठून गेलो. साऱ्यांच्या डोळ्यांत झोप आणि संशय होता. मी पांड्याकडे प्रश्नार्थक नजरेनं पाहिलं. तो म्हणाला, 'ती कुठं तरी घाबरली. काळोखातून कुठून तरी येत होती.'

हरीनं बायकोच्या अंगावरून उडीद, नारळ वगैरे उतरून टाकले. तरी काही कमी होईना. थोड्या वेळानं आम्ही परत आलो. वासूची बायको म्हणाली, 'बाबल्याकडे जात होती आसंल– वाटंत खय घाबरली. रांडेस येवढा न्हौरा असून दुसऱ्याचा नाद ! न्हौरा काय वायट हाय ?......'

कधी तरी ऐकलेल्या अफवेची आठवण झाली. तिला म्हणे हरी पसंत नाही.

# तराळ अंतराळ

शंकरराव खरात

२५५२८

## आई

दारात मला गेनुबुवा तराळ दिसताच मी आईला बोललो, ‘ आये ! तराळ आलाय.’ माझ्या आईनं तराळाला बघताच डोईचा पदर नीट केला.

**आईचा राग**

आम्ही घरी आलो तोच आईनं आण्णाला विचारलं, ‘ काय वो, कुणाचं पतर हाय ?’

‘ अगं ती धोंडाई, माजी भण, मेली.’ ऐकून आई हळहळली. मग थोडा वेळ थांबून आईनं विचारलं, ‘ पण पतर वाचायला एवढा येळ लागला ?’

‘ अगं, त्यापाय मास्तराची लाकडं फोडली.’ तोच आई फणफणली, ‘ पतरापाय एवढी लाकडं फोडून घेतली, मग तो मास्तर उद्या मेला तर त्याची किती लाकडं फोडावी लागतील ?’

तिला असं गुराढोरासारखं राबवून घेतलेलं खपायचं नाही.

माझ्या आईला अशा गोष्टीची चीडच.

**गळकं घर आणि आई**

आईनं घरातला सगळा पसारा आवरला होता. चुलीला आडवा पालथा तवा लावला होता. चुलीवर कोरड्यासाचं गाडगं ठेवलं होतं. दुसऱ्या चुलीवर भाकरीचं टोपलं ठेवलं होतं. भांडी वासणं चुलीपुढं गोळा करून ठेवली होती. माझी बहीण शेवंता रानातून दमून आल्यानं आल्या आल्या भाकरीचा टुकडा खाऊन झोपली होती. थोरली बहीण पवित्रा दारातून पावसाकडं बाहेर बघत होती .:. आईबाला पावसाळी रात्र जागून काढावी लागत होती.

आईबाला अशा पावसाळी रात्री घरातलं पाणी भांड्यात, भगुल्यात, गाडग्यात धरून बाहेर टाकण्यासाठी रात्रभर जाग्रणं होत होती ... नेमका रात्रीचा रप्रप् पाऊस पडू लागला तर बसल्या जागी वडिलांचे डोळे वर आढ्याकडे जात असत. आईचेही डोळे वर आपोआप फिरकत असत. त्यांना पूर्ण कल्पना असायची की आता घरात जागजागी पाणी गळून त्याची धार लागेल. त्यातच आईला नेमकं

माहीत होतं की जात्यावर गळणार, चुलीवर धार लागणार, शिक्यावर टपटपणार, पाठभिंतीला गाडग्याच्या उतरंडीवरून पाण्याचं झिराप झरझर खाली सरकत येणार. असं वरून आलेलं पाणी घरात जमिनीवरून कुठं, कसं, कोणत्या बाजूनं वळणार याची पुरी कल्पना आईला होती.

पावसाचा जोराचा रंग दिसताच आई लागलीच अंथरलेल्या गोधडचा, वाकळा, पोत्याची पटकारे लगोलग आवरू लागली. जिकडं पाण्याचा ओघळ येणार नाही, ज्या बाजूला पाण्याची धार सरकणार नाही, अशा बेतानं, अशा हिशेबानं आईनं गोधडचा खाली टाकल्या. धाकट्या भावांना आईनं आडवंतिडवं टाकलं, शेवा कोरड्या रहाणाऱ्या जागेवर गेली.

आईबाची नजर सारखी वरून गळणाऱ्या पाण्यावर होती. त्यात मागेल ते भांडं मी उठून देत होतो. आई अगोदरच दिवसभराच्या रानातल्या कामानं बेजार झाली होती. घरात जागजागी गळणाऱ्या पाण्यानं ती वैतागाच्या इसाळात बाला बोलली, 'तरी म्या सारखं वरडत हुती, उन्हाळचात घर तेवढं शेकरून घ्या. आता पावसकाळचं माणसानं काय म्हण करावं ?'

आईचा संताप ऐकून आण्णाही चिडला, 'तुजं हे खरं ! पण मी काय मोकळा होतू, का घरात हातरुन टाकून पडत होतू? पोटाच्या कामापाय माझा बी पाय घराबाहेरच !'

'आवो, पॉट हे जन्मालाच लागलंय! ते काय कुणाला सुटलंय व्हय? म्हणून-शान का माणसानं आपलं घरदार नीट ठेवू नये ?'

'अगं, पण मला सवडच कुठं होती ?'

'येळ काढायचा ! एक येळ उपाशी राहिलो असतो, पण हे टिचभर घर शेकारून झालं असतं. या पोरांबाळांच्या घरात कशाला अशी पावसात आबदा झाली असती ?' ... घरात जागजागी पाण्याची लागलेली धार बघून आई आण्णावर कावली होती ... आईचंही खरं होतं की घर उन्हाळचात शेकारलं असतं तर ही पावसात अशी दैना झाली नसती ... त्यात आईचा वैताग असा की आपलं घर लहानच, झोपडीगत होतं, त्याला शेकरून घ्यायला किती वेळ लागला असता?

**आई व शेरडं**

आई आण्णाला बोलली, 'तेवढी आत करडं घ्यावं. त्यांचा लहान जीव. रात-भर पावसात मरतील.'

**आई, घर आणि दिवा**

माझ्या आईबापांना, मोठ्या बहिणींना बुटक्या भिंतीच्या बाजूला सरळ उभ रहाता येत नव्हतं. त्या बाजूचा सगळा व्यवहार हा वाकून चालायचा. आपल्या

घरालाही चौकट अन् दरवाजा लावल्याचं बघून मला व माझ्या बहिणींना केवढी आक्रीत गोष्ट वाटायची ... मला आठवतं, वाचता वाचता, पेंगता पेंगता जळत्या दिव्यावर माझं डोकं आपटायचं. मला कपाळाला चटका बसायचा. मी जागा व्हायचो त्या वेळी मला माझ्या डोक्याच्या जळालेल्या केसांचा करपा वास यायचा. मग आई चौकटीतून मजवर ओरडायची, 'काय रं बाबा, अशा वाचण्यानं भाजून घेतोस व्हय ? राहू दी तुजं पुस्तक वाचणं अन् लिवणं. तू आपला दिवसा काय वाचायचं, लिवायचं ते लिवत जा.'

**आई आणि खेळणी**

माझ्या वस्तूंना कुणी धाकटचा भावानं हात लावला तर घरात मी आरडा-ओरडा करायचो. मग मला आई म्हणायची, 'बाबा, तुझं हे खेळणं बाजूच्या धाकटचा उतरंडीच्या गाडग्यात, संक्रातीत, तुजं काय ते जपून ठेवत जा. वर काय ठेवू नको. घरात कुठलीही गोष्ट ठेवली तर उंदीर काय त्या जाग्यावर ठेवत नाय.'

**आई व देव**

आई शुक्रवार व मंगळवार आंघोळ करून, कधीकधी न्हाऊन देवाची पूजा करीत असायची.

**आई आणि कोकरू**

मग अशा कोसळत्या पावसात त्या मुक्या जनावरांची, त्यांच्या बाळांची दैना कानावर पडल्यापडल्या आईचा जीव कळवळल्यावर ती वडिलांच्यावर ओरडायची, 'आवो, तुमाला ऐकायला येतंय का न्हाय ? ती बघा करडं ओरडायला लागलीत ! त्या बाळास्नी घरात तरी निवाऱ्याला घ्या.' कोकरं मुतल्याचा आवाज ऐकताच आई त्यांच्यावर चिडून ओरडायची, 'हत् तुमाला खाटकाच्या गाडग्यात घातलं ! घरात येऊन कोरड्या जागी मुतला का रं ?'

**आईचे कष्ट**

माझ्या आयबांनी गुराढोरांसारख कष्ट करून, राबूनही माझ्या घरात कवा-कवा, कधी सकाळची तर कधी संध्याकाळी- रात्रीची चूल पेटत नव्हती. त्याच पोटा-पाण्याच्या झुरणीत कष्टात माझ्या आईबापाची कायाची बेकाया झालेली असायची !

तरीही माझी आई रोजच रोजगारानं रानात, मळचात, शिवारात कामाला जात होती ! मळचात भांगलायचं, गवत काढायचं काम. आई रानात जायाची, कधी जळण आणायला, सरपणाची मोळी आणायला. कवाकवा शिवारात सुगीत जोंधळा काढायला, पिकाची बडवणी करायला जात होती. घरात लहान लेकरंबाळं टाकून पोटासाठी रोजंदारानी घराबाहेर पडायचं.

गावकीचा महिना आला की आण्णा चावडीवर बांधला असायचा ! आण्णा-च्या माघारी मग आईनं मर मर मरावं ! रोजगारानं कामं करावीत, घरच्या

आमा पोरास्नी कष्ट करून आरधी– कोर भाकरी घालावी. असं उण्याला पुरं करीत आई रोज कष्ट करायची.

**आईचा स्वाभिमान, झाडलोट नाही.**

माझ्या आईनं पोटापाय रोजंदारीनं कष्ट केलं हे खरं, पण ती कधी गावातल्या इनामदाराच्या, देशपांड्याच्या, वाण्याच्या दारात हातात खराटापाटी घेऊन झाडलोट करायला गेली नाही ... आण्णांनीही माझ्या आईला गावात कुणाच्या दारी झाडलोट करायला पाठवलं नाही ... दुसऱ्याच्या घरीदारी झाडलोट करायचं माझ्या आईला कधीच मान्य नव्हतं.

**मुलाला अफू**

'आई, हा सोपान गप्प राहीना' ... तोच आई म्हणाली, 'बराबर हाय, त्याची आता आफूची वेळ झाली ...' सुरुवातीला राळ्याच्या दाण्याएवढी अफू, नंतर बाजरीच्या दाण्याएवढी, त्यानंतर जोंधळ्याच्या दाण्याएवढी. असं पायरीपायरीनं मुलाच्या वयोमानाला धरून आया आपल्या मुलांना अफू चारत असत. माझी आईही घरात लहान मुलाला अफू चारायची. एकदा अफू खाल्ली की तंद्रीत मूल खेळायचं ... मग आईनं मुलाला मांडीवर घेतलं. तिनं दिवळीतली अफूची बारीक डबी घेतली. त्यातली बेताची अफू घेतली. तिची गोळी करून आपल्या दुधाबरोबर लहान मुलाला अफू पाजली. आपलं दूध पाजता पाजता त्याला आईनं झोपवलं.

**भाकरीची काळजी**

आण्णानं धोतराच्या एका पदरात दाणं आणि दुसऱ्या पदरात भाकरी आणलेली बघून आईच्या चेहऱ्यावरची काळजी हाटली. तिला वाटलं असावं, उदयाचा दिवस तरी गेला. आता परवाचा परवा बघू ... घरात आईनं चूल पेटवली, ती भाकरी टाकायला लागली.

आण्णानं घरात धान्य, जोंधळ्याचं दाणं आणलं का आईला बरं वाटायचं. मग चूल चालायची. घरात चूल बंद पडली का आई तोंड वाजवत बसायची. आण्णाच्या भोवती सारखी तिची भुणभुण चालायची ... आईचं सुटलेलं तोंड बघून आण्णा घरातून उठायचा आणि सरळ गावात वाण्याचं घर, सोनाराचं दार, बामणाचा वाडा, अशांच्या घरीदारी पायपीट करायचा ... 'मालकीनबाय, पोटाला काय दाणं घाला.' ... आण्णाचं हे निर्वाणीचं शब्द ऐकून त्या घरातल्या आयाबाया आण्णाच्या पदरात शेर, दोन शेर दाणं वाढत असायच्या.

**भाकरी व आई**

आईच्या मागची उदयाची काळजी हटली होती. त्यातच येताना आण्णानं धोतराच्या पदरात भाकरी आणली होती. ती भाकरी ताटात ठेवली. ती भाकरी,

घरातलं कोरडघास शेवंता, पवित्रा व भागीनं खाल्लं. आई भाकरी टाकतच होती. अजून आई– आण्णा जेवायचे होते.

**जत्रा**

आई घरातून बोलली, 'आवो, पोरगं कवाच्यान तुमची वाट बघत बसलंय. तेला जत्रंतनं हिंडवून तरी आणा की.'

तोच खालच्या आवाजात आण्णा बोलला, 'अगं, पोराला जत्रंत नेवून काय करू? जवळ दातावर हाणायला पैसा है का? आन त्यात पोराला कसं नेवू?'

'त्याला वो काय झालं? पोराला निस्तं जत्रंतनं हिंडवून आणा. जत्रंत चाललेलं ते खेळ तो बघंल. ते तेला दावून आणा.'

आई पुन्हा बोलली, 'आवो, तिकीटाचं खेळ सोडा. पण दुसरं काय गजी–ढोल दावा. लेझीम खेळतात ते दावा. चांगली दुकानांची जत्रंत रेलचेल झालीय ती बघेल... आवो मी म्हंते दिडक्या पडतील त्या बाजूला जाऊच नका. फुकटच्या बाजूनं हिंडा.... खावूशी वाटलं तर वळकीच्या मालकाकडून पोरापाय मागून घ्यावं. मस्त त्यांची घडीघडी लाकडं फोडता की.'

'अग पण लाकडं फोडायची वेळ वेगळी. घडीघडी भिकाऱ्यागत त्यांच्यापुढं तोंड करून मागायचं मनाला बरं लागत न्हाय.'

'का बरं भिकाऱ्यागत? लाकडं फोडून घेतात ते तुमचं कष्ट कुठं जातं? त्यास्नी काय कळत न्हाय गुराढोरागत लाकडं फोडून घियाला?'

'जत्रा बघायचं काय गरिबाचं काम न्हाय.' (आण्णा)

तोच आई बोलली, 'आपल्यागत मस्त दुनया हाय! म्हणून का माणसानं जत्रा सोडली व्हय?'

... 'आवो बाहेर थंडी हाय. त्यात ओढ्यातला गारवा. पोरगं बरोबर हाय. घोंगडंबी बरोबर घ्या.'

**भागित्रा**

त्या दिवशी आईला रानातून रोजगारानं काम करून इयाला वेळ झाला होता. आईला वाटायचं, आपल्याला उशीर झाला तरी ते घरी हायेतच, घरात पोरांच्याकडं ते बघतील. पोरं तशी काय उपाशी झोपायची न्हायती. पण त्या दिवशी आईला रानातून इयाला नेहमीपेक्षा उशीर झाला. उशीर म्हणजे चांगली रात्र पडली होती. जेवणवेळ झाली, चंद्र उगवून वर आला, तरी आई रानातून घरी आली नव्हती. ती आण्णाच्या जिवावर भरवसा ठेवून होती. पण त्या दिवशी बामणाच्या लग्नाची जादा लाकडं फोडायची म्हणून आण्णालाही घरी यायाला रात्रच झाली होती.

त्यापूर्वी घरी आम्ही सगळी भावंडं आईची वाट बघत होतो, आण्णाची वाट बघत होतो. घरात अंधार होता. मी विटाबायच्या घरातून दोन वेळा दिवा लावून लावून आणला, पण घरात येण्याच्या अगोदरच वाऱ्यानं वाटेत विझून गेला. मी पुन्हा दिवा लावून आणला नाही. घरात सगळा अंधार होता... मी आईची वाट पहात बसलो, पण रात्र झाली तरी कुणीच आलं नाही. बरं, टोपल्यात काय भाकरी नव्हती ... धाकटी भावंडं आईआण्णाची वाट बघून बघून दमली. ते तसेच उपाशी पोटी घरात बसल्या जागी खाली पडले. 'आता आय ईल, आता आण्णा ईल, झोपू नका' असं मी, शेवंतानं त्यांना कितीतरी वेळा बोललो, पण ते झोपले... त्यांनी दाराकडे डोळे लावले अन् भुकेच्या जांभाळचा देत, तारताळचा देत, ती तिथंच भुईवर आडवी झाली.

तोवर आई आन् थोरली बहीण पवित्रा दारात आली. घाईगडबडीनं डोक्यावरची काटक्याकुटक्याची सरपणाची मोळी दारात टाकली. त्या जळणाच्या भाऱ्यावर बांधलेलं लुगड्याच्या धडप्याचं गाठोळं सोडलं. ती छपरात आली. त्यातच ती रात्री अंधाराची रानातून आली. एकाएकी घरात कसं जावं म्हणून जराशी उंबऱ्याजवळ छपरातच टेकली व तिनं आत डोकावलं. घरात सगळा आंधार बघून लागलीच बोलली, 'कारं संकर, घरात आंधार, दिवा न्हाय लावायचा?'

मी पटकन बोललो, 'आये, मी दोन वेळा इटाबायच्या घरातून दिवा लावून आणला, पण वाटंत वाऱ्यानं विजून गेला. मग मी काय करू?' त्यावर तिनं लहान भावंडांची चौकशी केली. 'धाकटी पोरं?'

'आये, ती तुझी—आण्णाची वाट बघून झोपली.'

'त्यांनी काय खाल्लं का नाय?'

'काय खाणार? भाकरीचं टोपलं रिकामंच होतं. ती तशीच बिनभाकरीची झोपली.'

मग आई उठली. पाण्याच्या घागरीवरच्या करटीनं पाणी घेतलं. चूळ भरून पुन्हा करटीभर पाणी प्याली. घरात आली. फडक्याचं गाठोळं घरात आणलं. लागलीच दिवळीतला दिवा घेऊन ती शेजारच्या इटाबायच्या घरात गेली. तेथून दिवा पेटवून आणला. वाऱ्यानं जाऊ नये म्हणून त्याला पदर आडवा लावला. ती घराच्या उंबऱ्यात आली; पदर बाजूला घेतला, दिव्याचं तोंड उघडं झालं. पाजळत्या ज्योतीनं घरात उजेड पडला. आईला त्या उजेडात उघड्या भुईवर पडलेली पोरं ग्यानू, सोपाना, मारुती दिसली. 'आरं ही पोरं अशीच भुईवर पडल्याती. त्यास्नी खाली वाकळ तरी टाकून दियाची.'

'तेच मी शेवंताला बोललो, पण शेवा काय न्हाय बोलली.'

मग आई स्वतःच आपल्या मनाला बडबडली, 'काय रं देवा पोरं बिनभाकरीटुकड्याची झोपली.' असं बडबडून तिनं पुसलं, 'का रं, ते आलं न्हाईत का अजून?'

'नाय, आण्णा आजून आला न्हाय.'

यावर ती स्वतःच बडबडली, 'हेंचं काम तरी गुराढोरावाणी. दुसऱ्यायांच्या कामात गुंतलं की मग सगळं घरदार इसरुन जात्यात. माणसानं काय म्हण बघावं, घरातलं का दारातलं? पोटापाण्याचं का घरातलं? माणसानं काय करावं तर काय?' असं जरा रागाच्या इसाळच्यातच बोलली. मग चुलीपुढं बसून चुलीत वाकली. चिपाडं टाकली. चूल पेटवली. तेवढ्यात दारात पाय वाजल्याचा आवाज आला. मी दाराच्या चौकटीतच बसल्या बसल्या बाहेर डोकावलं. तोच आईनं मला विचारलं. 'कोण आलं रं'?

आण्णाला बघून मी म्हटलं 'आण्णा आला.'

'कावो, घरी इयाला इतका उशीर केला?...'

'अगं काय करायचं? बंडोबा बामणाच्या लग्नाची लाकडं फोडतोय नव्हं? लगीन आता हातातोंडावर, चार दिवसांवर आलं.'

'मला ते कळतं, पण घरी धाकटी पोरं हायेत. घरात दिवा लावायचा असतो. या लहान मुलांच्या जीवावर बसून कसं भागेल? न्हाय तर या पोरांनी दिवा लावता लावता आपल्या या काडाच्या घरात डोंबळ होईल. ऐतंच काडागवताचं घर, त्याचा डोंबाळा होयाला का येळ लागतोय व्हय?' ...आईनं चुलीत नळीनं फुंकून चांगला जाळ केल्यावर ती बोलली, 'मी कुठं न्हाय म्हणती? पण ही बघा पोरं. आपली वाट बघून भुकेनं तारताळच्या देत तशीच झोपली'.

...मी आणि शेवंता एकाच पितळीत बामणाच्या घरच्या भाकरी खायला बसलो... मी लागलीच कसनुसं तोंड करत आईला बोललो, 'आई, हे वांगं आळणी हाय. यात तिकट न्हाय.'

'आरं बाबा, ते बामणाच्या घरचं वांगं. त्यांना तिकट चालत न्हाय'...पवित्रानं चुलीवरचं चटणीचं लोटकं घेतलं, माझ्यापुढं ठेवलं... भाकरी खाल्ली... शेवंता पाणी पिऊन बाजूला आडवी झाली, झोपली. मग आईनं दोन भाकरी टाकल्या. आण्णाला पितळीत भाकरी दिल्या. चटणीचं लोटकं पुढं सारलं... आई व थोरली बहीण पवित्रा भाकरी खायाला एकाच पितळींत बसल्या. आई भाकरीचा घास चावताचावता आण्णाला म्हणाली,

'बामणाचं लगीन आलंय तर आपल्या भागित्रीला तरी घरी आणा. तिला नवऱ्याघरी कुटला चांगला घास खायला घावतोय?'

...'पण तिला तिचा दाल्ला धाडंल का?'...

'तेला काय झालं न धाडायला? भागित्रीच्या दाल्ल्याला उघड करून सांगा, बामणाचं मोठं लगीन हाय, पोराला काय गोडधड खायला घावंल. आलंय लगीन नशिबानं तर तेंच्याबी पोटात चार चांगलं घास जावू द्या.'

'व्हय, माजाबी जीव तेच्याएकी लय तरमळतोय. पण तिला धाडतील का न्हाय, हे कळत न्हाय.'

'तुमी तिच्या गावी जावून बोलून तरी बघा. मग काय होईल ते होईल.

न्हायच धाडलं तर म्होरं बघू.'

'बरं, मग भागीला आणायला शंकर जाईल?'

'आवो, या लहान लेकराचं कोण ऐकणार? तुमीच जा. त्यास्नी नीट समजावून सांगा. तुमच्या बोलाचा मान पडंल. सकाळी जावून, धाडली तर लागलीच माघारी या.'

माझ्यापेक्षा मोठी बहीण भागित्रा नांदायला गेली होती. तिला गावी आणायचा बेत पक्का झाला. थोरली बहीण पवित्रा घरीच- गावात होती. त्यामुळे तिचा प्रश्न नव्हता.

एक दिवस आड टाकून आण्णा भागित्रीला आणायला कवा पहाटेच उठून गेला... आई अन् पवित्रा घरातलं पोटाचं पाण्याचं आवरून रानात रोजगारानं निघाली. तिच्याबरोबर शेवंताही शेरडं सोडून रानात निघाली. दारातून निघतानिघता आई मला बोलली, 'शंकर, भागीला आणायला ते पहाटंचं गेल्यात! त्यास्नी इयाला रात होईल. तुमी घरातून कुठं बाहेर जावू नका. टोपल्यात भाकरी करून ठेवल्यात'. आईचं ऐकून मी मान डोलावली. आई, पवित्रा दारातून हालली. शेवा शेळचा घेऊन पुढं गेली होती.

त्या दिवशी आई, पवित्रा दिवं लागायच्या आत रानातून घरी आली होती. मागोमाग शेवंता शेरडं घेऊन आली. छपरात विसावा घेऊन आईनं चूळ भरली. घागरीतलं करटीभर पाणी प्याली. घरात गेली. चुलीवरची शिकुरी हातात घेऊन गंगूबायच्या घरी गेली. त्या शिकुरीत (मातीचं भांडं) गंगूबायच्या पेटत्या चुलीतनं विस्तव आणला. चुलीत टाकला. त्यावर चिपाड, काटक्या टाकून चूल पेटवली. तोवर आंधार पडत चालला होता. घरात दिवा लावला. पवित्रानं भाकरी टाकल्या. रानातनं आणलेल्या तांदळज्याची भाजी तव्यात टाकली. बरोबर घावलेली पात्रंची भाजी पण भाकरी बरोबर खायला आणली होती. ...खरंच, आण्णा दारात आला. मागोमाग भागित्रा होती... भागित्रानं डोईवरचं भाकरीचं गटोळं तिथंच खाली ठेवलं. तिथं छपरात खाली बसली. त्यांना बघून आई उंबऱ्यात आली व भागित्राला बोलली, 'बरं झालं बया, तू आलीस! ... ऊठ, चूळ भर!'

भागित्रा उठली. रांजणातलं पाणी तांब्यात घेतलं. तिनं चूळ भरली, हातपाय धुतले. घरात आली... फडक्यात बांधून आणलेल्या भाकरीची चवड सोडली. ती टोपल्यात ठेवली. भागित्रानं चांगलं तव्यात फोडणी दिलेलं सांडगं करून आणलं होतं. शिवाय वर तांबड्या मिरचीत लसून घालून, वाटून चटणी आणली होती... मी जेवलो होतो, तरी पुन्हा खमंग फोडणीचं सांडगं तोंडभर खाल्ले. माझ्याबरोबर शेवंतानंही खाल्लं. मग आण्णा व भागित्रा यांनी जेवण केलं... पवित्रा व शेवंता यांनी खाली अंग टाकलं. आई व भागित्रा मायलेकी उगंच काय काय बोलत बसल्या.

**आई व लग्नाचं जेवण**

आज सकाळीच आण्णा घरी सांगून गेला होता, 'आज लग्नात पोळ्या- लाड-

वांचं जेवण हाय!' हे जाणून आई दिवस मावळायच्या आत घरी आली होती. मी घरी शेरडं बांधल्याबरोबर आई म्हणाली, 'शंकर, आज तू, शेवंता, दद्यानू बामणाच्या वाड्याकडं तरी जावा! आज तिथं पोळ्यालाडवाचं जेवण हाय...' मी, शेवंता, दद्यानू निघालो. आमच्याबरोबर आईनं भागित्रालाही पाठवलं.

**आई आणि उष्टे**

आईनं गाडगं उलटं करून त्यावर मधोमध दिवा ठेवला होता. भागित्रा, पवित्रा, शेवंता पोळ्या खात होते... त्या डालपाटीभर उष्ट्या पत्रावळ्या घरात आण्णानं आणल्या होत्या. त्या पत्रावळीवरील चतकोर- आर्धी पोळी काढून समोर पितळीत ठेवीत होती. त्यावरील भात–आमटीचं खरकटं परत वेगळ्या भगुल्यात भरून ठेवीत होती. त्या उष्ट्या पत्रावळीवरील एक एक पक्वान्नाचा उष्टा पदार्थ अशा रीतीनं आई वेगवेगळा करून पितळीत ठेवत होती. त्या पत्रावळीवर आर्धा लाडू मिळताच तो माझ्या हातावर ठेवला. अगदीच उष्टं– खरकटं असेल ते वेगळ्या भगुल्यात भरलं. त्या डालपाटीभर असलेल्या उष्ट्या पत्रावळीवरील पोळ्या, लाडू, भात आईनं काढलं. त्यानं पितळ्या पूर्ण शिगेला भरल्या. त्याशिवाय काय पोळ्यांचं टुकडं अन् लाडूचा चुराबुंदी टोपल्यात भरली... कोरड्या पोळ्या खाताना माझ्या घशात तोटरा बसायचा. तोच आई मला म्हणायची, 'अरं बाबा, दमादमानं खा, वर पाणी पी' असं बोलून पाण्यानं भरलेला तांब्या मला देत होती... आईचं उष्ट्या पत्रावळ्यावरील पोळ्या, लाडू, भात निवड करण्याचं काम संपलं... शेवटी आई व आण्णा जेवले... 'पोरासनी राहू द्या लाडू' म्हणून त्यांनी लाडू आमच्यासाठी तसेच ठेवले....

बामणाच्या लग्नात आमच्या घरी तीनचार दिवस चूल पेटलीच नाही. लग्नात आण्णाला मिळालेल्या पोळ्या अन् त्या उष्ट्या पत्रावळीवरील काढून निवडून ठेवलेल्या पोळ्या उनात वाळवून कडक करून आई आम्हाला देत होती. शिळ्या आमटीला आई चुलीवर ठेवून पुन्हा पुन्हा कड देत होती. ओला खरकटा भात विटू नये म्हणून आई त्याचे सांडगे करून उन्हात वाळवत होती. गुळपोळीमिश्रित भाताचे कडक वाळलेले सांडगे गोड लागत होते आणि आमटीमिश्रित भाताचे जराजरा बामणी तिखटागत लागायचे. आईनं अर्धे– पाव लाडू, त्याचा चुराबुंदी चांगली वाळवून गाडग्याच्या उतरंडीच्या तळाच्या डेऱ्यात भरून ठेवले होते. आई मग त्यातला लाडू चुरा काढून कवाकवा दियाची. विशेषतः बाजाराच्या दिवशी नक्की, कारण बाजारातून काय खायला आणायला पैसाच मिळायचा नाही. तेव्हा ती आम्हाला लाडूचा चुरा दियाची.

**आई आंबरस करते**

त्या पाच आंब्यात माझी आई तर 'आंबरस' करायची. आई असंच पाचसात

आंबे गाडग्यात पिळायची, त्याच्या साली–कोया पाण्यात धुवून धुवून त्याच्यातला रस ना रस काढून घेत होती. तेवढ्या आंब्यांच्या रसात गुडघाभर पाणी करत होती. मग त्यात गोडीला गूळ ठेचून ठेचून टाकीत होती. आणि मग त्या रसाच्या पाण्यात गूळ चांगला ढवळला, मिसळला का झाला 'आंबरस'...माझ्या घरी तर आई आंब-रसाच्या ऐवजी आंबापाणीच गाडगंभर करायची.

**मुलाची मान दुखते**

मी आईला म्हणायचो, 'आये, माझी मानच दुखतीय बघ.' 'का रं झालं बाबा' असं आईनं विचारल्यावर मी आपला सरळ म्हणायचो, 'का कुणास ठावं...' पण माझ्या आईच्या ते चटकन लक्षात येणार. ती मला बोलणार, 'आरं बाबा, काल बाजारात आंब्याच्या पाटच्या टाकल्या असतील की... त्यानंच तर तुझी मान दुख-तीय!' असं म्हणून आई पुढं म्हणणार, 'एवढ्या कोवळ्या मानेवर कशाला जडशीळ पाटच्या वाहायच्या?'

'मग आंबरस कसा खायाला मिळणार?' मी असं म्हणताच मग आई खरं बोलायची 'कशाचा रं बाबा तो आंबरस? एक मासा अन् खंडीभर रसा! उगं नावाला आंबरस म्हणायचा.'

**आईचा रोजगार**

माझी आई पोटाच्या ओढीनं रानात पोटाचं आवरून जायाची. तिच्याबरोबर थोरली बहीणही जायाची. कधीकधी शेवंता लहान भावंडांना घेऊन आईबरोबर जायाची. लांब शिवारातला रोजगार असेल तर मात्र शेवंता घरी राहून लहान भावंडांना सांभाळायची.

**आई शाळेत पोचवी**

हातात पाटी घेऊन मी शाळेत निघालो. माझी आई मला शाळेत पोचवायला आली होती. मला कल्लेश्वर देवळाच्या शाळेत आईनं पोहचवलं. ती परत गेली. एकदा शाळेच्या रजिस्टरला नाव नोंद झाल्यावर शाळेत मुलाला रोजच्या रोज पाठवलं नाही तर दंड पडतो हे आईला कळल्यावर ती मला सुरुवातीला रोज पुढं घालून शाळेत आणायची.

**शाळेतला मार**

शाळेत मला उदम्यांच्या मुलांनी मारल्याचं माझ्या आयबाला कळालं. ते गप्प झाले. मग माझी आई मात्र मनाला येईल ते त्यांना बोलली, अर्थात आपल्या घरातच. त्यांना शिव्या देऊन आपला राग शांत केला. दुसऱ्या दिवशी दंडाच्या भीतीनं आईनं मला पुन्हा शाळेत आणून पोहोचवलं. ती परत गेली.

**आईचा संताप**

मी रडतरडत आईआण्णांना चाबकाचे उठलेले वळ दाखवले, तोच माझी

आई संतापानं बोलली, 'पडु दया शेरडं हितंच. मरु दया. आताच्या आता पोलिसात 'फिर्याद दया. माज्या पोराला वळ उठेतो चाबकानं का म्हण मारायचं?'

माझ्या आईनं पोलीस फिर्यादीची भाषा काढताच वडील तिच्यावर रागावले. समजुतीनं बोलले, 'कशाला फिर्यादीची भाषा करायची? झाली आपली चूक. आपण आपली शेरडं घेऊन घरी जाऊ.'

तोच आई माझ्या अंगावरील वळ बघून फणफणली, 'पोराच्या अंगावर वळ उठेतो मारलं. ते काय गुरढोर हाय?'

'मग काय तुझ्या पोराचं पाय धरू म्हणतीस व्हय?'

असं माळी म्हणताच आई फाडकन् बोलली, 'पोराला मारायचं तर माणसावाणी मारायचं. ते काय जनावर होतं ?'

'माझी मका खाल्ली तेचं काय?' असं तो बोलताच माझी आई संतापली, माझी शेरडं कोंडवाडयात घालायची. मी कोंडवाडा भरला असता. पण माझ्या, पोराला चाबकानं काय म्हण मारलं?'

माझी आई भलतीच चिडली होती, संतापली होती. पण आण्णाच शेवटी तिला म्हणाला, 'आता शेरडं सोडू का नको?'

माझ्या आईच्या बोलण्यानं माळी गप्प झाला होता. तो थंड होऊन बोलला, 'एवढया बार सोडून न्या. पुन्हा शेरडं आली तर कोंडवाडा दाखवीन'... वाटेत चालता चालता आई माझ्यावर कावली, 'का रं, शेरडं राखता का व्हलं मारुन खात बसता?' त्यावर मी गप्पच होतो. व्हल भाजण्याच्या नादात शेरडं पळाली होती हे मी जाणलं होतं. तोच पुन्हा आई बोलली, 'मी लागंल तेवढं सांगितलं बाबा, शनवारी पक्षाचा जीव घेऊ नकू, पण काटं ऐकतंय कुठं?'...

...आई रागानं मला बोलली, 'बरं तेनं मारलं. त्या माळयानं मारलं न्हाय, देवानंच पोराला मारलं. त्यानं आज सनवारचा व्हल्याचा जीव घेतला. त्या पाखरांचा जीव काय तळमळला असंल का न्हाय?'

### शेळीचं दूध व आई

शेळीचं दूध खायला गोड. त्यात औषधीही असे. कारण शेरडं बारा झाडाझुडपांचा, कडधान्यांचा पाला खातात, पचवतात. त्यातून दुधात औषधी गुण उतरतात असे माझी आई मला सांगायची.

### तराळकीचं अन्न

पाडव्याच्या दिवशी आईनं पाडव्याचा सण केला नाही, पुरणपोळ्या केल्या नाहीत. फक्त गुडीच उभी केली. म्हारोडयात घरोघरी पाडव्याचा सण होता, पण आमच्याच घरी नव्हता, म्हणून मी कष्टी होतो...मी सरळच घरी येऊन आईला

विचारलं, 'आये, आज पाडवा. घरोघरी सण! मग आपलीच चूल बंद?'...माझी आई हसत बोलली, 'आरं बाबा, तराळकी आली म्हणून तर पाडव्याचा सण केला न्हाय.'

मला आईच्या बोलण्याचा काहीच बोध झाला नाही. म्हणून पुन्हा मी पुसलं 'आये, तू असं कसं बोलतीस?',

'आरं बाबा, आपण सण केला तर तो वाया जाईल.'

'तो कसा काय, आम्ही एवढं घरात खाणारी असताना?'

तोच मग आई अधिक समजुतीच्या भाषेत मला बोलली, 'आरं बाबा, आज तराळकीचा सण गावाहून टोपली, दोन टोपली घरी यील की! मग घरचा सण वायाच जाईल.'

हे कसं ते सगळं मला तिनं समजावून सांगितलं. ...आनंदाच्या भरात मी आईला पुसलं, 'आये, टोपलं, दोन टोपलं पोळचा मिळणार म्हटल्यावर आपल्या घरादाराला पुरून उरतील की मग!

'व्हय, उरणार की! टोपलंभर तरी!'

'पण त्या शिळचा होतील, विटतील, त्याचं काय?'

त्यावर आई लागलीच म्हणाली, 'आरं बाबा, एवढा गोडधड, मोलाम्हागाचा जिन्नस कोण इटू दील? त्याला उनात वाळवायचा, चांगला कडक कडक भातवडचा-गत वाळू दियाचा! मग खुशाल गाडग्यात भरून ठेवायचा, कवाकवा पोटाला खायाला.'

मी आईला विचारलं, 'आये, गावात पोळचा मागायला कवा जायचं ग?'

'माणसाची जेवणवेळ टळली का जायाचं.'...मी परत आईला विचारलं, 'आये, तराळाला अगोदर का पोळचा वाढत नाहीत?'

'तसं कसं होईल बाबा?'

'त्याला का झालं?'

'आरं माझ्या बाळा, घरातलं माणूस जवल्याबिगार म्हाराला-तराळाला कोण सण वाढील? ही उलटी घडी कशी ?'

आमच्या भुकेच्या जांभाळचा बघून आईच आण्णाला बोलली, 'आवो, पोरं भुकेनं तारताळचा दयायला लागली. लौकर टोपलं घेऊन जावा. आवो, एकटंच कसं जाताय? पोरास्नी न्या!'

'अगं, हे गाव आपल्याला नवं. त्यात पोरं कशाला?'

'नवं असलं तरी आपलंच वतनी गाव हाय ना? त्यात तुमी तर तराळ. तराळाला कसलं नवं अन् जुनं? त्याच्या हक्कात काय कमी होतंय?'

सगळ्या गावात सण मागून झाला. घरी आई वाटच पहात होती. आम्हा दोघांचं पोट भरलं होतं. घरी आई व धाकटा मारुती व दयानू होता. त्यात आई-आण्णाच्या पोटात काही नव्हतं. आज पाडव्याच्या सणाला त्यांचं जेवण रात्रीच. त्यांना पोटातली भूक मारायची सवयच...

घरी आल्याआल्या शेवाच्या डोक्यावरचं आमटीचं भगुलं आईनं हातात घेतलं...घरात आल्याआल्या आईनं एका पितळीत मला, शेवाला, दयानूला वाढलं... मग आईनं आण्णाला पितळीत गुळवाणी वाढली. आत पोळ्या टाकल्या. शिकुरीत आमटी वाढली....शेवटी आई जेवली. तरीदेखील निम्मं टोपलं पोळ्या शिलकेत राहिल्या होत्या. ते पाहून आईचा चेहरा उजळला होता....मग मी बसल्या बसल्या आईला विचारलं, 'आई, आपल्याला रोज अशा पोळ्या मिळणार?'

'आरं, रोज काय माणसं सण करतात होय? पण भाकरी रोज मिळणार.'

'भाकरी तरी रोज मिळणार का?'

'तराळाला रोज भाकरी वाढावी लागतेच. तराळाचा तो हक्कच असतो.'

'नाय दिली तर?'

'त्यांचा बाप दील. तो गावाचा तराळ असतो!' आई मोठ्या विश्वासानं ठासून बोलत होती.

**प्रेताचा पंचनामा व आई**

ठाण्यातून फौजदार हवालदार येणार होता. मग प्रेताचा पंचनामा होणार होता. तोपर्यंत महार, रामोशाला प्रेताच्या राखणीला बसावं लागणार होतं. हे माझ्या आईला माहीत होतं. रात्र गेली, सकाळ झाली, दुपार आली तरी आण्णाचा पत्ता नाही, म्हणून आईनं मला त्या विहिरीकडं पाठवलं. पाठवताना आईनं आण्णा-साठी मजजवळ फडक्यात भाकरी बांधून दिल्या होत्या.

**तराळकी**

(भावकीतल्या काही माणसांनी तराळकीसाठी हेवेदावे सुरू केले.)

मी आईला पुसे, 'आये, तो गडी आपली तराळकी मोडून हिसकावून घेणार का?' तोच माझी आई समजूत घाली, 'तेचा 'बा' आला पाइजे. आमच्या वाड-वडिलांपासून कामतच्या (कामत गावच्या) तराळकीवर हक्क हाय.' आईच्या या बोलण्यानं मला धीर यायचा.

**आईचं काम**

आईनं येरवाळीच भांडीबासणं घासून रांजणातल्या शिळ्या पाण्यानं खळा-

खळा धुतली होती. तांबेपितळेचा चकचकीत दिसू लागले. कोरडयाशाचं गाडग आतून नीट धुतलं. बाहेरून त्याच्या बुडाला मातीचा पोचारा दिला. दोन लोटकी, मातीच्या शिकून्या पाण्यात बुचकाळून काढल्या. मग आईनं सर्व भाडीबासणं नेऊन घरात चुलीजवळ ठेवली. हातावर पाणी घेतलं, तोंडावरून पाण्याचा हात मारला. पदरानं तोंड पुसलं, मग ती घरात गेली. विस्तव आणण्याची शिकूरी घेऊन उंबऱ्याच्या बाहेर पडतापडता मला बोलली, 'म्या शेजारच्या जुगाबायच्या हितनं इस्तू आणते,' असं बोलून ती चूल पेटवण्यासाठी विस्तव आणायला शेजारी गेली... आईनं जुगावायच्या घरातून शिकूरीतून विस्तव आणला, चुलीत टाकला. मग तिनं चुलीत चिपाडं, काटक्या सारल्या, वर नळीनं चुलीत फुंकू लागली. मध्येच तोंडावर येणाऱ्या झिज्या हातानं सारत होती. त्यात काटक्यांचा धूर सगळ्या घरात भरला. त्यावर पुन्हा तिनं जोरजोरानं नळीनं चुलीत फुकलं. एकदम जाळाचा भडका झाला. चुलीतल्या काटक्या, चिपाडं पेटली. मग आईनं चुलीवर तवा ठेवला. पिठाचं गाडगं पुढं घेतलं. लाकडी तगारीत पीठ घेऊन ती मळू लागली. तोवर चुलीतल्या काटक्या चांगल्या ढणाढणा पेटल्या. तवा तापला. हातावर थापलेली भाकरी तिनं थाप्कन तव्यात टाकली. भाकरी चरारली, तव्यात शेकू लागली. तव्यात शेकलेली भाकरी मग चुलीतल्या इंगळावर खाली शेकायला ठेवली. जोंधळ्याच्या पांढऱ्या सफेद भाकरीला टम् पापड आला. तो पांढरा कडक खरपूस पापड मला खाऊशी वाटला. आईनं भाकरी टोपल्यात टाकल्या टाकल्या मी त्या भाकरीचा पापड काढून घेतला. कुडुम कुडुम चावू लागलो. चांगला खमंग लागला. टोपल्यात भाकरीवर भाकरी पडल्या... आईनं आण्णाला गरमगरम डाळीचं कोरडयास ताटातच वाढलं. गरमगरम भाकरी दुसऱ्या ताटात दिल्या.

**पाटलाचा मृत्यू व आई**

समजुतीच्या चार गोष्टी आबाला बोलून आण्णानं मागं पाय वळवला. चौकटीत मुंडी करून आईला बोलला,

'अगं, आता तुझी चूल बंद कर.'

'माजं पोटाचं आवरलं सगळं.' असं बोलून आई उलट बोलली, 'का वो, चूल बंद कर का म्हणून बोलला?'

'अगं तरवडीच्या मळ्यातलं मालक गेलं नव्हं का? दारात आबा आल्यात.' तरवडीच्या मळ्याचा म्हातारा गेल्याचा शब्द आईच्या कानावर धडकताच तिच्या तोंडातून 'काय रं देवा!' असे उद्गार बाहेर पडले. ती तशीच उंबऱ्याच्या बाहेर आली. दारात आबाला बघून तिला धक्काच बसला. कसं बसं डोईचं केस पदराखाली घेत ती हाळहाळली, 'आरं आरं देवा, लई वंगाळ झालं.' असं बोलताना तिचे शब्द ओले झाले, डोळे पाण्यानं भरले. तिनं डोळ्याला पदर लावला.

### दहनासाठी सरपण

घरातून आईनं आण्णाला आवाज दिला. 'आवो, पोरगं येतो म्हंतंय तर त्याला बरोबर न्या. एकाला दोघं लाकडं टाकायला बरं... त्यात आम्ही मागनं आलोच.' आई असं म्हणताच मी आण्णाबरोबर निघालोच. तोच आण्णानं आईला विचारलं 'अन् शेरडं ग?'

'आमी–शेवंता, पवित्रा शेरडं घेऊन तुमच्या मागे आलोच! त्याची काय तुमी काळजी करू नका.'

### सांत्वन

मागोमाग माझी आई, बहीण शेवंता, पवित्रा आली. शेवंतानं तरवडीत शेरडं चरायला पिटवली... मग आई, पवित्रा वस्तीवर आमच्याजवळ आल्या. आई सरळ आबाच्या घराच्या दाराजवळ गेली. तेथूनच तिनं आत डोकावलं. तोच म्हाताऱ्याच्या लेकीनं आईला बघून हंबरडा फोडला, 'सावूबाय, आमचा बा गेला, आता मला मागं कोण हाय?' त्याबरोबर आईनंही डोळ्याला पदर लावला. मग त्यांना धीर देत म्हणाली, 'कोण वं ऱ्हायला आलंय? सगळी त्याच वाटनं जाणारी हायेत. जगावाचायचं सगळं देवाच्या हातात. त्यात पिकलं पान, आज ना उदया जायाचं. तुमी काय आता दुःख करत बसू नका.' असं समजुतीनं बोलून तेथून परत आमच्याजवळ येऊन बसली.

### दहनासाठी सरपण गोळा करणं, आई व बहीण

आण्णानं एक लहान लाकडाचा उंडका उचलून आईच्या डोक्यावर ठेवला. मग माझ्या व पवित्राच्या डोक्यावर लहान लहान टुकडं ठेवलं... आई, मी, पवित्रा त्याच्या पाठोपाठ लाकडं घेऊन मसणवटचाच्या वाटेनं चाललो... माझ्या बहिणीचं डोकं मोकळंच. तिनं काय फडक्याची चुंबळ करून डोक्यावर घेतली नव्हती. त्यामुळे डोक्यावर रुतणाऱ्या लाकडामुळं ती कसनुसं तोंड करीत होती.... आम्ही घरादारानी, मायलेकीनं, बापलेकानं कुंभाराच्या गाढवागत लाकडाच्या खेपामागं खेपा मसणवटचात टाकल्या... पवित्राचं तोंड रडवं झालं होतं. ती डोकं चोळायची. पण आई तिला मध्येच म्हणायची, 'पवे, आता लाकडं होत आली बरं का. आम्ही दोघं ती टाकतो. पण तू आन् संकर गोटचामागच्या चारपाच गवऱ्या आणून टाका.... गवऱ्या मात्र डोक्याला एवढ्या लागत नाहीत.' मग पवित्राचं रडवं तोंड कमी झालं.

### मुलाला मार व आई

माझ्या आईनं माराचं वळ उठलेल्या जागी हळद लावली. कुठंकुठं शेकलं. माझ्या अंगावरचं वळ बघून माझी आई हळहळली, बोलली, 'लेकराला पाण्यापाय मरोस्तर मास्तरांनी मारायचं का? जळू दी तुजी साळा.'

**मेलेला बैल**

आईनं मला विचारलं, 'धांडोऱ्या मळ्यात बैल मेलाय. बाबा, तू जाशील का?'

यावर मी काहीच बोलत नाही हे पाहून आईनं मला विचारलं, 'का रं बाळा गप्प? बोलत का नाय?'

'आये, माजी शाळा दुपारची.'

'बुडुदी की दुपारची शाळा. त्यात कंचं नुकसान हाय? तू गेलास तर सागुतीचं कोरड्यासाला तरी राती व्हईल.'

'अगं पण, आमचा कुलकर्णी मास्तर गुराला मारल्यागत मारतो. हातावर छडीचं वळ उठतात.'

'घरच्या कोरड्यासापाय एक बार मार खाल्ला तर खावा. पण घरादाराला वशाट तरी खायला मिळेल.'

आईचं हे खरं होतं. अशा महत्त्वाच्या कामी शाळा बुडवली, त्यापाय मार खाल्ला तर त्यात आईला विशेष वाटलं नाही.... माराच्या भीतीनं मी आईला पुन्हा म्हणालो, 'आये, खरंच तो मास्तर गुरासारखा मला फोडील. त्याला काय इलाज?'

त्यावर आई क्षणभर गप्प झाली व पटकन बोलली, 'मास्तराला सांग मयत झालं होतं म्हणूनशान.'...'आये, कुणाचं ग मयत?' आई गप्प झाली, पेचात पडली. मग विचार करून म्हणाली, 'सांग की धांडोऱ्याच्या मळ्यात बैल मेला हुता तिकडं गेलो म्हणून.'

'मास्तरांनी विचारलं की 'तुझा बाप नव्हता का, तो कुठं गेला होता' तर?

'सरळ सांग, माजा बा गावकीचं टपाल घेऊन महाळकऱ्याच्या मुक्कामाला गेला हुता.'

आईची ही युक्ती मला पटली... मी आईला कबूल केलं.

**बैलाचं मृतमांस व आई**

वाटेत माझी आई मला दिसली. तिच्या डोक्यावर सरपणाचा भारा होता. मी तिला आडवा गेलो. तो भारा माझ्या डोक्यावर घेतला. चालता चालता आईला म्हणालो, 'आई, बैलाचं मांस आणलं. बैल ताजाफूट होता. सगळं कापसागत मांदंच मांदं.'

'मग ते कुठं ठेवलंय?'

'लांब शिक्यावर.'

'बरं केलंस, नायतर मांजराची भीती'...

'आये, मला चांगला रस्सा करून दे!'

'बराय, गेल्यागेल्या चूल पेटवती. लागलीच चुलीवर कोरड्यासाला गाडगं

ठेवते!'

'मग झॅक होईल.'

असं बोलत आम्ही घरी आलो... आई दार उघडून घरात गेली. तिनं एकदम मला हाक मारली, 'अरं संकर! हे रं कसं झालं?... हितं खाली शिक्याचं गाडगं कसं पडलं, फुटलं?'

'आना ग आये? मासाचं सगळं टुकडंच पळवलं.'

'त्या मुड्या बोक्यानं पळवलं वाटतं' असा आईनं हाळहाळत आवाज काढला ...'बोक्यानं माझ्या पोराच्या तोंडावर हाणलं!' माझी आई मात्र फुटलेल्या गाडग्याची खापरं गोळा करत होती...मीच मग आईला म्हटलं, 'आई, आपल्या वाटणीच्या मळ्यातलं जनावर का मरंना ग?'

तोच ती चटकन् बोलली, 'कशाला रे बाबा? आपल्या तोंडाच्या चत्रीपाय? छे छे देवा, तसं काय करू नको'.

आईचं ऐकून मी चाटच पडलो.

### ताकरताळं व आई

शेवंता मजकडे धावतच आली व बोलली, 'शंकर, तुला आईनं बोलावलंय.'

'कशाला?'

'आरं, ताकरताळं खायाला.' ...मी लागलीच पाटलाच्या वस्तीवर शेवंताबरोबर गेलो. तोच शेवंता म्हणाली, 'अरं अजून ताकरताळं वाढलं नाय. आय दारात उभी राहून ताकरताळं मागतीय नव्हं का?'

आई वस्तीवरच्या पाटलाच्या दारात उभी होती. ती रताळंताक मागत असावी हे मला खरं वाटलं. मी आईच्या जवळ गेलो. आई पाटलाच्या हौसाबायला विनवत होती, 'वाढा की वो माझ्या लेकराला रताळं ताक. त्यापाय तर तेला मी तुमच्या मळ्याला आणलंय.'

तोच आतून हौसाबायचा आवाज आला, 'सावूबाय, जरा थांब. थांब तुला ताकरताळं वाढती'...तेवढ्यात हौसाबाई घरातून बाहेर आली. तिनं एक पितळीभर शिजलेली पांढरीतांबडी रताळं आणली. ते सगळं ताट माझ्या आईच्या ओटीत ओतलं.... तोवर घरातून हौसाबायनं तीन जोंधळ्याच्या सफेद मोठ्या भाकरी आईच्या पदरात वाढल्या. त्या भाकरीवर पाट्यावर वाटलेल्या मिरचीचा तांबडालाल गोळा होता. ते झाल्यावर त्या बाईंनी गाडग्यात ताक आणलं. ते माझ्या आईपुढं धरत ती म्हणाली, 'सावूबाय, आता हे ताक कशात घेतीस?' आज नेहमीप्रमाणे मळ्यात येताना आईनं ताकासाठी मातीचा मोगा, लोटकं काहीच आणलं नव्हतं. धोतराच्या धडप्याशिवाय आई निव्वळ मोकळ्या हातानं आली होती. आता हौसाबायनं आणलेलं ताक कशात घ्यावं हा आईपुढं प्रश्न होता. म्हणून ती सरळ हौसा

बायला बोलली, 'हौसाबाय, हे ताकाचं गाडगं मलाच द्या की.'

'अगं सावू, घरात दुसरं गाडगं न्हाय, हे एकच तेवढं हाय'.

'आवो, तुमाला वाटच्याच्या, कुंभारा– बलुतेदारांकडून मस्त मिळतील की.'

'आता कवा कुंभाराकडून मिळायची अन् कवा घरात इयाची?'

'मग वो आता, ताक कशात घेऊ?' असं आईनं विचारताच, हौसाबाईची नजर सरळ गोठ्यात गेली. गोठ्यात म्हशीपुढं आंबवण ठेवलेली लोखंडी पाटी तिला दिसली. ती बघून आयला बोलली, 'अग सावूबाय, ती बघ लोखंडाची पाटी गोठ्यात हाय!'

आईची नजर गोठ्यात गेली. 'पाटी हाय म्हंता?'

'ती हाय बघ गोठ्यात म्हशीम्होरं. ती घी. पाण्यानं जरा धू, खंगाळ, ती चांगली हाय म्हशीचीच.'

हौसाबाय असं बोलल्या बोलल्या आई गोठ्यात गेली. म्हशीच्या पुढं ठेवलेली आंबवणीची पाटी ओढून घेतली, ती दारात आणली. त्या पाटीत हौसाबाईनं तांब्याभर पाणी वाढलं. आईनं त्या पाण्यानं पाटी चांगली खंगाळली, धुतली. मग त्या लोखंडी पाटीत हौसाबाईनं ते पाण्यासारखं पातळ ताक ओतलं. ते बघून आई पटकन बोलली, 'कावो, ताक लय पातळ पाण्यागत केलंय!'

'काय करायचं वो सावूबाय, ताकाला एक का दोन मागतकरी हायत व्हय? आपल्या दारात म्हैस हाय. त्यात कुणीबी ताकाचं पाणी मागितलं तर कुणाला कशाला न्हाय म्हणा? मग ते घट्ट ताक सगळ्या मागतकऱ्यांना कसं पुरायचं? तूच आता बोल.'

त्यावर आई क्षणभर गप्प झाली व मग बोलली, 'ते बी खरंच!' तशीच ती ताक घेतलेली लोखंडी पाटी आईनं लांब म्हशीच्या गोठ्यात आणली. तिथंच गोठ्यात सावलीत म्हशीजवळ आम्ही बसलो. पाटीतल्या ताकात आईनं रताळं चुरली. त्यांचा ताकाच्या पाण्यात रांदा केला. मग आम्ही तिघंही मायलेकरं एकाच पाटीत ताकरताळावर ताव मारू लागलो.... आईनं मग तीच पाटी पाण्यानं धुवून घेतली. त्यात पिण्यासाठी पाणी मागून घेतलं.

### मुलाची काळजी

तोच आईची नजर माझ्या हाताकडे गेली. ती लागलीच मला बोलली, 'हे का रं बाबा, तुझ्या सगळ्या हातापायाला झाडाचं खोंबारं लागल्यात. सगळं हातपाय खरवडून गेल्यात.'

त्याबरोबर मी बंडीच्या खिशातून दोन डिंकाचे गोळे काढून आईला दाखविले. ते कोण पाहील म्हणून पटकन परत खिशात घातले. मग काय, आई माझ्यावर तडकली.

'माझ्या बाबा, असं झाडावर चढून एखाद्या वक्ताला हातपाय मोडून घेशील अन् जन्माचा आधू होशील.'

तोच मी हासतच बोललो, 'झाडावरून पडायला मला का एवढा आडाणी, लेचापेचा समजलीस ?'

'तसं न्हाय, या भुताखेताच्या जागा ! कंची येळ कशी येईल हे सांगता येत नाही !' असं ती बोलली.

**व्हल्याची पिल्लं**

मी आनंदानं कोकरागत उड्या मारत आईकडं आलो. तिला म्हणालो, 'आये, व्हल्याची पिल्लं हायेत गं! माझ्या हाताला नेमकी येतील.'

'कशाला रं पारध्यागत व्हल्याची पिल्लं काढतोस?'

'आपण त्याला घरी पाळू की !'

'आरं, पण ती बिनआयबांची कशी राहायची ?'

'आपण त्याला दाणापाणी घालू की !'

'आरं, ती लहान पिल्लं, आपल्या आईच्या चोचीनं दाणापाणी खातात. ती तशी नेली तर पोटापाण्यानं झुरुन मरुन जातील.'

'न्हाय न्हाय ! ती मी घेणारच.' मी माझा हट्ट धरला. तोच आई बोलली, 'नको रं बाबा, त्या लहान पिलांचा आपल्याला सराप लागंल.'

असं म्हणून ती पुढं कळवळ्यानं बोलली, 'ती बाळं घेऊन गेल्यावर त्यांची आई रडत बसंल. ती मुकी पक्षीण आपली बाळं कुणी नेली म्हणून रडत झुरत बसंल. माणसागत त्यांचा पण जीवच !'

आता आईचं बोलणं ऐकून मी गप्प झालो. आईनं असं बोलून माझ्या उत्साहा-वर थंडगार पाणी ओतलं.

**लग्नाचं लुगडं**

एकाएकी आई वाडीला हजर. आईला बघून आण्णानं चटकन् पुसलं, 'काय गं, तू का म्हण अनमानधपक्या आलीस ?'

'आणलं मला हितं सरकारी गावकीच्या कामानं !' असं बोलून आई पुढं म्हणाली, 'या वाडीतली काय कुळं शेतपट्टीपाय चावडीवर बोलवायची हायेत.'

'ते खरं, पण तू कशी काय आलीस ?'

'मग, तुमच्या माघारी ही सरकारी गावकी कोण सांभाळणार ? पाटील तर दारात येऊन बोंबलत होता. मग मला निघावंच लागलं.... मनात म्हटलं, तुमची भेट होईल !'

तोच आण्णानं विचारलं 'कंची कंची कुळं बोलवायची हायेत ?' आईनं

त्यांची पटापटा नावं सांगितली. मग तिनं मध्येच आण्णाला पुसलं, 'तुम्हाला काय म्हाराचा मानाचा आहेर दिला का न्हाय आजून?'

'अगं, अजून काय पण दिलं नाय ! म्हणूनशान त्यांची सारखी पाठ धरलीय.'

'काय म्हणतो मालक ?'

'तो फक्स्त मान डोलावतोय.' असं आण्णा म्हणताच, आईच बोलली, 'मी त्या यशवंताला बोलते.' असं म्हणून ती सरळ मांडवाच्या दारी गेली. त्याला गाठून सरळ बोलली, 'का वो पाटील, म्हाराला आजून काय आहीर केला नाय?'

'तू आलीच व्हय सावूबाय ?'

'व्हय, मग कसं करता ? मला वाटलं, तुमी आतापातुर म्हाराला वाटं लावलं असंल !'

आईच्या या बोलण्यावर यशवंता गप्प झाला. मग हलकेच कसा म्हणतो, 'सावूबाय, या बारीला पटका, चोळीच्या खणावरच भागवतो बघ. म्होरच्या लग्नात म्हाराला म्हाराचं लुगडं खात्रीनं देईन.'

'आता तुमच्या घरात म्होरं कवा लगीन निघायचं अन् मला लुगडं कवा मिळायचं ? तोवर मी म्हातारी होईन.' असं आई कडकडीत बोलली. पण आईचा चेहरा पडला होता. म्हाराला पटका, लुगडं चोळीचा आहेर कबूल करून तो उलटा पडला होता.

तोच तो यशवंता म्हणतो, 'अगं सावूबाय, आमच्यावर काय इश्वास हाय का न्हाय ?'

'इश्वास मस्त हाय, पण ही येळ गेल्यावर ती पुन्हा येतीय थोडीच ? माणसाची आशामोड होतीय की !' असं जरा कडक आवाजात आई बोलली. पण तो आपला खाली मुंडी घालून होता. तोवर 'शेतपट्टी भरण्यास चावडीवर लगोलग हजर रहा ' असं वाडीतल्या कुळांना खबर देऊन आण्णा परत आला व आईला म्हणाला, 'काय गं, लुगडयाचं काय म्हणतात ?'

'लुगडं नायच म्हणत्यात.'

तोच आण्णा स्वतःशीच बडबडला, 'आयला, त्यापाय मी चारपाच दिस रावलो अन् शेवटी मोकळ्या हातानंच परत जायाचं ?'

तोच आई म्हणाली, 'काय करायचं ? इळानिंदा पोटापाय त्यांच्या दारात जावं लागतं !'

'व्हय, ते बी खरं. पण असं कबूल करून तोंडावर का म्हण हाणायचं ?'

तोच आई म्हणाली, 'मी आता गावात माघारी जाते. चावडीवर पाटलाला कुळांची खबर दिली पाहिजे. अन् जातानं शंकरला घेऊन जाते.' ... आईचा चेहरा पडला होता.... आईबरोबर मीही गावाची वाट धरली.... मी व आई गावच्या वाटेला लागलो. वाटेला चालता चालता आई पाटलाच्या मळ्यातील माणसांवर भडकली होती, त्यांच्या नावानं खडे फोडीत होती.... घरच्या ओढीनं आई भरा-

भर चालू लागली. घरी शेवंता व धाकली भावंडं वाट पहात असतील– पोळयांच्या आशेनं.

**मारुती व आई**

तोवर माझी आई झऱ्याच्या वाटेनं चटाचटा चालत पळत आली. ती आल्या-आल्या माझ्यावर कावली, 'किती रं येळ लावलाय? घरी पाण्याचा खोळंबा झालाय, तू इथं बिनघोर उभा ?'

त्यावर मी आईला घागर– कपडे चोरीचा प्रकार सांगितला. ते ऐकून आई गप्प झाली. तिनं उगंच इकडं तिकडं नजर टाकली. तिच्या तोंडातून आपोआप जळजळते शब्द बाहेर पडले, 'माझ्या लेकराचे कपडे कुणी नेले त्याचे हातपाय मोडले, त्याचं मढं गेलं !' असं बडबडून ती मला फाडकन् बोलली, 'काय मारुतीच्या दर्शनावाचून तुझं आडलं होतं, तवा तू ओल्या पडद्यानं मोठ्या गडद्यागत दर्शनाला गेलास ? आता मारुती काय तुझे कपडे आणून देतोय ?' तीही मारुतीच्या नावानं उलट वडबडली. मग मला बोलली. 'आता तर पाणी कशानं आणावं ? सकाळीच या मारुतीनं पंचाईत केली...' मी शाळेत कसा जाणार ? तोच आई मला बोलली, 'तुझी शाळा आता बंद कर. असल्या फाटक्याजुन्या कपड्यात शाळेत जाऊ नको' ...... मग आईनं उतरंडीची एक लहान मातीची कळशी काढली व मला म्हणाली, 'झऱ्यावर जा. या कळशीत पाणी आण.'... आई बाजार करून घरी आली. घरी आल्यावर बाजाराचं गटोळं सोडलं. त्यातून माझ्यासाठी एक उक्ता मांजरपाट कापडाचा अर्धा शर्ट आणला होता चड्डीही आणली होती. ती माझ्या हातात देऊन म्हणाली, 'घाल हे नवे कपडे !' ... मग आईनं चुरमुरे फुटाणे खायाला दिले. येताना तिनं नारळही आणला होता. तो पाहून मी आईला विचारलं, 'आई, हा नारळ कशाला ?'

'आरं, त्या मारुतीला फोडला पाहिजे.' ... मी तिला आश्चर्यानं विचारलं.... 'आता कशाला मारुतीला नारळ फोडतेस ? त्याच्या नादात तर माझे कपडे न् घागर गेली.'

तोच आई मला समजुतीनं बोलली, 'आरं, एवढी देवाची भक्ती करून पण चोरी झाली, तर त्यात आपल्याच हातानं काय तरी चुकलं असंल. त्यापाय देवानं आपल्यावर राग धरू नये म्हणून मारुतीला नारळ फोडायचा. देवाला ऊदकापूर लावून नारळ फोडून देव देव करायचा !'

दिवस मावळला होता. झांजड पडत होती. आईनं हातात नारळ, साखर, कापराच्या पुड्या घेतल्या व मला बोलली, 'चल, आपण मारुतीला जाऊ !'

आई असं म्हणताच मी नवे कपडे घालून तयारच होतो.... आम्ही गावात मारुतीच्या देवळाजवळ आलो.... मारुतीच्या दर्शनाला आलेल्या एका उदम्याच्या मराठ्याच्या हातात आईनं नारळ, कापराच्या पुड्या दिल्या. त्यानं नारळ फोडला.

नारळाचे पाणी देवावर टाकले. नारळाचा प्रसाद तिथं थोडा ठेवला, आपण थोडा घेतला. बाकी नारळ आईच्या पदरात टाकला. आईनं खडीसाखरेच्या पुड्यातले दोन खडे पायरीवर ठेवले. तिनं मारुतीरायाचं भक्तिभावानं दर्शन घेतलं. पायरीवरची माती आपल्या कपाळाला लावली, माझ्यापण. मग मला आईनं साखरेचा व नारळाचा प्रसाद हातात दिला.

**वाळीत प्रकरण**

शेवंताला पाटलाच्या मळ्यातून अंधाराची जेव्हा घरी आणली होती तेव्हा आईनं तिला जवळ, पोटी घेतलं होतं. शेवंताच्या डोळ्याचे अश्रू पुसले होते. तिच्या अंगावरून मायेचा हात फिरवताच शेवा रडायला लागली. डोळं पुसता पुसताच शेवाला आईनं पुसलं, 'का ग शेवे पळून आलीस ? नांदणं काय तुला गोड लागंना?'

मग शेवंता खडखडीत आवाजात बोलली, 'अग आये, मी एवढं मरमर काम करते, घरात सगळे बसून रहातात. मी एवढं काम करून मलाच जाच, मलाच मार. मी किती सहन करू? मी तेंचा काय गुन्हा केलाय?'

'असं का म्हण करत्याती? तुझी सासूपण?'

'अगं ती सासू दिसती तशी न्हाय! तिनं तर माजा उभा जाच मांडलाय. अग एक का दोन गोष्टी...सगळ्या घरादाराचं पाणीलावणी, दळणकांडाण, सगळ्या भाकरी टाकायच्या, त्यात रानात रोजगारीनं जायचं. सगळं माज्या एकटीच्याच पाठीमागं लावलंय बघ!'

'अन् तुझ्या घरातली माणसं?'

'अगं ती माणसं हायेत का जनावरं?' असं वैतागानं बोलून ती पुढं आपला हात आईला दाखवत म्हणाली, 'बघ माझा हात, दळून दळून माझ्या हाताला घट्टं पडलं. पाण्याच्या घागरी आणून आणून डोईचं केस पातळ झालं.'

आईनं तिच्या हाताचे घट्टे बघताच ती चिडली. 'मग, तुझ्या घरातली का माणसं मेली व्हय?'

'अगं, ती काम करणाऱ्या माणसाचा मुडदा पाडतील तवाच गप बसतील. मग माझा मुडदा पडायच्या परास आयबापाच्या घरी पळून आली.'

ती मोठ्या कळत्या माणसासारखी बोलत होती. अर्थात ती सासरच्या रोजच्या अनुभवानं तेवढी भाजलीच होती. रोजचा एवढा जाच सोसलेल्या माणसाच्या मुखातून त्याचे अनुभवाचे बोल पटापटा बाहेर पडणारच.

तिचं सारं ऐकून आण्णा तिला शांतपणे म्हणाला, 'अगं शेवा, तुला आयबा कुठवर पुरायचं? तुला नांदायला गेलं पाइजे.'

'मी कवा नांदायला न्हाय म्हटलंय? पण नवऱ्याघरची माणसं माणसागत वागली पाइजेत. त्यास्नी तेवढा जाब इचारा की. तुमी मला तसंच नांदायला पाठवाल तर मी हिरीत जीव दीन.'

शेवंता एवढ्या लहान वयात खडाखडा बोलत होती. ती घरात काय कुणाला बोलायला ऐकत नव्हती. ती तशीच नवऱ्याच्या घरी बोलत असणार. तिच्या मनाचा निर्धार ऐकून आईनंच तिला धीर दिला. 'शेवा, बया तू काळजी करू नको. मी पग त्यांचं काय ते बघायलाच बसलीय. बघू तुला कसं नांदायला नेत्याती '

आईच्या बोलण्याचा शेवाला आधार वाटला, मलाही वाटला.

असेच पंधरा दिवस, महिना गेला. शेवंताचा नवरा, सासू, चुलतदीर असे कुणीकुणी घरी येऊन गेले होते. पण आईनं तिला नांदायला पाठविली नाही. आलेले पाहुणे तसेच परत गेले. माझी आईही चिडीला पेटली होती. आण्णांचं व आईचं मध्येमध्ये यावरून भांडण व्हायचं पण आईनं शेवंताला सासरी पाठवली नाही.

शेवटी पिंपरीचे पाहुणेही चिडीला पेटले. त्यांनी म्हाराच्या तक्क्यावर म्हारांची भावकी एका रात्री जमवली. त्यांनी आण्णाला बोलावून घेतले... आई पाठोपाठ आली व तक्क्याच्या एका बाजूच्या कोपऱ्यात अंधारात काय ते ऐकायला बसली.

भावकीतल्या गेनुबुवा तराळानं पहिला सवाल केला, 'काय रे रामा, पिंपरीच्या पाहुण्याकडे पोरगी नांदायला पाठवतो का न्हाय ते बोल!'

'पाठवायला कोण नको म्हणतोय? पण पोरीच्या जिवाचं काय बरं बघितलं पाइजे का नको? का पोरीला तसंच आगीत टाकू?'

'आरं, रामा, घरोघरी मातीच्याच चुली! सासू म्हटली की सुनेला जाच आलाच म्हणन काय बायांनी नांदणं सोडलंय व्हय?'

'आवो, पण लहान पोरगी बघून त्यांनी आपल्या मुलीगत तरी सांबाळली पाइजे.'

'आरं, तसंबी सांबाळतील! असं किती दिस सासूचं चालतील? पुढं सुनंचं दिस येणारच की.'

'कवा सुनंच दीस इयाचं? तो माजी पोरगी मरायची की!'

मग गेनुबुवा चिडून बोलला, 'तुझ्या पोरीला काय नांदवायला पाठवत न्हाय म्हन की !'

'पाठवीन की, कळती झाल्यावर !'

'आयला मग तुजा तिसराच काहीतरी बेत दिसतोय!'

'बेतबीत काय न्हाय. पोरगी मोठी झाल्यावर पाठवीन'.

माझ्या बापाचा बोलण्याचा रोख बघून गेनुबुवा गावकीला बोलला, 'का वो मंडळी, आता बोला काय तुमचा इचार हाय तो!' ... तोच दसरानं चटकन निर्वाणीचा बोल केला, 'लेकाच्याला भावकीची जर किमत न्हाय तर टाका त्याला भावकीतून वाळीत. आपोआप त्याचा कैफ खाली ईल!'... शेवटी भावकीनं आमच्या घराला वाळीत टाकायचा निर्णय घेतला... वास्तविक भावकीनं माझ्या बहिणीला काय काय जाच होतो, तिचा काय काय छळ होतो याचा पाहुण्यांना जाब विचारायला पाहिजे होता... माझ्या आईलाही अन्यायाची चीड, संताप येत होता. ती अन्यायाला शरण जात नव्हती.

## वाळीत

आईनं मला विचारला 'शंकर, गप्प का झालास?'

त्यावर मी भावकीचा निर्णय सांगितला, 'आपण शेवाला नांदायला पाठवत नाही म्हणून भावकीनं आपल्याला वाळीत टाकलं,' त्याबरोबर आई कडाडली, 'मी बी नावाची सावित्री हाय. मी बी बघीन वाळीत टाकणाऱ्याच्या लेकी हायत्या का न्हायत्या. त्यांचं नांदणं कसं होतंय ते बी बघीन'.

...मी आईला विचारलं, 'आये, म्हारोड्यातल्या लग्नात आपल्याला जेवणात येऊ दियाची नाहीत. मग कसं? आपण कुठं जेवायचं?' माझा हा सवाल ऐकून आई गप्प झाली... पण क्षणभरातच ती खडया शब्दात बोलली, 'ना का आपल्याला गावजेवणात घेईनात, त्या दिवशी मी घरी राहून चांगल्या पोळ्या करीन.'

...'आये, हे झालं खरं. पण भावकीनं आपला विस्तव बंद केलाय. तू कवा-कवा रात करून घरी येतीस. मग शेजारचा विस्तव मिळाला नाही तर तू चूल कशी पेटवणार? भाकरी कशी करणार?'

माझ्या आईनं या प्रश्नाला चटकन उत्तर दिलं, 'गावातली वाण्याची दुकानं का बंद झाली व्हयरं बाबा? काडयाच्या पेटया लय मिळत्यात. एका पैशाला एक. अन् मी कवा रोज रोज शेजारच्या दारात इस्तू आणायला जाते?'

माझी आई दुसऱ्या शेजाऱ्याच्या घरीदारी बसायला बोलायाला जात नव्हती. पण शेजारच्याच बायका आमच्या दारात, घरी आईबरोबर बोलायला येत होत्या. वाळीत टाकल्यापासून माझी आई कधी कुणाच्या घरीदारी चूल पेटवण्यासाठी विस्तव आणायला गेली नाही. घरात अंधार झाला तरी दुसऱ्याच्या घरी जाऊन दिवा पेट-वून आणला नाही.

आण्णा मात्र वाण्याच्या घरी लाकडं फोडून झाल्यावर काडयाची पेटी आणत होता, उतरंडीच्या गाडग्यात कायम एक काडयाची पेटी ठेवलेली असे त्या काडयाच्या पेटीनं आई दिवा लावत होती. चूलही पेटवीत होती. या उलट जुगाई, ईटाई, गंगा-बाई, पवाबाई आमच्या घरी येऊन चुलीतला विस्तव घेऊन जात होत्या, दिवा पेट-वून घेऊन जात होत्या.

मी ... आईला बोललो, 'आये! उद्याच्या गेना म्हाराच्या पोराच्या लग्नात जेवणाचे गहू आपल्याला टाकले नाहीत.'

त्याबरोबर आई लागलीच बोलली, 'न का टाकीनात! मी पण उद्या पोळ्या करीन. तेलाच्या तेलच्या करीन तुमाला खायला धालीन ... मग आई लगोलग उठली. तिनं गाडग्यांची उतरंड उतरली, तळातल्या डेऱ्यातून एक शेरभर गहू माझ्या-समोर काढले. ते गहू पाहून मलाही हायसे वाटले.

आई माझा सुकलेला चेहरा, उतरलेला चेहरा पाहून बोलली, 'काय रे बाबा तू शाळेतनं इयाला उशीर केलास? घरी पोळ्या करून मी तुझी वाट कवापासून बघत बसलीय!'

आईला मी काहीच बोललो नाही. तेवढ्यात आईनं तेलाततळलेल्या पोळ्या– तेलच्या पितळीत माझ्यापुढं सरकावल्या. एका पितळीत गुळवणी वाढली. वाटीत आमटी वाढली. मग आई म्हणाली, 'बाबा खा, पोटभर पोळ्या खा.'

### मुलाचे पैसे

पैसे आईच्या हातात दिले. ती माझ्याकडं पाहून आश्चर्यानं बोलली, 'कुठलं रं बाबा हे पैसे?'

'हाडकंवाल्याला हाडकं विकली, त्याचं हे मिळालं!'

'मग ठेव तुलाच, बाजारात खायाला घियाला!' असं मला म्हणून आईनं पैसं गाडग्याच्या उतरंडीच्या एका लहान लोटक्यात ठेवले.

### लेकराचा आजार आणि बोकडाचा बळी

माझ्या घरात माझा सगळ्यात धाकटा भाऊ सोपान आजारी होता... माझी आई म्हणे त्याच्या तोंडात 'अग्रं'चा आजार झाला होता. त्याच्या तोंडात दुधाच्या साईसारखा पांढरा पदार्थ तोंडभर येत होता. रोज सकाळी आई त्याला मांडीवर घेऊन गरम पाण्यात फडकं बुडवून त्याच्या जिभेवरचा पांढरा अग्रं काढत बसत होती. ... त्यापाय माझ्या आईनं पुष्कळ गावठी दवापाणी केलं, झाडपाल्याचं औषध केलं, पाट्यावर वाटून घोटून औषधपाला पाजला. पण पोरगं काय उबजाऱ्या येत नव्हतं ... आईनं त्याला डागदराकडं नेला, पण डागदराच्या बाटलीतल्या पाण्यानं मूल उबजाऱ्या येईना, अंग धरंना.

...मग शेवटचा उपाय म्हणून आईनं लोटेवाडी गावच्या मोठ्या म्हसोबाला बोल केला 'देवा, म्हसोबाराया, तुला मी बोकडाची जत्रा करीन, माझ्या लेकराला आराम पडू दे!' ... केलेला नवस पटवावा म्हणजे मुलाला बरं वाटंल अशी आईची भावना. शेवटी म्हसोबाच्या आशेवर आईनं नेम धरला. म्हसोबाच्या यात्रेची जमवा-जमव झाली. मंगळवारचा दिवस उजाडला.

आईनं भल्या येरवाळी गरम पाण्याचे चार तांबे अंगावर घेतले, तिच्या दृष्टीनं ती न्हाली. देवाला हात जोडले. मग चुलीपुढं बसली. ढगढणत्या चुलीवर तवा ठेवला. भराभरा वीसपंचवीस मोठ्याल्या भाकरी टाकल्या. मग तांदळाचा दाणा रांधला. तो खाली उतरला. त्यानंतर देवाच्या नैवेद्यासाठी गव्हाच्या तळहाताएवढ्या चार चापट्या निवद टाकल्या. अशी सगळी तयारी करून आईनं, पोर देवाच्या जवळ जायचं म्हणून, सोपानाला शेवटी गरम पाण्याची आंघोळ दारात घातली.

### म्हसोबाची पूजा

बाहेर अंगणातूनच आईनं देवाला नारळ फोडला. नारळाचं पाणी चारी दिशेला शिपडलं....देवापुढं ऊदकापूर जाळला. ताटातला निवद देवापुढं ठेवला. तिनं भक्तिभावानं दर्शन घेतलं. वडिलांनीही...बोकडाच्या सुटरोटीचा—काळजाच्या घडाचा निवद आईनं म्हसोबाला दावला. देवाच्या पुजाऱ्याजवळ दुसरा एक नारळ फोडायला दिला. त्यानं देवापुढं नारळ फोडला. नारळाचं अर्धं आईजवळ फेकलं... आईनं मोठ्या भक्तिभावानं म्हसोबाला दंडवत घातला, देवाचा अंगारा आजारी पोराला लावला. मग आईनं देवाला बोल केला,

'देवा, म्हसोबाराया! आता तुझी जत्रा केली. आता माझ्या लेकराला सूट मिळू दे. त्याला चांगला बरा हू दे!' असा बोल करून आईनं मुलाला देवाच्या दारात ठेवला, पुन्हा अंगारा लावला. मग मला, शेवाला लावला. मग बाकी गडी बाया अंगारा ल्याले. ...

शेवटी माझी आई, चुलती व दुसरी पवाबाई जेवायला बसल्या. सगळं झाल्यावर त्यांनी भांडीवासणं घासली, विसावा घेतला.

...आम्हाला पाहून छपरात उभी असलेली लवंगी शेळी बँ...बँ...करून ओरडली. त्याबरोबर माझ्या आईनं तिचा बोल हेरला व तिला डोईवरचं गाठोडं खाली ठेवून बोलली, 'बाई, तुजा ल्योक आज देवाच्या दारी गेला!'

### पोराचा वाढता आजार

आई (आजारी) मुलाजवळ बसली होती. घराच्या लाचारगती संसाराला, ती किकून गेली होती. रोजच्या पोटापाण्याच्या ओढीनं वैतागली होती. लहान मुलाच्या अंगावरून हात फिरवत आई आण्णाला विरघळलेल्या शब्दात बोलली 'बघा, पोरगं आज तापानं शेकटलं!'

आईच्या बोलाचा झटका बसल्यागत आण्णा उठला...आण्णा बोलला, ,पोरगं तापानं भाजतंय!... मला खजिना घेऊन तालुक्याला जायाचंय. मला आता उठलं पाहिजे.'

आण्णाच्या या बोलानं आईच्या काळजाला धक्का बसल्यागत झालं. ती वैतागानं बडबडली, 'तुमाला हाय का काय काळजी पोराबाळांची, घरातल्या मीठ-मिरचीची, दाण्यादुण्याची? उठलंसुटलं सरकारी गावकीचं काम. ते पडु दया की तितंच!'...तो परत आईला समजुतीनं बोलला, 'तू आपलं पोराजवळ बस. रानात कुठं रोजगारानं जाऊ नको.!'...

आईच्या बोलण्यातला संताप, चीड मला दिसत होती. रोज काम करून नीट पोट भरत नव्हतं. गावकीच्या व रयतेच्या कामानं आईआण्णा दोघंही बेजार झाली होती.

आई उठली. तिनं चूल पेटवली. तवा ठेवला. भाकरी टाकल्या. पाट्यावर तांबड्या मिरचीची लसूण घालून चटणी केली.

आण्णासाठी तिनं भाकरी, वर चटणी व कांदा फडक्यात बांधला. ती भाकरी आण्णाजवळ दिली.

**मुलाचा अंत**

त्या दिवशी आई रोजगारानं रानात गेली नव्हती. घरात तापानं पडलेल्या मुलाजवळ दुचित होऊन बसली होती...घरी दोन दिवस पोराला बाटलीतला डॉक्टरचा दवा पाजला. पोराला गुण येईना, त्याच्या अंगचा ताप हाटंना...

आईच्या मनात अनेक शंकाकुशंका उभ्या रहात. तीच सकाळी उठल्यावर आण्णाला म्हणली, 'पोरगं इतके तापात रहायचं नाय. पोराला कुठली तरी लागीर झाली असेल.' असं बोलून ती स्वतःच आपल्याशी पोराकडं बघून बडबडू लागली, 'उनातानात, ध्यादुपारा, सकाळपासून सांच्यापातूर रानामळ्यात पोराला घेऊन पोटाचं काम केलं, तवा पोराला कुठं पाण्याच्या पाटात, दांडात झोपवलं. मुलाला कवा बांधावरच्या बाभळीखाली टाकलं. कुठली जागा कशी, कुठली कशी आपल्याला का ठावं? पोरगं कुठंकुठं हिंडवलं, कुठंकुठं वंगाळ जागी ठेवलं. काय तरी मुलाला भुताची लागीरच झाली असावी ते बघितलं पाइजे. त्याबिगर पोरगं उवजाऱ्या इयाचं नाय.'

अशीच काय तरी आई स्वतःशीच बडबडत होती, मुलाकडे टक लावून बघत होती.

'उदयाच्या शुकीरवारी अंगावर चार तांब्या पाणी घ्यावं अन् पोराला घेऊन म्हाताऱ्या नबाबाई देवर्षीकडे तरी जावं. तीच नेमकी काय हाय ते खडाखडा सांगील.'

शुक्रवार उजाडला. आईनं पोटाचं आवरून अंगावर चार तांबे पाणी घेतलं मुलाला अंगारा लावला व नबाबाईकडं निघायापूर्वी मला बोलली, 'शंकर, माज्याबरोबर त्या नबाबाईच्या घरी चल, मागच्या आळीत!' मी आईबरोबर निघालो, नबाबाईच्या घरी गेलो. आईला पहाताच नाकात तपकीर कोंबत बोलली, 'का ग सावूबाय, पोराला घेऊन आलीच?'

तोवर आई खाली बसली. आईनं मुलाला मांडीवर घेतलं. मुलाला पुढं दाखवलं. आई तिला म्हणाली, 'बघा नबाबाई, जरा मन घालून बघा! पोरगं लय दिस झालं, पडून हाय- दिसानं दीस खंगत चाललंय, अंगातला ताप काय हाटंना.

**नबाबाई देवर्षीण**

नबाबाई पुढं सरकली, तिनं जवळची पिशवी घेतली. मुलाला नीट एकटक

पाहिलं. पिशवीतला अंगारा काढून मुलाला लावला, पिशवीतनं एक लिंबू काढलं. लागलीच लिंबू बोटावर ठेवून तिनं देवाला गुडी लावली, चार देवदेवतांची नावं घेतली. भुताखेतांच्या नावाचा उच्चार केला. त्याबरोबर लिंबू खाली पडलं. लिंबू खाली पडल्यापडल्या नबाबाई आईला बोलली, 'ये बया सावूबया, पोराला खालच्या दाजी दरडावरच्या करंजाडातली कैकाडीन हाय बघ!' आई शांतपणे, गंभीर चेहऱ्यानं ऐकत होती...ती नबाबाई पुढं बोलली, 'तू असं कर! तिला तीन धानाचा दामटा, वर अंडं, हळदकुंकू, एक तांबडा पैसा अन् काळ्या दोऱ्याची बट असं आमोशाच्या दिवशी कर अन् तुझ्या रामाकडून नेमकं त्या जाग्यावर ठेवायला सांग.'

नबाबाईच्या बोलण्यानं आईला धीर आल्यागत दिसला. 'नबाबाई, तुज्या हाताला यश येऊ दे!' असं म्हणून तिच्या पायावर आईनं पोरगं ठेवलं. मग ती पोरगं घेऊन उठली. उठता उठता नबाबाई आईला म्हणाली, 'आता बिनघोर जा. पोराला आराम पडंल. पण सावूबाई, तू आठवड्याचा मंगळवार धर बरं का!' आम्ही नबाबाईनं कौल दिल्याप्रमाणे भुताचा लागीरचा खानादाना केला. आण्णा-जवळ दिला. त्यानं तो नेमक्या जागी दाजीदरडाच्या करंजाडात ठेवला.

आईनं आपल्या मनातली एक कांक्षा फेडून घेतली...

आईनं घरात दिवा लावला. दिवळीत ठेवला. दिव्याच्या ज्योतीनं घरातला आंधार हाटला. मग आईनं चूल पेटवली. भाकरी टाकू लागली....दुसऱ्या दिवशी न्याहारीचा वक्त झाला होता. तरी आईनं चूल पेटवली नव्हती. ती आज लहान सोपानाकडं टक लावून बसली होती...ते आता काही घटकेचं सोबती होतं हे आईला कळत होतं.

आई मुलाला मांडीवर घेऊन बसली होती. तिच्या डोळ्याला अश्रूंची धार लागली होती. आईनं मुलाच्या कपाळावरून, गालावरून हात फिरवला. मुलाचा शेवटचा सूर लागल्याचं आईनं जाणलं. मुलाच्या हातापायाचे आकडे वळू लागले, अंगाचं मुटकुळं होऊ लागलं, म्हणुन आईनं त्याच्या तोंडात शेवटचे दोन चमचे दूध घातलं. तिला वाटलं असेल की आता काय पोराचा भरंवसा नाही. म्हणून मला तिनं लागलीच आण्णाकडे पिटवलं.

'जा बाबा, तुझ्या बाला घेऊन ये. त्यासनी म्हणावं, पोरगं एकाएकी कसनुसं कराया लागलंया. त्याचा काय आता नेम नाय. पळ पळ!'

असं मला सांगून तिनं आपल्या डोळ्याचे अश्रू पुसले....

...आम्ही घरी आलो तर आमच्या दारात बायकामुलांचा घोळका जमला होता. तो ओळखून आण्णा लांबनंच ओरडला, 'काय रं केलंच हे देवा!'

### मढ्याचे पैसे आणि आई

मी आंघोळ करून घरी गेलो. तेव्हा घरात आई आलेली होती. तिनं चूल पेटवलेली होती. मी कुठं गेलो होतो याची पूर्ण कल्पना तिला अगोदरच आली

होती. मी घरात बसल्यावर माझ्याकडे बघत आई म्हणाली, ' माज्या बाबा, तुज्या पण मागं ही गावकी लागली ! '

तोच मी हासऱ्या चेहऱ्यानं हातातले बारा आणे आईपुढं करून आईला म्हणालो, ' आई हे बघ, त्या मढयाचे बारा आणे मिळाले.'

तोच आई कौतुकानं बोलली, ' बरं झालं. उद्याच्या बाजारात त्यात वरचं तेलमीठ भागंल ! तुला पण दोन पैसे त्यातले खायला घे ! '

असं बोलून आईनं मला पितळीत डाळीचं कोरडयास वाढलं. गरमगरम भाकरी दिली. मी जेवायला बसलो.

तोच आई मला म्हणाली, ' पंचमीच्या सणासाठी भागीला आणायला तुझा बा गेलाया ! आज रातीपातूर घरी ईल. उद्या काय तुझ्या अंगावर गावकी पड-णार न्हाय ! '

**मुलाला जागल्याचं काम**

माझी आई मध्येच आजारी वडलांना बोलली, 'आवो, पोरगं चावडीवर जातो म्हनतंय तर तुमी कशाला दगदग घेता ? आजच्या राती पोरगं जाईल ! '

' नको गं, पोराला रातीचं कशाला पाठवायचं ? ... '

' आवो, तो आजच्या दिस जाईल. साळा सोडून गावकीचं कामच कर, असं काय तेला आमी म्हणत नाय. तुमी आज काय जिवाला ताप करून घेऊ नका.'

**शिकायला निघालेला मुलगा**

तोवर माझ्या आईच्या डोळयातून अश्रू ओघळत होते. माझ्या बहिणीही डोळे पुसत होत्या. आता निघायचं म्हटल्यावर मी आईच्या, वडिलांच्या पाया पडलो. त्या वेळी माझ्याही डोळयातून आसवं गळू लागली. माझी आई आपली आसवं पुसतपुसत मला बोलली, 'शंकर, तू आपल्या जिवाला जपून रहा. पोटाचं हाल करू नको ! आमाला पत्रानं तुजी खुशाली कळवत जा.' ... माझी आई हात उंचावून मला निरोप देत होती.

**दिवाळीच्या सुट्टीला घरी आलेला मुलगा**

बाहेर दारातूनच आईला हाक मारली, ' आई, मी आलोय ! ' माझा आवाज ऐकताच आई बाहेर आली. सारी भावंडं बाहेर आली. ... तोच आई म्हणाली, 'शंकर, मध्येच का म्हणं आला ?'

' दिवाळीची सुट्टी पडलीय.'

'एवढया लांब कसं आला ?'

‘चालतच आलो !’

‘माझ्या बाबा, एवढ्या लांब चालत आला ? पण कवा निघाला हुता ?’

‘काल दुपारी ...... अगं आई, पहाट झाली असं समजून आम्ही रात्रभर चालतोयच बघ.!’

तोच माझ्या पायाकडं बघून आई म्हणाली, ‘आरं माझ्या बाबा, चालून चालून तुझं पाय सुजलं बघ.’

आई, भावंडं, बहीण आणि घरदार भेटल्याचा मला खूप हर्ष झाला होता.

### स्कॉलरशिपमधून आईला लुगडं

गावी जायाचं म्हटल्यावर मी आईसाठी सोलापुरी इरकली लुगडं, अर्थात कमी किमतीचं आणि एक धारवाडी चोळीचा खण घेतला. माझ्या आईला इरकली लुगडं कधी मिळत नव्हतं. त्यांची किंमतही नाचारगती संसारात देणं मुळीच परवडत नव्हतं. म्हणून मी मुद्दाम इरकली लुगडं चांगल्या टोपपदराचं घेतलं. माझ्या आईला हेच लुगडं सणासुदीला, उत्सवजत्रेला ठेवणीचं म्हणूनही वापरता येईल हाही त्यात माझा हेतू. माझ्या आईलाही हे लुगडं पाहून बरं वाटेल. माझ्या आईनं गावी कायमच विणीची साधी लुगडी वापरलेली होती ... म्हणून मी ते खरेदी केलं होतं.

### सुट्टीत आलेला मुलगा

आई नुकतीच रानातून येऊन दारात टेकली होती. तेवढ्यातच मी दारात गेलो होतो. मला पहाताच आईचा चेहरा आनदानं टवटवला होता. तिला व भावंडांना समोर पाहून मलाही मनात हर्ष झाला होता. मी थांबताच क्षणभरात आईनं मला विचारलं, ‘कवा निघाला होतास ?’

‘काल रात्रीच्या गाडीनं. कोरेगावाहून आलो. म्हसवडहून चालत आलो.’

‘एवढ्या लांब, एकटाच ?’ असं ती आश्चर्यानं बोलली.

### जत्रा बंद

मी (दिवाळीच्या) सुट्टीत येणार हे जाणूनच आईनं म्हसोबाच्या जत्रेचा दिवस धरला होता.... आई म्हसोबाच्या जत्रेच्या तयारीला लागली होती. घरच्या शेळीचं बोकडही म्हसोबासाठी राखून ठेवलं होतं. मी मनात ठरवलं की आपण आता आपलं विरोधी मत आईबापांना सांगितलंच पाहिजे.

... त्या दिवशी शनवार होता. आईनं जत्रेचा बाजारही केला होता. नारळ, कापूर, ऊद, गुलाल असं काय काय देवाच्या पूजेचं सामान आणलं होतं.

... मी ... आईला स्पष्ट बोललो, ‘आई, यंदा आपण म्हसोबाची जत्रा करायची नाही.’

माझा हा विचार ऐकून आई चाट पडली व आश्चर्यानं तिनं मला विचारलं, 'का रं बाबा तू असं म्हंतोस ?'

'माझा देवांच्या अशा जत्रा करायावर विश्वास नाही. त्यातच एकदा आपण देवाची जत्रा केली, घरचा बोकड कापला, पण सोपाना मेलाच की !'

'आरं बाबा, तो देव लय वंगाळ हाय ! ' असं आई मला बोलली.

'तो-वंगाळ असो का चांगला असो, म्हसोबाची जत्रा करायची नाही.' ...

आई मला स्पष्टपणे बोलली, 'अरं, या देवांच्या आसऱ्यानं, त्यांच्या आशीर्वादानं आपण रहातो, जगतो, म्हणून आपल्याला देवाची जत्रा केलीच पाइजे. ती आपल्याला डावलून कशी चालेल ? मला तर ती करावीच लागेल.'

आई हे निर्वाणीच्या भाषेतच माझ्याशी बोलली अन् जत्रा करण्याचा तिचा ठाम हेकाच मला दिसला. त्यामुळे मीही तिला स्पष्टच निर्वाणीचं बोललो, 'आई, तू म्हसोबाची जत्रा करणार असलीस तर मी उद्याच्या उद्या गाव सोडून पुण्याला जाईन, पुन्हा गावाला येणार नाही.'

मी एकदम एवढं कडक बोलल्यावर आई झटकन् मऊ शब्दात बोलली, 'अरं माझ्या बाबा, तू एवढा एकेरीवर आलास ? तू म्हंतोच तर आम्ही म्हसोबाची जत्रा बंद करतो. मग झालं ?'

ती असं बोलली व डोळ्यात उभे राहिलेले अश्रू पदरानं पुसू लागली. त्यावर मीच तिला स्पष्ट बोललो, 'जो देव तुम्हाला जवळ करत नाही, त्याची पूजा तुम्ही का म्हणून करता ?'

'तुझं का खरं असंना, पण ती जनरूढी हाय !'

'तीच आपण मोडली पाहिजे !'

तोच ती पदरानं पुन्हा डोळे पुसत आईच्या मायेनं बोलली, 'बाबा, तुज्या म्हणण्याप्रमाणं मी जत्रा बंद करते. पण तुज्या मनात गाव सोडायचा इचार आणू नको.'

**मावशी व आई**

मावशी माझ्या घरी येऊन आईजवळ रडत होती. तिचं दुःख पाहून माझीही आई रडत होती.

त्यावेळी मावशी आईला बोलली, 'सावू, माझ्या पोरांना सोडवून आण.'

'अगं, त्याला वकील देवा लागतो. वकीलाबिगर ते कसं सुटायचे ?'

'दे की वकील. मी कुठं न्हाय म्हंते ?'

'अगं, तेला पैसं मोजावं लागत्यात.'

'तू आता मोज. मी तुजं पैसं फेडीन.'

... त्या वेळी आठवतं की आईनं गावच्या सोनाराकडं तांब्याचं हांडं –भांडं

गहाणवट ठेवलं. गळ्यातलं डोरलं गहाणवट ठेवलं. त्यातून वकील फी भरून वकिलाला उभा केलं होतं.

### देव गंगेला अर्पण

मी आईला विचारले, 'आई आपले जुन्या घरातले देव कुठं दिसत नाहीत ?

त्यावर आई क्षणभर गप्प झाली. तिनं वर सहज नजर केली व मला उघडच बोलली, 'आपल्या बाबासाहेबांनी सांगितलंय की आता देवधर्म पाळू नको, तेची पूजा करू नको !' आईचं ते सांगणं बरोबरच होतं. मग लागलीच विचारलं 'पण ते देव आता कुठं ठेवलेत ?'

तोच ती बोलली, 'बाबा, ते देव आमी गंगेला अर्पण केले- त्यास्नी हितं तिथं ठेवून कसं चालेल?'

बरोबर ! बौद्ध धर्मान्तराच्या चळवळीचा तो भलताच वेग होता. माझी आई याच घरातल्या देवाची दर मंगळवार, शुक्रवार न्हाऊन पूजा करायची. मंगळवार शुक्रवार धरायची, ते तिचे उपवास आता बंद झाले होते.

मात्र बाबासाहेबांच्या नावानं तिनं गुरुवार उपास धरला होता.

### डॉ. आंबेडकर निधन

माझ्या पत्नीला व आईला ही बातमी समजताच त्यांच्याही डोळ्याला सारखी अश्रूंची धार लागली. माझ्या आईच्या मुखातून आपोआप शब्द बाहेर पडले, 'आगचं बाबा गेलं, गरिबाचा वाली गेला !'

### खेड्यातला डॉक्टर

आईला कुत्रं चांगलंच चावलं होतं. त्यानं हात फोडला होता. दात मांसात रुतलेले होते. दोन दिवस चांगलेच रक्त येत होते. त्या जखमेवर लावायसाठी डॉक्टर मलम द्यावयाचा. तोही मलमाची पुडी उंचावरून टाकायचा.

### मुलाच्या डोळ्यातले औषध

डोळ्यात औषध घालण्यासाठी मी आईला बरोबर घेऊन दवाखान्यात जायाचो ... माझी आई डोळ्याच्या पापण्या वरखाली धरायची. मग कंपौंडर डोळ्यात औषध ओतायचा ... मग डॉक्टरांना आई विनवायची, 'डागदरसाब ! पोराच्या डोळ्यात ते लाल रंगाचं औषध घाला की त्यानं डोळं लौकर बरे होतात!,

'बरं बरं सावूबाय, ते औषध उद्या घालू ! आता जा.' 'असं डॉक्टर म्हणायचे ... या डोळे येण्याने माझ्या डोळ्यात कधीकधी पांढरी फुलं पडत. ती पांढरी फुलं आई रोज सकाळी उसाच्या पानावरचं दहिवर वाटीत आणून सोन्याच्या

नथीनं दहिवरात बुडवून घासून काढीत असे.

**बहिणी**

आपला धाकटा भाऊ कुलगुरू झाल्याचं पहायला माझ्या बहिणी शेवंता, पवित्रा जिवंत असत्या तर त्यांना केवढा आनंद झाला असता ! माझी आई गावीच होती. त्या वेळी तिनं मला गावाहून पत्रानं कळवलं, 'तू मोठ्या जागी गेलास हे छापून आलं, आम्हाला कळालं. तरी पण तू आपल्या जिवाला जपून रहा.'... आपल्या दूर गेलेल्या मुलाला आई असाच सल्ला देणार !

**शेवंता पळून येते**

माझी बहीण शेवता इच्या नांदण्यावरून अशीच माझ्या दारात भावकी बसली होती... पिंपरी गावात माझी बहीण शेवंता दिली होती. तिचं लग्न लहानपणी कधी केलं होतं हे मला आठवत नव्हतं. पण शेवंता लहान, नऊदहा वर्षांची चिमुरडी पोर असल्यापासून नांदायला जात होती. तिला नांदायला पोहोचवताना मुराळी म्हणून मी कवाकवा तिच्याबरोबर गेलो होतो...गेनूबुवा तराळाच्या तोंडातून निबार शब्द बाहेर पडत होते. तो माझ्या बापाला उद्देशून बोलत होता, 'लेका रामा, आपली पोरगी पळून येणं चांगलं का वगाळ रं ?'

छपरात दोन पायावर बसलेला माझा बा सरळ उत्तर देत होता. 'हेला चांगलं कोण म्हणील ? हे वंगाळच !'

तोच दाराच्या चौकटीच्या आत बसूनच माझी आई बोलत होती. 'अवो, माजी पोरगी पळून आली, पण ती का पळून आली हेचा काय भावकी इचार करती का न्हाय ?'

तो गेनुबुवा माझ्या आयला बोलला, 'साऊबाय, तू कशाला मधे तोंड घालतीच ? आम्हा गडयांचा काय बोल व्हायचा तो होऊ दे की !'

तोच माझा बाप आईवर खेकसत होता, 'अगं तुला काय पडलंय ! तू गप्प बस की ! मी खंबीर हाय हितं.'

मग गेनबानं बोल पुढं चालवला. 'रामा, तुझी लेक तुजी नसून आमचीच हाय.'

'व्हय. मी का न्हाय म्हंतोय ? लेक माजी नसून तुमचीच !'

'असं...मग बोल रामा, लेक पळून आल्यानं अब्रू कुणाची गेली ?'

...'माजी गेली, तुमची गेली.' माझ्या बापानं उत्तर दिलं.

'आता कसं बोललास ? तुजी लेक पळून आली तरी आब्रू तुजी नसून आपल्या गावची गेली. व्हय का न्हाय ?'

तो अब्रू शब्द माझ्या आईला झोंबला. तिनं दाराच्या चौकटीतून तोंड बाहेर

काढून फाडकन् भावकीत बोल केला, 'हितं अब्रूचा सवाल कुठं हाय वो ?...मांजी लेक काय कुणाचा हात धरून पळून गेली न्हाय तवा तुमची आमची आब्रू जायाला ! तिच्या काय जिवाला सासूचा, नवऱ्याचा जाच असंल का न्हाय ? हेचा काय भावकी इचार करणार हाय का न्हाय हे बोला !'

खरं तर माझ्या आईचा बोल सरळ होता, स्पष्ट होता. माझी बहीण शेवंता वयानं अगदीच लहान, बारातेरा वर्षांची. तिला नांदायला नेली तेव्हाच ती किरवटानं चिरडी नेसून गेली होती. अंगात नवी शिवलेली डगळ चोळी. शेवा एकदम लहान, वयात नसलेली, विनकळती, ती पोरसवदाच की !

शेवंता सासरी नांदत होती. संक्रांतीचा सण आला म्हणून तिला गावी आणायला आईनं मला पिंपरीला मुराळी म्हणून पाठवलं होतं. शेवाला माहेरी संक्रांतीला पाठवा म्हणून मी तिच्या सासूला विचारलं, तेव्हा तिची सासू मला म्हणाली, 'कशाला वो पोरीला माहेरला नेताय ?'

मी म्हणालो, 'संक्रातीच्या सणाला !'

त्यावर तिची सासू कशी म्हणाली, 'आमी का आमच्या घरी संक्रातीचा सण करत न्हाय व्हय ? का तुमच्याच घरी करतात तेवढा ?'

...शेवाच्या सासूच्या बोलानं मी निरुत्तर झालो. तरी पण मी पुढं बोललोच, 'मला आयनं पाठवलंय म्हणून मी आलो.'

त्यावर ती सासू म्हणाली, 'मुलगी लहान हाय. आतापासून तिला इथं नांदायची सवय लागलेली चांगली. माहेरीच ती मोठी झाली तर सासरी तिला नांदायला गॉड लागायचं न्हाय !'

शेवाच्या सासूच्या या म्हणण्यात खरं किती खोटं किती हे मला तरी कळणार कसं ? मीही लहानच होतो. पण मला एवढंच माहीत होतं की त्या काळात मुलींची लग्नं लहानपणी होत होती. पाळण्याला देखील बाशिंग बांधत होती. त्यात मुलगी लग्नानंतर नऊदहा वर्षांची असतानाच तिला नवऱ्याघरी नांदायला नेत होते. तिचे आईबापही तिला नांदायला पाठवत होते. दहाअकरा वर्षांची लहान पोरगी—आपल्या आईबापाचं गाव, आईबाप, बहीणभाऊ, शेजारच्या मैत्रिणी, आपलं घरदार सोडून एवढ्या पोरवयात नांदायला सासरी जायाचं म्हणजे लहान मुलीची मोठी केविलवाणी अवस्था होत होती. माझी बहीण शेवंता नांदायला जाताना किती ओक्साबोक्शी रडत होती. रडताना तिचा ऊर एवढा भरलेला असे की तिला पोहोचवायला आलेल्या आयाबायांबरोबर बोलायला तिच्या तोंडातून शब्ददेखील उमटत नसे. मुलीला नवऱ्याघरी नांदायला जाण्यात हौस, आनंद व सुखाचा असा भाग तिच्या बाबतीत काहीच नव्हता. फक्त लहानपणी मुलीला नांदायचं वळण लागावं, असावं, तिला नवऱ्याघरी कामधंदा करण्याची सवय लागावी हा त्यातला एक हेतू असावा. पण त्याचबरोबर हाताखाली सून असावी हाही दुसरा महत्त्वाचा उद्देश त्यात मला शेवंताच्या सासूच्या बोलण्यात दिसला. त्यातच मी शेवंताच्या सासूला विचारलं,

'आमच्या शेवाला तुमी काय म्हण लय काम लावता ?' त्यावर ती म्हणाली, 'कुठलं रं बाबा, तिला का दिकंल हितं काम नाय !' मी अगोदरच, सारखं दळण करून शेवंताच्या हाताला पडलेले घट्टे पाहिलेले होते. तिनं मला एका बाजूला हात दाखवून हे रडत सांगितलं होतं. म्हणूनच मी तिच्या सासूला सरळ बोललो, 'पण शेवाच्या हाताला दिवसरात दळून दळून घट्टे पडले आहेत. अन् तुम्ही कसं नाही म्हणता ?'

त्यावर तिची सासू गप्प झाली.

मला शेवंतानं तिचा गुराढोरागत जाच रडून रडून सांगितला होता.

भल्या पहाटे पहिल्या कोंबडयानं बांग दिल्या दिल्या तिला दळण दळायला तिची सासू उठवत होती. त्या लहान पोरीला तसंच झोपेतून उठवून जात्यावर दळायला बसवत होती. शेवाही झोपंतच जातं ओढीत होती. असं पहाटे तीनचार वाजल्यापासून दिवस उगवेपर्यंत तिला जात्यावर दळण दळावं लागत होतं. दिवस उगवल्यावर शेवाला पाण्याची मोठी केळी– म्हणजे लहान घागर घेऊन तिच्या चुलत जाऊबरोबर ओढयाला पाण्यासाठी जावं लागत होतं. दारातला सगळा रांजण भरायला दहाबारा पाण्याच्या खेपा आणून आणून तिची मान बसत होती. एवढया लहानपणीच या कामामुळे तिच्या उरात दुखायचे. शेवाचं पाणी आणून झाल्यावर तिला तिची सासू गावातून झाडलोट करून आल्यावर चुलीपुढं बसून भाकरी टाकायला सांगत होती. शेवंताच्या हातचे तिच्या नवऱ्याघरी मी लहान लहान दामटे खाल्ले होते. चुलीपुढं भाकरी टाकल्यावर शेवा रानामळयात रोजगारानं भांगलण, खुरपण व इतर मजुरी करायलातिच्या चुलत जाऊबरोबर जात होती. रोजगारानं जाण्यापूर्वी तिची सासू तिच्यापुढं जेवणाचं ताट वाढीत होती. तिच्या ताटात झाडलोट करून आणलेल्या शिळया भाकरीचे टुकडे–टाकडे वाढत होती. त्याचबरोबर मागून आणलेलं लोटक्यातलं शिळं ताक कोरडयास म्हणून देत होती. तो शिळा टुकडा शिळया कोरडयाशात कसाबसा खाऊन रोजगारानं रानात मळयात जात होती आणि ती गेल्यावर तिची सासू फकस्त चुलीवर गाडग्यात कोरडयास करत होती. ते कोरडयास, ऊनऊन भाकरी तिचा ल्योक, ती शेवाच्या माघारी खात होते.

दिवस मावळायला रानातून आल्यावर शेवा पुन्हा चुलीपुढं भाकरी टाकायला बसत होती. त्या चुलीत आंबटओल्या काटक्यांचं जळण पेटता पेटत नसे. ती मग चुलीत फुंकून फंकून बेजार होई. त्यातच धूर होत होता. तिच्या डोळयाला धुरानं पाणी येत होतं. तरी ती तशीच तोंडानं नळीनं चुलीत फुकर घालीत होती. मग कुठं चूल पेटत होती, जाळ लागत होता. तेवढयात घरात त्यापाय तिची सासू तिला न्हाय ते बोलायची. आता जळणच ओलं असेल तर शेवानं काय करायचं ? सासूचं बोलणं शेवाला खपलं नाही तर ती सासूला उलट बोलत होती. मग मात्र 'काय लहान तोंडी मोठा घास घेतला' म्हणून तिची सासू तिला बोलत होती,

मारत होती.

आपली बायको एवढ्या लहान वयातच आपल्या आईला बोलायला लागली म्हणून तिचा नवराही तिला मारत होता. ती लहान शेवंता सासू-सासऱ्याचा मार खाऊन आईबापाचा आठव करून रडायला लागायची. तिला काहीच मग सुचायचं नाही. रडता रडता ती तशीच उपाशी झोपत होती. पण तिच्या सासूला तिची कधी दयामाया आली नव्हती. शेवाला लहानपणापासूनच सासरी नांदायची सक्त-मजुरी होती खरी. त्यात ती अगोदरच लहान, अंगानं किरकोळ. आईबापाच्या जिवावर बसून खाण्याचं तिचं वय. पण नवऱ्याच्या घरी तिला मोठ्या बाईसारखं कामाला जुंपलं होतं. मग तिच्या लहान जिवाला नांदण्यात काय सुख होतं ? एवढ्याशा लहान पोरीला पहाटेपासून ते रात्री जेवणवेळेपर्यंत कामाला सारखं जुंपल्यावर कुणाला बरं वाटेल ? त्यात माझ्या शेवंताच्या वाट्याला मायेचा शब्द नव्हता. केलेल्या कामाचं कोडकौतुक केलं जात नव्हतं. मग होतं काय ? सारखं काम ! काम ! ! मरेमरेतो काम ! जरासं उलट बोललं तर सासू-नवऱ्याचा मार. आता बोला ! अकरा-बारा वर्षाच्या मुलीनं नांदायला गेल्यावर सासूचा, सासरचा किती छळ सोसायचा ? नवऱ्याचा किती मार खायचा ? अशा सासरच्या जाचात, छळात आपल्या आईबापाचा, बहीणभावाचा आठव होऊन शेवंता पोरवयात पळून आली तर तिला काय म्हणून दोष देणार ? आणि त्यात आब्रू जाण्याचा तरी काय कुठं प्रश्न होता ? लहान पोरगी कामाच्या कारानं, सासरच्या जाचानं दमलेली, वैतागलेली. सासू-नवऱ्याच्या माराच्या भीतीनं, न विचारता नवऱ्याच्या घरातून आपल्या आईबापाला भेटायला, आपलं दुःख हालकं हालकं करायला माहेरी पळून आली. म्हणूनच माझ्या आईनं दारात बसलेल्या भावकीला सरळ उघड तो प्रश्न केला होता. त्यात माझ्या बाळमनाला काहीच वावगं दिसलं नव्हतं. पण भावकीतला एक म्हारगडी कसा म्हणतो, 'आयला रामाची बायको, बाय असून भावकीला सवाल करतेय हे काय भावकीला बरं वाटतंय का ?'

तोच माझा बाप आईला डाफरला, 'अगं, तू गप्प बस, काय कुणाला म्हणा-यचं ते म्हणू दे की !'

माझ्या आईनं शेवाला सासूच्या घरात होत असलेल्या जाचाचा मुद्दा काढताच दुसरा म्हार बोलला, 'सावूबाय ! सून तिथं सासूचा जाच व्हायाचाच की !' तोच माझी आई भावकीला बोलली, 'माजी लेक काय एवढी मोठी हाय व्हय, तवा तिला जाच करायला ? आजून तिचा व्हट पिळला तर दूध निघंल अशी माझी कवळी पोर, तिला का म्हण एवढा जाच ?'

'सावूबाय, आपून पोरगी दुसऱ्याच्या घरी दिली, तर तो आपल्याला मेलीच की ! तिचा आपला संबंध तुटला.'

'व्हयं, ते खरं. पण आयबाचं आतडं हाय. पोटचं लेकरू हाय. त्यांचा जीव तिळतिळ तुटायचाच की. तुमच्या लेकीचं असं झालं तर ?' असं बोलून माझ्या

आईनं भावकीच्या गड्यांना पुन्हा सवाल केला.

'सावूबाय, ती मेलीच म्हण समजा.'

'कशी वो मेली म्हणून समजायची ?' त्याला तिचा गुन्हा ? तिची चूक ? का उगाच लेक म्हणून दुसऱ्याच्या दारी मातीत घालायची ? ह्यो उलटा न्याय झाला, माणसं मारायचा.'

माझी आई चिडून बोलत होती. तिचं तोंड सुटलं होतं, पण ती खरं खरं बोलत होती. तिच्या बोलण्यात काही वावगं नव्हतं.

तेवढ्यात तराळ गेनुबुवा माझ्या बापाला बोलला, 'रामा ! मग कसं करायचं ? पोरगी कुठाय ती दावा आणि त्या माणसाबरोबर लगोलग धाडा, तिच्या नवऱ्यानं त्याची ही भावकी दारात आणलीय !'

तोच माझ्या आईनं भावकीला उलटा सवाल केला, 'हे गडी काठ्या कुऱ्हाडी घेऊन आलेत दारात, मग त्यास्नीच विचारा की माझी पोरगी कुठं हाय म्हणून ? का त्यांनी कुठं टाकली मारून विहिरीत, बारवंत ?'

माझ्या आईचा स्पष्ट बोल ऐकून पिंपरगावाहून आलेला एक गडी बोलला, 'आमी कशाला मारून टाकतोय वो तुमच्या मुलीला ? तिचा नवरा आमा भावकीला बोलला तवा आमी निघालो.'

तोच माझा बाप त्यांना बोलला, 'तुमी आला, चांगलं केलं ! एवढ्या लहान पोरीला नांदायला घेऊन जायला तुम्ही सगळ्यांनी हातात काठ्या–कुऱ्हाडी आणायची काय जरूर होती ?'

माझ्या वडिलांचा हा सवाल बरोबरच होता. वास्तविक शेवंता तिच्या सासूच्या, नवऱ्याच्या जाचाला, छळाला वैतागून पळून गेली होती. त्या लहान मुलीला परत नांदायला घेऊन जायचं होतं. त्यासाठी तिच्या नवऱ्यानं त्याच्या गावचे दहाबारा गडी हातात काठ्याकुऱ्हाडी घेऊन आणले होते. त्यातच जर का शेवा मध्येच वाटेत या गड्यांना घावली असती तर वाटेतच तिला काठ्यांनी झोडपून, मारून विहिरीत टाकली असती आणि पुन्हा उलटी बोंब केली असती की पोरगी पळाली, पसार झाली, तिनं विहिरीत जीव दिला ! माझ्या बहिणीच्या बाबतीत असं काही झालं असतं तर त्यात विशेष काही नव्हतं, कारण भावकीचा कायदा चमत्कारिक होता. भावकीची रूढीच अशी विलक्षण होती. भावकीच्या कायद्यापुढं काही चालत नसे, मग भावकीची रूढी बरोबर असो का चुकीची असो. त्यात माझ्या गावच्या म्हार भावकीलाही त्या गड्यांच्या हातातल्या काठ्या–कुऱ्हाडीचं काहीच वाटलं नव्हतं. त्यांना तो आपला सहज सोपा उपाय वाटत असावा. माझी भावकी त्यांना काहीच जाब विचारायला तयार नव्हती. 'पोरीला एवढा जाच का म्हणं ?' असा सवालही त्यांनी केला नाही. उलट ते माझ्या आय–बालाच बोलत होते, अशी ही भावकी. तरी गेनुबुवा माझ्या बापाला बोलला, 'रामा, आता पोरीला नांदायला धाडा !'

त्यावर माझा बा बोलला, 'आवो, पण पोरीचा काय पत्त्या तो तर आमाला कळला पाइजे. ती आता कुठं पळाली अन् जिवाला भिऊन कुठं दडून बसली हे आमाला कसं वो ठावं ? ती कुठं हाय म्हणून तिला आमी धाडावी ?'

माझ्या आण्णाचं बोलणं खरंच होतं. शेवंता पळून आली, पण कुठं गेली होती ? का कुणा दुसऱ्या पाहुण्याच्या गावी गेली ? का भीतीनं आजोळाला पळून गेली ? काहीच कळायला मार्ग नव्हता. त्यात ती काय गावी आमच्याघरी आली नव्हती. शेवा पहाटेच परसाकडं जाते म्हणून घराच्या बाहेर पडली होती. तिचं गाव दोन अडीच कोस. त्यात वाटेत पाटलाचा मळा. तिथं शेवाला चांगले ओळखत होते. ती पाटलाच्या मळ्यातही जीवासाठी आश्रय घेणार. मळ्यातली माणसं 'ही रामाची पोर' म्हणून तिला आश्रय देणार अशी अवस्था होती. त्यामुळे शेवंताचा नक्की ठावठिकाणा कुणाला काहीच माहीत नव्हता. त्यामुळे तिला कोठून, कशी नांदायला पाठवायची हा प्रश्न होता. भावकीला काय उत्तर द्यावं म्हणून आण्णा पेचात होता.

त्यावर गेनुबुवा तराळानं आण्णाला निर्वाणीचा बोल केला, 'रामा, आता कसं करायचं बोल. या आलेल्या पिंपरकरांना आमी काय सांगायचं बोल !'

त्यावर आण्णा सरळच बोलला, 'आता मी काय बोलू ? मला तर पोरीचा पत्त्या ठावं नाय. का पावण्यांनी पोरीला काय कमीजास्त केलं हेचा तरी तुमी त्यासनी जाब विचारा.'

माझा बाप असं बोलताच पाहुणे चुळबुळले. ते एकमेकांच्या तोंडाकडे बघू लागले. तेवढ्यात पांडा म्हारानं पाहुण्यांना पुसलं, 'का वो पावणं, पोरीचा काय तुमाला ठावठिकाणा ठाव हाय ?' त्यावर एक पावणा बोलला, 'आमाला ठाव असता तर हितपातूर आमी कशाला येतोय ? तितनंच नसती का तिला माघारी ओढत नेली ?'

गेनुबानं तर पाहुण्यांना सरळ सवाल केला, 'तुमी काय पोरीला कुठं मारून हिरीत टाकली तर न्हाय ना ?'

या उलटच्या सवालानं पाहुण्यांची तोंडं बघण्यासारखी झाली होती. आमची भावकी तशी कायद्यानं बोलणारी म्हणून त्यांनी हा सवाल केला.

'आमी काय बिनकळती हाय व्हय, तिला हिरीत ढकलायला ?' असं एक पाहुणा बोलून पुढं म्हणाला, 'एवढा काय वो त्या पोरीनं आमचा गुन्हा केलाय, अजून त्या पोरीचा जीव तसा लहानच. तुमी असं कसा आमाला बोल लावताय ?'

'तसं काय न्हाय ! पण आम्ही आपल्या मनातली कांक्षा फेडून घेतली.' असं गेनुबुवा बोलला.

आण्णा भावकीला बोलला, 'हे बघा, पोरीची जात. ती काय घरी ठेवायची जिन्नस न्हाय. पोरगी घावल्या घावल्या भावकीला साक्ष ठेवून तिला नांदायला पाठवतो.'

'हे आम्हाला पटलं.' असं बोलून गेनुबुवा पाहुण्याला म्हणाला, 'पावणं, आता तुमी ऐकलंच. मग बोला आता काय करायचं ते !'

'आता तुमी लेकीचे मायबाप ठरवाल ते आमाला कबूल हाय ! आमी काय तुमच्या म्होरं जात न्हाय.' असं पाहुण्यांचे उत्तर ऐकून गेनुबुवा आण्णाला म्हणाला, 'काय रं रामा, पोरगी घावल्या घावल्या नांदायला पाठवशील का न्हाय ते बोल !'

'मी कवा न्हाय म्हंतोय ? पोरगी तरी एकदा घावू द्या.' असं माझा बाप बोलला.

त्यावर दारातली बैठक मला संपल्यागत दिसली, दारात पाहुण्यांनी चुळा भरल्या, तांब्यातांब्या पाणी प्यालं. मग कुणाकुणाच्या घरी एकएक पाहुणा 'जेवा' म्हणून जेवायला गेला.

**शेवंता नांदायला जाते**

शेवटी शेवंताला नांदायला पाठवायचं ठरलं. तिचा जाच होणार नाही असा तिच्या सासरच्या माणसांनी माझ्या आईबाला शब्द दिला.

माझी बहीण शेवंता आयतवारी नांदायला जाणार होती. पाहुणा, शेवंताचा दाल्ला, शुक्रवारीच रात्री मुक्कामाला आला होता. शनवारचा बाजार करून रविवारी शेवाला पाठवायचं ठरवलं होतं. तसं पाहुण्यानंही कबूल केलं होतं... त्या दिवशी कासाराच्या दुकानी शेवंताला बांगड्या भरल्या. तिच्या पसंतीचा तिला चोळीचा खण घेतला. नांदायला जाण्याचा शेवंताला वेद लागला होता.... उदद्याच रविवारी ती सासरी जाणार. आपलं आख्खं भरलं माहेर सोडून नांदायला जायाचं अन् तेही एवढ्या लहानपणी. तिला वाईट वाटणारच.

शनिवारी रात्री माझ्या मेव्हण्याला गोड जेवण केलं. दूध भात अन् गूळ, वर चपात्या. पण....

रविवार उगवला.

आईनं शेवाला गरम पाण्यानं न्हाऊ घातलं.... वडीचं लुगडं नेसायला दिलं. त्यात सकाळीच खणाची चोळी शिवून आणली. सकाळचं न्हाणंधुणं, भाकरतुकडा करीपर्यंत दिवस लांबवर आला. पाहुणा सकाळपासनं निघायच्या तयारीत बसला होता. पण बायांचं थोडंच उरकतंय? त्यात नांदायला निघालेल्या लेकीला निघताना नक्कीच वेळ लागतो.... दिवस काय थांबतोय थोडाच? तो खाली गेला. सावल्या खाली सरकू लागल्या. शेवंता निघण्याच्या तयारीला लागली. तिनं आपल्या ओटीला मूठ दोन मूठ जोंधळ्याचं दाणं घेतलं. शेजारणी बायांच्या घरी भेटायला–निरोप घ्यायला गेली. बायकांनी तिला कुंकू लावून तिची ओटी भरली. त्यावेळी शेवंताचं डोळं पाण्यानं भरलं होतं... शेजारच्या विठाबायनं तिला उपदेश केला, 'शेवा,

चांगली नांद बरं का. आयबाचं नाव काढ!' ती मान डोलवायची व डोळ्याचं पाणी पुसायची. मोठ्या वायगत बोलायची,

'हे मला का सांगावं लागतंय व्हय? मी लहानपणाच्यान नांदतीय.'

'हे खरं बया, तरी पण तू आपल्या सासूला नीट धरुन रहा.' त्यावर ती फक्त मान डोलवायची व पुढच्या दारी भेटायला निघायची. शेवंता आपल्या आळी-तल्या सगळ्या घरी भेटली. आयाबायांनी तिला कुंकू लावले. तिची ओटी भरली. शेवटी माझं सगळं घरबार वाटेनं पुढं निघालं. बरोबर माझी आई, चुलती बाबई, शेजारीण गिरजाबाय, धुरपा, जुगाई, गंगाबाय याही पोचवायला निघाल्या.

शेवंताला घालवत जायाला मुराळी म्हणून आयबापानं मला धाडायचं ठरवलं होतं. त्याप्रमाणे मी शाळा बुडवून पिंपरीगावाला निघालो होतो.... पाहुणा बराच पुढे पाय ओढत चालला होता. आईजवळ लाकडी कुंकवाचा करंडा होता. चुलती बाबईजवळ पाण्याचा तांब्या होता. माझा चुलता हरिबा बरोबर होता.

गेलं वर्षभर भांडणात गेलं. आता गोडीनं सगळं मिटलं. सर्वांना बरं वाटत होतं. सगळेच ओढ्याची धार ओलांडून गावच्या पांदीजवळ आले. मग तिथंच सगळे थांबले. शेवंता पुन्हा पोहोचवायला आलेल्या बायांना भेटत होती. त्यांच्या गळ्यात पडून रडत होती.

...मग प्रत्येकजणी शेवंताच्या पाठीवरून हात फिरवत, तिला समजुतीनं बोलत, 'पोरे, शेवा! रडू नको बाय. आपण आपलं चांगलं रहावं. पुन्हा चार दिस राहून माहेरला आयबाला भेटायला यावं.'

मग शेवंता आण्णाला भेटली, रडायला लागली, गहिवरून. तोच आण्णानं तिच्या पाठीवरून आपला मायेचा हात फिरवला. 'शेवा. रडू नको. मी म्होरच्या आयतवारी नेमका तुला भेटायला ईन. काय काळजी करू नको.'

शेवंता शेवटी आयला भेटली तेव्हा तिचा ऊर भलताच दाटून आला. ती गहिवरून रडू लागली. आईच्याही डोळ्याला धार लागली. आई तिच्या डोळ्याचं अश्रू पुसत होती. तिला समजावत गप्प करत होती. तोच जुगाई आईला बोलली, 'आवो सावूबाय, तुमी पण पोरगी झालाय व्हय? शेवंताची समजूत काढायची, तिला धीर दियाचा सोडून तुमीच तिच्यागत लहान झाला व्हय?'

'आता जाऊ दया तिला. दिवस खाली गेला. त्यास्नी घरी पोचायला रात करू नका, निघू दया त्यास्नी.'

शेवंता आईपासून बाजूला झाली. माझ्या चुलतीनं शेवंताच्या पायावर पाणी टाकलं. आईनं करंड्यातला कुंकू तिला लावला. ती मग आई व चुलतीच्या पाया पडली. नंतर नाना व आण्णाच्याही. तोच आण्णा म्हणाला, 'आता निघा. येळ लावू नका.'

मेव्हणा आमच्यापुढं एक फर्लांगावर होता. आम्ही बहीणभावंडं बरोबर चालत होतो. शेवंताची सासुरवाडी जवळ येऊ लागली तशी ती माझ्याशी जास्त बोला-

यला लागली.

ती म्हणाली, 'शंकर, तू माज्या घरी आट दिवस राहा बरं का.'

'माजी शाळा बुडंल की मास्तर मला मारंल.'

'मग तू आण्णाला शाळेत घेऊन जा. आण्णा त्या मास्तराची लाकडं फोडत असंलच की.'

'पण माझा अभ्यास बुडंल की! परीक्षेत मी नापास होईन.' पण शेवाला त्याचं काहीच वाटत नव्हतं. आपल्याबरोबर माहेरचं माणूस असावं असंच तिला वाटत होतं. मी तिला आठ दिवसांच्या ऐवजी दोन दिवस रहायचं कबूल केलं होतं.... तेवढंच तिला बरं वाटलं.... आम्हीं शेवाच्या दारात पोहोचलो. तिची सासू बाहेर आडवी आली. तिच्या हातात चतकोर भाकरी अन् भरलेला तांब्या होता. तिनं पुढं येऊन शेवंताच्या अंगावरून भाकरीचा तुकडा ओवाळून घरामागं टाकला. हात पाण्यानं धुतला. शेवा तिच्या पाया पडली. तिला बघायला आलेल्या बायांच्या पाया पडली, मग ती आपल्या घरात शिरली. मीही तिच्या पाठोपाठ घरात गेलो. भाकरीचं गाठोडं शेवाजवळ दिलं. तिनं फडक्यातल्या भाकरीची चवड सोडून टोपल्यात ठेवली.

शेवंताचं नांदणं सुरू झालं. शेवंताचं सासुरवाशीणपण सुरू झालं. तिच्या डोईवरचा पदर लांब तोंडापुढं आला. तिचं जमिनीकडं खाली बघणं सुरू झालं. पुढं बघून घरातली कामं सुरू झालीं. यंत्रागत एकएक काम, एकामागं एक. घड्याळाच्या काट्यागत. दिवसामागून रात्र संपत येई.

शेवंताच्या घरात पहाटेच दळणाचं जातं घ...र, घ...र आवाज देऊ लागलं.

जात्यावरच्या ओव्यांचा आवाज माझ्या कानावर आदळू लागला. मला जाग आली होती. जात्यावरच्या गीताचा आवाज शेवंताचाच होता. 'माझा बंधू राजा... असं माझं गुण गात, कसलं तरी (स्वत: रचत) गीत ती जात्यावर गात होती पहाट उजाडत आली. तांबडं फुटलं.... तोवर शेवंतानं उठून पाण्याच्या घागरीच्या दोन खेपा रांजणात ओतल्या होत्या. अशाच पाण्याच्या खेपा पाच सहा करून तिनं रांजण भरला, वर एक भरली घागर रांजणाच्या कट्ट्यावर ठेवलीं. मग शेवंता चुलीपुढं बसली. चूल पेटवली. वर तवा ठेवला. भाकरीच्या कामाला ती जुंपली. शेवंताचं कष्टमय जीवन सुरू झालं होतं.... सरपण आणायला रानात जायचं अनवाणीच. रानात–मळ्यात घरचं पोटापाण्याचं आटपून रोजगारानंही जायचं. असं त्या लहान जिवाचं नांदणं सुरू झालं.... दुपारची सवड काढून माझ्याशी बोलायची. बाहेरच्या गोष्टी, घरच्या गोष्टी. त्यात घरच्या शेरडाचं बोलायची, धाकट्या भावाचं विचारायची, मोठ्या बहिणीच्या गोष्टी काढायची. आयबाला शेजाऱ्यापाजाऱ्यांच्याही गोष्टी काढून भरलं माहेर आपल्या दृष्टीपुढं उभा करायची... मग पुन्हा घरातल्या कामात सगळं माहेर विसरायची. ती खरंच गुराढोरागत काम करायची....

...शेवाला दिवस कवा मावळला याचा पत्ताच नसे.

मी एका दिवशी सकाळीच निघालो. शेवंतानं सकाळीच भाकरी टाकल्या. हुलग्याची उसळ केली. मला न्याहारीचं जेवण दिलं....

माझी निघण्याची तयारी झालो. शेवानं माझ्या भाकरी बांधल्या. मी निघालो. मला पोहोचवत शेवा न तिची सासू निघाली. गावच्या शिवेपर्यंत मला त्या पोहो-चवत आल्या.... मला निरोप देताना शेवाचं डोळं पाण्यानं भरलं. डोळयातून आस-वांची धार लागली. आता शेवाला हिथं सोडून जायचं म्हणून माझाही कंठ दाटून आला. तसाच मी दाटलेल्या गळयानं शेवाच्या सासूला बोललो, 'आमची शेवा लहान आहे. तिला तुमच्या लेकीगत सांभाळा. मी असं म्हणताच शेवानं डोळयाला पदर लावला....

### झाडलोट करणाऱ्या बाया

माझ्या महारवाडयात मात्र काही काही घरातल्या आयाबाया गावातल्या वाडयात, घरीदारी झाडलोट करायच्या. त्या रोजच सकाळी, येरवाळीच, तांबडं फुटायच्या आत जात्यावरचं दळण संपवून डोईवर खराटा–पाटी घेऊन गावात झाडलोटीला निघायच्या. दिवस कासराभर वर आल्यावर झाडलोट करून इयाच्या. घरी येताना गावातल्या घरी, वाडयात पोटाला वाढलेलं, रात्रीचं शिळंपाकं बरोबर नेल्याल्या पाटीत घेऊन यायच्या.

आमच्या शेजारची पवाबाई अशीच झाडलोटायला जायची. वरच्या आळीची शिवाची बायको, खालच्या आळीची वंचाला, मधल्या आळीतली येसाबाय, परशाची बायको, अशाच काय काय महारांच्या आयाबाया गावात वाडयात झाडलोट करा-यला जात होत्या. अर्थात हे झाडलोटीचं काम परंपरागत होतं. रूढीनं काम करायला बांधल्या गेल्या होत्या. त्यात कष्ट होतेच, पण पोटालाही रात्रीचं शिळंपाकं मिळत होतं. त्यात कधीकधी घरातली एखादी वेळ भागत होती.

पवाबायचं घर आमच्या घराच्या जवळच. माझ्या दारात बसून मी नेहमी बघायचो. पवाबाय जेव्हा झाडलोट करून घरी इयाची तेव्हा तिच्या भोवती तिच्या घरच्या पोराबाळांची गर्दी उडायची. ती डोईवरची पाटी खाली उतरायची, वरचं झाकलेलं फडकं काढायची. आत कायकाय आहे हे पाहण्यासाठी तिच्या मुलांची धड-पड चालायची. पाटीत काय गोडधोड खायाचं दिसलं तर त्यावर त्यांची मुरकंड पडायची. ते खाऊन मग ती निवान्त व्हयाची. त्या धडपडीत कुणाला मिळालं, कुणाला नाही यामुळे वर आणखीन रडारड चालायचो. पवाबायच्या दारातलं दृश्य मी दारात बसून अनेक वेळा बघितलं आहे.

याच झाडलोटीपाय येसाच्या चिंगाच्या दारात मोठं भांडण झालेलं मी पाहिलं होतं...

दिवस उगवला होता... तेवढ्यात पवाबायचा आवाज चिंगाबायच्या दारात उठला, 'काय गं पोरी, तुझी आय कुठं गेली ?'

'गावात झाडलोट करायला गेली.'

'गेली, पण कुणाच्या वाड्यात ?'

'ती आपल्या बामणाच्या वाड्यात गेली. आजपासनं खोताच्या वाड्यात तिला झाडायला सांगितलंय.'

'असं ? खरं म्हंतीस ?'

'माझी आयच तशी मला सांगून गेली' असं चिंगी म्हणताच पवाबाय भडकली. 'तिच्या काय बाचा खोताचा वाडा हाय काय ? रांड तितं माझ्या उरावर खोताचा वाडा झाडायला गेली व्हय ? त्या उंडगीला घरी येऊ दे, मी तिच्या झिंज्याच धरते.' ... तोच चिंगी बोलली, 'आवो पवाबाय, माझ्या आयला का शिव्या देताय ?'

'दी ना तर तुमच्यावर फुलं उधळू व्हय ? तुझी आय माझ्या पोटावर पाय दियाला लागलीय. तिला पोट हाय तसं आमाला पण हाय !'

ती पवाबाय मोठी बाई. तिच्या तोंडाला चिंगी मुलगी कशी काय लागणार... पवाबायची बडबड चालूच होती. तोवर तिची चाललेली शिवीगाळ ऐकून माझी आई पुढं तिच्या दारात आली व तिला पुसलं, 'सकाळी रामाधरमाच्या पाऱ्यात काय असं तोंडानं वाईटवाकडं बोलतायजी पवाबाय ?'

मग ती फाडकन ओरडली,

'मग काय त्याचं पाय धरू होय सावूबाय ?'

'आवो, घरात या पोरासनी काय कळणार ? चिंगाच्या आयला ती आल्यावर बोला' असं माझी आई समजुतीच्या सुरात बोलली. माझी आई तशी कळती होती. कुणा बायांचं काय भांडणतंटा सुरू झाला का माझ्या आयला तिथं बोलवून घत. माझी आई त्या दोन्ही बाजूला चार गोष्टी समजुतीनं सांगणार. त्यांचं किरकोळ भांडण मिटवून टाकणार... माझ्या आईचा बोल ऐकून पवाबाय जरा थंड झाली. तरी ती फणफणली, 'बघा की वो सावूबाय ! ही चिंगीची आय माझ्या खोताच्या वाड्यात झाडायला गेली. त्या वाड्यात मी आता किती सालं झाडलोट करतीया ! आता ही बया माझ्या पोटावर उठलीय. ही माझ्या लेकराबाळांच्या पोटावरच हाणायला बसलीय बघा.... चिंगीच्या आयला कळत न्हाय ? आपली लेकरंबाळं हायेत तशी दुसऱ्याची हायेत. तिनं जर खोताच्या वाड्यातली झाडलोट बंद केली न्हाय तर तिच्या दारात तिच्या झिंज्या मी धरीन. तिच्या नरडीचा घोट घेईन !'

... तोच ती मुलगी चिंगी सरळच पवाबायला बोलली, 'ये बया, तू काय उगं वटवट करू नगं आमच्या दारात. आमची आय खोताचा वाडा झाडणार ! तुला करायचं ते कर.'

हे ऐकून पवाबाय पिसाळलीच. 'माझ्या खोताच्या वाड्यात उद्या तुज्या

आयला झाडायला जावू देच. मी तिचा जीवच घीन अन् फासाला जाईन.'... तोच माझ्या आईनं पवाबायला समजावलं, 'आवो पवाबाय, तू कशाला धाकट्या पोरीच्या नादाला लागतीस ? तिची आई आल्यावर तिला काय ते बोल.'

'बघा की कशी लहान तोंडी मोठा घास घेतीय. चुरुचुरु बोलतीय.'

'तुमी आता तुमच्या घरी जावा. तिची आय आल्यावर तिच्याबरोबर बोला. पोराटोराच्या म्होरं कशाला तोंडाची वाफ दवडताय? ' असं माझ्या आईनं तिला बोलून, तिच्या हाताला धरून तिला घरापर्यंत नेली....

पवाबाय भांडणाला एक नंबरी होती. तिची आगळीक कुणी काढली तर ती कुणाच्या झिंज्या धरायला कमी करायची नाही. गड्याच्या पण अंगावर ती भांडायला धावायची. मग गडी काय करणार ? अन्नूपाण्यानं गप्प बसायचं !... ही पवाबाय गावात तीन वाड्यांची झाडलोट करते. हाच तिचा सकाळी न्याहारीपर्यंतचा धंदा. या झाडलोटीची तिला मिळकत बरी होती. तिच्या या झाडलोटीच्या जिवावर घरदार पोटाला खात होते. दोन दोन वक्ताला पुरलं एवढ्या शिळ्यापाक्या भाकरी, आमटी, चटणी तिला रोज मिळत होती, म्हणून तिला झाडलोटीची एवढी आशा. तिच्या या मिळकतीच्या जिवावर ती भांडायला खंबीर झाली होती. तिच्या पाठीवर गावातली वाड्यातील माणसं येत होती. त्यांच्या जिवावर ती उड्या मारीत होती. तिनं चिंगीच्या आयलाही दम दिला होता...

... चिंगीची आई येसाबाय गावातून झाडलोट करून घरी आली. तिच्या डोईवर पाटी होती. पाटीत कुणी काय काय वाढलेली भाकरी टुकडा, लोटक्यात आमटी, कोरड्यास असणार. त्यावर लुगड्याच्या धडप्यानं झाकलं होतं. तिच्या काखेला खराटा होता. चिंगाची आई अंगानं सडपातळ, रंगानं सावळी होती. ती गोल चेहऱ्याची, आखूड नाकाची होती. दाताला दातवण लावल्यानं सगळे दात काळे दिसत होते. तिच्या अंगावर असंच दंड घातलेलं जीर्ण लुगडं कोष्टाव विणीचं होतं. अंगात तशीच चोळी, रंग उडालेली, हिरव्या वाणाची. डोक्याचे केस वाळलेले, त्यात तेलफणी नसल्यानं वाकडे झालेले, कपाळावर आलेले दिसत. त्यातच झाडलोट करून आल्यानं तिचा चेहरा धुळकटलेला दिसत होता. तिनं घरी आल्या आल्या आपल्या मुलांच्या पुढंच डोईवरची पाटी उतरून खाली दारात ठेवली. त्या पाटीतल्या अन्नावर घारी, कावळे पडावेत तशी तिच्या मुलांची मुरकंड पडली. कुणी भाकरीचा टुकडा–लोणचं उचललं, कुणी आमटीचं लोटकं अन् भाकरी घेतली, कुणी त्या आमटीत हात घालून फुरके मारू लागले. ती शिळी आमटी, शिळी भाकरी–भात ती मुलं पोटात भरत होती ... तेवढ्यात... ती चिंगीवर व इतर पोरांवर कडाडली. 'काय रं मुड्यांनो, खातापिता भिकाऱ्यागत करता ? काय धड माणसावानी थाळीत घेऊन खावं का असंच कुत्र्यामांजरागत खाता ? उठा, घ्या ताट.'...

तेवढ्यात दारात पवाबाई जोरात आवाज काढत आली की !... पवाबाय

बोंबलत दारात आली,

'काय ग येसाबाय, तू बरी आमच्या पोटावर पाय देत खोताच्या वाड्यात झाडलोट करायला गेलीस ? माझ्या हक्काचा तो वाडा, तू काय म्हूण त्या वाड्यात गेलीस ?'

पवाबाईचा बिघडलेला अवतार, तिचे हातवारे अन् आवाज ऐकून येसाबाई शांतपणे बोलली, 'पवा, तू काय बोलायचं ते सरळ बोल. वाइटवंगाळ बोलू नको. ते मला खपायचं न्हाय.'

तोच ती पवाबाय पुन्हा कडाडली, 'तू माझ्या लेकराबाळांच्या तोंडातला घास काढून घेणार कोण पडलीस ? आन् मलाच दम देतीस ? तू उद्या माझ्या हक्काचा वाडा झाडायला जा तर, तुझ्या दारात शिळंला धडक देऊन माजा जीवच घीन बघ !'

'अग तुला उगाउगी जीव दियाला झालं काय ते बोल की !'

'तू माझ्या वाड्यात झाडायला का म्हूण गेलीस ?'

'तुझा काय तिथं हक्क हाय ते बोल !'

'अगं, तुजा तर काय हक्क हाय बोल ! माझी तर गेल्या सातआठ वर्सं झाडायची वहिवाट हाय ! तो वाडा आमच्या वतनाच्या वाट्याचा हाय. मग आता बोल, तुला आता काय म्हणायचं ?'

ती येसाबाय कायदेशीरपणानं बोल करीत म्हणाली, 'त्या वतनाचा कागद तुझ्यांजवळ न्हाय, माझ्याजवळही न्याय. तुला त्या वाड्यात झाडलोट करायची असंल तर खुशाल कर. मला काय तेची एवढी जरूर न्हाय. पण तुझं हे ओरडणं, वाईटवकटं बोलणं मला खपायचं न्हाय. मी पण तुझ्यागत वंगाळ हाय. माझं डोसकं ठिकाणावर हाय तोपर्यंत ठीक हाय. ते बिघडलं तर काय करंल तेचा पत्या न्हाय !'

चिंगीची आई पण तशीच होती, सारख्याला वारक्या. दोघींच्या भांडणाचा आवाज ऐकून माझी आई तिथं आली व समजुतीनं दोघींनाही म्हणाली, 'येसाबाय, त्या पवाबायच्या तोंडाला कशाला लागताय वो ?'

'मला कुठं तेवढंच काम हाय? पवाबाय म्हणती ना, तो खोताचा वाडा तिचा हाय? मग तिनं खुशाल त्या वाडयात झाडायचं काम करावं! मला कुठं तिथं सोनं मिळतंय? मी आपली कुठंबी कष्ट करुन पोट भरणारीन...'

मग लागलीच माझी आई येसाबायला बोलली, 'खरं हाय बया तुझं! तूच बरी शानी झालीस!'

तोच माझी आई पवाबाईकडं पहात बोलली, 'पवाबाय, तुझं आता काय राह्यलं का, बोल?'

त्यावर पवाबाई एकदम थंड झाली आणि तिला एकदम काय वाटलं कुणास ठावं, ती झटकन पुढं होऊन, माझ्या आईच्या पायावर तिनं डोकं ठेवलं अन् लागलीच तिनं येसाबायचंही पाय धरलं व तिला म्हणाली, 'बया, तू शानी, समजूतदार!

म्हणून मी असं दहादा तुझ्या पाया पडीन, पाय धरीन. तुजी तशी माझी बी लेकरं हायेतबघ ... त्यांस्नी जगवायापाय एवढा जिवाचा आटापिटा करायचा वग सावुबाय!'

त्यांचं भांडण मिटलं. आई तिथून घरी आली.

## गावातील सवर्ण बाया

### बामणीन बाई

तोच आतला आवाज जवळ आला, 'काय रे रामा! झाली का सगळी लाकडं फोडून?'

'व्हय, होत आल्याती. एकदोन राहिल्यात.'

तोच बामणीनबाई दाराच्या तोंडाला आली, 'मग मध्येच कशाला हाक मारलीस? मी थोडी कामात आहे.'

'काकी, माजं जरा काम हाय. घरनं पोरगं आलंय.'

'मग तो काय म्हणतोय?'

त्यावर जरा लाचारीच्या शब्दात आण्णा बोलला, 'भूक लागलीय म्हंतो. घरी भाकरीचा टुकडा नव्हता. त्याला काय भाकरीचा तुकडा वाढता?'

आण्णांचा गरिबासारखा आवाज ऐकून बामणीन काकी बोलली, 'थांब हं काय आहे का पहाते आत.' बाई असं म्हणताच आशा जराशी फुलली ... आतून बाईनं ताट आणलं. आण्णाला पुढं बोलावलं. 'अरे, हे कशात घेतोस?' ...त्याबरोबर आण्णानं नेस्त्या धोतराचा पदर पुढं केला. 'टाका या धोतरात.'

बामणीन काकीनं आण्णाच्या धोतरात भाकरी टाकल्या. त्यावर लोणच्याची फोड, चटणी होती...

गाडगं हातात घेऊन आण्णानं पुन्हा वाड्यात हाक मारली, 'पाणी वाढता का जी ?

'आले हं ! पाणी आणते!' आतून आवाज आला.

बाईनं येताना मोठ्या चरवीत पाणी आणलं ... त्या बाई लोटक्यात वरून पाणी वाढू लागल्या.

मी हातात लोटकं धरलं. तोच बाई ओरडल्या, 'आरे आरे, खाली मडक धर. वर भांड्याला लागशील! विटाळ होईल! तुला कळत नाही का?'

### बामणीन काकी

माळीच्या दारी उभ्या असलेल्या बामणीनकाकी एकदम माझ्यावर ओरडल्या, 'आरे आरे! वाळत घातलेल्या कपड्याला लागशील रे ! हा रामाचा पोरगा विटाळ करणार ...'

त्या काकीच्या बोलण्यानं मी एकदम चपापलो. मग मी पुढं पाहून लाकडाच्या ढलप्या टाकू लागलो. तोच बाई पुन्हा उभ्या राहून बोलल्या, 'चांगलं डोळे उघडून सरपण टाक. कपड्याला लागू नकोस ...'

आण्णानं आत हाक मारली, 'आत हाय कावो कोण?'

'का रं रामा?' असा आवाज करत बामणीनकाकी पुढं आल्या.

'मला पोटाला काय दाणं वाढता ?'

'आरं, पण लाकडं फोडायचं काम झालं का?'

'व्हय, झालं. फोडलेली लाकडं आत आणून टाकली.'

मजकडं बघून बाईनं विचारलं, 'का रं रामा, हा तुझा पोरगा काय करतो?'

'साळंत जातो.'

'आरे, हा शाळा शिकून काय करणारे?'

त्यावर आण्णा गप्प बसला व पुन्हा म्हणाला, 'अक्षर फोडण्यापुरतं शिकायचं. मुंबईसनं आलेलं पत्र वाचायला आलं का लय झालं बघा! न्हाय तर आमच्यात शिकून कोण मामलंदार– फौजदार झालाय?'

'असं काय? चांगलं आहे मग!'

त्यावर पुन्हा आण्णानं मूळ मुद्दा काढला. 'काकी, पोटाला काय दाणं वाढा. आज कायदिक न्हाय बघा!'

'अरे रामा, तुला पोटाला घालायला कुठलं रे दाणं आता? आम्हीच विकतचं खातो.'

त्या काकीबायच्या मनाला काय वाटलं कुणास ठावं? ती लगोलग आत गेली. जरा वेळानं सुपात दाणं घेऊन बाहेर आली. सुपातलं दाणं बघून आण्णाचा चेहरा उजळला. बाई पुढं आल्या आल्या आण्णानं आपल्या जवळच्या धोतराचा धडपा दोन्ही हातानं नीट धरला. तोच काकीबाय बोलल्या, 'आरं, फाटका पदर पुढं कशाला करतोस? चांगला भाग पुढं धर.'

'काय करता काकी, असंच सगळं हे हाय बघा!'

मग आण्णानं त्या धडप्याची डबल घडी केली, तो धडपा नीट पुढं धरला. त्यात काकीबाईनं सुपातल्या दाण्याची धार व्यवस्थित ओतली.

## मास्तरीणबाई

'मी रामा म्हार हाय जी' असा आण्णाचा आवाज आत शिरल्याशिरल्या मास्तरीणबाई चटाचटा पाऊल टाकत बाहेर आली. त्यात तिची नजर माझ्या पायाकडं गेली. बाई एकदम माझ्यावर ओरडली, 'ये पोरा, खाली बघ. रांगोळी तुडवलीच!'

ती बामणीन अशी बोलल्या बोलल्या मला पायात विंचू यावा तसा मी झटकन

बाजूला उडी मारली. त्यावर ती बाय परत फणफणलीच, 'मेलं! डोळं गेल्यागत चालतंय.'

त्यावर माझा वडीलच मास्तरीणबाईला समजुतीनं म्हणाला, 'विनकळतं पोरगं हाय.'

'पण त्याला खायाचं कळतं का नाही?'

'काय करता आता, दया सोडून.' असं आण्णा बोलताच त्या मास्तराच्या बायकोनं आत पुन्हा हाक मारली,

'आहो, आत काय करताय तुम्ही? दारात म्हार आयताच आलाय. पावसाचे दिवस... चार लाकडं तरी फोडून घ्या. आता स्वैंपाकाला सरपण नाही.' असं मास्तरीणबाई आत तोंड करून आवाज करून बोलली व पुन्हा आण्णाकडं तोंड करून म्हणाली, 'आरं, आमचं बघ सरपण संपलंय. लाकडाच्या चार ढपल्या तरी काढून दे. त्यात पावसाचे दिवस.'... पत्र वाचून घेणं भाग होतं. त्यात मास्तरीण-बाईनं लाकडं फोडण्याचाच प्रश्न पुढं टाकला. ... मास्तरीणबाई आत जाता जाता मास्तराला बोलून गेली, 'म्हार ऐताच दारात आलाय. त्याच्याकडून तेवढी लाकडं फोडून घ्या. वेळेला दारात घावलाय.'

(मास्तरानं) माळीच्या चौकटीतून आत बायकोला हाक मारली, 'आगं, ती आपली कुऱ्हाड कुठाय? रामाकडून आजच्यापुरत्या चार ढलप्या काढून घेतो.' त्या बरोबर आतून उलटा आवाज आला. 'आहो, आजच्यापुरत्या काय बोलताय? चार-आठ दिवस पुरंल एवढं तरी त्या म्हाराकडून फोडून घ्या. तो ऐताच घावलाय. त्यात पावसाचं दिवस.'... मास्तरीणबाईचं बोलणं आण्णाच्या मनाला लागलं होतं.

मास्तराची बायको खांदयावरचा पदर नीट सावरत बाहेर आली व सरळच बोलल्यागत बोलली,

'आहो, मुलं बरी मिळालीत. त्यांना शेण तरी आणायला सांगा. गाईचं मिळालं तर छानच.' तोच दगडू मध्येच तोतऱ्या शब्दात बोलला, 'आम्ही उदया सकाळीच पहिलं शेण आणून टाकू अन् दिवस बुडायला जळण आणून टाकू.'

'वा छान, आमची दोन्ही कामं होतील.' असं म्हणून मास्तराची बायको एकदम खूष...

दुसऱ्या दिवशी, रविवारी सकाळी, न्याहारीच्या वक्तापर्यंत आम्ही एक एक पाटी शेण आणून टाकलं. ते पाहून मास्तरीणबाई भलतीच खूष झाली ना....

जळणाचे भारे पाहून मास्तरीणबाईही खुषीत येऊन चटकन् बोलली. 'आता पंधरा दिवस चिंता नाही.' असं बोलून मास्तरीणबाई आम्हाला म्हणाली, 'असंच आम्हाला जळण आणून देत जा बरं का रं.'

## नबाबाई देवऋषीण

### मरीआईची पुजारीण

मरीआईच्या देवीच्या देवळात दिवा महार लावतो. माझ्या गावी मरीआईच्या देवळात दिवा नवाबाई म्हातारी लावत असे, तीच देवीची रोज पूजा करीत असे.

### देवऋषीण

हे दोघं (शाळकरी मित्र) बहाद्दर कायम आमोश्या—पुनवेला देवर्षीण नबा-बाईच्या दारी जाणार. तिला खास विचारणार, 'नबाबाई. आज कुठं काय भुताचं सान्नं खाना देणारं गिऱ्हाईक घावंल का?'

देवरुषीणबाई सरळच. तिला ठावं की भुताचा खाना भुताच्या नावावर जात होता तरी तो शेवटी कुणा तरी नडल्या—आडल्या गोरगरिबाच्या पोटात जात होता. त्यामुळे ती म्हाकाला, येल्याला सरळ सरळ खबर देई, कोंबडं कुठं सोडणार, आंड-दामटा कुठं टाकणार, चपात्या भाकरी कुणाला देणार. अशी सरळ खबर देऊन हासत बोलायची, 'काय रं पोरांनो, तुमी भुताचा खाना खाता?'

'तेला का झालं आजी? ते पण आन्नच, अन् चांगलंचुंगलं!'

त्यांचं उत्तर तिला पटायचं. मग ती कुठल्या जागी, कोणच्या भुताचा खाना, कवा जाणार हे सगळं त्यांना सांगणार.

## यल्लमाचा निवद

सूर्य डोक्यावर चढत होता. गावातला निवद यल्लम्माला येत होता. आया-बाया न्हाऊन, नवं लुगडंचोळी नेसून, ओले केस पाठीवर सोडून कपाळाला कुंकू-भंडारा लावून, नैवेद्याचं ताट हातात घेऊन यल्लम्माला येत होत्या. लहान मुला-मुलींच्या हातात पाण्याचा तांब्या असे. देवाला निवदनारळ करून आल्यावर काही बाया येताळाला निवद ठेवत होत्या. निवद म्हणजे तळहाताएवढ्या गव्हाच्या चपात्या तेलात तळलेल्या. त्यावर भात, गूळ अन् नारळाचा तुकडा ठेवत होते. कुणी बाई निवद ठेवीत होती, कुणी नुसतीच भाताची शितं टाकीत होती. अशा बाईला आम्ही विनवत असू, 'मावशीबाई, देवाला निवदबी ठेवा की.'

'आता न्हाय रं बाबा निवद. म्होरच्या खेपंला ठवू' असं ती बोलायची

## वाटेत भटलेली म्हातारी

आम्ही चालून चालून दमलो होतो. आम्ही जवळच्या झोपडीपुढं बसलो. त्यात एक म्हातारी बाई होती. ती आम्हाला असं आडरानाच्या प्रसंगात पाहून

मायेच्या सुरात बोलली, 'कसं रं बाळांनो तुमी अंधाऱ्या राती निघालाय?' औंधात आम्ही काय शिकतो, कुठं शिकतो, राहातो हे सगळं आम्ही सांगितलं...म्हातारीला नवल वाटलं. 'आम्हाला जेवायचं आहे. आमच्या जवळ भाकरी आहेत. आम्हाला पाणी देता का?' मी त्या गड्याला म्हणालो.

तोच ती म्हातारी आम्ही तिघंही ब्राह्मण आहोत असं समजून खरेपणानं म्हणाली, 'बाबांनो, आम्ही धनगराचं, आमचं तुमाला चालंल का?'

तोच लाळे पटकन बोलला, 'आजीबाई आम्हाला सगळं चालतं'...तोच ती म्हातारी माऊली म्हणाली, 'आमचा झुणकाभाकर तुमाला चालंलका?' 'होय, चालेल.' लागलीच त्या मायाळू म्हातारीनं आमच्यापुढं बाजरीच्या चार भाकरी आणि पितळीत झुणका आणून ठेवला.

## मेलेला बैल व म्हातारी मालकीण

त्या मेलेल्या बैलाकडं त्या घरातली गडीबाया सुतकी चेहऱ्यानं एकटक पहात बसल्या होत्या. बायांनी तोंडाला पदर लावले होते...म्हारांच्या हातातल्या सुऱ्या-पाट्या बघून आता हा बैल म्हाराच्या गाडग्यात शिजणार या जाणिवेनं त्या माळ्याच्या बायांनी डोळ्याला पदर लावले. तरी पण त्यातली एक म्हातारी मध्येच त्यांच्या गड्यांना बोलली, 'आप्पा, बैल म्हाराच्या ताब्यात कशाला देताय? तेची पूजा करून त्याला माणसागत मूठमाती का देत नाही?' तोच तो आप्पा खालच्या आवाजात म्हणाला, 'तुजा बोल हा खरा, पण या म्हारास्नी पटला पाहिजे ना?'... त्या माळ्याच्या वाट्याचा म्हार हिस्सेदार म्हादा त्यांना सरळच बोलला, 'का वो आजी तुमी हक्कावर पाय देताय?' मग त्या म्हातारीचा निबार आवाज उठला, 'त्यो रे कसा तुजा हक्क? बैल आमचा, आमी काय बी त्याचं करू!'

'तसं कसं आजो बोलता? बैल जिता होता तोवर तुमचा. आता तो मेल्यावर त्याच्यावर हक्क आमचा ... तुम्ही हे बवताबघता म्हाताऱ्या झाल्या अन् आत्ताच असं कसं भुलल्यागत बोलताय जी?'

'तुमचा हक्क मला कबूल! पण एवढा चांगला बैल, त्याला फाडून कसा खावा, याचं तुमाला कायच कसं वाटत न्हाय रं?...एवढ्या बार या बैलाला माती देऊ दचा. मग दुसऱ्या जनावराचं तुमी कायबी बघा.'

म्हातारीचा तो हेका ऐकून महार गडी बुचकळ्यात पडले. ... त्यात म्हादानं मध्येच तोंड घातलं, 'आजी, आता काय आमच्या तोंडावर हाणायचं करू नका. का म्हण हा घास आमच्या तोंडातून काढून घेताय?'

त्यात काय काय म्हार गडी आपल्या हक्काची, कायद्याची भाषा बोलू लागले. मग मात्र म्हातारीचा आवाज आला, 'आता तुमची आशाच त्याच्यावर बसलीय तर घेऊन जावा बाबांनो!'

असं म्हणून म्हातारीनं आपल्या डोळ्यांना पदर लावला. मग जरा ओल्या घोगऱ्या आवाजात आपल्या सुनांना बोलली, 'उठा गं आता, त्या माज्या राजाला म्हारांनी शिवायच्या अगुदर त्याची हळदकुंकू लावून पूजा तरी करा. उठा!'

त्या बरोबर म्हातारीच्या सुना उठल्या, घरात गेल्या. ताटात हळदकुंकवाचा करंडा आणला, पेटता दिवा ठेवला. तांब्यात पाणी घेतलं. त्या सूनबायांनी बैलाच्या पुढच्या पायांवर पाणी टाकलं. त्याच्या कपाळाला, शिंगाला कुंकू लावलं, त्याच्या अंगावरही हळदकुंकू टाकलं. बैलाची पूजा करून त्या सुना मागे फिरल्या. मग म्हातारीचा ल्योक भुजंगा म्हारांना म्हणाला, 'हं, म्हारांनो, आता उचला, त्या माज्या राजाला!'

## झरा आणि म्हारोड्यातल्या बाया

सकाळी म्हारोड्यातल्या बायका झऱ्यावर जमा झाल्या. पाण्यानं डबडबलेला नवा झरा बघून त्यांना बरं वाटलं. उगा पाण्यापाय परवडीला बसायचं त्यांचं टळलं. एखादया खट्याळ सासूच्या बोलण्याला कंटाळून झऱ्यावर पाण्याच्या निमित्तानं खुशाल बसणाऱ्या सुनांना मात्र अडचण झाली. त्यांना उगीचच वेळ घालवीत आता झऱ्यावर बसता येणार नव्हतं. लेकुरवाळ्या बायांची मुलांची अडचण एकदम दूर झाली. कामाधंदयाची बाय सकाळची चूल पेटवायला मोकळी झाली.

## वाळीत गावची मुलगी

(वाळीत टाकलेल्या) गावची मुलगी कोणी करत नसे. त्या गावी मुलगी कोणी देत नसे....एखादया गावचे म्हार असले तर ते माफी मागत नसत.ते वाळीत रहात असत. आपल्या पोरी चोरून नातेवाइकांच्या गावी देत असत. दुसऱ्या गावच्या नातेवाइकांच्या मुलीही गुपचूप करीत असत. या संगतीनं दुसरी गावंही वाळीत पडत होती.

## आंबेडकर जयंती व बाया

आयाबाया न्हावून त्यांनीही ठेवणीची लुगडी नेसली होती, अंगात चोळ्या घातल्या होत्या. त्यांनी डोईला चांगली तेलफणी केली होती. रानात रोज सकाळीच जाणाऱ्या गडीबाया घरीच होत्या. बायांनी घरदार, न्हाणं-धुणं निर्मळपणे केलं होतं.

## तमाशातल्या बाया

मोठ्या तमासगिरांच्या फडात नाचणारीण बाया असत. नाही तर बाकीच्या

फडात तमाशात नाचे पोरंच अधिक असत. गॅसच्या बत्त्या कनातीच्या दाराजवळच उभ्या करून ठेवलेल्या. त्यांच्याच झगझगत्या प्रकाशात बाकड्यावर, नाचणाऱ्या बायका अंगावर साज चढवून, नटूनथटून बसलेल्या असत. त्यांना बघायला हावऱ्या नजरांनी त्यांच्या भोवती गर्दी केलेली असते.

तमाशाच्या फडात नाचणाऱ्या बाया तमाशा कलावंताशीच लग्न केलेल्या असतात. त्यांच्या नावाचं त्यांनी गळ्यात मंगळसूत्र बांधलेलं असतं. काही नाचणाऱ्या कलावंतींचे यजमान असतात. त्या यजमानाच्या नावानं त्यांनी गळ्यात मंगळसूत्र घातलेलं असतं. तमाशात स्टेजवर नाचणारी बाई अशी यजमानाशी बायकोच्या नात्यानं सांधलेली असते. काही नाचणाऱ्या यौवना चांगल्या जीवनात सांभाळणाऱ्या यजमानांच्या तपासात असतात, तर काही लग्न करून कायमचा संसार करतात.

**तमाशातली बाई**

अहमदशेटनी एका बाईच्या नावानं आवाज दिला. तोच मेकप केलेली, चाळ बांधलेली, अंगावर भारी नऊवारी नेसलेली रसरसती उपवरा आली अन् मजपाशी मोकळ्या खुर्चीवर बसली. तिच्या अंगाचा भडक सेंट माझ्या नाकात घुसला. त्या संगीतबारीत नाचणाऱ्या अन् नाचून स्टेज दणाणून सोडणाऱ्या यौवनेकडे हासऱ्या चेहऱ्यानं पाहून मला अहमदशेट तांबे सरळ, खुल्लम् खुल्ला सवाल करतात, 'कसा काय, माल पसंत है ना?'

आली का पंचायत? जी गोष्ट माझ्या ध्यानीमनी नव्हती तीच त्यांनी मला विचारली. अन् अहमदशेट पुढे उघडच बोलतात, 'तुमच्यासारखा चांगला यजमान वकील मिळाला तर तिचं कल्याण होईल!' त्यांनी हे बोलून मला एकदम गार केलं...त्यांनी हे मला विचारण्यात एक अर्थ होता. एकतर ती मुलगी देखणी होती, ती यौवनाच्या भरात होती. तारुण्यानं तिच्या अंगोपांगात उधान उफाळलेलं होतं. त्या गौरवर्णी, आटूस बांध्याच्या, सुंदर पोरीवर कोण भाळणार नाही? त्यातच ती संगीतबारीत नाचणार, आपल्या आईभावंडांना जगवणार, त्यातच ती आपलं तारुण्य उधळणार. मिळाला चांगला यजमान तर ठीक, नाही तर ती खतऱ्यात पडणार. जवानी खलास करणार. तमाशा थेटरात नेमानं येणारा माणूस एखादया नाचणाऱ्या बाईवर टप धरूनच येतो अन् तिचा तो शेवटी यजमान बनतो. काही बाया यजमानाच्या जिवावर जगतात, तर काही यजमान बायांच्या जिवावर जगतात, रहातात. त्या बाईचा पण त्या यजमानावर जीव जडतो ना! असा 'यजमानी' प्रकार असतो याची मला पूर्ण कल्पना होती. त्यातच अहमदशेटच्या प्रश्नानं मला चाटच पाडलं. जवळ बसलेली जवान नारही नाचणारीणच. तिनं मजकडे खुषीत पाहून मला डोळा मारला ना! त्यात ती ऐन उसळत्या जवानीतली पोर...पण माझ्या स्वभावाची

अहमदशेटना कल्पना होती...तोच हसऱ्या चेहऱ्यानं अहमदशेट म्हणतात, 'मला वकिलांची कल्पना आहे. पण मी त्यांची मस्करी केली.' असं बोलून शेट त्या पोरीला म्हणाले, 'अगं तू जा. तुझी बारी आता उभी राहील.' त्यावर ती डोळं उडवतच गेली.

## वेश्यांचे जग

पुण्यातील काही वेश्यांना हद्दपारीच्या नोटीसा लागल्या होत्या. वेश्याप्रतिबंधक कायद्याखाली या वेश्यांच्यावर खटले भरून त्यांना हद्दपारीच्या नोटीसा लागल्या होत्या. खटला चालविण्यापूर्वी फिर्याद व पंचनाम्याला धरून गुन्ह्याच्या जागेची पाहणी करण्यासाठी मला पुण्यातील शुक्रवार पेठ, दाणेआळी, शालूकर बोळ चोळखण आळीत जावे लागे. पुढंपुढं हा वेश्यांचा प्रश्न फार अवघड व खोल असल्याची मला जाणीव झाली.

### पुण्यातील वेश्या

पुण्यात वेश्या म्हणून येणाऱ्या बाया या देवदासी असतात, त्या देवाला सोडलेल्या असतात. या देवदासी का सोडतात ? कोणत्या मुली सोडतात ? त्यांचे आईबाप त्यांना देवदासी म्हणून का सोडतात ? याचा शोध घेण्यासाठी, या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी त्या काळात मी एक महिनाभर सौंदत्ती, चिकोडी, मदरखिंडी, जमखंडी, बेळगाव, धारवाड, विजापूर या भागात फिरलो होतो.

### वेश्या कशी होते ?

भुकेच्या आगीत सापडलेली स्त्री वा मुलगी हिच्या हातात रुपया पडला किंवा आडाशीरी– पायली धान्य ओटीत पडले तर ती त्यापायी आपला देह विटाळून टाकते. त्या क्षणी भुकेल्या पोटी ती शीलाची राखरांगोळी करते ... आजचा दिवस गेला. दुसऱ्या दिवसाची पुन्हा काळजी ... मग त्या रुपया दोन रुपयांची पुन्हा आठवण होते. पायली अर्धा पायली धान्य पदरात पडावेसे वाटते. ते पुन्हा पदरात घेण्याची इच्छा होते. त्याचेच रूपांतर लपून छपून वारंवार अनैतिक संबंधात होते व शेवटी त्या व्यवहारास राजरोस रूप प्राप्त होते. नीतीच्या कल्पना बोथट होतात, शेवटी दारिद्र्यापायी वाकडा पाय पडलेली स्त्री किंवा मुलगी पुढे गिऱ्हाइकाच्या मागणीप्रमाणे स्थल व काल बदलत असते. शेवटी शेवटी तिच्या घराला वेश्यागृहाचे स्वरूप येते. ह्यामुळे होणाऱ्या कमाईत ती जगते व तिच्या कुटुंबाला कसेतरी जगवते. प्रथम शरमेने व पुढे सवयीने तेही जगत रहातात.

## देवदासी

वेश्याव्यवसायाचा जन्म आपल्या समाजरूढीतूनही काही प्रमाणात झालेला आहे. हिंदू धर्मात देवाला मुली सोडण्याचा प्रघात आज शतकानुशतके चालत आलेला आहे. यल्लाम्मा देवीची जोगतीण, खंडोबाची मुरळी, तसेच अरादीन, बसवी, कलावंतीण, इत्यादी नावाने मुली देवाला सोडतात व त्या त्या नावाने रहातात. देवांना वाहिलेल्या या मुलींची पुढे वेश्यांत भरती होते व ती वाढतच जाते.

देवाला सोडलेल्या मुलींची लग्ने देवाबरोबर लावतात. त्यामुळे त्यांना उभ्या आयुष्यात दुसरे लग्नच करता येत नाही. याच मुलींना व बायकांना 'देवदासी' म्हणून ओळखतात. देवदासींची उत्पत्ती कर्नाटक भागातून अधिक होते. तीही विशेषतः खालच्या वर्गातून. घरात गोरीगोमटी, नाकीडोळी नीटस पोरगी दिसली की तिचे आईबाप तिला देवाला सोडतात. देवाबरोबर तिचे लग्न लावतात. उपवर झाल्यावर तिच्याच गावी धनसंपत्तीने बऱ्या असलेल्या गृहस्थास ती आपला यजमान म्हणून मानते व त्याच्याशी अनैतिक संबंध ठेवते. तोही तिच्या घरच्या माणसांच्या व तिच्या पोटाचा प्रश्न सोडवतो. अपवादात्मक एखादी देवदासी एकाच यजमानापाशी राहिल्याचे एखादे उदाहरण सोडल्यास जो यजमान अधिक पैसे मोजील त्याच्याकडे देवदासींची धाव जाते. त्यामुळे पैशाच्या आकडचांवर त्यांचे यजमान सारखे बदलत असतात. शेवटी पैशाच्या लोभाने त्या शहरवस्तीकडे धावतात व सरळ सरळ दुकान मांडून देहविक्रीचा आपला धंदा सुरू करतात.

एखाद्या गावची देवदासी, अंगावर चांगले कपडे व दागदागिने लेवून जर शहरातून गावी आली तर तिच्या पालटलेल्या परिस्थितीवर भाळून देवाला सोडलेल्या गावच्या मुली शहरात अधिक पैसे मिळविण्याच्या आशेनं पुण्यामुंबईसारख्या शहरांची वाट धरतात. मग खिडकीत बसून गिऱ्हाइकांची वाट बघतात.

देवाला मुली सोडण्याच्या पाठीमागे भयंकर घातक व भ्रामक अशी कल्पना असते. त्याच कल्पना रूढ झालेल्या आहेत.... घरातील कर्त्या माणसाची अशी समजूत असते की देवाला मुलगी सोडली तर मुलीच्या स्वरूपात देवाचा वारा सारखा घरात खेळतो. घरात देवदासीचे स्थान म्हणजेच देवाची जिवंत सावलीच होय. त्यामुळे मुलीच्या स्वरूपात असलेल्या देवाच्या छायेत सगळे कुटुंब सुखाने नांदते, कोणास कसली इडापीडा होत नाही. दुःखदुखणे घरात येत नाही. यासाठी सगळे कुटुंब सुखात रहावयाचे असेल तर घरात देवाची सावली पाहिजे. देवाचा वारा पाहिजे. म्हणून घरात मुलगी जन्माला आली की तिला देवाला सोडून तिचे लग्न देवाबरोबर लावायचा प्रघात आहे.... अशा देवधार्मिक, घातक रूढींमुळे देवदासींचा वर्ग निर्माण झाला.

## टायपिंग क्लासमधील मुलगी

टाइपिंगच्या क्लासला माझ्याच बॅचला एक मुलगी येत होती. माझ्या टेबलाजवळ ती टाइपिंग करायची. एका महिन्यात त्या मुलीची चांगली ओळख झाली.

ती मुलगी तशी रंगानं काळीसावळी होती, पण नाकडोळे तरतरीत, चेहरा गोड. ती हसल्यावर तर अधिक गोड दिसायची. हसताना ती फुलून इयाची. तिच्या घरची परिस्थिती तिच्या कपड्यातून दिसायची. ती इंटर आर्टसला होती. ती माझ्याशी बोलायची, माझी चौकशी करायची. ती मला कधीकधी एस्. पी. कॉलेजाजवळच्या न्यू लकी हॉटेलात चहाला नियाची. ती माझ्याशी जवळकीनं वागायची. त्यातच मी नोकरीला होतो.... हे त्या मुलीला माहीत होतं.

माझं नाव, गाव व आईबापांची परिस्थिती तिला माहीत झाली होती. पण आरंभी तिला माझी जात मात्र माहीत नव्हती, तिनंही मला विचारली नव्हती. पण पुढं एकदा मला तिनं माझी जात विचारली. मीही तिला 'महार' म्हणून जात स्पष्टपणे सांगितली. पण या जातीनं असा काय चमत्कार केला की त्या मुलीनं पुन्हा कधी मला तोंडच दाखवलं नाही व क्लासलाही ती दिसली नाही.

## मुंबईतील नातेवाईक स्त्रिया

शेवंता मुंबईत होती... शिवडीला बसक्या कौलारू घरात राहात होती. तीही पोटभाड्यानं. आपला भाऊ कॉलेजात शिकतो याचं तिला मोठं कौतुक! ती माझ्यासाठी कष्टाच्या कामावरून रजा काढायची. विशेष म्हणजे ती मला दोन दिवसाआड कलीजाचा रसा अन् भात करून घालायची.

बहिणीकडं रात्रीच्या मुक्कामाला मोठीच अडचण होती. बिऱ्हाडात पोटबिऱ्हाडांचा मुक्काम. रात्री झोपताना अशी कुटुंबं खोलीत लुगड्याचे किंवा धोतराचे पडदे मध्ये बांधून आडोशापुरत्या भिंती उभ्या करत. कुणाचा नवरा कोणत्या पाळीला सुटून घरी येतो ह्याची त्या त्या बायांना कल्पना. त्यामुळे त्या जाग्याच नवऱ्याची वाट पहात बसत. अशा मुक्कामाच्या अडचणीत मी शिवडीहून नायगावला जात असे. तिथं माझ्या बहिणीच्या दोन नणंदा होत्या. त्यांच्या खोल्या नायगावच्या बी. डी. डी. चाळीत होत्या. त्यांच्याही खोलीत माणसांची गर्दीच असे. त्यामुळे बी. डी. डी. चाळीच्या फूटपाथवर मी... रात्र काढत असे.... वरळीला बी. डी. डी. चाळीत माझ्या चुलतीच्या बहिणीची आंबू नावाची मुलगी होती. तिलाही मी भेटायला जात होतो. तिच्याही खोलीत दोन बिऱ्हाडं. मुक्कामाचा प्रसंग आला तर तिथंही फूटपाथवरच ... नायगावच्या बी. डी. डी. सिमेंटच्या चाळीत माझी बहीण शेवंताची नणंद रहात होती. तिचा मुलगा शिकलेला, बी. ए. झालेला, चांगला हुशार. दुसराही मुलगा मॅट्रीकपर्यंत शिकलेला.

## जातपात पाळणारी शेजारीण मुलगी

(शेजारी) पंडुरकरांच्या लहान मुली प्रथम प्रथम आमच्या खोल्यांत खेळायला येत. आमच्याकडं कधी कधी चहाही पीत.

श्री. पंडुरकरांची लहान मुलगी शोभा नेहमीप्रमाणे खेळायला आली. चहा घेण्याला तिला माझ्या आईनं आग्रह केला. पण ती हसत मान हलवून 'नाही' म्हणत होती. म्हणून मी तिला म्हटलं,

'शोभा, चहा घे ना!' ती हसतच पुन्हा नको म्हणाली. यापूर्वी न बोलता चहा घेणारी ही मुलगी आज आग्रह केला तरी चहा का घेत नाही म्हणून मी तिला मुद्दाम विचारलं, 'का ग? चहाला का नाही म्हणतेस आज ?'

त्यावर पुन्हा तिनं हसतहसत नाही म्हणत मान डोलावली.

ती शोभा तशी लहानच मुलगी, ८ – ९ वर्षांची. मी तिला जवळ घेतलं. तिच्या पाठीवरून हात फिरवीत विचारलं, 'शोभा! आमच्या घरात आज चहा न पिण्याचं खरं खरं कारण काय?'

त्यावर ती लहान मुलगी हसली व बोलली, 'किनाय, आमच्या आईनं सांगितलंय की खरात काकांच्या घरी काही खायाचं नाही, चहा पियाचा नाही!'

## जातपात पाळणाऱ्या मोलकरणी

शेजारीच काय, पण मोलकरणीच्या बाबतीतही आम्ही अगतिक होतो. माझी पत्नी कॉलेजात एम्. बी. बी. एस्. ला शिकायला होती. त्यामुळे आम्हाला घरी कायमची स्वैंपाक करण्यासाठी व धुणी धुण्यासाठी बाई लागत असे. त्यात भांडीधुण्याला बाई मिळायची, चार आठ दिवस टिकायची. मग ती लागलीच झालेल्या कामाचे पैसे घेऊन, काहीतरी निमित्त काढून जी पसार व्हायची ती पुन्हा तोंडच दाखवायची नाही. मग आम्हाला कळायचं की तिला आमची जात माहीत झाली म्हणून तिनं काम सोडलं. आणि ही बाई कुठली होती?

आमच्या जवळच गाडीतळावर मोठी झोपडपट्टी... दुष्काळात धावलेल्या बाया, आमची जात समजल्यावर काही तरी निमित्त काढून धुण्याभांड्याची कामं सोडून पळून जात...

या मिळालेल्या अनुभवामुळे गाडीतळावर एक महाराची सोनाबाई नावाची बाई माझ्या पत्नीनं घरकामाला ठेवली. ती घरचा स्वैंपाक, भांडीधुणी करायची. दिवसभर घरी राहून माझ्या लहान मुलीलाही सांभाळायची. तशी ती विश्वासू आणि चांगली होती.

एकदा ही सोनाबाई आपल्या गावी म्हणून गेली ती परत आलीच नाही.

आमच्या घरी धुण्याभांड्यासाठी सोलापूरकडची एक कुणब्याची बाई काम

करू लागली. तिला आमची जात माहीत होती तरीही ती आमच्या घरचं धुणं-भांड्याचं काम करीत होती.

आमच्या घरी आपली बहीण धुणीभांड्याचं काम करते हे तिच्या भावाला मुळीच खपत नसे. तो स्टेशनात मालधक्क्यावर रोजानं हमाली करायचा. त्यात त्याची बहीण चार घरची धुणंभांडी करून भाऊ म्हणून त्याला एक वेळेला जेवण घालायची.

तो भाऊ आपल्या बहिणीला बोलायचा, 'म्हाराच्या घरी भांडी का घासतेस? तुला दुसरीकडे काम मिळत नाही का?' ......

पण ती बाई हुशार, जाणती होती. ती त्याला स्पष्ट सांगायची, 'आरं, मी त्यांची जात बघत बसत न्हाय. ती मला माहीत पण न्हाय. पण तो माणूस वकील हाय. त्याची बायको डॉक्टरी शिकतेय. मुलं इंग्रजी शाळेत जातात. ती माणसं मोठी हायेत. त्यांची जात काय बघतोस?'

पण तो स्पष्ट म्हणायचा, '... तू त्यांचं काम सोड. काम सोडलं नाहीस तर तुझं–माझं नातं संपलंच बघ!'

असंच कायकाय त्या बहीणभावांचं बोलाचाल– भांडण व्हायचं. ते सगळं ती बाई माझ्या पत्नीला सांगायची ... माझ्या पत्नीला हा एकएक अनुभव नवा होता. तिला हे सहन होत नव्हतं. ती अशा प्रसंगी मागचा–पुढचा विचार न करता माणसाच्या अंगावर मारायला धावायची. कुणी जातीचं, शिवाशिवीचं बोललं की त्या माणसावर संतप्त, त्रस्त व्हायची. त्याच्या तोंडावर फाडफाड बोलायची. त्याचा बोलून धडधडीत अपमान करायची.

त्यातच ती बाई माझ्या पत्नीला तिच्या भावाचा आग्रह सांगायची. तेव्हा माझी पत्नी तिला स्पष्ट सांगायची, 'तू आमचं काम सोड. आमची तुला जबरदस्ती नाही.' आमचं काम सोडण्याची मात्र त्या बाईची तयारी नव्हती.

असाच एक दिवस. रात्रीच ती बाई आमच्या घरात आली व माझ्या पत्नीला म्हणाली, 'बाई, माझ्या भावाचा मला लय जाच हाय वो. तो म्हंतो यांचं काम सोड.'

तोच माझी सौभाग्यवती बोलली, 'मग सोड. कशाला आमचं काम करतेस?'

'तसं नाय बाई ! मला तर तुमचं काम सोडायचं नाय !'

'तसं आहे तर मग कर.'

त्यावर ती बाई विचार करून म्हणाली, 'बाई मी तुमचं काम भल्या पहाटेच येऊन करीन, कुणी झोपून उठायच्या आत.'

'तू कशाला त्रास घेतेस?' माझ्या पत्नीचा तिला खडा सवाल.

'तरास कसला बाय? ते आमी पोटापाण्यापाय करतोय. आमाला तर जगलं पाईजे का नव्हं?'

'अग तुला रोज पहाटे कसं काम जमंल?'

'सगळं जमंल. पोटासाठी काय करता वो?'

ती कामवाली रोज नियमाने पहाटे चारलाच आमचं दार ठोठावायची.

'बाई, मी भांडीवाली आलीय, दार उघडा!' रोजच पहाटे उठून बसायचं. तिला भांडी, धुणं द्यायचं. तिची वाट पहात बसायचं. असं आम्ही जातीच्या चरकात घावलो होतो. रोजच अशी ती चोरून भांडी घासायची. तिला कामाचा पुरा दाम देऊन आम्हाला हा त्रास, दगदग. शेवटी संतापून माझ्या पत्नीनं तिचं काम वंद केलं. तिच्या जातीच्या पाशातून मोकळे झालो.

## पत्नी

(वकील होऊन पुण्यात राहू लागल्यावर) मी काही दिवसांनी माझ्या आईला बोलावून घेतले. ती घरात पोटापाण्याचं करत असे. माझ्या आईचं आयुष्य गावरानी गेल्यामुळे तिला पुण्यासारख्या शहरात, मी रहात असलेल्या खोल्यांत कोंडल्यासारखं बांधून ठेवल्यागत होत असे. पुण्यात बोलायला, बसायला जवळचा शेजार नसल्यानं तिला करमत नसे. ती मनात झुरायची. त्याचा परिणाम तिच्या प्रकृतीवर होत असे. ती कधी कधी एकटीच दुचित बसायची. त्यातच पुन्हा तिचं माझ्यामागं टुमणं होतं की तू आता लग्न करावं. त्यात तिच्या मनाचा हेतू स्पष्ट दिसत होता. सून आपल्या हाताखाली राबणारी, नांदणारी अशीच असावी. अर्थात प्रत्येकाच्या आईला वाटतं तसंच माझ्याही आईला वाटत होतं. पण माझ्या आईचे हे विचार मला अजून पटत नव्हते. त्या काळी आमच्या समाजात मुलीही फार शिकलेल्या नसत. मॅट्रीकपर्यंत गेलं का डोक्यावरून पाणी गेलं असंच मलीच्या आईबापांना वाटे. क्वचित मुली कॉलेजात जात. निदान मॅट्रीकपर्यंत तरी शिकलेली मुलगी पहावी असा माझा विचार होता. त्यामुळे माझ्या व आईच्या विचारांत भिंत उभी रहायची.

'बाबा, लवकर लगीन कर! आमच्या डोळ्यांदेखत तुज्यावर तांदूळ पडू देत!' असा आईचा माझ्यापाठीमागं सारखा धोशा लागला होता. त्यात माझंही वय तीस वर्षांचं झालं होतं. लग्न करावं असं माझ्याही मनानं घेतलं होतं. पण आपल्याला अनुरूप मुलगी मिळावी अशी माझी अपेक्षा होती.

त्यातच मी समाजकार्य व राजकीय पक्षात जबाबदारीच्या जागी काम करीत होतो. त्या दृष्टीनं मुलगी मिळाली तर ती मला पूर्ण जाणणारी असावी अशीही माझी इच्छा होती. लग्नाच्या पसंतीच्या बाबतीत माझे ठाम असे विचार होते. 'आपण जरी मुलीला पसंत केलं, तरी मुलीनीही आपल्याला पसंत करावं' असा हा माझा विचार. पन्नास टक्के पसंती नसावी. नाहीतर भावी जीवनात अनेक प्रश्न निर्माण होतात. जीवनात योग्य साथी न मिळाल्यानं लोकांची जीवनं कशी उध्वस्त होतात याचा अनुभव मला वकिलीत आला.

माझे एक मित्र केशव भालेराव यांनी त्यांच्याच नात्यातील मुलीचं स्थळ

मला सुचवलं. त्या मुलीचं आडनावही भालेरावच. केशवनं मला मुलीच्या रंगाबद्दल, वडिलांच्या चांगल्या खानदानी घराण्याबद्दल पुन्हा पुन्हा सांगितले होते. म्हणून मी केशवराव यांच्याबरोबर खडकीला मुलीच्या घरी गेलो. अर्थात् मी मुलीला पहावयास आलो आहे याची त्या घरी मुलीला, मुलीच्या आईबापांनाही कल्पना दिली नव्हती ... त्यांच्याकडं गेल्यावर मुलीला पहाण्याचा योग आला. मुलगी एस्. एस्. सी. ला बसलेली, गौरवर्णी, शेलाटी, रूपाने चांगली. मी मुलीला पाहिल्यावर मनातून पसंत केलं. तिचं नाव शकुंतला. ... एकदा केशवने भास्करराव भालेराव यांना माझ्या घरी बोलावले. ... त्यांच्याशी मुलीबद्दल केशव बोलला. त्यावर भास्करराव सरळच बोलले, 'ठीक. पण मुलीला पुढं शिक्षण घ्यायचं आहे!'

'लग्नानंतर शिक्षण घेईल' असं केशवनं सुचवलं.

'हो. तसंही करता येईल. लग्नानंतर शिक्षण घ्यायला काहीच हरकत नाही!' असंही मी बोललो. एवढंच फक्त बोलणं झालं. पुढं केशव भालेराव यांच्याबरोबर खडकीला भास्करराव भालेराव यांच्या घरी अधूनमधून जात असे. खडकीला त्यांच्या घरी येण्याचा माझा हेतू मुलीच्या —शकुंतलेच्या— ध्यानात आलेला असावा. मला नंतर केशवकडून कळले की मुलगी लग्नाला मुळीच तयार नाही. तिला पुढं शिक्षण घ्यायचं आहे, म्हणून मुलगी लग्नाला तयार नाही.

मुलीच्या निर्णयानं मी गप्प बसलो. मुलीचा हा निर्णय बरोबरच होता. मलाही माझ्या निर्णयाचं पक्कं स्मरणं झालं ... मुलीचा ठाम निर्णय होता, 'मला लग्न करायचं नाही, पुढचं शिक्षण घेऊन डॉक्टर व्हायचं आहे ...' मुलीच्या इच्छेविरुद्ध जाऊ नये अशीच माझी भूमिका होती. असेच वर्ष गेले. शकुंतलेच्या मनाची समजूत कुणीच काढू शकत नव्हते. सर्वांचे मार्ग बंद झाले होते. तोपर्यंत मुलगी एस्. एस्. सी परीक्षा पास झाली. तिला कॉलेजमध्ये जायचे होते.

शेवटी मुलीच्या आईबापांनी व नातेवाइकांनी शकुंतलेचे मन लग्नासाठी वळवले हेही मला केशवने सांगितले. मुलीची एक अट अशी की, 'भावी नवरदेवाने मला डॉक्टर होईपर्यंत शिक्षण दयावं. तसं लेखी स्टँपपेपरवर लिहून दयावं.'

मुलीची ही अट मला मान्य होती. लग्नानंतर मुलीनं पुढचं शिक्षण घेतलं तर उत्तमच, सोन्याहून पिवळं झालं असं मलाही वाटलं. मी स्टँपपेपरवर लिहून दयावयास कबूल झालो. माझं लग्नाचं घोडं इथपर्यंत आलं.

साखरपुडयाचा दिवस निश्चित झाला... स्वतः श्री. जी. के. माने (माजी खासदार) व श्री. दादासाहेब रूपवते मुलीच्या घरी दुपारीच गेले होते, पण ते काय सायंकाळी सहा वाजेपर्यंत परत आले नाहीत. इकडे साखरपुडयाच्या तयारीत माझ्या घरचे व मित्र वाट पहात बसले होते. पण मुलीच्या घरी गेलेल्या माझ्या मित्रांचा पत्ताच नव्हता. मला वाटले, पुन्हा काहीतरी आडफाटा आला असणार. मुलीनंच काहीतरी शंका उभी केली असणार....

सायंकाळी सात वाजता श्री. जी. के. माने व श्री. दादासाहेब ता. रूपवते

हसऱ्या चेहऱ्याने परत सोमवार पेठेत घरी आले. श्री. रूपवते त्यांच्या भाषेत सहज बोलले, 'मुलगी म्हणजे भारी काम आहे. तिच्यापुढे आम्ही नांगी टाकली. तिच्या-पुढे आमची काही मात्रा चालेना'... असं सांगून श्री. रूपवते हसायला लागले. 'मुलीची लग्नाला तयारी नाही. नवऱ्यामुलानं लिहून दिलं तरी ते कामापुरतं लिहून देतील व पुढं उलटतील, त्यांच्या लिहून देण्यावर माझा विश्वास नाही. माझं शिक्षण पूर्ण झाल्यावरच मी लग्नाचा विचार करीन' असं माने म्हणाले.

साखरपुडा असा पाण्यात विरघळला... अचानक चार–सहा महिन्यांनी श्री. केशव यानं निरोप आणला, 'मुलगी आता लग्नाला तयार आहे. पण नवऱ्या मुलानं मला पुढचं शिक्षण दिलं पाहिजे असं तिला लिहून पाहिजे.'

अर्थात् ही अट मला मान्य होतीच. शेवटी साखरपुडचाचा दिवस ठरला. साखरपुडा झाला. त्या वेळी शकुंतला फर्स्ट इयर सायन्सला फर्ग्युसन कॉलेजात शिकत होती.

दोन्ही बाजूंच्या संमतीने लग्नाचा दिवस ठरला आणि १० एप्रिल १९५५ रोजी आमचे लग्न झाले. लग्नात देण्याघेण्याबाबत उभयपक्षी काहीच अट नव्हती. ...१० एप्रिल १९५५ रोजी पुण्यात महाराष्ट्र शेडयूल्ड कास्ट्स फेडरेशनच्या कार्य-कारिणीची बैठक घेतली होती. ह्या सर्व नेते–कार्यकर्त्यांचं माझ्या वऱ्हाडात रूपां-तर झालं. पुण्याहून बसनं आम्ही खडकीला गेलो.

शेवटी समाजाच्या रीतिरिवाजाप्रमाणे लग्नविधी पार पडले. लग्नमंडपात लोकांनी आमच्यावर अक्षता टाकल्या. लग्न तसं व्यवस्थित पार पडलं. सून पाहून माझ्या आईला आनंद झाला.

### शेजारी व मुली

माझ्या दोन लहान मुली कॉन्व्हेंट स्कूलमध्ये जाणाऱ्या. त्यांना जातपातीचा काहीच पत्ता नव्हता, तशी माहिती असायचा काहीच प्रश्न नव्हता. त्यात माझी पत्नी शकुंतला सेकंड इयर एम्. बी. बी. एस्. ला शेवटच्या टर्मला होती. रविवारचा दिवस. आम्ही सगळेच घरी होतो. माझ्या मुली उज्ज्वला व दीपा वरच्या मज-ल्यात नेहमीप्रमाणे खेळायला गेल्या. त्यांचं खेळणं झाल्यावर त्या जिना उतरून खाली आल्या व सरळ घरात आल्या. त्या वेळी मी बाहेर उभा होतो. माझी पत्नीही बाहेरच पायरीवर बसली होती. ती बसल्या बसल्या वर जिन्याकडे पहात होती. माझ्या मुली जिन्यावरून उतरताच वरच्या मजल्यातल्या माणसानं जिन्यात बाद-लीनं पाणी टाकलं. याकडे माझ्या पत्नीचं लक्ष होतं. तिला काय शंका आली, तिनं मला सहज विचारलं, 'अहो, वरच्या माणसानं जिन्याच्या पायरीवर पाणी का टाकलं?'

त्यावर मला एकदम स्ट्राइक झालं व पत्नीला विचारलं, 'आपल्या मुली

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
3284
24-5-86

आताच वरून खेळून आल्या?'

'हो आल्या.'

'मग वरच्या माणसानंच पायरीवर पाणी टाकलं असलं तर पाणी टाकून त्यानं पायऱ्या शुद्ध केल्या असतील.'

'पण का?' माझ्या पत्नीचा प्रश्न.

'त्यांना विटाळ होईल म्हणून त्यांनी पायऱ्यांवर पाणी टाकलं असेल. तसं ते सोवळं पाळतात.'

हे ऐकून माझ्या पत्नीला भलताच संताप आला होता.

**पत्नी डॉक्टर होते**

माझ्या सौभाग्यवतीला इंटर सायन्सला चांगले मार्क्स मिळाले. तिला पुण्याला बी. जे. मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला. घरप्रपंच करायचा व मेडिकल कॉलेजमध्ये एम्. बी. बी. एस्. चा कोर्स करायचा अशा बिकट वाटेनं तिचा प्रवास सुरू झाला. डॉक्टर होण्याची माझ्या पत्नीची मुळापासून महत्त्वाकांक्षा. आपल्या ध्येयाच्या दिशेनं ती मोठ्या जिद्दीनं, आत्मविश्वासानं पावलं टाकीत होती. मार्गातील सर्व अडचणींना तोंड देत होती. त्याचा परिणाम तिच्या शरीरप्रकृतीवरही झालेला होता.

माझ्या लहान मुलीला, उज्ज्वलेला सांभाळण्यासाठी माझी आई गावाहून पुण्यास येत होती. दोनदोन महिने राहून परत जात होती. कारण तिला पुण्यात-पुण्यातील रहात्या खोल्यांत कोंडल्यागत होत होतं, रानपाखराला पिंजऱ्यात डांबल्यागत. म्हणून ती जातयेत होती.

कॉलेजचं शिक्षण करीत असताना, तिला घरप्रपंच व कॉलेजच्या दिव्व्यातून जसं जावं लागलं तसं जातीच्या चक्रव्यूहातूनही जावं लागत होतं. मेडिकल कॉलेजमध्ये जसा काही चांगला, जातपात न मानणारा 'स्टाफ' असे, तसेच काही मनातून जात मानणारेही असत. मेडिकल कॉलेजमध्ये असताना या जातिभेदानं तिचा सारखा पाठलाग केला होता. त्याचा परिणाम तिच्या अभ्यासावर होत होता. मात्र काही चांगल्या प्राध्यापकांनी सतत उत्तेजन दिले, मार्गदर्शन केले, त्यामुळेही तिला ध्येयाची पुढची वाटचाल करायला सतत स्फूर्ती मिळत गेली. तिला जातीची कोंडी फोडण्यासाठी एम्. बी. बी. बस्. च्या पहिल्या वर्षापासून ते शेवटची डिग्री मिळेपर्यंत सतत झगडावे लागले, संघर्ष करावा लागला.

माझी पत्नी तशी बऱ्या परिस्थितीत वाढलेली. जन्म पुणे खडकीचा. जन्मापासून जीवन पुणे–खडकीत मिश्र वस्तीत गेलेलं. त्यात तिचे वडील पोलीस डिपार्टमेंटमध्ये. त्यामुळे माझ्या पत्नीला तसा जातीचा स्पर्श झालेला नव्हता. त्यामुळे तिला जात व जातीचे गुणधर्म तसे माहीत नव्हते. अशा अवस्थेत जीवन जगलेल्या माझ्या पत्नीला जातीचा चक्रव्यूह किती अवघड आहे याची कल्पना आली, तिला

जातीच्या नावावर कुणी अपमानकारक बोलले त्याला तिने तशीच तडकाफडकी चिडून उलटी उत्तरेही दिली. त्याच्या परिणामाची तिने कधीच कदर केली नाही.... अशांना माझी पत्नी उलट तडकवीतही असे.

माझी पत्नी सौ. शकुंतला शंकरराव खरात ही मेडिकल कॉलेजमधून शेवटच्या एम्. बी. बी. एस्. च्या परीक्षेत पास झाली. तिला एम्. बी. बी. एस्. ची डिग्री मिळाली. मोठ्या दिव्व्यातून, सर्व प्रकारच्या अडीअडचणींना तोंड देऊन, लोकांचा कुत्सितपणा सोसून एम्. बी. बी. एस्. ची डिग्री मिळवल्यावर माझ्या सौभाग्यवतीला आनंद झाला. 'डॉक्टर' होण्याची तिची महत्त्वाकांक्षा पूर्ण झाली.

आता माझ्या घरातच माझी पत्नी सौ. शकुंतला ही डॉक्टर आहे. पुणे कार्पोरेशनच्या हेल्थ डिपार्टमेंटमध्ये मेडिकल ऑफिसर म्हणून ती काम करीत आहे. मी वकील झाल्यामुळे माझ्या समाजाला जसा माझा उपयोग झाला तसा तिचाही उपयोग समाजाला होत आहे.

**व्हाइस चॅन्सेलर म्हणून नेमणूक झाल्यावर –**

शकुंतला मात्र काळजीत पडली. ती मला म्हणाली, 'तुम्हाला जर सरकारला व्हाइस चॅन्सेलरच करायचं तर पुणे विदयापीठाचा का नाही?'

**अर्पणपत्रिका**

मला लेखनकार्यात सतत प्रोत्साहन देणाऱ्या माझ्या पत्नीस, सौ. शकुंतलेस.

मी माझे पूर्वायुष्य माझ्या पत्नीला जेव्हा सांगत असे तेव्हा ती ते ऐकून आश्चर्यचकित व्हावयाची. ती शहरी जीवनात वाढलेली व जगलेली असल्याने तिला माझ्या अनुभवाचे जग सगळे नवीन वाटत होते. माझे विलक्षण अनुभव ऐकून माझ्या पत्नीने– सौ. शकुंतलाने मला आत्मचरित्र लिहिण्यास सांगितले.

REFBK-0025524

आईनं बोर्डिंगात किती कष्ट उपसलेले ! तिनं थापलेल्या भाकरींची चवड रचली तर डोंगराएवढी होईल आणि ह्या भाकरीनं आम्हाला आयुष्यभर छळलेलं. पोटाची आग विझवण्यासाठीच आईनं हे दिव्य केलेलं. चुलाण्याच्या ढणढणत्या उजेडात विस्तवाच्या धगीपाशी ती बसलेली. सारी स्वैपाकखोली धुरानं कोंडलेली जशी काय गॅसचेंबर !

बलुतं

एकाएकी कालवा वाढला. बा सगळ्यांच्या म्होरं हुता. त्याच्या मागं आई. आईच्या आंगात चोळी नव्हती. बाचं आंगारकं घातलं हुतं. लुगड्याच्या चिंध्या लोंबत हुत्या. बा नुसत्या धोतरावर व्हता. साऱ्या अंगावर काळंशार वळ उठलं होतं ... आई बोंब मारत होती ...

उपरा

दाजी लई मायचं ऐकून चिडायचा व मज्या आक्काला जे बेहद मारायचा ते कधीकधी तिचं डोस्कं फुटायचं व रगत भळ्ळ येयाचं भाईर.

आठवणींचे पक्षी

मी म्हनू ह्योंच्या घरात दिवस काड्लं. लगन झाल्यापासून ह्या घरात मी हाल काडताय्. कदी आंगावर चांग्ला कप्डा मिल्ला नाय, का कोनाचा सुकाचा सब्द नाय ! माज् रडरड रडवलानी हाय ! हळद न्हाल्यापास्ना ह्योनं माज् कस्ला ता सुक देलान नाय!

मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे

भुकेच्या आगीत सापडलेली स्त्री वा मुलगी हिच्या हातात रुपया पडला किंवा आडाशीरी–पायली धान्य ओटीत पडले तर ती त्यापायी आपला देह विटाळून टाकते. त्या क्षणी भुकेल्या पोटी ती शीलाची राखरांगोळी करते ... आला दिवस गेला. दुसऱ्या दिवसाची पुन्हा काळजी ... मग त्या रुपया– दोन रुपयांची पुन्हा आठवण होते.

वेश्याव्यवसायाचा दारिद्र्य हा मूलभूत पाया आहे.

तराळ– अंतराळ

मूल्य : पंचाहत्तर रुपये